म. ग्रं. सं. ठाणे.
विषय चरित्र
सं. क्र. १२२६
REFBK-0014451
REFBK-0014451

# आमचा जीवनप्रवास

( कै. सर मोरोपंत जोशी व कै. सौ. यशोदाबाई जोशी यांच्या सहजीवनाचे हृदयंगम चित्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८६३९ वि: चरित्र
क्रमांक १२२६ नों. दि. २४।७।६५

REFBK-0014451
REFBK-0014451

☆

कै. सौ. यशोदाबाई जोशी

: एकमेव वितरक :

**व्हीनस प्रकाशन**, ‘ तपश्चर्या ’

३८१ क, शनिवार पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति जानेवारी १९६५

* * *

**मूल्य ८ रुपये**

प्रकाशिका : श्रीमती माणिकबाई भिडे, कँप उमरावती.

मुद्रक : य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.) आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे २.



सर मोरोपंत जोशी, Kt. K. C. I. E.
( वय ६५ )



सौ. यशोदाबाई जोशी (वय ५८)

# निवेदन

माझ्या परमपूज्य मातुःश्रींनी ( श्री. सौ. यशोदाबाई जोशी यांनी ) माझ्याकडून लिहवून घेतलेले त्यांचे " आमचा जीवनप्रवास " हे आत्मचरित्र वाचकांपुढे सादर करिताना आज माझ्या हृदयात त्यांच्याबद्दलच्या अनेक पवित्र भावना जागृत होऊन मन भारावून जात आहे. त्यांची ती प्रेमळ सुंदर मूर्ती, जी इतक्या दीर्घ आजारातही तेजस्वी व प्रसन्न राहिली होती, व केवळ 'आपल्या कुटुंबियांच्या मार्गदर्शनासाठीच' तिने जे लेखन सुरू केले व 'हे छापू नाही' म्हणून बजाविले, ते छापण्यास कसे द्यावे, हा प्रश्न माझ्या मनाची सारखी तळमळ करीत होता. हे लेखन का छापू नये याची कारणे त्यांनी स्वतः लिहवून घेतलेल्या प्रास्ताविकात आहेतच. परंतु त्यांची सर्वांत वडील व लाडकी नात इंदुमतीराजे राजवाडे यांच्या अत्याग्रहामुळे हे छापण्याची मी इ. स. १९६२ मध्ये हिंमत बांधली व त्यावेळी मला आतून असे स्पष्ट वाटले की, 'हे छापल्याने आपल्या प्रिय नातीची हौस पुरविली जात आहे' असे माझ्या परमपूज्य मातुःश्रींच्या आत्म्यास वाटून ते छापल्याचा त्यांना विषाद वाटणार नाहीं.

या लिखाणाबद्दल काही थोर साहित्यिकांचा मी सल्ला घेतला व त्यांनी त्याबाबत मला प्रोत्साहन दिले. सुविख्यात साहित्यिक श्री. आत्माराम रावजी देशपांडे ( कवि अनिल ) यांना मी ह्या आत्मचरित्राची प्रस्तावना लिहिण्याची विनंती केली. ती त्यांनी आनंदाने व आपुलकीच्या भावाने मान्य केली. त्यांनी आपल्या अनेक महत्त्वाच्या कामगिऱ्यांतून आपला बहुमोल वेळ काढून ही प्रस्तावना फार लवकर लिहून दिली याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके मला अपुरेच वाटत आहेत. त्याबद्दल श्री. आ. रा. देशपांडे यांची मी सदैव ऋणी राहीन.

माझ्या परमपूज्य मातुःश्री त्यांच्या आयुष्याची शेवटची १३–१४ वर्षे बिछान्याला जवळजवळ खिळलेल्या होत्या. इ. स. १९४० च्या सुमारास त्यांनी त्यांच्या आत्मचरित्र-लेखनास का सुरुवात केली हेही त्यांच्या स्वतःच्या प्रास्ताविकात आहेच. त्यांच्या स्मृती निर्मळ ( clear ) होत्या. स्वतःच्या हकीगती सांगताना त्या तन्मय होत व स्वतःच्या प्रकृतीचे अस्वास्थ्य त्यावेळीं विसरून जात. त्या प्रसंगी त्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टी मी भराभर लिहून घेत असे. अमुक एक मजकूर लिहावा किंवा नाही ह्याबद्दलही मी त्यावेळीं विचार केला नाही. अशा तऱ्हेने लिहिताना नऊशेच्या जवळपास ताव होऊन गेले. तेव्हा छापण्याच्या दृष्टीने त्यांतील विशेष खाजगी मजकूर–म्हणजे जो त्यांच्या निकटच्या कुटुंबियांनाच फक्त आवडेल व महत्त्वाचा वाटेल, तो सोडून बाकीचे लिखाण मूळच्याच भाषेत कसे संक्षिप्तात लिहावे

याबाबत मी श्री. अ. म. जोशी ( ग्वाल्हेरचे नामवंत प्राध्यापक व साहित्यिक ) यांना विचारले व त्याबाबत त्यांनी आपला अमूल्य वेळ खर्च करून मला खुषीने व आस्थापूर्वक साहाय्य केले, ह्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

माझे परमपूज्य मातापिता यांच्यात स्वदेशसेवा व स्त्रियांची सर्वांगीण उन्नती ह्यांबद्दल पराकाष्ठेचा जिव्हाळा व कळकळ होती. ह्यासाठी ती सर्व बाजूंनी सर्व तऱ्हेचा स्वार्थत्याग करण्यास तयार असत. आम्हां त्यांच्या कन्यांना सुविद्य करून त्यांची लग्नमर्यादा अठरा वर्षांच्यावर वाढविणे त्यांच्या काळात फारच कठीण होते. त्याबद्दलची कल्पनाही आताच्या काळात ( १९६५ ) कुणाला येणार नाही. इतकेच नाही तर स्त्रीशिक्षण ही इतकी साधी व सोपी दिसणारी गोष्ट व्यवहारात उतरविताना इतका लोकापवाद व संकटे मार्गात येत असत, हे कदाचित खरेही वाटणार नाही. पण त्या काळात मी मी म्हणविणाऱ्या मोठ्या सामाजिक सुधारकांना देखील आपल्या मुलींची लग्नमर्यादा वाढवून त्यांना विद्यासंपन्न करण्याचा हिय्या होत नव्हता. मुलांच्या बरोबरीने मुली श्रेष्ठ विद्या संपादून उत्तम नागरिक बनू शकतील, व राष्ट्राच्या हितास त्याची अत्यंत आवश्यकता आहे, हे त्या काळच्या जनतेस माझ्या आईवडिलांना प्रथम प्रस्थापित करून दाखवायचे होते, व म्हणून त्यांनी ‘ आधी केले मग सांगितले ’ ह्या उक्तीनुसार, त्याबाबतचे उदाहरण आपल्या स्वतःच्या मुलींवर यशस्वी करून दाखविण्याचा पक्का निश्चय केला. त्यासाठी लोकांकडून अपरिमित निंदा व नानातऱ्हेची दूषणे सहन करावी लागतील, व त्या प्रखरतेची झळ आपल्या मुलींना, त्यांच्या कोमल अशा लहान वयापासूनच सोसावी लागेल, याची त्यांना जाणीव होती, व त्यासाठी विशेषेकरून माझ्या मातुश्रींना प्रथम फार मानसिक कष्ट झाले. पण ते सर्व त्यांनी धैर्याने सहन करून आपला संकल्प, न डगमगता शांतीने तडीस नेला. त्यामुळे महाराष्ट्रात तरी स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीस जोराची चालना मिळाली, असे त्यांचे अनेक विद्वान हितचिंतक म्हणत असत.

माझी वाचकांस सविनय नम्र विनंती आहे की, त्यांनी ह्या आत्मचरित्राकडे प्रेमाने व आपुलकीच्या भावाने बघावे. जुन्या रूढींच्या चाकोरीतून नव्यात प्रवेश करण्याच्या संक्रमणाच्या काळात, आपल्या देशाच्या जनतेत कसकशा अनेक तऱ्हेच्या प्रतिक्रिया होत गेल्या, ह्याचे सरळ व शुद्ध भावाने केलेले चित्रण या लिखाणात बरेच पाहण्यास मिळेल.

उमरावती<br>
दि. १०-१-१९६५<br>
मकरसंक्रमण

**माणिकबाई भिडे**

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक ३८४३१ दि: २५-६-५५
१२२८

# प्रस्तावना

" आमचा जीवनप्रवास " हा कै. सौ. यशोदाबाई ( आक्कासाहेब ) जोशी ह्यांनी निवेदन केलेला त्यांच्या आणि कै. डॉ. सर मोरो विश्वनाथ ( अण्णासाहेब ) जोशी ह्यांच्या सहजीवनाचा वृत्तांत आहे. त्याला प्रस्तावना लिहिण्याचा माझा अधिकार नाही. कुसुमच्या ( कै. सौ. कुसुमावती देशपांडे ह्यांच्या ) मातु:श्री श्रीमती सीताबाई जयवंत ( माई चिटणीस ) ह्या आक्कासाहेबांच्या मानलेल्या कन्या. त्यांचे वडील कै. मल्हार खंडेराव ( दादासाहेब ) चिटणीस हे अण्णासाहेब जोशांचे बंधुतुल्य मित्र व सहाध्यायी होते. आक्कासाहेब व अण्णासाहेबांच्या सर्व मुलींनी लहानपणापासून माईंना आपली वहीणच मानले आणि त्या भगिनीच्या नात्यात प्रेमळ मैत्रीची भर घातली. कुसुमावती आज असती, तर ही प्रस्तावना तिनेच लिहिली असती. आता मी लिहावी ही आक्कासाहेबांच्या कन्या श्रीमती माणिकबाई भिडे ह्यांची इच्छा मी अगत्याने आणि आनंदाने मान्य केली. तसे पाहिले तर ह्या सुविख्यात जोशी घराण्याशी निकट संबंध आलेल्या काही थोर व्यक्ती महाराष्ट्रात अजून आहेत. त्यांनीच ही प्रस्तावना लिहिणे योग्य झाले असते. हे कार्य मजकडे येण्यात माझ्या थोड्याबहुत साहित्यसेवेच्या कौतुकाचा आणि आपुलकीचा भाव अधिक आहे. त्याचा आरंभीच कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे मला अवश्य वाटते.

मराठीत चरित्रलेखनाची परंपरा पूर्वीपासून असली तरी आधुनिक आणि अगदी अलीकडच्या काळात तिची पुष्कळच वाढ झाली आहे आणि ती खूप बदलली आहे. आता चरित्र हा एक महत्त्वाचा साहित्यप्रकार मानला जातो. त्याचे विविध रूपाविष्कारही विकसित होऊ लागले आहेत. आधुनिक थोर व्यक्तींची परिश्रमपूर्वक लिहिलेली चरित्रे आणि ऐतिहासिक काळातील संस्मरणीय विभूतींची संशोधन करून चिकित्सात्मक दृष्टीने लिहिलेली चरित्रे हे त्या विकासाचे एक अंग, आणि आत्मचरित्र हे दुसरे.

आत्मचरित्र तर चरित्र-साहित्याचा एक आविष्कारच होत आहे. रमाबाई रानडे ह्यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' आणि लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे' ह्या कृतींनी आपल्या लालित्यगुणांनी मराठीत अभिजात साहित्याचे अढळ स्थान मिळविले आहे.

आत्मचरित्राचे स्थूलपणे दोन प्रकार दिसून येतात. एक 'स्वचरित्र' आणि दुसरा 'सहचरित्र'. स्वचरित्रात 'स्व' ला प्राधान्य असते आणि इतर व्यक्तींचे आणि घटनांचे त्या 'स्व' च्या सापेक्षतेत निदर्शन केलेले असते. सहचरित्रात ते लिहिणारी व्यक्ती, जिच्या सहवासात तिचे जीवन गेले, त्या व्यक्तीलाच प्राधान्य देते

आणि तसे करताना स्वतः विरून जाते किंवा क्रिया-प्रतिक्रियांच्या आलेखासारखी उरते. अशी चरित्रे प्रायः स्त्रियांनी पत्नी या नात्याने पतीविषयी लिहिलेली असतात. पण उलटही असू शकते; उदाहरणार्थ श्री. पु. बा. काळे ह्यांनी लिहिलेले "अनसूयाबाई आणि मी" हे सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण चरित्र. सहजीवन, गुरु-शिष्य, प्रिया-प्रियकर, स्नेही-मित्र, बंधु-भगिनी आणि अशाच नात्यांचे असू शकते; म्हणून सहचरित्रात तितके विविध पैलू दिसू शकतील.

आक्कासाहेब जोशी ह्यांचा 'आमचा जीवनप्रवास' हे भारतीय संस्कृतीच्या विशिष्ट मूल्यांनी निर्माण केलेला स्त्रीजीवनाचा आणि सुगृहिणीचा आदर्श सतत पुढे ठेवणाऱ्या कर्तृत्ववान पत्नीने निवेदन केलेले आपल्या पतीचे, आपले आणि आपल्या कुटुंबातील सहजीवनाचे सहचरित्र आहे. ते सरळ आणि ऋजु पद्धतीने वर्णन केलेले आहे. आक्कासाहेबांना साहित्याचा व्यासंग नव्हता, पण त्या बहुश्रुत आणि सुसंस्कृत होत्या. त्यामुळे त्यांच्या निवेदनशैलीत सहजपणाचा आणि अकृत्रिम-पणाचा ओघ जितका जाणवतो तितकीच प्रौढताही.

अण्णासाहेबांच्या यशस्वी कर्तृत्वाने आणि कीर्तीने त्यांच्या कुटुंबाला वऱ्हाडात आणि तेव्हाच्या मध्यप्रांतात फार मानाचे स्थान मिळाले आहे. निकटवर्तीयांना त्यांच्या घराण्याबद्दल आदरयुक्त अभिमान वाटायचा आणि इतरांना आस्थापूर्ण जिज्ञासा असायची. त्यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी दाट परिचय असणाऱ्या व्यक्तींना आक्कासाहेबांचा हा जीवनप्रवास वाचताना आपण पूर्वीच्या घटनांचा एक वास्तव चित्रपट पाहत आहोत असेच वाटेल. इतरांना त्यांनी दुरून पाहिलेल्या आणि ऐकिलेल्या घटनांची इत्थंभूत माहिती मिळाल्याचा आनंद होईल.

माझे वडील उमरावतीलाच स्थायिक झाल्यामुळे लहानपणापासून मला खापर्डे, मुधोळकर आणि जोशी ह्या उमरावतीला भूषणभूत झालेल्या घराण्यांची माहिती होती. अण्णासाहेबांचा टेकडीवरचा बंगला तर मला उमरावतीचे एक सुंदर स्थळ-चिन्ह (लँडमार्क) वाटायचा. मी अकरा वर्षांचा होतो तेव्हापासून म्हणजे १९१२ पासूनच्या पुढच्या सर्व घटना मला चांगल्या आठवतात. डॉ. नागूताई जोशी (श्रीमती लक्ष्मीबाई राणी राजवाडे) विलायतेहून परत आल्या तेव्हा मासिक मनोरंजनाच्या एका अंकात त्यांचा सचित्र परिचय आला. त्याचे तर पानन् पान आजही डोळ्यांसमोर उभे राहते. १९२५ साली मी उमरावतीलाच वकिली सुरू केल्यावर अण्णासाहेबांचा आणि त्यांचे पुत्र आबासाहेब आणि कै. बाळासाहेब ह्यांचा जास्त संबंध आला, व तो कुसुमावतीशी विवाह झाल्यावर आणखी वाढला. त्यामुळे ह्या 'जीवनप्रवास' मधील घटना वाचण्यात मला खूप स्वारस्य वाटले.

असे चरित्रपर लेखन पारिवारिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आणि आवडणारे असले तरी त्याचे साहित्यात स्थान कोणते आणि कार्य काय हा प्रश्न आजच्या वाचक वर्गासमोर उभा राहू शकतो. ते स्थान ललित साहित्यात तसेच ललितेतर साहित्यात

असू शकते. ललित साहित्यातले स्थान निवेदनशैली, भाषासौंदर्य, रंजकत्व इत्यादी गुणांच्या प्रमाणांनी निश्चित होते. सरळ ओघपूर्ण निवेदन हीसुद्धा एक शैली आहे. सहज घरगुती भाषेतही सौंदर्य जाणवते. कौटुंबिक जीवनातले सुखसोहाळे, तसेच दारुण शोककारक घटना ह्या सर्वांत हृदयाला जाऊन भिडेल असे काही असतेच. ह्या सर्व गोष्टी ह्या निवेदनात आहेत.पण त्यापेक्षा मला अशा चरित्रपर लेखनाचे आधुनिक सामाजिक परिवर्तनाच्या ( सोशल चेंजच्या ) इतिहासाचे दाखले आणि दुवे म्हणून अधिक महत्त्व वाटते.

ह्या जीवनप्रवासाचा कालखंड ( १८६८ ते १९४८ ) महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. पेशवाईच्या अस्ताच्या वेळी महाराष्ट्रीयांचे सामाजिक जीवन स्थिरस्थित ( स्टॅटिक ) झालेले होते. त्यात पहिल्याने हालचाल होऊ लागली आणि पुढे १८५७ नंतर त्याला वेग आला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे सामाजिक परिवर्तन इतके गतिमान ( डायनॅमिक ) झाले आहे की, जे पूर्वीच्या ५० वर्षांत घडून आले नाही ते १५ वर्षांत घडून आले.

ह्या सामाजिक परिवर्तनाला १८६० ते १९२० च्या काळात चालना देणाऱ्या व्यक्तींना केवढे धैर्य दाखवावे लागले, विरोधाशी टक्कर द्यावी लागली, अवहेलना आणि निंदा सहन करावी लागली, ह्या गोष्टींची आजच्या तरुण पिढीला, त्या काळातील बारीकसारीक घटना माहीत नसल्याने पूर्ण कल्पना येऊ शकत नाही. त्यांची यथातथ्य जाणीव करून घेण्याच्या दृष्टीने अशा चरित्रातील साधनसामग्रीचा फार उपयोग होईल.

अण्णासाहेब व आक्कासाहेबांच्या सहजीवनाच्या प्रारंभकाळात एकत्र कुटुंबपद्धतीची तटबंदी शाबूत आणि खूप मजबूत होती. तिला सुरुंग लावण्याचे धैर्य येण्याच्या आधीच, उच्चवर्णीयांतही, मुलींचे ८ वर्षांच्या आत आणि मुलांचे १२ वर्षांआत लग्न उरकले जाई. जीवनाचा साचा ठरलेला असायचा. अगदी क्षुल्लक रीतिभातींच्या मर्यादा ओलांडणे गर्ह्य आणि दंडनीय मानले जाई. अशा काळात वेगळे बिऱ्हाड करणे, बायकांनी पायांत जोडा घालणे, नवऱ्याबरोबर फिरायला जाणे, स्त्रियांनी सभेला जाणे, मुलींना शिक्षण देणे आणि त्यांचे विवाह १८ वर्षेपर्यंत पुढे ढकलणे, ह्या सर्व मोठ्या धैर्याने कराव्या लागणाऱ्या सुधारणा होत्या.

ह्या सुधारणांविषयी स्थितिनिष्ठ उच्चवर्णीयांची इतकी तीव्र प्रतिक्रिया असायची की, ‘ सुधारक ’ हा शब्द जणू काही एखाद्या शिवीसारखाच ते वापरीत असत. सुधारकांची निंदा आणि त्यांच्याविषयी हरतऱ्हेच्या कंड्या पिकविणे ही तर कुटाळच नव्हे, पण एरव्ही प्रतिष्ठित मंडळींचीही एक रिकामपणची करमणूक होऊन बसली होती. अशा कंड्यांची झळ जोशी कुटुंबाला जरा अधिकच पोहोचली असणे शक्य आहे. कीर्तीसह धनसंपन्नताही प्राप्त झालेल्या कुटुंबांविषयी इतरांच्या मनात थोडा हेवाही असतो. अशा कंड्यांत सत्याचा काही अंश आहे काय हे पाहण्याची

कोणाला इच्छाच नसायची, कारण तो सापडणार नाही आणि त्यामुळे आपण आपल्या निंदाजनित आनंदाला मुकू अशी जणू त्यांना भीती वाटायची. अशामुळे कंड्या वणव्यासारख्या सारीकडे पसरत राहत. फक्त निकट परिचितांनाच माहीत असायचे की, त्यांत तथ्यांश काहीच नाही.

असे असले तरी अण्णासाहेबांसारख्या सुधारकांची भूमिका होता होईल तो स्वजनांची मने न दुखविता सुधारणा घडवून आणण्याची होती. ह्यात त्यांच्या मनातील ममत्वाचा मोठेपणाच दिसून येतो. ह्या जीवनप्रवासाच्या दुसऱ्या भागातील एक प्रसंग हे दाखवितो. लोकमान्य टिळक अण्णासाहेब जोशांना मुलाच्या मुंजीच्या जेवणाचे आमंत्रण द्यायला गेले तेव्हा त्यांनी अण्णासाहेबांना म्हटले की, तुम्ही आमच्या घरी जेवावे अशी फार इच्छा आहे, पण तुम्ही (विलायतेस जाऊन समुद्रोल्लंघनाचे) प्रायश्चित्त घेतले नाही; तेव्हा मला तुम्हांला पंगतीत बसविता येणार नाही. त्या आमंत्रणातील स्नेहपूर्णता जाणवून अण्णासाहेबांनी ते स्वीकारले आणि येवढ्या मोठ्या पंगतीत वेगळ्या मांडलेल्या पानावर ते शांतपणे जेवले.

स्वजनद्रोह न करिता व आपल्याच समाजातील माणसांची मने न मोडता सुधारणा करण्याचा हा मार्ग होता. आपल्या संस्कृतीच्या महत्त्वाच्या मूल्यांचे निष्ठा-पूर्वक जतन करायचे, त्यांचा त्याग, अनादर करायचा नाही, आणि त्यांना नवीन सुविचारांचा आणि सदाचारांचा उजळा द्यायचा ही त्या सुधारणेची भूमिका होती. मला वाटते आजही ह्याच भूमिकेची आणि मार्गाची अत्यंत आवश्यकता आहे; कारण स्वेतर संस्कृतीच्या निर्बुद्ध अनुकरणाने समाज विस्कळित होऊन स्वत्वच नष्ट होण्याचे भय वाटावे अशा गोष्टीही स्वातंत्र्योत्तर काळात फार झपाट्याने वाढू लागल्या आहेत.

ह्या जीवनप्रवासात आणखी पुष्कळच महत्त्वाची माहिती आहे. उदाहरणार्थ, महाबळेश्वरला एक पांथस्थ म्हणून आतिथ्यपूर्वक घरी ठेवून घेतलेला तेजस्वी तरुण संन्यासी, त्याच्याशी चर्चा, त्याचे रात्री ध्यानस्थ बसणे आणि तो संन्यासी म्हणजे जगद्विख्यात स्वामी विवेकानंद असणे, हा प्रसंग. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांची कुटुं-बियासारखी प्रेमळ वागणूक आणि इतर थोर लोकांच्या लहानमोठ्या गोष्टी. काही वर्णने तर नाविन्यपूर्ण आणि सरस वाटतात. १९११ च्या प्रसिद्ध दिल्ली दरबाराचे स्वतः पाहिलेले दृश्य, तेव्हा भेटलेल्या नेपाळच्या आणि पतियाळाच्या महाराण्यांचे लावण्यवर्णन मुळातच वाचायला पाहिजे.

ह्या जीवनप्रवासाचे निवेदन आक्कासाहेबांकडून आग्रहपूर्वक करून घेऊन ते सबंध जसेच्या तसे उतरवून घेतले ह्याबद्दल मला त्यांच्या कन्या माणिकबाई भिडे ह्यांचा सादर अभिमान वाटतो. हे परिश्रम त्यांनी केले नसते तर ह्या सर्व स्मृति कालांतराने नष्ट झाल्या असत्या.

वर्णव्यवस्था मोडकळीस येऊन नवी वर्गव्यवस्था उदयास येण्याची चिन्हे दिसू लागली होती. सरंजामशाहीचे अवशेष मात्र उरले होते. त्यांच्या जागी नवीन उच्चस्तर वर्ग आणि मध्यमवर्ग स्वकर्तृत्वाने पुढे येत होता. त्या संधिकाळातल्या घटनांचा एक वास्तव आलेख ह्या जीवनप्रवासाने मराठी साहित्याला उपलब्ध करून दिलेला आहे. तो एकाद्या सुरस प्रवासवर्णनासारखा मराठी वाचकांना आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करून ही थोडी लांबलेली प्रस्तावना पूर्ण करतो.

नवी दिल्ली
दि. १०-१-१९६५
मकरसंक्रमण

आत्माराम रावजी देशपांडे

## शुद्धिपत्र

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १३ | २ | उमे | उभे |
| २५ | २ | नोका | नोकर |
| २५ | ३ | त्यरची | त्याची |
| ७६ | ९ | खुपीने | खुबीने |

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................

# प्रास्ताविक

१९४० साली विजयादशमीच्या दिवशी अण्णासाहेबांचा ८० वा वाढदिवस त्यांच्या आप्तेष्टांतर्फे मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. त्या दिवशी अण्णासाहेबांबद्दलच्या माझ्या ‘आठवणी’ मी लिहून काढाव्या अशी कल्पना त्यांच्या मित्रमंडळींनी व आमच्या आप्तेष्टांनी काढली, व त्या सर्वांच्या आग्रहावरून मी त्या लिहून काढण्याचे ठरविले.

आज सहासात वर्षे मी अंथरुणाला खिळल्यासारखीच आहे. बसल्याबसल्या कितीतरी आठवणी येतात. सर्वजण माझे मन रंजविण्याचे व मला माझ्या स्थितीबद्दल वाईट वाटू नये म्हणून किती परींनी प्रयत्न करीत असतात! ईश्वराने माझ्या या जीवनप्रवासात माझी वेगवेगळ्या प्रसंगातून परीक्षा घेतली. पण ही आताची—अंथरुणाला खिळण्याची—परीक्षा फार कठीण आहे. अंगात शक्ती राहिली नाही. अंथरुणात पडून राहावे लागते. अशा स्थितीत मला भयंकर पराधीनता वाटते. पण या स्थितीतही परमेश्वर माझ्या हातून हे काम करून घेईल असा विश्वास वाटतो.

आपली जीवनयात्रा म्हणजे हिमालय पर्वत चढण्यासारखे आहे असे माझ्या मनाला वाटत आहे. या प्रवासात कितीतरी संकटे, दऱ्याखोरी, नद्या वगैरेंना तोंड देऊन वाट काढावी लागते. पण आता माझे पोचण्याचे शिखर जवळ आले आहे, पाय जडभारी झाले आहेत; म्हणून मी थोडा वेळ विश्रांती घेण्यासाठी निवाऱ्याची जागा पाहून तेथे अंमळ बसते. येथे बसून मला माझ्या आतापर्यंतच्या आयुष्याची स्वस्थपणाने, लांबवर दृष्टी टाकून पाहणी करता येईल.

एकदा लिहिण्याचा निश्चय केल्यावर माझ्या जीवनात घडलेल्या कितीतरी नानाविध गोष्टी मनश्चक्षूंपुढे 'गर्दी करू लागल्या. त्यातून लिहायच्या तरी कोणत्या? आम्हांला ज्या गोष्टींचे महत्त्व वाटणार त्या वाचणाराला तशा वाटायच्या नाहीत! पुढील पिढी नवमतवादीच असणार—ती त्या लिहिण्यात खोचा काढून त्यावर टीका करणार! तेव्हा एकदा वाटले की, काही लिहूच नये. शिवाय हे लिखाण अण्णासाहेबांना तरी आवडेल का, हाही विचार मनात येतो. स्वतःबद्दलची कोणतीही स्तुती त्यांना अगदी नको असते. तथापि माझ्या मुलींनी मला अति आग्रह केला की, “आक्का, तू तुमच्या जीवनप्रवासाची हकीकत लिहून काढच. आपल्या घराण्यात

भावी पिढीला तू व अण्णासाहेब यांसारख्या थोर व पवित्र पूर्वजांनी केवढा मोठा पुण्यसंचय करून ठेवला आहे ते तरी कळेल ! तुमच्या अंगी हे देवपण येण्यासाठी तुम्हांला किती तऱ्हेचे टाकीचे घाव सोसावे लागले हे त्यांना समजून येईल व आपल्या घराण्याचे आध्यात्मिक धोरण भक्कम ठेवण्यास त्यांना मार्गदर्शन होईल." अशा गोड भाषेत माझ्या मुलींनी माझे मन लिहिण्यासाठी वळविले. ईश्वराच्या कृपेने आज आमच्या घराण्याच्या पुढील तीन पिढ्या तरी माझ्या डोळ्यांसमोर आहेत व त्या सर्व सत्त्वशील आहेत. त्यांना माझे लिहिणे आवडेल या जाणिवेने मी आत्मचरित्र लिहिण्याचे योजिले आहे. पण मला स्वतःच्या हाताने लिहिता येत नाही. बोटे आखडली आहेत. म्हणून माझी तिसरी कन्या माणिकबाई हिने मी सांगेन त्याप्रमाणे लिहिण्याचे मान्य केले.

मात्र हे लिखाण आपल्या घराण्यापुरतेच ठेवावे असे मला वाटते.

माझ्या मुलींना वाटते तसे काही असामान्य कार्य आम्ही केले आहे असे मला वाटत नाही. पण संसारात राहून स्वशक्त्यनुसार पुष्कळ उच्च ध्येय कोणालाही साधता येईल, हे मात्र आमच्या गोष्टीवरून दिसून येईल. मात्र त्यासाठी नीती, सत्य व धैर्य या त्रिवेणी संगमात रोज स्नान करून दिवसास सुरवात करावी म्हणजे सर्व आपोआप साधेल.

मी काही लेखिका नाही. पण आयुष्यातील अनेक गोष्टी मला सरळ सुताप्रमाणे एकापुढे एक स्पष्ट आठवत आहेत. माळेतल्या मण्याप्रमाणे त्या एकत्र गोवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. माझ्या कुटुंबियांना हे लिखाण मनोरंजक व मार्गदर्शक ठरेल अशी आशा आहे.

यशोदाबाई जोशी

* * *

१०८०७

# १

## ( इ. स. १८६८ ते १८८९ )

आमच्या जीवनप्रवासाची हकीकत लिहून काढण्याचे मी का योजले हे प्रस्तावनेत सांगितलेच आहे. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात त्याला नानाप्रकारचे प्रसंग व अनुभव येतात, ते जर मण्यांप्रमाणे एकत्र गुंफले तर एक सुंदरसा हार बनेल, व प्रत्येक कुटुंबास तो आपल्या वंशजांसाठी उद्बोधक व मार्गदर्शक होईल.

गुलाबाची फुले वेचताना ज्याप्रमाणे त्यातल्या काट्यांची पर्वा वाटत नाही, त्याचप्रमाणे बालपणीच्या सुखदुःखांचे होते. प्रातःकाळच्या प्रहरात एखादे मधुर असे भक्तिरसाचे किंवा करुणरसाचे ऐकलेले गान जसे दिवसभर मनात घोळत राहते व कोमल भावना फुलवीत असते, तसे बालपणीची गोडी व रम्यता यांचे स्मरण माणसाला त्याच्या सबंध आयुष्यभर सुखसंवेदना देत राहते व काही क्षण तरी त्याला या जगाच्या सुखदुःखांच्या पलीकडे नेते. मलाही माझ्या बालपणीच्या अशाच काही आठवणी सदैव आल्हाद देत आल्या आहेत.

माझे माहेर साताऱ्यास अभ्यंकरांच्या घरी. माझा जन्म अश्विन शुद्ध प्रतिपदा शके १७९० ( इ. स. १८६८ ) मध्ये साताऱ्यास झाला. माझे पणजोबा सातारकर भोसल्यांकडे दप्तरदार होते म्हणतात. त्यांना काही इनामी व काही खाजगी असे बरेच मोठे उत्पन्न होते असे म्हणतात. माझ्या पणजोबांना एक मुलगा. ते माझे आजोबा. ते घरात सर्व बघत व सावकारीही करीत. माझी आजी सांगली-नजिकच्या दुधगाव येथील एका फार सज्जन व मोठ्या जोग ह्या सावकारांची कन्या. मला माझे आजोबा आठवत नाहीत. मी अडीच-तीन वर्षांची असताना ते वारले. मला त्याबद्दल एक स्पष्ट आठवण आहे. माझी आजी व पुष्कळशी मंडळी एक दिवस काशीहून घरी परत आली. आजी अगदी तोंड झाकून आली. ती सारखी कितीतरी दिवस अंधाऱ्या खोलीतच बसून होती. आजोबा व आजी काशीयात्रेस गेली होती. तिकडेच आजोबांचे देहावसान झाले.

माझे वडिलांना रावजी म्हणत असत. ते व बापू हे दोघे भाऊ. त्यांना तीन वहिणी होत्या. बापू वडील, म्हणून ते घरातील सर्व कारभार पाहत. रावजी पहिल्यापासून तापट व विरक्त होते. कित्येक महिन्यांत त्यांचे आमचे दर्शन होत नसे. आम्हां मुलांना त्यांनी कधी प्रेमाने जवळ घेतलेले मला आठवत नाही. ते काही उद्योग करीत नव्हते. " वडील बंधूंनी सर्व पहावे, माझे-कार्य काम ? " असे ते म्हणत. म्हणून आजोबांनी त्यांना एका स्नेही अधिकाऱ्याच्या कचेरीत ' पर्सनल क्लार्क ' म्हणून लावून दिले होते. तेथे आठ-दहा वर्षे काम करून ते सेवानिवृत्त झाले. त्यांना अल्पशी पेन्शन मिळाली. त्यातच ते ( माझ्या आईच्या मृत्यूनंतर ) स्वतः स्वयंपाक करून जेवीत, व ईश्वरचिंतनात वेळ घालवीत.

माझी आई पुण्याच्या सुखवस्तु सहस्रबुद्धे घराण्यातली. त्या काळातही तिथल्या मुलींना मराठी लिहिणे-वाचणे शिकविले जाई. माझी आई (हिला सर्व माई म्हणत ) फारच रूपवान होती. सरळ नाक, मोठ्या कपाळावर रुळणारे कुरळे केस, मोठे काळेशार डोळे व केतकीसारखा गौरवर्ण—आणि केतकीसारखीच नाजूक होती ती ! आम्ही घरात काही थोडी माणसे नव्हतो. मुले-मुलेच आम्ही आठ-दहा होतो–सख्खी, चुलत, आत्ये अशी भांवडे आणि आश्रितांची मुले. घरात सर्वांना एकसारख्या प्रेमाने वागविले जाई. सख्खी, चुलत ही नाती आम्हांला ठाऊक नसत. मला माझ्या आईपेक्षा माझ्या चुलतीचाच फार लळा होता. ती मोठी जाऊ आणि माझी आई धाकटी जाऊ. त्या एकमेकींना ' ताई ' व ' माई ' अशा एकेरी नांवाने हाक मारीत व एकमेकींवर जीवापलिकडे प्रेम करीत. मला कितीतरी वर्षे ठाऊक नव्हते की ताई ( चुलती ) माझी आई नाही म्हणून. ते जेव्हा कुणी मला पहिल्यांदा सांगितले तेव्हा मला रडूच कोसळले ! माझी सर्वांत मोठी ओढ म्हणजे अंधार पडू लागला की ताईच्या कुशीत निजायचे. मी तिचा पदर हाताला घट्ट गुंडाळून घ्यायची. वाटायचे की त्यामुळे ती मला सोडून जायची नाही. मग मी मध्येच जागी होऊन पाहायची तो ताई आणि माई आजीचे पाय चेपीत बसलेल्या दिसायच्या. मग मी पुन्हा ताईजवळ सरकत जाऊन तिच्या मांडीवर डोके ठेवून निजायची. ताई ( चुलती )चे माहेर साताऱ्यातच सरदार कान्हेरे यांच्या घरी. पण माझी आजी तिला वर्षाकाठी एकदोन वेळच, एक दिवसासाठीच माहेरी जाऊ द्यायची. ती मंडळी त्यावेळी माई ( आई ) ला पण तिच्याबरोबर माहेरपणास नेत व आपल्या सख्ख्या मुलीप्रमाणे वागवीत. पूर्वी तशीच पद्धत होती. ह्यावेळी ताईला ' बाबा ' हा मुलगा होता. तो माझ्याहून तीन वर्षांनी वडील. तो मला सख्ख्या भावाप्रमाणे वाटे व कान्हेरे आजोबाही सख्खे आजेच वाटत. ते तर माझे इतके लाड करायचे की त्यांच्या दुसऱ्या मुली ताईला चिडवीत की " वडिलांची हीच एक नात सर्वांत लाडकी ! " मला कान्हेरे आजोबांकडील सरदारी थाट फारच आवडायचा व वाटायचे की आपल्या

घरी पण असेच करावे. पण आमच्या आजीच्या पुढे कुणाचेच काही चालायचे नाही. असो.

आम्ही मुले सकाळी उठल्यावर मऊ भात खात असू. चहा तेव्हा नव्हता. मऊ भाताबरोबर लोणचे किंवा पापड मिळायचा. त्याचा स्वाद व चविष्टपणा बहारीचा वाटे. त्यानंतर आमच्या घरची मोलकरीण बायजा उष्टी-खरकटी काढायची, व मग ताईच्या सांगण्यावरून मला तिच्या घरी खेळायला घेऊन जायची. त्यात मला मौज वाटे, कारण तिथे मनसोक्त खेळायला मिळे. एक घोंगडी अंथरून ती मला त्यावर बसवी, व माझ्यापुढे काहीतरी खेळणी टाकून आपली कामे करीत बसे.

आमची बायजा कुणबी होती, पण भारी सालस आणि प्रेमळ. मी तिच्या घरी गेले की ती तिच्या भाकरी करी, त्यांचा असा खमंग वास यायचा की मी त्या खायला मागायची! तेव्हा ती मला समजावून सांगे, "अग माझ्या बाळूताई, बामनानं कुणब्याच्या हातचं खाऊ न्हाई, पाप लागतं." मग तिने मला चुरमुरे अगर फुटाणे आणून द्यावे व मी ते आवडीने खावे. तिच्या मनात कधी वर्णद्वेष उद्भवायचाच नाही. मला मात्र त्या वयात हे कुणाच्या हातचे खायचे नाही, हा काय प्रकार आहे याचा अचंबा वाटे!

आम्ही घरातील सगळी मुले व बायका आमच्या वाड्याच्या मागच्या ओसरीवर निजत असू. कारण आमची आजी तिथेच जमिनीवर अंथरुण घालून निजे. आजोबा गेल्यापासून ती असेच करी. त्या काळात विधवा बायकांची ती एक रूढी होती. तिच्यामुळे आम्ही सर्वच जमिनीवर बिछाने घालून निजायचे. पुरुष मंडळी बाहेरच्या चौकाच्या ओसरीवर किंवा माडीवर उठत बसत, व तिथेच पलंग घालून निजत. पण आम्हा मुलींची व बायकांची तिकडे जाण्याची प्राज्ञा नव्हती. आमच्या घरातल्या पुरुष मंडळींची व बायकांची जेवण्याच्या वेळेशिवाय संबंध दिवसात दृष्टादृष्टच व्हायची नाही; मग एकमेकांशी बोलणेचालणे कुठले? पिंजऱ्यातल्या पोपटाप्रमाणे आम्हां बायकांची स्थिती होती. एवढेच की पोपटाच्या पिंजऱ्याच्या मानाने आमचा पिंजरा अंमळ मोठा होता. मागील चौकातले स्वयंपाक-घर, माजघर, देवघर, ओसरी आणि त्यामागचे अंगण, तसेच आमच्या वाड्या-लगतच असलेले आमचे गणपतीचे मोठे देऊळ हा आमचा पिंजरा होता. त्या बाहेरचे जग आम्हांला दिसायचेच नाही. पण मजा अशी की त्यातच आम्ही खूष होतो!

माझ्या आजीचा चेहरा फार उग्र असे. तिचा रागही तसाच मोठा होता. तिला म्हणे लहानपणी माहेरी नेण्यास आमच्या साताऱ्याहून मेणा यायचा. एकदा मेणा वाहणाऱ्या भोयाने मेण्याचे दार लवकर उघडले नाही, तर म्हणतात हिने रागाने दारावर लाथ मारून ते फोडून टाकले! तिने पुढे आपल्या आयुष्यात अशाच तऱ्हेच्या कोपिष्टपणाने अनेक गोष्टींत आपल्या सुखावर लाथ मारून घेतली. तिच्या

डोळ्यांदेखत तिच्या दोघी सुनाही गेल्या. प्रथम माझी चुलती ताई एकविसाव्या बाळंतपणात गेली व त्यानंतर माई ( आई ) दोन वर्षांनी गेली व मग माझ्या आजीचे डोळे गेले. त्यावेळी मग तिला तिच्या सुनांच्या प्रेमळ शुश्रूषेची आठवण यायची. कारण त्यानंतर घरात सर्वांनी तिची पूर्ण आबाळ केली. ती ९९ वर्षांपर्यंत जगली. असो. आम्हा मुलांना तिचा भारी धाक असायचा. माझे नाव गंगू होते; पण मला बाळूताई म्हणत. आजीने जोराने 'बाळे' म्हणून हाक मारली की माझ्या जिवाचा थरकाप होई! आपल्या सुनांना तर ती तलवारीच्या धारेवर वागवायची जशी! सकाळपासून रात्रीपर्यंत उसंत नसायची त्यांच्या जिवाला. आमचे अभ्यंकरांचे घराणे सातान्यास सुखवस्तू व श्रीमंत समजले जाई. श्रीमंत घरातल्या बायकांना खरकटी भांडी घासणे, धुणे, पाणी भरणे वगैरे करायला सहसा लागायची नाहीत. तरी पण सोवळ्याओवळ्याच्या कल्पनेमुळे घरातील सुनांवर कामाचा फार ताण पडायचा. पहाटे चार वाजता उठून सोवळ्यातले केरपोतेरे, सारवणे करायची. देवपूजेची तयारी करून पूजेची भांडी घासायची. मोठ्यांच्या घरात कुणी ना कुणी माहेरवाशिणी असायच्याच. त्यांचे पथ्यपाणी, निरशनाची खाणी, तान्ह्या मुलांची न्हाणी, जेवणाच्या पंगती वाढणे, ही कामे घरातल्या सुनांनाच करावी लागत. सगळी कामेधामे आटोपून त्या दोघींना निजायला रात्री १२ वाजत. तरीसुद्धा त्या काळी अनेक सासुरवाशिणी, ४०–४५ वर्षांच्या झाल्या तरी सासूच्या हाताखाली समाधानाने राहत. त्यांना जसे काही ते स्वाभाविक जीवनच वाटे!

अभ्यंकरांच्या गणपतीच्या देवळात बरेच विद्वान ब्राह्मण व वेदाभ्यासी विद्यार्थी यांची राहण्याची सोय ठेवलेली होती. तेथील व्यवस्था माझी आजी स्वतः अंग-मेहनतीने व स्वखर्चाने करी. त्यांतील बरीच मंडळी रोज संध्याकाळी आमच्या वाड्याच्या चौकात 'म्हणणे' म्हणण्यास ( म्हणजे काही विशिष्ट वेदोक्त मंत्र म्हणण्यास ) येत व वेदघोषाने सर्व वातावरण दुमदुमून जाई. त्यात एक प्रकारची शांती व गंभीरपणा उत्पन्न होई. त्याचा माझ्या मनावर फार आनंददायक परिणाम होई. अद्यापपर्यंत ( १९४२ ) ते आवाज मला कित्येक वेळा कानांत घुमल्याप्रमाणे वाटतात व मनास शांती देतात. ह्या म्हणण्यानंतर सर्वांना खूपसे पोहे, खोबरे ह्यांची खिरापत रोज दिली जाई.

माझ्या लहानपणची मनाला चटक लावून गेलेली आठवण सांगते. आमच्या मागल्या चौकात रोज सकाळ-संध्याकाळचे दूध काढण्यास आमचा एक गडी गाय घेऊन येत असे. गाईपुढे वैरण ठेवून तिला दाव्याला बांधून तिच्या वासराला फरफर ओढीत नेऊन दूर बांधीत व मग गाईची धार काढीत. ते वासरू बिचारे सारखे गाईकडे जायला धडपडायचे आणि गाय त्याजकडे दीनवाणी पहायची. तिची ती मृदु व प्रेमळ दृष्टी! तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागत. माझेही डोळे मग भरून यायचे. मला वाटे "आपण किती वाईट आहोत! या वासराचे दूध आपण

घेतले तर ते बिचारे काय खाईल ? " या दृश्याचा माझ्या मनावर इतका खोल परिणाम झाला की, पुढे माझे लग्न झाल्यावर—मला सहाच वर्षे झाली होती तेव्हा —मला रोज सकाळी माहेरहून सासरी नेत व संध्याकाळी माहेरी आणून पोचवीत, तेव्हा मला माझी स्थिती त्या वासरासारखी वाटे. मी सासरी जाताना रडायची, त्यावेळी ताई ( चुलती ) प्रेमाने माझी समजूत घालायची, तेव्हा तिचाही चेहरा दीनवाणा होई. मग मला वाटे ती त्या गाईसारखी आहे व माझी त्या वासराप्रमाणे फरफट चालली आहे; आणि आजी 'सासरी गेलंच पाहिजे' असे रागाने सांगायची, तेव्हा मला वाटे, ती त्या गड्यासारखी कठोर आहे ! गाईबद्दल व स्त्री-जीवनाबद्दल माझी अनुकंपा वयाबरोबर वाढत गेली. माझ्या सासरीही गाय असे. मी स्वत: तिची निगा नीट होत आहे की नाही, ते कळकळीने पाही. मात्र स्त्रीजीवन सुखी करण्याचा प्रयत्न करण्याबाबतची संधी मला पुढे बऱ्याच वर्षांनी मिळाली. त्यासाठी सहानुभूती तर नाहीच, पण तऱ्हेतऱ्हेची खोटी दूषणे मला सहन करावी लागली. ते पुढे ओघाने सांगेन.

● ● ●

इसवी सन १८७४ मधील गोष्ट आहे ती. मला सहावे वर्ष चालू होते. एक दिवस आजीने माझ्या बरोबरीच्या काही मुलींना आमच्या अंगणात दुपारी फुगड्या खेळायला बोलावले होते. आम्हा मुलांना अशा तऱ्हेची गोडी दाखवायची तिची पहिलीच वेळ असेल. तिच्या शेजारी चारपाच माझ्या बिनओळखीच्या बायका येऊन बसल्या होत्या. आमचा खेळ ऐन रंगात आला होता, इतक्यात माझ्या कानांत हळूच कोणीतरी सांगितले, " अग, तुझी सासू आली आहे ! " मग माझी तिरपीट काय वर्णावी ? मी मोठ्याने किंचाळून विंचू चावल्यासारखी रडू लागले ! पुढे बऱ्याच महिन्यांनी मला कळले की, आजीजवळ बसलेल्या बायकांत त्या दिवशी माझ्या भावी सासूबाई येऊन बसल्या होत्या. त्यांना म्हणे कोणी सांगितले होते की, मी बहिरी आणि थोडी लंगडी आहे ! म्हणून त्या दिवशी माझी अशा तऱ्हेने परीक्षा घेण्यात आली म्हणे ! कुणाला आश्चर्य वाटेल, यानंतर आठऱ्हा दिवसांनी माझे लग्न झाले, त्याची मात्र मला काही एक आठवण नाही ! त्यासंबंधी मी जे काही सांगणार आहे ते मला काही वर्षांनी ताई व माई यांच्याकडून कळले.

एक दिवस सकाळीच माझ्या आतेचे यजमान श्री. माधवराव जोशी हे आजीकडे येऊन त्यांच्या जोशांपैकी एक स्थळ सांगून मला तिथे देण्याबद्दल आग्रह करू लागले. आजी म्हणाली, " माझी नात अद्याप लहान आहे; एव्हाच

तिचं लग्न करायची माझी इच्छा नाही. " पण त्यांनी आजीला अशी गळ घातली की शेवटी आजीने त्यांना अट घातली की, मुलगा माझ्या नजरेस पडल्यावर मग मी काय ते सांगेन. त्याच दिवशी संध्याकाळीं जोशी मुलाला घेऊन आमच्या गणपतीच्या देवळात आले. आजी मुलाला पाहून फार खूष झाली, आणि " माझ्या नातीला हाच गोरापान अन् विष्णुरूप सुंदर नवरा योग्य आहे " असे म्हणाली. माधवराव जोशांनी मग मुलाला मोडीत एक गणपतीचे छोटे स्तोत्र लिहावयास सांगितले. त्याचे सुंदर, मोत्यांचे ओळींप्रमाणे अक्षर पाहून सर्व मंडळीं इतकी खूप झाली की तिथल्या शास्त्रीबोवांकडून आजीने आपल्या भावी नातजावयाला विडा, सुपारी व नारळ देववून.लग्न पक्के केले. त्यानंतर आठच दिवसांनी माझे लग्न झाले.

लग्नातला एकच प्रसंग मला आठवतो. माझी लग्नाची वरात हत्तीवरून अंबारीत निघाली होती. त्या काळीं सातारकर भोसल्यांकडून काही ठराविक मंडळींना लग्न-समारंभातून अशा तऱ्हेचा संरजाम मिळे. माझे आजोबा त्यांजकडे दप्तरदार असल्यामुळे आम्हांला तो मिळाला होता. त्यावेळीं दारूकाम व बार जेव्हा का उडवू लागले तेव्हा हत्ती फार जोरात डुलू लागला. इतका की मी भयभीत होऊन रडू लागले ! तेव्हा माझ्या शेजारी बसलेल्या माझ्या पतिराजांनी जवळच फळांचे ताट होते त्यातले एक केळे सोलून मला खायला दिले, आणि त्या नादात माझे रडणे थांबले !

माझ्या यजमानांचे जोशी घराणे मूळचे कोकणातील पावस येथले. हे घराणे कोकणातून प्रथम साताऱ्यास शिवाजी महाराजांच्या वेळीं आले व तेथे त्यांनी एक मोठा वाडा बांधला. त्या वेळेपासून त्यांचेकडे ज्योतिषवृत्ती होती. पूर्वी ही जोशी-पणाची वृत्ती वंशपरंपरेने चाले असे दिसते, व त्यासाठी मोठे उत्पन्नही तोडून दिलेले असे. त्यावेळीं त्यांना पालखी व अब्दागिरीचा मान मिळाल्याचा दाखला मिळतो. या जोशी मंडळींनी पहिले शाहू महाराज यांना पंचांग करून दिले होते. ते जोशी यांचेकडे जपून ठेवलेले आहे. जोशांपैकीच श्री. वासुदेवराव यांनी, जोशी घराण्याचे फार जुने कागदपत्र, सनदा, हिशोब वगैरे मिळविले असून त्यावरून ह्या घराण्याचा २--२॥ शे वर्षांपूर्वीचा इतिहास सापडतो.

माझे पति मोरोपंत उर्फ अण्णासाहेब ( जुन्या रीतीप्रमाणें पत्नीने पतीचे नाव घ्यायचे नाही; पण मी हे आत्मचरित्र इ. स. १९४० मध्ये लिहायला सुरुवात केली, त्या काळाला अनुसरून मी या ग्रंथात त्यांच्याबद्दलचा उल्लेख ' अण्णासाहेब ' या नावानेच करणार आहे. ) यांचे पणजोबा नाना जोशी व त्यांचे सहा बंधू यांनी पुण्यास एक वाडा बांधून तिथे इ. स. १८०० चे सुमारास एक फार मोठा यज्ञ केला होता. ह्या यज्ञासाठी काशीहून काही मोठे विद्वान शास्त्री बोलाविले होते. पण यज्ञाची सर्व शास्त्रोक्त कर्म-मंत्र वगैरे जोशी मंडळींनीच स्वतः केली-इतकी ती विद्वान होती ! ह्या यज्ञात त्यांनी काही सुधारणा केल्या व त्या

काशीच्या शास्त्र्यांना पसंत झाल्या. त्या शास्त्र्यांची जोशी मंडळींनी फार मोठी संभावना केली व ते खूष होऊन काशीस परत गेले. सुधारणा करण्याचा गुण ह्या जोशी घराण्यात त्यावेळेपासूनच दिसून येऊ लागला होता, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ह्या घराण्यात वडिलोपार्जित अग्निहोत्र होते व नाना जोशांसारख्या संतवृत्तीच्या पुरुषाचा आशीर्वाद होता की ह्या घराण्यात जे सचोटीने व दानशूरपणाने वागेल त्यावर अग्निनारायणाची पूर्ण कृपा राहील; व ह्या घराण्यास आजमितीपर्यंत ( १९४२ ) त्याची सत्यता प्रत्ययास येत आहे. उपरि-निर्दिष्ट सात बंधू त्या काळात मोठमोठ्या नोकऱ्यांवर होते. त्यांनी आपल्या वाड्या-जवळ लोकांच्या उपयोगासाठी पुण्यास प्रसिद्ध असलेला ‘ बदामी हौद ’ बांधला. ही जागा पूर्वी ‘ काळे वावर ’ या नावाने ओळखली जात असे. तेथेच सध्या ‘ रे मार्केट ’ बांधलेले आहे.

माझे सासरे विश्वनाथराव उर्फ दादासाहेब जोशी यांना आणखी तिघे बंधू होते. सर्वांत वडील सदाशिवराव उर्फ आबासाहेब हे मुधोळ संस्थानात दिवाण होते. वडिलांच्या मागे त्यांनी आपल्या सर्व बंधूंचा विद्याभ्यास स्वखर्चाने व फार प्रेमाने केला. त्याहून धाकटे गोपाळराव जोशी हे साताऱ्यास वकिली करीत. माझे मामंजी व त्यांचेहून धाकटे वामनराव ह्यांचे कॉलेज-शिक्षण सुरू असतानाच ते सोडून मामंजी वऱ्हाडात नोकरीसाठी निघून गेले. त्यांच्या एका लांबच्या भाऊबंदांनी एकदा त्यांना चिडविले म्हणतात की, “ तुम्ही तुमच्या मोठ्या भावाच्या जिवावरच कॉलेजात जाऊन आपण श्रीमंत आहो अशी ऐट दाखविता... ” वगैरे. ते त्यांच्या मानी स्वभावाला इतके लागले की वडील बंधूंना न सांगताच त्यांनी वऱ्हाडात इलिचपूर येथे जाऊन शिक्षणखात्यात जी नोकरी लागली ती पत्करली. त्यांचा गणित विषयात हातखंडा होता. त्यांना त्यात प्रगती करण्याची संधी मिळाली असती तर ते एक फार मोठे गणितज्ञ म्हणून नावाजले गेले असते. त्यांचे इंग्रजीवरचे प्रभुत्व, आणि अक्षर ही पण उत्तम होती. त्यामुळे शिक्षणखात्यात त्यांना लवकर बढती मिळत गेली. त्यांना बुद्धिबळे उत्तम खेळता येत असत. त्यांचे घरी बुद्धिबळे खेळणारे व ते बघणारे यांचा रोज अड्डाच भरे. त्या काळी इलिचपुरात निजामाचा मोठा रिसाला असे, असे म्हणतात. त्यातील मोठे मुसलमान अंमलदारही तो खेळ खेळण्यास येत. मामंजींजवळ कोणत्याच तऱ्हेचा जातिभेद नव्हता. एकदा एका मुसलमान अमलदाराने त्यांना आठवण म्हणून एक जरीची शाल अर्पण केली, ती त्यांनी लागलीच साभार त्यास परत देऊन म्हटले, “ मी दान घेणारा ब्राह्मण नसून दान देणारा ब्राह्मण आहे. ” त्यांचा एक मुसलमान मित्र एकदा त्यांच्या घरी विषम-ज्वराने आजारी झाला, तर त्याची सर्व तऱ्हेची शुश्रूषा–मलमूत्र विसर्जनासुद्धा–त्यांनी स्वतः फार आस्थेने केली. त्यांच्या मित्रत्वाच्या कल्पना फार उच्च होत्या. असो. त्यांना सर्व तऱ्हेचे गाणे व वाद्य यांचे उत्तम ज्ञान होते. त्यांच्या संगीताच्या नादाचे

तर काही विचारूच नका ! गावात कोणीही गाणारा किंवा वाद्य वाजविणारा येवो—वाई, बोवा कोणी असो—त्याची पहिली बैठक यांच्याकडेच झाली पाहिजे ! त्यांना जो काही पगार मिळे त्यातला मोठा हिस्सा असल्या बैठकीत खर्च व्हायचा. आमच्या सासूबाई अत्यंत कर्तृत्ववान आणि धोरणी, म्हणूनच त्यांनी त्यांचा संसार उत्तम करून दाखविला. मामंजींचा स्वभाव अतिशय तामसी व लहरी होता. ते रंगाने गोरे, घाऱ्या डोळ्यांचे, सडपातळ व उंच असून, देखणे पण फार उग्र चेहऱ्याचे होते. त्यामुळे पाहणाराला त्यांच्याबद्दल एक प्रकारची भीती वाटे.

अण्णासाहेबांचे आजोबा (आईचे वडील) विष्णु मोरेश्वर आगाशे हे भोर संस्थानात चिखलगाव येथे राहत. हे कुटुंब त्या संस्थानातील प्रसिद्ध घराण्यांपैकी एक समजले जाई. आमच्या सासूबाईंचे आजोबा हे लष्करी बाण्याचे गृहस्थ असून ते सैन्यात छोटेसे अम्मलदार होते. त्यांनी अनेक लढायांत प्रत्यक्ष भाग घेऊन शौर्य गाजविले होते. त्यांच्या अंगावर शस्त्रांच्या अनेक जखमा झालेल्या होत्या व त्या ते मोठ्या अभिमानाने दाखवीत. ते समर-प्रसंगांची आवेशयुक्त आणि रोमांचकारी हकीकत सांगत असत. त्यावेळी त्यांचा भरदार आणि रुबाबदार चेहरा पराक्रमाच्या आवेशाने चमकू लागे व ऐकणारी मंडळी मोहित होऊन चित्राप्रमाणे तटस्थ राहत, अशी परंपरेने माहिती मिळते. माझ्या सासूबाई नेहमी म्हणत व अण्णासाहेबांच्या निकटच्या मित्रमंडळींनाही ते पटे की, त्यांच्यांत जे असामान्य धैर्य व हिंमत आहे ती त्यांच्या आजोळकडील क्षात्रवृत्तीमुळे त्यांच्यात आलेली आहे; व आजमितीसही स्वराज्यासाठी जर लढाई झाली तर अण्णासाहेब त्यात आघाडीवर जाऊन लढतील. त्यांना लहानपणापासून अद्यापपर्यंत (१९४२) पुष्कळ वेळा स्वप्ने पडतात की, एका मोठ्या लढाईत आपण आवेशाने लढत आहो. मग ते खूप घामाघूम होऊन जागे होतात. माझ्या सासूबाईंचा आणखी असाही विश्वास होता की, अण्णासाहेबांच्यात जी लोकोत्तर बुद्धिमत्ता व शांती आहे ती त्यांना त्यांच्या पणजोळकडून आलेली आहे. त्यांचे पणजोबा वाईचे जोशी मेणोलीकर. त्यांचे घराणे तीनचार पिढ्यांपासून दशग्रंथी ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध होते, व त्यांची महाराष्ट्रातील बऱ्याच राजेरजवाड्यांकडून उत्तम प्रकारे संभावना केली जात असे. विद्वत्तेबद्दल हे घराणे अद्यापही प्रसिद्ध आहे. असो.

अण्णासाहेबांचे आजोबा (आईचे वडील) श्री. आगाशे भोर संस्थानात चिखलगाव येथे राहत असत. त्यांची तेथे शेतीवाडी होती व ते सावकारीही करीत. तेथेच (म्हणजे चिखलगावी आजोळी) इ. स. १८६१ साली विजयादशमीच्या दिवशी अण्णासाहेबांचा जन्म झाला. आमच्या सासूबाईंना प्रथम एक मुलगी होऊन ती लवकर गेली. तिच्या पाठीवर काही वर्षे दुसरे अपत्य नव्हते. पुत्रप्राप्तीसाठी त्यांनी अनेक नेमधर्म केले. असे सांगतात की, एक दिवस दुपारी बाराच्या सुमारास एक जटाधारी बैरागी दाराशी आला आणि त्याने 'माई' म्हणून हाक मारली.

सासूबाई प्रथम घाबरल्या, पण प्रसंगावधान ठेवून त्याला भिक्षा घालण्यासाठी त्या बाहेर आल्या. तो वैरागी फार तेजस्वी व शांत मुद्रेचा होता. त्याने भिक्षा न घेता एक रुद्राक्ष सासूबाईंना दिला, व 'हे तुझ्या मंगळसूत्रात घालून ठेव. तुला एका वर्षाच्या आत फार पुण्यशील व भाग्यवान पुत्र होईल!' असे सांगून तो निघून गेला. त्यानंतर खरोखरी एका वर्षाच्या आत पुत्रलाभ झाला. विजयादशमीच्या दिवशी पहाटेच्या वेळी मुलाचा जन्म झाला. मुलाचे मुख अत्यंत तेजस्वी व गौरवर्ण होते. घरचे उपाध्ये म्हणाले, "हे चिखलगावात शुभ्र कमळ जन्मले आहे. ते आपल्या सुगंधाने दाही दिशा दरवळून टाकील!"

मुलाचे नाव 'मोरेश्वर' ठेवले. पण सर्वजण लहानपणापासून त्यांना अण्णासाहेब म्हणत. बालवयापासून त्यांना कुठे काही कमी पडले नाही. पाचव्या वर्षापर्यंत आईचे दूध मिळाले. त्यामुळे त्यांची प्रकृती निकोप व सुदृढ होती. लहानपणापासूनच ते धोरणाने व समजूतदारपणाने वागत. त्यांच्यात त्या वयापासूनच समयसूचकपणा फार प्रामुख्याने दिसून येई. त्यांना वयाच्या चार वर्षापर्यंत रकाराचा उच्चार करायला येत नसे. म्हणून घरातली मंडळी त्यांना त्याबद्दल चिडवायची व ज्यात रकार असेल असे शब्द उच्चारायला लावायची. पण ते त्या शब्दाला जुळेल असा व ज्यात रकार नसेल असा दुसरा शब्द तात्काळ उच्चारीत. त्यामुळे मंडळींना त्यांचे फार कौतुक वाटे. सत्याबद्दल त्यांचा विशेषच कटाक्ष असे. आमच्या सासूबाईंनी या सर्व गोष्टी लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबवल्या होत्या. त्यांच्या सत्यशीलतेची एक गोष्ट सासूबाई सांगत असत. एकदा शाळेत मुलांनी फार दांडगाई केली. तो आळ आला अण्णासाहेबांवर. एक मुलगा घरी येऊन सासूबाईंना गाऱ्हाणे सांगू लागला की, "अण्णासाहेबांनीच शाळेत मुलांची कुरापत काढून दांडगाई केली; त्याबद्दल त्यांनी आमची क्षमा मागितली पाहिजे." हेही अडून बसले की, "मी जर चूक केलेली नाही तर क्षमा का मागावी?" बराच वाद झाल्यावर सासूबाई म्हणाल्या, "बरं पण मी सांगते म्हणून क्षमा माग" तेव्हा "माझी काही चूक नाही. पण आई सांगते म्हणून मी क्षमा मागतो." असे म्हणून त्यांनी क्षमा मागितली.

त्या वैराग्याच्या प्रसादाने हा पुत्र आपल्याला लाभला, तेव्हा हा कोणी मोठा पुण्यात्मा आहे असा सासूबाईंना विश्वास होताच. तो अधिक बळकट होण्यास आणखी एक कारण घडले. त्यावेळी अण्णासाहेब सात वर्षांचे होते. एक दिवस त्यांना बरे नव्हते. म्हणून नित्याप्रमाणे सासूबाईंनी त्यांना पहाटे उठवले नाही. अंमळ उन्हे पडल्यावर उठविण्यास गेल्या तो मुलाच्या अंगावर उन्ह पडलेले, पण त्याच्या डोक्यावर मात्र सावली धरून एक भला मोठा नाग फडा काढून बसलेला! ते बघून सासूबाई फारच घाबरल्या. तोंडातून शब्द फुटेना. रामनामाचा जप करण्याचा यत्न करू लागल्या. इतक्यात माणसाची चाहूल लागून तो नाग निघून

गेला. सासूबाईंनी आधी जाऊन मुलाला पोटाशी घट्ट धरले व मंडळींना मोठमोठ्याने हाका मारू लागल्या. मंडळी जमली. मुलाला काही एक इजा झाली नाही हे पाहून सासूबाईंचा जीव भांड्यात पडला. मग त्यांनी एका विद्वान ब्राह्मणाला बोलावून आणून "मी आता हे संकट निवारण झालं म्हणून काय दानधर्म करू ?" असे त्यांना विचारले. "ही ईश्वराची कृपा समजून त्याला धन्यवाद देत रहा म्हणजे झालं. हा दृष्टांत म्हणजे पक्की खूण आहे की या मुलाला पुढे राजवैभव मिळेल, नाहीतर हा फार मोठा योगी होईल!" असे ब्राह्मणाने सांगितले.

अण्णासाहेब अडीच तीन वर्षांचे असल्यापासून त्यांचे धाकटे चुलते वामनराव त्यांना मांडीवर घेऊन बाळबोध अक्षरे शिकवीत, व ती त्यांच्या ध्यानात इतकी लवकर राहत की वयाच्या चवथ्या वर्षी ते मराठी पुस्तक घडाघड वाचू लागले व त्याचा अर्थही त्याना समजे. वयाच्या आठव्या वर्षी इंग्रजी चौथीचे पुस्तक ते उत्तम तऱ्हेने वाचू व समजू लागले. एकदा त्यांच्या शाळेत एक इंग्रज इन्स्पेक्टर आला. त्याला ते सर्व कौतुकाने दाखविले गेले. तेव्हा तो फारच खूप झाला. पण त्याने वामनरावांकडून कबूल करून घेतले की या मुलाला वरच्या वर्गात लवकर चढवावयाचे नाही; कारण त्याच्या मते इतक्या कोवळ्या वयात मेंदूस इतका ताण देणे अयोग्य होते. त्यामुळे पुढे ते मॅट्रिक सतराव्या वर्षी झाले. पण त्यापूर्वी खूपसे वाचन करून त्यांनी इतर ज्ञान पुष्कळ संपादन करून ठेवले होते.

लग्नात अण्णासाहेब तेरा वर्षांचे होते. अशांना त्यावेळी घोडनवरा म्हणत, म्हणून माझे चुलतसासरे गोपाळराव यांनी त्यांचे लग्न करण्यास म्हणून त्यांना साताऱ्यास आपल्याजवळ आणून ठेवले होते. त्यांना साताऱ्यास काही दिवस तिथल्या हायस्कूलात घातलेले होते. शाळेत जाण्यायेण्यास त्यानी त्यासाठी एक उत्तम घोडा व मोतद्दार ठेवला होता. माझे लग्न झाल्यावर माझे सासूसासरे आपल्या मुलासह वऱ्हाडात निघून गेले व माझे सासरमाहेर गोपाळराव मामंजींकडे सुरू झाले. घरात त्यांचा सर्वांवर एकसारखा दरारा असे. त्यांचा संताप केव्हा व कुठे भडकेल याला काही काळवेळ नसायचा. त्यांची मर्जी सांभाळायची म्हणजे माझ्या चुलत सासूबाईंना मोठे दिव्य वाटे. गोपाळराव मामंजींच्या जेवणाच्या बाबतीत इतक्या काही विचित्र खोडी होत्या की, सासूबाईंना अगदी डोळ्यांत तेल घालून स्वयंपाकपाणी करावे लागे. जरा कुठे भातात एखादा खडा किंवा केस दिसला की ते अतिशय भडकायचे आणि बायकोला वाटेल तसे बोलायचे. त्यांना वाढताना सासूबाई थरथरा कापत आणि ते पाहून मला कापरे भरायचे!

अशाच एका प्रसंगी गोपाळराव मामंजींच्या क्रोधाचा चांगलाच चुटका मला मिळाला. ते जेवायला बसले आणि लक्ष्मीसासूबाईंचे त्यांना विहिरीचे ताजे पाणी काढून आणणे गडबडीत राहून गेले. आता ते त्यांना बोलतील असे मनात येऊन मी चटकन् आमच्या मागल्या अंगणातल्या विहिरीचे पाणी कळशीने काढून

आणण्यासाठी गेले. मी माझ्यासारखीच ती लहान कळशी रहाटावरून काढायला व गोपाळराव मामंजी माझ्या पाठीमागे येऊन उभे राहायला एकच गाठ! मी विहिरीवर गेलेली त्यांना कशी दिसले कोण जाणे! "मी तुला बजावले होते ना, विहिरीचे पाणी काढायचे नाही? पुन्हा जर असे केलेस तर ठिकरीसारखी फोडूनच टाकीन!" असे मला रागाने बोलून ते लक्ष्मीसासूबाईंना शिव्या देतच घरात निघून गेले. मला तो असा वचक बसला की, मी पुन्हा त्यांचा कोणताच राग स्वतःवर ओढवून घेतला नाही.

गोपाळराव मामंजी बाहेर कामावर गेले म्हणजे आम्हा सासुरवाशिणींना मधूनमधून सागरगोटे, सांगस्या वगैरे खेळणे, झोपाळ्यावर ओव्या म्हणणे, असे करण्यास मिळे. एकदा अशा ओव्या म्हणत असतानाच आम्हांला अशी अद्दल घडली की, त्यानंतर पुन्हा कधी आम्ही झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणण्यास धजलो नाही. एक दिवस सकाळीच ते वकिलीच्या कामासाठी बाहेरगावी गेले होते. लक्ष्मीसासूबाईंना त्यामुळे अंमळ हायसे वाटले असावे. त्यांनी लवकरच कामधाम आटोपून आम्हा लेकीसुनांना झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणायला लावले. आज त्याही आमच्यात येऊन बसल्या होत्या. झोपाळ्याच्या एका बाजूच्यांनी ओव्या म्हणायच्या आणि मग दुसऱ्या बाजूने त्यावर म्हणायच्या, असे आळीपाळीने चालायचे, व कोण हटते ते पाहू, अशी चुरस लागायची. त्या दिवशी तर आमच्या ओव्या अशा रंगल्या व आम्हीही त्यात इतक्या दंग होऊन गेलो की काही विचारू नका! लक्ष्मीसासूबाईही त्यात रंगून गेल्या. कितीतरी दिवसांत त्या अशा मनमोकळ्या झालेल्या व त्यांच्या चेहऱ्यावर तसा आनंद आम्हांला दिसला नव्हता! पण या आनंदाच्या भर दंगलीत आमच्या वाड्याचा मागला दरवाजा एकाएकी काडकन् मोडल्याचा आवाज आला, आणि त्यातून गोपाळराव मामंजींची जणू नृसिंहमूर्तीच आत घुसली! त्यांचा तो लालबुंद चेहरा, रागाने गरगर फिरणारे घारे डोळे व शिव्यांची लाखोली पाहून आम्ही सर्व सुना-लेकी तेथून धूम पळून गेलो. बिचाऱ्या लक्ष्मीसासूबाई मात्र त्यांच्या तावडीत सापडल्या. ते म्हणे त्या दिवशी पक्षकाराशी भांडून, त्याजबरोबर बाहेरगावी न जाता घरी परतले होते. त्यांच्याच सांगण्यावरून आमचे पुढले दार आतून बंद केले होते, व ते आता रात्रीपर्यंत येणार नव्हते म्हणून आम्ही हा ओव्यांचा कार्यक्रम आरंभला होता. त्या नादात गर्क झाल्यामुळे त्यांनी बाहेरच्या दरवाजावर येऊन आम्हांला हाका मारलेल्या ऐकू आल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांचा क्रोध अनावर होऊन त्यांनी मागीलदारी येऊन लाथाबुक्क्यांनी तो दरवाजा अशा तऱ्हेने मोडून घरात शिरकाव केला होता! त्या दिवशी लक्ष्मीसासूबाईंवरही त्यांच्या लाथाबुक्क्यांचा प्रहार झाला व शिव्यांची झोड किती उठली ते विचारूच नये! त्यानंतर दोनतीन दिवस लक्ष्मीसासूबाईंचे तोंड अगदी सुकून गेले होते, व वावरताना त्या लंगडतही होत्या. पण नाक मुठीत धरून त्यांना आपल्या

यजमानांची सर्व कामे करायला लागतच होती. त्यांनीही बिचाऱ्यांनी त्याबद्दल आम्हा कोणाजवळ काही गाऱ्हाणे केले नाही. त्यावेळच्या रुढीची काय जबरदस्त जरब होती ती !

एकदा असेच घरात श्राद्ध होते. श्राद्धाची ब्राह्मणमंडळी जेवायला बसली होती. सासूबाई मोठी थोरली मोत्यांची नथ नाकात घालून वाढीत होत्या. अशा प्रसंगांना नथ घालावीच लागे. त्यामुळे त्यांचे स्वाभाविक सुंदर रूप विशेषच खुलून दिसत होते. इतक्यात जेवणाऱ्या ब्राह्मणांपैकी एक त्यांच्याकडे अंमळ निरखून पाहत असताना गोपाळराव मामंजींना दिसला. त्याबरोबर भर पंक्तीतून उठून त्यांनी सासूबाईंच्या थोबाडीत भडकावली आणि म्हणाले, " लाज नाही वाटत--ब्राह्मण तोंडाकडे टक लावून बघतो आहे अन् तू निर्लज्जासारखी इथे उभी आहेस ? " जणू काही तो ब्राह्मण त्यांच्याकडे पाहत होता हा त्यांचाच दोष होता ! त्यावेळी सासूबाईना आणि त्या ब्राह्मणास काय वाटले असेल ते त्यांचे तेच जाणोत ! हा प्रकार पाहून आम्ही सर्व सुन्न होऊन गेलो ! त्यानंतर दोन दिवस सासूबाई बाहेर आल्या नाहीत. रडून रडून त्यांचे डोळे सुजले होते. पण करतात काय ? नवऱ्याच्या अशा तऱ्हेच्या अनेक तब्येती सांभाळून त्याकाळच्या बायकांना आपला संसारशकट चालवावा लागे.

आमच्या घरात सख्खी—सावत्र मुलें, आप्तेष्ट मंडळी, आणि आश्रितांची मुले मिळून मोठा धबडगा असे. मला सासूबाईंना कामात मदत करावी लागे. शिवाय माझ्या चुलत जावा, नणंदा वगैरे असत. त्यांचीही पुष्कळ कामे मी करून द्यायची. त्यामुळे त्या माझ्यावर जास्तच काम टाकीत. संध्याकाळी मी अगदी दमून जायची आणि माझे डोळे मिटायला लागायचे. भूक लागलेली असायची, पण काही मागायची चोरी ! घरात सासुरवाशिणीला सकाळ—संध्याकाळ सर्वांच्या मागून जेवायला मिळायचे. अधेमधे काही एक मिळायचे नाही. सून लहान असो की मोठी असो, सरसकट एक नियम ! माहेरी सकाळी मऊ भात खायची सवय मला होती. पण लग्न झाल्यावर मऊ भात सोडाच पण आयुष्यातला सर्वच मऊपणा संपत असे आम्हा मुलींचा !

इतके असून माझे काही पूर्वसुकृत म्हणा किंवा काही म्हणा, पण माझ्यावर गोपाळराव मामंजींची पहिल्यापासून मर्जी बसली, व त्यांच्या रागीटपणाची मला फारशी झळ लागली नाही. माझ्या लग्नानंतर त्यांची वकिलीची प्राप्ती फार वाढली होती. ती माझ्या पायगुणामुळे असे त्यांना वाटत होते. शिवाय माझे लग्न ठरल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांच्या अंगावर वळचणीतून म्हणे एक भला मोठा नाग पडला, आणि त्यांना काही एक अपाय न करता अदृश्य झाला ! त्यावरून त्यांचा असा ग्रह झाला की ही घरात येणारी सून फार भाग्यवान आहे. या कारणांनी माझे नाव ‘ सरस्वती ’ ठेवण्याचे त्यांनी पूर्वी योजले होते, ते सोडून ‘ यशोदा ’ हे नाव

ठेवले. माझे सख्खे मामंजी उमरावती येथील हायस्कुलात श्री. विष्णु मोरेश्वर महाजनी ( हे पुढे रावबदादूर झाले ) यांच्या हाताखाली असिस्टंट हेडमास्तर होते, त्यावेळीं मी वयाच्या १०व्या वर्षी सातान्याहून प्रथम उमरावतीस आले. अण्णासाहेब त्यावेळीं मॅट्रिकच्या वर्गात होते. श्री. महाजनी यांची अण्णासाहेबांवर फार मर्जी होती, व त्यांनी त्यांचेवर तेव्हापासून जो पुत्रवत् लोभ ठेवला तो शेवटपर्यंत अखंड राहिला. अण्णासाहेब मॅट्रिकमध्ये पहिल्या वर्गात येऊन त्यांना काहीं बक्षिसेही मिळाली.

आम्ही शहरात भाड्याच्या घरात राहत होतो. घर खूप मोठे होते. कारण घरात सात आठ मुलगे–मित्र व नातेवाईक यांचे–अभ्यासासाठी ठेवून घेतलेले होते. मोफत विद्यादान करणे हे खऱ्या ब्राह्मणाचे कर्तव्य आहे असे मामंजी समजत. असो. याप्रमाणे माझ्या वयाच्या १० व्या वर्षापासून अण्णासाहेबांचा व माझा जीवनप्रवास एकत्र असा—म्हणजे एका घरात राहून, सुरू झाला. अर्थात् त्या काळच्या चालीप्रमाणे आमची जेमतेम दृष्टादृष्ट व्हायची व तीही जेवण वाढताना ! एकमेकाशी बोलणे कुठले ? तो विलक्षण उद्दामपणा समजला जाई, व त्यामुळे कोणत्याही सासुरवाशिणीची ती शिस्त मोडण्याची हिंमत होणे शक्य नव्हते. मी उमरावतीस वयाच्या दहाव्या वर्षापासून चवदाव्या वर्षांपर्यंत होते. पण वरील चार वर्षांत अण्णासाहेब फक्त एकदाच माझ्याशी बोलले. तो प्रसंग ऐकून पुढील पिढीला मौज वाटेल, व त्यावेळच्या चालींची थोडी कल्पना येईल म्हणून तो सांगतेः—

मला काम करताना भरभर चालायची सवय होती. त्यात मी उमरावतीस आल्यावर सासूबाईंनी माझ्या पायातल्या चांदीच्या साखळ्यांत भर घालून त्या मोठ्या करून दिल्या होत्या. हौसेचा व शृंगाराचा तो एक सोळा वर्षे लागेपर्यंत सासुरवाशिणीच्या बाबतीत आवश्यक भाग समजला जाई. हातांत गोठपाटल्या, गळ्यात टीक व सोन्याची जोंधळी पोत, कानांत बुगड्या व कुड्या, नाकात नथ, केसांत मूद व अग्रफूल, हे दागिने सर्व सुवासिनींना रात्रंदिवस घालावे लागत. कपाळीच्या कुंकवाप्रमाणेच ते सौभाग्य–अलंकार गणले जात. या पायांतल्या साखळ्यांमुळे माझे पाऊल चालताना अंमळ जोरात पडे व दणदण आवाज उठे. एक दिवस जवळपास कोणी नव्हते, व मी अशीच जोरात चालत असताना अण्णासाहेब तिथे आले व मला म्हणतात, “ केवढ्याने चालतेस ? बायकांनी मृदुपणाने चालावे; असा पायाचा आवाज होऊ देऊ नये ! ” ते ऐकून मी घाबरूनच गेले, व त्यानंतर कितीही भरभर चालले तरी पाय वाजू न देण्याची मी सवय केली.

मी उमरावतीस प्रथम वयाच्या दहाव्या वर्षी आले हे मी सांगितलेच. घरात खूप विद्यार्थी मुले मला दिसली. पण त्यांत अण्णासाहेब कोणते असावेत याचे माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. माझ्या लग्नाला आता चार वर्षे झाली होती व लग्नाच्या आठवणी मला फारच थोड्या होत्या. मी लग्नात सहा वर्षांची

तर होते; एवढ्या लहान वयात आठवण तरी काय राहणार? शिवाय त्यावेळी वधूने खाली मान घालून बसलेच पाहिजे असा कटाक्ष! पण आमच्या सासूबाई फार चाणाक्ष. मी उमरावतीच्या घरात गेल्यावर थोड्याच वेळाने त्या एका मुलाला म्हणाल्या, "जा रे, अण्णासाहेबांना बोलावून आण." व ते आल्यावर त्यांना माझ्या शेजारी उभे करून म्हणाल्या, "पाहू या ही नवऱ्याच्या कितपत उंचीला येते." मग मला अण्णासाहेबांची पूर्ण ओळख पटली! त्यावेळी मला अण्णासाहेब फार खिन्न असे वाटले. पुष्कळच वर्षांनी पुढे मला त्यांचेकडूनच त्याचे कारण कळले की, आमचे मामंजी सासूबाईना इतके कडकपणे वागवीत याबद्दल त्यांच्या हृदयाला वेदना होत व त्यांनी ठरविले होते की, जर ते मॅट्रिकमध्ये यशस्वी झाले नाहीत, तर घरातून कुठेतरी निघून जायचे, स्वतःच्या हिम्मतीने विद्याभ्यास करावयाचा व मग आपल्या आईस आपल्या वडिलांच्या कचाट्यातून सोडवायची! पण मग ते असेही म्हणत की, "मी त्यावेळी जर असा निघून गेलो असतो, तर माझ्या आईचे कोण हाल झाले असते व कुणास ठाऊक माझ्या आयुष्याचा ओघ कुठे व कसा वळला असता!" पण परमेश्वराने तो प्रसंग आणलाच नाही. स्त्रीजीवनाबद्दलचे कारुण्य व त्या दुःस्थितीपासून त्यांची सुटका करण्याची तळमळ त्यांच्यात, त्यांच्या आईला मिळणाऱ्या कठोर वागणुकीवरूनच मुख्यतः सुरू झाली. पण आमच्या सासूबाई फारच कर्तृत्ववान व धोरणी. घरातल्या विद्यार्थी मुलांवर त्या फार प्रेम करीत. त्या म्हणत, "मला अण्णासाहेब एकटेच होते, तरीपण मी त्यांना एकट्यालाच एकीकडे नेऊन कधी वेगळा खाऊ दिला नाही. मी घरात सर्व मुलांना एकसारखेच प्रेमाने वागवीत होते. त्यामुळेच अण्णासाहेबांना लहानपणापासून सर्वांशी समान दर्जाने वागण्याचे स्वाभाविक रीत्याच वळण लागले." घरातील विद्यार्थी मुलांना घरातले कोणतेच काम सांगायचे नाही अशी मामंजींची सक्त ताकीद असे. तरी पण ती मुले आपण होऊनच मामंजींना न कळत सासूबाईंना मदत करीत. उदाहरणार्थ, पाणी भरणारा ब्राह्मण वेळेवर न आल्यास त्यांना विहिरीवरून पाणी काढून ते भरून देणे व बाजारहाट करणे वगैरे. अण्णासाहेबांना बाजारहाटाचे काम सासूबाईंनी करू दिले नाही; कारण त्यांना भाव करून वस्तू विकत आणणे कधीच करता यायचे नाही. असो.

मी उमरावतीस येईपर्यंत परकरचोळीच नेसत होते! पण उमरावतीस आल्याबरोबर सासूबाईंनी त्या दिवसातील चालीप्रमाणे माझा साडी नेसण्याचा समारंभ केला. त्या दिवशी आप्तेष्टांच्या पुष्कळशा बायका जेवायला बोलवल्या होत्या. घरी समारंभ केले, कितीही बायका बोलावल्या, तरी आमच्या मामंजींची त्याला पूर्ण मोकळीक होती. मात्र घरातल्या बायका तेवढ्या केव्हाही कुठे बाहेर गेलेल्या त्यांना खपायच्या नाहीत! त्यामुळे वयाच्या दहाव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत घराच्या बाहेरचे जग मला दिसलेच नाही!

आमच्या सासूबाई विशेष कर्तृत्ववान् व चाणाक्ष होत्या, म्हणूनच मामंजीं-सारख्या तापट, लहरी व संशयी माणसावर त्यांची एक प्रकारची छाप पडे. मामंजींची मर्जी सांभाळणे म्हणजे महान् कठीण कर्म होते. त्यांच्या जेवणाची तऱ्हा काही औरच होती. नित्यशः सातआठ तोंडीलावणी लागत, व रोज लोणी काढून ताबडतोब कढविलेले ताजे तूप लागे. पानावर बसले की आयत्या वेळीं काही नवीनच तळण मागायचे. ते पाच मिनिटात तयार झाले पाहिजे, आणि सर्वांना सारखे वाढले गेले पाहिजे ! जेवणाच्या ऐन वेळेवर पाचसात पाहुणे जेवणास आल्याचा निरोप यायचा ! पण आमच्या सासूबाई त्याबद्दलची तरतूद झटकन करीत; कधी डगमगत नसत किंवा त्रासत नसत. जेवताना पाणी पिण्याची त्यांची एक भली मोठी तांब्याची पंचपात्री असे. ती त्यांनी तोंडाला लावली म्हणजे त्यात तांब्याने वरून पाण्याची धार धरावी लागे; व ती अशा तऱ्हेने पडली पाहिजे की पंचपात्री जास्त भरताही कामा नये, आणि त्यांचे पाणी पिणे संपल्यावर पंचपात्रींत पाणी शिल्लक राहता कामा नये ! ते सासूबाईंनाच तेवढे साधत असे.

मामंजींची मर्जी राखण्यास सासूबाईंना अनेक दिव्यांतून जावे लागे पण त्या माउलीने त्याबद्दल अप्रियता चर्येवरही दाखविली नाही कधी ! माझा जीव सासूबाईसाठी तिळतिळ तुटे व वाटे की गृहकृत्यांत आपण जीवापाड मेहनत करून त्यांना खूप सुखी केले पाहिजे. त्याही मला कितीतरी युक्तीने संसाराच्या गोष्टी शिकवीत. त्यांचाही स्वभाव कमी तापट नव्हता. पण तो त्या कह्यात ठेवीत. मी धोरण ठेवून त्यांच्या कलाने सर्व कामे करी. त्यामुळे त्यांचा माझेवर कधी कोप व्हायचा नाही व मला त्याबद्दल तशी भीतीही वाटायची नाही. त्या माझी मुलीप्रमाणे हौस करीत व मला कुठे काही कमी पडू देत नसत. आमच्या सासूबाई अत्यंत कल्पक, कुशल व कुशाग्र बुद्धीच्या होत्या. त्यांना बाहेरचे जग जर अधिक बघण्याची संधी मिळाली असती तर त्यांच्यामधील गुणांचा विकास केवढ्यातरी मोठ्या प्रमाणात झाला असता !

मी उमरावतीस गेल्यावर एका वर्षानेच मामंजींनी शहरातला एक तीनचौकी मोठा वाडा विकत घेतला. 'पिंपळगाववाल्याची हवेली' म्हणून तो भरवस्तीत प्रसिद्ध होता. आतापर्यंत आम्ही भाड्याच्या घरात राहत होतो, ते आता स्वतःच्या मालकीच्या वाड्यात गेलो. मामंजींना वाटले की, माझ्या चांगल्या पायगुणामुळेच हा वाडा त्यांना लवकर आणि थोडक्यात मिळाला. हा वाडा मोठा असल्यामुळे आमचा बायकांचा चौक वेगळा, पुरुषांचा चौक वेगळा व मामंजींचा चौक व माडी स्वतंत्र, असे झाले.

या वाड्याचा आधीचा मालक फार मोठा सावकार असून त्याने आपल्या वाड्यात अगणित द्रव्य पुरले आहे अशी लोकांत वार्ता होती. तो अकाली मरण पावला. त्याच्यामागे त्याच्या दोन बायका होत्या. त्यांना मूलबाळ नव्हते. त्यांचे

वैभव इतके मोठे होते की, त्या पालखीतून देवदर्शनास जात. त्यांना न्हाण्यास चांदीची घंगाळे असत. नवऱ्याच्या मागे त्यांना दारिद्र्य आले आणि तो वाडा विकण्याची पाळी आली. निदान ब्राह्मणाच्या हाती वाडा जात आहे, या भावनेने त्यांनी मामंजींना तो विकला. एकदा एका कोनाड्यात मामंजींना बावनकशी सोन्याचे एक कडे सापडले. ते लागलीच त्यांनी वाड्याच्या त्या जुन्या मालकिणींना नेऊन दिले. दारिद्र्य आले तरी त्या बाया फारच मोठ्या मनाच्या होत्या. "आम्ही तुम्हांला वाडा विकला त्याबरोबरच त्यात जे काही असेल ते तुमचेच झाले." असे त्या म्हणाल्या. तेव्हा मामंजींनी त्यांची समजूत घातली की, "मी फक्त वाडा घेतला आहे—त्यातले धन घेतलेले नाही; ते तुमचेच आहे; तुम्हांला त्याची माहिती नव्हती इतकेच." मग मामंजींनी ते कडे विकून ती रक्कम त्यांच्याकडे पोचती केली.

आता माझी दिनचर्या सांगते. पहाटे स्नान करून रोज तुळशीपुढच्या अंगणात सडा-सारवण करून रांगोळ्या काढायच्या, व सासूबाईंचे व मामंजींचे पूजेचे मांडावयाचे. मोलकरणीने धुणी धुतल्यावर त्यांवर सोवळ्यात पाणी घालून पिळून ती दांड्यांवर वाळत घालावी लागत. मोलकरीण न आल्यास सगळी धुणी माझ्यावरच पडत. सकाळीं भाज्या चिरणे, चटण्या-कोशिंबिरी करणे, हे माझेच काम होते. मामंजी व मुले जेवून शाळेत गेली म्हणजे सासूबाई व मी जेवायला बसायचे. जेवणानंतर दुपारी निवडणटिपण बरेच असे, व आल्यागेल्यासाठी फराळाचे जिन्नसही त्यावेळीं पुष्कळसे करायचे असत. संध्याकाळीं मामंजी, मुलगे घरी आल्यावर दूध पीत. चहा त्याकाळीं नव्हता. संध्याकाळीं ७-७॥ च्या सुमारास जेवणे होत. मागची कामे आवरून झोपायला ९॥-१० होत. मी चवदा वर्षांची होईपर्यंत असा माझा सतत नित्यक्रम होता.

याप्रमाणे बाहेरच्या जगाशी माझा या चार वर्षांत काही संबंध आला नाही. अण्णासाहेबांचेही त्या चार वर्षांत घरी फार राहणे नसायचे. ते पुण्यास डेक्कन कॉलेजात व पुढे मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात असत. एक दिवस मला कळले की, सासूबाईंच्या माहेरी कुणाचे तरी लग्न निघाले असून आम्ही सर्व लवकरच चिखलगावला (वाईनजीक) जाणार. तेव्हा माझा हर्ष गगनात मावेना. आता या उमरावतीच्या कैदखान्यातून आपली सुटका होणार या विचारात मी दंग झाले. आता साताऱ्यास माझ्या माहेरीही मला जायला मिळेल या कल्पनेने माझे हृदय वरचेवर उचंबळू लागले. गेल्या चार वर्षांत मला माहेरची काही एक बातमी नव्हती. माहेराबद्दल उत्सुकता दाखविण्याचीही सासुरवाशिणींना प्राज्ञा नसायची. सदा भिऊन, नमून राहावे लागे. सासुरवाशिणी म्हणजे गुलाम जशा! असो. शेवटी तो प्रवासाचा दिवस उगवला एकदाचा. सासूबाई, मामंजी व मी उमरावतीच्या आगगाडीत बसलो. आगगाडीची मला कोण अपूर्वाई वाटली! चार वर्षांपूर्वी मी उमरावतीस आले तो प्रवास झोपेझोपेतच झाला होता. मला

त्याबद्दल आठवणच नव्हती. पुण्यास अण्णासाहेब आम्हांला येऊन मिळाले व त्यांना घेऊन आम्ही सातआठ बैलगाड्यांत बसून पायरस्त्याने वाईकडे जाण्यास निघालो. वाईहून क्षेत्र धोम व तिथून चिखलगाव अशी वाट होती. वाटेत असा प्रवास करणाऱ्या अनेक गाड्या आम्हांला भेटत. पुणे सोडल्यापासून उलट दिशेने येणाऱ्या प्रत्येक गाडीकडे मी आशायुक्त नेत्रांनी पाही. वाटे, यात कोणी सातारचे, माहेरचे भेटेल; आणि दरवेळीं माझी निराशा होई. सासुरवाशिण म्हणून तसे काही बोलून दाखविण्याची चोरी ! इतक्यात—

उलट दिशेने येणाऱ्या गाड्यांतून ओळखीचे आवाज येतातसे मला वाटले. ते जवळ आले तो माझे चुलते बापू मला गाडीत स्पष्ट दिसले ! त्यासरशी सासुरवाशिणीने राखायची भीडमर्यादा पार विसरून मी त्यांना मोठ्याने हाक मारली. त्यांनी ‘ ओ ’ दिली. त्याबरोबर ‘मी आक्का आहे; बापू, गाडी थांबवा.’ असे मोठ्याने बोलून मी गाडीतून झटकन् उडी मारली ! बापू पुढे आले व मामंजींना “ अंमळ थांबा ” असे म्हणाले. पण “ आता वेळ नाही. आम्ही हळू हळू पुढे होतो. हिला सर्वांना जरासे भेटवून मग पुढे लवकर येऊन आमच्या गाड्यांना मिळू द्या. ” असे बोलून त्यांनी गाड्या पुढे चालविल्या. बापू, ताई ( चुलती ) व आणखी सातआठ माहेरची मंडळीं भेटली. तीही सर्व एका लग्नाला जाऊन परत येत होती. मी ताईला घट्ट मिठी मारली. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर वाहू लागला. केवढा आनंदाचा क्षण तो ! देवाने माझी हाक ऐकूनच जशी काही माझी माहेरची माणसे मला भेटविली होती. इतक्यात “ तुमच्या गाड्या फार दूर चालल्या. आता लवकर तू त्यांच्याकडे जा ” असा बापू मला आग्रह करू लागले. “ माझी माई ( आई ) मला भेटली नाही हो–मला आता लवकर साताऱ्याला न्या. ” असे मी बापूंना काकुळतीने म्हटले. त्यांनी आपल्या उपरण्याने आपले व माझे डोळे पुशीत “ नेऊ बरं आता तुला लवकर ” असे म्हणत मला परतविले. गाड्या फार दूर गेल्या असे पाहून त्यांनी एक भला माणूस माझ्याबरोबर दिला. अगदी मन घट्ट आवरून मी सर्वांना नमस्कार केला आणि गाड्या गाठण्यासाठी धूम पळण्यास सुरवात केली. त्यावेळीं माझ्या अंगात कोठून एवढी शक्ती आली असेल कोण जाणे ! एकदाच्या गाड्या गाठल्या. उशीर झाला म्हणून रागावतील हे भय होते. पण माझी भयभीत व अश्रूंनी न्हालेली मुद्रा पाहून मला वाटते कुणी मला रागावले नाही. माझ्यासारख्या मुग्ध सासुरवाशिणींची काय अवस्था होती याची आजच्या मुलींना कल्पना यावी म्हणून आपली ही एक आठवण सांगितली.

योग्य वेळीं आम्ही चिखलगावास पोहोचलो. चिखलगावात मला माझ्या समवयस्क अशा मुली व सुना खूपशा भेटल्या. गेल्या चार वर्षांत मला असा सहवास मुळींच लाभला नव्हता, त्यामुळे माझा तिथला वेळ फारच मजेत गेला. आम्ही सर्वांनी खेळीमेळीने कितीतरी कामे करायची. ओढ्यावर धुणी धुण्यासाठी जायचे.

तिथे कुणब्यांच्याही बायका येत, त्यांच्याशीही आम्ही गमतीत गप्पागोष्टी करायच्या. जातिभेदाची कल्पनाही त्यावेळी आमच्या कोणाच्या मनात यावयाची नाही. मला ते खेडेगावातील जीवन व वातावरण फार आवडले. तेथून डोंगरांचे देखावेही फार सुंदर दिसत. इथेच मी वयात आले व आगाशे मंडळींनी त्यावेळच्या रीती-प्रमाणे मला मखर वगैरे हौसेने घातले व माझ्या माहेरच्यांना बोलावणे धाडिले. माझे चुलते बापू तीनचार मंडळींसह उत्तमपैकी अहेर घेऊन आले. पण आमच्या मामंजींनी कशावरून कोण जाणे त्यांच्याशी खूप भांडण करून त्यांना त्यांनी आणलेल्या अहेरासह ताबडतोब साताऱ्यास परत धाडून दिले, व माझी व त्या मंडळींची भेटही होऊ दिली नाही. त्यामुळे घरातल्या सर्व मंडळींना–विशेषेकरून घरातल्या बायकांना फार वाईट वाटले. पण आमच्या मामंजींच्या पुढे कुणाचीही काही सांगण्याची हिंमत झाली नाही. मलाही अर्थातच ह्यावेळी माहेरी जाण्यास मिळाले नाही व मन फारच कष्टी झाले. चिखलगावचा लग्नसमारंभ आटोपून आम्ही सर्व अण्णासाहेबांबरोबर उमरावतीस परतलो.

● ● ●

यानंतर थोड्याच दिवसांत अण्णासाहेब बी. ए. झाले. त्यांची जात्याच लष्करी पेशाकडे ओढ होती. पण त्या काळात त्यात शिरकाव होणे कठीण होते; आणि चुलत्यांचा आग्रह पडला की त्यांनी वकील व्हावे. म्हणून एलएल. बी. चा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मुंबईस बिऱ्हाड करावे असे ठरले. त्याप्रमाणे मुंबईत भायखळ्यास 'गोल बंगला' म्हणून एक लहानसे घर होते, ते भाड्याने घेतले. तिथे सासूबाईंनी महिना दीड महिना माझ्याबरोबर राहून आमचा संसार मांडून दिला. घरातली म्हातारी स्वयंपाकीण त्यांनी माझ्याजवळ कामास व सोबतीस दिली, व एक नोकर ठेवून आमची उत्तम व्यवस्था लावून त्या उमरावतीस परत गेल्या. ही गोष्ट १८८१ सालची आहे.

मुंबईस राहिल्यापासून अण्णासाहेबांनी आपला कोणताच खर्च मामंजींवर पडू दिला नाही. एका मिशनरी शाळेत त्यांनी शिक्षकाची नोकरी धरली. ते काम सांभाळून त्यांनी एलएल. बी. च्या टर्मस् भरल्या. त्यांचे व माझे जीवन विकास पावण्याजोग्या अनेक गोष्टी मुंबईत घडल्या. त्यांपैकी प्रामुख्याने उल्लेखनीय म्हणजे मुंबईत आम्हांस वेगवेगळ्या तऱ्हेची विद्वान व थोर मंडळी, अनेक जातींची, अशी भेटली व त्यांपैकी काही कायमचे निकटचे स्नेही बनले. प्रसिद्ध वकील विश्वनाथ नारायण मंडलिक, डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, डॉ. काणे ही ब्राह्मण मंडळी त्यावेळी मुंबईत प्रसिद्धीस आलेली होती. मामंजींची

व त्यांची फार ओळख होती. या मंडळींनी अगदी घरच्याप्रमाणे आमचे अगत्य करून आमच्यावर लोभ ठेविला. त्याशिवाय माझे आजोबा सरदार कान्हेरे यांचे परम मित्र व मुंबईस उदयास आलेले भाटिया जातीचे धनाढ्य व्यापारी श्री. मुरारजी गोकुळदास हे मुंबईत माझे माहेरपण करीत असत. त्यांचे पुत्र धरमसी व त्यांच्या पत्नी यांनीही पुढे तो स्नेह तसाच चालू ठेविला. इ. स. १८९० पासून आम्ही जेव्हा उन्हाळ्यासाठी महाबळेश्वरी जाऊ लागलो, तेव्हा तेथे या मंडळींच्या वरचेवर गाठी पडत गेल्या व तो स्नेह वाढत गेला.

आम्ही मुंबईस गेलो तेव्हा डेक्कन कॉलेजापासून अण्णासाहेबांचे अगदी जीवश्चकंठश्च झालेले मित्र मल्हार खंडेराव उर्फ दादासाहेब चिटणीस आमचे घरीच अभ्यासासाठी म्हणून येऊन राहिले. आमच्या जीवनात त्यांची नैतिक व पारमार्थिक साथ आम्हांला अव्याहत मिळत गेली. ते जातीने परभू असून (मी जातीचा मुद्दाम निर्देश करीत आहे, कारण त्यावरून वाचकांच्या लक्षात यावे की, अण्णा-साहेबांजवळ जातिभेदाचे खूळ प्रथमपासून कधीच नव्हते.) इतिहासप्रसिद्ध खंडो बल्लाळ चिटणीस यांच्या वंशाच्या मुख्य घराण्यातले औरस वंशज होते. मॅट्रिकमध्ये त्यांनी संस्कृतची शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली होती. त्यांची वृत्ती शांत, निगर्वी व समाधानी होती. आपला नावलौकिक व्हावा ही गोष्ट त्यांच्या गावीही नसे. म्हणूनच 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या उक्तीप्रमाणे त्यांची व अण्णासाहेबांची गाढ मैत्री जमली.

याशिवाय मुंबईच्या मुक्कामात ज्या अनेक ओळखी झाल्या त्यांत पुढील मंडळी अण्णासाहेबांची फार मित्र झाली. हरि सीताराम दीक्षित – हे पुढे प्रसिद्ध सॉलिसिटर झाले; चिंतामण विनायक वैद्य – पुढे प्रसिद्ध लेखक झाले; पी. जे. पादशा – पुढे टाटा कंपनीत थोर पदास चढलेले पारशी गृहस्थ; तसेच मुंबईचे प्रसिद्ध वकील दाजी आबाजी खरे; या मंडळींच्या इतक्या दृढ ओळखी झाल्या की, त्या सर्वांनी तो स्नेह व घरोबा पुढे निरंतर कायम ठेविला. विद्वान व सत्यशील मंडळींचा स्नेह जोडावा, त्यांच्या कामांत त्यांना उत्तेजन द्यावे, घरी बोलावून त्यांचा आदरसत्कार करावा, या गोष्टी इथे मुंबईत अण्णासाहेबांनी अधिक प्रमाणात वाढविल्या. त्यामुळे मुंबईत आमच्याकडे पुष्कळ मंडळींची नेहमी ये–जा असायची. त्यांचे मोठमोठ्या विषयांवर वादविवाद चालायचे. आमचे घर लहानसेच होते. त्यामुळे मी जरी कधी बाहेर मंडळीत गेले नाही, तरी मला त्यांची सगळी बोलणी आतून ऐकण्याची सहजच संधी मिळाली व चांगले वादविवाद ऐकण्याची गोडी लागली. त्यामुळे माझ्या विचारांना नवीनच वळण मिळाले व आपणही खूप विद्या शिकून ज्ञानार्जन करावे अशी तीव्र उत्कंठा लागली. आतापर्यंत मला मराठी मुळाक्षरेही येत नव्हती. सासूबाई पोथी वाचीत, पण मला कधी 'शीक' म्हणून म्हणाल्या नाहीत. आम्हा सासुरवाशिणींच्या मनावर भीड व भय यांची इतकी घट्ट

पुढे बसलेली असायची की मी अठरा वर्षांची होईपर्यंत मला अण्णासाहेबांनाही कधी असे म्हणण्याचा धीर झाला नाही की, मला लिहिणे वाचणे शिकून ज्ञानार्जन करायचे आहे.

जाणाऱ्यायेणाऱ्या मंडळींचा खूप धबडगा मुंबईत होता. त्यामुळे उमरावती-पेक्षा इथे किती तरी पटीने अधिक अशी जबाबदारी माझ्यावर पडली व सासूबाईंनी शिकवलेली गृहकृत्ये उपयोगी आली. मला सर्व तऱ्हेची पक्वान्ने वगैरे चटकन करता येत. अण्णासाहेबांचे कपडे व्यवस्थित ठेवून त्यांना ते वेळच्या वेळी देणे, त्यांचे शिवणटिपण करणे, ही कामे मी माझेवर मुंबईत नवीन घेतली. अण्णासाहेबांचा व त्यांच्या मित्रांचा यावेळचा पोषाख डोक्याला पागोटे, अंगात अंगरखा व धोतर, व पायांत पुणेरी जोडे, असा असे. अण्णासाहेब कधीकधी बूट–मोजेही घालीत. ते सांगत की, कॉलेजात असताना पुष्कळ मुले डोक्याला पागोटी घालीत व अनेक वेळा अंगात अंगरखा न घालता नुसते उपरणेच घेत. फार किंमतीच्या कापडाचे कपडे न घालण्याचे अण्णासाहेबांनी प्रथमपासूनच ठरविले होते, व ते व्रत त्यांनी निरंतर पाळले. मात्र विलायतेस जाताना त्यांनी तिकडच्या चालीचे उत्तम कपडे केले. कारण तिकडे चांगल्या पोषाखाचा मनुष्य सद्गृहस्थ ( gentleman ) समजला जातो, म्हणून त्यांना एका जाणत्या इंग्रजाने मुद्दाम सांगितले होते. पण तिकडून परत आल्यावर पांढरी पाटलोण, अंगात बंद गळ्याचा रेशमी काळा किंवा पांढरा लांब कोट, व डोक्यास किरमिजी रंगाचा जरीचा रुमाल, असा पोषाख मुक्रर केला. त्यांची आई असेपर्यंत तिच्या इच्छेवरून ते घरात रेशीमकाठी धोतर नेसत. पण ती गेल्यावर मात्र त्यांनी घरात सरदारी विजार व अंगात त्यांच्या एका ठराविक कापडाचा पांढरा शर्ट, हे कपडे घालण्यास सुरुवात केली. असो. मामंजींसारख्या जेवणाच्या खोडी अण्णासाहेबांचे अंगी तिळमात्र नव्हत्या. पण त्यांना घरात सर्व व्यवस्थितपणाने लागे. मलाही तशीच आवड होती. त्यामुळे आमच्या घरात सर्वत्र प्रसन्न वातावरण राही.

पुण्यास डेक्कन कॉलेजात असतानाही अण्णासाहेबांनी आपल्या वडिलांच्या नात्याच्या किंवा ओळखीच्या मंडळींच्या मुलांचा शोध करून जुन्या ओळखी वाढवून, त्या कायम राखण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांच्या डेक्कन कॉलेजातल्या बऱ्याच गोष्टी मला पुढे त्यांच्या मित्रांकडून समजल्या. कॉलेजात ते सर्वांना हवे-हवेसे वाटत. त्यांचे इंग्रजीतले दोनतीन निबंध त्यांचे प्रोफेसर वॅरेट ह्यांनी त्यांवर उत्तम शेरा देऊन प्रिन्सिपॉलांना दाखविले होते. त्या वेळी एफ. जी. सेल्बी हे प्रिन्सिपॉल होते. त्यावर त्यांनी लिहिले "Who are you ? I want to meet you." त्यानंतर सेल्बी साहेबांनी अण्णासाहेबांना अतिशय उत्तेजन दिले, व त्यांच्याकडून अनेक ग्रंथ वाचून घेतले. त्यामुळे प्रथमपासून त्यांच्या अंगी असलेली देशभक्ती जोराने फोफावू लागली. त्यांना लहानपणापासून अनेक संस्कृत सुभाषिते,

तसेच अमरकोश वगैरे मुखोद्गत होती. कॉलेजात त्यांनी हे पाठांतर खूप वाढविले.

इ. स. १८८३ मध्ये अण्णासाहेब वकिलीच्या शेवटच्या परीक्षेत पहिले आले व त्यांना पारितोषकही मिळाले. त्याच वेळी त्यांच्या मित्रांनी म्हटले की, हे फार मोठे कायदेपंडित होणार! मी त्या आनंदात फारच गर्क झाले. तोच आता उमरावतीच्या त्या कोंडवाड्यात आपण पुन्हा डांबले जाणार ही कल्पना मला भेडसावू लागली. मुंबईची गेली दोन वर्षे मी नवे व मोठे जग बघत होते, स्वतंत्र वातावरणात वाढत होते आणि माझ्या मनात ज्ञानार्जनाच्या ऊर्मी उसळत होत्या. आता उमरावतीस गेल्यावर माझे मन पुन्हा गुदमरले जाणार होते. पण येईल त्या प्रसंगाला आता प्रसन्नतेने तोंड द्यायचे असा मी मनाशी निर्धार केला. त्याबाबत परमेश्वराने माझी कशीकशी परीक्षा घेतली ते पुढे दिसेलच.

आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार अण्णासाहेबांनी उमरावती हीच आपल्या वकिलीची कर्मभूमी ठरविली. विलायतेस जाऊन बॅरिस्टर होण्याची त्यांची इच्छा होती. पण श्री. विश्वनाथ नारायण मंडलिक त्यांना म्हणाले, "विलायतेस जाऊन व्यर्थ पैसा का नासता? तिथले लोक तुम्हांला जास्त काय शिकवणार? ते तकलुपी सोने आहे. तुम्ही बावनकशी सोने आहात!" मग तो बेत तितकाच राहिला. पण वऱ्हाडात सनद मिळण्यास त्यांना वर्ष दीड वर्ष लागले. म्हणून या अवधीत स्वस्थ न बसता त्यांनी मुंबई इलाख्याची सनद काढून उमरावतीस जवळ म्हणून भुसावळ येथे वकिली सुरू केली. दर शनिवार-रविवार ते तिथून उमरावतीस येऊन जात. पण त्यामुळे त्यांना फार दगदग पडू लागली. लवकरच त्यांना वऱ्हाडातील सनद मिळाली. पहिल्या दिवसापासून त्यांना चांगली कामे येऊ लागली. सनद मिळण्यास अडचणी उपस्थित झाल्यामुळे तरुण वकिलांच्या मनाची किती बिकट स्थिती होते, हे ध्यानात ठेवून अण्णासाहेबांनी त्या कामी पुढे कैक नवीन वकिलांना मदत करून लवकर सनद मिळवून दिली. सत्य बाजू असलेल्या पक्षकारांचीच कामे अण्णासाहेब घेत असत.

अण्णासाहेबांनी उमरावतीस वकिली सुरू केली त्यावेळी प्रल्हादराव जोग, पांडुरंग गोविंद अळशी, गोपाळराव खुशाल, देवराव विनायक दिगंबर हे वयोवृद्ध वकील, व रंगनाथ नरसिंह मुधोळकर हे तरुण वकील, हे प्रसिद्ध होते. मला वाटते श्री. दादासाहेब खापर्डे यांनी अण्णासाहेबांनंतर तीनचार वर्षांनी वकिली सुरू केली. जुन्या पिढीतील वकिलांस अण्णासाहेब फार मान देत. त्यामुळे तेहि अण्णासाहेबांवर खूष असत.

अण्णासाहेबांना वकिलीत जे पहिले पैसे मिळाले त्यांची त्यांनी मुंबईस जाऊन आपल्या आईच्या बुगड्यांसाठी मोत्ये खरेदी केली. त्या वेळी सासूबाईंना अत्यंत धन्यता वाटली. तेव्हापासून आपली आई जे काही म्हणेल ते त्यांना अण्णासाहेबांनी तात्काळ पुरविले. आता सासूबाईंना मुलाकडून खऱ्या सुखाचे दिवस आले होते.

पण त्याबरोबर मामंजींचे गाण्याबजावण्याचे छंद प्रमाणाबाहेर वाढू लागले होते. मामंजींनी नोकरीची पूर्ण वर्षे भरण्यापूर्वीच पेन्शन घेतले. त्यांनी इंग्रज इन्स्पेक्टरला सरळ जाऊन सांगितले, "मला नोकरी करणे म्हणजे गुलामगिरी वाटते. मी नाइलाजाने ती आतापर्यंत केली, पण इमानाने केली. आता माझा मुलगा नुक्ताच वकील होऊन मिळवता झाला. आता मला सेवानिवृत्त करा." त्या इंग्रजाला मामंजींचे सत्य व सडेतोड बोलणे फार आवडले व त्यांनी लागलीच त्यांचा राजीनामा मान्य केला. याप्रमाणे त्यांनी लवकरच पेन्शन घेतल्यामुळे ते आता सारखे घरातच असत. त्यायोगाने आम्हां बायकांना त्यांची प्रत्येक कामात जी बंदी होती ती अधिकच कडक झाली. त्यांचा रागीटपणाही वाढला होता. त्यामुळे सासूबाईही त्रासिक होऊ लागल्या होत्या. त्यांनी तरी किती दिवस धीर धरून सोसायचे? त्यामुळे मलाही सासूबाईंची मर्जी सांभाळताना पुरेवाट होऊ लागली. दर महिन्याला मी दूरची झाले की, घरातले काम एकट्या सासूबाईंवर पडे. त्यातून दर महिन्याच्या पाळीला माझे पोट भारी दुखे. त्यांना वाटे की मी पोट दुखण्याचे ढोंग करते. मग त्याबाबत त्या मला फार बोलत. मला इतके वाईट वाटे की, सांगायची सोय नाही! तरी त्या चार दिवसांत तशीच नेटाने बसून मी त्यांचे महिनाभर पुरेल इतके डाळ-तांदुळाचे निवडण आटोपून देई.

त्यात अलिकडे सासूबाईंना नातवंड बघण्याची फार घाई झाली होती. साहजिकच आहे. त्या काळाच्या मानाने त्याला उशीरच झाला होता. मी सतरा वर्षांची झाले होते; पण तो जसा काही माझाच दोष आहे, अशा तऱ्हेने सासूबाई इतर बायकांसमोर मला लावून बोलत. "अण्णासाहेबांचे आता दुसरे लग्न करून देते, कारण हिला मूल होत नाही" असे त्या बोलू लागल्या होत्या. माझे मन त्यामुळे अत्यंत उद्विग्न झाले. एक दिवस अण्णासाहेबांना रात्री मी त्याबद्दल सांगितले. त्यांनाही ते ऐकून फार वाईट वाटले. त्यांनी मला आश्वासन दिले की, काय वाटेल ते होवो, मी दुसरे लग्न कधीही करणार नाही. मला मामंजींचे स्नेही डॉ. गोविंदराव खोत यांचे औषध सुरू केले. यानंतर योगायोग असा की एका वर्षात मला दिवस राहिले. पण ते डोहाळे कोण त्रासदायक! सारख्या उलट्या होत व पोटात पाणी-सुद्धा ठरायचे नाही. पण आता सासूबाईंचा माझ्यावरचा राग बराच ओसरला व त्यांनी माझे पथ्यपाणी नीट केले. आता मला माझे ग्रह एकंदरीत सुधारले असे वाटू लागले.

याच सुमारास अण्णासाहेबांची वकिलीही लक्षात येण्याजोगी वाढली. त्यांनी बाबा गणपत देव म्हणून एक चांगला कारकून व ऑफिसकडे म्हणून एक वेगळा नोकर ठेवला. त्याच वेळीं आमच्या वाड्यात एक नाग वारंवार दिसू लागला. मला तर त्याची दहशतच बसली. मामंजींनी त्याला दूध पाजून नवस केला की, "आता घरात जे मूल जन्मेल त्याला तुझे नाव ठेवू; पण तू कुणाला असा दिसू नकोस." असो.

पूर्वीच्या काळीं पहिलटकरणीस तिच्या सातव्या महिन्यात बाळंतपणासाठी माहेरी नेत. त्यास अनुसरून आमच्या माहेरी लक्ष्मणराव रानडे म्हणून दोन पिढ्यांचे जुने कारकून होते, त्यांची मला माहेरी नेण्यासाठी रवानगी करण्यात आली. त्यांना मामंजींनी आठ दिवस उमरावतीस ठेवून घेतले. माहेरी धाडण्यापूर्वी सासूबाईंनी डोहाळजेवणे केली. मग माझी माहेरी पाठवणी करण्यात आली. ह्याच सुमारास माझे चुलत दीर, वामनराव मामंजींचे थोरले चिरंजीव पंडितराव यांचे लग्न झाले. त्यांच्या आई म्हणजे आमच्या चुलत सासूबाई भागीरथीबाई ह्या बऱ्याच तापट स्वभावाच्या होत्या. म्हणून माझ्या सासूबाईंनी त्यांना सांगितले की, "लग्नाची देवाण-घेवाण तुम्ही प्रथम ठरविली आहे; तरी लग्नात काही भांडणे होऊ देणार नाही असे तुम्ही मला वचन देणार असाल तरच मी लग्नाला येईन." त्यांनी ते सर्व मान्य केले. म्हणून सासूबाई, मामंजी, मी व अण्णासाहेब अकोल्यास लग्नाला गेलो. पण ह्या लग्नात भागीरथीसासूबाईंनी खूपच भांडणे केली. इतकी की, त्या काळातसुद्धा 'वरमायेच्या भांडणाचा अतिरेक' म्हणून ती गाजली! माझ्या सासूबाई त्यांच्या वडील जाऊबाई. त्यांनी भांडणे मिटविण्याची पराकाष्ठा केली. माझे मामंजी एवढे कडक, पण त्यांचेही भावजयीपुढे काही चालले नाही. माझ्या सासूबाई मामंजींना थट्टेने म्हणत, "आमची भागीरथीबाई दुसरेपणाची बायको आहे, म्हणून आमचे वामनभाऊजी तिला घाबरतात. एरव्ही ते काही कमी रागीट नाहीत. पण पहिली बायको गेली व मग दुसरी केली म्हणजे पुरुषांना तिची फार किंमत वाटते व ते तिच्यापुढे असे नमून वागतात." पंडितराव भाऊजी माझ्याहून दोन वर्षांनी लहान. लहानपणी ते माझ्याशी सोंगट्या व सागरगोटे खेळायचे. त्यामुळे त्यांचा माझा फार लोभ होता. त्यांचे सासरे प्रसिद्ध कोल्हटकर घराण्यातले, व त्यावेळीं ते अकोल्यात एक मोठे सरकारी अंमलदार होते. त्यांना ह्या भांडणामुळे फार वाईट वाटले. मला त्यांनी आपल्या घरी बोलावून सांगितले की, "ही माझी मुलगी अनुबाई दहा वर्षांचीच आहे. हिला तू धाकट्या बहिणीप्रमाणे सांभाळ." त्याप्रमाणे मी निरंतर ह्या नव्या जाऊबाईंशी मैत्री ठेवली. त्या काळातील लग्नातला एक मासला म्हणून मी ही हकीगत लिहिली. शिवाय तोपर्यंत जोशांच्या घराण्यात लग्नात भांडणे होत नाहीत, असाही लौकिक होता. असो. भागीरथीसासूबाई "तुम्हांला सून चांगली मिळाली, मला मात्र वाईट मिळाली." म्हणून माझ्या सासूबाईंना खूप उप-रोधिक शब्दांनी बोलल्या. पण माझ्या सासूबाईंनी त्यावर त्यांना प्रत्युत्तर दिले नाही;

इतकेच नव्हे पण त्या त्यांच्याशी प्रेमानेच वागत राहिल्या–जसे काही त्या त्यांना काही बोलल्याच नाहीत! ह्या सासूबाईंच्या मिळते घेण्याच्या स्वभावामुळेच त्यांच्या सर्व जावा व दीर यांत सलोखा राहिला. ह्यापासून मला फार बोध मिळाला व आयुष्यात पुढे आपणही तसेच वागावयाचे म्हणून मी मनाशी ठरविले. असो. ह्यानंतर मला लवकरच माहेरी बाळंतपणासाठी धाडण्यात आले.

मी बाळंतपणास साताऱ्याला जाण्यापूर्वी उमरावतीस अण्णासाहेबांजवळ वयाच्या अठराव्या वर्षी वाचायला लिहायला सुरुवात केली. ते आपल्या वकिलीच्या कामाशिवाय लोकसेवेची अनेक कामे करण्यात गढून गेलेले असत; पण मलाही काही वेळ देत. बाहेरच्या अनेकविध कामांमुळे त्यांनी घरातल्या माणसांकडे दुर्लक्ष केले नाही हे विशेष आहे. ते कित्येक गरीब विद्यार्थ्यांना शाळेची फी द्यायचे. अखिल भारतीय काँग्रेसची अधिवेशने हिंदुस्थानात १८८५ सालापासून सुरू झाली होती. त्याबद्दल जिकडेतिकडे बरेच कुतूहल निर्माण झाले असल्याचे कानी येत होते. आपला देश ऊर्जितावस्थेस यावा, स्वतंत्र व्हावा, यासाठी काय करावे अशी अण्णासाहेबांना रात्रंदिवस तळमळ लागलेली असे. या विषयावर वेगवेगळ्या मंडळींबरोबर ते नेहमी चर्चा करीत. मलाही त्यांच्या प्रत्येक गोष्टीत गोडी व महत्त्व वाटे. हळूहळू त्यांच्या सर्व कामांत आपण त्यांना साहाय्य करावे अशी माझ्यात उत्कट इच्छा जागृत झाली. अमुक तऱ्हेची भावना लोकांत उत्पन्न झाली तरच देशसेवेचे काम सुरू करावे अशी वाट न पाहता, आहे या परिस्थितीतच आपल्याला देशोन्नतीसाठी करिता येतील ती कामे सुरू करायची, असा आम्ही दोघांनी यावेळी निश्चय बांधला. राजकीय उन्नतीची कामे अण्णासाहेबांनी, व स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीची कामे मी करायची, असे आम्ही दोघांनी काम वाटून घेतले. ते काम कसे करावे याबद्दल अण्णासाहेब मला मार्गदर्शन करू लागले.

अलीकडे रोज रात्रीच्या जेवणाचे वेळी आमच्याकडे अनेक राजकीय व सामाजिक विषयांवर वादविवाद चालत. अण्णासाहेबांचे कोणते तरी स्नेही, आप्त, अशी दहाबारा मंडळी रोज जेवायला असायची. मलाही त्यांच्या त्या ज्ञानप्रचुर भाषणांचे तुटके अनायासेच लाभू लागले. आपण लोकांना जो उपदेश करायचा तो नुसता कोरडा न करता, ‘ आधी केले मग सांगितले ’ याप्रमाणे आपण आपल्या मुलांमुलींचे बाबतीत एक आदर्श कित्ता घालून देऊ, त्यांना उच्च शिक्षण देऊन चांगले वळण लावून उत्तम नागरिक बनवून दाखवू, असा संकल्प आम्ही दोघांनी त्यावेळी केला. पुढे मला प्रथम मुलगी झाली तेव्हाही अण्णासाहेबांनी सर्वांस निश्चयाने सांगितले की “ या मुलीला मुलासारखेच सर्व उच्च शिक्षण मी देईन; ते पूर्ण होईपर्यंत तिचा विवाह करणार नाही; व मुलाप्रमाणे मुलगीही सर्व दृष्टीने ज्ञानसंपन्न होऊ शकते हे दाखवून देईन! ” हे शब्द त्यांनी सर्व तऱ्हेने खरे करून दाखविले. ही बोलणी १८८७ साली घडली.

● ● ●

मी वयाच्या दहाव्या वर्षी सातारा व माहेर सोडले, ती वयाच्या अठराव्या वर्षी म्हणजे इ. स. १८८७ मध्ये परत साताऱ्यास माहेरी गेले. इतक्या वर्षांनी मला माहेरची सर्व मंडळी भेटल्यामुळे माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही !

गेल्या आठ वर्षांच्या अवधीत माझ्या माहेरी कितीतरी स्थित्यंतरे झाली होती. माझे चुलते बापू घरातली संपत्ती हळूहळू नाहीशी करीत होते. त्यांना बाहेरचा छंद लागला होता. भराभर घरातल्या वस्तु विकायचे किंवा गहाण टाकायचे ! शेतीवाडी, वसूल वगैरेकडे पूर्ण दुर्लक्ष झाले होते. घरात पैशाची चणचण भासू लागली होती. माझे वडील रावजी पुरते विरक्त–घरात काहीच बघायचे नाहीत ! मग बापूंना आवरणार कोण ? याही परिस्थितीत ताई (चुलती) व माई माझे माहेरपण सुखाचे करण्यासाठी जीवापाड झटल्या. त्यात माईला गेली चार पाच वर्षे रोज बारीक ताप येत होता म्हणे ! तरी पण यावेळी माहेरी सर्वांनी माझे इतके काही कौतुक केले की, मी खरेच सांगते, मी लाजेने अगदी गुदमरून गेले जशी ! किती आप्तेष्टांच्या घरी किती तऱ्हेची मला डोहाळजेवणे झाली त्यांची गणतीच नाही ! डोहाळतुली म्हणून मला बघायला बायकांची कोण गर्दी व्हायची ! माझे माहेरी इतके लाड होत, तरी पण त्याकाळी मुली व सुना यांनी पाळण्याच्या मर्यादेचे नियम फार काटेकोरपणे पाळले जात. त्याबद्दलची माझी एक हकीकत मी सांगते. एकदा मी मोठ्या हौदातील पाणी त्यात वाकून काढीत होते. काही काम करायचे म्हणजे अगोदर पदर बांधून घ्यायचा ही त्याकाळी पक्की रूढ शिस्त होती. पण मला नववा महिना लागलेला; मी अशी वाकल्यावर माझा खोचलेला पदर सुटून पाठीवर मोकळा झाला आणि पाठ उघडी दिसली. इतक्यात माई (आई) तिकडे काही कामास आली व माझी अशी उघडी पाठ पाहून तिने माझ्या पाठीवर अशी जोराने चापटी मारली (तिला ते फार अमर्यादेचे वाटले) की, मी कळवळून मटकन् खालीच बसले ! माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. "शुद्ध नाही पदराची– काय हा फाजीलपणा !" हे माईचे शब्द ऐकून मी भानावर आले. आईचे प्रेम व जिव्हाळा काय थोर, पण मर्यादा म्हणून समजलेली रूढी सोडून कोणतेही काम केले तर ते गैर समजून ते आईलाही खपत नसे. पण मी खरेच सांगते की, मला त्याबद्दल तिचा लवमात्रही राग आला नाही. बरे झाले, आणखी दुसरे कुणी नव्हते माझी उघडी पाठ बघायला ! माझी आई म्हणूनच तिने माझी मर्यादा सावरून घेतली, असेच मला वाटले. असो.

यावेळी माहेरी असताना मला त्याकाळीच्या (१८८७) स्त्री-जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधी अनायासे मिळाली. त्याबाबत अण्णासाहेबांनी मला नवा दृष्टिकोन दिला होता. माझे नवे विचार मी माझ्या आप्तेष्ट बायकांशी मधून मधून हळूच बोलून, त्यावेळच्या स्त्रियांच्या विचारांचा एकंदर झोक अजमावून बघत होते. मला एकंदरीत दिसून आले की, सर्व वर्गाच्या स्त्रियांना आपली स्त्रियांची

स्थिती फार दीन व असहाय आहे असे वाटत होते. ' आलो ना बायकांच्या जन्माला—आता असलेच जगणे व्हायचे ! ' अशीच वृत्ती होती. त्यातून मार्ग म्हणजे सती सावित्री, सीता यांजसारखे पतिव्रताधर्माने वागायचे हेच ध्येय प्रत्येकीत पूर्णपणे बिंबवले गेले होते. या स्थितीतून सुटका व्हावी ही मात्र सर्वांची उत्कट इच्छा होती. लिहिणेवाचणे शिकल्याने किंवा आणखी काही सुधारणा केल्याने आपले जीवन सुखी होईल, ही कल्पनाही कुणाला फारशी रुचत नव्हती. तरी पण " देवा, आता पुन्हा या घरात स्त्रीचा जन्म नको " असे पुष्कळजणी आपसात कुजबुजताना ऐकू येई.

विधवा बायकांची तर त्या काळातली दैना विचारूच नका ! मरण बरे पण हे वैधव्य नको असे त्यांना वाटे. विधवा वयाने कितीही लहान असली तरी तिने संन्यस्त वृत्तीने राहायचे; कुणापुढे कधी फारसे दिसायचे नाही; इतकेच नाही तर केशवपन केलेच पाहिजे, नाहीतर नवरा नरकात जातो, असेही एक कलम म्हणे धर्मग्रंथात घुसडलेले आहे ! ' घुसडलेले ' मी एवढ्याचकरिता म्हणते की, रामायणमहाभारतात तसा उल्लेख नाही. मी त्याबद्दल एका जबाबदार शास्त्र्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले की, 'बौद्धधर्माचा प्रसार झाला तेव्हापासून हा मुंडनाचा प्रकार व तोही फक्त ब्राह्मणवर्गात सुरू झाला आहे ! ' ते काहीही असो, पण ही पद्धत फारच भयंकर होती व अनेक दुर्दैवी विधवांना ते आघात सोसावे लागत होते. त्यांनाही ही आपत्ती अटळ व स्वाभाविक वाटे ! एखादी अत्यंत अन्यायाची गोष्ट रूढीमुळे कशी स्वाभाविक व न्याय्य वाटू लागते, याचे विधवाजीवन हे एक ढळढळीत उदाहरण आहे !

त्या वाईटामध्येही एक समाधानाची गोष्ट मला दिसून येई, ती ही की, त्या काळी स्त्री-जीवन कितीही कष्टमय असले तरी बहुतेक सर्व स्त्रिया ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून आपला संसार शांतीने करीत. ' माझे घरात पटत नाही—ही मी बाहेर निघून जाते ' अशी वृत्ती नव्हती. संसारात मिळते घ्यायचे, कुटुंबात एकी व जूट ठेवायची, हाच सर्वसाधारण स्त्रियांचा प्रयत्न असे. त्या वेळची समाजरचना अशाच धर्तीवर होती हेच त्यातले मर्म होते, असे मला वाटते. त्याबद्दल मी जो जो विचार करी तो तो माझी खात्री पटे की माणसाने आपली स्थिती सुधारण्याचे कितीही प्रयत्न केले तरी त्यास ईश्वरावर पूर्ण श्रद्धा व समाधानवृत्ती यांचे मुख्य अधिष्ठान पाहिजे, तरच खरे सुख सापडेल; व या तत्त्वास धरूनच सर्व सुधारणा झाल्या पाहिजेत. असो.

माझ्या पहिल्या मुलीचा जन्म ता. १-२-१८८७ रोजी माझ्या माहेरी साताऱ्यास झाला. मुलगी झाली म्हणून माझ्या माहेरच्यांना अंमळ वाईट वाटले. तथापि त्यांनी माझे बाळंतपणाचे सर्व विधि यथासांग व यथास्थित केले. त्याकाळची बाळंतपणाची तऱ्हा फारच विचित्र होती ! काय ती अंधारी बाळंतिणीची खोली !

खाजेखाली शेगडी ठेवून तिला दिलेला तो शेक! बाळंतीण त्यावर पापडासारखी शेकली जायची म्हणा ना! बाळंतिणीस खायला किती घालीत! डिंकाचे लाडू, आळिवाचे लाडू, खसखशीची खीर, हे सर्व जड पदार्थ, व पुष्कळ तूप खाल्लेच पाहिजेत. पण यानंतर बाळंतिणी मात्र चांगल्या लठ्ठ होऊन उठायच्या! आताच्या पाश्चात्त्य नवीन पद्धतीने बाळंतपण झालेल्या बाळंतिणी फिकुटलेल्या, अशक्त, दमलेल्या अशा का उठतात याचा सुज्ञ वाचकांनी विचार करावा. पूर्वीच्या बाळंतिणींना सर्व दृष्टींनी कमीत कमी सव्वा महिना पूर्ण विश्रांती मिळे. आता दहा दिवस झाले की, नवऱ्याबरोबर चहापार्ट्यांस किंवा सिनेमानाटके पाहण्यास जाण्याची त्यांची सुरुवात होते. या तऱ्हेची धांदल नवीन बाळंतिणीच्या शरीराला सोसत नाही, असा निश्चित अनुभव येतो.

माझ्या बाळंतपणास सव्वा महिना झाला तेव्हा माझ्या सासूबाई मला सासरी नेण्यास आल्या. उभ्या आयुष्यात माझे माहेरी राहणे असे याच वेळीं झाले; आणि तेहि सव्वा महिनाच. आता पुन्हा किती वर्षांनी माहेरी येता येईल कुणास ठाऊक, या विचाराने माझे हृदय फार कष्टी झाले. सासूबाईंनी त्या काळच्या रिवाजाप्रमाणे नवीन नातीस कपडे, दागिने वगैरे फार हौसेने आणले होते. ह्यावेळीं अण्णासाहेबांना त्यांच्या बारशाला घातलेली त्यांच्या आजोळची कुंची, शकुनाची म्हणून पहिल्या मुलीला घातली, व ही पुढे प्रत्येक मुलाच्या नाव ठेवण्याच्या प्रसंगी आपल्या कुटुंबात घातली जावी म्हणून मला बजाविले. मला माझ्या लग्नात घातलेली काचोळी व परकर त्यांनी जतन करून ठेविली. ह्या वस्तू मीही फार सांभाळून ठेवलेल्या आहेत. असो. माझ्या माहेरच्यांनी माझ्या मुलीस सोन्याच्या बिंदल्या, पायांतले चांदीचे तोडे व वाळे, गळ्यात सोन्याची पुतळी व कपडे देऊन, मला व सासूबाईंना रीतसर लुगडी, खण वगैरे दिले. ह्याशिवाय ह्यावेळीं माझ्या मामंजींनी चिखलगावला माझ्या चुलत्यांनी दिलेले जे आहेर परत केले होते ते माझ्या माहेरच्यांनी माझ्या सासूबाईंच्या हवाली केले. त्या वस्तूंबद्दल सासूबाईंनी फार कौतुक केले व पुढे मला पुष्कळ वेळा त्या म्हणायच्या, "तुझ्या माहेरची ती इतकी थोरली चांदीची भांडी घरात आल्यापासून आमच्या जोशांच्या घरात खूप चांदीची भांडी वाढायला लागली आहेत. ही भांडी मोठ्या शकुनाची लागली, ती कधीही मोडू नका." त्यानंतर सासूबाईंनी मुलीसह मला पुण्यास नेऊन तेथे दोन महिने राहून मग उमरावतीस नेली.

माझ्या मुलीचे नांव बाराव्या दिवशी प्रथम 'सीता' असे ठेवण्यात आले होते. पण त्यानंतर मामंजींचे पत्र आले की, तिचे नवसाचे (मागे सांगितलेल्या नागाच्या प्रसंगास अनुसरून) नाव 'नागूताई' ठेवावे. म्हणून पहिले नाव बदलले. तिला सर्वजण प्रथमपासूनच 'ताई' म्हणत. सासूबाई तिला जीव की प्राण समजून तिचे लाड करीत. तिला न्हाऊ-माखू त्याच घालीत, व रात्री ती त्यांच्याजवळच

निजे. त्यामुळे मला मुलीचा काहीच त्रास व्हायचा नाही. कोणत्याही तान्ह्या मुलास कधी न घेणारे आमचे मामंजीसुद्धा सारखे नातीस घेऊन बसत. याप्रमाणे आजी-आजोबा यांचे नातीचे कौतुक दिवसभर चालायचे. काळेभोर केस, मोठे डोळे, मोठे कपाळ व नितळ गोरा वर्ण, यामुळे ताई फारच तेजस्वी व पाणीदार दिसे. ताईचे घरात इतके लाड व्हायचे की, ती चांगलीच हट्टी होऊ लागली, व दोन वर्षांची होईपर्यंत चालली नाही. तिचे आजा-आजी तिला मुळी कडेवरून खाली सोडीतच नसत! ताईची प्रत्येक गोष्ट सासूबाई फार हौसेने करीत. तिचा उष्टावण समारंभ तर त्यांनी तिचेसाठी नवी चांदीची ताटली, लोटी पेला, पाच वाट्या, चमचा व चांदीच्या फुल्यांचे तीन पाट करून साजरा केला; व ते सर्व रोज वापरून तिला रोज थाटात त्या जेवायला घालीत. तेव्हापासून त्यांनी घरातील सर्व मंडळींना जेवणास रोज चांदीची ताटे मांडणे सुरू केले. त्यापूर्वी आम्ही ती भांडी फक्त सणावारी वापरीत होतो. ह्याच वेळी जेवणास दुहेरी पाट मांडण्याची प्रथा त्यांनी सुरू केली व पंगतीस जे कोणी बाहेरचे येई त्यासही ह्याच प्रकाराने ताटपाट मांडले जाई. त्यात कधीही भेदभाव केला जात नसे. अण्णासाहेबांनी या बाबतीत आपल्या आईस कधीच नको म्हटले नाही. पण त्यांची वृत्ती अशा बाबतीत अगदी विरक्त होती. मीही पुढे सासूबाईंनी घालून दिलेली ही पद्धत तशीच चालू ठेविली. माझ्या ती इतकी अंगवळणी पडली होती की, मला त्यात आपण विशेष काही करतो आहो असे वाटत नसे. पण आम्ही आमच्या मनाची ठेवण मात्र अशी ठेवली होती की, कुणाचे घरी जेवायला गेलो व तिथे जरी पत्रावळी मांडल्या असल्या तरी तिथे तितक्याच संतोषाने जेवीत होतो, व आम्हांला तशी सवय नाही असे न भासावे म्हणून सावधगिरी बाळगीत होतो. आमच्या सर्व मुलांनाही आम्ही असेच वळण लाविलेले आहे. काही मंडळी आमच्या ह्या पद्धतीला फार नावे ठेवतात, म्हणून मी हा मजकूर मुद्दाम खुलाशाने लिहिला आहे. तुम्ही कसेही वागा, लोक नावे ठेवतातच हे मात्र खरे. असो.

याच सुमारास श्री. मल्हार खंडेराव उर्फ दादासाहेब चिटणीस अण्णासाहेबांचे मदतनीस म्हणून उमरावतीस वकिली करू लागले. ते आमच्याच वाड्यात त्यांच्या पत्नी सौ. यमूताई यांजसह बिऱ्हाडास येऊन राहिले. आमची ताई दहा महिन्यांची झाल्यावर चिटणिसांना 'मैना' म्हणून मुलगी झाली. तिला आम्ही 'माई' म्हणत असू. या ताई-माईची जोडी सख्ख्या बहिणींप्रमाणे एकत्र वाढू लागली. ही मंडळी परभू जातीची होती व त्या काळात ब्राह्मणाने परभू माणसाला शिवायचे म्हणजे विटाळ मानला जाई. पण सासूबाईंनी त्यांच्याशी फार खेळीमेळीने व समजूतदारपणे वागून त्यांचे मन कधी दुखविले नाही. ती मंडळीही या बाबतीत फार समंजसपणाने वागत. यमूताई चिटणीस अत्यंत हुशार, विचारी व चाणाक्ष होत्या. मला त्यांची फार मोठी सोबत वाटे.

दादासाहेब चिटणीस दुपारी फावल्या वेळी आम्हांला केसरी, काळ, सुधारक, यांसारखी त्यावेळीं लोकप्रिय असलेली वृत्तपत्रे वाचून दाखवीत. त्यामुळे बदलत्या काळाप्रमाणे अनेक तऱ्हेच्या सुधारणा घडवून आणणे कसे इष्ट आहे, हे आमच्या मनावर दृढ बिंबू लागले. त्याशिवाय निरनिराळ्या संतांचे अभंग, श्लोक वगैरे ते आम्हांस वाचून दाखवीत व समजावून सांगत. कधी कधी अण्णासाहेबही तिथे येत व मग त्यांचा आणि दादासाहेबांचा ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल पुष्कळदा वाद व्हायचा. दादा ईश्वरवादी, तर अण्णासाहेब बुद्धिवादी! मला तर असे वाटते की, दादासाहेबांचा व आमचा इतका घरोबा नसता तर अण्णासाहेबांचा बुद्धिवाद ऐकून मीही अनीश्वरवादी बनले असते!

याच सुमारास मामंजींच्या स्नेह्याचा एकुलता एक मुलगा बळवंतराव लांडगे हा आमच्याकडे शिक्षणासाठी येऊन राहिला. त्याचे वडील उमरावतीत एक नावाजलेले वकील व फार दानशूर म्हणून प्रख्यात होते. त्याबद्दलच्या त्यांच्या अनेक गोष्टी आहेत. पण त्यातली एकच सांगते. एकदा ते बाजारातून जात असताना एक माणूस हिंदीत ओरडत होता–"काय ही उमरावती भिकार! माझी उंची अत्तरे घेणारा कुणीच गिऱ्हाईक मला इथे मिळत नाही!" त्याच्याभोवती खूप गर्दी जमली होती. हे वकीलसाहेब त्या व्यापाऱ्याजवळ गेले व त्याला म्हणाले, "किती रुपयांची तुझी अत्तरे आहेत?" त्याने एक मोठी रक्कम सांगितली. त्यांनी आपल्या नोकराकडून ती रक्कम आपल्या घरून ताबडतोब आणवून घेतली व त्याला दिली, आणि भर बाजारात त्याची सर्व अत्तरे आपल्या काठीवर ओतून घेतली! त्याचे ओघळ जमिनीवर सर्वत्र पसरले. मग त्यांनी त्या व्यापाऱ्यास सर्वांसमक्ष बजाविले, "बघ उमरावती किती संपन्न आहे–पुन्हा तिला नावे ठेवू नकोस!" पुढे कित्येक वर्षे तो विषय सर्वांच्या तोंडी होता. त्या काळात अशीही काही मंडळी होती. असो. बळवंतराव लांडगे यास आमची मुले 'लांडगे काका' म्हणत. ते त्यांचे मित्र भाऊसाहेब मुंडले यांजसह काही वर्षे उमरावतीस राहून पुढे यवतमाळ येथे जाऊन राहिले. भाऊसाहेब मुंडले पुढे रावबहादुर झाले. या दोघांनी यवतमाळ येथे फार मोठा नावलौकिक मिळविला. हे दोघे मित्र व त्यांच्या पत्नी पुढे अण्णासाहेबांच्या सुधारकी मतांना पूर्ण साथ देत राहिले.

याप्रमाणे आमचे दिवस चालले होते. ताई आता चवदा महिन्यांची झाली होती. तिला उमरावतीचा उन्हाळा सोसेना म्हणून तिला घेऊन सासूबाई, मामंजी व मी एप्रिल १८८८ मध्ये महाबळेश्वरी गेलो. अण्णासाहेब नंतर मे महिन्यात आले. या वर्षापासून दर उन्हाळ्यात आमचे महाबळेश्वरी जाणे सुरू झाले. मामंजी मात्र येत नसत. उमरावतीलच मित्रमंडळींच्या मेळ्यात राहणे त्यांना बरे वाटे.

महाबळेश्वरी किंवा इतर ठिकाणी प्रवास करताना आम्ही सर्वांनी सेकंड क्लासने प्रवास करायचा हे अण्णासाहेबांनी ठरवूनच ठेवले होते. याचा मुद्दाम उल्लेख

करण्याचे कारण असे की त्या काळात चांगली ऐपत असलेली मंडळींही तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत. ज्यांना विशेषच ऐपत असे व आपला मोठेपणा लोकांत दिसावा अशी हौस असे अशी पुरुषमंडळी स्वतः सेकंड क्लासात बसून बायका-मुलांना तिसऱ्या वर्गात बसवीत. अण्णासाहेबांची सेकंड क्लासने प्रवास करण्याची विचारसरणी आपल्या कुटुंबियांना स्वास्थ्याने प्रवास करावयास मिळावा अशी होती. त्यात कोणत्याही प्रकारे आपली श्रीमंती दाखविण्याची वृत्ती नव्हती. फर्स्ट क्लास तर त्यावेळी इंग्रज अंमलदारांसाठीच आहे असे दिसून येई. कोणी हिंदी माणसाने त्या डब्याने प्रवास केला तर त्यात बसलेला इंग्रज त्याला त्यातून घालवून देण्याचा यत्न करी. आम्हांलाही तसा अनुभव बऱ्याच वेळा आला. कारण सेकंड क्लासचे रिझर्वेशन न मिळाल्यास आम्ही फर्स्ट क्लासने प्रवास करीत असू. दरवेळी आतील इंग्रज प्रवाशांशी भांडून आपला तिथे बसण्याचा हक्क प्रस्थापित करावा लागे. त्यावेळी स्टेशनमास्तर व गार्डही इंग्रजांना घाबरत. पण आम्ही नेटाने व हक्क म्हणून तिथली जागा सोडीत नसू. एकदोनदा तर इंग्रजांशी वाद घालून अण्णासाहेबांनी त्यांजवर बेअदबीची फिर्याद करण्यापर्यंत मजल नेली व त्यांना माफी मागायला लावली! थर्ड क्लासने प्रवास करणाऱ्यास सुखसोयी मिळाव्यात म्हणून अण्णासाहेब फार प्रयत्न करीत. पण त्यावेळी रेल्वेचे अधिकारी अगदी वरपर्यंत गोष्ट नेली तरी त्याकडे दुर्लक्ष करीत व तक्रारींची दखल घेत नसत.

इ. स. १८८८ च्या मेअखेर आम्ही महाबळेश्वर सोडून पुण्यास गेलो. त्यावेळी मुंबई-पुण्याकडे अनेक थोर मंडळी चमकू लागली होती. त्यांची व अण्णा-साहेबांची ओळख होतीच, पण त्यांच्या बायकामंडळींत आमची ओळख अण्णा-साहेबांनी करून दिली. त्या मंडळींपैकी न्या. रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, विष्णु मोरेश्वर भिडे, दाजी आबाजी खरे, रामभाऊ जोगळेकर, इत्यादिकांच्या घराण्याशी आमचा घरोबा उत्तरोत्तर वाढत गेला. आम्हांला अशा अनेक प्रकारच्या गोष्टींचे अनुभव आले की, ज्यामुळे आमच्या सार्वजनिक कल्याणाच्या कामास जोराने चालना मिळाली.

दर उन्हाळ्यात महाबळेश्वरी व पुण्यामुंबईकडे जाण्याने तिकडे त्यावेळी जन्म पावलेल्या अनेक लहानमोठ्या सार्वजनिक संस्था पाहण्याची व काहींना थोडाफार हातभार लावण्याची संधी आम्हांस मिळाली. प्रत्येक तऱ्हेच्या राजकीय व सामाजिक चळवळीत अण्णासाहेब जिव्हाळ्याने लक्ष घालीत, व त्या वऱ्हाडातही प्रसृत करण्यास झटत. पुण्यास श्री. धोंडो केशव कर्वे यांची व आमची फार मैत्री जमून त्यांचा 'अनाथबालिकाश्रम' आम्ही अगदी स्थापनेपासून पाहिला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी व तीत काम करणारी ज्ञानसंपन्न व स्वार्थत्यागी मंडळी यांजबद्दल अण्णा-साहेबांना नितांत आदर होता, व त्यांनी या मंडळींबरोबर सतत मैत्री ठेवली. अण्णासाहेब आपल्या मिळकतीतला केवढा तरी भाग अशा संस्थांना दानधर्म

करण्यात घालवीत. फावल्या वेळात ते परोपकाराची किती कामे करीत याची तर गणतीच करता येणार नाही. त्याबद्दलच्या त्यांच्या इच्छा परमेश्वर जणू काही त्यांच्या पाठीशी उभा राहून, त्यांना पैसा पुरवून पूर्ण करीत असे, असा अनेकदा अनुभव येई.

न्या. रानडे यांजबद्दलचा अण्णासाहेबांचा आदर अवर्णनीय असे. पुढे कित्येक वेळा ते आपल्या मुलांना सदुपदेशाच्या गोष्टी सांगू लागले म्हणजे न्यायमूर्तींबद्दल सद्गदित होऊन उल्लेख करीत. त्यांच्या थोरवीच्या अनेक गोष्टी सांगून म्हणत, " न्यायमूर्तींना वाईटातून चांगले व उपयुक्त निवडता येत असे. त्यांच्याकडे कुणीही जावो आणि काहीही सांगो, ते त्याला चांगलाच मार्ग दाखवीत. कुणी ' मला आगी लावाव्याशा वाटतात ' असे म्हटले तर ते म्हणत, " ठीक आहे, तर मग गावात उकीरड्याची जी बाजू आहे ती घाण आहे–तिथेच आग लावा, म्हणजे ती जळून शुद्ध तरी होईल ! " हे ऐकले म्हणजे मला वाटे, अण्णासाहेबही असेच समयसूचक, उपयुक्त सल्ला देणारे परोपकारी आहेत की !

अण्णासाहेबांच्या परोपकारी व धाडसी स्वभावाची एक हकीकत त्यावेळी घडली ती सांगते. एकदा आमच्या शेजारच्या एका घरास मोठी आग लागली. शेकडो लोक मदतीस धावले, त्यात मामंजी व अण्णासाहेबही पुढे झाले. अण्णासाहेबांनी महाप्रयासाने एका बाळंतिणीस माडीवरून सोडवून आणले. तो ती ' मूल वरच राहिले ' म्हणून आक्रोश करू लागली. लागलीच अण्णासाहेब जिवाची पर्वा न करता एका खिडकीतून वर चढले व त्या मुलाला सुरक्षित खाली घेऊन आले ! ते खाली उतरण्यास व माडी कोसळण्यास एक गाठ पडली ! मूल भेटल्यावर त्या आईचा आनंद काय वर्णावा !

याच सुमारास मामंजींचे एक लहानपणचे मित्र विष्णु सदाशिव परांजपे पुण्यास काही रोजगार करावा या हेतूने आले होते. ते अतिशय हुशार व खटपटी होते. आम्ही त्यावेळी पुण्यास आलो होतो. मामंजी व अण्णासाहेब यांच्याशी त्यांची व्यवसायाबाबत खूप चर्चा चाले. शेवटी असे ठरले की विष्णुपंतांनी झाडे, फुले व बी-बियाणे यांची वाढ व विक्री करण्याचा धंदा करावा. ' भुलईची खाण ' म्हणून पुण्यास एक मध्यवर्ती पाण्याची जागा होती, ती या कामासाठी विकत घेण्याची योजना झाली. त्यासाठी तीनचार हजार रुपयांची रक्कम एकदम हवी होती. कर्ज मागणे हे मामंजींच्या स्वभावाला माहीत नव्हते. मदत देतो म्हणून तर त्यांनी विष्णुपंतांना वचन दिलेले ! ते म्हणाले, " तुम्हा दोघी सासू-सुनांचे दागिने तूर्त विकून ही रक्कम उभी केली तर कसे ? " मी लागलीच माझ्या गोठ, पाटल्या, सरी वगैरे देण्यास तयार झाले. त्याप्रमाणे रक्कम उभी करून ती बिनव्याजी विष्णुपंतांना दिली. विष्णुपंतांनी पुढे ही रक्कम दोनतीन वर्षांत फेडली. मित्रकार्यासाठी

दागिने विकण्याचा हा माझा पहिला प्रसंग! त्यानंतर विष्णुपंतांची धंद्यात भरभराटच होत गेली. त्यांनी मला 'मुलगी' म्हटले, आणि दरवर्षी उन्हाळ्यात महाबळेश्वराहून आम्ही पुण्यास आलो म्हणजे आमचा ते अतिशय अगत्याने पाहुणचार करीत. अद्यापि 'विष्णु सदाशिव आणि कंपनी' या नावाने त्यांचा बी-बियाणाचा धंदा पुण्यास भरभराटीत आहे.

स्त्रियांचे शिक्षण व उन्नती यासंबंधीच्या अनेक चळवळी आम्ही पुण्यास सुरुवातीपासून पाहिल्या. त्या सुमारास पंडिता रमाबाई या उदयास येत होत्या. परंतु ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मोहजालात सापडून त्या ख्रिश्चन झाल्या होत्या. त्यावेळी देशात ती एक लाटच उसळली होती जशी! नारायण वामन टिळक म्हणून प्रसिद्ध कवी प्रथम हिंदु–ब्राह्मण व पूर्ण ईश्वरभक्त होते. त्यांनाही हिंदुधर्मापेक्षा ख्रिश्चन धर्म अधिक विशाल व सुसंस्कृत वाटला आणि ते ख्रिस्ती झाले. अशा तऱ्हेने अनेक सज्जन व निष्ठावंत लोक हिंदुधर्मास–तो इतका श्रेष्ठ असून –पारखे झाले.

एका जून महिन्यात आम्ही पुण्यास असताना एक दिवस सकाळीच पंडिता रमाबाई अण्णासाहेबांना भेटायला म्हणून घरी आल्या. त्यांचे आम्ही योग्य ते आदरातिथ्य केले. थोड्या वेळाने त्या म्हणाल्या, "अण्णासाहेब, मला तुम्हांस काही महत्त्वाचा संदेश एकीकडे जाऊन सांगायचा आहे." त्यावर अण्णासाहेब त्यांना पलीकडे सोप्यात घेऊन गेले. मग त्या म्हणाल्या, "मला ख्राइस्टने काल दृष्टांत दिला की, तुम्ही अण्णासाहेब जोशांना ख्रिश्चन व्हा म्हणून सांगा." त्यावर अण्णासाहेबांनी हसून उत्तर दिले, "असं का? फार चांगली गोष्ट आहे. ख्राइस्टला म्हणावं तू स्वतः जाऊन हा संदेश अण्णासाहेबांना सांग, म्हणजे ते ख्रिश्चन होतील!" गोविंदराव काणे म्हणून अण्णासाहेबांचे कॉलेजातील एक ईश्वरवादी स्नेही होते, तेही पुढे ख्रिश्चन झाले. परंतु त्यांचें मित्रत्व अण्णासाहेबांनी निरंतर ठेविले. ख्रिश्चन म्हणून कोणाशी त्यांनी हेवादावा केला नाही. सर्वांबद्दल त्यांची समदृष्टी असे.

राजकीय क्षेत्रातही अण्णासाहेबांचे असेच समदृष्टीचे व समतोलाचे धोरण असे. त्याकाळी पुण्यात राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या प्रमुख व्यक्ती म्हणजे बाळ गंगाधर टिळक, शिवराम महादेव परांजपे, गोपाळ कृष्ण गोखले वगैरे. या सर्वांशी अण्णासाहेबांची मैत्री होती. दादाभाई नौरोजी यांजबद्दल तर अण्णासाहेबांस फारच आदर होता. एखाद्या महान् ऋषीच्या दर्शनास जावे तसे ते जेव्हा जेव्हा मुंबईस जात, तेव्हा तेव्हा त्यांच्या भेटीस जात. त्या काळच्या परिस्थितीत दादाभाईंचे राजकारणातील धोरण अधिक उपयुक्त व दूरदर्शीपणाचे आहे असा त्यांच्या विचारांचा कल दिसून येई. मलाही ते त्यांच्या दर्शनास बरोबर नेत.

आमच्याकडे प्रथमपासून नाना प्रकारचे पाहुणे नेहमी येत असत. त्यात मोठे शास्त्री, सामाजिक व राजकीय मतांचा प्रचार करणारे, तसे कोणी क्रांतिकारकही असत. मला ते कोण हे पुष्कळ वेळा माहीत नसे! दादासाहेब चिटणीस म्हणत,

" अण्णासाहेबांची धन्य आहे ! या अशा मंडळींना सुद्धा ते त्यांच्याशी वादविवाद करून, सापाच्या मांत्रिकाप्रमाणे विषरहित करून, काही तरी भरीव सत्कार्य सात्त्विकपणाने करण्यासाठी वळवितात ! " अण्णासाहेबांना पुष्कळ जहाल मंडळी ' मवाळ ' म्हणून हिणविण्याचा प्रयत्न करीत. पण अनेक वेळा अण्णासाहेबांची भाषणे इतकी सडेतोड व कडक होत की स्वतःला जहाल म्हणविणारेही इतके उघड बोलू शकणार नाहीत ! परंतु हे सर्व कार्य करीत असतांना आपल्याला लोकांनी थोर म्हणावे असा भाव त्यांच्या मनात कधीही नसावयाचा. उलट ' अमुक एक मनुष्याची सत्कार्य करण्याची महत्त्वाकांक्षा आहे ना ? ठीक आहे, त्याला त्यात मदत करू, सत्कार्यास जितकी माणसे मिळतील तितकी जमवू ! ' हेच त्यांचे धोरण असे.

❀ ❀ ❀

या सुमारास हिंदुस्थानच्या कॉंग्रेसची गाऱ्हाणी इंग्रज जनतेच्या कानावर घालण्यासाठी विलायतेत एक शिष्टमंडळ धाडण्याचे ठरले. त्यात अण्णासाहेबांची निवड झाली. बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी सुरेन्द्रनाथ बॅनर्जी हे त्यात प्रमुख होते, व अण्णासाहेब व रावबहादूर रं. न. मुधोळकर हे त्यांचे सहकारी म्हणून जायचे ठरले. अण्णासाहेबांची प्रकृती अलिकडे नीट नसे. त्यांचे पोट वारंवार बिघडत असे. पोटात वात होऊन तो आतल्या आत अडकून बसे—इतका की, कधीकधी त्यामुळे त्यांचा जीव कासावीस होई. अशा परिस्थितीत त्यांचे विलायतेस जाणे मला किती कठीण वाटले म्हणून सांगू ! पण त्यांच्या देशकार्याच्या आड येणारी मी नव्हते. त्या काळात विलायतेस—तेही ब्राह्मणाने जाणे, याला सर्व तऱ्हेने केवढा विरोध असे याची आज कुणाला कल्पनाही येणार नाही ! याबाबत मामंजी व सासूबाई यानीही खूप धैर्य दाखविले. कॉंग्रेसच्या कामासाठी विलायतेस जायचे म्हणजे त्याकरिता त्याकाळी वर्गण्या, फंड वगैरे नसत; आणि असते तरी अण्णासाहेबांनी ते घेतले नसते. तेव्हा त्यांचे विलायतेस जाणे म्हणजे आमच्या कुटुंबाच्या खर्चाची निदान सातआठ महिन्यांची व्यवस्था करायला हवी होती. शिवाय विलायतेचा सर्व खर्च एक वर्ष तरी निभेल अशी पैशाची बेगमी बरोबर न्यायला हवी होती. इकडे विलायतेस जाण्याचे दिवस जवळ येत चालले आणि पैशाचे तर कुठे जुळेना !

काही मित्रांनी सल्ला दिला की, " बडोद्याच्या सयाजीरावांकडे जाऊन मदत मागावी. ते परदेशी जाण्यासाठी शिष्यवृत्त्या देतात. कॉंग्रेसचे काम होईल व बॅरिस्टरही होऊन येता येईल. कर्जाऊ म्हणून रक्कम मागावी; कारण तुम्ही फुकट उपकार कुणाचे घेणार नाही ! " त्याप्रमाणे अण्णासाहेब बडोद्यास जाऊन महाराजांना भेटले. महाराज त्यांच्याजवळ फार सहानुभूतिपूर्वक व गोड बोलले, पण कोणत्याच

तऱ्हेने रक्कम देण्याचे त्यांनी नाकारले ! यानंतर पुढे पंधरावीस वर्षांनी उन्हाळ्याच्या सुटीत ते महाबळेश्वरी आले असताना अण्णासाहेबांस भेटले. त्यावेळी अण्णासाहेब वऱ्हाडातले नामांकित वकील व काँग्रेसचे एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून लौकिकास चढले होते. महाराजांना अण्णासाहेबांचा स्वभाव व विचार इतके आवडले होते की, एक दिवस ते त्यांना आग्रहाने म्हणाले, " तुम्ही आमचे राज्यात प्रमुख दिवाण-गिरी पत्करा. " त्यावेळी अण्णासाहेबांनी सांगितले, " आपल्या या औदार्याबद्दल मी आपला आभारी आहे. पण मी स्वतंत्र बाण्याचा मनुष्य आहे. मला कुणाची नोकरी करणे जमणार नाही. " त्याच वेळी अण्णासाहेबांनी त्यांना मागील मदत नाकारल्याची आठवण दिली. त्यावर महाराज गहिवरून म्हणाले, " अरेरे, केवढे अमूल्य रत्न मी त्यावेळी गमावले ! आता आपण मित्र म्हणून ते सर्व विसरून जाऊ या ! "

सुदैवाने विलायतेस जाण्यास एकच महिना बाकी राहिला, तो अण्णा-साहेबांना एकदम वकिलीची मोठाली कामे आली. त्यांत काही पुढे एक वर्षांनी चालणारी होती, पण त्यांच्या पक्षकारांनी आपखुशीने आगाऊ रकमा आणून दिल्या. ईश्वराने त्यांना कधी काही कमी पडू दिले नाही. ईश्वराच्या या कृपेबद्दल माझ्या तर डोळ्यांतून आनंदाश्रूंचा पूर वाहिला ! २५ एप्रिल १८९० रोजी अण्णासाहेब बोटीने विलायतेस रवाना झाले.

दुर्दैवाने अण्णासाहेब विलायतेस तीन चार महिनेच राहू शकले. तिथे त्यांना पोटदुखी सुरू झाली. तशाच स्थितीत त्यांनी खूप कामे केली. बरेचसे काम उरकले होते. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्यांना त्यांच्या दुसऱ्या सहकारी मंडळींच्या अगोदरच हिंदुस्थानात परतणे भाग पडले. ते विलायतेस गेल्यापासून माझे मन मात्र भारी अस्वस्थ राही. त्यात मला आठवा महिना लागलेला. सासूबाईंनी मला बाळंतपणासाठी माहेरी पोहोचती केली. मन खिन्न झालेले. त्यात एकदा मला बैलगाडीनेही प्रवास करावा लागला, ते धक्के बसले. अशा परिस्थितीत मी माहेरीच आठा महिन्यांची बाळंतीण झाले. मुलगा झाला. चांगला मोठा व भव्य होता. पण जन्मल्यापासून बेचैन राही, म्हणून जुन्या पद्धतीप्रमाणे घरातल्या बायकांनी त्याला थोडी अफू दिली. दोन तीन दिवसांचाच होऊन तो गेला ! काय ईश्वरी संकेत व ऋणानुबंध असेल ते त्याचे तोच जाणे ! मी मात्र कित्येक दिवस अतिशय दुःखात बुडून गेले. मातेचे वात्सल्यप्रेमाचे कोमल तंतू—ते वर्णन लेखणीने होणे शक्य नाही ! त्याबद्दलचे स्मरण माझ्या हृदयावर कायमची जखम करून राहिलेले आहे. असो. ह्यानंतर १५ दिवसांनीच मला सासूबाईंनी सासरी नेली व अण्णासाहेब विलायतेहून परत येणार होते, त्यांना आणण्यास त्या मुंबईस गेल्या. मुलगा सुखरूप परत आला, म्हणून त्यांना आणण्यासाठी मुंबईस गेल्या असता सासूबाईंनी बोटीची व समुद्राची पूजा केली ! ते पाहून बोटीवरच्या लोकांना मौज वाटली.

अण्णासाहेब एवढ्या उमेदीने व कष्टाने विलायतेस गेलेले, पण अशा रीतीने आजारी पडून त्यांना स्वदेशी परत यावे लागले. पण त्याबद्दल निराशेचा असा शब्दही त्यांनी कुणाजवळ काढला नाही. जणू काही विशेष काही झाले नाही अशा वृत्तीने त्यांनी आपले नित्याचे व्यवहार सुरू केले. हळूहळू त्यांच्या मित्रमंडळींचे सत्कार्य करणारे एक मंडळच उमरावतीत बनू लागले. त्यात दादासाहेब चिटणीस, माधवराव दामले, अनगळ वकील, भाऊसाहेब मुंडले वकील, काळे वकील वगैरे मंडळी होती. याशिवाय रं. न. ऊर्फ तात्यासाहेब मुधोळकर व दादासाहेब खापर्डे हेही या मित्रमंडळात येऊ लागले होते! दादासाहेब खापर्डे हे स्वतःला लोकमान्य टिळक यांचे गटातील 'जहाल' म्हणवीत व रावबहादुर मुधोळकर व अण्णासाहेब हे नामदार गोखल्यांची मते मानणारे म्हणून त्यांना 'मवाळ' म्हटले जाई. राजकीय गोष्टींच्या चर्चेचे वेळी या दोन्ही गटांत पुष्कळ वेळा कडाक्याचे वाद होत. लोकांना वाटे यांच्यांत यापुढे वाकडे येणार. पण एकदा वादविवादाच्या सभेतून बाहेर पडले की ही मंडळी एकमेकांशी फार प्रेमाने व खेळीमेळीने राहत. खाजगी जीवनात त्यावरून त्यांच्यामध्ये कुठेही रागारागीचा प्रकार व्हावयाचा नाही. खाजगी भेटीगाठी, घरोब्याने वागणे वगैरे पुरुषांत व त्यांच्या बायकामंडळींतही चाले. श्री. दादासाहेब खापर्डे यांचे कुटुंब सौ. लक्ष्मीबाई मला बहीण म्हणत व मी त्यांच्या घरी जेवायला गेले की मी बिनप्रायश्चित्ताच्या घरची म्हणून मला पंगतीबाहेर कधीही बसवीत नसत. त्यांना मुलगी नव्हती म्हणून त्यांचा मोठा मुलगा बाबासाहेब माझ्या मुलीस–ताईस–बहीण म्हणायचा व भाऊ-बिजेच्या दिवशी ओवाळून घ्यायला यायचा. अद्यापही ही भावंडें भेटली की त्यांच्या लहानपणच्या गोष्टींच्या मौजेने आठवणी सांगतात.

त्याचप्रमाणे रावबहादुर मुधोळकर व आमचे कुटुंब यात घरोब्याचा सलोखा असे. पुष्कळ लोकांना त्याबद्दल हेवा वाटे व आमच्यांत चुरस आहे, अशा गोष्टी उठवून वितुष्ट आणण्याचा ते यत्न करीत. पण तो कधीच सफल व्हायचा नाही. मुधोळकरांना चटकन् राग येई व पुष्कळ वेळा ते दुसऱ्याला टाकून बोलत. परंतु अण्णासाहेब ती सर्व भांडणे मिटवून सर्वांना शांत करीत. "मुधोळकरांच्या अंगात कर्तृत्व आहे; तिकडे बघा व त्याचा उपयोग करून घ्या." असे ते आपल्या मित्रांना समजावून सांगत. प्रल्हादराव जोगांसारख्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध वकिलाला ते फार मान देऊन वागत. त्यामुळे सर्व मंडळी अण्णासाहेबांवर खूष असत.

विलायतेहून परत आल्यावर त्यांनी आपल्या सर्व–घरगुती व बाहेरच्या–कामांत अधिक नियमितपणा व व्यवस्थितपणा सुरू केला. रोज सकाळी पांचला उठून प्रातर्विधि, नमस्कार व प्रातःकालचे फिरणे वगैरे आटपून ते कामाला लागत. जेवणाच्या वेळा कधीही चुकवीत नसत. रात्री नऊ वाजल्यानंतर लेखन किंवा वाचन कधीही करीत नसत. त्यावेळी कुटुंबातील मंडळीत, विशेषेकरून आपल्या मातुश्रीजवळ

बसून घटकाभर काही चांगल्या विषयावर गप्पागोष्टी सांगत बसत व दहा वाजण्याच्या आतच निजण्यास जात.

पण विलायतेहून आल्यानंतर सुद्धा अण्णासाहेबांची तब्येत मात्र काही केल्या सुधारेना. पुष्कळ वैद्य झाले, डॉक्टर झाले, पण पोटात वात होऊन जीव कासावीस होणे चालूच होते. ते अगदी फिक्कट दिसू लागले. शेवटी आपण कोणते अन्न खावे, प्रकृतीला ते कसे मानवेल वगैरे विषयावरील इंग्रजीतील व मराठीतील बरीच पुस्तके त्यांनी मागवली, व त्यांतील वेगवेगळीं पथ्ये करून पाहून, आपणास कोणता आहार मानवतो ते पडताळून पाहिले. भात खाणे अजीबात सोडले. मसाल्याचे पदार्थही वर्ज्य केले. अगदी सात्त्विक अन्न खाण्याचे ठरविले. पण हे सर्व प्रयोग करून निश्चित आहार ठरविण्यास दोन अडीच वर्षे लागली. त्यानंतर मात्र त्यांची पोटदुखी गेली.

या आहाराबद्दलची मला एक गोष्ट आठवली, ती गंमतीची वाटेल म्हणून लिहिते. एक दिवस अण्णासाहेब कचेरीत गेल्यावर मी दुपारी माडीवर जाऊन रोजच्याप्रमाणे त्यांची खोली व्यवस्थित लावीत होते. विलायती गृहव्यवस्थेबद्दल ऐकल्यावर त्याप्रमाणेच आपल्या घरात अधिक रेखीवपणा करण्याचे मी ठरविले होते. एका टेबलाचा कप्पा सहज उघडला तो आंत एक कोंबडीचे अंडे दिसले! मला वाटले, अण्णासाहेबांचा मुसलमान नोकर होता त्याने ते ठेवले असेल, म्हणून मी ते फेकून दिले. आमच्या त्या काळच्या समजुतीप्रमाणे अंड्याला हात लावणे म्हणजे विटाळ समजला जाई. म्हणून मी मुकाट्याने स्नान करून घेतले. सासूबाईंना त्याबद्दल काही सांगितले नाही. रात्री मी अण्णासाहेबांना ती हकीकत सांगितली, आणि नोकराला रागे भरा म्हणून त्यांना म्हटले. त्यावेळी त्यांनी 'मीच प्रकृती-साठी ती अंडी आणवून सध्या खाण्यास सुरुवात केली आहे' म्हणून मला सांगितले. त्यावेळीं त्यांनी विलायतेतही आपण मांसाहार कसा घेतला हे मला इतक्या चांगल्या तऱ्हेने समजावून सांगितले की त्याबद्दलच्या माझ्या सर्व गैरसमजुती दूर झाल्या, व त्यांच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी मी यमूताई चिटणीस यांजजवळ गुपचुप तसले पदार्थ करायलाही शिकले!

सदसद्‌विवेकबुद्धीस जे पटेल तेच करावयाचे हा त्यांचा बाणा होता. या कारणास्तव त्यांनी विलायतेहून आल्यावर प्रायश्चित्त घेतले नाही. 'मी विलायतेस गेलो ही काही वाईट गोष्ट केलेली नाही व तेथेही मी काही वाईट गोष्टी केल्या नाहीत; तेव्हा मी प्रायश्चित्त घेणार नाही.' हा त्यांचा ठाम निश्चय होता. मुधोळकर मात्र प्रायश्चित्त घेऊन मोकळे झाले. आमचे मामंजी एवढे कडक, पण अण्णा-साहेबांनी प्रायश्चित्त न घेण्यासंबंधीची आपली विचारसरणी त्यांना समजावून सांगितल्यावर त्यांनीही अण्णासाहेबांना प्रायश्चित्त घेण्याबद्दल पुन्हा आग्रह केला नाही. अण्णासाहेबांनी एकदा काही निश्चय केला म्हणजे तो ते कालत्रयीही फिरवणार

नाहीत हे मामंजी पक्के जाणून होते. मामंजी जुन्या वळणात वाढलेले खरे, पण प्रगतिपर व चांगले वाणेदार विचार ते ग्रहण करीत. या प्रायश्चित्त न घेण्याने मात्र आम्हांस पुढे लोकांकडून नानातऱ्हेचा त्रास सोसावा लागला. गावातले ब्राह्मण आमच्याकडे धर्मकृत्य करण्यास येईनासे झाले. मामंजींनी वाईहून एक हुशार ब्राह्मण विद्यार्थी आणून त्यास वेतन देऊन घरात पूजापाठ करण्यास ठेवला व त्याचे शिक्षणही करविले. "आमच्याकडे कुणी न आले तर मला सर्व धर्मकृत्ये येतात; घरातली धर्मकृत्ये मीच करीन." असे मामंजी म्हणायचे.

अण्णासाहेबांच्या प्रकृतीबद्दल मात्र मामंजींना फार चिंता लागली. डॉ. खोत व उमरावतीचे सिव्हिल सर्जन यांनी 'मोकळ्या हवेशीर ठिकाणी घर घेऊन तिथे त्यांना ठेवा' असा सल्ला दिला. म्हणून मामंजी स्वतः अण्णासाहेबांना बरोबर घेऊन अशा तऱ्हेच्या घराचा शोध करू लागले. उमरावतीस कँपात एका टेकडीवर मोकळ्या हवेचा एक लहानसा बंगला होता. त्यापलीकडे रस्त्याचे दुसऱ्या बाजूस एका अँग्लो-इंडियनाचा एक मोठा बंगला विकाऊ होता, पण तो इतका हवाशीर नव्हता. त्यांपैकी पहिला टुमदार लहानसा बंगला माझ्या मनात भरला. दोन्ही बंगल्यांच्या किंमती सारख्याच होत्या. तेव्हा धाकटाच बंगला मला आवडला म्हणून विकत घेण्यासाठी मामंजींनी तोच पक्का केला. कसा काय शकुन लागतो हे पाहण्यासाठी मामंजींनी प्रथम तो सहा महिने भाड्याने घेऊन मग चार हजार रुपयांना विकत घेतला. मामंजींच्या मनाने पक्के घेतले की बंगला फार शुभ शकुनाचा लागला; कारण तो भाड्याने ठरविल्यावर अण्णासाहेबांना खूप कामे येऊन बंगला विकत घेण्याची रक्कम फार जलद तयार झाली. आमचे पाहून मग तात्यासाहेब मुधोळकरांनी तो दुसरा मोठा बंगला विकत घेतला. हे सर्व होईपर्यंत उन्हाळ्याचे दिवस आले आणि आम्ही सालाबादप्रमाणें महाबळेश्वरी गेलो.

१८९०–९१ या वर्षी महाबळेश्वरी अण्णासाहेबांच्या आणखी खूप मंडळींशी ओळखी झाल्या. अण्णासाहेब कामासाठी विलायतेस जाऊन आलेले, व प्रायश्चित्त घेण्यास जोराने नकार देणारे म्हणून लोकांत त्यांजबद्दल यावेळी फारच कुतूहल निर्माण झालेले दिसले. मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन हे दरवर्षी उन्हाळ्यात नियमितपणे महाबळेश्वरी येत. त्यांची व अण्णासाहेबांची दाट ओळख झाली होती. अण्णासाहेबांनी प्रायश्चित्त घेतले नाही म्हणून राजेसाहेबांना फार वाईट वाटले होते. ते एकदा खिन्नपणाने अण्णासाहेबांना म्हणाले, "अहो, म्हणजे आता आम्हांला तुमच्या घरी जेवायला येता येणार नाही!" अण्णासाहेबांनी शांतपणे त्यांना म्हटले, "मग विजातीयांत आपले मित्र आहेतच ना, तसाच मी एक आहे असे समजा. मला आत्मविश्वास आहे की मी जो निश्चय केला आहे तोच बरोबर आहे, हे एक दिवस आपणास पूर्ण पटेल, व मग आपण स्वतः होऊन मजकडे भोजनास याल." आणि खरोखरच पुढे दहापंधरा वर्षांनी तसेच

घडले. बदलत्या जगाच्या प्रवाहाकडे व प्रगतीकडे पाहून राजेसाहेबांची मते सुधारणा करण्याकडे झुकली व ते महाबळेश्वरी आमच्याकडे जेवणास येऊ लागले.

अण्णासाहेबांनी प्रायश्चित्त न घेतल्याबद्दल विशेष हळहळ वाटलेले दुसरे गृहस्थ म्हणजे त्यांचे हितचिंतक मुंबईचे विश्वनाथ नारायण मंडलीक. हे अलौकिक बुद्धिमत्तेचे व बाणेदार वकील त्यावेळीं मुंबई इलाखाभर फार प्रख्यात होते. अण्णासाहेबांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे. तत्त्व म्हणून प्रायश्चित्त घ्यावयाचे नाही, ही अण्णासाहेबांची विचारसरणी त्यांना पटली होती. पण ज्याला आपण आपल्या मुलाप्रमाणें समजतो, तो असा वाळीत टाकला जाऊ नये, ही त्यांची उत्कट इच्छा. यावेळीं (१८९०-९१) जूनमध्ये आम्ही महाबळेश्वर सोडून पुण्यास आलो, तेव्हा बऱ्याच मित्रमंडळींनी अण्णासाहेबांशी रोटीव्यवहार बंद केला. न्यायमूर्ती रानडे यांनी मात्र त्यांना विलायतेहून कामगिरी करून आल्याबद्दल एक मोठी चहापार्टी दिली. त्यास पुण्यातील बरीच निवडक मंडळीं हजर होती.

या प्रायश्चित्ताबद्दल एक विशेष गोष्ट याच सुमारास ( १८९१ ) घडली. माझ्या मातोश्री आजारी होत्या. म्हणून माझे वडील रावजी वाई येथे येऊन राहिले होते. अण्णासाहेब विलायतेहून आल्यापासून त्यांची गाठ पडली नव्हती, म्हणून जूनमध्ये आम्ही महाबळेश्वराहून खाली उतरताना वाईस त्यांच्याकडे भेटीस गेलो. त्यांनी दोन दिवस आम्हांला वाईस ठेवून घेतले. एका शब्दानेही त्यांनी प्रायश्चित्ताची गोष्ट काढली नाही. मी हळूच रावजींना म्हटले, “ आम्हांला तुमच्याजवळ राहण्याचा आग्रह करू नका. इथले भिक्षुक तुम्हांला आमच्यासाठी त्रास देतील. ” तर ते म्हणाले, “ मला ठाऊक आहेत इथले लोक ! त्यांपैकी पुष्कळांच्या चारित्र्याबद्दल त्यांची चांगली खोड मोडण्याइतका पुरावा माझ्याजवळ आहे. ” त्याच दिवशी वाईत एक कसलीशी सभा होती. त्यासाठी अण्णासाहेबांना बोलावणे आले. तिथे गेल्यावर त्यांना एकदम पोटशूळ उठला व ते बेशुद्ध झाले. मग धावपळ करून त्यांना कसेबसे घरी आणले. एक दोन दिवसांनी आम्ही पुण्यास गेलो. तो काय, सबंध वाईभर म्हणे बातम्या की “ अण्णासाहेब जोशी दारू पिऊन बेशुद्ध होऊन पडले ! ” वगैरे. वर्तमानपत्रांतूनही त्या बातम्या खूप रंगवून ‘ सुधारकाची फजिती’ म्हणून छापून गेल्या. पुण्यातही जिकडेतिकडे हीच चर्चा ! उमरावतीपर्यंत या बातम्या पोहोचल्या, पण अण्णासाहेब दारूच्या थेंबासही शिवत नाहीत हे उमरावतीस सर्वांना माहीत होते. अण्णासाहेबांनी या काहुराकडे कांही एक लक्ष दिले नाही. ते विलायतेस गेले तेव्हा त्यांचे स्तुतिपर खूप मजकूर आला होता—आता निंदापर आला ! दोहोसही त्यांनी सारखीच किंमत दिली. माझ्या वडिलांनीही एक दिवस कृष्णाकांठी जमून शिळोप्याच्या गप्पा मारणाऱ्या व अण्णासाहेबांची निंदा करणाऱ्या काही भिक्षुकांची चांगलीच कानउघाडणी केली. तेव्हापासून कोणी भिक्षुक त्यांच्या वाटेस गेले नाहीत.

मी त्यावेळीं वाईहून दोन दिवसांसाठी सातारला माझ्या माहेरी जाऊन मग पुण्यास गेले. तेथे माझे नेहमीप्रमाणे प्रेमाने माहेरपण झाले. मी सातारला गेले की माझ्या सर्व आप्तेष्टांना जाऊन भेटत असे. त्याप्रमाणे एक दिवस सकाळीं माझ्या मावशींकडे गेले. तो तेथे फार मोठ्या मेजवानीचा बेत दिसला. मी विचारले, “ मावशी, आज काय आहे ? ” तेव्हा त्या म्हणाल्या, “ कशी वेळेवर तू. माहेरवाशीण आलीस ! आज मी त्या मोठ्या जहागीरदारीणबाईंना मेजवानी करीत आहे. ” तेव्हा मी त्यांना म्हटले, “ तर मग मी आता घरी जाते. संध्याकाळी पुन्हा येईन. त्या जहागीरदारीणबाई माझ्या ओळखीच्या आहेत. पण आम्ही बिनप्रायश्चित्ताचे म्हणून त्या माझ्याशी फार तुटकपणाने वागतात. केवळ ह्यांच्या ( अण्णासाहेबांच्या ) सांगण्यावरून मी त्यांना वर्षातून एकवेळ भेटते. त्यांचे यजमान ह्यांचे ( अण्णासाहेबांचे ) फार मित्र आहेत. पण मी या ठिकाणी भेटले तर त्या बाई माझा व तुमचाही अपमान करायच्या ! ” ह्यावर मावशी म्हणाल्या, “ मी ते काही एक ऐकणार नाही ! तू आमची आहेस. बघते त्या तुझा कसा अपमान करू धजतात ते ! त्यांच्या भीतीने आम्ही आमची लेक दूर करायची की काय ? ” मग मी तिला आम्ही सुधारक म्हणून नुक्ताच वाईस झालेला प्रकार सांगितला. पण मी जेवायला राहावे हा तिचा आग्रह ती सोडीना. शेवटी मी अशा अटीवर तिच्याकडे जेवायला राहिले की, “ त्या जहागीरदारीणबाई असेपर्यंत मी बाहेर येणार नाही. त्या जेवून गेल्यावर मग मी तुम्हां मंडळींबरोबर मागाहून जेवेन. ” यानंतर मोठ्या जाम्यानाम्यानिशी त्या जहागीरदारीणबाई मावशीकडे जेवायला म्हणून आल्या. त्या प्रथम बाहेर दिवाणखान्यात बसल्या. पण त्यांच्याबरोबर आलेली त्यांची एक मैत्रीण स्वयंपाकघरात आली. मी तेथे खोबरे किसून देत बसले होते. मला पाहून त्या मैत्रिणीने चकित झाल्याप्रमाणे दर्शविले, व ती परत दिवाणखान्यात गेली. तिच्या पाठोपाठच माझी मावशी “ जेवणाची तयारी आहे, चलावं पानावर ” म्हणून त्या पाहुण्यांना सांगायला गेली. तो ती मैत्रीण व जहागीरदारीणबाई एकमेकींच्या कानांशी कुजबुजताना तिला दिसल्या. मग जहागीरदारीणबाई मावशींना म्हणाल्या, “ आज आम्ही जेवत नाही. आम्हांला उपास आहे. आम्ही आता घरी जातो. आम्हांला आता कुंकूच लावा. ” ते ऐकून मावशींना आश्चर्याचा धक्काच बसला ! त्या म्हणाल्या, “ आज कशाचा उपास ? आपण माझं जेवणाचं आमंत्रण घेतलंत तेव्हा नाही तसं सांगितलं ? आपण आज जेवणास म्हणून आलांत ! उपासाचे पदार्थ मी आत्ता तयार करते... ” वगैरे. पण त्या काही ऐकेचनात व एकदम उठून जायला निघाल्या ! घरातल्या सगळ्या बायका गोंधळून गेल्या. त्यांना काहीच सुचेना. मी जाणले की मला पाहूनच त्यांनी असे वागणे केले. मग मी बाहेर गेले व जहागीरदारीणबाईंना म्हटले, “ आपल्याला जर असे वाटत असेल की मी आज आपल्या पंगतीला बसेन किंवा वाढायला वगैरे लागेन तर ती भीती

सोडा. मी आपणास सत्य सांगते की मी स्वयंपाकात मुळीच शिवले नाही आहे, व जेणेकरून आपल्या सोवळ्याओवळ्यात विघाड होईल असें काहीएक करणार नाही. आल्यासारखे आपण इथे जेऊन जावे." पण त्यांनी माझे बोलणे ऐकले न ऐकल्यासारखेच केले व माझ्या मावशींच्या अनेक विनवण्यांकडे काहीच लक्ष न देता व त्यांचे घरी काही एक न खाता, त्यांच्या घरची भरली ताटे टाकून, तश्शाच तावडतोब घरी निघून गेल्या! त्या गेल्यावर मला फार रडू कोसळले! मावशींनी माझी हरतऱ्हेने समजूत केली! कट्टर सनातनी वातावरणात वाढलेल्या असूनही माझ्या मावशी फार विशाल अंतःकरणाच्या होत्या. आपण जिला मुलगी म्हटले तिला सुधारक म्हणून दूर लोटणे त्यांना अशक्य वाटले. त्या काळातही अशी काही विचारवंत मंडळी होतीच. असो. पुढे माझ्या मावशींना निश्चित समजले की मी विनप्रायश्चित्ताची घरात होते म्हणून त्या जहागीरदारीणबाई त्या दिवशी त्यांचेकडे जेवल्या नाहीत! आम्ही प्रायश्चित्त घेतले नाही म्हणून अनेक मंडळी आम्हांला अनेक तऱ्हांनी विरोध दाखवीत त्यांपैकी एक मासला म्हणून ही हकीगत लिहीत आहे. असो.

यानंतर लवकरच आम्ही उमरावतीस परत आलो. अलीकडे मामंजींचे गाणेबजावणे व त्यावरून सासूबाईंना त्रास देणे, हे अधिकच वाढत चालले होते. आपल्या आईस होणाऱ्या त्रासाबद्दल अण्णासाहेबांचे मन अधिकाधिकच दुःखी होऊ लागले होते व त्यावरून त्यांच्यात व मामंजींत फारच वादावादी होऊ लागली होती. एक दिवस रात्री तर ती सर्व इतक्या विकोपास गेली की, अण्णासाहेब न जेवताच घरातून निघून गेले. तीन दिवसपर्यंत ते कोठे आहेत ह्याचा पत्ता लागेना. घरात आम्हा बायकांच्या तोंडचे तर पाणीच पळाले! मामंजीही फार घाबरले व नरम झाले. त्यांनी दादासाहेब चिटणीसांकरवी त्यांचा शोध करून, "घरी परत यावे व नव्या घेतलेल्या बंगल्यात तुम्ही आपली बायको व मुलगी यांजसह वाटल्यास वेगळे राहावे" म्हणून आग्रहाचे निरोप धाडले आणि मला व ताईला (मुलगी) एक दिवस संध्याकाळी मामंजींनी नव्या बंगल्यात धाडून दिले. मला त्याबद्दल आगाऊ तिळमात्रही कल्पना नव्हती. सासूबाई व मामंजी यांची गेल्या तीन दिवसांत खूप खलबतें चालत व त्यांनी मुकाट्याने नव्या बंगल्यात शिधापाणी व भांडीकुंडीही धाडून दिली होती म्हणे! माझी नव्या बंगल्यात रवानगी करताना सासूबाईंनी मला म्हटले, "आता तुमचे कायमचेच तिकडे बिऱ्हाड होणार. आता तुम्ही मजेत रहा. ...तुझ्यामुळेच माझ्या मुलाने वेगळे राहण्याचे ठरविले—" वगैरे बोलून मला फारच कडक शब्दात दूषणे दिली. ती मला लिहिणे सुद्धा दुःसह वाटते. मला सासूबाईंबद्दल आदर होता व त्यांच्यापासून वेगळे राहावे हे माझ्या कधी स्वप्नीही आले नव्हते. त्यामुळे त्यांनी मला दिलेली कठोर दूषणे माझ्या फारच जिव्हारी झोंबली. सासूबाईच प्रत्यक्ष असे बोलू लागल्यावर मग गावातल्या लोकांच्या माझ्यावर

होणाऱ्या टीकेचा एक भडकाच उडाला व जगाचा अनुभव नसलेली व सासूबाईंच्या कृपाछत्राखाली वाढलेली मी, निष्पाप, शुद्ध व निष्कपटपणाने आतापर्यंत आपल्या आत्मविश्वासावरच जी समाधानवृत्तीने राहात होते–त्या माझ्यावर हे असले कृतघ्न म्हणून आरोप यावेत, याहून दारुण दैवदुर्विलास काहीच असू शकणार नाही, असे मला वाटले. एखाद्या समुद्रकिनाऱ्यावर शांतपणे व निश्चिंतपणे उभे असावे व कुठून तरी एखादी प्रचंड लाट अकस्मात निर्माण होऊन आपण दूर समुद्रात एकदम खेचले जाऊन क्रुद्ध लाटांच्या हेलकाव्यात गटांगळ्या खात गुदमरत राहावे अशीच माझ्या मनाची त्यावेळी स्थिती झाली–यापेक्षा त्या अतिकठोर प्रसंगाचे अधिक वर्णन न केलेलेच बरे ! ह्या प्रसंगानंतर सासूबाई माझेशी प्रेमाने कधीच बोलल्या नाहीत. मी मात्र माझ्या-कडून त्यांना संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न करी. अण्णासाहेबांनी माझी व सासूबाईंची एक वर्षपर्यंत गाठ पडू दिली नाही. त्यांना भेटण्याची मला फार उत्कंठा वाटे, पण अण्णासाहेबांच्या निश्चयापुढे माझे काही चालले नाही. त्याबद्दल एकदा ते मला एवढेच म्हणाले की, “ ज्या तऱ्हेने मला माझ्या मुलांना यापुढे शिक्षण द्यावयाचे आहे व माझ्या आईसही सुख लागेल असे करायचे आहे, त्यासाठी मी वेगळा राहिलो हेच योग्य आहे. त्यामुळे माझ्या आईशी माझे वडील जरा नरमाईने वागतील अशी माझी अपेक्षा आहे. ” यानंतर याबद्दल ते मला काही जास्त विचारू देत नसत. सासूबाई व मामंजी गावातल्या घरातच यापुढे राहिले. अण्णा-साहेबांनी आपले ऑफीस गावातल्या घरीच ठेविले व रोज ते आईवडिलांची आस्थापूर्वक चौकशी करीत आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांचा सर्व खर्च चालवीत. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे आम्ही या वर्षी ( १८८९ ) क्यांपातील आमच्या नव्या बंगल्यात राहण्यास गेलो. मामंजी व सासूबाई गावातल्या घरातच राहिली.

* * *

# २

## ( १८८९ – १८९१ )

आम्ही उमरावतीस क्यांपातील नव्या बंगल्यात राहण्यास आलो त्यावेळी त्याबाजूस फारच विरळ वस्ती होती. रात्र झाली की घरात फार भीति वाटे ! कधी कधी तर खालच्या मोर्शी रस्त्यावर गाड्या लुटल्या जात. पहिल्यापासून अण्णासाहेबांनी एक रात्रीचा पहारेकरी, ताईला सांभाळण्यासाठी एक मोलकरीण, स्वयंपाकाला ब्राह्मण, व इतर कामाला एक कुणबी नोकर अशी माणसे ठेविली होती. बाबा देव कारकून होताच. सुदैवाने सर्व नोकर अत्यंत विश्वासू व कष्टाळू असे लाभले होते.

नव्या बंगल्यात आल्यानंतर मी अण्णासाहेबांना म्हटले, " मला मराठी शिकविण्यासाठी कुणीतरी शिक्षक ठेवा ! " तेव्हा त्यांनी त्यासाठी एका पोक्त पेन्शनर मास्तरांची योजना केली. अधिक विद्या संपादन करण्याची माझी फार दिवसांची इच्छा सफल होण्यास सुरुवात झाली. याचा परिणाम म्हणजे ' स्त्रियांना बिल्कूल शिक्षण देऊ नये ' अशा अर्थाची वेडावाकडा मजकूर घातलेली निनावी पत्रे अण्णासाहेबांना येऊ लागली. मलाही एक-दोन आली !

अशा स्थितीत मला १८९१ च्या फेब्रुवारी–मार्चच्या सुमारास पुन्हा नेहमीप्रमाणे कडक डोहाळे लागले. अण्णासाहेब स्वत: माझे पथ्यपाणी पाहू लागले. घरात दुसरे होतेच कोण ? मला तर पाणीसुद्धा पचत नव्हते ! तेव्हा अण्णासाहेबांनी त्याबाबत काही डॉक्टरी पुस्तके वाचली, इंग्रज सिव्हिल सर्जनचा सल्ला घेतला, व मला कोंबडीचा तयार सुर्वा सुरू केला. मांसाहार घेण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग ! पण हे एवढे खाणे मला पचू लागले व माझी प्रकृती बेतात राहिली. कोणतीहि अडचण येवो, अण्णासाहेब कधी डगमगायचे नाहीत ! त्यातून काहीतरी मार्ग ते शोधून काढीत. त्यांनी आपला पोटशूळ असाच बरा केला, हे मी मागे सांगितलेच आहे. पण एकंदरीत माझी प्रकृती नरमगरमच राहात होती. तरी-

पण मी माझा मराठीचा अभ्यास नेटाने चालू ठेवला होता; व मास्तरांच्या मते माझी प्रगती फार झपाट्याने होत होती. मी आता संतकवींच्या कविता वाचण्यास सुरुवात केली होती, व लहान लहान निबंधही लिहू लागले होते.

या वर्षी ( १८९१ ) एप्रिलमध्ये पुन्हा महाबळेश्वरी जाण्याचे दिवस आले व मला व ताईला नोकरांसह अण्णासाहेबांनी आगाऊच महाबळेश्वरी पाठवून दिले- तेथून परत आल्यावर मला पुष्कळसे बरे वाटू लागले होते. या खेपेस दिवस राहिल्यापासून माझ्या मनाला विलक्षण शांती आली होती. अण्णासाहेबांची वकीली अधिक जोरात सुरू झाली होती. त्यात अण्णासाहेबांची कामे फार वाढली. काँग्रेसची कामे, गावात 'सिटी लायब्ररी' स्थापणे, टेनिस वगैरेंसाठी क्लब काढणे, इत्यादी अनेक कामे त्यांनी सुरू केली. त्यासाठी गावात पुष्कळ सभा होत. त्यामुळे कधी कधी रात्री बारा एक वाजेपर्यंतही त्यांना घरी येता येत नसे. इंग्रज सिव्हिल सर्जनमार्फत त्यांनी माझ्यासाठी एक चांगली नर्स बघून ठेविली. एक दिवस सासूबाई बंगल्यावर आल्या आणि मला व ताईला गावातल्या घरी घेऊन गेल्या. एका वर्षानंतर माझी व त्यांची ही भेट झालेली. त्याबद्दल मला अण्णासाहेबांनी आगाऊ सांगून ठेविले होते. सासूबाईंना पाहताच मला त्यांना घट्ट मिठी मारावीशी वाटली. त्यांनी पूर्वी माझ्यावर केलेले कठोर आरोप मी विसरले. पण सासूबाईंची मुद्रा मात्र स्तिमित व निर्विकार राहिली. जसे काही पूर्वी त्या मला काहीच वाईट बोलल्या नव्हत्या! गावातल्या घरी मला मामेसासूबाई आगाशे व सीताबाई गोरे ( मामंजींच्या आजोळच्या नात्यातल्या ) भेटल्या. त्यांना माझ्या बाळंतपणासाठी म्हणून सासूबाईंनी आगाऊ बोलावून ठेविले होते. त्यांना माझेबद्दल फार सहानुभूती व प्रेम वाटे व त्यांच्यामुळेच मी सासूबाईंचे मला टोचून बोलणे शांतपणाने सहन करू शकले.

माझी दुसरी कन्या कमलाबाई हिचा जन्म ता. १ सप्टेंबर १८९१ रोजी पहाटे झाला. त्या दिवशी ऋषिपंचमी असून तेवढीच दीड दोन घटकांची वेळ उत्तम होती म्हणे! एका चांगल्या ज्योतिषाकडून मामंजींनी मुलीची पत्रिका करवून घेतली. त्या तास दीड तासात जो प्राणी जन्माला येईल तो अत्यंत पुण्यवान व भाग्यशाली होईल असे त्यांनी सांगितले. आणि खरोखरच जन्मल्याबरोबर कमलाबाईचे रूप किती सुंदर दिसले म्हणून सांगू! काळेभोर, कुरळे केस, कमलासारखे मोठे मोठे काळेभोर डोळे, रेखीव गाल, बाळसेदार चेहरा व संपूर्ण गौरवर्ण! म्हणूनच तिचे नाव 'कमला' ठेविले. सासूबाई तर दिवसातून तीन वेळा तिची दृष्ट काढून टाकीत! तिच्या बारशाच्या दिवशी सासूबाईंनी तिला बरेचसे मोत्यांचे दागिने केले. मुलीला सव्वा महिना झाल्यावर मी मुलीसह पुन्हा क्यांपात बंगल्यावर परत आले.

आता अण्णासाहेबांनी आपल्या नव्या नव्या सुधारणा करण्यासाठी मलाही काही गोष्टी करण्यास भाग पाडले. रोज सकाळी ते मला आपल्याबरोबर फिरायला

घेऊन जाऊ लागले. त्यावेळीं ते मला पायात बूटमोजे घालायला लावीत. अंगात पोलकी व केसांची तंग वेणी न घालता अंबाडा बांधायचा! गावात कुठेही गेले तरी पायात पुणेरी जोडा व अंगावर शाल हे घातलेच पाहिजे! जे काही करायचे ते सर्व उघडपणे करायचे–आत एक बाहेर एक असे काही नाही, असा अण्णासाहेबांचा कटाक्ष असे. कुठे बाहेर गेले की सर्वांनी माझेकडे टकमक पहायचे आणि कुचेष्टेने कुजबुजायचे! "ही ब्राह्मणाची बाई–हिने का असला पोषाख करायचा?" अशी जिकडे तिकडे बायकांत व पुरुषांत टिंगल सुरू झाली. आम्ही ख्रिश्चन झालो अशाही सर्वत्र कंड्या पिकल्या व तशी वाईटसाईट मजकुराची पत्रेही येऊ लागली! पुढे करण्याच्या अनेक सुधारणांमध्ये जनापवादाला तोंड देण्यास मन घट्ट होण्यासाठी हे जणू काही धडेच होते!

अशा तऱ्हेने दिवसामागून दिवस जात होते. रोज काहीना काही नवी कामे, नव्या अडचणी चालूच होत्या. त्यांतून धीराने मार्ग काढण्याचा मी दृढनिश्चय केला होता. माझ्या विद्यार्जनात मी यत्किंचित खंड पडू दिला नाही. आमच्या बंगल्याच्या पलीकडील टेकडीवर फ्रेंच सिस्टर्सचे 'होली क्रॉस' नावाचे कॉन्व्हेंट होते. तेथील मुख्य 'मदर' ची मी व अण्णासाहेबांनी तेथे जाऊन ओळख करून घेतली. मी त्यांच्याकडे रोज दुपारी जाऊन इंग्रजी लेखन, वाचन, संभाषण व हरतऱ्हेचे शिवणकाम शिकण्यास सुरुवात केली.त्यात सिस्टर सूझन म्हणून एक फार थोर घराण्यातली सिस्टर होती. तिचा व माझा सख्ख्या बहिणीप्रमाणे लोभ जडला. या बाईच्या सहवासाने मला कितीतरी चांगल्या नव्या नव्या गोष्टी समजल्या, व जगाकडे अधिक प्रेमाने व मोठ्या मनाने पाहण्याचा दृष्टिकोन आला. या फ्रेंच सिस्टर्स खरोखर फार उत्तम लोकसेवा करीत आहेत अशी माझी खात्री पटू लागली, व आपल्या हिंदु समाजात त्यांच्यासारख्या बायका, लोकसेवा करण्यास तयार व्हाव्या, असे मला अति उत्कटपणे वाटू लागले. मी सिस्टर सूझनशी याबाबत चर्चा करी. ती मला इंग्रजीत बोलायला लावी, त्यामुळे त्या भाषेचा सराव मला फार झपाट्याने झाला. 'Charity begins at home' ही म्हण त्यांनी मला प्रथम पटवून दिली. त्यामुळे गृहिणी म्हणून आपली गृहकृत्ये मी अधिक लक्षपूर्वक करू लागले. या सिस्टर सूझननेच मला कलात्मक गोष्टींबद्दलची गोडी शिकविली. चूल व मूल हेही गृहिणीचे पवित्र कर्तव्य असून ते तत्परतेने करून शिवाय बाहेरची लोकसेवेची कामे प्रत्येकीस करिता येतील अशी माझी खात्री होऊन ते करून दाखविण्याचा मी निर्धार केला. त्यात सिस्टर सूझनचे मला पुष्कळ साहाय्य झाले. अण्णासाहेबांचे तर या कामी प्रोत्साहन होतेच.

दादासाहेब चिटणीस यांच्या साहाय्याने आम्ही 'वनिता समाज' या नावाने स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उमरावतीस एक संस्था काढण्याचे ठरविले. १८९२ साली या संस्थेची स्थापना केली. लोकांनी एकदम बिचकून जाऊ नये म्हणून प्रथम

दर शनिवारी दुपारी तीन ते चार वाजेपर्यंत कीर्तने सुरू केली. दादासाहेब चिटणीस, माझे मामेदीर मोरुदादा आगाशे व बडनेऱ्याचे पेंडसे वकील यांची कीर्तने झाली. खूप बायका जमल्या होत्या. त्यावेळीं कीर्तनकारांनी सध्याच्या काळात स्त्रियांची काय काय कर्तव्ये आहेत याबद्दल विचार प्रगट केले. ही कीर्तने बायकांना फार आवडू लागली. हळूहळू गावातील विद्वान पुरुषमंडळींनाही आम्ही तेथे बोलावू लागलो, व कीर्तनरूपाने व व्याख्यानरूपाने ते आपले विचार प्रकट करू लागले. " हे सुधारक आम्हांला बाटवायला निघाले की काय ? " अशाही शंका लोकांत सुरू झाल्या !

त्याच वेळी आम्ही बायकांना दुपारी घरी लोणची, मुरांबे, पापड वगैरे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ कसे करावे, आपल्या जेवणात रुचकर व पथ्यकर प्रकार कसे करावे, मुलांची जोपासना कोणत्या पद्धतीने करावी, लोकरीचे विणकाम, कपडे बेतणे, कशिदा, भरतकाम, साक्षरता, वगैरे गोष्टी शिकवू लागलो. याबद्दल गावात मात्र खूप टिंगल सुरू झाली.

या वर्षी ( १८९१ ) आम्ही दरवर्षीप्रमाणे उन्हाळ्याचे सुटीत महाबळेश्वरी गेलो. एके दिवशी सकाळी मी व अण्णासाहेब फिरून परत येताना हाऊस एजंट श्री. दीक्षित यांचे घरी बाजारपेठेत बसलो होतो. इतक्यात एक तेजस्वी, तरुण, अंगात कफनी व डोक्यास फेटा बांधलेला असा भव्य पुरुष तेथे आला. तो फार श्रमलेला दिसत होता. " मी एक पांथस्थ साताऱ्याहून इथे आलो आहे—इथे कुठे माझी खाण्यापिण्याची सोय होईल काय ? " अशी त्याने चवकशी करण्यास सुरुवात केली. त्याला पाहिल्याबरोबर मला त्याच्याबद्दल विलक्षण आदर व आपुलकी वाटू लागली. आम्ही त्याला म्हटले की, " चला आमच्या घरी–आम्ही तुमच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करू. " मग तो आमच्या घरी आला. त्याच्या बोलण्याचालण्यावरून तो कुणी थोर घराण्यातला, भला व विद्वान मनुष्य आहे अशी आमची खात्री झाली. अण्णासाहेबांनी त्यांना आमच्या घरी तीनचार आठवडे ठेवून घेतले. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल वादविवाद करणे अण्णासाहेबांना अगोदरच आवडायचे. त्यात हा माणूस भेटला. रोज अनेक मंडळी आमच्या घरी जमत व फिरायला जात. त्या सर्वांचा वरील विषयावर वादविवाद चाले. त्यांची भगवी वस्त्रे पाहून त्यांना सर्वजण ' स्वामी ' म्हणत. त्यांची राहणी फारच साधी व सभ्य होती. ते रोज रात्री ९ वाजेपासून पहाटे ४ वाजेपर्यंत ध्यानस्थ बसत व दिवसा इतर मंडळींबरोबर बोलत चालत.

आमच्या इथे आल्यानंतर दुसरे दिवशी ते अण्णासाहेबांना म्हणाले, " तुमच्या घरी मी पाहतो, खूप पाहुणे मंडळी आहेत. या माताजी ( म्हणजे मी ) सारख्या कामात असतात. थकून जात असतील त्या. तुमची ही धाकटी मुलगी रात्री रडते. तर मी जर तिला रात्री सांभाळली तर तुमची काही हरकत आहे काय ? "

अण्णासाहेब म्हणाले, "आमची हरकत नाही. पण तुम्हांला आम्ही मुलीचा त्रास सोसायला का लावावे ?" ते म्हणाले, "छे, ती मला बिलकुल त्रास देणार नाही. एक दिवस पहा तर खरे !" त्या दिवशी रात्री जपाला बसण्यापूर्वी ते आमच्याकडे आले आणि म्हणाले, "माताजी, तुम्ही आज या मुलीला माझ्या झोळीत ठेवून पहाच !" मी कमलाबाईस कपड्यात नीट गुंडाळून त्यांच्या झोळीत घातली. ती झोळी बरोबर घेऊन ते रात्रभर ध्यानस्थ बसले. आश्चर्याची गोष्ट अशी की, त्या मुलीने रात्रभर हू की चू केले नाही ! (ती त्यावेळी ९–१० महिन्यांची होती.) मी सकाळी चारला नित्याप्रमाणे उठले, तेव्हा स्वामीजींनी मुलगी माझ्याजवळ आणून दिली. ते आमच्या घरी तीनचार आठवडे होते, तोवर त्यांनी रोज हा क्रम चालविला. या मुलीचा व त्यांचा पूर्वजन्मीचा काय ऋणानुबंध असेल तो खरा, पण माझ्या सर्व मुलींत ही मुलगी अत्यंत शांत व उदात्त स्वभावाची झाली. तिला व आम्हांला आपला कृपाप्रसाद देणारे हे स्वामी दुसरेतिसरे कोणी नसून पुढे जगद्वंद्य झालेले स्वामी विवेकानंद होते !

● ● ●

या सुमारास हिंदी लोकांना व्हॉलंटियर कोरमध्ये जाण्यास मिळावे म्हणून अण्णासाहेबांनी खटपट सुरू केली, व बंदुकीचा परवाना मिळवून नेम मारणे वगैरे शिकण्यास आरंभ केला. त्यांना सैन्यविषयक जीवनाची प्रथमपासून अत्यंत आवड होतीच, ती त्यांच्या विविध कार्यपटुत्वाबरोबर जोराने वाढू लागली. त्यांची 'अराजक क्रांतिकारक' म्हणून इंग्रजांच्या गुप्त माहितीखात्यात नोंद होण्यास ही गोष्ट प्रामुख्याने कारणीभूत झाली, हे आम्हांस पुढे काही वर्षांनी समजले.

याप्रमाणे नानाविध कामे अण्णासाहेब करीत होते. पण रोज संध्याकाळचा वेळ ते मला व मुलांना नियमितपणे देतच. नाही तर त्यावेळच्या पुष्कळ सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांबद्दल ऐकू येई व अनुभवही येई की जनताजनार्दनाचे कामामुळे त्यांना स्वतःच्या कुटुंबीयांकडे लक्ष देण्यास सवड होत नसे ! पण माणूस संसारात पडल्यावर त्याला काही कौटुंबिक कर्तव्य असतेच की नाही ? स्वार्थ आणि परमार्थ (जनसेवा) दोन्ही भरीवपणे करणे शक्य आहे हे अण्णासाहेब स्वतः वागून दाखवीत होते. कमलबाईच्या पाठीवर दोन वर्षांनी मला मुलगा झाला. हे बाळंतपणही सासूबाईंनी मला गावातल्या घरी नेऊन केले. मुलगा फार सुंदर असून त्याचे नाव नीलकंठ ऊर्फ मोतीभाऊ ठेविले. पण जन्मल्यापासूनच त्याच्या पोटात पांथरीचा विकार होता. त्यावर नानातऱ्हेचे उपाय केले, परंतु काही आराम पडेना. तो सारखा अशक्त होत चालला. त्याची आम्हांला रात्रंदिवस काळजी वाटे. अशा



श्री. मोरोपंत जोशी ( वय ३१ ), सौ. यशोदाबाई जोशी ( वय २४ )
कु. नागूताई जोशी ( वय ६ ), कु. कमला जोशी ( वय १॥ )

स्थितीतही लोकांनी उठविले की, "यांनी ही समाजसेवेची कामे काढलीं आहेत, त्यांत मुलांकडे दुर्लक्ष होत आहे." मला असली बोलणी फार लागत. अशा मनःस्थितीत मुलगा २-२॥ वर्षांचा झाल्यावर मला पुन्हा दिवस राहिले.

१८९५ सालच्या उन्हाळ्याच्या सुटीत आम्हांला महाबळेश्वरी जाता आले नाही. माझे बाळंतपण जवळ आले होते, म्हणून आम्ही पुण्यास क्यांपात बंगला घेऊन राहिलो. यावेळीं सासूबाई माझ्याबरोबर आल्या होत्या. पण त्याच वेळीं त्यांच्या माहेरी—बाईनजीकच्या चिखलगावी—लग्न निघाले व माझ्या बाळंतपणाला अद्यापि अवकाश आहे असे समजून, त्या अण्णासाहेबांसह लग्नासाठी गेल्या. एके दिवशी पहाटे माझे पोट दुखू लागले. जवळपास मायेचे कोणी नाही—क्षणभर माझे मन अगदी सुन्न होऊन गेले. पण मन घट्ट करून, शेजारी मालनबाई कुकडे म्हणून एक खिश्चन मास्तरीण राहत होत्या—त्यांची व माझी नुकतीच ओळख झाली होती—त्यांना मी बोलावणे धाडले. त्यांनी चटकन् एका गोऱ्या डॉक्टरणीस बोलावून आणले, व माझे बाळंतपण आस्थापूर्वक यथास्थित करवून घेतले. ह्या मालनबाई फार थोर मनाच्या व कर्तव्यनिष्ठ होत्या. त्यांनी आपल्या वडिलांच्या मागे आपल्या चार लहान भावंडांचे उत्तम शिक्षण केले. त्यासाठी त्यांनी मास्तरणीची नोकरी पत्करली, व त्या आजन्म अविवाहित राहिल्या. त्यांची व आमची मैत्री आजन्म राहिली. मला ह्यावेळीं तिसरी मुलगी झाली. पण त्यानंतर पाचसहा दिवसांनीच मोतीभाऊची प्रकृती विकोपास जाऊ लागली. मालनबाईनी व गोऱ्या डॉक्टरणीने सल्ला दिला की, मुलास ताबडतोब मुंबईस नेऊन इलाज करा. सहावे दिवशी अण्णासाहेब सासूबाईंसह गावाहून परत आले, व त्या दोघांनी मुलास मुंबईस न्यावे असे ठरले. त्या दिवशी मुलगा अगदी निपचित पडला होता, काही खाईना, त्यामुळे माझ्या काळजाचे जणू काही पाणीच झाले. मी बाळंतपणातही त्याबाबत तिळमात्रही हयगय केली नव्हती. मीही त्यांच्याबरोबर मुंबईस जाण्यास कंबर बांधली, पण मला कोणी नेण्यास तयार होईना! दुपारच्या गाडीने ही मंडळी मुंबईस जाण्याचे ठरले, तो मोतीभाऊ अंमळ हुशार झाला व मला अगदी बिलगून बसला. "मला दूध पाज, माझे केस विंचरून दे" असे म्हणाला. तेव्हा त्याचा एक सुंदर आरसा असलेला ब्रश होता तो घेऊन मी त्याचे केस सावरू लागले, तोच ब्रश माझे हातातून पलंगावरून खाली जमिनीवर पडला व त्यातील आरशाचे तुकडे तुकडे झाले! "अग बाई! what bad luck!" मालनबाई एकदम ओरडल्या. "आम्हा खिश्चन लोकांत आरसा फुटणे फार दुश्चिन्ह मानतात...." असे बोलून गेल्या! पण माझी झालेली दीन मुद्रा पाहून त्या पुढे म्हणाल्या, "तशी काही हरकत नाही म्हणा——मुलाला त्या तुकड्यांकडे पाहू देऊ नका." मग त्यांनी तो ब्रश घेऊन काचेच्या तुकड्यांसह तो आपल्या हातरुमालात घट्ट बांधला व म्हटले, "मी आता हे देवळात घेऊन जाऊन 'संकट टाळ' म्हणून

ख्राइस्टची प्रार्थना करीन; तुम्ही बिलकुल घाबरू नका. " मग मला सर्वांनी खूप धीराच्या गोष्टी सांगितल्या. पण आमचा मोतीभाऊ मला काही केल्या सोडीना! एका हाताने माझी मान व एका हाताने माझ्या गळ्यातला सोन्याच्या जाळीचा मणी त्याने घट्ट धरून ठेविला. मग मी तो गळ्यातून काढून त्याच्या हातात खेळण्यास दिला, व सासूबाईंनी त्याला माझ्याजवळून चटकन उचलून घेतला. माझ्याकडे येण्यास तो हात करीतच होता! त्याने त्या मण्याचा जोराने चावा घेऊन तो टाकून दिला व पुन्हा मलूल होऊन निपचित झाला! झाले!! मुलाला घेऊन मंडळी स्टेशनवर गेली. मी तो मणी हातात घेऊन किती तरी वेळ हताश होऊन अश्रु ढाळीत बसले! आमच्या मोतीभाऊचा फोटोही काढलेला नव्हता—म्हणून त्याची हीच आठवण म्हणून ठेवलेली आहे. माझ्या मनाची यानंतर काय स्थिती झाली हे मी लिहू शकत नाही! दिवसच काय पण घटकापळे मी ईश्वराचा धावा करण्यात घालवीत होते की, " माझा मोतीभाऊ बरा होऊन लवकर परत यावा. " माझे कशातही लक्ष नव्हते—सारखी त्याची मूर्ती माझ्याकडे येण्यास ओढ घेत आहे असा भास होई! मुलीचे बारावे दिवशी मालनबाईंनी मला मुलीला पाळण्यात घालायलाच लावली व म्हणाल्या, " तुमच्या मुली एकापेक्षा एक सुंदर! हिचे नाव ' माणिक ' हे नक्के हं! म्हणजे आता तुमचा ' मोती ' जोडीला बळकट होईल. " मला मुंबईची अद्याप काहीच बातमी समजलेली नव्हती. पण पुढे समजले की त्याच दिवशी आमचा ' मोती ' गमावला गेला होता! ईश्वराने आम्हांस दिलेला तेजस्वी तारा थोड्या दिवसांतच तुटून गेलेला होता. सायंकाळी गाडीने अण्णासाहेब व सासूबाई रिक्त हस्ताने मुंबईहून परत आले. ईश्वराने आपला ठेवा आपल्याकडे परत नेला! पुढचे काय सांगू? मला ब्रम्हांड शून्य झाले व कशाचेच भान राहिले नाही! परंतु जगाची रहाटी काय विलक्षण पाहा, त्या मानसिक स्थितीतही ईश्वराने आम्हांला आमची जीवनयात्रा पुढे पुढे चालविण्यास लाविले! मालनबाईंनी तो ब्रश—ज्याच्या आरशाचे शतशः तुकडे झाले होते तो—रुमालात बांधलेलाच मला परत आणून दिला. तोही मी आठवण म्हणून जतन करून ठेवला. त्या आरशाप्रमाणेच माझ्या हृदयाचे जणू काही शतशः तुकडे होऊन त्याच्या दुःखरूपी काचा माझ्या हृदयाचे लचकेच काढीत होत्या!

पण माझ्याप्रमाणें अण्णासाहेब दीन व हताश होऊन बसले नाहीत. त्यांनी मला फार धैर्य दिले. आपणास मुलांच्या संगोपनाची नीट माहिती नाही; त्याबाबतच्या अज्ञानामुळे हा प्रकार घडला, असे वाटून त्यांनी बालसंगोपनाबद्दलचे इंग्रजी, संस्कृत वगैरे अनेक ग्रंथ आणवून त्यांचा सूक्ष्म अभ्यास केला, व ठरविले की, दुधाचे नीट पचन न झाल्याने मुलांना पोटाचे अनेक रोग जडतात! आईचेही दूध अनेक वेळा मुलांना जड पडते. त्या काळात आतासारखी मुलांसाठी वेगवेगळ्या तऱ्हेच्या दुधांची पिठे निघालेली नव्हती, व डॉक्टर लोकही त्याबाबत हमखास अशी कारणे सांगू शकत नसत. पुष्कळ डॉक्टरांशी, विशेषतः इंग्रज डॉक्टरांशी, चर्चा करून

१८७५४

अण्णासाहेबांनी निर्णय घेतला की, गाढवीचे दूध मुलांना पचनास हलके व ताकद देणारे आहे. त्याप्रमाणे नव्या मुलीस त्यांनी ते देण्यास सुरुवात केली. त्याबाबत घरातल्या मंडळींनी व बाहेरच्या लोकांनी फारच नावे ठेवली! एक कुशल अनुभवशीर हिंदी डॉक्टरीण तर अण्णासाहेबांना म्हणाली, "गाढवीचे दूध फार उष्ण; शिवाय त्यामुळे मुलीचा मेंदू मंद होईल!" त्यावर अण्णासाहेब त्यांना म्हणाले, "मग गाईचे दूध दिल्याने मुले मठ्ठ नंदीबैल होतील असेही का म्हणू नये?" ह्या दुधाचा आम्हांला फार चांगला गुण आला, व ही माझी मुलगी सर्वांत चपळ, बाळसेदार व बुद्धिवान झाली. ज्यांनी त्यांनी त्याबद्दल मुलीला नावाजायचे! अण्णासाहेबांच्या अनेक मित्रांनी आमच्या या दुधाच्या यशस्वी प्रयोगाचा फायदा घेऊन आपल्या अशक्त मुलांच्या प्रकृती सुधारून घेतल्या. अण्णासाहेबांनी शोधकवृत्तीने ज्याप्रमाणे पूर्वी आपला पोटशूळ घालविला, त्याच वृत्तीने त्यांनी लहान मुलांच्या उत्तम संगोपनाचा मार्ग काढला. कोणतेही व कसेही संकट येवो, त्यास धैर्याने तोंड देऊन, त्यातून सुटकेचा काहीतरी मार्ग काढायचाच, ही अण्णासाहेबांची हातोटी निरंतर दिसून येत गेली.

जुलै १८९५ मध्ये आम्ही उमरावतीस परत गेलो. त्यानंतर अण्णासाहेबांकडे पक्षकार मंडळींची कामे फार वाढली. माझ्या दर मुलीच्या जन्मानंतर त्यांची प्राप्ती वाढायची हे अगदी ठरून गेल्यासारखे झाले होते. आता काँग्रेसची कामेही त्यांच्यावर अधिक पडली. चारदोन वर्षांत उमरावतीत काँग्रेस भरवायची या दृष्टीने ते वऱ्हाडात सर्वत्र जागृती करू लागले. त्यासाठी ठिकठिकाणी हिंडून त्याबद्दलची माहिती व उपयुक्तता प्रसृत करायची; कुणाला सेक्रेटरी नेमून दे, तर कुणाला पैशाची मदत दे, हे अव्याहत सुरू झाले. इतके सर्व करून आपण मात्र सूत्रधाराप्रमाणे मागे रहायचे! यापायी त्यांचा कितीतरी खर्च होई! त्यावेळी चालू असलेल्या वर्तमानपत्रांतून इतरांची स्तुती अण्णासाहेबांनीच छापायची, व यांचे नाव मात्र कुठेही नसायचे!

मीही आता अनेक कामांत गढून जात असे. आपल्या संसाराच्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडून उरलेल्या वेळात लोकसेवेची कामे करायची हा मी प्रथमपासूनच स्वतःला नियम घालून घेतला होता व ते सर्व उत्तम बजावता येते हा माझा स्वानुभव आहे. आता मी आठवड्यातून तीन दिवस दुपारी वनिता-समाजात जाई. याशिवाय आमचे चातुर्मासाचे नेमधर्म होतेच. गरीब बायकांच्या मदतीसाठी थोडाफार खर्च करण्याचा उपक्रम आम्ही सुरू केला. गरीब बायकांची बाळंतपणे व त्यांचे पथ्यपाणी, बाळभूक म्हणून लहान मुलांना दूध देणे वगैरे आम्ही सुरू केले. मी आता सिस्टर सूझनमार्फत एक सिंगरचे हातमशीन विकत घेतले. त्यावर गरीब मुलांसाठी मोफत कपडे शिवून देण्याचे काम मी माझ्याकडे घेतले होते. माझ्या मुलांचे शिवण मी स्वतः घरी शिवतच असे. शिवाय सिस्टर सूझनच्या

शिकवणीने आपले घर थोडक्यात कसे व्यवस्थित व सुशोभित ठेवावे याची अटकळ मला आली होती. आमच्या बंगल्यात मध्ये हॉल, मागेपुढे व्हरांडा व चार बाजूंस चार खोल्या होत्या. सिस्टर सूझनच्या मदतीने मी सर्व बंगला कलात्मक तऱ्हेने लावला. आमच्या घरात पाहुण्यांचा नेहमी धबडगा असे. पण घरात कुठे पसारा व अव्यवस्थितपणा दिसू नये म्हणून मी फार जपत असे. त्यामुळे माझ्या मुलांनाही व्यवस्थितपणाची शिस्त व गोडी लागली.

अण्णासाहेब रोज सायंकाळी मुलांमध्ये बसून कितीतरी मजेशीर पण उपदेश-पर अशा गोष्टी त्यांना सांगत. मुले या वेळेची अगदी वाट बघत असायची ! गाणी व श्लोक म्हणायला मुले याच वेळी सहजगत्या शिकली. कमलाबाईचा आवाज फार गोड होता. ती व ताई कॉन्व्हेंटमध्ये पियानो शिकत असत. आम्ही गावातील गवई नामदेवबुवा यांना तिला तंबोऱ्यावर गाणे शिकविण्यासाठी ठेवले होते. त्यावरही गावात फार टीका झाल्या. याप्रमाणे आमचा जीवनप्रवास झपाट्याने चालला होता आयुष्यातील काटेरी झुडपे ( प्रसंग ) वगैरेतूनही मार्ग आक्रमायचा असतो. पण काटेरी झुडपांत गुलाबाची फुलेही आल्हाद देण्यास असतात. त्यामुळे तो काटेरीपणा सुसह्य होतो. त्याचप्रमाणे गोड मुलांच्या सहवासात आम्ही संसारातील अडचणी व लोकांच्या टीका सहन करू शकत होतो.

१८९७ मध्ये वऱ्हाडात फार मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी वऱ्हाड अत्यंत संपन्न होते. मोठमोठ्या जमीनदारांनी आपली धान्याची कोठारे खुली करून लोकांना उपाशी मरू दिले नाही. सरकारी साहाय्याने ठिकठिकाणी दुष्काळ कमिट्या स्थापिल्या गेल्या. त्यासाठी अण्णासाहेब अहर्निश खपले व पुष्कळ लहानथोर श्रीमंत लोक रात्रंदिवस खपून व्यवस्था बघत. आमच्या मामंजींनी तर त्यात जीवापाड काम केले. त्यावेळची त्यांची डायरी सुंदर अक्षरांनी लिहिलेली आहे. तीत त्यावेळच्या पुष्कळ गोष्टी नमूद करून ठेविल्या आहेत. त्यावेळी आम्ही सर्व कुटुंबीयांनी शक्य ती पैशाची व शारीरिक श्रमाची कामे या दुष्काळ-कमिट्यांतून केली.

दुष्काळाच्या या गडबडीत १८९७ मध्ये अण्णासाहेबांना उमरावतीत कॉंग्रेसचे अधिवेशन भरवायचे होते. कारण आगाऊ एक वर्ष त्यासंबंधी ठराव झाला होता. पुढे एवढा मोठा दुष्काळ वऱ्हाडात पडेल ही कल्पना त्यावेळी आली नव्हती. वऱ्हाडसारख्या मागासलेल्या प्रांतात व तेही दुष्काळाच्या काळात अधिवेशन भरविणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. पण राजकीय कार्यासंबंधीची त्यांची तळमळ जाज्वल्य होती. अशा कार्यासाठी उत्सुक असलेले हुषार व कर्तृत्ववान असे जे लोक त्यांना भेटत, त्या सर्वांत संघटन घडवून आणून त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणे व त्यांची महत्त्वाकांक्षा न दुखावेल अशा खुबीने मंडळी जमविण्यास त्यांनी सुरुवात केली. या त्यांच्या खटपटीमुळे वऱ्हाडात राजकीय चळवळीस फार मोठी चालना मिळाली. या

निमित्ताने मुधोळकर, दादासाहेब खापर्डे वगैरे मंडळी आमच्याकडे वारंवार येऊ लागली. एकंदरीत १८९६ व १८९७ ही वर्षे उमरावतीत कॉंग्रेस अधिवेशनाची तयारी करण्याच्या कामी फार गडबडीत गेली.

१८९७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या बारा तारखेस माझ्या चवथ्या मुलीचा जन्म झाला. यावेळी मामंजी नुकतेच काशीला जाऊन आले होते, म्हणून या मुलीचे नाव त्यांनी ' काशी ' असे ठेविले. ही माझी मुलगी, माझ्या इतर मुलींच्या मानाने लहानपणी फारच रडकी होती. म्हणून दादासाहेब चिटणीसांनी तिचे नाव ' शांता ' असे पाडले. ते म्हणाले, " हे नाव ऐकून ती आता शांत वागू लागेल. " आणि तिचे तेच नाव कायम झाले.

१८९७ च्या डिसेंबर महिन्यात उमरावतीस जे कॉंग्रेस अधिवेशन झाले, ते वऱ्हाडला अभिमान वाटण्याजोगे होतेच, पण ते माझ्या वंशजांना भूषणावह व सदैव स्फूर्तिदायक ठरेल असे झाले. कारण केवळ अण्णासाहेबांच्या धडाडीमुळे, परिश्रमामुळे व दूरदर्शीपणामुळे ते यशस्वी झाले, हे कोणालाही नाकबूल करिता येणार नाही. या कामात नानातऱ्हेच्या अडचणी आल्या; पण अण्णासाहेबांचे धैर्य व निश्चय यामुळेच त्यांत सुलभपणा आला. 'सध्याचे दुष्काळाचे वर्ष आहे, लोकांस हा खर्च झेपणार नाही; शिवाय त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांची आपणावर इतराजी होईल ' असे अनेक मुद्दे उपस्थित करून कित्येक जबाबदार मंडळींनी त्यात खो घालण्याचा प्रयत्न केला. पण अण्णासाहेब डगमगले नाहीत. जे काम एकदा हाती घेतले त्याबद्दल इंग्रजांची कितीही इतराजी झाली तरी ते त्याची बिलकूल पर्वा बाळगीत नसत. इंग्रज अधिकाऱ्यांची त्यांनी कधी खुशामत केली नाही. त्यामुळे इंग्रज अधिकारी त्यांचेवर नाराजच राहत. तथापि इंग्रजांपैकी जे थोर घराण्यांतील अधिकारी इकडे येत त्यांत एक गुण मोठा दिसून येई. त्यांचे धोरण अरेरावीपणाचे असले तरी खाजगी रीत्या ते खऱ्या गुणांची पारख करणारे असत. उमरावतीस फ्रॅंक स्लाय म्हणून एक इंग्रज आय. सी. एस. अधिकारी होते. त्यांनी अण्णासाहेबांची महती प्रथमपासून जाणली होती. ते म्हणत, " तुमच्या वऱ्हाडात एकच अशी व्यक्ती आहे की, जिच्याबद्दल मला फार आदर वाटतो–आणि भीतीही वाटते ! ही व्यक्ती म्हणजे मोरोपंत जोशी. ते वऱ्हाडचे सिंह आहेत ! " हे स्लायसाहेब पुढे मध्यप्रांताचे गव्हर्नर झाले, व त्यांच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे पहिले सभासद म्हणून त्यांनी अण्णासाहेबांची नेमणूक केली. ती हकीकत पुढे येईलच.

अशा स्थितीत १८९७ सालच्या डिसेंबर महिन्यात उमरावतीस कॉंग्रेस अधिवेशन झाले. वेगवेगळ्या कमिट्या नेमून कामाच्या वाटण्या करण्यात आल्या. पण कामाची मुख्य जबाबदारी व बोजा अण्णासाहेबांवर पडला. महाराष्ट्रातील सर्व डेलिगेट मंडळी आमच्याच बंगल्यात उतरण्याचे ठरले. अण्णासाहेबांना त्यावेळी बाहेरची इतकी कामे होती की, हे घरातील काम बरेचसे मलाच पाहावे लागले. या

अधिवेशनाच्या वेळीं स्त्रियांनी कलाकौशल्याचे एक प्रदर्शन भरवावे असे ठरले. तीही कामगिरी बव्हंशाने माझ्यावरच आली. आमच्या ' वनिता समाजा ' तर्फे हे काम सुरू केले. हे प्रदर्शन इतके उत्कृष्ट झाले की, सर्वांना ते फार पसंत पडले व यानंतरच दर कॉंग्रेसचे वेळी प्रदर्शन भरविण्याचा उपक्रम सुरू झाला. ही गोष्ट उमरावतीकरांना अभिमान वाटण्याजोगी आहे. हे कॉंग्रेस अधिवेशन फार यशस्वी व संस्मरणीय झाले. त्याबद्दल वृत्तपत्रांतून व कॉंग्रेसच्या माहितीपत्रकांतून भरपूर वर्णन आले असल्यामुळे इथे त्याचा विस्तार करीत नाही. पण त्यावेळी काही गमतीदार गोष्टी मी ऐकल्या व स्वतः अनुभविल्या त्या सांगते.

कॉंग्रेसचा मूळ पाया घालणारे मि. ह्यूम हे इंग्रज गृहस्थ आमच्याच बंगल्यात पाहुणे होते. या गृहस्थांची लीनता व रुबाब काय वर्णावा ! ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ' म्हणतात त्यांपैकी ते मला भासले. अण्णासाहेबांनी त्यांची व माझी ओळख करून दिली. त्यावेळी इंग्रजी बोलण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग असल्यामुळे मला फारच संकोच व भीति वाटली. पण पुढे परिचय झाल्यावर त्यांची आणि माझी जणू पुष्कळ दिवसांची ओळख आहे असे वाटून मी त्यांच्याशी मोकळेपणाने बोलू लागले. हे गृहस्थ जसे अगाध बुद्धिमत्तेचे होते, तसेच त्यांचे मन कोमल होते. त्याबद्दल एकच गोष्ट सांगते. त्यांच्या पत्नीने त्यांना हातात धरण्याची एक सुंदर काठी दिली होती. ती तिची शेवटची देणगी होती. तिला मि. ह्यूम जीवापलीकडे जपत. ह्या कॉंग्रेसच्या गडबडीत ती काठी कुठे व कशी गहाळ झाली कोण जाणे, पण त्यामुळे तो बिचारा गृहस्थ भारीच तळमळला ! " काय वाटेल ते देतो, पण ती काठी मला मिळवून द्याच ! " म्हणून ते अण्णासाहेबांना म्हणाले. त्यासाठी अण्णासाहेबांनी फार फार करून शोध केला, पण ती काठी काही सापडली नाही ! मिस्टर बी. जे पातशहा म्हणून आणखी एक थोर पारशी गृहस्थ त्यावेळी आमच्याकडे पाहुणे होते. ते टाटा कंपनीत फार मोठ्या हुद्द्यावर होते. हे गृहस्थ अण्णासाहेबांचे कॉलेजपासूनचे मित्र असून ते संतवृत्तीचे होते. ते कॉलेजात सर्व विषयांत पहिले यावयाचे म्हणे. ते जनावरांनी ओढलेल्या वाहनांत बसत नसत. त्या काळात मोटारी नव्हत्या, त्यामुळे ते कुठेही गेले तरी पायीच जात. त्यांच्याबद्दल लोकांत फार कौतुक होऊन कुतूहल निर्माण झाले.

ह्या कॉंग्रेसचे अध्यक्ष सर शंकरन् नायर हेही आमचेच पाहुणे होते. ते अत्यंत थोर मनाचे व बाणेदार गृहस्थ. त्यांनी आमच्याशी निरंतरची मैत्री ठेविली. त्यावेळी कॉंग्रेसमध्ये बरेच वादाचे प्रश्न उपस्थित झाले होते, पण ते सर्व त्यांनी फारच चातुर्याने शांत केले. महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे बहुतेक सर्व डेलिगेट आमच्याच कंपाउंडात क्यांप करून उतरविण्यात आले होते. त्यांचे आदरातिथ्य करण्याचे काम मामंजींनी स्वतः आपणाकडे घेतले होते व त्या सर्वांना त्यांनी खूप केले. आमच्या स्नेही मंडळींनी नंतर आम्हांला सांगितले की, " पुण्याकडील मंडळींना वाटत होते

इ. स. ते नों. वि.

की वऱ्हाड हा फार मागासलेला प्रांत, तिथे काय आपली व्यवस्था राहणार ? पण वऱ्हाडच्या पाहुणचारामुळे त्यांचा तो गैरसमज पार निघून जाऊन वऱ्हाड त्यांना फार उदार व संपन्न आहे असे वाटले. ”

पण यावेळी मला विशेष आठवण राहण्याजोगी गोष्ट घडली ती नामदार गोखले यांची. त्यावेळीं ते नुकतेच विलायतेहून ‘ माफी प्रकरण ’ होऊन परत आले होते. हे माफी प्रकरण प्रसिद्धच आहे. त्यावेळीं त्यांच्याबद्दल लोकांत खोट्या-नाट्या बातम्या पसरविल्या जाऊन लोकांची मते इतकी कलुषित करण्यात आली होती की, ‘ उमरावतीच्या अधिवेशनात आम्ही त्यांना पाऊलही टाकू देणार नाही ’ अशा धमक्या देण्यात येत होत्या. त्यावेळीं न्या. रानडे यांनी गोखल्यांची बाजू खूपच उचलून धरली. त्यांनी अण्णासाहेबांना एक खाजगी पत्र लिहून गोखले यांचा उमरावती काँग्रेसमध्ये काही अपमान होणार नाही अशा तऱ्हेचा बंदोबस्त केला जावा म्हणून कळविले. अण्णासाहेबांनीही त्यांना तसे आश्वासन दिले.

ना. गोखले व काही मंडळी उमरावतीस काँग्रेसला येण्यास पुण्याहून निघाली. तो त्यांना भुसावळ येथे प्लेग क्वारंटाईनमध्ये अडकवून ठेवण्यात आले. त्याबद्दल लागलीच भुसावळहून अण्णासाहेबांस तारा आल्या. कामाच्या ऐन गडबडीतून कशी तरी सवड काढून अण्णासाहेब रात्रीच्या गाडीने भुसावळेस गेले. तेथे नानातऱ्हेच्या खटपटी करून ते गोखलेप्रभृती मंडळींना पहाटे उमरावतीस घेऊन आले. भुसावळला जाताना तेथील मंडळींना कदाचित एकदोन दिवस तेथेच राहावे लागल्यास त्यांच्या खाण्यापिण्याची सोय असावी म्हणून ते मला म्हणाले, “ त्या मंडळींना लवकर येता न आल्यास त्यांच्यासाठी माझ्याबरोबर लवकर काही उत्तम फराळाचे जिन्नस करून द्या. ” मी दोनतीन तासांत पंचवीस मंडळींना पुरतील इतके पाचसात प्रकाराचे फराळाचे जिन्नस करून त्यांच्याबरोबर दिले. मला त्यावेळी कुठली शक्ति आली होती कोण जाणे ! घरात माझ्या चौघी लहान मुली, पाहुण्यांची कोण गर्दी, तिकडे स्त्रियांचे कलाकौशल्याच्या कामाचे प्रदर्शन–पण ही सर्व कामे माझ्या हातून व्यवस्थितपणे पार पडली. गोखले वगैरे मंडळीं भुसावळेहून आमच्याकडेच आली. त्यावेळीं अण्णासाहेबांनी ‘ हे माझे भाऊ ’ म्हणून गोखल्यांशी माझी ओळख करून दिली. माझ्या मुली विचारू लागल्या, “ आम्ही यांना काय म्हणू ? ” तर गोखले म्हणाले, “ मला गोखलेकाका म्हणायचे ! ” मग ते आमच्या घरात अगदी घरच्यासारखे मिसळून गेले. मलाही फार दिवस न भेटलेला सख्खा भाऊ भेटल्याप्रमाणे वाटले. पूर्वजन्मीचाच जणू ऋणानुबंध !

पहिल्या दिवशी जेव्हा गोखले काँग्रेस मंडपात जायला निघाले, तेव्हा मी त्यांना घरात बोलावून “ देवघरात जाऊन देवाला नमस्कार करून जा ” म्हणून म्हटले. त्याबरोबर त्यांचे डोळे पाण्याने भरून आले. अधिवेशन संपवून परत आल्याबरोबर ते अगोदर मला भेटले व म्हणाले, “ आक्का, तुमच्या आशीर्वादाने

मी सुखरूप परत आलो!" आम्हांला वाटले होते त्याप्रमाणे त्यांचा तेथे अपमान झाला नाहीं. इतकेच नव्हे तर कॉंग्रेस संपून लोक जेव्हा घरोघर परतले तेव्हा ते ना. गोखले यांचे धैर्य व प्रामाणिकपणा यांची वाखाणणी करीतच गेले, असे सर्वत्र ऐकू आले.

त्या दिवशी खाजगी बैठकीत न्या. रानडे यांनी "अण्णासाहेब जोशी यांनी आपल्या आश्वासनाप्रमाणे गोखले यांची बाजू कॉंग्रेसमध्ये उत्तम सांभाळली." असे अण्णासाहेबांना धन्यवाद दिले, असे मला दादासाहेब चिटणीस यांनी सांगितले. हे ऐकून माझ्या डोळ्यांतून खरोखरीच आनंदाश्रू वाहिले व आपल्या घरीं आलेला सत्यवादी अतिथी–त्याचा अपमान होऊ दिला नाही ही परमेश्वराचीच आम्हांवर कृपा झाली असे मला वाटले.

त्यावेळीं कॉंग्रेसला आलेली सर्व मंडळीं व अण्णासाहेबांना मदत करणारी उमरावतीतील मंडळीं, या सर्वांना एक मोठी चहापार्टी आपल्या घरी द्यावी असे अण्णासाहेबांनी एकदमच ठरविले. मला आदल्या दिवशी सायंकाळी पाच वाजता त्यांनी सांगितले की, "उद्या सकाळीं नऊ वाजता आपणाकडे सुमारे तीनशे मंडळींना मी चहापार्टीस बोलावीत आहे; तेव्हा सर्व तयारी करून उत्तम व्यवस्था होऊ द्या." असे बोलून ते आपले दुसऱ्या कामाला निघून गेले! जो तो आपापल्या कामात गुंतलेला, मला आता कोण मदत करणार? या विचाराने मी क्षणभर गोंधळले. पण मग लागलीच धीर धरून निश्चय ठरविला. गावात माझे वडील बंधू होते त्यांना बोलावून आणून तावडतोब मजूर आणविले. त्यांनी रात्रभर जागून बंगल्याच्या टेनिस कोर्टावर मांडव घातला, तोरणे बांधली व तीनशे खुर्च्या लावल्या. मी लगेच सासूबाई कडे गेले, व आम्ही दोघींनी रात्रभर जागून अनरसे, चकल्या, पाकाचे शंकरपाळे, शेव, खोबऱ्याची बर्फी, भजी, शिरा व दोनचार उपासाचे पदार्थ, असे जिन्नस तयार केले. शिवाय पाहुणेमंडळी येणार म्हणून घरात मी आधीच तारफेण्या, चिवडा, बुंदीचे लाडू, चिरोटे, करंज्या वगैरे पदार्थ करून ठेवलेले होते. तेही चहापार्टीच्या वेळीं उपयोगी पडले. सकाळीं सात वाजताच आम्ही जय्यत तयारी ठेवली. ही पार्टी सर्वच दृष्टींनी अत्यंत संस्मरणीय झाली. यावेळीं माझी एक प्रथा फार उपयुक्त ठरली. ती म्हणजे घरात वर्षाचे धान्य एकदम व्यवस्थित भरायचे, व शंभर माणसांना पुरेल इतका शिधा निवडून टिपून घरात नेहमी जय्यत ठेवायचा. त्यामुळे याबाबत माझी बिलकूल धावपळ झाली नाही.

त्या प्रसंगी आम्ही भरविलेल्या स्त्रियांच्या कलाकौशल्याच्या प्रदर्शनाचीही अशीच वर्षभर आधीपासून जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली होती. याबाबत स्त्रियांमध्ये खूप औत्सुक्य व उत्साह निर्माण झाला होता. त्याप्रमाणे वस्तूही भराभर तयार होऊ लागल्या. प्रदर्शन भरविण्याबाबत टीकाही भरपूर झाल्या. तथापि प्रदर्शन सर्व दृष्टींनी अपूर्व असेच झाले. त्यातील काम व व्यवस्था यांची सर्वत्र

तारीफच ऐकू आली. मात्र ते सर्व जुळविताना आम्हांला जो काही त्रास झाला व नानातऱ्हेचे कटू अनुभव आले ते आमचे आम्हांला माहीत! पण शेवट गोड झाला म्हणजे सर्व गोड झाले असे होते, व पूर्वीचा त्रास तितका विसरला जातो.

या कॉंग्रेसच्या निमित्ताने आम्हांला अनेक स्नेह्यांचा लाभ झाला, तसे एक दोन चांगले नोकर मिळाले. चांगले नोकर मिळणे हे भाग्य खरेच, पण त्यांना टिकवून ठेवण्यातही धोरण ठेवावे लागते. आमच्या घरात नोकरांना ममतेने व आपुलकीने वागविण्याची पूर्वापार पद्धत आहे. आम्ही त्यांचे औषधपाणी वगैरे स्वतः खर्च देऊन करतो. तसेच दर दसऱ्याच्या वेळी त्यांना विशेष कामानिमित्त बक्षिसेही देतो. दिवाळी, वर्षप्रतिपदा, दसरा, नागपंचमी व पोळा अशा पाच सणांच्या निमित्ताने नोकरांना व गरिबांना अन्नाची भरपूर वाढणी करून देतो.

आम्हांला पैशाच्या दृष्टीने लोक भाग्यशाली म्हणत. पण पैसा ही गोष्ट अशी आहे की तो कितीही मिळाला तरी माणसाला तृप्ती वाटत नाही. मला व अण्णासाहेबांना, आम्हांला जो पैसा मिळत होता त्यात समाधान होते. त्याबद्दल कधी अभिमान वाटला नाहीच, पण आपण कोणी विशेष आहो अशी जाणीव झाली नाही. आम्हांला आयुष्यात जे काही उत्तम स्नेही, व जिवास जीव देणारे नोकर लाभले, त्याबद्दल मी देवाचे नेहमी उपकार मानते.

आमचे मन ईश्वरभक्तीकडे लावण्यास ज्या व्यक्ती कारणीभूत झाल्या, त्यांत दादासाहेब चिटणीस हे प्रमुख होत. हे खरोखर एक थोर संतच होते. त्यांच्या वेदांतपर गोष्टी ऐकून माझ्या मनाला फार शांती लाभे. त्यांची ईश्वरभक्ती व देशभक्ती जाज्वल्य होती. त्यांची खरी किंमत जगाला कधीच समजली नाही. दुसरी थोर व्यक्ती म्हणजे स्वामी विवेकानंद. १८९२ मध्ये महाबळेश्वरी त्यांचे आमच्या घरी जे वास्तव्य घडले त्याबद्दल मी मागे सांगितलेच आहे. ती एवढी थोर व्यक्ती आहे हे त्यावेळी आम्हांला कळले नाही व दुर्दैवाने पुढे पुन्हा त्यांची भेटही झाली नाही. तरी सत्संगाचे फळ त्यामुळे आम्हाला जरूर लाभले!

मिसेस ॲनी बेझंट यांचे भाषणांचा व लेखनाचा आमच्यावर फार खोल परिणाम झाला. त्या चारपाच वेळा उमरावतीस येऊन गेल्या. त्यांचा मुक्काम दादासाहेब खापर्डे यांजकडे असायचा. त्यावेळीं त्यांची ओळख होऊन त्यांच्याशी चर्चा करण्याची आम्हांला संधी मिळाली. त्यांची सर्वच मते आम्हांला पटली नाहीत, तरी ईश्वरभक्ती अधिक जागृत होण्याची त्यांच्यापासून आम्हांस जरूर स्फूर्ती मिळाली. त्यांचा उमरावतीत वनितासमाजातर्फे फार मोठा गौरव झाला. त्यावेळी आमच्या कमलाबाईने त्यांच्या स्वागतपर गाणी म्हटली, व तिच्या गोड आवाजाने त्या इतक्या खूश झाल्या की, त्यांनी तिला जवळ घेऊन अनेक शुभ आशीर्वाद दिले.

पुढे १९३० साली अण्णासाहेबांना बियासचे सद्‌गुरू सावनसिंगजी महाराज यांचा उपदेश घेण्याचा लाभ झाला. नंतर सद्‌गुरूंनी उमरावतीस स्वतः येऊन मला

व माणिकला गुरूपदेश दिला. त्यावेळीं माझ्या हल्लीच्या आजारपणास सुरुवात होऊन डॉक्टरांनी मला बिछान्यात निजवून ठेवले होते. अण्णासाहेबांना या सद्‌गुरूंनी वर्णिलेला आराधनेचा मार्ग पटला होता; व त्या दृष्टीने त्यांनी या गुरूंचा उपदेश घेतला होता. मलाही त्यांचा उपदेश घेतल्यापासून मनाला अत्यंत शांती लाभली.

● ● ●

आमच्या आयुष्यात कांही क्रांतिकारक मंडळींशी आमचा चमत्कारिक तऱ्हेने संबंध आला. अण्णासाहेबांकडे नेहमीच नानातऱ्हेची राजकीय व सामाजिक कामे करणारी माणसे येत असत. १९०१–१९०२ च्या सुमारास आमच्याकडे ‘ सिंग ’ या नांवाचे एक पाहुणे आले होते. ते अण्णासाहेबांना केव्हा, कुठे आणि कसे भेटले हे मला कधीच समजले नाही. माणूस शीख माणसासारखी दाढी वाढविलेला, तरुण, मोठा भारदस्त व सभ्य असा होता. पांढरी सरदारी विजार व शुभ्र अंगरखा असा त्याचा पोशाख असे. तो अस्खलित मराठी बोले; आणि शिवाजी व रजपूत वीरांच्या गोष्टी आवेशयुक्त वाणीने सांगे. त्याला दांडपट्टा, नेम मारणे व घोड्यावर बसणे वगैरे उत्तम येत असे. स्वतःबद्दल तो कधी काही बोलत नसे. अण्णासाहेबही मला म्हणत, “ तुम्ही त्याबद्दल मला काही विचारू नये, व कुणाला काही सांगूही नये. तो एक अज्ञात वीर पुरुष आहे. ” उमरावतीतील चारपाच ज्वलंत देशभक्त व अण्णासाहेब रात्रीच्या रात्री त्याजबरोबर बागेत हलक्या आवाजात बोलत बसत. हा गृहस्थ कधी महिन्याने, तर कधी चार महिन्यांनंतर, तर कधी पंधरा दिवसांनीच आमच्याकडे एकदम पाहुणा यायचा, व तितकेच दिवस राहून पुन्हा कुठे जाई व काय काम करी याचा मला कधी पत्ता लागायचा नाही. ‘ सिंग ’ हे नाव शिखासारखे दिसते म्हणून सर्व मंडळी त्यांना ‘ रावसाहेब ’ म्हणू लागली. हा गृहस्थ काही तरी राज्यक्रांतीत गुंतलेला असावा अशी माझी समजूत झाली.

पुढे १९०५ च्या सुमारास हा गृहस्थ चमत्कारिक परिस्थितीत वारला, अशी बातमी आली. त्यावेळी आणखी काही गोष्टी कानांवर आल्या. शिवाजीने भवानी तलवार मिळविण्यासाठी ज्या तऱ्हेचे अनुष्ठान केले होते, त्या तऱ्हेचे अनुष्ठान या गृहस्थाने सातपुड्याच्या जंगलात एका एकांत स्थळी आरंभिले. त्यात म्हणे असे असे की, एकवीस दिवस त्या अनुष्ठानात त्याने फक्त थोड्या दुधावर रहायचे, कुणाशी भाषण करायचे नाही व त्याच्याशीही कुणी बोलायचे नाही. पण त्याच वेळीं सरकारच्या गुप्त हेरांना त्याचा सुगावा लागून ते त्याच्या पाठीशी असल्याचे वृत्त त्याला सांगणे भाग पडले. त्यावेळी तो गाढ तंद्रीत होता; व त्यातून त्याला एकदम जागा केल्यामुळे

त्याच्या मनास व शरीरास एकदम एवढा धक्का बसला की, त्याने तो पाचसात तासांतच वारला ! तावडतोब त्याला तेथेच अग्नि देण्यात येऊन गुप्त हेरांना त्याचा सुगावा लागू दिला नाही ! ही हकीकत ऐकून सर्व मंडळी फार हळहळली. अण्णासाहेबांनी मला त्याच्याबद्दल अखेरपर्यंत काही सांगितले नाही. तरी त्यांच्या सहकाऱ्यांकडून असे समजले की, हा गृहस्थ बापू गोखले यांच्या वंशातला असून मोठी क्रांती घडवून आणण्याच्या खटपटीत होता. पण सध्याचे कालमान ध्यानी घेऊन, सर्व गोष्टी सबुरीने घेण्यास अण्णासाहेबांनी त्याला उपदेश केला. एरव्ही इंग्रजांकडून तो केव्हाच मारला गेला असता. कोल्हापुरचे महाराज, म्हैसूरचे महाराज, बाळ गंगाधर टिळक इत्यादिकांशी त्याची फार खलबते चालत. टिळकांचे मार्गदर्शनावरून तो नेपाळातही कारस्थाने करण्यास जात असे. अशा अनेक गोष्टी त्याच्याबद्दल ऐकल्या. ही माझी हकीकत इंग्रजांचे हाती 'कबुली जबाब' म्हणून आयतीच पडणार नाही अशी मला उमेद आहे ! कारण हे लिखाण केवळ माझ्या घरातच खाजगी म्हणून वाचले जावे यासाठी लिहिले आहे, हे मी आरंभीच सांगितले आहे. काही तरी गहन राजकारणात अण्णासाहेब होते, असा इंग्रज अधिकाऱ्यांना पूर्ण संशय होताच. पण त्याबद्दल नक्की पुरावा त्यांना कधी सापडला नाही. पण मला का कोण जाणे सारखे वाटते की, आमच्या देशाला स्वराज्य खास मिळणार, आणि ते आम्ही आमच्या हयातीत पाहणार ! मग अशा किती तरी गोष्टी उजागिरीने सांगण्यास अनेक लोकांना संधी मिळेल. आमच्या देशाचे सर्वच लोक खास गुलामी मनोवृत्तीचे नाहीत. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही म्हणूनच केवळ ते तूर्त गप्प बसले आहेत. त्यांची स्वराज्याबद्दलची चळवळ एक दिवस खचित मूर्त स्वरूप धारण करील !

स्त्रियांच्या उन्नतीबाबत त्या काळात जे जे करावे ते ते थोडेच वाटे. मुलींना शिकवून, विद्वान करून, मोठेपणी त्यांची लग्ने करायची; त्यांची इच्छा असल्यास त्यांनी पदवीधर व्हावे व स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योग करून पैसे मिळवावे; त्यासाठी त्यांची मनोभूमिका शुद्ध व पवित्र बनवावी; व हे करणे प्रत्येक आईबापास कसे शक्य आहे ही गोष्ट आपण स्वतः उदाहरण घालून सिद्ध करायची, असे आम्ही ठरविलेच होते. दुसरी गोष्ट म्हणजे प्रौढ स्त्रियांत साक्षरताप्रसार करणे; त्यांना संसारोपयोगी गोष्टींची माहिती देणे; तसेच जगातील सुधारलेल्या देशातून पुरुष व विशेषेकरून स्त्रिया, आत्मोन्नतीसाठी काय काय गोष्टी करितात, व त्यातून आपण काय शिकावे, याबाबतच्या विचारांना व कामगिरीला, चालना मिळावी म्हणून व्याख्याने करविणे, व आमच्या 'वनिता समाजा' सारख्या संस्था स्थापणे, अशी अनेक कामे करावयाची होती.

तिसरी गोष्ट म्हणजे पांढरपेशा समाजातील विधवा स्त्रियांचे जीवन सुखमय करण्यास झटणे. हे काम आम्हांला फार सावधगिरीने करावे लागले; कारण त्यांत लोकापवादाचे प्रसंग पदोपदी येत. प्रो. अण्णासाहेब कर्वे यांनी पुण्यास 'अनाथ

बालिकाश्रम ' स्थापिला होता व स्वतः पुनर्विवाह केला होता. या गोष्टीचा वऱ्हाडात प्रचार करण्याचे आम्ही ठरविले. स्त्रियांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन द्यावे, त्यांनी मास्तरकी, नर्सिंग, वैद्यकी इत्यादि उद्योगधंदे करण्यास प्रवृत्त व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यास आमच्या वनिता समाजातील स्त्रियांनी कामे वाटून घेतली. अण्णासाहेबांच्या प्ररणेने व्यंकटराव मुधोळकर ( रा. ब. मुधोळकरांचे एक आप्त ) यांनी उमरावतीत लहान प्रमाणावर एक विधवा-विवाह-मंडळ स्थापन केले. आमच्यापैकी काही जणांनी त्यात प्रथम अज्ञात राहून मदत करण्याचे कबूल केले. त्याबाबत आमचा पहिला अनुभव उमरावतीतील वयोवृद्ध वकील प्रल्हादराव जोग यांच्या बाबतीत आला. त्यांची वडील मुलगी यमूताई बालविधवा झाली. तिला शिक्षण देऊन विद्वान करावे म्हणून आम्ही प्रल्हादरावांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याबद्दल आमच्या पदरी त्यांचा रोषच आला. त्यानंतर प्रल्हादरावांची पत्नी थोडक्याच दिवसांत वारली; आणि केवळ सहा महिन्यांनी या साठ वर्षे वयाच्या वृद्ध गृहस्थाने एका अकरा वर्षांच्या मुलीशी लग्न केले ! या विवाहापासून त्यांना परावृत्त करण्याचे त्यांच्या अनेक मित्रांनी प्रयत्न केले. " निदान प्रौढ विधवेशी तरी विवाह करा " असे व्यंकटराव मुधोळकर यांनी त्यांना सांगून पाहिले. पण ते सर्व व्यर्थ झाले ! त्याबद्दल त्यावेळच्या वृत्तपत्रांपैकी ' हिंदुपंच ' या सचित्र पत्रात प्रल्हादराव जोगांवर एक व्यंगचित्र प्रसिद्ध झाले होते. ते असे की एक लहान मुलगी विधवा झाली असून तिला एका अंधाऱ्या खोलीत रडत बसविली आहे; आणि तिचा म्हातारा बाप मुंडावळ्या बांधून स्वतः एका लहान मुलीशी लग्न करीत आहे !

आणखी एका विधवाविवाहाबद्दल आम्हांला चांगलीच अद्दल घडली. अण्णासाहेबांचे निकटचे मित्र अनगळ वकील ( हे पुढे रावबहादूर झाले ) यांची बहीण वेणूताई बालविधवा होती. आमच्या सांगण्यावरून अनगळांनी तिला विद्याभ्यास शिकविणे सुरू केले. पुढे वेणुताईचा पुनर्विवाह करून द्यावा असेही त्यांच्या मनात येऊ लागले. त्यासाठी तिचे मन तयार करण्याकरिता ते तिला मधून मधून आमच्याकडे पाठवीत. त्यावेळी यमूताई चिटणीसही तिच्याबरोबर येत. अनगळांनी आपल्या घरातल्या बायकांना मात्र याबद्दल काही कळू दिले नाही. यमूताई चिटणिसांनी व मी हळूहळू तिचे मन पुनर्विवाहास तयार केले. व्यंकटराव मुधोळकरांनी तिच्यासाठी नागपूरचे डॉ. गद्रे हे वर शोधून काढले. मग अनगळांनी तिला गुप्तपणे नागपुरास पुनर्विवाह लावण्यासाठी नेले. जाताना मी तिला शुभाशीर्वाद व कानांतील मोत्यांच्या कुड्या अहेर म्हणून अण्णासाहेबांच्या सांगण्यावरून करून दिल्या. पुनर्विवाह झाल्यावर मग अनगळांनी घरातील मंडळींना व गावात ही बातमी सांगितली. मग त्यात आम्ही साथी म्हणून आम्हांवर टीकेची जी झोड उठली म्हणता ! पण सर्वांत माझ्या मनाला जे झोंबले ते हे की, अनगळांच्या घरातील बायकांनी उठविले की, मी व अण्णासाहेबांनी वेणूताईला वाईट मार्गाला लावली, व तिला दिवस गेले तेव्हा

अनगळांना तिचा पुनर्विवाह करून देणे भाग पडले! पण स्वतः अनगळ फार समजूतदार होते. त्यामुळे त्यांनी आमच्याशी पूर्ववत स्नेहसंबंध ठेविले.

उमरावतीत ' लेडी डफरीन हॉस्पिटल ' स्त्रियांसाठी नुक्तेच सुरू झाले होते त्यात उत्तम नर्सेस मिळवून देण्याबाबत खटपट व्हावी म्हणून आमच्या इंग्रज कमिशनरनें आमच्या वनितासमाजास आग्रहाने सुचविले. वनितासमाजातील काही स्त्रिया व इंग्रज अम्मलदारांच्या काही स्त्रिया, यांची एक कमिटी नेमून हे काम सुरू झाले. इंग्रज स्त्रिया खिश्चन नर्सेसची निवड करू लागल्या. हिंदू स्त्रियांना ती संधी मिळू देईनात. हिंदू स्त्रियांनी ते काम शिकावे म्हणून आम्ही फार प्रयत्न केला, परंतु चांगल्या घरच्या स्त्रिया पुढे येण्यास त्या काळी धजेनात; व ज्या कोणी थोड्याबहुत तयार झाल्या, त्यांच्यावर व आमच्यावर लोकांनी टीकेचे असे काही काहूर उठविले की, आमच्या वनितासमाजातील त्या कमिटीच्या सर्व स्त्रियांनी त्यातून अंग काढून घेतले. अण्णासाहेबांच्या सांगण्यावरून मीच काय ती तिथे थोडे दिवस टिकून राहिले. पण या सर्वच गोष्टी एकंदरीत मला फारच त्रासदायक वाटल्या, व मी मनाशी ठरविले की, एकदम अनेक कामे करण्यापेक्षा, आपण आपले पूर्वीचेच वनितासमाजाचे काम करावे, व मी डफरिन हॉस्पिटल कमिटी सोडली! पण जगाची काय मजा असते पहा, त्यावरूनही लोकांनी माझ्यावर अनेक तऱ्हेने टीका केली! ' म्हणे मला श्रीमंतीचा फार गर्व झाला आहे; मला सदा मानपान पाहिजे; इतर बायकांत मी पूर्वीप्रमाणे मिसळत नाही...' वगैरे. अण्णासाहेब मला नेहमी म्हणायचे, " तुम्ही लोकांच्या टीकेला विनाकारण महत्त्व देऊन, स्वतःला त्रास करून घेऊ नये." मी त्यांना म्हणायची, " मला अद्याप तुमच्यासारखी शांत वृत्ती शिकायची आहे. "

१८९८ च्या उन्हाळयात आम्ही प्रथम कलकत्ता, मग दार्जिलिंग व जूनमध्ये काशी असा मुक्काम करण्याचे ठरविले. जूनमध्ये सासूबाई व मामंजी उमरावतीहून येऊन आम्हांस काशीस भेटणार होते. एप्रिलच्या सुरुवातीस अण्णासाहेब, मी व आमच्या चौघी मुली तीनचार नोकर बरोबर घेऊन कलकत्त्यास गेलो. काँग्रेसमुळे तिथे अण्णासाहेबांच्या खूप ओळखी झाल्या होत्या. साताऱ्यास एके काळीं कलेक्टर असलेले श्री. घोपाल ( आय. सी. एस्. ) यांच्या आग्रहावरून आम्ही कलकत्त्यास प्रथम त्यांचे घरी राहिलो. त्यांनी प्रसिद्ध टागोर कुटुंबातील मंडळी, डॉ. नीलरतन सरकार व त्यांचे कुटुंबीय, तसेच सतीशचंद्र बोस म्हणून मोठे जमीनदार होते, यांच्याशी आमचा परिचय करून दिला. त्या सर्वांचे मित्रत्व आम्हांला पुढे पुष्कळ वर्षे लाभले.

कलकत्त्याहून आम्ही दार्जिलिंगला गेलो व तेथे काही दिवस राहून काशीक्षेत्री गेलो. तेथे मामंजी व सासूबाई आलेलीच होती. मामंजींनी या वेळेस सासूबाईच्या इच्छेनुसार खूप दानधर्म करून काशीयात्रा यथासांग केली. त्यांनी तेथे एक मोठे ब्राह्मणभोजन घातले. अण्णासाहेबांनी विलायतेहून आल्यानंतर प्रायश्चित्त घेतले नसल्यामुळे काही ब्राह्मणांनी ऐन वेळी ती अडचण उपस्थित केलीच. " अण्णा-

साहेबांनी प्रायश्चित्त घेतल्याशिवाय एकही ब्राह्मण जेवायला येणार नाही " असा तेथील ब्रह्मवृंदाकडून निरोप आला. शेवटी अण्णासाहेबांनी निश्चयाच्या पण गोड शब्दांत आईवडिलांना समजावून सांगितले की, " ज्याअर्थी हे ब्राह्मण दुराग्रह करीत आहेत, त्याअर्थी अशांना भोजन घालून काय पुण्य मिळणार ? त्यापेक्षा गंगाकाठी जे अनेक लुळेपांगळे, आंधळे गरीब लोक आहेत त्यांना ते सर्व नेऊन घाला. ते भुकेलेले तळमळणारे आत्मे, त्यामुळे तृप्त होतील व तुम्हांला खरे पुण्य लागेल. " भामंजींनाही दुसरा उपाय नव्हता. अण्णासाहेबांनी सुचविल्याप्रमाणे त्यांनी ब्रह्मवृंदास कळविले. त्यामुळे त्या मंडळीत मतभेद उत्पन्न झाला, व एका बाजूची भिक्षुकमंडळी जेवण जेवून, चांगली दक्षिणा मिळवून गेली. मग अण्णासाहेबांनी लुळ्यापांगळ्या गरिबांसाठी अधिक जेवण तयार करविले, व ते त्या सर्वांना व्यवस्थित घातले.

काशीतील प्रथेप्रमाणे सासूबाईंनी स्वतःचे वेणीदान केले व मला तसा आग्रह करू लागल्या. अण्णासाहेबांना अशा कोणत्याही गोष्टी पसंत नसत. पण माझ्या मनात अद्यापि काही जुने संस्कार राहिले होते. मला वाटले, आपणही वेणीदान करावे. सासूबाईंनीही अण्णासाहेबांना खूप आग्रह केला. भटजींना मंत्र म्हणायला सांगितले आणि अण्णासाहेबांना माझी वेणी थोडीशी कापण्यास सांगितले. त्यावर रागारागाने अण्णासाहेबांनी माझी अर्धी वेणी कापून दिली ! आता इतक्या वर्षांनंतर मला माझ्या विचित्र विश्वासाबद्दल हसू येते !

काशीहून उमरावतीस परत जाताना आम्ही तीनचार कळशा भरून गंगा बरोबर घेतली होती. उमरावतीस आल्यावर आम्ही मोठ्या प्रमाणावर मावंदे केले. सर्वांना गंगेचे पाणी पिण्यास दिले. मी कळशीतले गंगेचे पाणी रोज पीत असे. मला आधीच पडसे झाले होते. ते मावंद्याचे दिवशी खूप वाढले, व घसाही अतिशय दुखू लागला. आमचे डॉ. खोत त्या दिवशी मावंद्याच्या जेवणास आले होते. त्यांनी माझ्या गळ्याची आतून बाहेरून बारकाईने तपासणी केली, व अण्णासाहेबांना एकीकडे नेऊन ते त्यांच्याशी काहीसे हळूहळू बोलले. त्या दिवसापासून त्यांनी माझ्या गळ्याला बाहेरून लेप लावायला सुरुवात केली. ते रोज दोन वेळा येऊन माझा गळा व घसा बघत. घसा व सर्दी बरी झाली, तरी लेप व आणखी काही कडक औषधे लावणे चालूच होते. मग अण्णासाहेबांनी एक दिवस मला सांगितले की, डॉ. खोतांनी त्याची अशी परीक्षा केली आहे की, तो ' गॉयटर ' ग्रंथीचा उगम आहे. अशा तऱ्हेची ग्रंथी गळ्याला झाली, तरी तत्काळ अपाय होण्याजोगे या रोगात काही नसते, अशी डॉ. खोत माझी समजूत घालायचे. पण या रोगाने मला जन्माचे पछाडले !

हे ' गॉयटर ' झाल्याचे समजल्यापासून माझे मन काही दिवस भीतीने सुन्न झाले होते. पण अण्णासाहेबांच्या धीराच्या उपदेशाने मी ते शांत करू शकले. त्यात मला डोहाळे लागले होते. आता जे भावी बालक आपल्या पोटी जन्माला

येणार आहे, त्याच्यावर आपल्या मनस्तापाचा विपरीत परिणाम होऊ देणे इष्ट नाही, ही जाणीवही माझ्या मनात फार जोराने जागृत झाली. मध्यंतरी ‘ सिंग ’ ऊर्फ ‘ रावसाहेब ’ आमच्या घरी आल्यापासून स्वराज्य व शिवाजी यांच्या गोष्टी घरात खूप चालत. तेव्हा त्याकाळचे वाङ्मय वाचण्यात मी माझे मन तासन् तास गढवू लागले. त्याच वेळी मी मास्तरांच्या मदतीने शेक्सपियरची काही नाटके वाचून काढली. त्या सुमारास शाहूनगरवासी नाटक कंपनीचे नाव फार गाजले होते. त्यांचीही पुष्कळ नाटके मी पाहिली. या नाटकांवरून एक गोष्ट आठवली. त्याच वेळी उमरावतीत काही सुविद्य तरुण मंडळींनी ‘ तानाजी मालुसरे ’ हे नाटक धर्मार्थ म्हणून केले. त्यात अण्णासाहेब शिवाजी झाले होते, पेंडसे वकील तानाजी, दादासाहेब चिटणीस बाजी पासलकर, अशी कामे होती. सुशिक्षित मंडळींनी केलेले उमरावतीतील हे पहिलेच नाटक ! या नाटकाचे उत्पन्न मला वाटते उमरावतीच्या सिटी लायब्ररीस दिले.

इ. स. १८९८ मध्ये माझा मुलगा आबासाहेब याचा जन्म झाला. चौघी मुलींनंतर हा मुलगा झाल्यामुळे सर्वांनाच–विशेषेकरून सासूबाई व मामंजी यांना फारच आनंद झाला. मुलगा खूप गौरवर्ण, रूपवान व तेजस्वी होता. अण्णासाहेबांच्या एका म्हाताऱ्या व ईश्वरभक्त पक्षकाराच्या सांगण्यावरून मामंजींनी मुलाचे नाव ‘ एकनाथ ’ ठेवून त्याला श्री. बळवंतराव लांडगे यांच्या पत्नी हरणाबाई यांचे ओट्यात, मला घालण्यास लावून, त्याच्या मुंजीपर्यंत त्याला घरचे कपडे शिवू नका म्हणून सांगितले. पूर्वी माझे दोन मुलगे लहानपणीच गेले होते, म्हणून हा तोडगा करण्याचा त्या पक्षकाराने सल्ला दिला. हरणाबाई अत्यंत सज्जन होत्या. त्यांनी फार हैसेने या मुलास त्याच्या मुंजीपर्यंत कपडे पुरविले. मामंजींनी त्याचे टोपण नाव ‘ आबासाहेब ’ असे ठेवले. त्यांच्या वडील बंधूंना आबासाहेब म्हणत. मामंजींना वाटे की, तेच आता पुन्हा जन्मास आले आहेत ! लहानपणापासूनच या मुलाला असे शिक्षण द्यायचे की, तो पुढे शूर लढवय्या व्हावा, असे मी ठरविले होते. माझी दुसरी मुलगी कमलाबाई व हा मुलगा यांच्यात रूप, रंग व स्वभाव या बाबतीत फार साम्य होते. मी या मुलाची पत्रिका माझे मामेदीर मोरुभाऊ आगाशे यांजकडून करविली. त्यांनी ज्योतिषशास्त्राचा खोल अभ्यास केला होता. त्यांनी भविष्य सांगितले की, हा मुलगा शिवाजीसारखा लढवय्या तर नाही होणार, पण फार मोठा कायदेपंडित होईल; पण याची चाळीशी उलटल्यावर हा स्वराज्यात नोकरी करील. मग मी त्यांना विचारले, “ हा कुठे कुणा संस्थानिकाकडे नोकरीत राहणार काय मग ? ” त्यावर ते म्हणाले, “ तसाही योग दिसतो. पण त्याचे आयुष्यात ‘ स्वराज्य ’ म्हणजे हिंदुस्थान स्वतंत्र होण्याचे स्वराज्य होण्याचा योग दिसतो. ” पण त्यांचे हे शेवटचे वाक्य त्यावेळी सर्वांनी थट्टेवरच नेले.

आबासाहेबाच्या जन्मानंतर लवकरच आम्ही आमच्या राहत्या बंगल्यानजीक

आणखी एक बंगला बांधायचे ठरविले; कारण आमचे कुटुंब व पाहुणे मंडळी आता वाढू लागली होती, व आमचा बंगला आम्हांला अपुरा पडू लागला होता. यापूर्वी आम्ही निंबोली येथे शेती विकत घेतलीच होती. बँकेत पैसे ठेवण्यापेक्षा शेतीवाडी, घरे व सोने यांत पैसे अडकविणे जास्त बरे असे मी ठरविले होते. या नवीन बंगल्याचा सर्व नकाशा मामंजींनी स्वतः तयार केला होता. बंगला खूप मोठा होणार होता. एवढी मोठी रक्कम अण्णासाहेबांजवळ त्यावेळीं नव्हती, म्हणून ते सचिंत झाले होते. मामंजींचा उत्साह तर एवढा मोठा की, अण्णासाहेबांच्याने त्यांचा हिरमोड करवेना. पण ईश्वराच्या कृपेने याच वेळीं अण्णासाहेबांना नवी कामे मिळून सर्व रक्कम तयार झाली ! बंगल्याचे काम १९०२ साली पूर्ण झाले. आमच्या त्या वेळच्या जमान्यात आमचा हा बंगला वऱ्हाडात सर्वोत्कृष्ट म्हणून गाजला.

● ● ●

आता आमची मोठी मुलगी ताई सुमारे बारा वर्षांची व कमळाबाई सात आठ वर्षांची, अशा झाल्या होत्या. शेजारच्या कॉन्व्हेंटमध्ये व घरी मास्तर ठेवून त्यांचे शिक्षण उत्तम चालले होते. आता आम्ही मुलीचे लग्न केव्हा करतो याबद्दल लोकांत कुतूहल उत्पन्न होऊ लागले होते. त्या कालानुसार आमची ताई लग्नाची व्हायला लागली होती. आम्ही दर उन्हाळ्यात महाबळेश्वरी जात असू. तिथे अनेक मोठे मोठे लोक व संस्थानिक यांच्या व आमच्या ओळखी झाल्या होत्या. मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांचे व अण्णासाहेबांचे फारच मित्रत्व जडले होते. त्यांच्याच आत राणीसाहेब जमखिंडी, आपले दत्तक चिरंजीव परशुरामराव भाऊसाहेब यांसह महाबळेश्वरी तीनचार वेळा आल्या होत्या. त्यांनी आपण होऊन माझी ओळख करून घेतली होती व माझ्या दोन मुलींची त्या फार चौकशी करीत. एक दिवस त्यांनी मुद्दाम जमखिंडीहून आपले खाजगी कारभारी उमरावतीस धाडून माझी मुलगी ताई हिला आपल्या दत्तक मुलासाठी मागणी घातली. मामंजी व सासूबाई यांना तिथे मुलगी देणे फारच पसंत पडले. पण अण्णासाहेबांचा पूर्वीचा निर्धार पक्का होता की मुलींना खूप विद्वान करून मग प्रौढपणी त्यांची लग्ने करायची. त्यांनी मला माझे मत विचारले. मी ताबडतोब उत्तर दिले की, आपण मुलींबद्दल पूर्वी जो निर्धार केला आहे, तसेच करायचे ! मुलीला मोठे स्थळ चालून आले आहे म्हणून माझ्या मनाला तिळमात्र मोह पडत नाही. आम्हांला आमच्या मुलीची लग्ने इतक्यात करायची नाहीत, असे तुम्ही त्यांना स्पष्ट कळवा ! " मग अण्णासाहेबांनी मामंजींचीही समजूत घातली की, " तुमचा जसा माझ्यावर हक्क आहे तसा माझा माझ्या मुलांवर हक्क आहे. रूढीची भीति बाजूला सारली म्हणजे

माझ्या मुलीसाठी मी जो कार्यक्रम आखला आहे तो कुठे काही वाईट आहे का ? मी तिला मुलाप्रमाणे शिकवून पदवीधर करीन. मग तिच्या विचाराने पुढे काय ते ठरवता येईल !" यानंतर मामंजींनी मुलीच्या लग्नाबद्दल गोष्ट काढली नाही.

१९०१ च्या जूनमध्ये आम्ही आबासाहेबाला आमचे कुलदैवत रेवणसिद्ध याच्या दर्शनास नेले. रेवणसिद्ध हे दैवत ( शिवाचे ) जोशी घराण्यात मामंजींच्या आजोळच्या वैद्य घराण्यातून आले. रेवण नावाच्या एका सिद्ध पुरुषाने त्या ठिकाणी पूर्वी तपश्चर्या केली होती. हे स्थान फार जागृत आहे. जोशी घराण्यात कुणाचेही लग्न किंवा मुंजकार्य झाले, किंवा मुलगा झाला, म्हणजे त्याला तेथे पाया पडण्यास नेण्याची प्रथा आहे. मामंजींच्या मातुश्रींना तेथे दृष्टांत होऊन त्यांच्यासाठी तिथे गंगा आली होती अशी आख्यायिका आहे. ह्या ठिकाणी कौल लावून प्रश्नांची उत्तरे मिळतात. मामंजींनी तिथे विचारले की, "आमच्या उमरावतीच्या वाड्यात फार धन पुरलेले आहे म्हणतात हे खरे काय ?" त्यावर त्यांना उत्तर मिळाले की, "तेथे अगणित द्रव्य आहे, पण ते शोधण्याच्या भरीस तुम्ही पडू नये; त्यामुळे अपाय होईल." मामंजींनीही त्याबद्दल कधीच अभिलाष धरला नव्हता; पण गावात मात्र सर्वत्र बातम्या पसरत की या वाड्यातली खूप संपत्ती मामंजींना सापडली आहे, व त्यामुळेच अण्णासाहेबांचे वैभव वाढत आहे. अर्थातच त्या बातम्यांत तिळमात्रही तथ्य नव्हते.

मुलीच्या लग्नाबाबत झालेल्या प्रकारानंतर मामंजींनी आमच्या मुलीच्या लग्नाचा आम्हांला पुन्हा आग्रह केला नाही. तरी आयुष्यात आपल्या हातून कन्यादान घडले नाही, याबद्दल त्यांना व सासूबाईंना फार वाईट वाटे. म्हणून पूर्वीच्या समजुतीप्रमाणे त्यांनी इ. स. १९०१ मध्ये तुळशीचे लग्न लावण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पोटच्या मुलीच्या लग्नाप्रमाणे घरात टोलेजंग तयारी सुरू झाली. अगदी खऱ्या लग्नाप्रमाणे मंडप, सीमांतपूजन, उष्टी हळद, तेलफळ, रुखवत, मंगलाष्टकें, कन्यादान, सुनमुख, वरात वगैरे सर्व यथासांग झाले. घरात पाहुणेमंडळी खूप जमली होती, त्यांची उत्तम बरदास्त ठेवण्यासाठी मामंजी जातीने रात्रंदिवस खपले. त्यावेळी त्यांचे वय ६०-६१ वर्षांचे होते. प्रकृती उत्तम व कणखर होती. मात्र काही वर्षांपासून त्यांच्या हातात एक तऱ्हेचा कंप उद्भवलेला होता. तरी पण त्यांची सर्व कामे यथास्थित चालू होती.

लग्न आटोपून सर्व मंडळींचे अगदी पोटभर आदरातिथ्य करण्यास मिळाले, त्यांना मनाजोगे उत्तम अहेर देऊन त्यांची विदागी केली, म्हणून मामंजी विशेष खूष होते. या सर्व गडबडीत त्यांचे नित्याचे सतारवादन करण्यास त्यांना फुरसत झाली नव्हती. तुळशीच्या लग्नाच्या तिसऱ्या दिवशी रात्री जेवणानंतर ते सतार वाजविण्यास बसले. त्या रात्री त्यांनी अगदी देहभान विसरून सतार वाजविली. पहाटेचे चार वाजले तेव्हा त्यांनी सतारवादन अंमळ थांबविले. तोच त्यांच्या

हातांतून सतार गळून पडली ! आपला उजवा हात चालत नाही असे त्यांना दिसून आले. बोलण्याचा यत्न केला तो बोलताही येईना. उठायला लागले तो तोल जाऊन पडले. जवळ बसलेल्या मंडळींना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी जाऊन मामंजींना धरले तो ते बेशुद्ध झाले होते ! सर्वांची धावपळ झाली. डॉक्टर आले, पण काही उपाय लागू पडेनात ! त्यांना अर्धांगाचा झटका आला होता ! अशा स्थितीत ते पाचसहा दिवस होते. त्यात त्यांना खूप ताप भरला व न्यूमोनिया झाला. सहाव्या दिवशी त्यांना थोडी शुद्ध आली. त्यांनी सासूबाईंना व अण्णासाहेबांना जवळ बोलावले, अण्णासाहेबांच्या पाठीवरून हात फिरवला, व जे डोळे मिटले ते पुन्हा उघडले नाहीत ! ता. १ डिसेंबर १९०२ रोजी मामंजींचे देहावसान झाले. घरात आठ दिवसांपूर्वी झालेला तो तुळशीच्या लग्नाचा सुखसोहळा, आणि त्यानंतर मामंजींच्या मृत्यूचा अति दारुण प्रसंग ! आमच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगरच कोसळला ! अण्णासाहेब एवढे धीराचे, पण आईच्या मांडीवर डोके ठेवून ते किती तरी वेळ रडले. पण शेवटी विवेक करून त्यांनी पुढील सर्व कामे यथासांग केली. धार्मिक विधींवर त्यांचा विश्वास नव्हता. तरी पण आपल्या आईच्या इच्छेनुसार त्यांनी मामंजींची उत्तरकार्ये, दानधर्म वगैरे सर्व उत्तम तऱ्हेने केले.

आमचे मामंजी अति रागीट खरे, पण त्यांच्यात दिलदारपणा व बाणेदारपणा हे फार मोठे गुण होते. अण्णासाहेबांवर त्यांचा फार जीव असे व अण्णासाहेबांचेही त्यांच्यावर फार प्रेम होते. त्यांची व मामंजींची काही बाबतींत मते भिन्न होती, तरी अण्णासाहेब त्यांना फार आदराने वागवीत. मलाही ते माझ्या वडिलांच्या ठिकाणी वाटत. आमच्या सुधारकीपणामुळे आमच्यावर गावात खूप टीका चालायची, पण मामंजींच्या दराऱ्यामुळे उघडपणे आमच्या वाटेस जाण्यास कोणी धजत नसत. त्यामुळे मामंजींच्या मृत्यूने आमच्यावरील मोठे छत्र नाहीसे झाले असे वाटून काही दिवस आमचा धीर खचून गेला जसा !

मामंजी गेल्यानंतर सासूबाईंनी त्यांच्या गावातल्या वाड्यातच राहण्याचे ठरविले. रोज संध्याकाळी अण्णासाहेब त्यांच्याकडे जाऊन बसत. सासूबाईंच्या इच्छेस येईल त्याप्रमाणे ते त्यांच्या खर्चासाठी रकमा देत. मलाही त्याबद्दल तिळमात्र विषाद वाटला नाही. एवढी मातृभक्ती ते करतात म्हणूनच ईश्वर त्यांची भरभराट करतो, असा माझा विश्वास असे. " माझ्या आईने तिच्यासाठी मला घरावर तुळशीपत्र ठेवण्यास सांगितले तरी ते मी तत्काळ खुषीने करीन " असे ते म्हणत. आईसाठी इतका स्वार्थत्याग करण्याची त्यांची तयारी होती.

समाजसुधारणा करण्याच्या प्रयत्नांत आमच्यावर लोकांनी कसकशा टीका केल्या हे मी मागे सांगितलेच आहे. तो जुना जमानाच असा काही विचित्र होता की, त्याची व सध्याची तुलनाच करणे कठीण आहे. त्या काळात रूढ चालीरीतीविरुद्ध कोणी थोडेसे जरी वागले—मग ते कितीही चांगले व उपयुक्त असो—तरी ते

करणारावर अनुदार अशा टीकेचा भडिमार व्हायचा ! या कारणामुळे आपली सामाजिक सुधारणा लवकर होत नाही हे अण्णासाहेबांनी कॉलेजात असल्यापासून जाणले होते, व तेव्हापासूनच ज्या रूढी त्यांना वाईट वाटल्या त्या नाहीशा करण्याचा त्यांनी निर्धार केला. मी ज्यावेळीं उमरावतीत प्रथम बाहेर जाताना पायात जोडा व अंगावर शाल घेऊ लागले त्यावेळी असाच टीकेचा भडिमार झाला होता. प्रथम जे कोणी पायंडा घालण्यास जातात त्यांना लोक टीकास्त्रांनी जर्जर करू बघतात हेच खरे ! मोठे मोठे लोकसुद्धा या लोकापवादाला भिऊन वागतात. याचे एक उदाहरण आठवले ते सांगते.

एका वर्षी आम्ही पुण्यास होतो, त्यावेळीं लो. टिळकांच्या मुलाची मुंज निघाली. म्हणून ते अण्णासाहेबांना आमंत्रण देण्यास आले.त्यावेळी ते म्हणाले, "तुम्ही आमच्या घरी जेवावे अशी माझी फार इच्छा आहे. पण तुम्ही प्रायश्चित्त घेतलेले नाही, तेव्हा मला तुम्हांला पंगतीत बसविता येणार नाही." त्यावर अण्णासाहेब त्यांना म्हणाले, "तुम्ही प्रेमाने जेवायला बोलावता आहा, तेव्हा मी अवश्य येईन. तुम्ही माझे पान खुशाल पंगतीबाहेर मांडा." मग टिळकांच्या घरच्या एवढ्या मोठ्या पंगतीत एकट्या अण्णासाहेबांचे पान तेवढे पंगतीबाहेर मांडले गेले, व तिथे बसून अण्णासाहेब शांतपणे जेवले ! लो. टिळकांसारख्यांना आपल्या घरात अण्णासाहेबांना पंगतीत बसविण्याचे धैर्य झाले नाही ! इतर निमंत्रित पाहुण्यांच्या पंगतीत जर अण्णासाहेबांना बसविले तर त्या पाहुण्यांची मने दुखावली जातील असे कदाचित लोकमान्यांना वाटले असेल. मी त्याबद्दल त्यांना दूषण देते असे नाही. पण त्यांनी मोठमोठ्या गोष्टींत सिंहासारखे धैर्य दाखविले, तेव्हा स्वतःच्या घरी बोलावलेल्या अशा अतिथींला घेऊन स्वतः एकटे वेगळे जेवणास बसण्याचे धैर्य त्यांनी दाखविले असते तर त्यांच्याबद्दलचा माझा आदर शतपटीने वाढला असता ! पण अशा खाजगी गोष्टीतही लो. टिळकांसारखे लोक जनमताच्या विरुद्ध जाऊ धजत नसत असा तो काळ होता, हे यावरून ध्यानात येईल.

१८९७ साली आम्ही महाबळेश्वराहून साताऱ्यावरून परत येताना, माझी आई फार आजारी होती म्हणून मी तिच्याजवळ साताऱ्यास महिनाभर राहण्याचे ठरविले. त्यावेळी माझ्या माहेरची स्थिती फारच खालावलेली होती. माझे चुलते बापूसाहेब बाहेरख्यालीच्या नादाने एक एक चीज बाहेर नेऊन विकीत होते. माझे वडील रावजी विरक्त वृत्तीने बाहेरगावी कामावर राहत. वसुलीचे काम करण्यास कोणी जबाबदार माणूस राहिला नव्हता. तशात माझी आई अंथरुणाला खिळलेली. इतक्यात माझी धाकटी बहीण गोदू हिचे पुण्याच्या कानिटकरांकडे एकदमच लग्न ठरले. आईला तर लग्नाला जाणे अशक्यच होते. तेव्हा त्यासाठी मी जावे असे मला सांगून ती म्हणाली, "आता या गोदूचे सासर-माहेर सर्व तूच कर ...... आता तुझीमाझी पुन्हा भेट होणे शक्य नाही !" आईचा तो कृश, परंतु सुंदर

चेहरा, तिची करुण मूर्ती, अद्यापि माझ्या डोळ्यांसमोर येते जशी! यानंतर मी अत्यंत जड अंतःकरणाने उमरावतीस गेले. पुढे आठदहा दिवसांनीच माझी आई स्वर्गवासी झाल्याचे पत्र आले!

यानंतर माझे बंधू तात्या आणि माधव व चुलत बंधू बाबा यांना अण्णासाहेबांनी सुचविले की, "तुम्ही उमरावतीस येऊन काही व्यापारधंदा करा. मी तुम्हांला मदत करीन." त्याप्रमाणे ती मंडळीं उमरावतीस आली. माझे वडील रावजीही नंतर उमरावतीस मुलांकडे आले. त्यांना थोडेसे पेन्शन मिळत असे. त्यातून त्यांनी स्वतःच्या पोटाला चिमटा लावून तीनचार हजार रुपये मागे टाकले होते. स्वतःच्या खर्चाचा भार त्यांनी आपल्या मुलांवरही टाकला नाही. रावजींनी व अण्णासाहेबांनी मिळून उमरावतीत एक थिएटर बांधायचे ठरविले. त्यात स्वतःची सर्व रक्कम देऊन रावजींनी आपला चार आण्यांचा हिस्सा ठेवला. अण्णासाहेबांजवळून उसने पैसे घेऊन माझे चुलतभाऊ बाबा यांनी आपला चार आण्यांचा हिस्सा घेतला, व माझा धाकटा भाऊ माधव यास उद्योग राहावा या दृष्टीने अण्णासाहेबांनी त्यास कर्ज म्हणून पैसे देऊन त्याचाही चार आण्यांचा हिस्सा करून दिला. उरलेला चार आण्यांचा हिस्सा अण्णासाहेबांनी स्वतःच्या नावावर केला! पण सांगण्यास कारण की, आपल्या निकटच्या आप्तांशी पैशाचा असा व्यवहार करू नये अशी जी एक समजूत आहे, त्याची सत्यता ह्या बाबतीत माझ्या पूर्ण अनुभवास आली, व यामध्ये आम्हांला विनाकारणच वाईटपणा आला.

* * *

# .३.

## ( १९०० ते १९०९ )

इ. स. १९०० हे वर्ष केवळ उमरावतीवासीयांसच नव्हे तर सर्व वऱ्हाडला फार मनःक्षोभाचे झाले. कारण या वर्षी वऱ्हाडचे उमरावतीस असलेले हायकोर्ट नागपूरला कायमचे गेले. ते उमरावतीस राहावे म्हणून वऱ्हाडच्या मंडळींनी खूप खटपट केली. परंतु त्यात यश आले नाही. अण्णासाहेबांचे त्यामुळे काहीच नुकसान झाले नाही. वऱ्हाडचे लोक त्यांना अधिक पैसे देऊन केसेससाठी नागपूरला नेऊ लागले, व त्यांची प्रॅक्टिस खूप वाढली व नावलौकिकही वाढला. इ. स. १९०० हे वर्ष आमच्या खाजगी जीवनातही फार मनःक्षोभाचे झाले. माझा मुलगा आबासाहेब याच्या पाठीवर एक वर्षानेच मला पाचवी कन्या झाली. तिचे रूप अत्यंत सुंदर होते. तिचे नाव आम्ही मंगलागौरी उर्फ इंदिरा असे ठेविले. प्रथमपासूनच तिचा अण्णासाहेबांकडे भारी ओढा, त्यामुळे सर्व मुलांपेक्षा त्यांना तिचा फार लळा लागला. सर्वांनी मला म्हणावे, "आता तुम्हांला पंचकन्या झाल्या; तुम्ही फारच भाग्यवान!" पण हे ऐकून, का कोण जाणे, मला हे असे ऐकणे नको—दृष्ट होईल, असा धसका बसे. इ. स. १९०० च्या उन्हाळ्यात ह्या दोन लहान मुलांना घेऊन महाबळेश्वरचा दूरचा प्रवास करणे मला फार जोखमीचे वाटले. त्यात रावबहादुर मुधोळकरांचे द्वितीय कुटुंब – त्यांना 'जिजी' म्हणत – यांनी फार आग्रह धरला की, आम्ही यावर्षी त्यांच्याबरोबर माथेरानला जावे. त्या मला वडील बहीण मानीत आणि त्यांना त्यावेळी कडक डोहाळेही लागलेले होते, म्हणून आम्ही त्यावर्षी माथेरानला जाण्याचे ठरविले. पण माथेरानची हकीगत सांगण्यापूर्वी रावबहादुर मुधोळकर यांच्या ह्या द्वितीय विवाहाबद्दल थोडे सांगणे अयोग्य होणार नाही. मुधोळकरांचे प्रथम कुटुंब वारले, त्यावेळी त्यांची चाळिशी उलटलेली असून त्यांना एक कन्या होती. त्यांनी द्वितीय विवाह एका बालविधवा प्रौढ तरुणीशी करावा म्हणून त्यांचे एक आप्त व

पुनर्विवाहाचे चालक व्यंकटराव मुधोळकर यांनी फार गळ घातली व त्याला राव-बहादुरांनी संमती दिली. त्याप्रमाणे एका कुलवंत वधूची निवडही झाली. पण ऐन मोक्याचे थोडे दिवस अगोदर रावबहादुरांनी कोणास न कळविता, पुण्याकडे जाऊन एका बारा वर्षांच्या कुमारिकेशी लग्न केले! त्यामुळे व्यंकटराव आदीकरून त्यांच्या निकटच्या मित्रांना फारच धक्का बसला व त्यांनी त्यांजवर रोष केला. त्यांत अण्णासाहेबही एक होते. त्यानंतर एक वर्ष ते रावबहादुरांच्या घरी गेले नाहीत. जिजी मुधोळकर वयाने लहान, पण रूपाने फार सुंदर व स्वभावाने फार प्रेमळ होत्या. त्यांच्या घरात दीर, जावा, नणंदा, आत यांचा फार मोठा घबडगा होता. त्यात प्रथम त्या घाबरून जात. रावबहादुर त्यांना तळहातावरील फोडाप्रमाणे जपत व त्यांनीच मला आपल्या घरी नेऊन जिजींची ओळख करून "ही तुमची धाकटी बहीण" म्हणून सांगितले. जिजीही माझ्याबरोबर प्रथमपासूनच फार प्रेमाने वागत. मला त्यांच्याबद्दल फार सहानुभूती वाटे. त्या आमच्याकडे वरचेवर येत—आमच्या जवळच त्यांचा बंगला होता— व माझी मुलगी ताई त्यांच्याहून चार वर्षांनी लहान होती तरी तिच्याशी खेळत, व मनमोकळ्या वागत. थोडेच दिवसांत राव-बहादुरही त्यांच्याबरोबर आमच्याकडे येऊ लागले व सर्व मंडळी ब्याडमिंटन, सायकलवर बसणे वगैरे शिकू लागली. आता अण्णासाहेबही रावबहादुरांशी पूर्ववत प्रेमाने वागू लागले. त्यांना जिजी 'भाऊ' म्हणत. एक दिवस त्यांनी मला सांगितले की, "मला माझ्या भवितव्यतेची काळजी वाटते. ह्यांच्या व माझ्या वयांत केवढे अंतर! आमचा संसार कसा तडीस जाणार?" त्यावर अण्णासाहेबांनी त्यांना खूप धीराच्या गोष्टी सांगून म्हटले, "तुम्ही सर्व चिंता सोडा. तुमचा संसार दीर्घ व उत्तम होईल." व पुढे त्याप्रमाणेच झाले. त्यामुळे त्यांचा माझ्यावरील लोभ वाढतच गेला. माझ्या काही मैत्रिणींना ते बघवत नसे, व त्यांच्यात व माझ्यात वितुष्ट यावे म्हणून प्रयत्न होत. त्यांचे वय लहानच होते, त्यांना कधीकधी माझ्या विरुद्ध सांगितलेल्या गोष्टी खऱ्या वाटत, व त्या माझ्यावर रुसत. पण मग मी त्यांची समजूत घाली व पुन्हा त्यांचा सर्व राग जाई. आम्हा बायकाबायकांतही चुरस आहे, अशी काहीजणी टीकाही करीत, पण त्याकडे मी कधीच लक्ष देत नसे. त्यामुळे आमचा घरोबा उत्तम टिकला.

ह्याप्रमाणे १९०० मध्ये आम्ही मुधोळकर कुटुंबाबरोबर माथेरानला गेलो. त्यावेळी तेथे नेरळ स्टेशनवरून डोल्यांतून—त्यांस मंचल म्हणत—माथेरानला जावे लागे. तिथे आम्ही जवळ जवळ असे वेगळे बंगले घेऊन राहिलो. माथेरानलाही अण्णासाहेबांनी मुंबईच्या बऱ्याच नामवंत मंडळींच्या ओळखी केल्या. त्यांत मुंबईचे पुरुषोत्तमदास मंगळदास व त्यांच्या पत्नी लीलावतीबाई यांचा आमचा फार दाट परिचय झाला. मुंबईचे मंगळदास मार्केट यांचेच आहे. लीलावतीबाई फारच हुशार व कर्तृत्ववान होत्या. त्यांच्या जातीच्या रिवाजाप्रमाणे त्यांच्या मुलीचे तिच्या तान्हेपणीच एका

मुलाशी लग्न ठरले होते. त्याला ते लोक ' सगाई ' म्हणत. पुढे तो मुलगा फारच वद-फैली निघाला. पण त्यांच्या रूढीप्रमाणे त्यांना सगाई तोडता येईना. तेव्हा त्याबद्दल लीलावतीबाईंनी कोर्टात दावा मांडला होता. त्याबाबत त्या अण्णासाहेबांशी चर्चा करून त्यांचा सल्ला घेत. अर्थातच मित्रत्वाचे नात्याने अण्णासाहेब त्यांना मोफत सल्ला देत. पुढे तो दावा बाईंनी जिंकला व सगाई रद्द करून घेतली. बाईंना वाटे की अण्णासाहेबांच्या महत्त्वाच्या सल्ल्यामुळेच त्यांना यश आले व त्यांनी पुढे आमच्याशी निरंतरचा स्नेह ठेविला. ही सर्व मंडळी व मुधोळकरांचे व आमचे घरांतील मंडळी, माथेरानला रोज पायी लांब लांब फिरायला जात असू. एक दिवस तेथील 'प्यानोरमा' पॉइंटवर आमच्यावर आग्या मधमाशांच्या एका फार मोठ्या थव्याने येऊन आम्हांला घेरले ! आम्हांला पळता भुई थोडी झाली. सर्वांना माशा खूप चावल्या. दोन मैलपर्यंत त्या माशांनी आमचा पाठलाग केला. आमच्या मोठ्या मुलींना तर त्यामुळे ताप भरला !

यानंतर अण्णासाहेबांनी माथेरानच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जाऊन, मधमाशांची पोळीं काढण्याबाबत काही कडक नियम करून, तेथे येणाऱ्या प्रवाशांना असा त्रास होऊ नये ह्याबद्दल विशेष काळजी घ्या, म्हणून महत्त्वाच्या सूचना केल्या व त्या अमलात आणण्याचे त्याने आश्वासन दिले.

याप्रमाणे माथेरानचा उन्हाळ्याचा सीझन आटोपून आम्ही उमरावतीस परत आलो, तो: माझ्या दोन्ही लहान मुलांना—आबासाहेब व इंदिरा यांना—अतिशय जुलाब होऊ लागले. पोटांत पाणीही ठरेना. याच वेळीं आमच्या विश्वासाचे डॉक्टर डॉ. खोत यांचे व मामंजींचे काही भांडण होऊन त्यांनी आमच्याकडे येणे सोडले होते. त्यामुळे नुक्तेच डॉक्टर झालेले माझे चुलत दीर भाऊराव यांचे औषध सुरू केले. त्यांनी मुलीला दात येत आहेत व त्यामुळे हे जुलाब होताहेत असे निदान करून तिच्या हिरड्यांस चिरे दिले ! त्यामुळे ती सुकुमार मुलगी बेशुद्ध होऊन तिला चांगलाच ताप भरला. सासूबाई, मामंजी गावातून आमच्याकडे राहण्यास आले. मी सारखी मुलीला मांडीवर घेऊन बसले होते, व त्या स्थितीतच दुष्ट काळाने आमची ती अत्यंत रमणीय, कोमल कलिका आमच्यापासून हिरावून नेली ! मी तर बेशुद्धच झाले ! थोडी शुद्धीवर आले तो डॉ. खोत माझ्याजवळ आलेले ! ते संधिवाताने फार आजारी होते, पण माझे संकट जाणून आपण होऊन आमच्या मदतीस आले. त्यांनी माझे फारच सांत्वन केले व "आता दुःख बाजूस सारून ह्या मुलाकडे बघा " म्हणून सांगितले. मुलाचीही प्रकृती विकोपास जात होती ! डॉ. खोत म्हणाले, "मला या आजाराची किल्ली सापडली आहे. माझ्या दवाखान्यात जाऊन ' सायमीन ' हे औषध आणा, त्यामुळे आता हा मुलगा तरी वाचेल." पण दुर्दैवाने ते औषधच कुणास सापडेना, व डॉ. खोतांना त्यांच्या घरी जाऊन आणण्याची शक्ती नव्हती. ते फारच चिंतातुर

झाले, व " आता सहा तासांच्या आत जर हे औषध मुलाच्या पोटात गेले नाही तर तो हाती लागणार नाही " असे म्हणाले. त्यांनी अनेक माणसे ते औषध धुंडाळण्यास धाडिली. चार तासांनी ते औषध एकदाचे सापडले, व लगलीच मुलाला दिले गेले. त्याला हळूहळू उतार पडू लागला. डॉ. खोत यांच्या त्या उपकारांचे आम्हांस निरंतरचे कृतज्ञतापूर्वक स्मरण राहिले. पण याप्रमाणे आम्ही विलक्षण कौटुंबिक वादळात सापडून कन्यावियोगाचा एक कठोर वज्रपात आमच्यावर झाला. ते वादळ हळूहळू शांत होऊन आयुष्यातील पुढील मार्ग आक्रमण करण्यास आम्हांला भाग पडले.

इ. स. १९०२ मध्ये नवा बंगला तयार झाला म्हणून त्याची वास्तुशांत करण्याचे आम्ही ठरविले. उमरावतीतील भिक्षुकांनी आमच्याकडे येण्याचे नाकारले. म्हणून आम्ही काशीहून एक शास्त्री व नागपूरहून एक भटजी असे आणवून वास्तुशांत यथासांग करविली. वास्तूच्या जागी नवरत्ने घालून घरच्या घरधनिणीने त्यात घागरीतून पाणी आणून घालायचे असते. त्याप्रमाणे मी मोठ्या कलशातून पाणी घातले व वास्तूसाठी केलेला खळगा ताबडतोब भरला. ते फारच शुभदायक झाले असे सर्वजण म्हणाले! नाही तर अशा ठिकाणी पाचदहा तरी पाण्याचे कलश सहज घालावे लागतात म्हणे! या वास्तुशांतीसाठी अण्णासाहेबांची बरीचशी मित्रमंडळी व बाहेरगावचे पाहुणेही जमले होते. वास्तुशांतीनिमित्त आम्ही भिकाऱ्यांसाठी फार मोठे भोजन घालण्याचे ठरविले. त्यासाठी आगाऊ शहरात व आसपासच्या खेड्यांतून चारपाच दिवसांपासून दवंडी देवविली होती. सकाळी दहा वाजल्यापासून रात्री एक वाजेपर्यंत एकसारख्या पंगती उठत होत्या. भोजनास वऱ्हाडातील नावाजलेले शिरापुरीचे जेवण, वरणभात, भाजी असा बेत ठेवला होता. त्यावेळी पोटभर जेवून तृप्त झाल्याचा त्या गरिबांच्या तोंडावर जो आनंद दिसून आला तो अपूर्व होता. त्यामुळे आमच्या मनाला विलक्षण संतोष व प्रसन्नता वाटली. ही एकच गोष्ट अशी झाली की, तिच्याबद्दल गावात आमच्यावर टीका झाली नाही.

याच सुमारास मला पुन्हा डोहाळे लागले व प्रकृती नादुरुस्त होऊ लागली. आमचे डॉ. खोत नुकतेच वारले होते. डॉ. वासुदेवराव भट म्हणून गावात नवे डॉक्टर आले होते, त्यांचे औषधोपचार आम्ही सुरू केले. हे डॉ. भट म्हणजे अण्णासाहेबांचे शालेय गुरु रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचे जामात. या डॉक्टरांनी आमच्या कुटुंबावर आजन्म लोभ ठेविला. या सुमारास अण्णासाहेब 'व्हालंटियर्स कोर' मध्ये जाऊ लागले होते. तेव्हा त्यांची बंदुक घेऊन मी नेम मारण्याची प्रॅक्टिस करायची. त्यांचेबरोबर मी पुष्कळदा हरणाच्या शिकारीलाही जाई. या खेपेस मला आतूनच अशी स्फूर्ती व्हायची की, लष्करी पेशाच्या सर्व गोष्टी कराव्या, पाहाव्या, ऐकाव्या. नदीकिनाऱ्यावर तंबूच्या रांगाच्या रांगा लागून लष्करी तळ

पडला आहे व तिथे आपण आहो, अशी मला नेहमी स्वप्ने पडू लागली.

पुढील वर्षी ( १९०३ ) आमची सर्वात मोठी कन्या ताई मॅट्रिक पास झाली. तिला आता पंधरा वर्षे पूर्ण झाली होती. तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी तिच्या लग्नाची जमखिंडीकरांकडील मागणी आम्ही नाकारल्यापासून आमच्यावर व तिच्यावरही लोक जसे काही डोळ्यांत तेल घालून नावे ठेवण्यास टपलेले असायचे. पण माझ्या मुलींना उत्तम शिक्षण देण्याचा निश्चय मी तिळमात्र ढळू दिला नाही. मुलींना शिक्षण देऊन मोठ्या करायच्या तर त्यासाठी अगदी लहानपणापासून त्यांच्या मनावर कसे संस्कार करायचे याची रूपरेषा आम्ही आधीपासून काळजीपूर्वक आखली होती. मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम होऊ नयेत यासाठी आईबापांनी अत्यंत जागरूकता ठेविली पाहिजे. विशेषेकरून लैंगिक विचार जेणेकरून प्रज्वलित होतील अशा गोष्टी लहान मुलांसमोर पुष्कळदा केल्या जातात व बोलल्या जातात असे दिसून येते. हल्ली या सिनेमांपासून तर काही विचारूच नये ! त्यात काही वावगे नाही, मुलांना सर्व तऱ्हेच्या गोष्टी माहीत असाव्या अशी विचारप्रणाली अलिकडे ऐकण्यास मिळते. पण असल्या विचारांना मुलांच्या कोवळ्या वयात चालना देणे अगदी गैर आहे असे माझे स्पष्ट मत आहे ! असो.

आमची ताई मॅट्रिक झाली त्यावेळी आतासारख्या शिक्षणाच्या कोणत्याच सोयी उपलब्ध नव्हत्या. त्यात लोकनिंदेचा जबरदस्त मारा ! त्यामुळे आमच्या ताईचे शिक्षण करिताना आम्हांला फार नाजूक परिस्थितीस तोंड द्यावे लागले. शेजारच्या कॉन्व्हेंटमध्ये तिला धाडीत होतो, पण तेथे ख्रिश्चन धर्माकडे तिचे मन वळू नये म्हणून फार जपावे लागे. मुलांच्या शाळेतील बापू सहस्रबुद्धे म्हणून एक हुशार व सज्जन असे मास्तर तिला शिकविण्यास ठेवले. ते तिला सेकंड लँग्वेजखेरीज मॅट्रिकचे सर्व विषय शिकवीत. फ्रेंच व पियानो शिकण्यास मात्र तिला कॉन्व्हेंटमध्ये धाडीत होतो. आम्ही तिला डॉक्टर करू इच्छित होतो, व पुढे त्यासाठी तिला विलायतेस धाडण्याचा हेतू होता. या दृष्टीने फ्रेंच शिकणे फायदेशीर होईल असा सल्ला मिळाल्यामुळे तिला आम्ही फ्रेंच ही सेकंड लँग्वेज घ्यायला लाविली. ताई मॅट्रिकच्या परीक्षेसाठी नागपूरला गेली त्यावेळी रस्त्याच्या दुतर्फा व घरावरूनही लोकांची गर्दी लोटली होती. एक मुलगी मॅट्रिकला बसली आहे–हा काय चमत्कार ! ती आहे तरी कशी ? असे ज्याला त्याला कुतूहल निर्माण झाले होते !

ताईची मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर १९०३ मध्ये आम्ही महाबळेश्वरी गेलो. या मुक्कामात आमची नामदार गोखले, रँग्लर परांजपे, शिवरामपंत साठे, वगैरे मंडळींशी अधिक मैत्री झाली. परांजपे त्यावेळी नुकतेच विलायतेहून मोठे यश मिळवून आले होते. त्यांचे वागणे किती साधे व सरळ ! त्यावेळी मला डोहाळे लागले होते. मला वाटे आपणास रँ. परांजपे यांच्यासारखा अति बुद्धिवान मुलगा व्हावा. एकदा वाटे शिवाजीसारखा देश स्वतंत्र करणारा शूर पुत्र व्हावा.

ना. गोखले आमच्या मुलांबाळांत मिसळून त्यांजसकट आम्हांला गद्धाकोट हा पत्त्यांचा डाव खेळायला बसवीत. अशा थोर लोकांच्या सहवासात त्या वर्षी महाबळेश्वरी आमचा काळ गेला. त्यामुळे मला सारखे वाटे की, माझ्या पोटी कोणी थोर व्यक्ती जन्मास येणार !

जूनच्या आरंभी महाबळेश्वर सोडल्यावर आम्ही सर्व आमचे स्नेही हरि सीताराम दीक्षित सॉलिसिटर यांच्याकडे मुंबईस काही दिवस राहिलो. त्यावेळीं आम्हांला आमच्या ताईला ग्रँट मेडिकल कॉलेजात ठेवायचे होते. तिची मुंबईस कशी व्यवस्था करावी या विवंचनेत आम्ही होतो. पण दीक्षित व त्यांच्या पत्नी यांनी आम्हांला अतिशय आग्रह केला की, "तुम्ही ताईला आमचेकडे ठेवा, आम्ही तिला आमच्या मुलीप्रमाणे सांभाळू." मग आम्ही ताईला दोन वर्षे त्यांच्याकडे ठेविली. त्याबद्दल मोबदला म्हणून त्यांना काही देणे शक्य नव्हते, कारण त्यांनी ते कधीही घेतले नसते. म्हणून त्यांच्याकडे मुंजी, बारसे वगैरे प्रसंग पाहून आम्ही त्यांना विशेष मोठाले अहेर देत गेलो, व त्यांनी आमच्यावर केलेल्या लोभाचे व चांगुलपणाचे अंशतः उतराई झालो.

उमरावतीस परत आल्यावर हळूहळू माझे दिवस भरत आले व २६ आक्टोबर १९०३ रोजी माझ्या नूतन मुलाचा जन्म झाला. मुलाचे नाव 'भालचंद्र' उर्फ बाळासाहेब ठेविले. याचा चेहरा सुंदर व शरीर बाळसेदार होते. माझा मोठा मुलगा आबासाहेब रोज सायंकाळी देवघरात जाऊन आपले चिमुकले हात जोडून प्रार्थना करायचा की, "देवा मला भाऊ दे !" आणि खरेच देवाने त्याला भाऊ दिला. सासूबाई म्हणत, "आता आमच्या घरात सूर्य व चंद्र यांची कशी छान जोडी झाली ! माझे अण्णासाहेब मला एकटेच होते. त्यावर संसार एका चाकाचा झाला. माझ्या नातवांचा आता जोडीच्या चाकांवर होईल !" अकराव्या महिन्यांतच तो चालायला व धावायला लागला व पायाने फुटबॉल मारायला लागला ! लहानपणापासून त्याच्यात निर्भयपणा व आत्मविश्वास प्रामुख्याने दिसू लागला.

१९०४ च्या उन्हाळ्यात आम्ही महाबळेश्वरी न जाता लोणावळ्यास बंगला घेऊन राहिले. हा बंगला एका उंच टेकडीवर असून तेथून खंडाळ्याच्या घाटाचा सुंदर देखावा दिसे व रोज तेथून जाणारी आगगाडी दिसे. त्यामुळे आमची मुले तेथे फारच रमली. अण्णासाहेबांच्या मनात अलीकडे फार येऊ लागले होते की, आपण आता व्यापारात पडावे. मुंबईस त्यांचे मुकादम म्हणून कोणी स्नेही होते, ते नुकतेच व्यापारात पडले असून त्यात फार फायदा होतो, म्हणून ते नेहमी फार चित्ताकर्षक गप्पा सांगत. मला स्वतःला त्यात काही तथ्य वाटले नाही, पण अण्णासाहेबांना ते फार पटले, व ते त्या मुकादमांकडे मुंबईस दर शनिवार-रविवारी जाऊन व्यापारविषयक माहिती मिळवू लागले. लोणावळ्यास आमच्या पुष्कळ

ओळखी झाल्या. ती मंडळी पुष्कळदा आमच्याकडे यायची व मग व्यापारविषयक गोष्टींवर खूप वाद चालायचे.

जूनच्या सुरुवातीस अण्णासाहेब उमरावतीस गेले व मी मुलांना घेऊन एक महिन्यासाठी पुण्यास गेले. व्यापारात पडण्याची अण्णासाहेबांची हौस लोणावळ्यात आलेल्या थोड्या अनुभवाने फार कमी झाली होती. यावेळी पुण्यास ना. गोखले ह्यांनी मला मुलांसह त्यांच्या घरी माहेरपण म्हणून येऊन राहण्याचा फार आग्रह केला. त्यांच्याजवळ त्यांची विधवा बहीण व त्यांच्या दोन कन्या–काशी व गोदू–राहत होत्या. त्यावेळी ती मंडळी पुण्यात गांधींचे वाड्यात बिऱ्हाडाने राहत असत. गोखले व त्यांच्या भगिनी यांनी आमचे अगदी मनापासून अगत्य केले. गोखले जेव्हा जेव्हा कलकत्त्यास जात (ती त्यावेळी हिंदुस्थानची राजधानी होती.) तेव्हा तेव्हा उमरावतीस मुद्दाम आमच्यासाठी राहत असत. आले म्हणजे आमच्या मुलांना घेऊन पत्ते खेळत. अण्णासाहेबांना पत्ते आवडत नसत; पण त्यांनाही ते खेळायला बसवीत. पुष्कळ वेळा ते खेळताना मुद्दामच चिडत, त्यामुळे खेळाला खूप रंग चढे. 'गोखले काका' उमरावतीस येण्याची आमची मुले अगदी वाट पाहत, व ते आपल्या कुटुंबपैकीच एक आहेत असे त्यांना वाटे.

आम्ही सुरू केलेल्या मुलींच्या शिक्षणाचे गोखल्यांनी फार कौतुक केले. गोखल्यांचे मनात त्यांच्या मुलींनाही लग्नाच्या मोठ्या करून उच्च शिक्षण देण्याचे होते. परंतु त्यांच्या मुलींना मातेप्रमाणे वागविणाऱ्या त्यांच्या भगिनी त्याबद्दल त्याकाळी होणारा लोकापवाद घेण्यास तयार नव्हत्या व भगिनीचे मन दुखविणे गोखल्यांना संकट वाटत होते. पण माझ्या मुलींचे वळण पाहून व माझे विचार ऐकून त्यांच्या भगिनींनी आपल्या भाच्यांना भावाच्या इच्छेनुसार उच्च शिक्षण देण्यास पूर्ण संमती दिली. भगिनीचे मन वळविण्याचे सर्व श्रेय गोखले यांनी मलाच दिले. अशा तऱ्हेने १९०३ सालचा आमचा पुण्याचा कार्यक्रम आटोपून आम्ही उमरावतीस परत आलो.

आता या ठिकाणी आम्ही शेती का विकत घेतली याची एक जुनी माहिती सांगते. अण्णासाहेबांची वकिली झपाट्याने वाढत होती; पण त्याबरोबर घरासाठी, कुटुंबासाठी काही पैसे राखून ठेवावे हा विचार आतापर्यंत त्यांच्या मनाला शिवला नव्हता. गरिबांना दानधर्म करण्याची त्यांची विशेष प्रवृत्ती होती. माझ्या मनाचीही तशी प्रवृत्ती होती, पण आता कुटुंबाच्या जबाबदाऱ्या वाढल्या होत्या, म्हणून अडीअडचणीसाठी तरी काही पैशांचा संग्रह करणे जरूर आहे असे मला वाटू लागले. थोडे पैसे शिल्लक पडले की अण्णासाहेब ते एखाद्या संस्थेस देणगी म्हणून देऊन टाकीत. म्हणून पैसे शेतीत गुंतवावे, असे माझ्या मनाने घेतले. त्यासाठी मी उमरावतीतील प्रसिद्ध सावकार व मामंजींचे स्नेही रामभाऊ डोळे यांचा सल्ला घेतला. त्यांना ती कल्पना आवडली. निंबोली (तालुका चांदूर) येथे पाच हजार रुपयांस

उत्तम शेती विकाऊ असल्याची माहिती मिळाली. मुख्य प्रश्न व अडचण होती ती एवढी मोठी रकम उभी करण्याची. तेव्हा मी माझे सोन्यामोत्याचे दागिने विकून रकम उभी करण्याचे ठरविले. दागिने विकण्याची ही माझी तिसरी खेप. पहिली खेप मागे वर्णिल्याप्रमाणे मामंजींचे स्नेही विष्णु सदाशिव यांना बागाईत विकत घेण्यासाठी, दुसरी खेप अण्णासाहेबांचे परम स्नेही दादासाहेब चिटणीस यांच्या बहिणीच्या यजमानांवर कोर्टात काही खटला झाला होता त्यात त्यांना सोडविण्या-साठी, आणि आता ही तिसरी खेप. शेती विकत घेण्यासाठी दागिने विकण्यास मामंजी तयार होणार नाहीत हे मला माहीत होते. पण रामभाऊ डोळे यांनी मामंजींचे मन मोठ्या खुबीने वळवून अण्णासाहेबांचीही संमती मिळविली, आणि आमच्यासाठी ती शेती विकत घेऊन टाकली. तेथील व्यवस्था पाहण्यास मामंजींनी आपले एक आप्त गोपाळराव गोरे यांना निंबोलीस पगार देऊन ठेविले. पाचसात वर्षांत तेथील उत्पन्न वाढून नवी नवी शेते विकत घेता आली.

यानंतर माळव्यात किसोनी म्हणून एक गाव अण्णासाहेबांनी आमचा दुसरा मुलगा बाळासाहेब याजसाठी म्हणून घेतले. तसेच यवतमाळ तालुक्यात पहूर म्हणून मालगुजारी गाव घेतले. त्यांची अशी इच्छा होती की, आपल्या धाकट्या मुलाने खूप मोठी शेती करावी; कारण तो विशेष बुद्धिवान होता व अशा बुद्धिवान मुलांनी वकील, डॉक्टर वगैरे होण्यापेक्षा शेतीत लक्ष घालून अमेरिकेतील शेतीप्रमाणे त्यात सुधारणा करावी व तरुण पिढीला एक नवीन उपयुक्त उदाहरण घालून द्यावे; व मोठा मुलगा आबासाहेब याने कापसाच्या व्यापारात पडावे. अण्णासाहेबांची इच्छा पूर्ण करण्याचा मुलांनी कसून प्रयत्न केला, पण त्यात त्यांचे मन लागेना.

अण्णासाहेब वकिली करू लागल्यापासून वऱ्हाडात ठिकठिकाणी निघणाऱ्या कापड, रेशीम वगैरेंच्या गिरण्यांचे शेअर्स विकण्याचा भारीच सुळसुळाट झाला होता. आपल्या देशातील कारखान्यांना उत्तेजन देऊन ते वाढविलेच पाहिजेत हे अण्णासाहेबांचे दृढ मत—नव्हे त्यांच्या मनाचे नाजूक स्थान होते. असे कित्येक शेअर्स त्यांनी विकत घेतले. पण त्यांपासून त्यांना काही एक फायदा न होता कित्येक गिरण्यांचे दिवाळे निघून ते पैसे बुडाले. अण्णासाहेब आपल्या वकिलीच्या व राजकीय कामात चूर असायचे—त्यांना गिरणी बुडत आहे हा पत्ताही नसायचा! मी त्यांना म्हणायची, " उपयुक्त लोकोपयोगी संस्था, गरीब विद्यार्थी यांना तुम्ही सढळ हाताने दानधर्म करता ते उत्तम आहे; पण या व्यापारी भाईची भीड पाळून घेऊन आपले नुकसान का करून घेता ? " मला वाटते या शेअर्सच्या पायी अण्णासाहेबांचे दोन लाख रुपये तरी बुडाले असतील !

पुढे १९२५ साली अशीच पंचवीस हजारांची रकम अण्णासाहेबांनी व्ही. एम. चितळे यांना 'ऑल इंडिया रिपोर्टर' ची पुस्तके छापण्यासाठी कर्जाऊ दिली. चितळे हे अत्यंत हुशार व निस्पृह गृहस्थ होते. त्यांनी एक दोन वर्षांत आपला

इ. स. १९०

जम बसवून आम्हांला आमची रक्कम परत देण्याची तयारी दर्शविली. पण ती रक्कम आम्ही चितळ्यांजवळच ठेवण्याचे ठरविले. मला भीती वाटली की, एवढी रक्कम पुन्हा हातांत आली की, अण्णासाहेब ती कुणा संस्थेस दान देऊन टाकतील, तेव्हा ती चितळ्यांकडेच अडकून असलेली बरी !

पण पुढे मी काही कामानिमित्त सांगलीस गेले असताना माझ्या पश्चात दिवेकर नावाच्या एका गृहस्थाने ही पंचवीस हजारांची रक्कम मोठ्या व्याजाचे आमिष दाखवून अण्णासाहेबांकडून नेली. या गृहस्थाने म्हणे कलकत्त्याच्या बाजूला कोळशाच्या खाणी घेऊन धंदा सुरू केला होता. आपल्या धंद्यासंबंधी मोठ्या गप्पा सांगून त्याने अण्णासाहेबांकडून ही रक्कम घेतली. पुढे नाना सबबी सांगून ते रक्कम फेडण्याचे टाळीत राहिले व एक दिवस आजारी पडून ते वारले ! अशा रीतीने हे पंचवीस हजार रुपये सपशेल बुडाले ! पण त्याबद्दल अण्णासाहेबांना काही विषाद वाटला नाही.

१९०४ साली मी सर्व मुलांसह अण्णासाहेबांबरोबर बनारसच्या काँग्रेसला गेले. अण्णासाहेब स्वतः दर काँग्रेसला जातच, पण आणखी स्वखर्चाने काही तरुण, होतकरू माणसांना स्वदेशसेवेची स्फूर्ती मिळावी म्हणून बरोबर नेत. आमचे कुटुंब, श्री. दादासाहेब खापर्डे व रा. ब. मुधोळकर असे आम्ही सेकंड क्लासचे डबे रिझर्व करून बनारसला गेलो. तेथे एक बंगला भाड्याने घेऊन काही दिवस बिऱ्हाड केले. मुंबईचे प्रख्यात वकील दाजी आबाजी खरे हेही आमच्यात होते. त्या सुमारास स्वदेशी वस्तू वापरण्याचा जोराचा प्रचार सुरू झाला होता. याबाबत वऱ्हाडातही खूप जोरात जागृती करण्याचे वऱ्हाडच्या मंडळीत बेत झाले. आमच्या घरात हे स्वदेशीचे व्रत आम्ही कैक वर्षांपासून सुरू केलेलेच होते. या काँग्रेसच्या अधिवेशनामुळे सर्वांनी स्वदेशी वस्तू वापराव्या याबाबत वऱ्हाडातील स्त्रियांमध्ये जोरात प्रचारकार्य करण्याचा मी निश्चय केला. स्वदेशीचे व्रत पाळण्यात आमच्या मुलांनीही आमच्याशी खुषीने सहकार्य केले. आम्ही स्वदेशी कापड तर गेली कैक वर्षे वापरीत होतो; पण मुलांना लागणाऱ्या लेस, रिबन, चॉकलेट, बिस्किटे, फटाके यांसारख्या वस्तू विलायती घेत होतो. पण याही वस्तू स्वदेशी मिळाल्या तरच आम्ही घेऊ असा आमच्या मुलांनी निश्चय केला.

स्वदेशीच्या व्रतासाठी प्रचार करण्याची कामे आमच्या वनिता समाजातील अनेक स्त्रियांनी आनंदाने स्वीकारली. त्यासाठी उमरावती, अकोला, यवतमाळ येथे स्त्रियांच्या समित्या नेमल्या व त्याबाबत ठिकठिकाणी व्याख्याने देण्यास काही स्त्रिया तयार केल्या. मलाही कुठे कुठे भाषण करण्याचे प्रसंग येऊ लागले. हळूहळू त्याबद्दलचे मुद्दे प्रथम तयार करून न वाचता बोलण्याची मला सवय झाली. पण हा सर्व प्रचार आम्ही गोड शब्दांनी व प्रेमळपणाने केला. “तुम्ही हे केलेच पाहिजे, ते केलेच पाहिजे, न केले तर तुम्ही भ्याड, स्वार्थी....” असली भाषा

आम्ही चुकूनही काढली नाही. हे मी एवढ्याचसाठी मुद्दाम नमूद करीत आहे की, पुढील काळात १९२० व १९३० साली स्वदेशीची पुन्हा मोठी लाट हिंदुस्थानात आली, त्यावेळी सर्वांनी खादी वापरावी असा कॉंग्रेसतर्फे प्रचार सुरू झाला, व विदेशी वस्त्रांच्या होळ्या करिताना जाणाऱ्या-येणाऱ्याच्या टोप्या विदेशी म्हणून जबरदस्तीने हिसकावून होळीत टाकण्याचे प्रकार झाले ! आपले कर्तव्य प्रत्येकाने मनोभावे करावे, त्यात जबरदस्ती नसावी, असे माझे मत आहे. यासंबंधी सहजें आठवली म्हणून एक गोष्ट सांगते.

आमच्या उमरावतीस अंबादेवीचे प्राचीन देऊळ आहे. तेथे दर्शनास जाताना प्रत्येक स्त्रीने खादी नेसूनच आत जावे अशी त्या स्वदेशीच्या चळवळीच्या दिवसात जबरदस्ती करण्यासाठी देवळाच्या बाहेर पिकेटिंग सुरू झाले. त्यात पार्वतीबाई पटवर्धन या म्होरक्या झाल्या, व बायकांची एक टोळी बनवून खादी-शिवाय देवळात जाणाऱ्यांना प्रतिबंध करू लागल्या. मला हा अतिरेक वाटला. माझी प्रकृती त्यावेळी अगदी नीट नव्हती. पायऱ्या चढण्याची मला डॉक्टरांनी मनाई केली होती. पण मला वरील अन्याय्य पिकेटिंगचा प्रतिकार केल्याशिवाय चैन पडेना. मी देवीचे दर्शनास मुद्दाम तलम इंदुरी लुगडे नेसून जायचे ठरविले, व पार्वतीबाई पटवर्धन यांना निरोप धाडिला की, "देवळात जाताना खादीची जबरदस्ती करणे अयोग्य आहे. मला ते बिलकूल पसंत नाही. तेव्हा त्याबाबत विरोध म्हणून मी आज मुद्दाम तलम इंदुरी लुगडे नेसून देवीचे दर्शन करणार. तुम्हांला मला काय प्रतिबंध करावयाचा असेल तो करा !" परंतु त्या माझ्या वाटेस जायला बिलकूल धजल्या नाहीत, आणि मी नेहमीप्रमाणे देवीचे दर्शन घेऊन परत आले.

इ. स. १९०५ मध्ये मला वाटते, कलकत्यास कॉंग्रेस झाली. तिचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. त्या थोर व्यक्तीला पाहिले म्हणजे हा कुणी थोर मुनी या कलियुगात जन्मून लोककल्याण करीत आहे असे मला नेहमी वाटे. यावेळी अण्णा-साहेबांबरोबर मी कलकत्त्यास गेले. बरोबर आमची द्वितीय कन्या कमलाबाई व धाकटा मुलगा बाळासाहेब होते.

कलकत्त्याची कॉंग्रेस फार उत्तम झाली. तेथील थोर राष्ट्रभक्त मंडळींच्या ओळखी अधिक दृढ झाल्या. सतीशचंद्र बोस म्हणून कलकत्त्यास मोठे जमीनदार होते. त्यांच्या घरी आम्ही त्यांच्या अत्याग्रहामुळे उतरलो. त्यांच्या पत्नी इंदुमती यांनी कमलाबाईला बंगाली तऱ्हेच्या साड्या नेसण्यास शिकवावे, व बंगाली पद्धतीचा वेण्यांचा अंबाडा स्वतः घालून द्यावा. ती बंगाली वेषभूषा कमलाबाईस फारच खुलून दिसे. ती त्यावेळी तेराचौदा वर्षांची असेल. मी कमलाबाईस कॉंग्रेस-मंडपात घेऊन जाई, तेव्हा बरेच लोक तिला पाहावयास जमायचे व तिच्याबद्दल चौकशी करायचे. मला आमचे बोससाहेब म्हणाले, "तुम्ही अशा गर्दीत या मुलीला नेत जाऊ नका. तुमच्या महाराष्ट्रातील गोष्ट वेगळी असेल, पण आमच्याइकडे मोठ्या घराण्यातल्या

व अशा सुंदर मुली आम्ही कुणाच्या नजरेस पडू देत नाही." मग मी तिला पुन्हा गर्दीत नेले नाही.

या कलकत्याच्या काँग्रेसनंतर आमचे स्वदेशीचे व्रत अधिकच जोरदार झाले. दर काँग्रेसनंतर अण्णासाहेब देशसेवा करण्याच्या कामात अधिकाधिक मग्न होत. मात्र त्याबद्दल ते मुळींच गाजावाजा करायचे नाहीत. मी पुष्कळदा त्यांना म्हणायची, " तुम्ही पडद्याआड राहून सर्व सूत्रे हलविता, दुसऱ्यांना त्याचा मोठेपणा देता, आणि तुमचे नाव मात्र कुठेच पुढे येत नाही!" यावर ते म्हणत, " हे विचार तुम्ही मनातही आणू नयेत. आपण आपले कर्तव्यकर्म करीत राहण्यात खरा आनंद आहे." तनमनधन अर्पून ते जनसेवा करीत आणि कुणाचा तिळभर पैसा किंवा उपकार कधीही घेत नसत.

१९०५ च्या मार्च महिन्यात आम्ही चि. आबासाहेबाची मुंज केली. अण्णासाहेबांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे मुलाची मुंज थोडक्यात करायची, मिरवणुकी काढायच्या नाहीत, व मुंजीप्रीत्यर्थ एक मोठी देणगी एखाद्या उपयुक्त संस्थेस द्यावी असे त्यांच्या मनात होते. पण त्या काळात कार्ये थोडक्यात करण्याचा प्रघात नव्हता. उलट असल्या कार्याच्या निमित्ताने आपल्या सर्व आप्तेष्टांना अगत्याने आपल्या घरी बोलावून त्यांचा संकलित आशीर्वाद घेतल्याने मुलाचे कल्याण होईल अशा भावना होत्या. आमच्या दादासाहेब चिटणीसांनी आपल्या मुलाच्या मुंजीत मुंजीची व जेवणाची आमंत्रणे केवळ चिठ्यांनी करण्याची प्रथा सुरू केली होती. आम्हीही तीच प्रथा चालू ठेविली. अर्थात् मुंज मात्र चांगली टोलेजंग व्हावी म्हणून आमच्या सासूबाईंनी पुढाकार घेतला, व सर्व धार्मिक विधी आणि मिरवणुकी वगैरे समारंभ थाटाने झाले पाहिजेत असा त्यांनी आग्रह धरला, म्हणून अण्णासाहेबांनी त्यास संमती दिली. मुंजीच्या अगोदर दीडदोन महिने आम्ही मंडप घालण्यास सुरुवात केली. त्या काळात तो माल आयता मिळत नसे व त्याबद्दलचा ठेका पण कुणी घेत नसे. आमच्या निकटची काही आप्त मंडळी आमच्या मदतीस येऊ लागली. आम्ही त्यांच्या उतरण्याची व्यवस्था व समारंभाचे इतर कार्यक्रम ह्याबद्दल योजना ठरविण्यात व्यग्र झालो. अशा वेळीं अचानक एक विघ्न उपस्थित झाले. मुंजीनिमित्त मला मोत्यांचे काही जिन्नस करावयाचे होते, त्यासाठी माल घेऊन माझ्या माहेरच्या नात्यातले बडोद्याचे व्यापारी विनायकराव गाडगीळ, मुंबईचे मोती व्यापारी कृष्णाजीपंत गोखले यांजसह उमरावतीस आमच्याकडे सकाळच्या गाडीने आले. सासूबाईंकडे व माझ्याकडे माल पसंत करण्याचे काम अण्णासाहेबांनी सोपविले. ते अशा गोष्टीत कधी स्वतः लक्ष घालीत नसत. आम्ही माल पसंत करीत असतानाच गाडगीळ यांना भयंकर थंडी भरून आली व मनस्वी ताप चढून खाकेत दुखू लागले. आमच्या धाकट्या बंगल्यात त्यांना उतरविले होते. डॉक्टर येईपर्यंत आम्ही त्यांच्याजवळ बसून होतो.

डॉक्टरनी त्यांना प्लेग झाल्याचे सांगितले. आम्ही लागलीच त्यांच्या घरी तारा केल्या. उमरावतीतील त्या काळातली ती पहिलीच केस होती. त्यामुळे गावात फार खळबळ उडाली. त्यात आम्ही गोऱ्या लोकांच्या वस्तीत राहत होतो. म्हणून इंग्रज सिव्हिल सर्जनने ताबडतोब येऊन पेशंटला गावाबाहेर झोपडीत नेण्यास सांगितले. अण्णासाहेब म्हणाले, "तो माझा पाहुणा आहे; त्याची मायेची माणसे येईपर्यंत मी त्याला इथेच ठेवणार." त्यावर सिव्हिल सर्जन म्हणाला, "मग तुमचे घर क्वारंटाईन करावे लागेल व नंतर त्याचे छत वगैरे जाळावे लागेल." अण्णासाहेब म्हणाले, "ते सर्व सोसण्यास मी तयार आहे." ते स्वतः व त्यांची काही मित्रमंडळी यांनी जिवाची पर्वा न करता त्यांची शुश्रूषा करण्याची कामगिरी सुरू केली. तिसरे दिवशी गाडगिळांचा थोरला भाऊ सीतारामपंत, एक दोन मंडळींसह उमरावतीस बडोद्याहून आला. ती मंडळी फार थोर मनाची व अत्यंत समजूतदार होती. त्यांनी सिव्हिल सर्जनच्या मताप्रमाणे पेशन्टला गावाबाहेरील आमच्या एका स्नेह्याच्या बागेतील झोपडीत नेले. डॉक्टरांनी उपचारांची पराकाष्ठा केली, परंतु आजाराच्या सहाव्या दिवशी पेशन्ट स्वर्गवासी झाले. आपल्या घरी आलेल्या पाहुण्याचा अशा तऱ्हेने अंत व्हावा याचे आम्हांला परमावधीचे दुःख झाले! सिव्हिल सर्जनने त्याच्या मताप्रमाणे आमच्या धाकट्या बंगल्याची व कंपाऊंडची सफाई व शुद्धी केली! पण 'एक महिन्यानंतर तुमची मुंजीची पाहुणी येण्यास हरकत नाही' असे म्हणाला. आता आमचा धाकटा बंगला पाहुणे उतरविण्याच्या स्थितीत नव्हता, म्हणून आम्हांला पाहुण्यांसाठी बऱ्याचशा तंबूंची व्यवस्था करावी लागली

मुंजीचा समारंभ त्या काळच्या पद्धतीप्रमाणे सर्व यथासांग झाला. आमची झोपाळ्यावरची न्हाणी वगैरे सर्व झाले. यावेळी अण्णासाहेबांसाठी सासूबाईंनी उंची जांभळा पीतांबर व जरीचे कामाची हिरवी शाल मुद्दाम काढवून आणून ती त्यांना वापरायला लावली. मग सासूबाई मला म्हणाल्या, "माझ्या मनात गाडगिळांमार्फत तुझ्यासाठी मोठ्या मोत्यांचे काप व मुंजा मुलासाठी मोती-पाचूंची कंठी करायचे फार होते. पण काय करणार, तो एक घोटाळाच होऊन बसला!" तो काय योगायोग पहा, त्या असे म्हणताहेत तोच यमूताई चिटणीस व आमच्या फार बरोब्याच्या सावित्रीबाई ओक ह्या आल्या, व सावित्रीबाईंनी त्यांची पाचू-मोत्यांची कंठी मुंजा मुलास समारंभात वापरण्यास आणली व यमूताईंबरोबर लक्ष्मीबाई भोळे, आमच्या फार स्नेहातल्या बाई, यांनी त्यांचे मोठाले मोत्याचे काप मला चार दिवस घालण्यास म्हणून आपण होऊनच धाडिले. मला ते वापरण्याचा भारीच संकोच झाला, कारण मला दुसऱ्याच्या वस्तू वापरणे मुळीच आवडत नसे. पण त्या बायकांनी फारच आग्रह केला व सासूबाईही म्हणाल्या, "त्या तुझे एवढे कौतुक करताहेत तर घटकाभर त्या वापरून त्यांना परत दे." माझे हृदय त्यांच्या सर्वांच्या प्रेमळपणाने इतके भारावून गेले की मला त्यांचा शब्द मोडवेना, व म्हणूनच मला



उमरावती येथील सौ. यशोदाबाई जोशी यांचे आवडते निवासस्थान व घोड्याजोडीची चौचाकी गाडी.

इथे ते लिहावेसे वाटले. मिरवणुकीसाठी मी पुण्याहून नव्या अब्दागिरीची जोडी करवून आणली. जोशांच्या घराण्यात पूर्वी अब्दागिरीचा मान होता म्हणे ! मुलासाठी फार उंची गुलबक्षी मखमल व त्यावर भारी जीग काम, असा पोषाख करविला. पहिली भिक्षावळ देताना मी दोन लाडू हातात घेऊन " देशाला स्वतंत्र करण्याचे बाण हाती देत आहे ते घे " असे मुलास म्हटले. त्यावर गावात फार चर्चा झाली म्हणे !

चि. आबासाहेबाबरोबर मंडपातच आम्ही अकरा धर्ममुंजी केल्या. मुंजे मुलगे व त्यांचे आईबाप यांना प्रत्येकी अडीचशे रुपयांच्या देणग्या दिल्या. त्यावर कित्येकांनी ' फार उत्तम केले ' असे म्हटले, तर कित्येकांनी टीकाही केली की, " पैसे भरून मुलाचे आईबाप भुलवून, त्यांच्या मुलांच्या मुंजी केल्या ! नाही तर या सुधारकांकडून कोण उपकार घेणार ? " जग हे असे आहे. कसेही वागा, ते टीकास्त्र सोडणारच !

याप्रमाणे आबासाहेबाची मुंज सर्व अडचणींचे निवारण होऊन चांगल्या तऱ्हेने पार पडली. सुधारकांच्या घरी धार्मिक विधी करण्यास जायचे नाही, त्यांवर ग्रामण्य पुकारायचे, ह्या उमरावतीतील ब्रह्मवृंदांच्या अडवणुकीमुळे आमचे काहीच नडले नाही. काशीकडील एक विद्वान शास्त्री व आमचे वाईचे उपाध्ये यांनी येऊन सर्व काही यथासांग केले. खऱ्या ब्राह्मणवृत्तीच्या ब्राह्मणांकडून हे सर्व घडले ह्याचे मला अत्यंत समाधान वाटले. पण या समाधानाचा आनंद मला फार दिवस लाभला नाही असेच म्हणावे लागते. कारण मुंजीनंतर लवकरच पुण्यास आम्हांला, अण्णासाहेबांकडूनच्या एका निकटच्या आप्ताकडील मुलीच्या लग्नाला जावे लागले. तिथे सुधारक म्हणून आमचा बराच पाणउतारा केला गेला, त्यामुळे माझे मन बरेच उद्विग्न झाले. ती हकीकत मुद्दामच नमूद करते. कारण त्यामुळे आमचेपुढे अनेक वेळा मानसिक स्वास्थ्य नाहीसे करणारे प्रसंग कसकसे येत, ह्याचे एक दृश्य दिसेल. पुण्यास आम्ही लग्नघरी न उतरता आमच्या नेहमीच्या ठिकाणी, विष्णु सदाशिव कंपनी यांजकडे उतरलो. लग्नसमारंभ आटोपून आम्ही पुढे महाबळेश्वरी जाणार होतो. मी अण्णासाहेबांना म्हटले, " आपण दोघेच लग्नाला जाऊ, मुलींना बरोबर नको न्यायला. या पुण्यात लोक आमच्या मुलींकडे टीका करण्याच्या दृष्टीने फार बघतात. कुणी उघड बोलतात, ' म्हणे या मुलींना विद्यासंपन्न करणार आहेत मुलग्यांसारखे '; ' यांची म्हणे लग्नेच करणार नाहीत '; ' यांची नाकेच टोचलेली नाहीत '; ' यांची वये चोरली आहेत '; ' खिश्चनांसारखे पोलकेच घालतात ' अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टी बोलतात. मला स्वतःला तसे कुणी बोलले तर ते मी सोसून घेते, पण माझ्या मुलींना ऐकू येईल अशा तऱ्हेचे बोलणे माझ्या जिव्हाळी लागते." त्यावर अण्णासाहेब म्हणाले, " ह्या बोलण्यांकडे दुर्लक्ष करायला तुम्ही आता शिकले पाहिजे. असली बोलणी ऐकायची मुलींनाही थोडी थोडी सवय झाली तर काय हरकत आहे ? " वगैरे. मी मग मुलींना घेऊन त्या लग्नाला गेले. रीतीप्रमाणे

आम्ही लग्नघरच्या बायकांना हळदीकुंकू वगैरे देण्याच्या मदतीस लागलो. लग्न होऊन विहिणींची पंगत बसली. अशा वेळी मी तूप वाढण्याची मदत करी, कारण त्यात सोवळ्याओवळ्याचा प्रश्न उद्‌भवत नसे. इतक्यात वधूमातेने विहिणींच्या पंगतीत मुख्य विहिणीजवळ माझ्या मुलींसह मला आग्रहाने नेऊन बसविले. मी 'नको नको' म्हणतच्च होते. वरणभात वाढणे सुरू झाले, तो वधूमातेच्या सासूबाई तेथे आल्या व मला म्हणतात, "अग, तू इथे कशी बसलीस? तुम्ही सर्व सुधारक, बिनप्रायश्चिताची, तुम्ही आमच्या विहिणींच्या पंगतीस मुळीच नको. उठा उठा इथून लवकर व मागून आपल्या मुलींसह दुसरीकडे जेवा." असे म्हणून त्यांनी मला भर पंक्तीतून उठवली! मला त्यावेळी इतके तोंडात मारल्यागत झाले म्हणून सांगू! मी मुलींना घेऊन लागलीच बाहेरच्या बैठकीत गेले! पंगतीतल्या सगळ्या बायका आमच्याकडे टकमका बघतच राहिल्या! मला अपमान व संतापातिरेकाने रडू येऊ लागले, पण माझ्या मुलींना ते दिसू नाही म्हणून मी ते सर्व जसे गिळून टाकले! मला वाटले, त्याच पावली घरी निघून जावे; पण अण्णासाहेबांना ते आवडले नसते ह्या जाणीवेने मी गप्प बसले व मनाशी निश्चय केला की, पुन्हा या लग्नघरी पाय ठेवायचा नाही! पण अण्णासाहेबांना माझी विचारसरणी पसंत पडली नाही. ते म्हणाले, "अज्ञानामुळे ते लोक तुमच्याशी तसे वागले. अपकाराची फेड गोडीनेच नेहमी करावी. त्यामुळे ह्या लोकांची मने शुद्ध होतील..." व सांगण्यास कारण की, अण्णासाहेबांनी मला दुसरे दिवशी आपल्याबरोबर पुन्हा त्या लग्नघरी जायला लावले व अगोदर बजावले की, "कालच्या प्रकाराबद्दल लग्नघरी कुणालाच काही ओळख देऊ नका. तिथे सर्वांशी प्रेमाने वागा." मी मुलींना मात्र दुसरे दिवशी माझ्याबरोबर नेले नाही.

१९०६ साली दिवाळीच्या दिवसांत एक विशेष प्रसंग घडला. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री आम्ही अकरा वाजेपर्यंत जागत बसलो होतो. आमचे नोकर कंपाउंडात ढोलक्यावर गाणी म्हणत बसले होते. इतक्यात बारा वाजण्याच्या सुमारास "धावा धावा, दरोडा पडला" अशा ओरडण्याने आम्ही जागे झालो. आमच्या बंगल्याच्या टेकाडाखाली मोर्शी रस्त्यावर गोपाळराव बापट सबजज्ज राहत होते, त्यांच्याकडे दरोडा पडला होता! अण्णासाहेब दुबारी बंदूक घेऊन धावतच खाली आले आणि त्यांनी नोकरांना लाठ्या घेऊन बापटांचे घरी जाण्याचा हुकूम दिला. इतक्यात मी त्यांना म्हटले, "तुमचे छोटे सातबारी पिस्तुल इथे ठेवून जा. सगळे नोकर तुम्ही बापटांकडे दवडलेत. ते चोर इथे आले तर मी एकटी काय करणार?" पिस्तुल माझ्या हाती देऊन ते वेगाने बापटांचे घराकडे निघून गेले. मी एकटी, माझे दोन लहान मुलगे आणि धाकट्या मुली व घरांत नुकताच ठेवलेला आचारी गोपाळ मोडक, इतकेच राहिलो. लक्ष्मीपूजन म्हणून आम्ही पाचपन्नास हजारांचा माल तिजोरीतून बाहेर काढून ठेविला होता. तो सर्व एका पेटीत भरून ती पेटी गोपाळ मोडक याचेजवळ

देऊन मी म्हटले, " ही पेटी घेऊन तू घराच्या टॉवरवरील खबदडीत लपून बस. मी बोलावीन तेव्हा बाहेर ये ! " गोंधळलेल्या मनःस्थितीत माझ्या हे ध्यानी आले नाही की, एका नवीन माणसाच्या हाती आपण एवढे मोठे डबोले देऊन बसलो आहो ! मग मी मुलांना खोलीत बसवून स्वतः दारात पिस्तुल घेऊन उभी राहिले !

सुमारे दोन तासांनंतर काही नोकर परत आले. बंदुकीचे बार ऐकून दरोडेखोर हाती आला तेवढा माल घेऊन पळून गेल्याचे समजले. ते गेल्यावर पुष्कळ मंडळी जमा झाली, पोलिसही आले व जबान्या घेण्याचे काम सुरू झाले. बापटांना डोक्यावर बराच मार बसला होता. चांगले उजाडल्यावर अण्णासाहेब बापटांच्या घरून परत आले. त्यांनी बापटांच्या लहान मुलांना आमच्याकडे आणले व त्यांच्या घरातल्या मंडळींना शेजारधर्म म्हणून जी करावयाची ती सर्व मदत केली. पुढे तीनचार वर्षांनी ते दरोडेखोर ग्वाल्हेरच्या बाजूस सापडले म्हणतात, पण त्यांजवळ फारसा माल मिळाला नाही. त्यावेळी त्यांनी पोलिसांना सांगितले म्हणे की, " आमचा पहिला बेत मोरोपंत जोशांच्या बंगल्यावर दरोडा घालायचा होता. पण तेथे त्या दिवशी खूपशी माणसे डफावर गाणी म्हणत बसली होती, म्हणून ऐन वेळी तो बेत रद्द करून आम्ही बापटांच्या बंगल्यावर गेलो ! " आमच्या घरावरचे मोठेच संकट टळले म्हणायचे ! आणि नवा नोकर गोपाळ मोडक मी त्याच्या हाती दिलेले डबोले घेऊन त्या रात्री पळाला नाही, ही सुद्धा केवढी ईश्वराची कृपा !

या वर्षी आमचे डॉक्टर वासुदेवराव भट यांच्या पत्नी चिमूताई क्षयाने आजारी झाल्या. त्यात त्यांना दिवस गेले होते. अण्णासाहेब त्यांना बहिणीप्रमाणे मानीत असत. म्हणून स्वच्छ हवेसाठी डॉ. भटांच्या सांगण्यावरून त्यांनी चिमूताईंना आमच्या धाकट्या बंगल्यात आणून ठेविले. अशा स्थितीत एप्रिल महिन्यात चिमूताई प्रसूत झाल्या व त्यांना मुलगा झाला. बाळंतपण मलाच करावे लागले. चिमूताई मला म्हणाल्या, " हा मुलगा प्रथम तुमच्या हातात आला आहे. आता तुम्हीच त्याची आई बरे का ? " ते ऐकून माझ्या डोळ्यांना पाणी आले. मी त्यांना धीर दिला. पण त्यानंतर त्यांची प्रकृती अधिकच बिघडत गेली. मे महिन्यात आम्ही महाबळेश्वरी गेलो असताना त्या वारल्याचे कळले !

जूनअखेर आम्ही उमरावतीस परत आलो. तो डॉ. भट आमच्याकडे येऊन म्हणाले, " माझ्या मुलाची त्याच्या आजोळी बरोबर जोपासना होत नाही. तुम्ही त्याला तुमच्या घरी ठेवा. त्याला दूध पाजण्यासाठी चांगली दाई मिळाली आहे. " आम्ही तत्काळ यास संमती दिली. मुलाचे नांव ' विश्वनाथ ' होते, पण मी त्याला ' छबू ' म्हणायची. काय त्या मुलाची स्थिती होती म्हणून सांगू ! मुडदुस झालेला, सगळ्या अंगावर सुरकुत्या पडलेल्या, पोट मोठे आणि हातपाय आखडलेले ! मला या मुलाची भारी दया येई. माझ्या स्वतःच्या मुलांचे केले नाही इतके मी त्याचे केले. तो आठ वर्षांचा होईपर्यंत आमच्याकडे राहिला.

त्याचा व त्याच्या दाईचा सर्व खर्च आम्हीच केला. तो मुलगा अद्यापि माझ्यावर अत्यंत प्रेम करतो. पूर्वऋणानुबंधाच्या या गोष्टी आहेत !

१९०७ साली कॉंग्रेस सुरतेस झाली. त्यावेळीं मी अण्णासाहेबांबरोबर जाऊ शकले नाही. त्यांच्याबरोबर या खेपेस माझी ज्येष्ठ कन्या ताई व तृतीय कन्या माणिक या गेल्या होत्या. तेथे कॉंग्रेसमध्ये दुफळीं झाली, भांडाभांडी, खुर्च्यांची मारफेक वगैरे सर्व गोंधळ झाला, हे सर्वश्रुतच आहे. तेथून सर्व मंडळीं उद्विग्न मनाने घरोघर परतली. अण्णासाहेब एरव्ही कोणत्याही परिस्थितीत निराश होऊन बसलेले मी पाहिले नाहीत. पण त्यावेळीं मात्र सुरतेहून परत आल्यावर ते मला फारच खिन्न दिसले. अर्थात त्याबद्दल उद्वेगाचे किंवा रागाचे उद्‌गार त्यांनी कुणाही-जवळ काढले नाहीत. "ईश्वरी संकेताप्रमाणे सर्व घडत असते; कर्तव्य करीत राहणे हे माणसाचे काम आहे—फळ मिळणे ईश्वरेच्छेवर आहे." अशा तऱ्हेचे उद्‌गार मात्र त्यांच्या तोंडून वारंवार निघत. पण यानंतर बरीच वर्षे ते कॉंग्रेस अधिवेशनास गेले नाहीत. पुढे १९१५ साली मुंबई कॉंग्रेसमध्ये एकी होण्याचा योग होता. परंतु तेथेही फारशी एकी झाली नाही. यानंतर मात्र ते कॉंग्रेसला गेलेच नाहीत. त्यांनी आपली इतर लोकोपयोगी कामे पूर्ववत चालू ठेविली.

या वर्षी आमच्या घरात मात्र दोन आनंदाच्या गोष्टी घडल्या. आमची थोरली कन्या ताई एल्. एम्. ॲंड एस् या डॉक्टरीच्या शेवटच्या परीक्षेत पास झाली. इतकेच नव्हे तर ती पहिली आली, व तिला दोन सुवर्णपदके मिळाली. आज इतकी वर्षे अनेक तऱ्हेचे लोकापवाद सहन करून मुलीला मुलाप्रमाणे शिक्षण देण्याचा जो हेतू आम्ही मनात धरला होता, तो अशा रीतीने उत्तम प्रकारे फलद्रूप झाला, ही खरोखर ईश्वराचीच कृपा ! योगायोग असा की त्याच दिवशी आमची द्वितीय कन्या कमलाबाई मॅट्रिक झाल्याचे कळले ! ताई त्यावेळीं मुंबईतच होती. ती पास झाल्याबद्दल मुंबईचे प्रसिद्ध डॉ. राव यांची अभिनंदनाची तार आम्हांस प्रथम आली; व मग अनेकांकडून अशा तारा आल्या !

माझ्या दोघी मुली एकाच दिवशी पास झाल्याचे कळले, आणि आपल्या अंतर्यामीच्या इच्छेची पूर्तता झाली या विचाराने त्यावेळीं मला इतका आनंद झाला की, तो माझ्या मेंदूच्या शक्तीबाहेर जाऊ लागला. मी पुन्हा पुन्हा अण्णा-साहेबांजवळ मुलींच्या यशाबद्दल बोलू लागले. तेव्हा अण्णासाहेबांनी मला ताबडतोब एकीकडे नेऊन सांगितले, "आनंदाच्या वेळींही मन शांत व समतोल ठेवले पाहिजे. आपल्या मुलांचे कुणाजवळ कौतुक सांगत बसायचे नाही. या व्रताच्या कसोटीची आजची वेळ आहे." मग मी एकटीच एका खोलीत बसून ईश्वराचे धन्यवाद मानीत बसले. गावातील बरीच मंडळी आमचे अभिनंदन करण्यास एकसारखी येत होती. पण मी मात्र माझे मन पुरते स्थिर होईपर्यंत कुणाला भेटले नाही.

आता पुढील उच्च शिक्षणासाठी ताईला विलायतेस धाडायचे व कमलाबाईला

पुण्यास फर्ग्युसन कॉलेजात ठेवायचे या गोष्टींचा विचार आमच्या घरात सुरू झाला. माझ्या दोन्ही मुली माझ्यापासून दूर जाणार या चिंतेने माझे मन फार बेचैन होऊ लागले. गावात मुलींच्या अभिनंदनार्थ किती तरी पार्ट्या झाल्या. उमरावतीच्या स्त्रियांनी जाहीर सभा भरवून त्यांचे अभिनंदन केले, व ताईला एक मानपत्रही दिले. पण खरेच सांगते, माझे मन माझ्याच चिंतेत चूर राहिले !

१९०७ च्या जानेवारीत कमलाबाईला पुण्यास फर्ग्युसन कॉलेजात घातले. त्याकाळी तेथे फारच तुरळक मुली होत्या. तिच्या वर्गात तर तीनच मुली होत्या. माझ्या मनात तिला मुंबईस ठेवायचे होते. पण पुण्याची हवा चांगली व कॉलेजचे प्रिन्सिपॉल रँ. परांजपे हे आमचे स्नेही, तेव्हा त्यांच्या आग्रहावरून आम्ही तिला त्यांच्याच कॉलेजात धाडण्याचे ठरविले. ते पुण्यातले कॉलेज, आणि एका सुधारकाची मुलगी तेथे जाऊ लागली, म्हणून त्या कॉलेजात फारच कुतूहल वाटले. कमलाबाई कॉलेजात जाऊ लागली की दुतर्फा मुलांनी उभे राहून तिला ऐकू येईल इतक्या मोठ्याने "ती पहा कालिदासाची शकुंतला आली !" किंवा अशाच तऱ्हेची दुसरी वाक्ये आपसात बोलावी ! ती बिचारी फारच गोंधळून जाई. अण्णासाहेब तिला वारंवार उपदेशपर पत्रे लिहीत की, "तू मुळीच घाबरत जाऊ नकोस. आपण नेहमी आपल्या सरळ मार्गाने जावे. मग आपली कोणी खोडी काढू शकणार नाही." पुण्यास कँपात एक लेडीज सोशल क्लब होता. तेथील काही मोठ्या पारशी बायका महाबळेश्वरी माझ्या मैत्रिणी झालेल्या होत्या. तेव्हा मी कमलाबाईस त्या क्लबाची सभासद केले. पण तेथील वातावरण तिला फारसे रुचले नाही, म्हणून ती क्वचितच तेथे जाई. गावातील आमच्या आप्तेष्टांकडे मात्र मी बरोबर असल्याशिवाय ती जात नसे. कारण विनाकारण नसत्या चौकशा करण्याची त्यांची प्रवृत्ती ती जाणून होती. कमलाबाईसाठी पुण्यास एक बंगला, स्वतंत्र व्हिक्टोरिया गाडी व दोन विश्वासू नोकर आम्ही ठेविले होते.

१९०७ च्या एप्रिल ७ तारखेस 'मॅसेडोनिया' या बोटीने ताईचे उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी नामदार गोखले यांच्या सोबतीने विलायतेस जाण्याचे ठरले. तिला एकटीला विलायतेस शिक्षणासाठी ठेवायची याबद्दल कितीही विचार केला तरी माझे मन कच खाऊ लागले. पण या शिक्षणाने तिचे कल्याण होणार हा एकच विचार मनात ठेवून मी माझ्या काळजीबद्दल अण्णासाहेबांजवळ देखील काही बोलले नाही. तिचे लग्न करून मग तिला विलायतेस पाठवावे, ही एक कल्पना मात्र मी अण्णासाहेबांपुढे मांडली. पण "शिक्षण पूर्ण होईपर्यंत लग्न करायचे नाही, शक्य तो अविवाहित राहून जनसेवा करायची, असा आपला निश्चय आहे." असे ताईने आम्हांला सांगितले व मग आम्हीही तिला लग्न करण्याचा आग्रह केला नाही.

अण्णासाहेब रोज तिला आपल्याबरोबर फिरायला नेत व परदेशात धैर्याने व स्वाभिमानाने राहण्याबाबत तिला धीर देऊन उपदेश करीत. अण्णासाहेबांची

मुलींवर विशेष ममता होती व त्या बाबतीत त्यांचे मन फार हळवे होते. पण वर-वर ते तसे कधी दाखवीत नसत. अगदी आम्ही दोघेच बोलत असलो म्हणजे आम्ही आमच्या मुलांमुलींबद्दलचे कौतुक एकमेकांना सांगायचे. त्यावेळीं अण्णासाहेब म्हणायचे, “ आपण आपल्या दोघांत मुलांची वाटणी करू. मुलगे तुमचे आणि मुली सगळ्या माझ्या ! ”

बघताबघता ताई विलायतेस जाण्याची तारीख जवळ आली. आम्ही सर्वजण तिला पोचवायला मुंबईस गेलो. मुंबई, पुणे व उमरावती येथील आमचे अनेक आप्त व स्नेही ताईला निरोप देण्यासाठी जमले होते. आमचे दादासाहेब चिटणीस व त्यांची मुलगी माई हीही आली होती. मी मात्र ताईला बोटीवर पोचविण्यास गेले नाही. कारण तेथे कोणी डोळ्यांतून पाणी काढायचे नाही असे अण्णासाहेबांनी आम्हांस बजावले होते ! मला घरी सोडून बंदरावर जाताना मात्र ताईला व मला फारच अवघड वाटले. पण मी मन घट्ट केले. मुलांच्या सुखासाठी आईबापांना अनेक प्रकारे स्वार्थत्याग करावा लागतो. या स्वार्थत्यागाची गोड फळे लाभली म्हणजे मनाला अवर्णनीय संतोष होतो. ताई विलायतेस सुखरूप पोचल्याची तार येईपर्यंत मात्र आमचे मन फारच टांगल्यासारखे झाले होते.

ताईची विलायतेस पोचल्याची तार येऊन मन अंमळ स्वस्थ होते न होते तो आमचे परम मित्र दादासाहेब चिटणीस हे त्यांच्या मूळ गावी (बोरगाव–सातारा जिल्हा) एकाएकी अत्यवस्थ झाल्याची बातमी आली. त्यांच्या पत्नी यमूताई नुकत्याच त्यांच्या माहेरी कोकणात गेल्या होत्या. त्यांची मुलगी माई माझ्याजवळच होती. तिला बरोबर घेऊन अण्णासाहेब ताबडतोब बोरगावास गेले. त्या खेड्यात चांगला डॉक्टर आणण्यापूर्वीच दादासाहेब स्वर्गवासी झाले ! त्यांची व अण्णा-साहेबांची पाचसहा तासच गाठ पडली. दादासाहेबांनी मृत्यूला फार धैर्याने तोंड दिले. अण्णासाहेबांनी त्यांना विचारले, “ मी तुझ्यासाठी काय करू ? ” त्यांनी उत्तर दिले, “ तू आहेसच; तेव्हा मला माझ्यामागे कुणाची काही एक काळजी नाही. ” शेवटी एकदा ‘ God Save India ’ असे म्हणून गीतेचे श्लोक म्हणत म्हणत त्या पुण्यात्म्याने देह सोडला.

ताईची विलायतेहून नेमाने सविस्तर पत्रे येत. नामदार गोखले हे तिच्या-बरोबरच विलायतेस गेले होते व त्यांनी तिची उत्तम व्यवस्था लावून दिली. पण लंडन येथे सर्व व्यवस्था लागायला सहा महिने लागले. तोंवर आयर्लंडमधील रोटंडा हॉस्पिटलमध्ये एल्. एम्. ची डिग्री मिळत असे, तेथे तिला धाडण्यात आले. गोखले यांनी अनेक मोठमोठ्या मंडळींशी तिच्या ओळखी करून दिल्या. त्यांत विशेष उल्लेखनीय म्हणजे प्रसिद्ध कायदेपंडित मि. पोलक, सर जगदीशचंद्र बोस, प्रसिद्ध लेखक रमेशचंद्र दत्त, मिसेस पी. के. राय इत्यादी मंडळी होती.

१९०७ सालच्या दिवाळीनंतर मला एक दिवस एकाएकी छातीत खूप

धडधड होऊन झीट आल्यासारखे झाले. दरवर्षीप्रमाणे दिवाळीत मी बरेचसे फराळाचे केले, त्याचा ताण हृदयक्रियेवर पडून हा झटका ( Heart attack ) आला आहे, असे डॉ. भट यांनी निदान केले व पुढे सहा महिने मला बिछान्यात निजून राहण्यास सांगितले. तरी मधूनमधून मला हा झटका येई. १९०० साली माझ्या गळ्याला 'गॉयटर' ची गाठ झाली होती, ती हळूहळू वाढून त्याचा हृदयावर दाब पडून हे हृदयाचे झटके येत आहेत, असे डॉ. भटांनी मला सांगितले.

मार्च १९०८ मध्ये मी मुलांसह महाबळेश्वरी गेले. निजूननिजून व खुर्चीतून उचलून मला आगगाडीचा प्रवास करावा लागला. त्यावेळीं तेथे जाण्यास भाड्याच्या मोटारी मिळत नसत. दोन घोडे व दोन खेचरे जोडलेल्या चारचाकी गाडीतून–तिला फैटण म्हणत–वाठार स्टेशन ते महाबळेश्वरपर्यंत जावे लागे. महाबळेश्वरच्या वातावरणात माझी प्रकृती भराभर सुधारत गेली. शिवाजीमहाराजांच्या संचाराने पावन झालेले ते डोंगर व दऱ्या मला नेहमीच आल्हाददायक व स्फूर्तिदायक वाटत. या वर्षी अण्णासाहेबांनी माझ्यासाठी आमची उमरावतीच्या गाडीची घोडेजोडी व मोतद्दार रामबक्स व गणेश यांना मुद्दाम महाबळेश्वरी आणले होते. मी रोज या गाडीत बसून फिरावयास जाई. त्यावेळीं माझ्या आवडीची सर्व स्थाने पाहताना मी माझा आजार पार विसरून जाई. जून महिन्यात महाबळेश्वराहून पुण्यास परत येईपर्यंत मी घरातल्या घरात चांगली हिंडूफिरू लागले.

१९०८ मध्ये कमलाबाई फर्ग्युसन कॉलेजातून प्रीव्हियसची परीक्षा उत्तम तऱ्हेने पास झाली. इंग्रजीत तर ती पहिली आली. पण त्या वेळच्या पुण्याच्या वातावरणाला ती फार कंटाळली. ती म्हणू लागली, " हे पुण्याकडचे लोक कसे पडद्याआडून शालजोडीतील टोमणे देऊन बोलतात! आपल्या वऱ्हाडातील लोकांप्रमाणे सरळ, दिलदार वागणे इथे नाही. मला तुम्ही मुंबईच्या कॉलेजात ठेवा. मुंबईत ताईला काही त्रास झाला नाही." माझ्याही मनात तिला प्रथमपासून मुंबईसच ठेवायचे होते. तेव्हा जानेवारीपासून एप्रिलपर्यंत ताईप्रमाणे तिला प्रथम हरि सीताराम दीक्षित सॉलिसिटर यांजकडे ठेविली. तेथून ती एल्फिन्स्टन् कॉलेजात जाऊ लागली. अण्णासाहेब पूर्वी त्याच कॉलेजात होते. उन्हाळ्याच्या सुटीनंतर मात्र आम्ही कमलाबाईसाठी गिरगावात एक चांगलीशी जागा भाड्याने घेऊन वेगळे बिऱ्हाड केले. तिच्याजवळ कृष्णा बावा आचारी व लिंगू मोलकरीण यांस ठेवले.

त्याच वर्षी दिवाळीच्या सुटीसाठी कमलाबाई उमरावतीस आली. या खेपेस ती इंटरमिजिएटच्या परीक्षेस बसणार होती. पण परीक्षेपूर्वी सातआठ दिवस तिला ताप भरला. चारपाच दिवस झाले तरी ताप उतरेना! डॉ. भट यांचे उपचार सुरू होते. सातव्या दिवशी ताप उतरला. पण तिला अतिशय अशक्तता आली व पूर्ववत शक्ती येण्यास दोन महिने लागले. अर्थात तिला इंटरमिजिएट परीक्षेस बसता आले नाही.

मला वाटते १९०९ मध्ये उमरावतीस पहिली मराठा परिषद झाली. बडोद्याच्या महाराजांचे बंधू श्री. संपतराव गायकवाड हे परिषदेचे अध्यक्ष होते. ते व त्यांच्याबरोबर बडोद्याची आठदहा मोठी मोठी मंडळी–अधिकारी व सरदार–आली होती व ती सर्व आमच्याच मोठ्या बंगल्यात उतरली होती. आम्ही स्वखर्चाने त्यांचा सर्व पाहुणचार केला. संपूर्ण वऱ्हाडात या परिषदेबद्दल फारच उत्सुकता निर्माण झाली होती. त्या काळीं वऱ्हाडात ब्राह्मणब्राह्मणेतर ही भावना मुळींच नव्हती. ब्राह्मण मंडळींनीच पुढाकार घेऊन ही परिषद घडवून आणली होती. अण्णासाहेबांस तर तेव्हा सर्वांनी फारच मान दिला. या परिषदेत अण्णासाहेबांच्या उपदेशामुळेच त्यांचे स्नेही महादेव शंकर देशमुख दर्यापूरकर यांनी " मी माझा मुलगा रामराव यास उच्च शिक्षणासाठी विलायतेस पाठविण्यास तयार आहे." असे जाहीर केले. ही परिषद वऱ्हाडभर गाजली. आमच्या घरी उतरलेली पाहुणी तर फार खूष होऊन बडोद्यास परतली. त्यापैकी एक मोठे अधिकारी श्री. खासेराव जाधव यांनी आमची मैत्री शेवटपर्यंत कायम ठेविली.

यानंतर मार्च (१९१०) अखेर आम्ही दरवर्षीप्रमाणे महाबळेश्वरी गेलो. ह्या वर्षी आम्ही आमच्याकडे दरवर्षीप्रमाणे पुष्कळ पाहुणे बोलाविले. आपल्याप्रमाणे आपल्या आतेष्टांनाही महाबळेश्वरच्या हवेचा लाभ व्हावा, व त्यांचे स्नेहसंबंध अधिक दृढ व्हावे, अशी आम्हा दोघांनाही आवड होती. पण ह्या खेपेस जास्तच पाहुणी आली–इतकी की आम्ही तरतूद करून ठेवलेली अंथरुणे पांघरुणेही आठपंधरा दिवस कमी पडली. त्यावेळीं हे सामान महाबळेश्वरी भाड्याने फारसे मिळत तसे. मग आम्ही आमच्या स्वतःच्या गाद्या पांघरुणे पाहुण्यांना दिली व आम्ही ओव्हरकोट व जुनी लुगडी अंथरून त्यावर निजलो. पण त्यावर्षी आमच्या घरी सर्वजण फारच खेळीमेळीने राहिली. आमच्या पाहुण्यांत रामभाऊ चांदोरकर म्हणून एक फार विनोदी गृहस्थ होते. ते मला म्हणाले, " अहो मला लोक विचारतात की, ह्या बंगल्यात माणसांची ये जा इतकी आहे की, इथे कुणी राजा राहतो की, एखादे हॉटेल बिटेल आहे ? " आमच्या घरातल्या सर्व मंडळींनी आणखी मित्रमंडळी जमवून रोज खूप लांब लांब फिरायला जायचे.

अशा मजेत दिवस जात असता आमच्याकडे एक नवीनच अकल्पित गोष्ट सुरू झाली. ती आम्हांला प्रथम फार गुप्तपणाने सुरू करावी लागली. अण्णासाहेबांना त्यांचे एक मित्र सहज म्हणाले, " अहो, सांगली संस्थानचे अधिपती लग्नाचे आहेत. त्यांना फार सुंदर मुलगी हवी आहे. तुम्ही तुमची कन्या कमलाबाई हिच्यासाठी त्या ठिकाणी का नाही खटपट करीत ? हा मुलगा फार गुणी आहे. हे स्थळ तुम्ही दवडू नका ! " काय असेल ते असो, अण्णासाहेबांना त्यावेळीं ही गोष्ट रुचली. ते मला एकीकडे नेऊन म्हणाले, " हा मुलगा मिरजेच्या अधिपतींचा

सख्खा पुतण्या, सांगलीच्या गादीवर दत्तक झाला आहे. तो राजकुमार कॉलेजात शिकलेला आहे व तेथे त्याचे हुषारीबद्दल फार चांगले नाव आहे असे ऐकतो. मी माझ्या चार मित्रांकडे चौकशी करून हा मुलगा खरोखरीच चांगला असेल तर पुढे खटपट करितो. आपली कमला नाजूक आहे, व अभ्यासाचा ताण तिला फारसा झेपत नाही. आपल्याला मुलींना काही नोकऱ्या मिळविण्यासाठी शिक्षण द्यायचे नाही. लग्नानंतरही जरूर तर तिला विद्या वाढविता येईल. कमलाला अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत. मुलींची उशीरा लग्ने करण्याचा आपण केलेला संकल्प पुरा झाला आहे. तेव्हा हा सांगलीकर मुलगा उत्तम असल्यास याच पदावर जाण्यास कमलाबाई योग्य आहे. सध्या मात्र याबद्दल काही कुणाजवळ बोलू नका. मला प्रथम सर्व चौकशी करू द्या. तुमचा रुकार असेल तर मी यात पडेन." आम्ही दोघांनी यावर आपसात पुष्कळ विचार केला, व या तरुण अधिपतींची संपूर्ण चौकशी केल्यावर मगच कमलाबाईजवळ त्यासंबंधी बोलावे असे ठरविले. अर्थात ताईच्या लग्नाचा विचार ती विलायतेहून परत येईपर्यंत तिच्याच इच्छेवरून बाजूला ठेविला होता. ताईच्या लग्नाचा विषय काढला की अण्णासाहेब नेहमी म्हणायचे, "मुलगी मिळवती झाल्याशिवाय तिला खरी स्वतंत्रता मिळणार नाही. आता समाजाची घडी बदलत जाणार आहे. बायकांनाही पुरुषांप्रमाणे आपला चरितार्थ चालविण्यास स्वतः काम करून पैसा मिळवावा लागणार आहे!" मला त्यांचे हे विचार अगदी आवडत नसत. मला उगाचच वाईट वाटे. मनात येई की, "म्हणजे यापुढे मुले आईबापांच्या छत्राखाली न वाढता यंत्राच्या साच्याप्रमाणे वाढायची की काय? मुलाबाळांना नोकरांवर सोपवून बायकांनी बाहेर जाऊन नोकऱ्या करणे मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरेल काय? प्रत्येक कुटुंब सौख्य व शांतीचे आदर्श व्हावे यासाठी माणसांची धडपड असते. बायकांनी घरे सोडून एवढा थोरला वेळ नोकऱ्यांवर बाहेर घालविला, तर या सर्व धडपडीचा उपयोग काय?" अशा तऱ्हेचे विचार माझे मन त्रस्त करीत. असो. कमलाबाईच्या लग्नाबरोबर असे हे विचारही माझ्या मनात जोराने सुरू झाले, म्हणून ते थोडेसे नमूद केले.

आम्ही ठरविल्याप्रमाणे सांगलीचे अधिपती श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन यांच्यासंबंधी प्रथम कसून माहिती मिळविली व ते स्थळ योग्य आहे अशी खात्री झाल्यावर मगच कमलाबाईचे मत विचारले. प्रथम तिने नकार दिला, कारण महाबळेश्वरी येणारे एकदोन राजे तिने पाहिले होते; त्यावरून राजेलोकांबद्दल तिचे मत वाईट झालेले होते. पण अण्णासाहेबांनी तिला पुष्कळ समजावून सांगितल्यावर ती म्हणाली, "पूर्ण चौकशी केल्यानंतर, सर्व बाजूंनी त्यांच्या चांगलेपणाबद्दल माहिती मिळाल्यानंतरच तुम्ही पुढे पाऊल टाका. केवळ हे राजे आहेत म्हणून मला त्याबद्दल कधीही मोह पडणार नाही, हे माझे निश्चित मत आहे." हे तिचे उत्तर ऐकून आम्हांस समाधान वाटले. आपली ही मुलगी पैशाला व वैभवाला

भुलणारी नाही, तर तिला खऱ्या शीलाची व संभावितपणाची लालसा आहे, हे पाहून आम्हांला धन्यता वाटली.

श्रीमंत अप्पासाहेबांस येत्या जूनमध्ये राज्यसूत्रे मिळणार होती, म्हणून सांगलीस कॅप्टन बर्क हा इंग्रज अधिकारी राज्यशकट हाकीत होता. अण्णासाहेबांनी बर्क यांना पत्र लिहून आमची मुलगी दाखविण्याचा विचार कळविला. त्यांचे ताबडतोब उत्तर आले, "मुलीचा फोटो तुम्ही प्रथम पाठवा." फोटो पाठविताच लगलीच त्यांचे उलट टपाली पत्र आले की, "मुलीला दाखविण्यास ताबडतोब आणा." आता आम्हांला पंचाईत पडली की, त्या काळच्या रिवाजाप्रमाणे मुलाच्या घरी मुलीला दाखवायला न्यायची नाही; मुलाला आमच्या घरी बोलवावे तर आमच्या घरात पाहुण्यांची कोण गर्दी! चहूकडे एकदम बभ्रा होणार! इतके करून लग्न ठरले तर ठीक. नाही तर "सुधारकाची एवढी वाढलेली मुलगी कोण करणार? गेले मोठे राजाकडे मुलगी दाखवायला!" असा आमच्या वाइटावर टपून बसलेल्या लोकांना टिंगल करायला आयता विषय मिळायचा!

पण अण्णासाहेबांनी यातून तोड काढली. मिरजेचे अधिपती श्रीमंत बाळासाहेब यांची व अण्णासाहेबांची फार मैत्री होती. त्यांनी त्यांच्या कानांवर गुप्त गोष्ट म्हणून हा प्रकार घातला. श्रीमंत बाळासाहेब जुन्या मताचे पण फार दिलदार होते. त्यांनी अण्णासाहेबांना सर्व तऱ्हेचे साहाय्य करण्याचे आश्वासन दिले व सुचविले की, "माझे घर तुमचेच घर समजून तुम्ही मिरजेस माझ्या घरी या व तेथे सांगलीकरांना मुलगी पाहण्यास बोलवा. ते तेथे येतील अशी मी व्यवस्था करितो व या गोष्टीचा बभ्रा होणार नाही अशीही तजवीज करितो."

यावर आम्ही ठरविले की, आपण आपल्या सर्वच मुलांना घेऊन विश्र्या-जवळ आमचे कुलदैवत 'श्री रेवणसिद्ध' म्हणून आहे तेथे एक दिवस दर्शनास जाऊन येतो, असे घरात सांगून महाबळेश्वरहून निघावे व प्रथम मिरजेस जाऊन मुलगी दाखवून, मग जमल्यास श्री रेवणसिद्धास जावे. कमलाबाईस या गोष्टी सांगतच होतो. तिचे म्हणणे पडले की, "मलाही प्रथम सांगलीकरांचा फोटो दाखवा. मगच मी मिरजेस जायचे की नाही ते सांगेन." मग अण्णासाहेब पुन्हा श्रीमंत बाळा-साहेबांकडे गेले व सहज म्हणून सांगलीकरांच्या फोटोची चौकशी केली व फोटो मिळविला. फोटो पाहिल्यावर कमळाबाईने मिरजेस जाण्यास रुकार दिला.

मिरजेचे श्रीमंत बाळासाहेब मुद्दाम आमच्याबरोबर मिरजेस आले. श्रीमंतांनी आपल्या कारभाऱ्यास व नोकरांस आमचा उत्तम बंदोबस्त ठेवण्यास सांगितले व ते काही कामाकरिता एक दोन दिवसांसाठी म्हणून कुरुंदवाडला निघून गेले. आम्हांला ते अंमळ चमत्कारिक वाटले. पण पुढे काही महिन्यांनी कळले की, त्यांचा व सांगलीकरांचा पूर्वी काही कारणावरून थोडा गैरसमज झाला होता. म्हणून यावेळी त्यांनी त्यांना भेटण्याचे अशा रीतीने टाळले. असो. संस्थानिकांच्या घरी पाहुणे राहण्याचा

आमचा पहिलाच प्रसंग. श्रीमंत कुरुंदवाडला गेल्यावर आमच्या चहापाण्याची, जेवणाची वगैरे कुणीच नोकर चवकशी करीनात. मालकांच्या गैरहजेरीत मोठ्यांच्या घरीं पाहुण्यांची कशी गैरव्यवस्था होते ह्याची थोडीशी चुणूक येथे आम्हांला पहायला मिळाली. असो.

दुपारी चार वाजता कॅप्टन वर्क सांगलीच्या अधिपतींसह दोन मोठाल्या घोड्या जोडलेल्या चौचाकी गाडीतून येऊन पोहोचले. मुलगा कसा वागतो, कसा बोलतो, इकडे आमचे मन व डोळे एकवटलेले होते. राजेसाहेब येताहेत अशी वर्दी आल्याबरोबर मी व अण्णासाहेब त्यांचे स्वागतास पुढे गेलो. सांगलीच्या अधिपतींना पाहिल्याबरोबर मला एकदमच वाटले की फार दिवस चुकलेला आपला मुलगाच भेटला जसा ! इतका जिव्हाळा व आपुलकी मला का वाटावी हेच मला कळेना ! ती मंडळी बसल्यावर मी कमलाबाईस बोलावून आणते असे सांगून आत गेले. तिला मी बाहेर आणली तो कॅप्टन वर्क व सांगलीचे अधिपती यांची नजर तिच्यावर जणू काही खिळूनच गेली ! कोणीच तिला काही प्रश्न विचारीनात ! मग अण्णासाहेबांनीच तिला काही प्रश्न विचारण्यास सुरुवात केली, तेव्हा हळूहळू सर्व मंडळी बोलू लागली. श्रीमंत बाळासाहेबांच्या आज्ञेवरून श्रीमंत सांगलीकरांसाठी कारभाऱ्यांनी पानसुपारीची मात्र अगदी पेशवाई पद्धतीची जय्यत तयारी ठेविली होती. सुमारे अर्धा तास सांगलीकर मंडळी आमच्याकडे बसली व नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब होऊन ती घरी परत गेली.

सायंकाळी बर्कसाहेबांची चिठ्ठी आली की, " तुमची मुलगी आम्हांस पसंत आहे. तुमचे मत काय ते आम्हांस कळवावे. " अण्णासाहेबांनी लागलीच उत्तर लिहिले की, " आमची मुलगी देण्याची तयारी आहे. चारआठ दिवसांत पुढचे बोलणे करू. मी आज मुलांसह महाबळेश्वरी परत जात आहे. माझ्या मते या तरुण मंडळींच्या आणखी एक दोन वेळा भेटी व्हाव्या, व मग सर्व नक्की करावे. तोवर या गोष्टीबद्दल शक्य तितकी गुप्तता रहावी अशी माझी इच्छा आहे. " नंतर आम्ही महाबळेश्वरी परत आलो. तीनचार दिवसांनी बर्कसाहेबांचे पत्र आले की, " सांगलीकर राजे तुमच्या मुलीच्या भेटीगाठीसाठी उद्याच महाबळेश्वरी येतील. ते मुधोळच्या राजेसाहेबांचे घरी उतरतील. तुम्ही त्यांच्या भेटीची व्यवस्था करावी."

त्याप्रमाणे घरात या गोष्टीची वाच्यता नको म्हणून आम्ही मुंबईचे आमचे स्नेही मंडलिक यांना तार करून दोनचार दिवसांसाठी त्यांचा बंगला पाहुण्यांसाठी म्हणून मोकळा करून घेतला. तेथे चहापाण्याची सर्व व्यवस्था केली, व सांगलीकर राजेसाहेबांस तेथे चहाचे आमंत्रण दिले. यावेळीं सांगलीकर आले ते एकटेच आले, व अगदी मनमोकळेपणाने व साधेपणाने आमच्याशी इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलले. कमलाबाई पण मोकळेपणाने बोलली. तिला मी गाणी म्हणायला सांगितली, व तिने गोड आवाजात, सहजपणे ती म्हटली. ती राजेसाहेबांस विशेष आवडली

असे दिसले. त्या दिवशी ते आमच्याकडे सुमारे दोन तास बसले. दुसरे दिवशी पुन्हा अशाच तऱ्हेच्या त्यांच्या आमच्या गाठीभेटी झाल्या. त्यांच्या विद्वत्तेचा ठाव घेण्यासाठी अण्णासाहेबांनीही त्यांना खुबीखुबीने पुष्कळ प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे त्यांनी इतकी समयसूचकतेने व जपून ( guardedly ) दिली की अण्णासाहेब फार खूष झाले. दोन दिवसांनी ते सांगलीस परत गेले. त्यानंतर लगेच बर्कसाहेबांची तार आली की, " राजेसाहेबांना तुमची मुलगी कमळाबाई पसंत आहे. पुढील बोलणी करण्यास सांगलीस तातडतोब यावे. " आता आम्हांला यासंबंधी गुप्तता ठेवण्याचे कारण नव्हते. तेव्हा आम्ही घरातल्या सर्व पाहुणे मंडळींना तारेचा मजकूर सांगितला.

लग्नाबद्दलची पुढील सर्व बोलणी करण्यास अण्णासाहेब मग सांगलीस गेले. त्यापूर्वी आम्हांस कुणी अशी भीती घातली की, ते खूप हुंडा मागतील. तो देणे अण्णासाहेबांच्या मताविरुद्ध होते, व त्या कारणास्तव त्यांनी लग्नही मोडले असते. कमलाबाईही हुंड्याविरुद्ध होती. अण्णासाहेबांनी सांगलीस गेल्यावर बर्कसाहेबांस प्रथमच सांगितले की, " सांगलीकरांच्या राजवैभवाला शोभेल अशा थाटाने आम्ही सर्व लग्नसमारंभ, अहेर, देणग्या वगैरे करू. पण माझी एक मुख्य अट आहे की, लग्न झाल्यावर मुलगी आमच्या घरी माहेरपणास धाडली गेली पाहिजे. नाहीतर संस्थानिकांच्या घरून तसे केले जात नाही असे ऐकतो. " त्यावर तो म्हणाला, " आमच्या विलायतेत हा प्रश्नच येत नाही. पण तुमच्याकडील रीती वेगळ्या आहेत. इकडे राजे लोकांच्या बायका माहेरी धाडीत नाहीत ह्याचे कारण पुष्कळ वेळा माहेरची माणसे गरीब असतात. तुमची गोष्ट तशी नाही. शिवाय राजेसाहेबांचा स्वभाव फारच दिलदार व विचारी आहे. ते तुम्ही बोलवाल तेव्हा मुलीला धाडतील, असे मी आश्वासन देतो. " हुंड्याबद्दल वगैरे बर्कसाहेब कांहीच बोलले नाहीत, तेव्हा तीही फिकीर अनायासेच टळली. ता. २९ जून १९१० ही लग्नाची तारीख ठरली. ह्यावेळीं अर्धा मे महिना झाला होता, व महाबळेश्वरीच आम्ही लग्नाच्या तयारीस सुरुवात केली. सासूबाई दर उन्हाळ्यात माहुलीस येत. तेथे त्यांच्यासाठी अण्णासाहेबांनी बद्रीनारायणाचे देऊळ बांधून त्यांस उत्पन्न करून दिलेले होते. सासूबाईंना लग्न नक्की झाल्याचे कळल्यावर अत्यानंद झाला, व त्या महाबळेश्वरी आल्या. मग आम्ही लग्नाची तयारी जोरात सुरू केली. अण्णासाहेबांची वऱ्हाडातील मित्रमंडळी व पक्षकार यांना ही बातमी ऐकून फार आनंद झाला. आता आमचा वेळ निमंत्रणाच्या याद्या करणे, लग्नसामानाची व्यवस्था करणे, व्यापाऱ्यांना ऑर्डरी देणे, या गर्दीत जाऊ लागला. घरात सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मग मी अण्णासाहेबांना म्हटले की, " यंदा इथे येण्यापूर्वी तुम्हांला खूपच कामे येऊन फार मोठी रक्कम जमली, तेव्हा माझ्या मनात आले की, तुमच्या मनात कुणा संस्थेला मोठी देणगी देण्याचे आलेले आहे. कारण असे टोकताळे तुमचे नेहमीचे

ठरलेले आहेत. ईश्वर तुमच्या पाठीशी उभा राहून तुमच्या इच्छा पुरवितो. पण यावेळी ही रक्कम एका संस्थानिकाला तुम्ही कन्यादान करावे म्हणून जमली असेच म्हणावयाचे!"

ताईला विलायतेत ही सर्व हकीकत आम्ही पत्राने कळविली. तिने कुतूहल म्हणून सांगलीकरांचे बंधू बापूसाहेब हे तेथे होते त्यांची ओळख काढून भेट घेतली. एक दिवस तिची आम्हांस तार आली की, "माझे पत्र पोहोचेपर्यंत कमलाबाईचे लग्न नक्की करू नका." आम्हांस या तारेचा काहीच उलगडा होईना! ऐन आनंदात अचानक ही अशी तार आल्यामुळे, का कोण जाणे, माझ्या पोटात एकदम कसे धस्स झाले, व मनाला अत्यंत रुखरुख लागली! यानंतर पांचसहा दिवसांनी आम्हांला याहून जोराचा एक धक्का बसायचा होता त्याचेच हे जणू पूर्वसूचक होते!

* * *

# .४.

## ( १९१० – १९१५ )

मागील भागात नमूद केल्याप्रमाणे ताईच्या विलायतेच्या तारेनंतर पाचसहा दिवसांनी बर्कसाहेबांची सांगलीहून तार आली की, " काही राजकीय गोष्टीसंबंधी उलगडा व्हावयास हवा आहे, तोवर लग्न लांबेल; तुम्ही मला सांगलीस येऊन ताबडतोब भेटा." या तारेने आम्हांला फारच धक्का बसला. घरात जिकडेतिकडे एकदम गप्प झाल्यासारखे झाले ! हे काय विघ्न उपस्थित झाले आहे, या विचाराने मला अगदी बेचैन करून टाकिले ! अण्णासाहेब मात्र ही तार बघून तिळमात्र डगमगले नाहीत. आम्हांला शांत राहण्याचा धीर देऊन ते सांगलीस गेले.

यावेळीं कमळाबाईच्या शांत वृत्तीची खरी पारख झाली. तिने आपल्या वागण्यात काही मोठी चिंता उत्पन्न झाली आहे असे बिलकूल दिसू दिले नाही. तिने आपली नेहमीची गंभीर व आनंदी वृत्ती कायम ठेविली. या तिच्या वृत्तीमुळेच अण्णासाहेबांचा तिच्याकडे विशेष ओढा असे. आपल्या वडिलांच्या शांत स्वभावास ती खरोखरच साजेशी आहे, याचा या प्रसंगी मला पुरेपूर अनुभव आला !

इकडे सांगलीस अण्णासाहेबांना राजकीय प्रश्नाबाबत निराकरण करण्यास फार त्रास पडत होता असे त्यांच्या पत्रांवरून दिसून आले. बर्कसाहेब राजेसाहेबांना सर्व अधिकार देऊन विलायतेस जाण्याच्या तयारीत होते. त्यांनी अण्णासाहेबांना सांगितले, " आमचा इथला पोलिटिकल एजंट म्हणतो की, 'तुम्ही फार ज्वलज्जहाल आहा; तेव्हा तुमची मुलगी राजेसाहेबांच्या घराण्यात आणण्याच्या मी विरुद्ध आहे !' आम्हांला राजेलोकांच्या लग्नाबद्दल औपचारिक रीत्या पोलिटिकल एजंटची परवानगी घ्यावी लागते. तुमचा नांवलौकिक पाहता पोलिटिकल एजंट काही विरोध करील हे माझ्या स्वप्नीही आले नाही. तरी तुम्ही आता कोल्हापूरला जाऊन त्याला भेटा व त्याच्या शंकांचे निरसन करा. माझे वैयक्तिक मत व राजेसाहेबांचे मत हीच

मुलगी करावी असे आहे." मग अण्णासाहेब स्वत: राजेसाहेबांना भेटले. त्यांनी अण्णासाहेबांना सांगितले की, "मी तुम्हांला दिलेला शब्द पक्का समजा. पोलिटिकल एजंटची संमती मिळाली नाही तर मी जन्मभर तसाच राहीन, पण तुम्हांला दिलेले वचन मोडणार नाही."

नंतर अण्णासाहेब कोल्हापूरला जाऊन पोलिटिकल एजंटला भेटले. प्रथम तो अण्णासाहेबांशी उद्दामपणे बोलू लागला. पण अण्णासाहेबांच्या सडेतोड बोलण्याने तो नरम आला व मग गोड बोलू लागला. लग्नाला विरोध करण्याची त्याने कारणे सांगितली ती अशी : "तुम्ही इंग्रज अधिकाऱ्यांशी फटकून वागता. तुमची भाषणे फार कडक व इंग्रजांवर ताशेरे झाडणारी असतात. शिवाय टिळक तुमचे मित्र आहेत. त्याचप्रमाणे राजेसाहेबांच्या दत्तकपूर्व मातु:श्री या लग्नाच्या विरुद्ध आहेत असे समजले. आताच थोड्या वेळापूर्वी त्यांच्या मातु:श्री मिसेस गोळे, येऊन ही हकीगत मला सांगून गेल्या, व लग्नास मोडता घालण्याचा त्यांनी आग्रह केला. त्यांनी सांगितले की, माईसाहेब (राजेसाहेबांची दत्तकपूर्व आई) यांना रामभाऊ जोगळेकरांची मुलगी पसंत आहे." यापुढे पोलिटिकल एजंट म्हणाले, "हे जोगळेकर आमचे फार दोस्त आहेत. त्यांनी मला तुमच्याविरुद्ध पुष्कळ गोष्टी सांगितल्या." हे जोगळेकर अण्णासाहेबांचे कॉलेजपासूनचे मित्र होते व त्यांच्याशी फार प्रेमाने वागत. पण त्यांच्या स्वभावाचा हा पैलू समजण्याचा आम्हांला कधी प्रसंग आला नव्हता. पोलिटिकल एजंटशी खूप वादविवाद करून अण्णासाहेबांनी त्यांना हे कबूल करायला लावले की, "तुमच्या नागपूरच्या चीफ कमिशनरने जर तुमच्याबद्दल शिफारसपत्र दिले, तर मी या लग्नाला परवानगी देईन."

त्यावेळी सर फ्रान्सिस क्रॅडॉक हे नागपूर प्रांताचे चीफ कमिशनर होते. रावबहादुर मुधोळकरांचे व त्यांचे फार चांगले असे. चीफ कमिशनर व अण्णासाहेब यांची फारशी दिलजमाई नव्हती; पण वाकडेही नव्हते. त्यांचा मुक्काम त्यावेळी पचमढी येथे होता. अण्णासाहेबांनी विचार केला की, मुधोळकरांना बरोबर घेऊन त्याला भेटल्यास लवकर काम होईल. पण मुधोळकरांनी उगाच काही जुजबी सबबी पुढे करून अण्णासाहेबांबरोबर जाण्याचे टाळले. आता स्वत:च्या हिंमतीवरच चीफ कमिशनरला भेटून सर्व खुलासा करावयाचा असे ठरवून अण्णासाहेब पचमढीस जाऊन त्यांना भेटले. हे इंग्रज लोक आमच्यावर राज्य कोणत्याही धोरणाने करीत असोत, त्यांच्यामध्ये एक मोठा गुण असा आहे की, त्यांना माणसाच्या खऱ्या गुणांची पारख असते, व त्या त्यांच्या मनोबिंदूला जो कोणी चातुर्याने स्पर्श करू शकेल त्याला न्याय अवश्य मिळतो! चीफ कमिशनरसाहेब आधी जरा गुर्मीतच बोलले, पण अण्णासाहेबांनी त्यांना, "माझ्या मुलीचे लग्न झाले नाही तरी बेहेत्तर, पण माझ्याविरुद्ध तुमच्याजवळ काय गोष्टी आहेत त्या मला स्पष्ट सांगा. मी सर्वांची उत्तरे देतो. मग तुम्ही काय तो निर्णय घ्या. परंतु मला न्याय हवा आहे." असे

रोखठोकपणाने सांगितल्यावर त्यांनी मोकळेपणाने दोनतीन गोष्टींबद्दल खुलासा विचारला. त्यावेळीं त्या दोघांमध्ये पुढीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली:—

चीफ कमिशनरः—तुम्ही माझेकडे कधी भेटीला येत नाही, ते का ?

अण्णासाहेबः—मला तुमच्याजवळ स्वतःसाठी असे काही मागायचे नसते. सार्वजनिक गोष्टींबद्दल शिष्टमंडळे तुमच्याकडे येतात, त्यावेळीं माझी त्यांना जरुरी लागल्यास ती मला बोलावतात व त्यांच्याबरोबर मी तुमच्याकडे येतो.

चीफ कमिशनरः—तुम्ही दोंन वेळा रावबहादुरकी नाकारलीत ते का ?

अण्णासाहेबः—मला पदव्या घेणे आवडत नाही. तुमच्या विलायतेतही अशा मताचे पुष्कळ लोक आहेत.

चीफ कमिशनरः—तुम्ही तुमच्या कारकुनामार्फत अराजक क्रांतिकारकांना मोठी देणगी दिलीत हे खरे आहे काय ?

अण्णासाहेबः—माझ्या शेतीचे काम पाहणारा एक कारकून एक दिवस मोठी रक्कम घेऊन फरारी झाला. त्याबद्दल मी पोलिसांत वर्दीही दिली होती. या गोष्टीस मी क्रांतिकारकांना देणगी दिली असे विकृत स्वरूप दिले गेल्याचे मी आज पहिल्याने ऐकतो आहे. माझ्याविरुद्ध अशा अनेक गोष्टी रचल्या गेलेल्या दिसतात. मी त्या सर्वांचे निराकरण करू इच्छितो. अशा क्षुल्लक गोष्टींवरून जर मी क्रांतिकारक ठरणार असेन, तर तुमच्या राज्यात सत्यास काडीची किंमत नाही असे मी उघड म्हणेन !

यानंतर चीफ कमिशनर खूप नरमाईने बोलले आणि म्हणाले, “ तुमची बाजू ऐकल्यावर मी आता पोलिटिकल एजंटकडे तुमच्याविरुद्ध मत देणार नाही. त्याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा. तुम्ही जर इंग्रज असता तर तुमच्या सडेतोड व बाणेदार वृत्तीमुळे तुम्ही विलायतेत फार उच्च पदावर चढला असता. ”

याप्रमाणे अण्णासाहेबांच्या मुलाखती व खटपटी चालू असता मे महिन्याची अखेर आली. पुण्यात ह्या लग्नाबद्दल खूपच चर्चा होत असल्याचे आम्ही ऐकले. पुण्यातील सनातनी लोकांतर्फे श्री. बाळासाहेब नातू यांच्या नेतृत्वाखाली श्रीशंकराचार्यांकडे एक व कोल्हापूरच्या एजंटकडे एक, अशी शिष्टमंडळे जाऊन “ ऋतू प्राप्त झालेल्या मुलीचे लग्न धर्मबाह्य ठरवावे ” म्हणून खटपटी सुरू झाल्या होत्या.

महाबळेश्वरहून परत जाताना आम्ही पुण्यावरून सरळ मुंबईस व तेथून उमरावतीस जायचे ठरविले होते. पण पुण्याच्या स्टेशनवर ना. गोखल्यांचे खाजगी चिटणीस बर्वे नामदारांचा निरोप घेऊन आले की, “ तुम्ही नेहमीप्रमाणे पुण्यास विष्णु सदाशिव कंपनीकडे उतरा. मी तुम्हांला तेथे येऊन भेटतो. ” नामदार गोखले यांचा व आमचा एवढा स्नेह होता की, मला त्यांच्या म्हणण्यास मान द्यावाच लागला. त्याप्रमाणे आम्ही विष्णु सदाशिवांच्या घरी गेलो. तेथे एकदोन तासांत नामदार गोखले मला येऊन भेटले. संकटसमयी हा ‘ गोपाळकृष्ण ’च आपल्याला

भेटला असे वाटून मला गहिंवरून आले व माझ्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर लोटला! गोखल्यांनीही स्वतःच्या डोळ्यांना रुमाल लावला. ते मला म्हणाले, "आक्का, मला वाटले होते की, तुम्ही फार मोठ्या धीराच्या आहात! आता मला या लग्नाबाबत सगळी हकीगत सांगा. अण्णासाहेबांनी अद्यापि मला कसे काही कळविले नाही?"

वास्तविक कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटकडून अण्णासाहेबांना समजले होते की, नामदार गोखल्यांच्या मुली सांगलीकरांना दाखविल्या होत्या. म्हणून त्यांनी गोखल्यांना स्वतःच्या मुलीबद्दल काही कळविले नव्हते. पण मी ते त्यांना कसे सांगणार? मी लग्नाबद्दलच्या अडचणींची सर्व हकीगत व अण्णासाहेबांचे पचमढीस जाणे वगैरे सर्व त्यांना सांगितले. तेव्हा ते म्हणाले, "यातील राजकीय बाजू मला ठाऊक आहे. तुम्ही आता अण्णासाहेबांना ताबडतोब तार करून इथे बोलवा, व मला भेटायला सांगा. तुम्ही अगदी निर्धास्त असा. कमळाबाईला मी माझी मुलगी समजतो. हे लग्न झालेच पाहिजे. मी आता हा असाच जाऊन गव्हर्नरला भेटतो. तुम्ही तूर्त याबद्दल कुणाजवळ काही बोलू नका."

यानंतरचे आठपंधरा दिवस आम्ही पुण्यात जवळजवळ अज्ञातवासात काढले. तरी पण कुठल्या तरी ओळखी आणि नाती काढून लोक आमच्याकडे भेटायला म्हणून येतच. कुणी सांत्वनाचा आविर्भाव आणून, तर कुणी कुत्सितपणाने गोष्टी फुगवून माझ्या कानात जशा कोंबीत! त्यावेळीं मला खरोखर पुण्याच्या मंडळींचा फारच तिटकारा आला! नसत्या चवकशा व नाहक कुत्सितपणा माणसांनी कुठल्या थराला नेऊन पोचवावा तरी!

लग्नाची तारीख २९ जून (१९१०) ठरविली होती; आणि दहा जूनपर्यंत अण्णासाहेब पचमढी वगैरेहून परत आले नव्हते! तेव्हा मी विचार केला की, आता कमळाबाईस घेऊन रेवणसिद्धास दर्शनास जावे. कारण मागे आम्ही मिरजेस गेलो तेव्हां त्या कुलदैवताचे दर्शन न घेताच परतलो, म्हणून लग्नात हे विघ्न उद्भवले, असे माझ्या मनाने घेतले. तिथून परत येईपर्यंत लग्नाचे काही ठरले तर ठीकच, नाही तर परस्पर उमरावतीचा रस्ता धरावा; आता या पुण्यात राहणे नको! त्याप्रमाणे मी, कमळाबाई व काही नोकर मिळून रेवणसिद्धास गेलो. तेथे दर्शन होऊन उत्तम शकुन झाले. तासगाव स्टेशनवरून ह्या स्थानी टांग्याने जावे लागत असे. आम्ही स्टेशनवर पोहोचलो तर तिथे आम्हांला पाहण्यास फार गर्दी लोटली, व तासगावकर पटवर्धन आईसाहेबांचा निरोप आला की, "मला तुम्ही तुमच्या मुलीसह येऊन भेटा." लोकांना तिथे आमच्या आगमनाची कशी बातमी लागली देव जाणे! मला वाटले होते की, पुण्यातच अशा तऱ्हेचे उपद्व्याप होतात. अर्थातच आम्ही त्या पटवर्धनांकडे गेलो नाही, व पुण्याच्या गाडीत बसलो. पुण्यास येऊन पाहतो तो अण्णासाहेब पुण्यास आलेले होते. ना. गोखले ही तेथे होते. त्यांनी

हसतहसत मला म्हटले, "आता पुन्हा मला सांगा, अगोदरच मला तुम्ही या सर्व अडचणी का कळविल्या नाहीत ? मी त्या दिवशी तुम्हांला सांगून सरळ गव्हर्नरकडे गेलो. तेव्हा ते मला म्हणाले, 'तुम्ही या मुलीसाठी एवढा खटाटोप का करिता ?' मी म्हटले, 'का म्हणजे ? मुलीची आई मिसेस जोशी माझी बहीण आहे. तिच्या मुलीच्या लग्नाची खटपट मला करायलाच पाहिजे !' मग मी त्यांना बजावून सांगितले की, 'या लग्नाला जर तुम्ही मोडता घातलात तर मी हे प्रकरण विलायतेपर्यंत नेईन व तुमचे मित्रत्व उघडपणे तोडीन...खाजगी बाबतीत तुम्ही राजकारण का घुसडता ?' मग गव्हर्नरने सांगलीच्या राजेसाहेबांना बोलावून घेतले आणि त्यांच्याशी बोलणे केले, आणि शेवटी या लग्नास परवानगी दिली. आता ते सर्व प्रकरण मिटले आहे असे समजा आणि प्रसन्न मनाने लग्नाच्या तयारीस लागा." हे सर्व इतक्या गडबडीत झाले की, आपण जागे आहोत का स्वप्नात आहोत हेच मला समजेना ! आणि नामदार गोखल्यांच्या थोरपणाबद्दल माझा आदर सहस्रशः वाढला !

या गडबडीत ताईने विलायतेहून तार केली होती ती गोष्ट आम्ही विसरलोच होतो. तिचे कारण आम्हांला नंतर कळले. सांगलीच्या दत्तकपूर्व घरचे सख्खे बंधू विलायतेत शिकत होते व त्यांचा ताईशी परिचय होता. एकंदर संस्थानिकांबद्दल आमच्या घरी चांगले मत नव्हते. तेव्हा हा संबंध जास्त विचारपूर्वक करावा एवढ्यासाठी म्हणून तिने ती तशी तार केलेली होती.

यानंतर अण्णासाहेबांनी वऱ्हाडात ठिकठिकाणी तारा करून लग्न २९ जू. सांगलीस नक्की झाल्याचे आपल्या मित्रमंडळींस कळविले. आता लग्नाचे सर्व साम आणण्यासाठी सासूबाई उमरावतीस गेल्या व आम्ही बायकांनी रात्रंदिवस जा गून सोवळ्यातले गव्हले, रुखवताचे सामान वगैरे तयार करण्यास सुरुवात केली. आमच्या निंबोलीच्या शेतीचे व्यवस्थापक गोपाळराव गोरे, कारकून मोरोबा परांजपे, बाबा देव, यांना आम्ही आमच्या निंबोलीहून मुद्दाम आणविलेले आमचे दहाबारा नोकर बरोबर देऊन लग्नापूर्वी सातआठ दिवस सांगलीस आमच्याकडील तयारीस धाडले. त्यांना आम्ही बजावले होते की, व्याह्यांकडील कुणी कारकून किंवा नोकर तुम्ही आपल्या जानोशाच्या घरी कामास लावू नये. त्यांच्या खाजगी कारभाऱ्यांकडून आपणास लागणारी भांडीकुंडी, बिछायती वगैरे पूर्ण याद्यांसह आपल्या ताब्यात घेऊन, सांगलीहून परत जाताना ते सर्व त्यांचे परत करून रीतसर पावत्या घ्याव्या. कोठीचे सर्व सामान त्यांच्या ओळखीच्या व्यापाऱ्यांकडून आणवून तुम्ही स्वतः त्यांची बिले लागलीच चुकती करून द्या. कुणी असे म्हणता कामा नये की, 'ह्या वऱ्हाडच्या मंडळींनी राजेसाहेबांवर आपल्या खर्चाचा बोजा घातला.' गोपाळराव गोरे फार कर्तृत्ववान होते. त्यांनी आपल्या निःस्पृहपणाने व हुशारीने आमची सर्व व्यवस्था झटपट केली व सांगलीच्या मंडळींना आश्चर्यचकित केले ! असो. आम्ही मुलांमुलींसह लग्नाच्या अगोदर दोन दिवस सांगलीस पोहोचलो

अण्णासाहेबांनी ज्यांना ज्यांना आमंत्रणाच्या तारा पाठविल्या होत्या, ती सर्व मंडळी लग्नास आलीच, पण काही अण्णासाहेबांचे स्नेही व पक्षकार यांना आमंत्रणे पोहोचली नव्हती, ती मंडळी बातमी कळल्याबरोबर आपण होऊन लग्नास आली. सांगलीस त्यावेळी ज्या आगगाड्या आल्या, त्यांत आमचे वऱ्हाडचे पाहुणेच ज्यास्त असत! किती पाहुणे येत होते व किती पंगती आमच्याकडे बसत असत याची गणतीच राहीना जशी! आमचे लांडगेकाका, बंडूनाना करकरे, दिनकरराव फडके वगैरे मंडळी सर्वांची आस्थापूर्वक विचारपूस करून त्यांची बरदास्त ठेवण्यात रात्रंदिवस मग्न होती. आचारी वाढपी आम्ही पुण्याहून मुद्दाम आणविले होते.

आम्ही सांगलीस पोहोचलो तेव्हा आम्हांला स्टेशनवर उतरवून घेण्यास राजेसाहेबांचे कारभारी व काही त्यांची मानकरी मंडळी आली होती, व त्यांनी आम्हांला आमच्या जानोशाच्या घरी नेऊन पोहोचविले. आम्ही आमची दोन घोड्यांची चौचाकी गाडी सांगलीस नेली होती. तीत बसून संध्याकाळी अण्णासाहेब जाऊन राजेसाहेबांस भेटून आले व त्यांच्या मातुःश्री व आतेष्ट स्त्रियांना आमच्याकडील मुख्य बायकामंडळी रीतसर अक्षत आमंत्रण देतील म्हणून त्यांनी सांगितले. राजेसाहेबांनी खाजगी कारभाऱ्यांना ती सर्व व्यवस्था करण्याची आज्ञा दिली. पुरुषांची सर्व आमंत्रणे अण्णासाहेबांकडून एकदमच स्वतः राजेसाहेबांनी घेतली. दुसरे दिवशी मी तीनचार बायकांसह विहिणींना व इतर राजघराण्यातील मानाच्या स्त्रियांना अक्षत देण्यास गेले. दत्तकगृहाकडील म्हणजे गादीकडील राजेसाहेबांना फक्त एक बहीण होती. पण ती लग्नाला येऊ शकली नव्हती. तेव्हा राजेसाहेबांच्या दत्तकपूर्व मातुःश्री माईसाहेब यांना आम्ही प्रथम आमंत्रण दिले. तो त्यांनी आमच्याबद्दल पूर्ण नापसंती दर्शविली! आमच्याशी त्या एकही शब्द बोलल्या नाहीत. पण आम्ही ठरविले होते की, रीतीच्या शिष्टाचारात कुठेही चूक होऊ द्यायची नाही, आणि विहिणींनी अपमान केला तरी राग दर्शवायचा नाही. माईसाहेबांची माहेरची सर्व बायकामंडळी आली होती, ती वेगवेगळ्या दालनांतून उतरलेली होती. त्या सर्व ठिकाणी आम्ही जाऊन अक्षत देऊन रीतसर आमंत्रणे केली. त्या बायकाही माझ्याशी तुटकपणाने वागल्या. माईसाहेबांच्या चुलत सासूबाईंना अक्षत व आमंत्रण दिल्यावर त्या तर म्हणाल्या, " आता तुम्हांला सुधारकांना कुंकू लावले तर चालेल ना? " तेव्हा माझी भावजय म्हणाली, " आम्ही सगळ्या जुन्या रीतीच पाळतो. आपण वडीलपणाने आम्हांला वेळोवेळी सूचना कराव्या. आम्ही तसे करू." यानंतर त्यांच्या एका ब्राह्मणाच्या नोकरबाईने आम्हांला कुंकू लावले व आम्ही घरी परतलो. या सर्व गोष्टींमुळे माझे मन अंमळ उदास झाले. पण मला अण्णासाहेबांनी धीर देऊन म्हटले, " तुम्ही आपल्या कर्तव्यकर्मात व शिष्टाचारात चुकू नका. लोकांनी माईसाहेबांचा आपल्याबद्दल विनाकारण गैरसमज करून दिला आहे. म्हणून त्या

अशा वागताहेत. तुमच्या चांगुलपणाचा त्यांना अनुभव आला म्हणजे पुढे त्या तुमच्याशी चांगल्या वागतील."

लग्नाच्या आदल्या दिवशी देवाला अक्षत देऊन आल्यावर सीमांतपूजन झाले. रात्री व्याहीभोजन झाले. त्यासाठी आमच्याकडील सर्व आतेष्टांना आमंत्रण होते. पण तेथील सर्वच कारभार कारकून व नोकर माणसांमार्फतच चाललेला होता. घरचे म्हणून पुढे होऊन कोणीच आमची विचारपूस करीत नव्हते. तेव्हा आम्हांला वाटले की आपणाकडे मोठमोठी पाहुणे मंडळीं आलेली, त्यांचा तिथे अपमान व्हायचा, म्हणून आम्ही दोघेच येऊ म्हणून आम्ही कळविले. भोजनोत्तर देणीघेणी होऊन आम्ही परत आलो तो पहाटेचा एक वाजला! दुसऱ्या दिवशी दुपारी दीड वाजण्याचा मुहूर्त होता. आम्ही आमच्याकडील देवदेवक पहाटेच बसविले. त्यावेळी आमच्या वऱ्हाडाकडील अनेक पाहुण्यांनी–नागपूरचे श्रीमंत गोपाळराव बुटी, मलकापूरचे विष्णुसा सावजी, शेट केसरीमल धामकवाले आदिकरून–इतके मोठमोठे अहेर केले की सांगलीकडील मंडळी थक्कच झाली! तिकडील लोकांना नागपूर-वऱ्हाडात अनेक संपन्न व उदार लोक आहेत याची काही कल्पनाच नव्हती असे दिसले. असो. मग आम्ही वरगृही उष्टी हळद घेऊन गेलो. तो तिथे कशाचीच दाद लागेना! अकरा वाजले तरी देवदेवकाचा पत्ताही नव्हता. इतक्यात कुणी मला हळूच म्हटले, "वरमातेचा मुहूर्त चुकविण्याचा बेत आहे." त्यात तथ्य कितपत होते ईश्वर जाणे! मग मी खुद्द राजेसाहेबांनाच जाऊन सांगितले की, "तुमच्याकडील देवदेवक लवकर बसायला हवे. नाही तर मुहूर्त चुकेल." मग सगळी व्यवस्था लवकर झाली व श्री. नारायणराव पटवर्धन मंगळवेढेकर (मोठी पाती) यांनी देवक बसविले, आणि सुमारे बारा वाजता वराची वधूगृही येण्याची स्वारी लवाजम्यासह निघाली. नवरदेव हत्तीवर घातलेल्या चांदीच्या हौद्यावर विराजमान झाले होते. त्यावेळी मिरवणूक फार भव्य होती. आजूबाजूच्या गावांतील हजारो लोक ती पाहण्यास जमले होते. त्यांच्या राजास नुकतेच गादीचे हक्क मिळालेले, तेव्हा त्यांचा विवाहसमारंभ त्यांच्या प्रजाजनांनी उत्साहाने पाहिला. आमच्या वऱ्हाडच्या मंडळींनीही या मिरवणुकीची पुढे कित्येक वर्षे तारीफ केली. अशा पेशवाई थाटाच्या मिरवणुकी वऱ्हाडात कधीच पाहायला मिळत नसत. मुख्य राजवाड्यापासून वधूगृहापर्यंत शोभिवंत खांब, पताका, तोरणे, कमानी वगैरे उभारले असून संस्थानचा मोठा सरंजाम-शृंगारलेले हत्ती घोडे, चौघडा, मानाचा डंका, नौबदी, भगवा झेंडा, जरीपटका–बरोबर होता. आमची वऱ्हाडची मंडळी ते पाहून थक्क झाली, व "अण्णासाहेबांचे भाग्य थोर म्हणून त्यांच्या मुलीला असे घर लाभले" असे आनंदोद्गार त्यांनी काढले.

लग्न सांगलीच्या पूर्वपरंपरेप्रमाणे गणपतीच्या-तांब्याच्या–चौकाच्या माजघरात लागले. कमळाबाईला तिच्या आजोळच्या अभ्यंकर मंडळींनी केशरी जरीमंदिली शालू अष्टपुत्री म्हणून आणला होता तो नेसविला होता. अंगावर मोतीया रंगाचा

९०४५९

जरीचा मंदिली शेला. लग्न लागल्याबरोबर राजवैभवाचे भालदार चोपदार यांनी प्रथम कमलाबाईच्या नावाने ललकारून तिचे स्वागत केले, व नंतर संस्थानच्या पूर्व पद्धतीप्रमाणे तिच्यासाठी नेमलेला पिढीजाद नोकरवर्ग-खाजगी कारभारी, कारकून, हुजरे, शागीर्द ब्राह्मणाच्या चाकरीच्या बायका, दासी इत्यादिकांनी येऊन तिला नमस्कार केले. राजेसाहेबांनी लग्नाच्या वेळी आम्ही दिलेला जरी पीतांबर व जरीची शाल, हा पोषाख उतरून दरबारी पोषाख चढविला, व ते बाहेरच्या मोठ्या दिवाण-खान्यात मोठा दरबार भरला होता तेथे एकटेच गेले. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व राजेरजवाडे व मोटमोटी मंडळीं तेथे जमली होती. मात्र त्यांच्याकडील बायकामंडळी कुणी आली नव्हती, कारण त्यांना वरपक्षाकडील जबाबदार बायकांकडून रीतसर आमंत्रण गेले नव्हते म्हणे! असो. दरबार आटोपल्यावर कन्यादान, सप्तपदी व लाजाहोम यासाठी राजेसाहेब आत आले. कन्यादानाच्या वेळीं आम्ही राजे-साहेबांच्या हातात हिऱ्याची अंगठी व सोन्याच्या मोहरा देऊन कन्यादान केले त्यावेळी मात्र आतापर्यंत दाबून ठेविलेला आम्हा दोघांच्याही मनाचा आवेग आम्हांला आवरेना-तो अश्रूंच्या रूपाने जोराने बाहेर पडू लागला! 'खचितचि आहे परक्याचे धन कन्या हे' याची पूर्ण जाणीव झाली. आता माझी मुलगी दुसऱ्याची झाली, तिला सासरी कसे वागवितील, या तरुण राजाला आजूबाजूचे लोक बिघडविणार तर नाहीत...असे नाना विचार माझ्या मनात थैमान घालू लागले!

वरात रात्री दहाला निघणार होती. पण त्यालाही फार उशीर झाला; कारण वरमाता माईसाहेब लग्नाला आमच्या मंडपात तर आल्या नाहीतच, पण सुनमुखाचीही तयारी लवकर होऊ देईनात. त्याबद्दलचे आमंत्रण मी रीतीप्रमाणे साखर चांदीच्या ताटात घालून, ते सर्व त्यांना अर्पण करून, केले होते. या सुमारास कोणी अशीही हूल उठविली की, वरमाता राजेसाहेबांजवळ असा हट्ट धरून बसली आहे की, "सांगलीच्या गादीला एकदम दोन बायका असण्याची चाल आहे; त्यासाठी मी एक मुलगी आणलेली आहे, तिच्याशी आताच लग्न कर; मगच मी दोन्ही सुनांचे सुनमुख पाहीन." मग मात्र मी घाबरले व मला वाटले, "काय ध्या या राजे लोकांचे ?—करायचेही दुसरे लग्न!" एवढे अण्णासाहेब खंबीर मनाचे पण तेही हे ऐकून सचिंत झाले! पण रात्री अकराचे सुमारास खाजगी कारभाऱ्यांनी निरोप आणला की, "माईसाहेब म्हणताहेत की, सुनबाईस गणपतीच्या देवळात आणा, तिथे सुनमुख होईल." त्याप्रमाणे कमळाबाईस मेण्यातून तिथे नेण्यात आले. तिकडे आमच्याकडील सर्व बायकामंडळी तिच्याबरोबर गेली; पण मी जाऊ शकले नाही, कारण माझ्या छातीत फारच धडधड (palpitation) व्हायला लागून मला फीट आली. संस्थानचे डॉक्टर डॉ. देव म्हणून फार सज्जन गृहस्थ होते, त्यांना माझ्या-साठी बोलावून आणले, व त्यांनी मला औषध वगैरे देऊन स्वस्थ पडून राहण्यास

सांगितले. अण्णासाहेब माझ्याजवळ बसूनच होते. त्यांना व मला डॉ. देवांनी आश्वासनपूर्वक सांगितले की, " आमचे राजेसाहेब आपल्या आईच्या आग्रहाने दुसरे लग्न करतील हा विचारच तुम्ही मनात आणू नका. ते फार सत्यवचनी व खंबीर मनाचे आहेत. " हे डॉ. देव व सांगलीच्या लक्ष्मीबाई अभ्यंकर यांनी या लग्नात आम्हांस फारच मानसिक धैर्य दिले, व ते आम्हांला उपकारक वाटले.

याप्रमाणे दिवसाचे कार्यक्रम आटपून वरात निघण्यास रात्रीचे दोन वाजले. रंगारंगाच्या दिव्यांनी, भव्य कमानींनी व पताकांनी सर्व राजरस्ता झळकत होता ! नगारे, तुताऱ्या, ब्यांड यांच्या आवाजाने दशदिशा जशा भरून गेल्या होत्या. प्रेक्षकांचा जमाव तर एखाद्या अफाट समुद्राच्या लाटांप्रमाणे हालत होता. पण मुलीच्या या वैभवापेक्षा " देवा, माझ्या मुलीला या राजघराण्यात खरे सुख लागू दे " हाच विचार आमच्या दोघांच्या मनात प्रामुख्याने घोळत होता !

ती प्रेक्षणीय वरात राजवाड्यात पोचली तो जवळ जवळ उजाडले. वरात तेथे पोहोचण्याचे सुमारास मला व अण्णासाहेबांना डॉ. देव राजवाड्यात घेऊन गेले. आमच्याकडील सर्व पाहुणे मंडळी आगाऊच त्या मिरवणुकीबरोबर गेली होती. राजवाड्यात वरातीनंतरचा फारच मोठा समारंभ झाला. वधूवरांना सिंहासनावर बसवून त्यावर चवऱ्या मोरचेल व पंखे ढाळले जाऊ लागले आणि भालदार चोपदारांच्या ललकारण्यात नजराणे दिले गेले. सर्व मंडळी फार आनंदात दिसली. त्यानंतर राजवाड्याच्या देवघरासमोर गृहप्रवेशाचे धार्मिक विधी होऊन कमळाबाईचे नाव ' सरस्वतीबाईसाहेब ' असे ठेवण्यात आले.

वरातीच्या दुसऱ्या दिवशी मांडवपरतण्याची प्रयोजने वगैरे आमच्याकडे उत्तम रीतीने पार पडली. त्या दिवशीच्या पंगतीत मिरजेचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब यानी अण्णासाहेबांना सांगितले, " आज मी स्वतः सोवळे नेसून अण्णासाहेबांचा स्नेही म्हणून पंगतीत हिंडून सर्वांचा समाचार घेणार आहे." आणि त्यांनी तसे केलेही ! आम्ही सर्वांना उत्तम अहेर, देणग्या वगैरे दिले. लग्नानिमित्त आम्हांला अभिनंदनपर तारा व पत्रे किती आली याची गणतीच नाही. त्यांचे अक्षरशः ढीग झाले !

अशा तऱ्हेने सर्व समारंभ आटपून आम्ही लवकरच सांगली सोडली. जाण्यापूर्वी अण्णासाहेबांनी राजेसाहेबांची ' खास खाजगी ' भेट घेऊन " आता आमच्या मुलीला सांभाळा " म्हणून म्हटले. कमळाबाईलाही आम्ही उपदेश केला की, " आता तुमच्या घराण्याच्या रीतीरिवाजाप्रमाणे वागावे. राणी म्हणजे प्रजेची आई, हे जाणून सर्वांचे पालनपोषण करण्यास झटावे. सासूबाईंना खूष ठेवण्याचा सर्व प्रकारे प्रयत्न करावा..... " वगैरे. तिनेही खरोखरच त्याप्रमाणे सर्व केले.

उमरावतीस जाण्यापूर्वी मी पुण्यास मुद्दाम उतरून कमळाबाईची गादीच्या नात्याची नणंद आक्कासाहेब-त्या सरदार मेहेंदळयांकडे दिलेल्या होत्या -यांना

भेटून त्यांना करवलीचे मान-पोषाख वगैरे दिले, व उमरावतीस दिवाळसणास यावे म्हणून आमंत्रण केले, व ते त्यांनी मान्यही केले. मला त्यांचा स्वभाव फारच चांगला वाटला.

ह्याप्रमाणे लग्नाहून आम्हीं उमरावतीस परत आल्यावर आठदहा दिवसांनीच आम्हांला कमळाबाईच्या गर्भाधान समारंभासाठी सांगलीहून आमंत्रण आले. मी दोन कारकून व माझी भावजय एसूवहिनी यांस बरोबर घेऊन प्रथम मुंबईस गेले. तिथे सरदारगृहाचे मालक साळवेकर आमचे पूर्वीपासूनचे फार स्नेही होते, त्यांच्या मार्फतीने मी पाचदहा हजारांपर्यंत वस्तू, उत्तम फर्निचर, उंची पोषाख वगैरे एका दिवसात खरेदी करून, ते सर्व घेऊन सांगलीस गेले. ह्या वेळीही माईसाहेबांच्या माहेरची सर्व बायकामंडळीं सांगलीस आली होती. त्या सर्वांना व दरबारच्या प्रमुख मानकरिणींना मी उंची लुगडी वगैरे दिली. पण अद्यापपावेतो माईसाहेब माझ्याशी बोलत नव्हत्या. आता त्या वेगळ्या बंगल्यात, व कमळाबाई व राजेसाहेब हे दोघे एका दुसऱ्या बंगल्यात राहात होते. आम्हांला त्यांनी गणपतीच्या वाड्यात उतरविले होते. कमळाबाई सासूबाईच्या मर्जीप्रमाणे अगदी जुन्या पद्धतीस धरून वागत होती. एकंदरीत ती समाधान वृत्तीत होती, हे पाहून मीही समाधान मानले.

लग्नानंतरचे सर्व सण, मंगळागौरी वगैरे आम्ही कमळाबाईस उमरावतीस आणून तिच्या राजवैभवाला शोभेल अशा रीतीने केले. दिवाळसणास राजामातांना आम्ही उमरावतीस आणले. आम्ही त्यासाठी आमचा बंगला उत्तम शृंगारला होता. सर्व व्यवस्था पाहून राजेसाहेबांनी प्रशंसोद्गार काढले. त्यांचे त्यावेळचे वागणे आम्हांस फार साधेपणाचे व प्रेमळ असे वाटले. त्यांच्यासाठी आम्ही मोठी मेजवानी केली. गावातले मोठेमोठे लोक बोलाविले होते. त्यांत दादासाहेब खापर्डेही होते. तेवढ्यावरून राजेसाहेब सांगलीला परत गेल्यावर म्हणे पोलिटिकल एजंट त्यांना रागावून म्हणाला, "जोशांनी खापर्ड्यांना तुमच्या पंगतीला जेवायला बोलवायला नको होते. ही गोष्ट गैरशिस्त झाली!" ही हकीगत अण्णासाहेबांना कळल्यावर त्यांनी चीफ कमिशनरची भेट घेऊन त्यांना सांगितले, "माझ्या घरी राजेसाहेब आले त्यावेळीं मी जी पाहुणी जेवायला बोलाविली त्यांबद्दल पोलिटिकल एजंटने राजेसाहेबांना काय म्हणून बोलावे? ह्या माझ्या खाजगी गोष्टी असून ही माझी जबाबदारी आहे. त्याबद्दल राजेसाहेबांना का दोष? माझ्या घरी मी कोणालाही बोलावू शकतो; त्याला राजकीय स्वरूप काय म्हणून दिले जाते? तुम्ही कृपा करून हे माझे म्हणणे पोलिटिकल एजंटला कळवा!"

हे सांगलीचे लग्न झाल्यापासून इंग्रज सरकारचा अण्णासाहेबांवर फारच डोळा! पण ते मुळीच डगमगले नाहीत. परंतु त्यामुळे राजेसाहेब मात्र आमच्याशी फार जपून वागू लागले! या राजेलोकांना पोलिटिकल एजंटचा फार वचक असे.

आम्ही स्वतंत्र वातावरणात वाढलेली माणसे; आम्हांला कोणाची भीती होती? यानंतर याबाबत आम्हांला असे अनेक प्रसंग आले, त्याबद्दलची हकीगत पुढे ओघाओघाने सांगेन.

● ● ●

मला वाटते १९११ सालीच असेल, हिंदुस्थानातील कौन्सिलच्या निवडणुका झाल्या. रावबहादुर मुधोळकर कलकत्त्याच्या मुख्य कौन्सिलचे सरकारनियुक्त सभासद नेमले गेले होते. त्यानंतर सार्वजनिक निवडणुका झाल्या. वऱ्हाडच्या जमीन-दारांतर्फे अण्णासाहेब कौन्सिलचे उमेदवार म्हणून उभे राहिले. अण्णासाहेबांच्या काही हितशत्रूंनी त्यावेळी अण्णासाहेबांविरुद्ध खूप प्रचार केला. त्यात इंग्रज अधिकाऱ्यां-कडून त्यांना फूस मिळाली. अण्णासाहेब क्रांतिकारक आहेत असा त्यांचा संशय होताच. शिवाय उमरावतीत अण्णासाहेबांच्या प्रोत्साहनाने राष्ट्रीय शाळा, भिडे मास्तरांचा आखाडा, वगैरे संस्था निघाल्या होत्या; आणि व्हॉलंटियर्स क्लबमध्ये पुष्कळ प्रयत्न करून त्यांनी प्रवेश मिळविला होता. हे इंग्रज अधिकाऱ्यांना डाचतच होते. पण इतके करून या निवडणुकीत अण्णासाहेब बहुमताने निवडून आले. कौन्सिलमधील त्यांची भाषणेही फार उपयुक्त व प्रभावी म्हणून गाजली.

यानंतर मला वाटते १९११ अखेरच असावी, पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांनी दिल्लीस येऊन मोठा दरबार भरविला. अनेक थोर राजेरजवाडे, थोर विद्वान मंडळी, कौन्सिलचे सभासद, इत्यादिकांना सरकारातून आमंत्रणे दिली गेली. खुद्द इंग्लंडचे सार्वभौम बादशहा सम्राज्ञीसह दिल्लीच्या सिंहासनावर बसण्यासाठी यायचे हा अपूर्वच योग होता. त्या समारंभाची तयारी करण्यात कित्येक महिने अगोदर सरकारी अधिकारी निमग्न झालेले दिसत होते.

अनेकांना बोलावणी होती, त्यांत अण्णासाहेबांनाही होते. दिल्लीचे पल्ले दूरदूरचे म्हणून आम्ही तेथे नेण्यासाठी एक नवी मोटर विकत घेतली. पण माझ्या मनाला हुरहुर वाटली की, आपल्या आवडत्या सुलक्षणी घोड्यांना अशा मोठ्या दरबार–मिरवणुकीतून मिरवण्याचा सुयोग नाही लाभणार! परंतु योगायोग असा की, आमचे यवतमाळचे स्नेही रावबहादुर मुंडले यांनाही त्या दरबारासाठी आमंत्रण आले व त्यांनी दिल्लीस त्यांच्यासाठी म्हणून आमची चौचाकी घोडे-जोडीची गाडी मागितली. प्रत्येक निमंत्रित पाहुण्याला त्याच्या वाहनांचा जो खर्च पडेल तो सगळा सरकारातून मिळणार होता, व त्यामुळे आमच्या त्या सुलक्षणी घोडेजोडीस गाडीसह दिल्ली दरबारला जायला मिळाले.

अण्णासाहेबांबरोबर मलाही दिल्लीदरबारचे आमंत्रण होते व आम्ही जाण्याचे बेत करीत असता सांगलीहून राजेसाहेबांचे पत्र आले की, आमचा दिल्लीत मोठा कँप पडणार आहे, त्यासाठी आमचे नातेवाईक व काही मानकरी मंडळी यांना तिथे नेण्याची आम्हांला परवानगी आहे; तरी आक्कासाहेबांनी सर्व मुलांसह आमच्या कँपात रहावे." त्यांचा व कमळाबाईचा फारच आग्रह पडला, तेव्हा आम्ही त्यांच्याकडे उतरण्याचे ठरविले. अण्णासाहेब एकटेच वऱ्हाडच्या मंडळींबरोबर वऱ्हाडच्या क्यांपात उतरले.

सांगलीकर मंडळींची मुंबईहून स्पेशल ट्रेन जाणार होती. तेथे मी मुलांसह त्यांना जाऊन मिळाले. जंजिऱ्याचे नबाब व सांगलीचे राजे यांची मिळून ती ट्रेन होती. त्यांत सर्व तऱ्हेच्या सुखसोयी—स्वयंपाकघर, जेवणघर वगैरेसुद्धा—स्वतंत्र होत्या व तेथे आमच्या डब्यातून गाडी चालू असतानाही जाण्याची वाट (corridor) होती. आमच्याबरोबर राजेसाहेबांच्या भगिनी सौ. आक्कासाहेब मेहेंदळे याही होत्या. त्यांचा स्वभाव फारच चांगला, मनमिळाऊ व विनोदी होता. त्यामुळे आमचा दिल्लीपर्यंतचा दूरचा प्रवास फारच मजेत, गप्पागोष्टी वगैरे हास्यविनोदात झाला! आम्ही दिल्ली स्टेशनवरूनच परस्पर प्रथम हरिद्वार व आग्रा पाहून येण्याचे ठरविले होते व म्हणून दिल्लीदरबारपूर्वी काही दिवस अगोदरच आम्ही त्या मुलुखात गेलो होतो. हरिद्वारला प्रथम गेलो. तेथे आमचे राहणे तीन दिवस पडले. त्या हरिद्वारची ती दिव्य गंगा, काय तिचे निर्मळ पाणी! कैक फूट खोल व किती शुद्ध! मोती जर आत पडले तर तळाशी दिसावे! तेथील देवळांपेक्षाही तेथील नदीकिनारा व त्या-सभोवतीचा रमणीय देखावा मला फार आवडला. माझे तर तेथून पाऊल निघेना.

तिथल्या पंडे लोकांचा त्रास मात्र विचारू नका. त्या पवित्र व नितांत रमणीय स्थानाचे पवित्र वातावरण भ्रष्ट करायलाच जणू ते निघाले होते. ह्या बाबतीत काही सुधारणा होणे अत्यावश्यक आहे. मोठ्या जड पावलांनी आम्ही हरिद्वार सोडून आग्र्यास गेलो. तेथे पाहण्यासारखे खूपच आहे. ताजमहालची वर्णने किती तरी ऐकली व वाचली होती, पण ह्या वर्णनात व प्रत्यक्ष पाहण्यात जमीनअस्मानाचा फरक आढळला. मला ताजमहालचा जो विशेष वाटला तो म्हणजे त्याच्या अवाढव्य विस्तारात सामावलेला त्याचा गोंडस आटोपशीरपणा. हा चमत्कार त्या वास्तूमध्ये मोठ्या खुबीने साधला आहे. दरवाजातून पाहताच हा आश्चर्यकारक गोंडसपणा दृष्टोत्पत्तीस येतो. ताजमहाल आम्ही चांदण्यात, सूर्योदयाचे वेळी व सूर्यास्ताच्या वेळी पाहिला. तरी नेत्रांची तृप्ती होईना.

आग्र्यातील इतर इमारतींचेही वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात. मुख्य राजवाडा ज्याने बांधला त्या शहाजहान बादशहाची दालने, पुढे त्याच्याच मुलाने त्याला कैद करून ठेवलेली ती दळभद्री खोली, स्वर्गतुल्य राजवाड्याच्या तळघरात बांधलेल्या बंदिवानांना कोंडण्याच्या अंधाऱ्या व दमट कोठड्या, ही सारीच दृश्ये

मन हेलावून सोडतात. राजवाड्यातील स्नानगृहे, तेथे रंगारंगांच्या दिव्यांवरून पडणारे पाण्याचे कृत्रिम धबधबे, सर्व महालांतून, थंडीत गरम पाणी पोहोचविणाऱ्या, तर उष्णतेत थंड पाणी खेळविणाऱ्या संगमरवरी पाटांची किमया,—केवढे कुशल इंजिनीयर असले पाहिजेत ते ! जिकडे पहावे तिकडे शुभ्र संगमरवरी दगडांच्या भिंती व जमिनी ! त्यांवर नानातऱ्हेचे व नानारंगांचे कौशल्यपूर्ण नक्षीकाम ! मुख्य दरबारची जागा आता ओसाड पडलेली असली तरीही तिची रमणीयता कमी झाली नाही. मात्र गतवैभवाच्या या सावल्या पाहून मन उदासही झाल्यावाचून राहत नाही.

आग्ऱ्यातून निघताना आमची बरीच गैरसोय झाली. आम्ही स्टेशनपासूनच्या फार दूर अशा 'आरामबागे'त उतरलो होतो. प्रथम नोकरांना पुढे धाडून दिले व त्यांना पोहोचवून आमच्या मोटारी परत येताना नादुरुस्त झाल्या. त्यामुळे एक गाडी चुकली. दुसरी होती मध्यरात्रीला. सर्वांना भुका लागल्या. बरोबर थोडा शिधा होता. मी विचार केला, आता आपणच पिठलेभात करून सर्वांना जेवू घालावे. मी इकडे शिध्याचे सामान काढीत आहे तो तिकडे आमच्या राज-जामातांनी ( राजे-साहेबांनी ) त्या अंधारातच बाहेर हिंडून लाकूडफाटा जमवून आणला. त्यांनी मला तीन दगडांची एक चूल मांडून दिली. मला त्यावेळी भारीच संकोचल्यासारखे झाले. याच वेळेस कमळाबाईस काही दिवस गेले होते. तिला जपताजपता मी काळजी-खाली दमून जाई. आमच्या मोटारी दुरुस्त होईपर्यंत रात्रीचे अकरा वाजले. तोपर्यंत आमची पिठले–भाताची जेवणी उरकली. मोटारी नीट झाल्यावर आम्ही एकदाचे स्टेशन गाठले.

दिल्लीस पोहोचल्यावर तेथील ते अफाट वैभव दृष्टीस पडले ! मोठमोठ्या वर्णनांनी भरलेली अनेक पुस्तके या विषयावर लिहिली गेली आहेत. मोगल-बादशहांच्या नंतर असला दरबार हाच असे म्हणावे लागेल. त्यापेक्षा हा सरस नसेल, पण एकदोन पिढ्या निघून गेलेल्या असल्यामुळे हा नाविन्यपूर्ण वाटला ह्यात शंका नाही. एवढे मात्र निःसंशय की, विलायतेत असलेल्या दरबारांपेक्षा ह्या दरबाराचा थाट मोठा होता.

राजेलोकांपैकी प्रत्येकाने आपले कसकसे क्यांप बसवावे, तेथील सजावट कशी करावी, बगीचे कसकसे करावे, सरंजाम किती आणावा इत्यादी सर्व अगदी बारकाईने पढविण्यात आले होते; आणि ही माहिती कित्येक महिने आगाऊ ज्याची त्याला पुरविण्यात आली होती. दिल्लीत त्यावेळी जिकडे नजर टाकावी तिकडे पांढऱ्या शुभ्र तंबूंचे क्यांपच क्यांप ! दृष्टीच्या टप्प्यापलीकडेही हा पांढरा शुभ्र समुद्र पसरलेला भासमान होत होता. त्यांवर लावलेल्या पताका, तेथे उभारलेल्या कमानी व इतर सजावट वाऱ्याच्या झुळकीसरशी कंपायमान होई, तेव्हा त्या श्वेत समुद्रावर लाटा उसळत आहेत असा भास होई. ठिकठिकाणी मंगल वाद्यांचे व ब्यांडचे सूर ऐकू येत. आम्ही रोज मोटारीत बसून क्यांप पाहण्यासाठी बाहेरून बाहेरून फेर-

फटका मारीत असू. क्यांपचे बगीचे तर अल्पावधीत इतके टवटवले होते की, एक नंदनवनच उभे राहिल्याचा भास होई. भोपाळच्या बेगमेचा बगीचा सर्वोत्तम ठरला म्हणे! काश्मीरच्या महाराजांच्या क्यांपचा तट व दरवाजा काश्मिरी नक्षीदार लाकडावर कोरलेला होता. पुढे त्यांनी तो इग्लंडच्या राजाला नजर दिला म्हणून ऐकले. कुणाकुणाच्या कामाचे, कौशल्याचे वर्णन करू? प्रत्येकाने आपापल्या कामात पराकाष्ठा केली होती!

ह्या सर्व गडबडीत दरबारचे अगोदर आम्ही दिल्लीचा लाल किल्ला व मोती मशीद पाहण्यास गेलो. त्या इमारती पाहताना त्यांचे वैभवहीनत्व मनात येऊन उदासही वाटे, व उलट त्यांची वैभवशाली बांधणी पाहून आदरही वाटे. काय असेल ते असो, येथे किंवा आग्र्यास आम्ही काही नवीन पाहत आहो असे वाटलेच नाही. सर्व काही पाहिलेच आहे, सर्व काही माहितीतीलच आहे, असे वाटे. का असे वाटे याचे स्पष्टीकरण मजजवळ नाही. पण असे वाटत होते हे खरे. इतके होते तरी ते पुन्हापुन्हा पाहावेसे वाटे. अद्याप १९४२ मध्येही ते पाहावेसे वाटते. असो.

या दिल्लीदरबारप्रसंगीची शिस्त व व्यवस्था अद्वितीय होती. एक वर्ष आधीपासून त्याची तयारी चालली होती. खास सरकारी कमिट्या नेमून सर्व कार्यक्रम आधीच आखून झालेले होते. बादशहा व सम्राज्ञी अमुक वेळेला दिल्लीच्या तख्तावर चढतील हे सुद्धा आधीच ठरविण्यात आले होते; आणि वर्षभर आधी ठरल्याप्रमाणे बरोबर घडवून आणण्यात आले. इंग्रज म्हणजे राजा असो की रंक असो, शिस्त व वेळापत्रक तंतोतंत पाळतो, हे मोठे आश्चर्यकारक व अभिनंदनीय वाटते; व देवा, आमच्या लोकांत हा गुण केव्हा आणशील, आम्हांला स्वराज्य केव्हा मिळेल, व आम्हीही आपल्या गुणांनी केव्हा तळपू असे म्हणावेसे वाटते!

समारंभाच्या सातआठ दिवस अगोदर राजे लोकांनी आपापल्या सरंजामासह गाड्यांत बसून कसे जायचे, बादशहा व सम्राज्ञी तख्तावर बसल्यानंतर त्यांना उत्थापन कसे द्यायचे, मुजरे कोणत्या क्रमाने व कसेकसे करायचे या सर्व गोष्टींची चकचकीत तालीम त्यांना देण्यात आली होती. मिरवणूक पोचण्यास किती वेळ लावायचा, त्यासाठी गाडीघोड्यांच्या चाली कशा ठेवायच्या, ह्याची देखील आगाऊ एकदोन वेळ तालीम घेण्यात आली होती. त्यावेळी सिनेमा किंवा चलच्चित्रे नव्हती, तरी पुष्कळ स्थिर चित्रे वर्णनासह प्रसिद्ध झाली आहेत.

बादशहा व सम्राज्ञी यांच्या दिल्लीप्रवेशाची मिरवणूक पाचसहा मैल लांबीच्या रस्त्यावरून जायची होती. त्यासाठी कोण कडेकोट बंदोबस्त ठेवला होता! सबंध रस्ताभर दुतर्फा सुसज्ज बंदुकी घेतलेले गोरे शिपाई उभे होते. त्याशिवाय मिरवणूक पाहणारांच्या जमावात साध्या पोषाखातले अनेक गुप्त पोलीस पेरलेले होते म्हणतात. मिरवणूक पाहणाऱ्या लोकांची कोण ती गर्दी! रस्त्याच्या बाजूच्या घरांचे सर्व

मजले, छप्परेसुद्धा माणसांनी फुलून गेली होती. निमंत्रित पाहुण्या बायकांसाठी एका मोक्याच्या जागेत स्वतंत्र दालन केले होते. मिरवणुकीत बादशहा एका अत्यंत उमद्या घोड्यावर बसून प्रथम पुढे चालत होते. तशी म्हणे विलायतेत पद्धत आहे. बादशहा म्हणजे सर्वांचा म्होरक्या–तो प्रथम एकटाच पुढे चालायचा, असे आम्ही ऐकले. त्यानंतर बादशहाचे बॉडीगार्ड (खास संरक्षक दल) व त्यामागून बड्या बड्या राजेमहाराजे यांच्या चारचार घोड्यांच्या गाड्या होत्या. निजाम, म्हैसूर, ग्वाल्हेर, इंदूर वगैरे संस्थानिकांच्या गाड्या सोन्याच्या होत्या. हजारो लाखो लोक बादशहांचा जयजयकार करीत होते. आपण गुलामगिरीत आहोत याचा त्यावेळी जणू काही सर्वांना विसरच पडला होता. राजेमहाराजे यांना शक्य तितके झगझगीत पोषाख व मोठाले अलंकार घालण्यास इंग्रज अधिकाऱ्यांनी खास सूचना दिल्या होत्या असेही ऐकले! एवढ्या सर्व राजेलोकांत फक्त तीनच मंडळी साध्या पोषाखात व अलंकार न घातलेली, लक्षात येण्याजोगी दिसून आली. एक हैद्राबादचे निजाम, दुसरे बडोद्याचे महाराज व तिसरे सांगलीचे राजेसाहेब.

प्रत्यक्ष दरबाराचा थाट काय वर्णावा? त्या प्रसंगाला शोभेल अशी सर्व प्रकारची सजावट तेथे केलेली होती. विशेष म्हणजे प्रत्येकी आठ देखणे तरुण राजकुमार बादशहांच्या व सम्राज्ञीच्या अंगावरचा गाऊन (पाठीमागे सोडलेले उपवस्त्र) उचलून धरण्यास होते. विलायतेत म्हणे तशी पद्धत असते. हे सर्व राजकुमार सारख्या उंचीचे व सारखे पोषाख घातलेले होते. हे गोजिरवाणे बालवयी राजकुमार मला फार आवडले; पण मनात असेही येऊन गेले की, यांच्या वाड-वडिलांनी केवढे पराक्रम केले, स्वातंत्र्यासाठी आपले रक्त सांडले, आणि त्यांच्या वंशजांना इंग्रजांचे असे दास्य करण्याचा प्रसंग यावा, हा केवढा दैवदुर्विलास! असो.

या दरबारातील बडोद्याच्या महाराजांचा मुजरा फार गाजला. बादशहाला पहिला मुजरा करण्याचा मान निजामाला होता. निजामाचा ठराविक साधा पोषाख होता. त्यांनी अंगावर काही दागिने घातले नव्हते. मुसलमानी पद्धतीप्रमाणे त्यांनी पुढे येऊन मुजरा केला. त्यानंतर बडोद्याच्या महाराजांची पाळी आली. पांढरा शुभ्र अंगरखा, पांढरी चुणीदार विजार, डोक्यावर बडोदेशाई पगडी, अंगावर कोणतेच अलंकार नसलेले, हातात तलवार न घेता एक बारीक वेताची छडी घेऊन ते पुढे आले. आपण मांडलिक नसून मित्र आहो, असे व्यक्त करण्याचा त्यांचा हेतू होता, असे नंतर लोक म्हणू लागले. त्यांची उंची फार नव्हती. सप्रमाण चालण्याची ऐट व एकंदर रुबाब मोठा उमदा वाटत होता. ते पुढे येताच टाळ्यांचा मोठा गजर झाला. बादशहा व सम्राज्ञी यांच्या पुढे त्यांनी किंचित मान वाकवून मुजरा केला, व दोन तीन पावले मागे सरकून पाठ फिरवून ते आपल्या जागेवर जाऊन बसले. त्यावर टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. "आपला मान ठेवून कसा ऐटीत मुजरा केला?" असा ध्वनी जणू काही प्रेक्षकांतून निघू लागला. लोक

हळूहळू एकमेकांत बोलू लागलेले मात्र स्पष्ट दिसले. पण इंग्रज अधिकाऱ्यांची तोंडे मात्र लालबुंद होऊन फुगल्यासारखी दिसली. मला त्यावेळी शिवाजीमहाराजांनी भर दरबारात औरंगजेब बादशहापुढे न वाकण्याचे जे थोर धारिष्ट्य दाखविले होते त्याची आठवण झाली.

त्यानंतर अनेक राजे जरीचे भरगच्च पोषाख व मोठेमोठे अलंकार घालून एकामागून एक असे मुजऱ्यास पुढे आले. त्यांच्यांतील कित्येकांनी प्रमाणाबाहेर वाकून मुजरे केले, तेव्हा मोठी मौज दिसली. ह्या बाबतीत भोरच्या पंतसचिवांनी तर कमालच केली. त्यांनी दहा अकरा वेळा बादशहाला मुजरे केले ! लोक खदखदू लागले. एक, दोन, तीन असे आकडे लोकांच्या तोंडून बाहेर पडू लागले. तरी पठ्ठ्याने तितकेच मुजरे सम्राज्ञीपुढे सुद्धा मोजले !

पण सर्व देखावा एकंदरीत गंभीर व परिणामकारक झाला. मात्र त्यानंतर व्हॉइसरॉयकडून बडोद्याच्या महाराजांना तंबी मिळाल्याचे लोक बोलू लागले. सयाजीमहाराजांवर असा प्रसंग पूर्वीही आल्याचे ऐकिवात होते. इंग्लंडचे सातवे एडवर्ड जेव्हा गादीवर आले, तेव्हा हिंदुस्थानात झालेल्या समारंभासाठी बादशहांचे बंधू ड्यूक ऑफ क्यॅनॉट यांना बादशहाने आपले प्रतिनिधी म्हणून हिंदुस्थानात पाठविले होते. त्या प्रसंगी हिंदुस्थानात जो दरबार झाला त्यावेळी हिंदुस्थानचा व्हाइसरॉयही दरबारात प्रामुख्याने हजर होता. त्याला सयाजीराव महाराजांनी तुटपुंजा मुजरा करून ड्यूक ऑफ कॅनॉटला रुबाबात दरबारी थाटाचा मुजरा केला. त्यावेळी त्या वेळचा तो व्हाइसरॉय असाच गरम झाला होता म्हणे ! पण महाराजांनी त्याला स्पष्ट सांगून निरुत्तर केले होते की, "इंग्रजांशी मी जो तह केला आहे तो बादशहाचा दोस्त म्हणून. तेव्हा बादशहाच्या भावाला मी योग्य तो मुजरा केला. त्यानंतर व्हाइसरॉयला तसा मान देण्याची जरूरी उरत नाही."

या दरबारप्रसंगी ज्या काही महत्त्वाच्या म्हणून घोषणा केल्या गेल्या त्यांतली सर्वांना पसंत पडलेली घोषणा म्हणजे कलकत्ता ही राजधानी बदलून दिल्ली ही राजधानी केली ! त्यावेळी पुष्कळांनी उद्‌गार काढले की, "दिल्ली राजधानी होणे हे हिंदी स्वराज्याला शुभ व इंग्रजांच्या राज्याला अशुभ. कारण दिल्लीचे तख्त एकाकडे फार दिवस राहत नाही !"

ह्या दरबारच्या दिवसांत बडोद्याच्या महाराणीसाहेब व महाराज यांनी मला व अण्णासाहेबांना त्यांच्या क्यांपात तीनचार वेळा भेटीस बोलाविले. एकदा मी अशीच महाराणीसाहेबांकडे भेटायला गेले होते. त्या दर वेळेला आमच्याशी फार अगत्याने व मोकळेपणाने वागत. त्या दिवशी मी गेले असता त्यांच्याकडे नेपाळच्या महाराणी येत आहेत अशी वर्दी आली. मी मग लागलीच उठले व "आता मी घरी जाते, पुन्हा पुढे मग येईन" असे म्हणाले. त्यावर मला बसवून घेऊन त्या म्हणाल्या "बसा हो, या महाराणी फार बघण्यासारख्या सुंदर आहेत.

आमचे त्यांचे काही जुने नातेही आहे. पूर्वीच्या जमान्यात एका नेपाळच्या महेशांनी आमची बडोद्याची एक राजकन्या पळवून नेऊन आपली एक राणी केली होती म्हणतात ! ”

इतके बोलणे होत आहे तो नेपाळच्या महाराणी बडोद्याच्या कँपात येऊन पोहोचल्याची वर्दी आली. बडोद्याच्या महाराणींनी त्यांना सामोरे जाऊन त्यांचे दरबारी थाटाने स्वागत केले. ते दृश्य प्रेक्षणीय वाटले. सोन्याच्या काठ्या हातात घेतलेले बडोद्याचे भालदार चोपदार, झगझगणाऱ्या पोषाखांचे त्यांचे हुजरे व दासी, आणि नेपाळ नरेशांकडील भालदार चोपदार व त्यांच्या अनेक दासदासी यांचे उभय महाराण्यांना मुजरे झाले.

नेपाळच्या महाराणींचा त्यावेळचा पोषाख काही वेगळ्याच तऱ्हेचा होता. मी पूर्वी तसा पोषाख कधी पाहिला नव्हता. त्यांनी अफगाणी तऱ्हेची पण फार सैल अशी चुण्याचुण्यांची साठणीची विजारच जणू अशी परिधान केली होती. त्यावर अंगात एक भरजरी सैल सदरा व ज्याकीट. अंगावर एक फारच मनोहर झिरझिरीत ओढणी खांद्यावरून सोडली होती. त्या ओढणीचा मागचा भाग आठ नेपाळी दासींनी उचलून धरला होता. नेपाळ महाराणींच्या डोक्यावर खूपशा बारीक वेण्या घालून मुगुटासारखा आंबाडा घातला होता. त्या आंबाड्यावर रत्नांची फुले झळकत होती. महाराणीसाहेब अंगाने सडपातळ व नाजुक गौरवर्णी होत्या. रूप तर इतके सुंदर की, गुलाबाचे एखादे उमलत असलेले कोमल फूलच ! असे सौंदर्य मी पूर्वी कुठेच पाहिले नव्हते. त्यांचे वय वीसबावीस वर्षांचे वाटले, पण मागाहून कळले की, त्या पंचेचाळीस वर्षांच्या होत्या ! दोघी महाराण्या दुभाष्याच्या साहाय्याने एकमेकींशी बोलत होत्या. सुमारे एक तास त्यांची ही मुलाखत चालली होती. पण वेळ कसा भुरकन निघून गेला, समजलेही नाही.

ह्याच सुमाराला बडोद्याच्या राजकन्या इंदिराराजे यांचा ग्वाल्हेरच्या महाराजांशी विवाह ठरल्याचे जाहीर झाले होते. ग्वाल्हेरच्या प्रथम महाराणींना मूल होणार नाही असे वैद्यकीय दृष्ट्या ठरल्याने, ग्वाल्हेर नरेशांनी हा दुसरा विवाह करण्याचे ठरविले होते असे म्हणतात. तरी पण सयाजीराव महाराजांसारख्या प्रगमनशील नरेशाने असल्या विवाहास संमती देऊन सवतीवर आपली मुलगी द्यावी याबद्दल बरीच टीकाही होत होती. दिल्लीदरबारनंतर एकदोन महिन्यांतच हे लग्न होणार होते. लग्नास येण्याविषयी महाराणीसाहेबांनी मला फार आग्रहपूर्वक आमंत्रण दिले होते. पण इंदिराराजेंनी पुढे ते लग्न मोडून विलायतेत जाऊन कुचबिहारच्या महाराजांशी लग्न लावले, हा सारा इतिहास प्रसिद्धच आहे.

दिल्लीदरबारच्या वेळी झालेल्या अनेक कार्यक्रमांपैकी एक मी कधी विसरणार नाही, इतका तो गोंदल्याप्रमाणे माझ्या मनावर ठसला आहे. तो म्हणजे इंग्लंडच्या सम्राज्ञीने दिल्लीस जमलेल्या पाहुण्या स्त्रियांसाठी दिल्लीच्या राजवाड्यात दिलेली

' गार्डन पार्टी. ' यावेळी हिंदुस्थानातल्या अनेक महाराण्या, राजकन्या व बड्या-बड्या नामवंत स्त्रिया, आपली जणू काय ठेवणीतील वस्त्रे व मोठमोठे किंमती अलंकार यांचे प्रदर्शन करण्याची शिकस्त करीत होत्या. आमच्यासारख्या निमंत्रित पाहुण्यांनाही ' पार्टी 'चे आमंत्रण होते. सर्व स्त्रियांशी इंग्रज सम्राज्ञीनी हस्तांदोलन केले. हा लाभ चुकता कामा नये म्हणून तेथल्या राण्यामहाराण्यांची कोण धांदल, आणि केवढी अहमहमिका ! माझीही त्या हस्तांदोलनात एकदा वर्णी लागली. पण मी खरेच सांगते, त्यामुळे माझ्या अंगावरचे मास मुळीच वाढले नाही ! मला त्यात काही मोठे झाले असे वाटले नाही. पण त्यावेळीं मला एका हिंदी न्यायाधीशाची जुनी गोष्ट आठवली. त्यांची प्रिन्स ऑफ वेल्सशी हस्तांदोलन करण्याची वर्णी लागली होती, व ते ज्याला त्याला सांगत "I actually shook hands with the Prince of Wales !" यावर पुण्याच्या काही विनोदमूर्तींनी अशी एक थाप उठविली की, या न्यायमूर्तींनी त्यानंतर कुणाशी उजव्या हाताने शेकहँड केलाच नाही ! दुसऱ्या एका गप्पीदासाने त्यावर अशी कडी केली की, त्यांनी त्यानंतर आपला उजवा हात कधी धुतलाच नाही ! असो. या गोष्टीचे स्मरण होऊन मला त्या वेळेसही मनातल्या मनात हसू आले.

ही गार्डनपार्टी दोनतीन तास चालली. त्याप्रसंगी बडोद्याच्या महाराणी-साहेबांनी कमळाबाईची व माझी किती तरी महाराण्यांशी ओळख करून दिली. त्यावेळीं ग्वाल्हेरच्या व इंदूरच्या महाराणी जवळ जवळ बसल्या होत्या. इंदूरच्या महाराणी चंद्रावती आमच्याकडे पाहून चमत्कारिक तऱ्हेने हसत होत्या. बडोद्याच्या महाराणी मला हळूच एकीकडे म्हणाल्या, " त्या तुमच्या पायातील ' शूज ' वर टीका करताहेत. " मला ते ऐकून उमज पडेना. पण महाराणीसाहेबांनी खुलासा केल्यावर समजले. पार्टीला पेटंट लेदरचे शू घालून येण्याच्या सूचना अगोदर-पासूनच्या होत्या. त्याप्रमाणे मी इतरांप्रमाणे पेटंट लेदरचे शू घातले होते. पण माझे शू ' चालण्याच्या पद्धतीचे ' ( walking shoes ) होते, गार्डनपार्टीच्या पद्धतीचे नव्हते !

महाराणीसाहेब मला म्हणाल्या—

" तुमच्या ' शूज ' त्या जोड्या चालण्याच्या आहेत, गार्डन पार्टीच्या नाहीत म्हणून त्या हसताहेत हो ! "

" मला बाई हा भेद माहीत नव्हता. पुढे मी सावधगिरी बाळगीन. " मी बडोद्याच्या महाराणीसाहेबांना म्हटले.

" ठीक आहे. जरूर हे ध्यानात ठेवा. विलायतेत या गोष्टींना फार महत्त्व आहे " त्या म्हणाल्या.

" काय हो, तुमची मोठी मुलगी विलायतेंत आहे ना ? " त्या पुढे विषय बदलून बोलू लागल्या, " परत आल्यावर ती तुम्हांला तिकडच्या सगळ्या चालीरीती

सांगेल. बरीच भोळी आहे बरे का ती! मला विलायतेत दोनतीन वेळा भेटली होती. तिचे लग्न लौकर करून टाका. एखादा कुणी फसवून जाळ्यात अडकवायचा!"

त्यांचे हे शेवटले वाक्य ऐकून माझ्या पोटात धस्सच झाले. त्यांच्या ते लक्षात आले व त्या म्हणाल्या, "घाबरू नका. विलायतेत मी तुमच्या मुलीची नेहमी बारकाईने चवकशी करते. अद्यापपर्यंत सर्व ठीक आहे. पण तिचे वय लहान आहे, तरुण आहे ती, म्हणून मित्रत्वाच्या नात्याने हे सांगितले."

इतक्यात जंजिऱ्याच्या बेगमसाहेब आपली बहीण मिसेस फैजी रहिमान यांच्याबरोबर तेथे आल्या. त्यांचे माहेर मुंबईच्या सुप्रसिद्ध धनाढ्य तैयबजी घराण्यातले होते. ह्या घराण्याचा व आमचा महाबळेश्वरी फार चांगला घरोबा झाला होता. त्यामुळे त्या माझ्याशी फार प्रेमाने व साधेपणाने वागायच्या. त्या म्हणाल्या, "तुम्ही पतियाळाच्या महाराणी पाहिल्यात का? इथे जमलेल्या साऱ्याजणींत रूपाने त्या सरस आहेत. बाकी सर्वांचे नंबर त्यांच्या खालीच लागतील. सौंदर्यात त्यांचा पहिला व तुमच्या मुलीचा—सांगली राणीसाहेबांचा—दुसरा! जे ते मला तुमच्या कमळाबाईकडे बोट दाखवून 'ह्या कोण' म्हणून विचारत आहे." हे ऐकल्यानंतर माझ्याही लक्षात आले की कमळाबाईकडे तेथील स्त्रिया वळून वळून पाहत आहेत.

तेथे जमलेल्या बहुतेक महाराण्यांना इंग्रज 'कंपॅनियन' होती. त्या मला फार उद्दाम वृत्तीच्या वाटल्या. त्यांनी आपल्याप्रमाणेच आपल्या हातात सांपडलेल्या राण्यामहाराण्यांना रंगरंगोटी व केशभूषा करायला लावले होते. त्यांची बोलणी मला समजत होती, त्यामुळे त्या कमळाबाईची प्रशंसा करीत होत्या हे मी जाणले. पण त्यामुळे मी हुरळून न जाता, या महामाया आमच्या राण्यामहाराण्यांवर, त्यांची मने भ्रष्ट करण्यासाठी इंग्रजांनी सोडल्या आहेत की काय, असे मनात येऊन माझे मन खिन्न झाले.

जंजिऱ्याच्या बेगमसाहेबांनी तेवढ्या गडबडीत पतियाळाच्या महाराणीसाहेबांना शोधून काढून त्यांची व आमची ओळख करून दिली. असे अप्रतिम लावण्य मी साऱ्या जन्मात पाहिले नव्हते! काय ती त्यांची गौरकांती झळकत होती! प्रत्येक अवयव अत्यंत रेखीव व अत्यंत कोरीव! कालिदासाने संस्कृतात वर्णन केलेले 'आकर्ण विशाल नयन' मला याच मूर्तीत प्रथम पाहायला मिळाले. त्यांची उंची सुमारे सव्वापाच फूट असावी. परंतु सडपातळ व अतिशय गोंडस बांधा! चालण्यात देखील केवढा गोडवा व भारदस्तपणा! सर्व काही अवर्णनीय! चितोडची पद्मिनीच मी प्रत्यक्षात पाहत आहे, असे मला वाटले. हे घराणे शीख, पण अस्सल रजपुतांचे आहे असे तेथे ऐकले. ही महाराणी त्या गार्डनपार्टीत जेथे जेथे हिंडली, तेथे तेथे स्त्रियांचा घोळका तिच्या भोवती जमून उघडउघड तिच्या तोंडावर तिची वाहवा करताना आढळे. त्यामुळे ती बिचारी लज्जेने चूर होऊन गेली आणि तिच्या



श्री. मोरोपंत जोशी ( वय ५० ) सौ. यशोदाबाई जोशी ( वय ४३ )

गालांवर अधिकच रक्तिमा विलसू लागला. आमच्या कमळाबाईशी तिने हस्तांदोलन केले तेव्हा तर बायकांचा फारच मोठा घोळका त्यांच्याभोवती जमला. "ही शकुंतला-मेनकेची भेट आहे" असे कुणी त्यावेळीं कुजबुजले. अशा रीतीने आम्ही अनेक गोष्टी बघत व अनुभवीत आमचा तो दरबारप्रसंगीचा दिल्लीचा संस्मरणीय मुक्काम संपविला व उमरावतीस परत गेलो.

यावेळीं कमळाबाई गरोदर होती, म्हणून जानेवारी १९१२ अखेर तिच्या सातव्या महिन्यात आम्ही तिला उमरावतीस आणून तिची डोहाळजेवणे केली. तिला त्यावेळीं फारच तेज चढले होते. तिच्या राजघराण्याला प्रथम मुलगा हवा होता. पण तिला चढलेले तेज पाहून मला खात्रीने वाटले की, हिला ह्यावेळीं मुलगी होणार! मी तिच्या सासूबाईंना पत्र लिहिले की, "रीतीप्रमाणे पहिले बाळंतपण माहेरी व्हायचे असते, त्याप्रमाणे ते आम्ही उमरावतीस करू इच्छितो." परंतु त्यांचा निरोप आला की, "आमच्या गादीची रीत आहे की, पहिले बाळंतपण सासरीच व्हायचे. तरी सूनबाईस आमच्याकडे लवकर पाठवून द्या." त्याप्रमाणे कमळाबाईला फेब्रुवारी महिन्यात आम्ही सांगलीस पाठविले. "बाळंतपणाचा एक महिना तरी तू माझ्याजवळ येऊन राहा" असा कमळाबाईने मला फार आग्रह केला. म्हणून मीही तिच्याबरोबर सांगलीस गेले. वास्तविक उमरावती सोडून इतके दिवस सांगलीस राहणे मला सर्व दृष्टींनी अडचणीचे होते. शिवाय लेकीच्या सासरी जाऊन राहणे मला पसंत नव्हते. पण मुलीच्या कल्याणासाठी मला तसे करणे भाग पडले.

सांगलीस जाऊन कमळाबाईच्या बंगल्यात राहण्याची ही माझी पहिलीच वेळ. मी माझ्याबरोबर एक मोलकरीण नेली होती. पण संस्थानची वागण्याची पद्धत फार वेगळी व जबाबदारीची. तिथल्या रीती माझ्या मोलकरिणीला शिकविताना मला फार त्रास पडला. तिथे उपचारच (formalities) फार! पण मी एकंदरीत पाहिले, कमळाबाईने घरात व्यवस्था उत्तम बसविली होती. राजेसाहेबांचाही नोकरांवर फार धाक होता. नोकरांनी कामाशिवाय अधिक बोलणे, गप्पा मारणे, खुशामत करणे वगैरे प्रकार त्यांना मुळीच चालत नसत. राजेसाहेबांचा स्वभाव जितका भिडस्त तितकाच धोरणी व दूरदर्शी होता. वयाच्या मानाने त्यांच्यात फारच गंभीरपणा व पोक्तपणा आलेला मला दिसला. लहानपणीच अंगावर येऊन पडलेली राज्यकारभाराची मोठी जबाबदारी हे याचे कारण असावे.

सांगलीच्या राजघराण्यात जरी पडद्याची चाल नव्हती, तरी पुरुषांचे दालन वेगळे असून तिथे कोणी बायका जायच्या नाहीत; तसेच बायकांच्या महालात ठराविक हुजऱ्यांशिवाय कोणी पुरुष मंडळी येत नसत. घरातही बायकांची व पुरुषांची रोजची जेवणे एकत्र अशी व्हायची नाहीत. बाहेरची कोणी पुरुषमंडळी राजेसाहेबांच्या भेटीस आली तर त्यांची व कमळाबाईची भेट व्हायची नाही. अशा

रीतीने कमळाबाईला. जवळजवळ पडद्यात असल्यासारखेच वागावे लागे. तिला लहानपणापासून तसली कधीच सवय नव्हती. पण प्राप्त परिस्थितीप्रमाणे ती समाधानाने वागत होती.

कमळाबाईच्या सासूबाईंची इच्छा तिचे बाळंतपण जुन्या पद्धतीनेच करावे अशी होती. पण राजेसाहेबांनी आमच्या इच्छेवरून ते नव्या पद्धतीने करण्याचे मान्य केले. सांगलीचे स्टेट सर्जन डॉ. देव यांनी एक उत्तम इंग्रज मिडवाईफ आगाऊच सांगलीस आणविली. ही बाई वयाने पोक्त व फार मिष्टास बोलणारी होती. पण मला तिचा चौकसपणा प्रमाणाबाहेर वाटे. मी बारकाईने शोध केला तो मला कळले की, कोल्हापूरच्या पोलिटिकल एजंटचा वशिला लावून ही बाई आली होती. हाच पोलिटिकल एजंट प्रथम कमळाबाईच्या लग्नाला विरोध करणारा होता. मला उगाच वाटू लागले, " हा साहेब या मिडवाईफमार्फत कमळाबाईच्या बाळंतपणात काही अडचण तर उत्पन्न करणार नाही ना ! या राजकारणातल्या गुंतागुंतीचे काय घ्या ? " मी आपली सर्व सुखरूपपणे पार पडावे म्हणून देवाचा रोज धावा करी !

योग्य वेळी ६ मार्च १९१२ रोजी कमळाबाई प्रसूत होऊन तिला कन्यारत्न झाले. राजकन्येचा जन्म म्हणून राजवाड्यात मंगलवाद्ये सुरू करवून तिला सलामी देवविली गेली. अधिकारी मंडळी तिला अभिनंदनार्थ नमस्कार करण्यास आली व त्यानंतर सर्व नोकरवर्गाने येऊन राजकन्येस मुजरे केले. काही कैद्यांना मुक्तता दिली व मोठा आनंदोत्सव सुरू केला.

राजकुमारी रूपाने फार सुंदर व तेजस्वी होती. मात्र वडिलांप्रमाणे ती किंचित सावळ्या रंगाची होती. तिचे बारसे कमळाबाईच्या अशक्तपणामुळे अंमळ पुढे ढकलावे असे मला वाटत होते. परंतु तिच्या सासूबाईंच्या आग्रहावरून ते बाराव्या दिवशीच करावे लागले. त्यामुळे कमळाबाईस फार वेळ ताटकळत बसावे लागून तिची फार दमणूक झाली. मुलीचे नाव ' इंदुमतीराजे ' ऊर्फ ताईसाहेब असे ठेवण्यात आले. मी माझ्याकडचा बाळंतविडा राजघराण्यास साजेसा यथास्थित करून तो रीतीप्रमाणे मांडून ठेवला. शांता व माणिक यांनी स्वतः शिवलेले कपडे पार्सलने पाठविले होते तेही मांडले. ते सर्वांनी फार वाखाणिले. मुलीला सोने, मोती यांची बाळलेणी, चांदीची भांडी, राजेसाहेब व कमळाबाई यांस उंची पोषाख व इतरांना योग्य ते अहेर मी दिले.

यानंतर मी लवकरच कमळाबाई व राजकुमारीसह सांगलीच्या क्यांपबरोबर महाबळेश्वरी गेले. कमळाबाईची प्रकृती अशक्त झाल्यामुळे पूर्वी योजिल्याप्रमाणे मला आधी उमरावतीस परत जाता आले नाही. मार्चअखेर सर्व मुलांना बरोबर घेऊन अण्णासाहेब उमरावतीहून महाबळेश्वरी आले. दरवर्षीप्रमाणे आम्ही स्वतंत्र

बंगला माझ्याने घेतला होता. सांगलीकरांनी 'कासम म्यानशन' हा बंगला घेतला होता. मी रोज रात्री तान्ह्या मुलीसाठी कमळाबाईकडे निजायला जायची व सकाळी तिचे व मुलीचे न्हाणेधुणे झाले म्हणजे घरी परत यायची.

यापूर्वी महाबळेश्वरी 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' स्थापन झाली होती. तिच्या स्थापनेत त्यावेळी अण्णासाहेबांनी बराच पुढाकार घेतलेला होता. त्या ठिकाणी टेनिसकोर्ट, बिलियर्ड, वगैरे खेळ ठेविले होते. त्यामुळे महाबळेश्वरी येणाऱ्या सर्व लहानथोर मंडळींच्या भेटीगाठी होऊन मित्रत्व वाढेल अशी अपेक्षा होती. त्या दृष्टीने अण्णासाहेब तिथे फार खटपट करीत.

ही लायब्ररी उघडण्याचा जो समारंभ झाला त्यासाठी खूप बायकापुरुष मंडळींना आमंत्रणे होती. त्या काळी अशा समारंभांना बायका फारशा जात नसत. आम्ही अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या बायका तिथे हजर होतो. त्यांत महाराष्ट्रीय हिंदु बाई अशी मी एकटीच होते. त्यामुळे मला भारीच संकोच वाटत होता. अण्णासाहेबांचा आग्रह होता की, "आता तुम्हांला हळूहळू यात पुढे यायला पाहिजे—ही सुधारणा व्हायलाच हवी." म्हणूनच मी गेले. त्याबद्दल विशेषतः आमच्या महाराष्ट्रीय मंडळींत फार टीका झाली म्हणे!

त्याशिवाय महाबळेश्वरी घोड्यांच्या रेसेस, पोलोचे सामने वगैरे पूर्वी चालत. गव्हर्मेंट हाऊसमधील 'ॲट होम' (At Home) म्हणा अगर गार्डन पार्टी म्हणा, हा सीझनमधील एक मोठा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम असे. तेथे जमलेल्या अनेक बड्याबड्या मंडळींना आमंत्रणे असायची. त्यावेळी इंग्रज अधिकाऱ्यांच्या पुढेपुढे करण्याची आपल्या हिंदी लोकांत खूप अहमहमिका लागायची! अण्णासाहेबांना ते मनाला फार लागत असे. आम्ही प्रथम या समारंभास जाण्याचे टाळीत असू. पण कमळाबाईचे लग्न झाल्यापासून आमच्या प्रत्येक हालचालीवर सरकारची बारीक नजर असल्याचे दिसून आले. तेव्हा आमची गैरहजेरी सरकारच्या डोळ्यांत खुपून त्याचा सांगलीच्या राजेसाहेबांना त्रास होईल, म्हणून या पार्ट्यांना आम्ही जाऊ लागलो.

एकदा तर फार गंमत झाली. लॉर्ड विलिंग्डन मुंबईचे गव्हर्नर असताना त्यांचा मुक्काम उन्हाळ्यात महाबळेश्वरी होता. लॉर्ड व लेडी विलिंग्डन यांच्याभोवती तिथे राजेरजवाडे व मोठेमोठे व्यापारी यांचे कडे पडलेले असायचे, व त्यांची खुशामत करण्याची सर्वांची धडपड चालू असायची! एकदा जंजिऱ्याच्या बेगमसाहेबांनी टूम काढली की, "आपण लेडी विलिंग्डनना एक मोठी पडदापार्टी देऊ व त्यावेळी त्यांना आपले काही देशी खेळ दाखवू." सर महादेव चौबळ त्यावेळी मुंबई प्रांतात एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर होते. त्यांच्याकडच्या मुलींनी बेगमसाहेबांना याबाबत मदत देण्याचे कबूल केले. चौबळांचा व आमचा पूर्वीपासूनचा खूप घरोबा होता. तेव्हा त्यांच्या घरच्या मुली, आमच्या मुली, तसेच महाबळेश्वरात आलेल्या

इतर काही मोठ्यांच्या मुली यांनी फुगड्या, झिम्मा वगैरे खेळ वाद्यांच्या तालावर त्या पडदापार्टीच्या वेळीं करून दाखविले. बायकाबायकांतच ते करावयाचे होते, म्हणून मुलींना त्यांच्या पालकांनी त्यांत भाग घेऊ दिला.

पण आयत्या वेळीं खुद्द गव्हर्नरसाहेबही या पडदापार्टीत येऊन दाखल झाले ! बेगमसाहेबांनी त्यांना गुपचूप आमंत्रण देऊन ठेविले होते, व ते येणार असल्याचे कोणालाही कळू दिले नव्हते. आम्हांला (व इतर बऱ्याच बायकांना) अशा प्रकारे गव्हर्नरना पडदापार्टीत आणणे बिलकूल आवडले नाही. स्वाभाविकपणे या पडदापार्टीची महाबळेश्वरात खूपच चर्चा झाली, व "चांगल्या थोरामोठ्यांच्या मुलींनी गव्हर्नरपुढे नाचून दाखविले" अशा तऱ्हतऱ्हेच्या त्यावर टीका झाल्या !

ह्याप्रमाणे अनेक तऱ्हांनी गव्हर्नरची खुषामत चाले. पण या सर्वांत विशेष असे एक पोक्त वयाचे व नुक्तेच गादीवर आलेले संस्थानिक यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाई. आपल्याविरुद्ध हे गव्हर्नरला काय सांगतील कोण जाणे, असे वाटून इतर संस्थानिक त्यांना फार घाबरत असेही ऐकू येई. पण आम्हांला त्याबद्दल घाबरण्याचे काहीच कारण नव्हते. मी त्याबद्दल वरील उल्लेखही केला नसता; पण त्यांनी आमच्याबद्दलही गव्हर्नरजवळ जी कागाळी केली त्याबद्दल आमची खरी बाजू वाचकांना कळावी म्हणून पुढील हकीगत सांगणार आहे. आम्हांला सर महादेवराव चौबळ व त्यांजसारख्या एकदोन जबाबदार स्नेह्यांकडून कळले की त्यांनी गव्हर्नरला सांगितले, "मोरोपंत जोशांनी आपली मुलगी सांगलीकरांच्या गळ्यात घालून त्यांना फशी पाडले व आता माझ्या मुलासही त्यांची तिसरी मुलगी माणिक ही देऊन त्याचे नुकसान करणार होते, पण त्यांचा तो व्यूह मी वेळींच हाणून पाडला." वगैरे. ह्या गोष्टीचा आम्हांला फारच संताप आला व अण्णासाहेबांनी त्यांना पुढील आशयाचे पत्र लिहिले, "तुम्ही गव्हर्नरजवळ जी माझ्याबद्दल कागाळी केली ती सर्वस्वी खोटी असून आमचा अपमान करणारी आहे. तुमच्या कॉलेज-पासूनची तुमच्या घराण्यातली भाऊबंदकी व कारस्थाने मला पूर्णपणे माहीत आहेत. असल्या घरात मुलगी देणे कालत्रयीही माझ्या स्वप्नीसुद्धा यायचे नाही. याबद्दल पूर्ण निकाल लागलाच पाहिजे. मी आव्हान देतो की, तुम्ही, तुमचा मुलगा, मी व एक जबाबदार गृहस्थ, यांनी लवकरच एकत्र जमावे; व माझ्याबद्दल जी खोटी व खोडसाळ अफवा तुम्ही उठविली आहे, ती पूर्ण खोटी आहे हे मी सिद्ध करून देतो..." वगैरे. त्याचे त्या संस्थानिकांनी काही उत्तरच धाडिले नाही; पण मग पुढे महाबळेश्वरी कुठे उत्सवांतून किंवा इतर समारंभांतून भेटले म्हणजे जसे काही काहीच झाले नाही, असे साळसूदपणे दाखवून ते आपण होऊन आमच्याशी मुद्दाम येऊन बोलत ! त्यानंतर मात्र आम्ही त्यांच्या घरी जाणे मुळींच केले नाही !

१९१२ जूनअखेर आम्ही उमरावतीस परत गेल्यावर विलायतेहून ताईचे पत्र आले की, मी आता लवकरच हिंदुस्थानात परत येते. विलायतेत तिने L. M. (Rotunda) L. R. C. P. व M. R. C. S. अशा पदव्या घेतल्या होत्या. F. R. C. S. ही डॉक्टरची मोठी पदवी घेऊन मग तिने स्वदेशी परतावे अशी आमची इच्छा होती. पण माझी प्रकृती १९०७ पासून वरचेवर नादुरुस्त राही, त्यामुळे तिला विलायतेत चैन पडेना. तसे काळजी करण्यासारखे काही नाही, असे तिला आम्ही वारंवार कळवीत होतो. पण तिने लवकर येण्याचा हट्टच धरला व अमक्या बोटीने मी निघते म्हणून एक दिवस तिची तारच आली.

तिला आणण्यास मी मुंबईस गेले. कामामुळे अण्णासाहेब येऊ शकले नाहीत. आम्ही बरीच मंडळी बोट येण्याच्या वेळी बंदरावर गेलो होतो. ज्या साध्या नऊवारी लुगड्यात महाराष्ट्रीय पद्धतीचे ओचाकासोट्याचे नेसणे नेसून ती मागे विलायतेच्या बोटीवर चढली होती, त्याच पोषाखात ती आता बोटीवरून उतरली. तिला पाहून मला अतिशय आनंद झाला. ५–५॥ वर्षे ती विलायतेत होती. तिला घेऊन मी तावडतोब उमरावतीस गेले. उमरावती, अकोला, यवतमाळ वगैरे ठिकाणच्या स्त्रियांनी तिला मानपत्रे दिली. तिच्यासाठी मोठमोठ्या चहापार्ट्या केल्या व तिचा खूप गौरव केला.

विलायतेहून परत आल्यावर लवकरच मुंबईस दवाखाना काढण्याचा ताईचा विचार तिने आम्हांला सांगितला. आमच्या मनात तिने हैदराबादेस डॉक्टरी सुरू करावी असे होते. तिथल्या काही मोठमोठ्या नबाबांशी अण्णासाहेबांच्या ओळखी होत्या, व त्यांनीच सुचविले होते की, ताईने तिथे प्रॅक्टिस सुरू करावी. अण्णासाहेबांची फार दिवसांची इच्छा होती की तिथे ताईला चांगला पैसा मिळण्यासारखा असून त्या पैशांतून तिने एक मोठा नमुनेदार धर्मार्थ दवाखाना काढावा व गरीबांना मदत करावी. परंतु मुंबई मध्यवर्ती पडते या दृष्टीने ताईला मुंबईच हवी होती. तेव्हा तिथे चांगली सोइस्कर जागा पाहून तिची उत्तम व्यवस्था लावून देण्याच्या तयारीला आम्ही लागलो. विलायतेहून परत आल्यावर दोन अर्डीच महिन्यांत तिने मुंबईस प्रॅक्टिस सुरू केली. गिरगावात सँडहर्स्ट रोडवर टोपीवाल्याचा बंगला म्हणून पाच मजली इमारत होती, तीतील तिसरा मजला आम्ही ताईसाठी राहण्यास म्हणून घेतला. या बंगल्याच्या समोरच्या इमारतीत खालचा संपूर्ण मजला भाड्याने घेऊन, तिथे विलायतेत तिच्या परिचयाचे झालेले डॉ. गोपाळराव देशमुख, डॉ. दिनकरराव साठे, व डॉ. एरुळकर हे डॉक्टर होते, त्यांच्या सहकार्याने ताईने कन्सल्टिंग रूम, नर्सिंग होम व ऑपरेशन थिएटर थाटले. माझ्या मनात तिने एकटीनेच हे सर्व चालवावे असे होते व अण्णासाहेबही त्याच मताचे होते. पण त्यांनी तिला विरोध केला नाही व मलाही सांगितले की, "तुम्ही तिला याबाबत काही बोलू नये. आपली जबाबदारी तिला आता समजते आहे." विलायतेहून आल्यावर तिच्या मतांत

बराच फरक झालेला होता, पण त्याबद्दल तिच्याशी कोणत्याच प्रकारे वाद घालू नका म्हणून अण्णासाहेबांनी मला बजावले. असो.

आता माणिक व शांता यांनाही मुंबईस शिक्षणास ठेवायचे आम्ही ठरविले. त्यांना लागणारा खर्च ध्यानी घेऊन आम्ही ताईला दरमहा रकम पाठविण्यास सुरुवात केली. एकदोन वर्षांत तिचा मुंबईत उत्तम जम बसल्यावर ती आम्हांला म्हणू लागली, " आता तुम्ही खर्चाची रकम पाठवू नका. तुम्ही मला मुलाप्रमाणे शिक्षण दिलेत. तेव्हा मला मुलगाच समजा. माझ्या भावंडांचा खर्च आता मीच करणार." पण अण्णासाहेब म्हणायचे, " लेकीचा पैसा मी घेणार नाही." आम्ही तिला लग्नाचाही आग्रह केला, पण ती म्हणाली, " ते माझे मी पाहून घेईन. आता माझे हे कामच असे आहे की, संसाराची कामे करण्यास मला अवसरच मिळणार नाही." आमच्या महाबळेश्वरी जाण्यामुळे अण्णासाहेबांच्या मुंबईतील मोठमोठ्या पारशी, गुजराथी, मुसलमान वगैरे मंडळींशी खूप ओळखी झाल्या होत्या. शिवाय तेथे आमचे स्नेही डॉ. भालचंद्र भाटवडेकर, सॉलिसिटर दीक्षित वगैरे मंडळी होतीच. त्या सर्वांच्या सहानुभूतीने ताईचा मुंबईत चांगला जम बसून लवकरच उत्तम नावलौकिक झाला.

माणिक व शांता यांना ताईजवळ मुंबईस शिकण्यास ठेवल्याचे मी सांगितलेच. आतापर्यंत त्यांचे सर्व शिक्षण बापू सहस्रबुद्धे या मास्तरनी घरीच करवून घेतले होते. मुंबई युनिव्हर्सिटीच्या म्याट्रिकला बसण्यासाठी म्याट्रिकपूर्वी निदान एक वर्ष मुंबईच्या ( मुंबई इलाख्याच्या ) शाळेत गेलेच पाहिजे असा नवीन नियम झाला होता. या दोघीही मुली अद्यापि उमरावतीचे घर सोडून माझ्याशिवाय कधी कुठे दूर राहिल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांना मुंबईस जाणे फार अवघड वाटत होते, आणि मलाही आता मुली कोणीच घरात नाहीत, ही कल्पना फार जड वाटू लागली. त्या मला गृहकृत्यांत फार मदत करीत. माणिकला कलात्मक गोष्टींची विशेष हातोटी होती. शांताला घोड्यावर बसणे, टेनिस, ब्याडमिंटन खेळणे, वगैरे अधिक आवडत असे. आम्ही ताईच्या लहानपणापासूनच आमच्या घरात एक टेनिस कोर्ट केलेले होते. मित्रमंडळींना बोलावून अण्णासाहेब रोज सकाळीं नियमितपणे टेनिस खेळत. मीही १९०६ सालापर्यंत टेनिस खेळत होते, व सायकलवर व घोड्यावरही मुलींबरोबर क्यांपात संध्याकाळी फिरायला जात असे. आबासाहेब व बाळासाहेबही चांगले टेनिस खेळू लागले होते.

मुली १९१२ मध्ये मुंबईस जाईपर्यंत आमची सर्वांची दिनचर्या सकाळपासून रात्रीपर्यंत अगदी बांधलेली असे. मी व अण्णासाहेब पहाटे साडेचार वाजता उठून प्रातर्विधी आटपायचे. पाच वाजता सर्व मुलांना उठवून, त्यांचे प्रातर्विधी आटोपून घेऊन, सर्वांना दूध पिण्यास देऊन, पावणेसहा वाजता त्यांना पायी फिरायला धाडायचे. अण्णासाहेब पहाटे वेगळे फिरायला जात. मी कधीकधी त्यांच्या-

बरोबर जाई. सकाळी सात वाजता बापू सहस्रबुद्धे मास्तर मुलांना शिकविण्यास येत. त्यांचा वक्तशीरपणा इतका होता की, त्यांच्या येण्यावर घड्याळ लावून घ्यावे. ते फार बुद्धिमान, सात्त्विक वृत्तीचे गृहस्थ होते. आमची सर्व मुले आठनऊ वर्षांची होईपर्यंत आम्ही त्यांना समोरच्या कॉन्व्हेंटमध्ये धाडले, त्यामुळे त्यांना इंग्रजी बोलणे लिहिणे उत्तमपैकी आले. तिथल्या फ्रेंच नन्स (nuns) मुलांच्या रीती-भातीकडे (manners) फार बारकाईने लक्ष देत. तेही वळण मुलांना उत्तम लागले. मुलांच्या मराठीकडे, विशेषत: शुद्ध बोलण्याकडे, आम्ही स्वतः लक्ष घालीत असू. मुलगे दहा वर्षांचे झाल्यावर त्यांना उमरावतीच्या मुलांच्या हायस्कूलमध्ये घातले. मुलींचे हायस्कूल त्यावेळी उमरावतीस नव्हते. म्हणून मुली कॉन्व्हेंटमध्ये पियानो, ड्रॉइंग, पेंटिंग व शिवण शिकण्यास जात. मोठ्या मुलाच्या वेळी हायस्कूलमध्ये देवभानकर म्हणून हेडमास्तर होते. अत्यंत कर्तबगार व सज्जन म्हणून त्यांची ख्याती होती.

मुलींचा अभ्यास दुपारी चार वाजेपर्यंत चाले. नंतर मी त्यांना दुपारचे फराळाचे करण्यास शिकवी. रोज सकाळसंध्याकाळ चटण्या कोशिंबिरी वाढण्यास लावी, व दर रविवारी ताक करणे व स्वयंपाक शिकवी. संध्याकाळी सात वाजता मुलांची जेवणे होत व नंतर आम्ही मोठी माणसे जेवीत असू. रात्री अण्णासाहेब मुलांशी खेळीमेळीने गप्पा मारीत व उपदेशपर गोष्टी सांगत. रात्री ९।–९॥ ला सर्व झोपत. अण्णासाहेब रात्री जागून कधीही वाचन किंवा इतर कामे करीत नसत. जेवणाखाण्यात नियमितपणा असला म्हणजे घरात सर्वांनाच सुख व विश्रांती लाभते असा अनुभव आहे.

उमरावतीच्या अशा शांत, आनंदमय वातावरणातून मुली आता मुंबईच्या गजबजलेल्या व अनोळखी अशा नव्या जगात जायच्या होत्या. मुलींना वाईट वाटत होते व ते पाहून मलाही कळवळून येई. पण मी ते बाहेर दाखवीत नसे; उलट त्यांना धीराच्या गोष्टी सांगे. माणिकचा स्वभाव लहानपणापासून फार धोरणी. 'ता' म्हणता ताकभात तिच्या लक्षात यायचा. तिची बुद्धी फार कुशाग्र होती, त्यामुळे तिच्या वयाच्या मानाने तिला फार समजे. म्हणून मला कधीकधी तिला गप्प करण्याचा प्रसंग यायचा. त्या वेळी अण्णासाहेब म्हणायचे, "तुम्ही मानसशास्त्रावरची पुस्तके वाचीत जा. अशा बुद्धिवान मुलांना इतके दाबू नये, समजावून सांगावे." माणिक आनंदी, समय-सूचक व विनोदी होती, तशीच ती मनाची फार हळवी होती. शांताचा स्वभाव याहून वेगळा. ती सरळ व भोळ्या स्वभावाची होती. कुणाचे डावपेच चटकन तिच्या ध्यानात यायचे नाहीत. ती सर्वांशी खूप घळमळीत बोले, त्यामुळे तिची कोणाशीही लवकर मैत्री जमे.

मुंबईस जाण्यापूर्वी अण्णासाहेबांनी त्या दोघींना उपदेश केला, "मुंबईत आता तुम्ही मोठे जग पाहाल. तुम्हांला आम्ही जी विद्या देत आहो ती तुम्हाला

जगात उत्तम वागता यावे व आपले आयुष्य सत्कार्यी लावता यावे म्हणून. विद्यार्जनाचा हाच खरा हेतू आहे. तुम्हांला तिथे वेगवेगळ्या स्वभावाची मुलेमुली भेटतील, नवे नवे अनुभव येतील; त्या सर्वांतून चांगले ते ग्रहण करा व वाईट ते सोडून द्या. या अनुभवांचा पुढच्या आयुष्यात उपयोग करून घ्यायचा असतो. " वगैरे.

शांता व माणिक मुंबईस गेल्यावर मला घरात काही केल्या चैन पडेना. आता वर्षा-दीडवर्षात आबासाहेबाला व त्याच्या पाठोपाठ बाळासाहेबालाही मुंबईस शाळेत धाडावे लागणार ! पण मुलांच्या कल्याणासाठी मन घट्ट करणे आवश्यक होते. दादासाहेब चिटणीसांची मुलगी माई (जयवंत) आता उमरावतीस राहायला आली होती. तिचे यजमान आर्. आर्. ऊर्फ बाळासाहेब जयवंत यांना अण्णासाहेबांनी उमरावतीस आपल्या हाताखाली काम करण्यास घेऊन त्यांचे बस्तान चांगले बसवून दिले होते. या माईला मी मुलगी म्हटले होते. माझ्या मुली आता दूर गेल्यामुळे मी तिला वरचेवर घरी बोलावी व तिच्या मुलांचे नातवंडे म्हणून कौतुक करी आणि त्यांच्या सान्निध्यात स्वतःची करमणूक करून घेई. चिटणीस वारल्यापासून त्यांचा मुलगा वसंत याला आम्ही आमच्याच घरी शिक्षणास ठेवून घेतला होता व तो डॉक्टर होईपर्यंत त्याचा सर्व खर्च आम्हीच केला होता. ताई मुंबईत राहिल्यावर हा मुलगा ताईकडेच राहिला व मेडिकल कॉलेजात जाऊ लागला. दादासाहेब चिटणीसांचा मुलगा म्हणून आम्ही त्याचे सर्व प्रेमाने केले.

माणिक व शांता यांना गिरगावात 'मास्टर्स ट्यूटोरियल हायस्कूल' म्हणून मुलामुलींची मिश्र शाळा होती तीत घातले. त्यावेळी त्या शाळेचा फार चांगला लौकिक होता. त्या शाळेत कडक शिस्त होती. त्यामुळे तिथे मुलींना मुलांपासून त्रास होत नसे. तरी पण मुंबईत सर्वच नवीन. तिथल्या पद्धतीप्रमाणे राहणीत थोडाफार फरक करावा लागला. शिवाय ताई विलायतेहून आलेली. तिकडच्या बऱ्याच पद्धती तिने उचलल्या होत्या. मुंबईस दवाखाना उघडल्यापासून ती बंगाली ब्राम्हो पद्धतीची सहावारी पातळे नेसू लागली होती. विलायतेत ती तसेच नेसत असे. माणिक व शांता यांना मात्र तसल्या सहावारी साड्या मी नेसू दिल्या नाहीत. मी म्हटले, "तुमचे शिक्षण पुरे होऊ द्या, लग्न होऊ द्या, मग तुमच्या सासरच्या मंडळींना आवडेल तसा पोषाखात बदल करा." त्याकाळी सर्वत्र महाराष्ट्रीय स्त्रियांत ओचा-कासोटा घालूनच नेसण्याची पद्धत होती. ताई कामावर जाताना हातांत बांगड्या घालायची नाही. माझ्या मनाला ते बरे वाटायचे नाही; कारण आपल्यात ते अशुभ मानतात. ती म्हणायची, "मला कामाच्या वेळी ते सोईचे पडते. युरोपियन बायका कुठे बांगड्या घालतात ? या शुभाशुभपणाच्या भलत्याच कल्पना आपल्यात आहेत." मी तिला अधिक विरोध करीत नसे.

विलायतेतल्या पुष्कळ चांगल्या कल्पनाही ती तिथून घेऊन आली होती.

तिने आपले मुंबईचे घर फार सुंदर सजविले होते. एका खोलीत इंग्रजी पद्धतीचे चहा, जेवण वगैरे घेण्यासाठी टेबल व खुर्च्या मांडल्या होत्या. मुली व पाहुणी मात्र माजघरात पाट मांडून जेवीत; कारण त्यांची व ताईची वेळ जमत नसे. मंडळी बसण्यासाठी एक उत्तम हॉल होता. शिवाय एक लहानसे देवघरही होते. विलायतेहून आल्यापासून तिने वेगवेगळ्या धातूच्या मूर्ती व कलात्मक वस्तू जमविण्यास सुरुवात केली होती व त्यांसाठी व उत्तम पुस्तके (लायब्ररी) यांजसाठी खोली स्वतंत्र होती. एकंदरीत ताईच्या घराच्या सजावटीची सगळीजण फार तारीफ करीत.

१९१३ सालच्या एप्रिलमधली गोष्ट. आम्ही दरवर्षीप्रमाणे महाबळेश्वरी गेलो होतो. यावर्षी आमचा बाळासाहेब परीक्षेमुळे आमच्या जरा मागून महाबळेश्वरी आला. वाटेत कुठे त्याने आयस्क्रीम खाल्ल्याचे निमित्त झाले आणि महाबळेश्वरी पोचल्याबरोबर त्याला खूप सर्दी व खोकला झाला. पाचवे दिवशी त्याचे डोके मनस्वी दुखून त्याला जोराचा ताप भरला! तो इतका की तो एकदम बेशुद्ध होऊन बडबडू लागला. आम्ही मुंबईस तार करून ताईला बोलावून घेतले. डॉ. देशमुखही आपणहून तिच्याबरोबर आले. 'फार वाईट तऱ्हेचा विषम' असे त्यांनी तापाचे निदान केले. शक्य ते डॉक्टरी उपाय सुरू झाले. आमच्या तोंडचे पाणी पळाले! आमच्या अनेक स्नेह्यांनी त्यावेळीं आमची फार विचारपूस केली व काय मदत लागेल ती देण्याची तयारी दर्शविली. माणिक, शांता व वसंत चिटणीस आळीपाळीने त्याच्याजवळ जागते बसत. ताई हजर रहायचीच. मला कसची झोप? सर्वांच्या आग्रहावरून मी आपली उगाच अंथरुणावर अंग टाकी व पुन्हा उठे. अण्णासाहेबांची तीच स्थिती होती. मुलाच्या डोक्यावर सारखी बर्फाची पिशवी धरून ठेवावी लागे.

तापाच्या विसाव्या दिवशी त्याला अतिशय जुलाब सुरू झाले. 'आजची रात्र बिकट आहे' असे डॉ. देशमुखांनी आम्हांला सांगितले. ते व ताई रात्रभर मुलाजवळ बसून राहिले. रात्री बाराच्या सुमाराला मुलाला भयंकर वात होऊन तो पलंगाखाली पडला व निश्चित झाला! माझ्या मनाची स्थिती काय झाली हे सांगणेच अशक्य! मी सारखी ईश्वराचे नामस्मरण करीत होते. आमचे स्नेही सॉलिसिटर दीक्षित शिर्डीच्या साईमहाराजांचे शिष्य होते. त्यांनी मुलाला लावण्यासाठी अंगारा पाठविला होता. माझा त्यावर फारसा विश्वास नव्हता; पण आपला शेवटचा उपाय म्हणून मी तो मुलाला लावला, आणि साईमहाराजांची प्रार्थना केली की, "मुलगा दुखण्यातून उठू दे—मी त्याला आपल्या दर्शनास शिर्डीस घेऊन येईन."

त्यानंतर सुमारे दोन तासांनी बाळासाहेबाने डोळे उघडून मला 'आक्का' म्हणून हाक मारली. त्याबरोबर डॉ. देशमुख उठून आनंदाने म्हणाले, "The crisis is over. He will recover now". (आणीबाणीच्या संकटाची वेळ

आता टळली. आता हा बरा होणार.) यानंतर एकदम टेंपरेचर खाली जाईल, व त्याला फार ऊबेत ठेवावे लागेल, असे त्यांनी सांगितल्यावर आम्ही गरम पाण्याच्या पिशव्या तयार केल्या. त्यानंतर त्याला खूप घाम आला, व ताप भराभर उतरू लागला. पुढे त्याला सारखा उतारच पडत गेला.

त्यानंतर दोनतीन महिन्यांनी नवस बोलल्याप्रमाणे मी बाळासाहेबाला शिर्डीच्या महाराजांच्या दर्शनाला नेले. परंतु त्यांच्या भोवतालच्या शिष्यमंडळींत त्यावेळी मला इतके विचित्र प्रकार दिसले की, साईमहाराजांच्या अंगाऱ्याने मुलगा बरा झाला असा जो काही भरंवसा मला उत्पन्न झाला होता, तो पार नाहीसा झाला! आता पुन्हा असे अंगारे लावून दर्शनाला नेण्याचे नवस करायचे नाहीत, असा मी मनाचा पुरा निर्धार केला. ईश्वरानेच माझ्या मुलाला वाचविले, अंगाऱ्याने नव्हे, असेच माझे ठाम मत झाले! संकटाच्या वेळीं मन खरोखरी वेडे होते, आणि मग सगळीकडून साहाय्य घेऊ पाहते! अण्णासाहेबांना मात्र कोणत्याही परिस्थितीत माझ्यासारखा मोह पडत नसे. डॉ. देशमुखांची मात्र ह्या बाळासाहेबाच्या दुखण्याच्या वेळीं आम्हांला फार मदत झाली. त्यांचे आम्हांवर अनंत उपकार झाले असे आम्हांला वाटले. त्यांनी आमच्याकडून काहीएक पैसे घेतले नाहीत. मग आम्ही ते दुसऱ्या रूपाने परत केले.

पुढे जूनमध्ये आम्ही बाळासाहेबाला घेऊन सांगलीस गेलो. तिथल्या खुल्या हवेत त्याची प्रकृती भराभर सुधारत गेली. तथापि जुलैअखेरपर्यंत पातळ पदार्थ खाण्याचे पथ्य मात्र चालू होते. त्याचे चित्त वेधणारी काही तरी हवापालट करावी म्हणून आम्ही जुलै महिन्यात त्याला घेऊन कमळाबाई व राजेसाहेब यांजसकट गोकाकचा धबधबा पाहण्यास गेलो. या धबधब्यापासून वीज उत्पन्न करून ती आजूबाजूच्या गावात पुरविली आहे. घटप्रभेचे सौंदर्य या पावसाळ्यात अप्रतिम दिसत होते. तेथे मोकळ्या हवेत बराच वेळ हिंडल्यावर सर्वांना भुका लागल्या. बरोबर फराळाचे पुष्कळ आणले होते; पण बाळासाहेबाचे पथ्याचे पदार्थ आणण्याचे चुकून राहून गेले. आजारानंतर त्याला अतिशय भूक लागे. म्हणून आम्ही त्याच्यासमोर काही खात नसू. पण आज त्याला आमचे फराळाचे जिन्नस समोरच दिसले आणि ते खाण्याचा तो हट्ट घेऊन बसला! मग सर्व मुलींनी त्याची समजूत घातली की, "आज आम्ही तुझ्याबरोबर नुसते दूधच घेतो—या पदार्थांपैकी काही खाणार नाही." त्याप्रमाणे खरोखरीच सर्वांनी दूध पिऊन एक प्रकारे उपवास केला व बाळासाहेबाच्या पथ्यात विघ्न येऊ दिले नाही. वनभोजनास नेलेले सर्व पदार्थ जसेच्या तसेच राहिले! माझ्या मुलांच्या या समजूतदारपणाने माझे हृदय कौतुकाने भरून गेले!

इ. स. १९१३ मध्ये माणिक म्याट्रिकला बसली व चांगल्या तऱ्हेने पास झाली. प्रिलिमिनरी परिक्षेत ती सर्व मुलांत दुसरी आली होती. शांताला मात्र

शाळेच्या हेडमास्तरनी परीक्षेला बसू दिले नाही. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे तिचे संस्कृत व गणित हे विषय नीट भरून काढता आले नव्हते. पण दोघींच्याही हुशारीची आणि विनयशील वागणुकीची त्यांनी ताईजवळ फार स्तुती केली. माणिक म्याट्रिकमध्ये खूप वर येईल असा तिच्या हेडमास्तरांचा कयास होता. पण परीक्षेपूर्वी महिनाभर तिची प्रकृती बिघडली. तिला बारीक ताप येऊ लागला व भूक लागेना. एकंदरीत तिला मुंबईची हवा मानवतच नव्हती. त्यामुळे म्यार्ट्रिकच्या परिक्षेत अपेक्षेप्रमाणे तिचा नंबर वर आला नाही व तिचे मन खट्टू झाले. कुणा ज्योतिषाने म्हणे तिला सांगितले होते की, १९१३ ते १९२३ ही वर्षे तिला वाईट जातील आणि ती तेच मनामध्ये धरून बसली होती. त्यात ताई कुठे थट्टेत म्हणाली, " हिच्या प्रकृतीला काही होत नाही–तिच्या मनाला लग्न करावे असे वाटत आहे आणि त्याच विचाराने तिची प्रकृती बिघडत आहे." हे तिचे बोलणे तर तिने फारच मनाला लावून घेतले ! ती म्हणाली, " ताई नसत्या गोष्टी माझ्या अंगी लावते. लग्नाबद्दल विचार माझ्या स्वप्नातही येत नाहीत ! " या सर्वांचा परिणाम तिची प्रकृती वरचेवर नादुरुस्त होण्यात झाला.

याच वर्षी डिसेंबर महिन्यात कमळाबाई व राजेसाहेब त्यांच्या छोट्या इंदुराजासह सिंहगडास राहण्यास गेले. त्यांनी आम्हांलाही सिंहगडास येऊन राहण्याचा अतिशय आग्रह केला. म्हणून मी माणिक, शांता, आबासाहेब व बाळासाहेब यांजसह त्यांच्याकडे सिंहगडास गेले. इथे सर्व मंडळी खूप मजेत व खेळीमेळीत राहिली. सिंहगडहून परत येताना आबासाहेबाला ताईजवळ मुंबईस ठेवावा लागला. कारण त्याला पुढे मुंबई युनिव्हर्सिटीमध्येच घालायचे होते. मुंबईस त्याला एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्ये घातले. श्री. लागू म्हणून त्या शाळेत एक फारच उत्कृष्ट मास्तर होते व आबासाहेबाचा मित्र चिंतामणि द्वारकानाथ देशमुख हा याच शाळेतून लागू मास्तरांच्या हाताखालून जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळवून म्याट्रिकमध्ये पहिला आला होता. त्याने आबासाहेबाला या शाळेत जाण्याबद्दल फार भर दिली. हा चिंतामणि म्हणजे आमचे दादासाहेब चिटणीस यांच्या पत्नीचा भाचा ( बहिणीचा मुलगा ). त्याचे वडील रोहे येथे वकिली करीत. तो पुष्कळदा सुट्टीत उमरावतीस येई, व आमची मुलेही दादासाहेबांच्या मुलांप्रमाणे त्याला आपला मावसभाऊ समजून त्याच्याशी प्रेमाने वागत. या मुलाचा स्वभाव अतिशय सालस व निगर्वी होता. तो आम्हांला आमच्या कुटुंबातलाच एक वाटे.

या चिंतामणीबद्दल अण्णासाहेब पहिल्यापासून म्हणायचे की, हा मुलगा पुढे फार मोठे नाव काढील. पुढे तो विलायतेस जाऊन आय्. सी. एस्. झाला. एल्फिन्स्टन् स्कूलचे प्रख्यात मास्तर श्री. लागू पुढे लवकरच एल्फिन्स्टन् कॉलेजात प्रोफेसर झाले. त्यांनी हा चिंतामणि इंग्रजी पाचवीत असतानाच त्याची अद्वितीय कुशाग्र बुद्धी पाहून त्याच्या वडिलांची ओळख काढून, त्यास स्वतःच्या घरी

स्वतःच्या देखरेखीखाली विद्यार्जनासाठी आणून ठेविले होते. प्रो. लागू अत्यंत विद्वान व अत्यंत लहरी म्हणून ओळखले जात. आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा त्यांचा निश्चय होता. शाळेत शिक्षक व पुढे कॉलेजात प्रोफेसर असताना जी मुले त्यांना विशेष बुद्धिवान व सज्जन वाटत, त्यांना खूप मेहनत घेऊन स्वतः शिकवून तयार करायचे, हे जणू त्यांचे व्रतच होते. अशा मुलांत हा चिंतामणि देशमुख, जी. एस्. राजाध्यक्ष ( पुढें आय्. सी. एस्. ) वाय्. एन्. सुखटणकर ( पुढे आय्. सी. एस. ), रघुनाथ समर्थ वगैरे मुले होती. त्यांची व आबासाहेबाची शाळेत मैत्री जमली. पण त्याची सर्वांत गाढ मैत्री जमली ती बी. जी. वाड ( पुढे प्रख्यात डॉक्टर झालेले ) यांच्याशी. असो.

या चिंतामणीच्या मध्यस्थीने प्रो. लागू यांनी आबासाहेब व शांताबाईस खाजगी रीतीने संस्कृत शिकविण्याचे कबूल केले. त्यासाठी त्या दोघांना त्यांच्या घरी जावे लागे. परंतु ते शिकवणीचे पैसे घेईनात. तेव्हा चिंतामणीच्या सूचनेवरून एक दिवस अण्णासाहेब अचानक लागूंच्या घरी गेले, व गोड गोड बोलून त्यांनी शिकवणी-बद्दल दरमहा साठ रुपये त्यांना घ्यायला लावले. चिंतामणि नंतर ताईला सांगत होता, “ आमचे गुरुजी म्हणजे जमदग्नीचा अवतार आहेत. ते कुणाकडे जात-येत नाहीत. पण अण्णासाहेब अचानक त्यांच्याकडे गेल्याने ते इतके गोंधळून गेले की काय बोलावे हे त्यांना सुचेना, व म्हणून त्यांनी अण्णासाहेबांच्या म्हणण्याला संमती दिली. ” ह्या लागूंची मर्जी राखणे फार कठीण असे, पण चिंतामणि फार काळजीपूर्वक ती संभाळी. आमची मुले चिंतामणीला चिडवीत की, “ तू लागूंची सूनबाई आहेस ! ” चिंतामणीला ते बाहेर कुणाकडे सहसा जाऊ देत नसत. पंधरा दिवसांनी फक्त एक दिवस ताईकडे येण्याची त्याला परवानगी असे, कारण आमची मुले त्याला मावस-भाऊ मानीत, हे लागूंना माहीत होते. चिंतामणीने आमच्या मुलांना बजावले होते की, “ शिकताना लागूंच्या तोंडाकडे पाहत जाऊ नका, कारण त्यांना ते आवडत नाही. फारसे प्रश्न विचारू नका—ते आपण होऊन सर्व सांगतात; जरा संभाळून वागा; त्यांची मर्जी केव्हा जाईल याचा नेम नसतो, आणि ती एकदा गेली की ते तुम्हांला कधीही शिकवणार नाहीत. ” असे हे प्रो. लागू—थोर विद्वान आणि तसेच निःस्पृह !

१९१४ च्या उन्हाळ्यात महाबळेश्वरची आमची सुट्टी बरीच गडबडीची झाली. महाबळेश्वरी इंग्रजांचा स्वतंत्र क्लब होता, पण तिथे युरोपियनांशिवाय कुणालाही प्रवेश नव्हता. म्हणून पारशी लोकांनी आपला असा एक स्वतंत्र जिमखाना काढला. हिंदूंना कुठेही एकत्र जमण्याची, खेळ खेळण्याची व गप्पागोष्टी करून एकमेकांच्या ओळखी करून घेण्याची अशी जागा नव्हती. महाबळेश्वरच्या गाव-पेठेला लागून काही वर्षांपूर्वी ‘ नेटिव्ह जनरल लायब्ररी ’ स्थापन झाली होती. परंतु तीत खेळ खेळण्याची व एकत्र बसून गप्पा वगैरे मारण्याची नीटशी सोय नव्हती. तेव्हा दुसरीकडे एक सोईस्कर ठिकाण पाहून तेथे हिंदू जिमखाना स्थापन

करण्याची कल्पना अण्णासाहेबांनी काढली, व लागलीच ती फलद्रूपही झाली. या जिमखान्यासाठी मोठमोठ्या लोकांची एक कमेटी नेमण्यात आली. जिमखान्यासाठी देणग्या मिळविण्याची अण्णासाहेबांनी जोराची खटपट सुरू केली. राजपिंपळ्याच्या महाराजांनी त्यासाठी सर्वांत मोठी देणगी दिल्यामुळे त्यांचे नाव या जिमखान्यास देण्यात आले. लवकरच जिमखान्याची स्थापना झाली. त्यासाठी इमारती वगैरे भराभर तयार होऊन जिमखाना लवकरच खूप लोकप्रिय झाला. तेथे सर्व तऱ्हेच्या खेळांची सोय होती. बायकांसाठीही स्वतंत्र हॉल, टेनिसकोर्ट वगैरेंची व्यवस्था होती. त्यामुळे बऱ्याच बायका तिथे येऊ लागल्या.

हा हिंदू जिमखाना स्थापन झाला हे इंग्रज अधिकाऱ्यांना आवडले नाही, अशी लवकरच कुरकूर ऐकू येऊ लागली. पुढे राजेलोकांना इंग्रजांचा क्लब खुला करण्यात आला. त्यात राजेलोकांनी या हिंदू जिमखान्यात फार जाऊ नये हाच हेतू असला पाहिजे, असा त्यावेळीं सर्वांचा दृढ समज झाला. तरी पण ती मंडळीं हिंदू जिमखान्यातच जास्त येत. अण्णासाहेब तिथे राजेलोकांशी चर्चा करून त्यांची मने इंग्रजांविरुद्ध कलुषित करतात, असा इंग्रज अधिकाऱ्यांचा दृढ समज झाला होता—किंवा काही स्वार्थी इंग्रजधार्जिण्या लोकांनी तसा करून दिला होता म्हणा! परंतु राजेलोकांनी हिंदू जिमखान्यात जाऊ नये अशा त्यांना खाजगी रीत्या तंब्या येऊ लागल्या. अण्णासाहेबांना हे कळले तेव्हा त्यांनी जिमखान्याच्या सभासदत्वाचा ताबडतोब राजीनामा दिला! आमचे जुने स्नेही धरमसी मुरारजी, पुरुषोत्तम विश्राम मावजी, खटाव, मिरजेचे राजेसाहेब इत्यादि मंडळींनी हा राजीनामा मंजूर केला नाही. पण मग अण्णासाहेबांनी जिमखान्यात जाणेच सोडून दिले. आपल्या एका-साठी जिमखान्याचे नुकसान व्हावे हे त्यांना पसंत पडले नाही. पण त्यानंतर बहुतेक सर्व राजेलोक घाबरून जिमखान्यात जाईनासे झाले!

या वर्षी (१९१४) लॉर्ड व लेडी विलिंग्डन नेहमीप्रमाणे महाबळेश्वरी होते. आमच्याशी ते विशेष गोडीने वागू लागले होते. मिष्टास बोलण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता. "मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम्" ही एरव्ही त्यांची कृती सर्वश्रुतच होती. ताईबद्दल विशेषतः ते फार कळकळीने चवकशी करीत. ताई ह्या वर्षी महाबळेश्वरात थोडे दिवस येऊन राहिली होती. एकदा लेडी विलिंग्डनने तिला चहाला बोलाविले. त्यावेळीं "तुमचे मुंबईचे नर्सिंग होम पहायला मी येणार आहे" असे तिने आपण होऊनच म्हटले, व त्याप्रमाणे पुढे ती खरोखरीच गेली. ताईने तिचा योग्य तो आदरसत्कार केला व तिला एक सोन्याचा कुंकवाचा करंडा भेट म्हणून दिला. नर्सेससाठी खूप सुधारणा करण्याची लेडी विलिंग्डनची इच्छा होती, म्हणून ती लेडी डॉक्टरांना आपल्या मदतीसाठी अशी पकडीत असे.

१९१४ सालच्या दिवाळीत प्रतिपदेच्या मुहूर्तावर अण्णासाहेबांनी उमरावती सोडून नागपूरला जावे व तिथेच वकिली करावी असे ठरविले. आता

त्यांची सर्व कामे नागपूरच्या हायकोर्टात असत व त्यांना सारखे तिकडे जावे लागे. त्याची त्यांना फार दगदग होई. शिवाय नागपूरला जायचे म्हणजे प्रत्येक वेळी तिथले अण्णासाहेबांचे स्नेही राजारामपंत दीक्षित (सॉलिसिटर दीक्षितांचे बंधू) त्यांना आपल्याकडे राहण्याचा आग्रह करीत. त्याचा अण्णासाहेबांना संकोच वाटे. म्हणून नागपुरात कायमचे बिऱ्हाड करण्याचे त्यांनी ठरविले.

पण उमरावती सोडून आम्ही सर्वांनी नागपुरास जावे हे मला पसंत नव्हते. मला वाटे, आपण उमरावतीत इतक्या हौसेने व परिश्रमाने घर बांधले व वऱ्हाडात शेतीवाडी घेतली; उमरावतीत आमची सर्व तऱ्हेने भरभराट झाली होती. शिवाय आता ताईलाही मुंबईस मोठी प्रॅक्टिस मिळत होती. ती आता अण्णासाहेबांना म्हणू लागली होती की, "तुम्ही आता प्रॅक्टिस सोडा, मी कुटुंबाचा भार सांभाळते. पाश्चात्त्य देश पाहण्याची तुमची फारा दिवसांची इच्छा आहे, ती आता पूर्ण करा. शिवाय स्वतःला देशकार्याला वाहून घेण्याची तुमची तीव्र तळमळ आहे तीही पुरी होऊ द्या." पण अण्णासाहेब ऐकायचे नाहीत. त्यांना मुलीच्या जीवावर जगणे पसंत नव्हते. शिवाय अद्यापि आबासाहेब व बाळासाहेब यांचे शिक्षण, माणिक व शांता यांची लग्ने, या जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या होत्या व त्याशिवाय आपले कर्तव्यकर्म पूर्ण होणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. देशसेवेची कामे त्यांची चालूच होती. ते म्हणत, "नामदार गोखल्यांसारख्या कार्यकर्त्यांच्या समाजकार्यासाठी द्रव्याची अधिक आवश्यकता आहे. नागपूरला जाऊन प्रॅक्टिस केल्याने त्यांच्यासारख्यांना अधिक द्रव्य देणे मला शक्य होईल." असा बाप-लेकीचा संवाद चाले. मी त्यांच्या बोलण्यात भाग घेत नसे. तरी पण नागपूरला बिऱ्हाड करण्याचे वाटू लागल्यापासून माझे मन अतोनात बेचैन झाले. मग अण्णासाहेब म्हणाले, "तुम्हांला जर उमरावती इतकी प्रिय आहे तर तुम्ही उमरावतीतच राहा व आपले घर सांभाळा. मी मधूनमधून शनिवार रविवार असा उमरावतीस येत जाईन." पण आता बाळासाहेब व मी अशी दोघेच उमरावतीच्या बंगल्यात राहाणार–एवढ्या मोठ्या घरात आम्ही काय करणार? या विचाराने मीही अखेर नाइलाजाने नागपूरला जायचे ठरविले.

१९१४ च्या नोव्हेंबर महिन्यात शांता व आबासाहेब मॅट्रिकच्या परिक्षेत चांगल्या तऱ्हेने पास झाले. माणिक मात्र एल्‌फिन्स्टन् कॉलेजच्या तिच्या पहिल्या वर्षाच्या परिक्षेत नापास झाली. गेले संपूर्ण वर्ष तिला मुंबईत वरचेवर मलेरियाचा ताप येत असे. त्यामुळे तिच्या हातून मुळीच अभ्यास झाला नव्हता. नापास झाल्यामुळे तिच्या आधीच हळव्या मनाला फारच उद्विग्नता आली. यानंतर आबासाहेबाने पुण्यास डेक्कन कॉलेजात प्रवेश मिळविला व शांताबाई मुंबईस एल्‌फिन्स्टन् कॉलेजात जाऊ लागली. पण तिथे ती फक्त इंग्रजीच्या तासांना जायची. बाकीच्या वेळात 'स्कूल ऑफ आर्ट' मध्ये जाऊन डॉईंग-पेंटिंगचा अभ्यास

करण्याचा तिने आग्रह धरिला. तिला या विषयांची विशेष आवड होती व अण्णासाहेबांनीही तिला तशी परवानगी दिली. "आपल्या मुलींना पदव्या घ्यायला लावून काही नोकऱ्या करायला लावायच्या नाहीत आम्हांला! त्या ज्ञानसंपन्न व सुसंस्कृत व्हाव्या हाच माझा मुख्य हेतू आहे" असे ते म्हणाले. त्याबद्दल पुष्कळांनी आश्चर्य व्यक्त केले. कॉलेजचे इंग्रज प्रिन्सिपॉलही म्हणाले की, "हिंदुस्थानांत ही पहिलीच विद्यार्थिनी भेटली की जी पदवीच्या मागे न लागता केवळ ज्ञानार्जनासाठी कॉलेजात आली!"

१९१५ साली जानेवारी महिन्यात आम्ही बाळासाहेबाची मुंज केली. पण मुंजीच्या आधी तो नवज्वराने फार आजारी झाला. घरात मांडव पडलेला, आतेष्टांना आगाऊ आमंत्रणे गेलेली, आणि त्यात हा असा अकस्मात आजारी पडला! त्यामुळे आमची धांदल व काळजी विचारू नका! पुढे त्याला मुंज लाभणार नव्हती म्हणून ती लांबणीवर टाकता येईना. पण आमचे फ्यामिली डॉक्टर डॉ. भट यांनी आम्हांला धीर दिला व अतोनात परिश्रम घेऊन त्यांनी मोठ्या शर्तीने त्याला दुखण्यातून बरा केला. मुंबईहून ताईही त्याच्यासाठी आली व तिच्या भरंवशावर आम्ही मुंज करू धजलो. घरात कुणी आजारी पडले की ताईला मुंबईहून यावे लागे. तीही प्रत्येक वेळी येऊन मनापासून सर्व करी, त्यामुळे आम्हांला तिचा फार आधार वाटे. पण एकंदरीत बाळासाहेबाची मुंज उत्तम तऱ्हेने व थाटात पार पडली. या मुंजीसाठी कमळाबाई व राजेसाहेब आपल्या मानकरीमंडळीस बरोबर घेऊन लवाजम्यासह आले होते, त्यामुळे आमचा मंडप विशेष खुलून दिसला. भिक्षावळ म्हणून कमळाबाईने बाळासाहेबास चारचाकी मेणागाडी दिली. (आमची चारचाकी व्हिक्टोरिया गाडी होतीच.) या मेणागाडीतूनच भिक्षावळ गावात देवाला नेली. या मुंजीत आम्ही पाच धर्ममुंजी केल्या.

१९१४ च्या अखेरपासून सासूबाईंची तब्बेत फार बिघडू लागली. म्हणून त्यांना आम्ही आमच्याकडे क्यांपातल्या आमच्या बंगल्यात राहण्यास आणले. येण्यापूर्वी त्यांनी आपली सर्व भांडीकुंडी एका गरीब ब्राम्हणाच्या कुटुंबास दान केली, व त्यांनी फार वर्षांपूर्वी इंदूरहून आणलेली पांढऱ्या पाषाणाची सुमारे पावणेदोन फूट उंचीची अन्नपूर्णादेवीची सुंदर मूर्ती आमच्या बंगल्यात ठेवण्यास आणून दिली. त्यांची प्रकृती इतकी अशक्त होऊ लागली की, डॉक्टरांनी त्यांना १९१५ च्या उन्हाळ्यात त्यांच्या दरवर्षीच्या नियमाप्रमाणे माहुलीस जाण्याची मनाई केली. तेव्हा त्यांच्या शुश्रूषेसाठी अधिक नोकर ठेवून तिथे पंखा व वाळ्याच्या ताट्यांची सोय केली व मीही उन्हाळ्यात त्यांच्यासाठी राहण्याचे ठरविले. पण त्याच उन्हाळ्यात कमळाबाईचे बाळंतपण महाबळेश्वरी आमच्याच बंगल्यांत (माहेरी म्हणून) व्हायचे ठरले होते. म्हणून सासूबाईंनी मला आग्रह केला की, "माझी प्रकृती अधिक खास बिघडणार नाही; तुम्ही

आपल्या निंबोलीच्या गोपाळराव गोऱ्यांना इथे माझ्या सोबतीस आणून ठेवा व सर्व-जण महाबळेश्वरी जा. कमळाबाईस मुलगा झाला तर मी पणतवंडाच्या डोक्यावर सोन्याची फुले घालण्यास तिथे जरूर येईन." आमचे फ्यामिली डॉक्टरही म्हणाले की, "त्यांच्या जीवाला तशी काही भीती नाही; मी त्यांची सगळी काळजी घेईन." तेव्हा मग मी महाबळेश्वरी फार जड अंतःकरणाने गेले.

महाबळेश्वरी आम्ही 'वेण्णालॉज' हा बंगला घेतला होता. तेथे आमच्याच घरी ५ एप्रिल १९१५ रोजी कमळाबाईस पुत्ररत्न झाले. सांगलीच्या राजघराण्यात फारा वर्षांनी गादीला हा औरस वारस मुलगा झाला होता. त्यामुळे सांगलीत फार मोठे उत्सव झाले. शुभचिंतनाच्या तारांचे ढीग पडले. मुलगा आमच्या घरी जन्मला म्हणून मला विशेषच आनंद झाला, व मी अत्यंत उल्हसित मनाने त्याच्या बारशा-पर्यंतचे सर्व समारंभ केले. मुलगा झाल्यावर कुणब्याच्या सुवासिनी बायका दहा दिवसपर्यंत बाळंतिणीच्या दाराच्या पायऱ्यांवर पाण्याचे कलश भरून आणून ओततात. त्याला 'हेल घालणे' असे म्हणण्याची महाराष्ट्रात पुरातन काळापासून चाल आहे. त्याप्रमाणे आमच्याकडे हेल घालण्यास सुमारे दीडशे बायका रोज येत होत्या. त्या सर्वांना बारशाच्या दिवशी मी लुगडीखण देऊन पक्वान्नाचे जेवण घातले, व इतरही रीतीचे सर्व समारंभ केले. मुलाचे नाव माधवराव ऊर्फ रावसाहेब असे ठेवण्यात आले.

बारशाचे दिवशी आमच्या सासूबाई डॉक्टरांचे न ऐकता, प्रकृतीच्या त्यांच्या त्या अशक्त स्थितीत गोपाळराव गोरे व नोकर बरोबर घेऊन पणतवंडाच्या डोक्यावर सोन्याची फुले घालण्यास महाबळेश्वरी आल्या व तेथून 'शेवटचे दर्शन घेण्यास' म्हणून माहुलीला गेल्या आणि जूनअखेर उमरावतीस परतल्या.

आम्ही जूनमध्ये ( १९१५ ) कमळाबाईबरोबर सर्वजण सांगलीस गेलो. तेथे नूतन युवराजांच्या जन्माबद्दल व सांगलीत त्यांच्या प्रथम आगमनानिमित्त फार मोठे स्वागत–समारंभ झाले. त्यावेळीं राजेसाहेबांच्या प्रजाजनांचे त्यांजवर असलेले अलोट प्रेम आम्हांला पाहायला मिळाले. आदल्याच वर्षी सांगलीत कृष्णानदीस फार मोठा पूर आला होता, त्यावेळीं राजेसाहेबांनी स्वतः शहरात हिंडून सर्वांना मदत केली होती. त्याबद्दलही त्यांच्या प्रजाजनांना कृतज्ञता वाटत होती. ती व्यक्त करण्यास त्यांना ही स्वागताची संधी मिळाली. हे सर्व पाहून आपले जामात आदर्श राजाचे काम करीत आहेत या विचाराने आम्हांला धन्यता वाटली.

जूनअखेरीस आम्ही उमरावतीस परत गेलो. सासूबाईंची प्रकृती अधिकच बिघडू लागली. पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच ती हळूहळू घसरू लागली, व पुढे १ सप्टेंबर १९१५ रोजी गणेशचतुर्थीच्या दिवशी त्या स्वर्गवासी झाल्या! आदल्या दिवशी त्यांनी अण्णासाहेबांना जवळ बोलावून सांगितले, " माझ्या गुरूंनी मला सांगितले आहे की, 'ज्यावेळीं तुमच्या दोन्ही कानांत घण् घण् असे आवाज सुरू

होतील त्यावेळी समजा की चोवीस तासांत आपला मृत्यु होणार. ' तसे आवाज आता सुरू झाले आहेत. तेव्हा मी उद्या जाणार. उद्या गणेशचतुर्थी आहे. गणपतीची लवकर स्थापना करून तावडतोब यथासांग नैवेद्य करा. देवाच्या कामात काही एक चूक व्हायला नको. बाकीची व्यवस्था मी त्या ब्राह्मण सवाष्णीला सांगितली आहे, त्याप्रमाणे तिच्याकडून करवून घ्या. " यानंतर त्यांनी फारसे बोलण्याचा प्रयत्न केला नाही. आम्ही सर्व त्यांच्याजवळ बसूनच होतो, तर त्या खुणवू लागल्या, " तुम्ही आता जाऊन निजा. मी रात्री जाणार नाही; उद्या दुपारी जाईन. " पण आम्हांला कसची झोप लागणार, आणि त्यांना सोडून कसचे जाणे होणार ? त्या ब्राह्मण सवाष्णबाई--अन्नपूर्णाबाई खोत यांना सकाळीच बोलावून आणले. त्यावेळी सासूबाई चांगल्या शुद्धीत होत्या. गावाला जाताना त्या जशी आपल्या प्रवासाची उत्तम तयारी करीत, तशीच यावेळी त्यांनी आपल्या देखरेखीखाली आपल्या महाप्रयाणाची तयारी त्या अन्नपूर्णाबाईकडून करवून घेतली. एक नवे सोवळे मागून घेऊन ते निऱ्या करून एका पाटावर ठेवविले. गाईचे ताजे शेण आणवून एक जागा त्यांच्या खोलीत सारवून घेववली, व ' त्यावर मला शेवटचे उतरवून ठेवा ' म्हणून सांगितले. तिथे ताजी तुळशीपत्रे, फुले व गंगोदक आणून मांडून घेतले. रोज वाचण्याची त्यांची गीता आपल्याजवळ आणविली व ' शेवटी ही गीता माझ्या हातात देऊन मला न्या ' असे सांगितले. गणपती बसवून नैवेद्य झाल्याचे कळल्यावरोवर त्यांनी मानेनेच सर्वांचा निरोप घेतला, व त्यानंतर दोनच मिनिटांनी अण्णासाहेबांच्या मांडीवर त्यांनी शांतपणे प्राण सोडला !

सासूबाईंच्या इच्छेप्रमाणे त्यांचे पुढचे सर्व विधी व क्रियासंस्कार अण्णासाहेबांनी यथासांग केले. ते सर्व आटोपून घरी आल्यावर अण्णासाहेब आपल्या खोलीत जाऊन एकटे बसले. त्यावेळी त्यांना एखाद्या लहान मुलाप्रमाणे ओक्साबोक्शी रडू कोसळले ! मलाही अतिशय दुःख झाले. माझ्या वयाच्या सातव्या वर्षापासून मी त्यांना आपल्या आईच्या ठिकाणी मानीत होते. अण्णासाहेब व मी किती तरी वेळ शोकमग्न झालो होतो. " माझे छत्र कायमचे गेले...मी आज पोरका झालो " असे अण्णासाहेबांनी उद्गार काढले ! पण काळ हा कुणासाठी थांबत नसतो. तो सतत पुढे पुढेच चालत असतो. त्याच्याच फेऱ्यांत आम्ही मानव एकापुढे एक असे दिवस लोटीत राहतो !

वरील आघातानंतर मला उमरावतीस तिळभरही चैन पडेना. अण्णासाहेबांना कामानिमित्त लवकरच नागपूरला जावे लागले. तेव्हा मी विचार केला की, आपणही आता आपले उमरावतीचे बिऱ्हाड हलवून कायमचे नागपूरला जावे. तिथे एक वर्षापूर्वीपासूनच अण्णासाहेबांनी एक बंगला घेऊन ठेवला होता. त्याप्रमाणे मी उमरावतीचे सर्व घर आवरायला सुरुवात केली. पण त्यायोगाने माझ्या मनाची बेचैनी वाढू लागली. जावेसे वाटेना व राहावेसेही वाटेना ! मन कसे कात्रीत

सापडल्यासारखे झाले. त्यात माझी प्रकृती आता वारंवार बिघडू लागली ! आक्टोबर १९१५ पासून माझ्या डाव्या बरगडीत विलक्षण कळा सुरू झाल्या. त्यानंतर आठ पंधरा दिवसांनी मला बारीक ताप येऊ लागला. आम्ही यावर्षी डिसेंबरात मुंबईस जाणार होतो. पण डिसेंबरच्या सुरुवातीस माझ्या बरगडीत एक गाठ उद्भवली. आमचे फ्यामिली डॉक्टर मुंबईस जाऊन त्याची तपासणी करून घ्यावी म्हणून गर्दी करू लागले. त्यावरून मी ताडले की, ही काही विशेष व्याधी मला जडत असल्याचा डॉक्टरांना संशय येत आहे. म्हणून मी घरात विशेष आवरासावर करून व बंदोबस्त करून मुंबईस जाण्याचे ठरविले. मला वाटले मी मुंबईहून घरी परत येते की नाही कोण जाणे !

मुंबईस आम्ही नेहमीप्रमाणे ताईकडे राहिलो. मुंबईत त्यावेळी कॉंग्रेसची गडबड चालू होती. अण्णाहेबांच्या ओळखीची वेगवेगळ्या प्रांतातली अनेक थोर पुढारी मंडळी त्याप्रसंगी मुंबईस जमली होती. सुरतेच्या ( १९०७ च्या ) कॉंग्रेसमध्ये पडलेली दुफळी मोडून यावर्षी एकी होण्याचा योग होता म्हणून अण्णासाहेब मुद्दाम कॉंग्रेससाठी मुंबईस आले. सुरतेनंतर कॉंग्रेस अधिवेशनास ते गेले नव्हते. या कॉंग्रेसच्या वेळी हिंदुमुसल्मानांची एकी व ‘ खिलाफत ’ प्रकरण फार गाजत होते. मी त्याला आमच्याआमच्यांत ‘ एक नवीन टूम ’ म्हणून नाव दिले, कारण माझा मुसलमानांवर बिलकूल विश्वास नाही. ते लोक मतलबापुरते गोड बोलण्याचा कावा उत्तम करतात आणि धर्माची किंवा स्वार्थाची गोष्ट आली की, क्षणार्धात बेइमानी करतात हे मी जाणून होते. पण यावर्षी आमच्या मुसलमानेतर पुढाऱ्यांनी मुसलमानांचा खूप उदो उदो चालविला होता हे खरे !

यावर्षी डॉ. ॲनी बिझांट यांचे नाव राजकारणात प्रामुख्याने झळकू लागले होते. त्यांचे ‘ थिऑसफिकल फेडरेशन ’ याच वर्षी मुंबईस धूमधडाक्याने चालू होते. यामुळे यावर्षी नाताळची सुटी आम्हांला गडबडीची गेली. ताईकडे व अण्णासाहेबांकडे येणारी अनेक लहानथोर मंडळी होती, त्यांना चहापार्ट्या, पानसुपारी वगैरे देण्याच्या गडबडीने ताईच्या घरचा दिवाणखाना गजबजलेला असे. मुंबईत ही सर्व गडबड चालू असल्यामुळे मला माझ्या प्रकृतीचे भानच राहिले नाही.

मग एक दिवस अण्णासाहेबांनी डॉ. देशमुखांना बोलावून आणून माझी प्रकृती दाखविली. त्यांनी सर्व नीट पाहून म्हटले, “ तसे विशेष काही नाही. तुमच्या बरगडीत एक छोटीशी गाठ झाली आहे. ती उद्या कापून टाकू. पाच मिनिटाचे काम आहे. भूलबील काही द्यावी लागणार नाही. ” मग ते अण्णासाहेबांना पलीकडच्या खोलीत घेऊन गेले व त्या दोघांचे बराच वेळ बोलणे झाले. अण्णासाहेबांनी मला काही एक न कळविता कमळाबाईस मुंबईस बोलावून घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता ताईच्या नर्सिंग होममध्ये माझ्या बरगडीचे ऑपरेशन केले. ताई व दुसरे दोन डॉक्टर मदतीस होते. ऑपरेशन सुरू केल्यावर

डॉ. देशमुख मला म्हणाले, "प्रथम मला तुमची एकच गाठ आहे असे वाटले. पण आता एकापुढे एक अशा तीन गाठी लागत आहेत. त्या काढल्याच पाहिजेत. तुमच्या गळ्याला गॉयटर असल्यामुळे तुम्हांला भूल देता येत नाही. तेव्हा तुमची गाठीची जागा बधीर करण्यासाठी तुम्हांला इन्जेक्शने द्यावी लागतील. तरी मन घट्ट करून एवढे थोडा वेळ सहन करा." मी मनात ईश्वराचे ध्यान करून आल्या प्रसंगाला तोंड देण्यास सिद्ध झाले. चाकूकात्र्यांचे आवाज मला ऐकू येत होते, कापण्याच्या भयंकर वेदना जाणवत होत्या–यावा तसा बधीरपणा इन्जेक्शनने साधला नव्हता–पण मी माझ्या तोंडातून हू की चू बाहेर पडू दिले नाही. ताईला सुद्धा माझ्या यातना बघवेनात आणि तिला भोवळ आली. नंतर दोनतीन तासांनी मला ताईच्या घरी आणण्यात आले. पुढे मला समजले की, या गाठी म्हणजे कॅन्सरचा एक प्रकार होता. त्यातून मी कशी वाचले परमेश्वरच जाणे! हे दुखणे म्हणजे माझे एक भयंकर दिव्यच होते!

पुढे आम्ही उमरावतीस परत गेल्यावर आमचे डॉ. भट यांच्या मुलाची मुंज निघाली. या मुलाचा–छबूचा–मला फार ळळा लागला होता हे मी मागे सांगितलेच आहे. त्याची सावत्र आई त्याला नीट वागवीत नसे. मुंजीस छबूचे आजोबा रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी हे आले होते. ते अत्यंत सत्त्वशील असे महात्मा होते. आपली स्वतःची मुलगी स्वर्गवासी होऊन आता त्या ठिकाणी दुसरी–आणि तीही पुनर्विवाहाची आली होती, तरी पण ते तिला स्वतःच्या मुलीप्रमाणे वागवीत. घरात काही मंगलकार्य असले की ते अस्पृश्यांना आपल्या घरी बोलावून स्वतःच्या बैठकीवर आणून बसवीत, व त्यांना स्वतंत्र जेवण देत असत. त्यांच्या पंगतीत पानांभोवती रांगोळ्या काढवून स्वतः सर्वांचा अगत्याने समाचार घेत. त्या काळात ही गोष्ट अपूर्व होती. छबूच्या मुंजीत त्याच्या सावत्र आईने मातृभोजनाच्या वेळी मला बोलाविले नाही. याचे महाजनी यांना फार वाईट वाटले. सकाळी मुंज लागल्यावर पुरुषांची पंगत बसायची होती, तेव्हा ते म्हणाले, "माझे पान आत आक्कांजवळ मांडा. तिथे छबूला त्यांच्या पानात आणून बसवा. हे आता दुसरे मातृभोजन होऊ द्या. तीच खरी छबूची आई आहे. केवळ तिच्याच परिश्रमांमुळे आम्हांला आज छबू दिसत आहे." माझ्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर लोटले!

यान सुमारास आमचे जुने स्नेही महादेव शंकर देशमुख दर्यापूरकर यांनी आपली नऊदहा वर्षांची बालविधवा मुलगी सोनू हिला माझ्याजवळ आणून माझ्या हवाली केली. ही मुलगी अतिशय रूपसंपन्न होती. लग्न झाल्यावर पंधरा दिवसांनीच वयाच्या सातव्या वर्षी ती विधवा झाली. आईबाप बिचारे तिच्यासाठी शोकमग्न झाले. मुलीला मात्र त्यातले काही समजत नव्हते. त्याकाळी विशेषतः मराठा ज्ञातीत पुनर्विवाहाची नुसती गोष्टही काढण्याची सोय नव्हती! आम्ही देशमुख यांना खूप आग्रह करीत असू की, तुम्ही या मुलीला शिक्षण देऊन विद्वान करा. पण त्यांच्या

जुन्या विचारपरंपरेला ते धावरत. मुलगी नऊ वर्षांची झाल्यावर ते तिला आमच्याकडे घेऊन आले आणि म्हणाले, "आता हिला तुमची पाचवी मुलगी समजून मी तुमच्याच स्वाधीन करतो. तुमच्या हातूनच तिचे पुढे उत्तम शिक्षण होऊ द्या." आणि त्यांनी तिला आमच्याजवळ ठेविलीच. ही मुलगी फार भाबड्या स्वभावाची व लाडावलेली होती. मला तिची अतिशय जबाबदारी वाटली. पण छबूप्रमाणेच ती फार प्रेमळ व लागट होती. उमरावतीस आता मुलींचे हायस्कूल निघाले होते, तिथे तिला बोर्डिंगात ठेवण्याचे आम्ही ठरविले. माझ्याजवळून बोर्डिंगात जाताना ती फार रडली व मलाही फार वाईट वाटले. काय पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असतील ते खरे! याच मुलीचा भाऊ रामराव याला त्याच्या वडिलांनी अण्णासाहेबांच्या सांगण्यावरून त्याच्या वयाच्या सतराव्या वर्षी विलायतेस ब्यारिस्टर होण्यासाठी धाडले होते. वऱ्हाडातल्या मराठा घराण्यातून विलायतेस उच्च शिक्षणासाठी गेलेला हा पहिला मुलगा. वऱ्हाडात पुढे तो फार मोठ्या पदास चढला.

इ. स. १९१६ च्या फेब्रुवारीत मी उमरावती सोडून नागपूरला राहण्यास गेले. उमरावतीच्या घरात एक कारकून व दोन तीन नोकर नेहमीच्या व्यवस्थेसाठी ठेवून, अधूनमधून उमरावतीस येऊन देखरेख ठेवण्याचे मी ठरविले. गेली दोनतीन वर्षे नागपूरला जाऊन राहायचे घाटत होते ते शेवटी करावेच लागले. मला उमरावतीच्या घराचा कोपरान् कोपरा जणू काही 'जाऊ नको' म्हणून म्हणत होता. पण आमचे उमरावतीचे अन्नोदक काही वर्षे तरी संपलेच होते म्हणायचे! थोडेसे देव उमरावतीस ठेवून, तिथे रोजच्या पूजेसाठी एक ब्राह्मण नेमून मी नागपूरला गेले. नागपूरला जाताना मला अत्यंत वाईट वाटले. उमरावतीस, विशेषेकरून या नव्या बंगल्यात आल्यापासून आमचा जो सर्व बाजूंनी उत्कर्ष होत होता, त्यात आम्ही संतुष्ट होतो. पण 'त्याबद्दल इतका मोह नको' म्हणून कदाचित् अशा तऱ्हेने देवाने उमरावती सोडण्याचा प्रसंग आमच्यावर आणला, असे मी माझ्या मनाला समजावू लागले!

* * *

अनुक्रम ३६४३९ दि.
२२-६-४५

# ५.

## ( १९१६ ते १९२६ )

नागपूर शहर उमरावतीहून खूपच मोठे. मध्यप्रांता (Central Provinces) ची त्यावेळची ती राजधानी होती. तिथे गेल्यावर अण्णासाहेबांची प्रॅक्टिस एकदम वाढतच गेली. आमच्या उमरावतीच्या ऑफिसकडील कारकून बाबा देव व घरातील कारकून तिवारी व मोरोबा परांजपे यांनाही सहकुटुंब आम्ही नागपुरास नेले. तसेच आमच्या गाड्या, ती सुलक्षणी घोडेजोडी, रामबकस वगैरे नोकर अशा सर्वांनाच तेथे घेऊन गेलो. नागपूरला उमरावतीपेक्षा पाहुण्यांची ये-जा वाढली. वऱ्हाडातील अण्णासाहेबांचे जुने पक्षकार नागपुरास आले की, बहुतकरून आमच्याकडेच उतरत. नागपुरास मुख्य गव्हर्मेंट हाऊस असल्यामुळे तेथे चहापार्ट्या, मेजवान्या नेहमी चालत, त्यांस आम्हांला जावे लागे व घरीही तसे समारंभ करावे लागत. त्यावेळी नागपुरात डॉ. गौर, सर बिपिन बोस व माणेकजी दादाभाई हे विशेष नामांकित कायदेपंडित होते. त्यांची आमची बरीच मैत्री जमली. त्यांच्याकडील बायकामंडळी, मुले वगैरे वरचेवर आमच्याकडे भेटीगाठीसाठी, जेवणास, टेनिस वगैरे खेळण्यास येत.

नागपुरास मोरूभाऊ दीक्षित ब्यारिस्टर हे अण्णासाहेबांच्या हाताखाली काम करीत. तसेच वामन वा. चितळे म्हणून नवा होतकरू वकीलही अण्णासाहेबांनी हाताखाली घेतला. अण्णासाहेबांची नागपुरातील कामे फार वाढू लागल्यामुळे त्यांनी खरे म्हणून आणखी एक कारकून ठेविला, तोही सुदैवाने बाबा देवप्रमाणे इमानी निघाला. उमरावतीहून येताना अण्णासाहेबांनी आपली तेथील सर्व प्रॅक्टिस आपले असिस्टंट श्री. बाळासाहेब जयवंत यांना दिली होती. पण त्यानंतर एकदोन वर्षात त्यांनी जयवंतांना कामासाठी नागपुरासच बोलावून घेतले आणि तेथे त्यांचा जेणेकरून उत्कर्ष होईल अशी त्यांना सर्वप्रकारे मदत केली.

मी इ. स. १९१६ साली जानेवारी महिन्यात नागपूरला गेले. तेथे घर

नीटनेटके लावण्यात व पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात दोन अडीच महिने कसे गेले ते मला समजलेही नाही. तेथील बंगला जरी मोठा होता तरी त्यात आपल्या तऱ्हेच्या सोयी आम्हांला स्वखर्चाने कराव्या लागल्या. माझी प्रकृती अद्याप अशक्तच होती, म्हणून मार्चअखेर मी मुलांना घेऊन महाबळेश्वरी गेले. अण्णासाहेब नेहमीप्रमाणे मागून एप्रिलमध्ये आले. ह्यावर्षी माणिक तिच्या कॉलेजची परीक्षा पास झाली शांताला पेंटिंग शिकविणारी एक बाई भेटली. डेक्कन कॉलेजात प्रो. मुल्लर म्हणून इंग्रजीचे प्रोफेसर होते, त्यांची बायको सुंदर चित्रे काढी. तिला शांताची चित्रकला फार आवडली व ती शांताला आग्रहाने आपल्याबरोबर चित्रे काढण्यास नेई. त्याशिवाय लालकाका म्हणून एक पार्शी चित्रकार महाबळेश्वरी आले होते, त्यांच्याकडून शांता वनश्रीच्या देखाव्याची चित्रे काढण्यास शिकू लागली. ह्यावर्षी तिला महाबळेश्वरी घोड्यावर बसण्याची संधी मिळाली. आमचे जामात सांगलीचे राजेसाहेब यांनी तिला आपल्या घोड्यावर बसण्याचा आग्रह केला. त्याप्रमाणे ती रोज घोड्यावर बसून फिरायला जाऊ लागली. नागपूरलाही ती घोड्यावर बसत असेच. ह्यावर्षी महाबळेश्वरी ती गव्हर्मेंट हाऊसच्या टेनिस टूर्नमेंटमध्येही खेळली. त्यामुळे महाबळेश्वरी तिच्याबद्दल बरेच कुतूहल निर्माण झाले.

याचा परिणाम म्हणून की काय कुणास ठाऊक, अलीकडे महाबळेश्वरी येऊ लागलेले वासद्याचे महाराज ( काठेवाडातील रजपूत ) अण्णासाहेबांचे भेटीस आले, व त्यांनी शांताला त्यांच्या भावाला देण्याबद्दल गोष्ट काढली. अण्णासाहेबांनी त्यांना आदरयुक्त उत्तर दिले, " परजातीची मुलगी करण्याची तुमची तयारी पाहून मी तुमचे अभिनंदन करितो....पण ह्या मुलीची विलायतेस जाऊन चित्रकलेचा अभ्यास करण्याची इच्छा असल्यामुळे, तूर्त ती लग्न करण्यास तयार नाही.... " वगैरे. मग ती गोष्ट तशीच राहिली.

पण वरील गोष्टीमुळे मला मात्र एक नवीनच चिंता लागून राहिली. जातीबाहेर लग्न करण्याच्या अण्णासाहेब विरुद्ध नव्हते, पण माझ्या मनाची मात्र तशी तयारी नव्हती. या एवढ्या गोष्टीत मात्र माझे व अण्णासाहेबांचे दुमत होते; व त्याबद्दल एकीकडे आमचा बरेच वेळा वाद होई. माझे प्रामाणिक मत होते की, माणसांच्या बाबतीत आपल्या पूर्वीच्या ऋषीमुनींनी घालून दिलेले चातुर्वर्ण्यच का पाळू नये ? त्यांनीही त्याबद्दल योग्य विचार करूनच ते नियम केले असले पाहिजेत...वगैरे. मी असे ऐकत असे की विलायतेत कुत्रे, घोडे यांच्यासारख्या जनावरांबद्दल जातीची शुद्धता ( pedigree ) ठेवण्याची फार काळजी घेतात. माझ्या कुटुंबापुरते तरी जुने चातुर्वर्ण्याचे नियम पाळले जावे याबद्दल मी प्रथमपासूनच फार काळजी घेत असे. रोटीव्यवहाराबद्दल माझी काहीच हरकत नव्हती. पण अण्णासाहेबांच्या या विचारसरणीमुळे मला भीति वाटे की, माझ्या मुली जातीबाहेर एखाद्याशी लग्न करण्यास तर तयार होणार नाहीत ना ? पुढे १९१७ साली

आम्ही उटकमंडला गेलो असता तेथे आमचे एक मुंबईचे स्नेही रतनसी धरमसी मुरारजी हे आले. त्यांनी तेथील मद्रासकडील एका फार मोठ्या राजघराण्यातील युवराजांना माणिकला देण्याबद्दल फार शिफारस केली. त्यांची व युवराजांची फार मैत्री होती. मीं रतनसींना स्पष्टच सांगितले की, "ते युवराज कितीही चांगले असोत, मी जातीबाहेर मुलगी कधीच देणार नाही." मग ती गोष्ट तितकीच राहिली. पण अण्णासाहेब मला म्हणायचे, "परजातीत मुलगी न देण्याचे तुमचे विचार फार संकुचित आहेत, ते आता दूर करा. नागपूरचे सर बिपिन बोस यांचा नातू व्हिवीयन बोस हा कसा सोळा आणे मुलगा आहे! त्याची आई इंग्रज आहे म्हणून काय झाले? असा नेक मुलगा आपल्या ब्राह्मणांतही मिळायचा नाही." मला ते बोलणे रुचत नसे. पण ईश्वरकृपेने माझ्या मुलींनी ह्याबाबतीत माझ्याच मताने चालण्याचे मला आश्वासन दिलेले होते.

महाबळेश्वरहून १९१६ जूनमध्ये नागपूरला परत येताना मला बाळासाहेबाला ताईजवळ मुंबईस शिक्षणासाठी ठेवावे लागले. कारण त्याला आता तेथील एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्ये घालवयाचे होते. त्याला दूर ठेवणे म्हणजे मला माझ्या काळजाचा एक तुकडा कापल्याप्रमाणे दुःखप्रद वाटले. संसाराच्या पाशातून मन हळूहळू काढावे, म्हणून जणू काही परमेश्वर मला धडेच शिकवीत आहे असे मला वाटले. पण मुलांच्या कल्याणासाठी मन घट्ट करणे भाग होते.

यानंतर मला कमळाबाईच्या बाळंतपणासाठी सांगलीस जावे लागले. ताई पण त्यासाठी मुंबईहून सांगलीस आली होती. ह्यावेळीं मला कमळाबाईची प्रकृती अशक्त व वृत्ति चिंतातुर अशी दिसली. ताई व ती खूप गोष्टी बोलत बसत, पण मला त्या समजू नयेत असा मला त्यांचा हेतू दिसून येऊ लागला. माझी मुले माझ्याशी फार प्रेमाने व आदराने वागत हे खरे; तरी पण काही गोष्टी, ज्यांमुळे माझ्या मनाला वाईट वाटेल असे त्यांना वाटे, त्या मला सांगत नसत. मला आपले वाटे की, त्यांनी सगळे मला मनमोकळेपणाने सांगावे. ही मुले अण्णासाहेबांजवळ सगळे सांगायची, पण माझ्याजवळ तितके सांगायची नाहीत. अण्णासाहेबांजवळ मी हे एखादे वेळेस बोलायची, तर ते थट्टेने म्हणायचे, "का? आपण मुलांची वाटणी त्यांच्या लहानपणी केली आहे ना? मुली माझ्या व मुलगे तुमचे. मग मुलींनी काही गोष्टी तुम्हांला न सांगता मला सांगितल्या तर काय हरकत आहे?"

अशा परिस्थितीत १६ नोव्हेंबर १९१६ रोजी कमळाबाई प्रसूत होऊन तिला दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव 'पांडुरंगराव' उर्फ 'प्रतापसिंह' ठेविले. कमळाबाईचा पहिला मुलगा युवराज रावसाहेब व या दुसऱ्या मुलात दीड वर्षांचे अंतर होते. रावसाहेब या वयात बराच बोलू लागला होता. मी त्याला 'बंड्र' म्हणे, व ते त्याला फार आवडत असे. त्याने आपल्या ह्या नवीन भावाला 'पिलू' म्हणण्यास

सुरुवात केली. या दोघांना आम्ही घरात ‘ बंड्ू–पिलू ’ म्हणून प्रेमाने हाक मारीत असू. राजकुमारी इंदुराजा आता पाचसहा वर्षांची झाली होती. ती मला तिला ‘ बावी ’ म्हणायला लावी. तिच्यासाठी मिसेस फॅहे (Fahey) म्हणून जी युरोपियन नर्स ठेविली होती, ती आता ह्या नव्या मुलाचे काम करू लागली. तेव्हा इंदुराजाला ते आवडायचे, पण रावसाहेब त्याबद्दल भारी राग करायचा; आणि ‘ तू त्याला घेऊ नको, मला घे ’ असा तो हट्ट धरून बसे. त्या नर्सला मुलाचे मानसशास्त्र काहीच समजत नसे. अशा वेळीं ती रावसाहेबाची समजूत न घालता त्याला अधिकच चिडवायची. पुष्कळ मुले लहानपणी असा हट्ट करतात, पण अशा वेळीं त्यांच्याशी गोड बोलून त्यांना आपल्या भावंडाबद्दल सहिष्णुता शिकवायला पाहिजे. पण ते शास्त्र या नर्सला उमगायचे नाही. त्यामुळे रावसाहेब लहानपणापासून कळत न-कळत आपल्या भावाप्रत उदासीन झाला.

इ. स. १९१७ सालच्या उन्हाळ्यात आम्ही उटकमंड येथे जाण्याचे ठरविले. ह्यावेळच्या प्रवासाची सर्व व्यवस्था आवासाहेबाने ठेविली. उटीस आम्ही ‘ केनिलवर्थ ’ हा बंगला भाड्याने घेतला. तो एका टेकडीवर असून त्यासभोवती सुंदर बगीचा होता. ह्यावर्षी आमचे जुने स्नेही मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी जहांगीर पेटिट सहकुटुंब उटीस आले होते. त्यांची व आमची मुले मिळून वरचेवर लांब फिरायला व वनभोजनास जात. घरात आम्ही एक ब्याडमिंटन कोर्ट केले होते, तेथे मुले खेळत. उटीला महाबळेश्वरासारखी दऱ्याखोरी नाहीत; पण चहूकडे लहानलहान, सदैव हिरव्या राहणाऱ्या टेकड्या असून त्यांवर गगनचुंबी युकॅलिप्टसच्या झाडांची मुद्दाम लागवड करून लाविलेली जंगले होती. हे ठिकाण समुद्रसपाटीपेक्षा सुमारे सात हजार फूट उंचीवर असून महाबळेश्वरपेक्षा खूपच थंड आहे. येथील जंगलात उन्हाळ्याच्या दिवसांतही नाना रंगांची फुले व पांढरे गुलाब सर्वत्र फुललेले दिसतात. दूर दूर पायी फिरणाऱ्या माणसास येथे प्रेक्षणीय असे वनश्रीचे देखावे अनेक आहेत.

अण्णासाहेबांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी ह्या मुलखातही खूप नव्या ओळखी करून घेतल्या. आमचे स्नेही मुंबईचे रतनसी धरमसी (मुरारजी गोकुळदासांचे नातू) हेही आपल्या मुलाबाळांसह ह्यावर्षी उटीस आले होते. त्यामुळे आमच्याकडे जाणाऱ्यायेणाऱ्यांची, व चहापार्ट्या, जेवणे वगैरेची खूप गर्दी चाले. आम्ही इकडलेच नोकर ठेवले होते, पण त्यांना आमची भाषा आणि आम्हांला त्यांची भाषा समजेना. त्यामुळे गोंधळ होई व स्वयंपाकघरातली बरीचशी कामे मला व मुलींनाच करावी लागत.

बडोद्याचे महाराज व महाराणीसाहेब ह्यावर्षी उटीस होते. त्यांची व आमची वरचेवर भेट होई. आम्हांला त्यांनी त्यांच्याकडे चारपाच वेळा जेवायला बोलाविले. त्यांनाही आम्ही एकदा आमच्याकडे जेवायला बोलाविले. ह्या जेवणासाठी तऱ्हतऱ्हेचे पदार्थ मी व माझ्या मुलींनी मिळून केले. आयत्या वेळीं काहीं गरम पदार्थ

तळून बाहेर धाडण्यासाठी माणिक स्वयंपाकघरात राहिली. ती सर्वांबरोबर जेवायला बाहेर आली नाही. अशी काही कामे निघाली की माणिक नेहमीच स्वखुशीने अशा तऱ्हेचा स्वार्थत्याग दाखवी. त्या दिवशी जेवणाचे सर्वच पदार्थ इतके उत्तम झाले होते की, त्याबद्दल त्या उभयतांनी फार वाखाणणी केली आणि विचारले, " इतके सगळे पदार्थ गरमगरम कसे राहिले आहेत ?" त्यावर मला राहवले नाही आणि मी म्हटले, "माझी मुलगी आतून हे सर्व करून धाडीत आहे." त्यावर महाराज म्हणाले, " तर मग आता त्यांना बाहेर बोलवा. त्या बाहेर आल्याशिवाय आम्ही जेवणार नाही." मग ती बाहेर आली व त्या उभयतांनी तिला खूप शाबासकी दिली. ही बडोद्याची मंडळी आमच्याशी खरोखर फार प्रेमाने व आपुलकीने वागली.

आम्ही उटीस फिरायला गेलो की म्हैसूरच्या राजघराण्यातील स्त्रियांच्या पडद्यांच्या मोटारी आम्हांला दिसायच्या, व त्या बायका दरवेळीं पडदे वर करकरून आमच्याकडे बघायच्या. तेव्हा मी अण्णासाहेबांना म्हटले की, " आम्हांला एकदा म्हैसूरच्या महाराणींची ओळख तरी करून द्या ! " मग अण्णासाहेबांनी महाराजांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडे चिठ्ठी लिहून महाराणींच्या भेटीची वेळ ठरवून घेतली. त्याप्रमाणे मी माणिक व शांता यांना बरोबर घेऊन महाराणीसाहेबांच्या राजवाड्यात गेले. तेथील इंग्रजी तऱ्हेच्या भव्य दिवाणखान्यात आम्हांला बसविण्यात आले. थोडयाच वेळात रूपाने फार सुंदर व रुबाबदार, पण खिन्न दिसणाऱ्या महाराणीसाहेब बाहेर आल्या. आम्ही त्यांना रीतसर नमस्कार केले. त्या आमच्याशी इंग्रजीत चांगल्या बोलल्या. इतक्यात त्यांच्या मोठ्या सासूबाई ( त्यांना मोठ्या महाराणीसाहेब म्हणत ) आम्हांला भेटण्यास बाहेर आल्या. त्याबरोबर त्या पहिल्या महाराणीसाहेब (सूनबाई) अगदीच गप्प बसल्या. त्या मोठ्या महाराणीही आमच्याशी पुष्कळ बोलल्या. त्या दिसण्यात किंचित उग्र व कडक अशा भासल्या. तेथे सुमारे २०–२५ मिनिटे बसून आम्ही परतलो.

दुसरे दिवशी बडोद्याच्या महाराणी मला भेटल्या. त्या मला म्हणाल्या, " मी ऐकते काल म्हैसूरच्या मोठ्या महाराणीसाहेबांना तुम्ही फार घुस्सात आणलेत ! " मी म्हटले, " नाही, घुस्याचा काही प्रकार झाला नाही." तेव्हा त्या म्हणाल्या, " मोठ्या महाराणीसाहेब आपल्या सुनेला कुणाला भेटू देत नाहीत. महाराज आईच्या पूर्ण हुकमतीत आहेत. ती सून दुसऱ्या जातीची–रजपूत–आहे, म्हणून मोठ्या महाराणींचा तिच्यावर रोष आहे. त्या तिची व महाराजांची गाठच पडू देत नाहीत. त्यांच्या दुसऱ्या मुलाला ( महाराजांच्या धाकट्या भावाला ) त्यांनी युवराज ठरवून ठेवला आहे. तो आपल्या वडील भावजयीशी आदराने वागतो. तुम्ही चिठ्ठी पाठविलीत ती त्याच्या हाती पडली असेल. म्हणून तुमची व छोट्या महाराणींची गाठ पडू शकली." ही हकीगत कळल्यावर आम्हांला त्या छोट्या महाराणींबद्दल अनुकंपा उत्पन्न झाली. पण त्यानंतर त्या कुणाचीच भेट घेण्याच्या भानगडीत आम्ही पडलो नाही.

एकंदरीत महिना दीड महिना आमचे उटीत राहणे सुखाचे झाले. पण त्यानंतर अण्णासाहेबांची प्रकृती एकाएकी बिघडू लागली. एक दिवस रात्री त्यांचे पोट इतके दुखू लागले की, आता दिवस कसा उजाडतो अशी वेळ आली. मी रात्रभर उभीच्या उभी होते. सकाळी डॉक्टर आणले, त्यांनी 'थंडीमुळे आतडी दुखावली आहेत' असे निदान केले व त्यांना तावडतोब बंगलोरला घेऊन जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे आम्ही सर्व बंगलोरला गेलो. तेथे आमच्या वऱ्हाडात एक्झिक्यूटिव्ह इंजिनीयर असलेले श्री. रामैय्या यांचा बंगला होता. त्यांचा व आमचा चांगला घरोबा होता. त्यांची मुले त्यावेळी बंगलोरला होती. ही मंडळी आम्हांला नेहमी बंगलोरला येण्याचे आग्रहाचे आमंत्रण देत असत. तेव्हा आम्ही त्यांच्याच घरी उतरलो. तेथे त्या मंडळींच्या ओळखीचे नंजप्पा म्हणून नामांकित डॉक्टर होते, त्यांचे उपचार सुरू केले.

तेथे एका रात्री अण्णासाहेबांचे पोट इतके दुखू लागले की, आम्ही अतिशय घाबरून गेलो. डॉक्टरांचे घर तेथून पाचसहा मैल दूर! त्यात त्या रात्री भयंकर पाऊस व वादळ सुरू झाले! आम्हांला तर ती काळरात्रच भासली! माझी सर्व मुले त्या रात्री अण्णासाहेबांच्या उशाशी जागत बसली. ईश्वराचा धावा करण्यापलीकडे आमच्या हातांत काहीच नव्हते. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पाऊस व वादळ शांत झाले. अण्णासाहेबांना विलक्षण थकवा आलेला होता. मग मला आठवण झाली की, आमच्या घरापासून सुमारे अर्ध्या मैलावर 'टाटा सायन्स इन्स्टिट्यूट' मध्ये आमचे एक स्नेही सत्यबोध हुदलीकर यांचा एक मित्र गोपाळ परांजपे शिकत होता. तेव्हा मी आबासाहेबाला सांगितले, "तू आताच त्या इन्स्टिट्यूटमध्ये जाऊन गोपाळ परांजपे यांचा शोध कर आणि त्यांना घेऊन त्यांच्या माहितीचा एखादा डॉक्टर जवळपास असल्यास त्याला तावडतोब घेऊन ये." आबासाहेब तिकडे धावतच गेला व वीस पंचवीस मिनिटांतच परांजपे यांना घेऊन आला. आपल्या मुलखातला एक महाराष्ट्रीय मनुष्य भेटला म्हणून मला फार बरे वाटले. मग त्या परांजप्यांनी सायकलवर जाऊन तिथले दुसरे एक नामांकित डॉक्टर रामचंद्रराव यांना आणले. त्यांनी तावडतोब अण्णासाहेबांवर उपचार सुरू केले. दिवसातून ते तीनचार वेळा येऊन जात; पण व्हिजिट फी मात्र एक वेळचीच घेत. काय ऋणानुबंध असेल तो असो, ह्या डॉक्टरांनी अत्यंत घरोबा दाखवून अण्णासाहेबांची फार आस्थापूर्वक काळजी घेतली व त्यामुळे त्यांना भराभर आराम पडू लागला. ते डॉक्टर मला त्यावेळी देवासारखे भासले. तसेच गोपाळ परांजपे यांनीही आम्हांला पुष्कळ साहाय्य केले, त्याबद्दल त्यांचे आम्ही फार आभार मानले.

अण्णासाहेबांच्या आजारीपणामुळे आम्हांला दहापंधरा दिवस बंगलोरला राहावे लागले. दुसऱ्याच्या घरात इतके दिवस राहण्याचा आम्हांला फार संकोच वाटला, पण निरुपाय होता. त्या घरातल्या मंडळींनी आम्हांला फार आपुलकीने

वागविले, म्हणून तिथून निघताना त्यांना सर्वांना आम्ही आठवण म्हणून चांगल्या भेटी दिल्या. नंतर आम्ही मुंबईस जाण्यास निघालो. वाटेत कमळाबाईच्या आग्रहामुळे सांगलीस उतरून तिच्याकडे ८-१० दिवस राहिलो. तिथे ताई पण अण्णासाहेबांची प्रकृती पाहण्यासाठी मुंबईहून मुद्दाम येऊन गेली. आता त्यांची प्रकृती झपाट्याने सुधारत होती. याप्रमाणे त्यांचा उटीस सुरू झालेला बंगलोरमधील आजार म्हणजे एक मोठे जिवावरचे दुखणेच होऊन त्यातून त्यांचा पुनर्जन्मच झाला असे आम्हांला वाटले. सांगलीहून आम्ही मुंबईस आलो व तेथे ताईने आम्हांला पंधरावीस दिवस राहवून घेऊन अण्णासाहेबांची प्रकृती मोठमोठ्या डॉक्टरांकडून काळजीपूर्वक तपासून घेतली.

इतके होईपर्यंत जून ( १९१७ ) अखेर आली. नंतर आम्ही नागपुरास गेलो. या खेपेस नागपुरास जाताना कमळाबाईचा दुसरा मुलगा राजकुमार प्रतापसिंह याला मी बरोबर नेला. अलीकडे त्याचे पोट वारंवार बिघडत असे व त्याला थोडासा मुडदूस ( rickets ) झाला होता. त्यामुळे त्याच्या पायांना बराच बाक आला होता. आमचे डॉ. भट यांनी त्याला औषधोपचार सुरू केले. त्यांच्या सांगण्यावरून मी रोज त्याच्या पायांना स्वतः कॉडलिव्हर ऑईल चोळायची. पायांचा बाक जाण्यासाठी त्याला गुडघ्यापर्यंतचे विशिष्ट प्रकारचे लोखंडाच्या पट्ट्यांचे बूट घालावे लागत. ते घालायचे म्हणजे तो फार हट्ट करी. तेव्हा मोठ्या मिनतवारीने कधी चुचकारून, तर कधी धाक दाखवून, त्याच्या पायांत सकाळपासून रात्रीपर्यंत ते बूट घालावे लागत. माझ्या स्वतःच्या मुलांबद्दल मला वाटली नाही इतकी मला त्याची काळजी वाटे. तीच स्थिती अण्णासाहेबांची. दिवसातून किती वेळा येऊन ते त्याचे खाणेपिणे, परसाकडणे, यांजवर नजर ठेवीत. म्हणतात ते खोटे नव्हे–मुले दुधासारखी वाटतात, तर नातवंडे दुधावरील सायीसारखी वाटतात !

ह्यावेळी शांता नागपुरातच होती व प्रकृती बरी नसल्यामुळे घरी राहूनच इंटरचा अभ्यास करण्याचे तिने ठरविले होते. बंगलोरहून आल्यापासून माणिकचीही प्रकृती नीट राहत नव्हती. पोट बिघडणे व मधून मधून ताप येणे हे चालूच होते. ह्या दोघींचे लग्न करून द्यावे असे आम्ही ठरविले. इतकेच नव्हे तर चांगली मुलगी मिळाली तर आबासाहेबाचेही लग्न उरकून घ्यावे असा विचार माझ्या मनात उसळू लागला होता. माझ्या बरगडीतल्या गाठीवर ऑपरेशन झाले होते ( १९१५ ) व त्या क्यान्सरच्या असल्याचा डॉक्टरांना संशय होता. मला वाटे कुणास ठाऊक त्या पुन्हा केव्हा उद्भवतील ? शिवाय माझे हृदयविकाराचे झटके ( heart attacks ) ही अलीकडे वाढू लागले होते. सुनेलाही आपल्या डोळ्यांदेखत आपल्या घराचे वळण लागावे हाही माझा एक हेतू होता. लग्नाच्या बाबतीत शांताला विचारले, तेव्हा ती "मला इंग्रजी पद्धतीने वागणारा नवरा हवा" असे म्हणाली. मग आम्ही इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधील मुलगे पाहण्याचे ठरविले. नुकतीच तीनचार

मुले त्या परीक्षेत पास होऊन आली होती. त्यांपैकी विजापूरचे पांडुरंगराव देसाई यांचे चिरंजीव शंकरराव हे होते. ते स्थळ आम्हांला कुणी सुचविले. त्या घराण्याची आम्हांला सर्व माहिती होती. हे घराणे मूळचे कोकणातले. तिथे त्यांना देसाईपणाचे पूर्वी वतन होते. पांडुरंगरावांनी मोठी विद्या संपादन करून वकिलीत मोठे नाव मिळविले होते. विजापूरकडे ते लक्षाधीशात गणले जात. त्यांचे घराणे चांगले होते. पण त्यांची राहणी कानडी मुलखातली, जुन्या पद्धतीची होती. ती मंडळी कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीची होती.

रावबहादुर मुधोळकरांनी आपल्या मुलीसाठी हे स्थळ पाहिले होते, परंतु सगोत्र निघाल्यामुळे ते लग्न जमले नाही. सावळ्या रंगाखेरीज मुलात काही दोष नाही, घरची मंडळी फार समंजस आहेत, असे मुधोळकरांच्या बोलण्यावरून आम्हांला समजले होते. तेव्हा मीच अण्णासाहेबांना म्हटले, " हे देसायांचे स्थळ तुम्ही शांतासाठी बघा. ती उंच आहे व हा मुलगाही चांगला उंच आहे म्हणतात." त्याप्रमाणे अण्णासाहेबांनी पांडुरंगरावांना पत्र लिहिले. त्यांचे तावडतोब उत्तर आले की, " मुलगी मुलाला कलकत्त्यास नेऊन दाखवावी. त्याला पसंत पडल्यास आमची हरकत नाही. तुम्हांला मुलगी दाखविण्यास मुलाच्या गावी नेणे पसंत नाही. पण मुलगा आसामात आहे, त्याला रजा मिळणे शक्य नाही; तेव्हा तो मुलगी पाहण्यास कलकत्त्यास येईल." त्याप्रमाणे अण्णासाहेब शांताला घेऊन कलकत्त्यास गेले. त्यांना मुलाचा स्वभाव, त्याचे वागणे, वगैरे चांगले वाटले. त्यानंतर लवकरच पांडुरंगरावांचे पत्र आले की, " मुलाला मुलगी पसंत आहे; पण मुलगा आसामात आहे, तिकडचे लोक वेगळ्या प्रकारचे आहेत, तरी तिकडे राहणे तुमच्या मुलीला कितपत चालेल ह्याचा पूर्ण विचार करून मगच पुढल्या गोष्टी नक्की ठरवाव्या असे मला वाटते." ह्यावर शांताने काही शंका काढल्या. पण अण्णासाहेबांनी तिला सर्व बाजू समजावून दिल्यावर तिने लग्नाला होकार दिला. लग्न फेब्रुवारी १९१९ मध्ये व्हावे असे ठरले. त्यावेळी १९१८ चा फेब्रुवारी चालू होता.

दरम्यान मला कमळाबाईच्या बाळंतपणासाठी सांगलीस जावे लागले. ३१ मार्च १९१८ रोजी तिला तिसरा मुलगा झाला. त्याचे नांव गोविंदराव उर्फ भय्यासाहेब असे ठेविले. मुलगा अतिशय रूपवान होता. त्याचे डोळे तर हरणासारखे होते. वर्णाने मात्र काळासावळा होता.

इथे सांगलीस असतानाच आबासाहेबासाठी साताऱ्याच्या परांजप्यांची मुलगी सांगून आली. मुलीला बाप नाही, पण घराणे उत्तम आहे असे समजले. तिचा फोटो आम्हांला पसंत पडला. आबासाहेबाला आता विसावे वर्ष चालू होते. यात्र वर्षी तो बी. ए. च्या परिक्षेला बसायचा होता. फेब्रुवारी महिन्यात त्याचे व शांताचे एकदमच लग्न करावे असे माझ्या मनात होते. आबासाहेब आमच्या आज्ञेबाहेर नव्हता; पण त्याचे म्हणणे एवढेच की, " माझी विद्या पूर्ण होईपर्यंत, म्हणजे मी

विलायतेहून परत येईपर्यंत मला लग्न करायचे नाही. वाटल्यास लग्न ठरवून ठेवावे." मुलीची आत्या काकू आपटे व त्यांचे यजमान माझ्या माहेरकडील घरोब्याचे होते. मुलीचे मामा अकोल्याचे बाळाभाऊ बापट वकील मुलीतर्फे बोलणे करीत होते. माझे म्हणणे, "आता लग्न नुसते ठरवून ठेवावे; मुलगा विलायतेस गेल्यावर मुलीने आमच्याकडे राहावे; आम्ही तिचे शिक्षण करू." त्यावर ती मंडळी म्हणाली, "नुसते लग्न ठरवून तीन वर्षे थांबणे, व मुलीला लग्नापूर्वी तुमच्या घरी ठेवणे वाईट दिसेल. तुम्ही लग्न करून घ्यावे. शिक्षण होईपर्यंत मुलगा ब्रह्मचर्य व्रताने राहील असे तुमचे म्हणणे ना? लग्न झाल्याबरोबर तो विलायतेस जाणारच आहे. यामुळे सर्व साधेल." तेव्हा "लग्न केल्यास मुलगा विलायतेहून येईपर्यंत हे लग्न वाङ्‌निश्चयाच्याच स्वरूपाचे राहील; स्पष्ट सांगायचे म्हणजे तोपर्यंत गर्भाधान संस्कार होणार नाही, हे मुलीला व तिच्या आईस समजावून सांगावे. पुढेमागे त्याबद्दल गैरसमज उद्भवू नयेत" असे मी त्यांना बजावून सांगितले. मुलीच्या आईने ते मान्य केले. नंतर आम्ही मुलगी पाहिली व ती आम्हांला पसंत पडली. त्याप्रमाणे मुलीच्या आईला कळविले. अशा रीतीने आबासाहेबाकरिता पाहिलेली पहिलीच मुलगी आम्ही पसंत केली व शांतासाठी जे पहिले स्थळ पाहिले तेही पक्के केले.

ह्याप्रमाणे १९१८ मध्ये आमच्या घरातील लग्ने ठरत असताना आम्ही उन्हाळ्याच्या सुट्टीत महाबळेश्वरी गेलो. तिथे कमळाबाईचा मुलगा तान्हा असल्यामुळे तिच्या बंगल्यात मी त्याच्याजवळ निजण्यास रोज रात्री जाई. तिथे असताना एक दिवस रात्री नऊ वाजता मला न्हाणीघरात महाबळेश्वरकडील एक महाविषारी साप–फुरसे चावले! घरात विलक्षण घबराट व धावपळ सुरू झाली. कुणासच काही सुचेना! ह्या फुरशास एकच इलाज–कोंबडी त्या जागेवर बसविणे हा आहे, म्हणून मी वाचलेले होते; व तो न झाल्यास माणूस पंधरावीस मिनिटातच मरतो, असा तेथील लोकांचा अनुभव होता. मी लागलीच नोकरांना सांगितले की, "बंगल्याच्या माळ्याजवळ कोंबड्या आहेत; तो मागेल ती किंमत देऊन त्या आणा." पाच मिनिटांतच त्या कोंबड्या आणल्या गेल्या. मादी कोंबडीच्या शौचाच्या वाटेचे छिद्र सर्पदंशाचे खुणेवर बसवावे लागते. तसे करणे सुरू झाले. त्यावाटे सर्पविष खेचले जाऊन कोंबडी तशी लावली की मरून पडे. अशा पंधरा वीस कोंबड्यांची गत झाल्यावर अण्णासाहेब महाबळेश्वर येथील दवाखान्याच्या डॉक्टरकडे स्वतः गेले व त्याला घेऊन आले. तो वेगवेगळ्या सर्पांवरील उपायांचा मजकूरच त्याजजवळच्या पुस्तकात चाळून पाहू लागला. त्याला काहीच सुचत नव्हते. मिरजेच्या राजेसाहेबांजवळ सर्पावर रामबाण औषध आहे म्हणून ऐकिवात होते. त्यासाठी त्यांजकडेही तेवढ्या रात्री एक मनुष्य दवडविला. त्यांनी स्वतः येऊन ते औषध मला लाविले. पण त्यामुळे जो उतार व्हायला हवा होता तो झाला नाही. इकडे कोंबड्या बसविणे चाललेच होते. ते पाहून मला फार वाईट वाटले व मी मृत्यूला तोंड देण्यासाठी

मन तयार केले. माझे मुलगेमुली रडू लागल्या. अण्णासाहेबही डोळे पुसू लागले. माझ्याभोवती खूपच मंडळी जमली. इतक्यात कोणी सुचविले की, वाईस कुणी वेडेकर म्हणून सर्पदंश उतरविणारा प्रसिद्ध मांत्रिक आहे. त्याचे नावे व हैदराबादच्या निजामाच्या नावे माझ्या डोक्यावर दोन लहान गोटे ठेवावे. त्याप्रमाणे करून त्या वेडेकरांना आणण्यास वाईस मोटर धाडिली. ते सकाळीं दहाचे सुमारास आले. तोपर्यंत माझ्यावर कोंबडीचे प्रयोग चालूच होते, पण आता त्या मरत नव्हत्या. मात्र माझ्या सर्वांगात भयंकर वेदना होत होत्या. मांत्रिकाने स्नान करून ओलेत्याने विहिरीवरून एक मोठा पेला भरून पाणी आणून दिले. माझा मांत्रिकावर मुळीच विश्वास नव्हता व ते पाणी पिण्याबद्दल मी फारच हट्टाने नकार दिला. मग मांत्रिकाने मला फारच धाकदपटशा दाखवून ते सर्व पाणी पिण्यास लावले. त्याने सांगितले की, असा हट्ट सर्पदंशाच्या माणसात सर्प अंगात येऊन आणतो. ते काय असेल ते असो, पण मी ते पाणी प्याल्यानंतर एका क्षणाने माझ्या अंगातील सर्व वेदना पावलास जिथे सर्पदंश झाला होता तेथपर्यंत उतरून संपल्या! त्या ठिकाणी डॉक्टरांनी नुकतेच पोटॅशम परमॅंगनेट चिरा देऊन भरले होते. मांत्रिक म्हणाले, " जर ही जखम डॉक्टरनी केली नसती तर ह्या बाई माझ्या मंत्रानंतर लागलीच पूर्ण निर्विष होऊन हिंडूफिरू लागल्या असत्या. " त्यावेळेपासून मात्र मंत्रावर माझा पूर्ण विश्वास बसला. यानंतर सहा महिने मांत्रिकाने मला सांगितलेले नियम फार कडकपणाने पाळावे लागले. ताईला मुंबईला तारा गेल्या होत्या, तीही काही औषधे घेऊन दुसरे दिवशी आली. मला त्या धोक्यापासून पूर्ण मोकळेपणा येण्यास पुढे एक महिना लागला. मी कशी ह्या संकटापासून वाचले ह्याचेच मला राहून-राहून आश्चर्य वाटे. पुढे बऱ्याच वर्षांनी मी बियासच्या सद्‌गुरूंचा उपदेश घेतला तेव्हा त्याबद्दल त्यांना विचारले. त्यावर ते म्हणाले, " तुम्हांला याच जन्मी नाम मिळायचे होते, व तुमच्या हातून उत्तम भजन होऊन याच जन्मात तुमची जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका व्हावयाची होती, म्हणून तुम्ही वाचला. "

या सर्पदंशाच्या विचारातून माझे मन दुसरीकडे नेण्यास मग मी मुलांच्या लग्नाची तयारी म्हणून वेगवेगळ्या याद्या करण्यास सुरुवात केली. नवऱ्या मुलीचे दागिने माझ्या बहिणीचे यजमान काका कानिटकर यांच्यामार्फत पुण्यास करण्यास दिले. इतक्यात मला काकू आपटे यांचे पत्र आले की " तुमच्या भावी सुनेची आई साताऱ्यास प्लेगने एकाएकी वारली ! " हे एक नवीनच विघ्न उपस्थित झाले! मग काकू आपटे व मुलीचे मामा मला येऊन भेटले व म्हणाले, " या कारणास्तव लग्न मोडू नका. " मी म्हटले, " आम्ही एकदा शब्द दिला तो पक्का समजा. " मी मनाशी ठरविले, " मुलगी ठरविताना तिला बाप नव्हता; आता तिची आई पण गेली ! मुलाची जी काही हौस, मानपान व्हावा असे आम्हांला वाटते, ते दुतर्फांचा खर्च करून मीच करीन. ती बिचारी आईबापाविना पोरकी झाली, आता

अनुक्रम........
आवक स. ...... दि ........


आम्हीच तिचे आईबापाप्रमाणे करू." मुलीच्या मामांनी सांगितले की, "मुलीच्या आईने तिच्या लग्नासाठी पाच हजार रुपये काढून ठेवले आहेत ते आम्ही लग्नास लावू." तेव्हा तेवढ्या रकमेत बसेल एवढा खर्च त्यांनी करावा व बाकी जावयाचा, विहिणीचा मानपान वगैरेचा खर्च आम्ही आमच्या पैशाने करू; फक्त मुलीकडच्यांनी ते मानपानाचे उपचार लग्नात वेळोवेळीं पुढे करावे, असे आम्ही त्यांच्याशी ठरविले. हुंडा आम्हांला घ्यायचा नव्हताच.

आता माणिकचेही लग्न व्हावे म्हणून माझे मन उतावीळ झाले होते. वास्तविक शांता व आबासाहेब यांच्यापेक्षा ती मोठी, तिचे लग्न अगोदर व्हायला पाहिजे, हा विचार मला रात्रंदिवस बेचैन करू लागला. रँग्लर परांजपे यांनी आम्हांला तिच्यासाठी एक स्थळ सुचविले होते. ते म्हणजे रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे यांच्या नातवाचे. हा मुलगा विलायतेस आय्. सी. एस्. साठी गेला होता व त्याला परत येण्याला अद्यापि वर्ष दीडवर्ष होते. त्यावेळी माणिक नुक्तीच इंटरमध्ये नापास झाली होती व त्यामुळे ती खिन्न मनःस्थितीत होती. लग्नाचा विषय काढताच "काय वाटेल ते होवो, मी आता मुंबईत राहणार नाही व मला लग्नही करायचे नाही—मी आता तुमच्याजवळ राहून तुमची सेवा करणार" असा ती हट्ट धरून बसली. मग आम्ही तिला लग्नाचा आग्रह केला नाही.

पण मी नोव्हेंबर ( १९१८ ) मध्ये लग्नाची तयारी करण्यास उमरावतीस गेले, तेव्हा माणिक आनंदाने माझ्याबरोबर आली. इतकेच नव्हे तर माझ्या उजव्या हाताप्रमाणे मला सर्व कामांत तिने साथ दिली. आमचे आप्तेष्ट, अण्णासाहेबांचे स्नेही व पक्षकार, या सर्वांचीच मला कल्पनातीत मदत झाली. काही पक्षकारांनी आपले शृंगारलेले घोडे मिरवणुकीसाठी आणून दिले. मांजऱ्याचे पाटील यांनी 'समारंभासाठी हौद्यासह आपला हत्ती पाठवतो' असा निरोप धाडिला. माझ्या लग्नाची वरात हत्तीवरून निघाली होती, म्हणून माझ्या मुला-मुलींची वरातसुद्धा हत्तीवरून निघावी अशी माझी इच्छा होती. ती ईश्वराने न मागता पुरविली.

या लग्नाचा सर्व कार्यक्रम, पाहुण्यांची व्यवस्था, जेवणावळींत करण्याची पक्वान्ने, इत्यादी याद्या लग्नापूर्वी पंधरा दिवस माझ्या विचाराने तयार करून, त्याप्रमाणे सर्वांना कामे वाटून दिली. लग्नासाठी पुष्कळ पाहुणी आमच्याकडे जमली. सांगलीकर राजघराण्यातील मंडळी आली होती. जतचे राजेसाहेब व राणीसाहेब आले होते. ताईच्या फार स्नेहाच्या बारियाच्या महाराणीसाहेब व त्यांच्या जाऊबाईही लग्नास मुद्दाम आल्या होत्या. याशिवाय नागपूरच्या सरदार घराण्यातील काही मंडळी, माझ्या आजोळची कान्हेरे मंडळी, व इतर आप्तेष्ट, अशी अनेक माणसे मोठ्या प्रेमाने आली होती. त्या सर्वांची सोय आमच्या बंगल्यात व बंगल्याच्या विस्तृत आवारात सुशोभित तंबू व राहुट्या आणि छप्परे घालून केली होती. व्याह्यांसाठी आमचे स्नेही महादेव शंकर देशमुख यांचा बंगला, व त्या

शेजारचे दोन बंगले, ह्यात उत्तम प्रकारे सोय केली होती.

प्रथम ५ फेब्रुवारीला ( १९१९ ) शांताचे लग्न होते व त्यानंतर ९ फेब्रुवारी रोजी आबासाहेबांचे, अशी चार दिवसांच्या अंतराने दोन्ही लग्ने झाली. त्यामुळे पाहुणे मंडळी बरेच दिवस राहिली. ते सर्व दिवस मोठ्या गडबडीत व मजेत गेले. सर्वांच्या जेवणखाण्याची व्यवस्था माझा भाऊ माधव अभ्यंकर, गोपाळराव गोरे व माणिक, सारखे हिंडून पाहत होते. रोज पहाटे तीन वाजल्यापासून रात्रीचा एक वाजेपर्यंत चूल पेटलेली असून चहा करणे व अन्न शिजविणे चालू असे! जे कोणी येईल त्याला अन्नदान सतत चालू ठेवावे, कोणालाही विन्मुख जाऊ देऊ नये, असे आम्ही आमच्या सर्व मंडळींना बजाविले होते, व त्यांनी तशी दक्षता घेतली. घरातील पाहुण्या बायकांवर काम पडू नये म्हणून मी पुण्याहून २०-२५ वाढपी मुद्दाम आणविले. वऱ्हाडपेक्षा तिकडील वाढपी ज्यास्त हुशार असत.

बंगल्याच्या समोरच्या बाजूस दोन हजार माणसे बसतील असा विस्तीर्ण मंडप घातला होता व तो उत्कृष्ट तऱ्हेने श्रृंगारला होता. त्यासाठी हल्लीसारखे मंडप घालणारे कंत्राटदार उमरावतीत त्याकाळी नव्हते. आम्ही आमच्या निंबोलीचे २०-२५ गडी आणवून लग्नापूर्वी दोन महिने मंडपाचे काम सुरू केले होते. त्या-काळात उमरावतीत वीजही नव्हती. म्हणून आम्हांला मंडपात मेणबत्तीची हंड्या-झुंबरे लावावी लागली.

प्रथम ५ फेब्रुवारीला शांताचे लग्न होते. आदल्या दिवशी लग्नाच्या अक्षतीची थाटाची मिरवणूक निघाली. पण मध्ये पाऊस आल्यामुळे थोडा विरस झाला. घरातल्या वडील बायका म्हणाल्या, "अक्षत भिजणे शुभ समजतात." पण हा शकुन चांगला की वाईट याची माझ्या मनाला मात्र उगीच हुरहूर लागली. लग्नाचा गोरज मुहूर्त होता. त्या दिवशीचे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. मात्र कन्यादान झाल्यावर मला एकाएकी हृदयविकाराचा झटका आला! डॉ. भट जवळ होतेच. त्यांनी मला ताबडतोब उपचार करून निजवून ठेविले. त्यामुळे लग्नानंतरच्या व्याह्यांच्या रात्रीच्या पंगतीला उशीर झाला. सर्व व्याहीमंडळींना चांदीची ताटे व बाकीच्यांनाही दुहेरी पाट व त्यांवर केळीची पाने मांडली होती. पण अण्णासाहेबांनी गडबडीत जे कोणी जिथे जाऊन बसले तिथे त्यांना बसू दिले. त्यामुळे वरपक्षाकडील काही मंडळी चांदीच्या ताटावर बसविली गेली नाहीत व घरी गेल्यावर त्याबद्दल ती खूप रागावली. श्री. पांडुरंगराव देसाईंनी उदारपणाने त्या सर्वांची समजूत केली असेही मला कळले. मग दुसरे दिवशी सकाळीच मी त्यांच्याकडे जाऊन त्याना सांगितले की, "मला फीट आल्यामुळे मी पंगतीत हजर राहू शकले नाही, त्यामुळे पानांचा हा घोटाळा झाला. आता आपणांकडील सर्व मंडळींना आम्ही अधिक एक जेवण देऊन मी सर्वांना चांदीची ताटे मांडून योग्य सत्कार करिते." पांडुरंगरावांनीही थोर मनाने.मला म्हटले की, "गर्दीत असे झाले याबद्दल मी आमच्या मंडळींची

समजूत केलेली आहे; आता कुणाचा राग नाही." पण माझ्या फार आग्रहामुळे त्यांनी माझ्या त्या दुसऱ्या भोजनाच्या आमंत्रणाचा स्वीकार केला व सर्वांची योग्य मानाने जेवणे झाली. मी ह्या चांदीच्या ताटांच्या मांडण्याची फार काळजी घेत असे व त्यावद्दल कुणी रागावू नये म्हणून जपत असे. या लग्नास आलेल्या राजघराण्यातील सर्व मंडळींची पंगत मी माडीवरच करवीत असे व मग ती सर्व मंडळी आमच्या मोठ्या पंगती पाहण्यास मांडवात खाली खुर्च्या असत त्यांवर नुसते बसून बघत. सर्व पंगतीत फार सुंदर रांगोळ्या, फुलदाने, कुंड्या वगैरे कलात्मक मांडण्यात माणिक फार परिश्रम घेई व त्या पंगती सर्वांना पसंत पडत.

एकंदरीत ह्या लग्नाचे समारंभ उत्तम तऱ्हेने पार पडले. हा लग्नसमारंभ पाहण्यास शेजारच्या खेड्यापाड्यांतूनही खूप लोक जमा झाले होते व लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनी एकच उद्‌गार काढले की, "आजपर्यंत वऱ्हाडात एवढ्या थाटात व शिस्तवार असे कोणाचेच लग्नकार्य झाले नाही."

आता आबासाहेबांच्या लग्नाचा प्रारंभ करायचा होता. लग्नाच्या अगोदर तीन दिवस मुलीकडची मंडळी आली होती. त्यांना शेजारच्या बेदरकरांच्या बंगल्यात आम्ही जानोसा दिला होता. मुलीची मावशी व मामा सुरुवातीसच म्हणू लागली की, "तुमची पाहुणी मंडळी बरीच दिसतात. आमच्याकडून ह्या सर्वांना जेवणास बोलावण्याची व्यवस्था कशी होणार? मंडपही खूप मोठा घालावा लागेल." तेव्हा मी म्हटले, "तुम्हांला शक्य नसेल तर आम्ही मांडव घालून देतो." इतक्यात मुलीची आत्या काकू आपटे तेथे आल्या. त्यांनी आपली मुलगी नुक्तीच मिरजेच्या युवराजांना दिली होती. त्या म्हणाल्या, "आम्ही कबूल केल्याप्रमाणे सर्व करतो. ती सारी जबाबदारी मी घेते. तुम्ही काळजी करू नका." आणि खरोखरीच नंतर त्यांनी पुढाकार घेऊन माझे व आमच्या आप्तेष्टांचे फार अगत्य केले. खरे म्हणजे मी त्यांच्यामुळेच हे लग्न ठरविले होते. परांजप्यांचे घराणे मला तीन पिढ्यां-पासून ठाऊक होते. मुलगीही रूपाने हजारात होती व स्वभावाने चांगली असल्याचे मी ऐकिले होते. म्हणून लग्न ठरविताना मी इतर गोष्टींचा विचार केला नव्हता. आमच्या त्या काळात उत्तम अहेर व मानपान करण्याची विशेष महती समजली जात असे. म्हणून मी मुलाकडील मानपान, अहेर वगैरे आमच्याकडूनच तयार करण्याचे पत्करले. शिवाय वरमातेला तोंड धुण्याच्या पाण्याच्या वेळी जे मान देण्याचे असतात, तसेच सर्व मान मी माझ्या सर्व चुलत जावांसाठीही आमच्याकडूनच करविले व ते सर्वांना कौतुकास्पद वाटून फार पसंत पडले.

ते लग्नही शांताच्या लग्नाप्रमाणे मोठ्या थाटात पार पडले. लग्नसमारंभात आमच्याकडे पंगतीची ऊठबस सकाळपासून रात्रीपर्यंत एकसारखी चालू होती. लग्नात बायकांना एकत्र बसून गप्पागोष्टी करून मित्रत्व वाढविण्याची खूप संधी मिळाली. त्यामुळे त्यांच्यात प्रसन्न व खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले. वरात

हत्तीवरून निघाली व ती पाहण्यास रस्त्याच्या दुतर्फा लोकांची अफाट गर्दी लोटली. वरातीनंतर लक्ष्मीपूजन होऊन मुलीचे नाव 'पद्मावती' ठेविले. लग्नानंतर आमच्याकडील सर्व मानकरी व पाहुण्या बायकांना मी त्यांच्या योग्य मानाप्रमाणे लुगडी व चोळ्या देऊन ती वस्त्रे नेसण्याचा आग्रह केला. तो समारंभ मोठा सुंदर दिसला! या समारंभाबद्दल अण्णासाहेब मला गंमतीने नंतर म्हणाले, "लोक म्हणताहेत की, मुलाच्या लग्नात आक्कासाहेबांनी इतक्यांना लुगडी दिली की, वरातल्या केरसुणीलाही म्हणे लुगडे नेसविले!"

लग्नानंतर आमच्या नव्या सुनेला आम्ही आमच्या दुसऱ्या मुलांप्रमाणेच सर्वांच्यात बोलू बसू दिले. बाहेरची तिऱ्हाईत मंडळी आली म्हणजे मात्र काही जुन्या रीतीप्रमाणे ती वडील माणसांचा आदर करी, तो मी तसाच राहू दिला. पण लग्नानंतर आठदहा दिवस ती फारच खिन्नखिन्न राही. दगदगीमुळे ती फार दमली पण होती, पण एकंदरीत तिची प्रकृती अशक्त आहे असे मला दिसून आले. माझ्या मुलांबरोबर तिने बाहेर फिरायला जावे, त्यांच्यात बसून पत्ते वगैरे खेळावे, मोकळेपणाने बोलावे राहावे, म्हणून मी पहिल्यापासून प्रयत्न करीत होते. आठदहा दिवसांनी ती जरा खुलू लागली.

याप्रमाणे शांताबाई व आबासाहेब यांचे लग्नसमारंभ मोठ्या प्रमाणात व चांगल्या रीतीने पार पडले. बारीकसारीक काही बोलणीचालणी झाली, पण ती मुद्दामच इथे नमूद केली नाहीत. प्रत्येकाच्या राशीला काही हेवेदावे करणारी माणसे असतात, पण त्यांच्या गोष्टी मी अधिक वाढू दिल्या नाहीत, व त्यांची चर्चा पण केली नाही. त्यामुळे कार्य आनंदाने व खेळीमेळीने पार पडले.

● ● ●

शांताच्या लग्नानंतर काही दिवस तिच्यासह विजापुरास राहून, रजा संपल्यावर आमचे नवे जावई मार्चमध्ये आसामात परत गेले. जाताना शांताला घेऊन दोन दिवस नागपूरला राहिले, व तिला तेथेच ठेवून आपण एकटेच आसामकडे गेले व 'शांताला जूनमध्ये आसामात नेईन, तोवर तुमच्याकडेच राहू द्या' असे म्हणाले. शांता विजापूरला जाऊन तिथली मंडळी पाहून खूष झाली होती. तिने मला तिच्या नव्या घराची खूप माहिती सांगितली. "ती मंडळी फार प्रेमळ असून मला त्यांनी अतिशय ममतेने वागविले. घरात फार जुनी रीत आहे. प्रत्येक सून आपल्या नवऱ्याच्या उष्ट्या ताटात जेवते. मलाही तसे करावे लागले. घरात स्वयंपाकास तेवढी बाई आहे. बाकी वाढणे, चटण्या-कोशिंबिरी करणे, शेण लावून उष्टी काढणे वगैरे कामे सुनांनाच करावी लागतात. मी त्यांच्या बरोबरीने ते सर्व

केले व मला त्यात मौज वाटली. आसामात मात्र मला साहेबी पद्धतीने राहावे लागेल..." वगैरे. ते ऐकून मला समाधान वाटले की, माझी मुलगी ज्या घरात गेली तिथे समरस होऊन वागली. पण तिचा एक नवीनच उद्भवलेला दृष्टिकोन मला दिसून आला. "आपल्या घरात औपचारिक गोष्टी ( formalities ) फार पाळल्या जातात त्या करू नयेत" अशा तऱ्हेचे ती बोलू लागली. तेव्हा मी तिला म्हटले, "प्रत्येक घरची काही वैशिष्ट्ये असतात, ती त्यांनी पाळणे योग्य. आता तुझ्या नव्या घरात तुला योग्य वाटतील त्या पद्धती तू कर."

माझ्या नव्या सुनेशी मी शक्य तितक्या प्रेमाने, तिचे सर्व प्रकारे कौतुक करीत वागण्याचा कसून प्रयत्न करीत असे. माझ्या मुली मला गमतीने एकीकडे चिडवायच्या की, "आम्हांला लहानपणी तू बऱ्याच कडकपणाने वागवीत होतीस. पण आता सुनेच्या बाबतीत मात्र तुझे फारच लाड चालले आहेत. म्हणजे आमच्या घरात सुना माहेरवाशिणी व लेकी या सासुरवाशिणी असे झालेले दिसत आहे!"

पद्मावतीचा ( सुनेचा ) स्वभाव विशेष खोल असा मला दिसून आला. पण मी सांगेन तशी ती वागायची. माणिक घरात कशी वागते, कशी कामे करिते, ते पाहून तिने ते लवकर उचलले. आमच्या घरी सर्व मुलांनी रोज सकाळी, तिन्ही सांजा व रात्री प्रथम देवाला व मग घरातील वडील मंडळींना नमस्कार करण्याची पद्धत होती. त्याप्रमाणे पद्मावतीही करू लागली.

माणिकच्या लग्नाची चिंता मला आता अधिकाधिक ग्रासू लागली. तिला अनुरूप व तिच्या मनास येईल असे स्थळ आम्हांस आढळेना. एका इंडियन मेडिकल सर्व्हिसच्या मुलाने तिला मागणी घातली, तेव्हा 'मला डॉक्टर तर मुळीच नको' असे म्हणून तिने ती मागणी नाकारली. मागे रँ. परांजपे यांनी सुचविलेले विनायकराव भिडे यांचे स्थळ पुन्हा आमच्या मनात घोळू लागले. पण त्यांना विलायतेहून यायला अद्याप आठदहा महिने होते. शिवाय त्यांची मंडळी हुंडा फार मागत आहेत, अशा अफवा माझ्या कानांवर आल्या होत्या. तेव्हा माणिक म्हणाली, "पैशावर माझी किंमत करणारे घर मला नको. तुम्ही त्या मंडळींना विचारू नका. मी माझे वाचन, लेखन व ईश्वरचिंतन यांतच मग्न राहणार, व घरात राहून तुमची सेवा करणार. मला लग्न करावेसेच वाटत नाही." त्यामुळे ते तेवढ्यावरच राहिले. माणिकला वाङ्मयाची विशेष गोडी असून तिला लेखनकला स्वभावतःच जमत असे. पुढेमागे विलायतेस जाऊन ही कला वाढवावी अशी तिची उत्कट इच्छा होती. पण ईश्वरी संकेत हे 'झाकले माणिक'च राहावे असा होता असे दिसते.

इ. स. १९१९ जूनमध्ये आम्ही नागपुरला परतल्यावर पूर्वी ठरल्याप्रमाणे शांताला आसामात धुब्री येथे तिच्या यजमानांकडे धाडिली. तिला पोहोचविण्यास आबासाहेब गेला. आता मी सर्वांच्या विचाराने पद्मावतीच्या शिक्षणाची योजना ठरविली. पदवी मिळविण्याच्या भरीस न पडता तिने General Knowledge

( सामान्य ज्ञान ) वाढविण्याचा प्रयत्न करावा असे आबासाहेबांचेही मत पडले. तिची बुद्धि कुशाग्र होती. माझे चुलतदीर रामभाऊ जोशी त्यावेळी नागपुरात इतिहासाचे प्रोफेसर होते. त्यांच्या सांगण्यावरून पद्मावतीस त्यांच्याकडे इंग्रजी संभाषण शिकविण्यासाठी आठवड्यातून तीन दिवस धाडावयाचे ठरले. आठवड्यातून तीन दिवस ती कॉन्व्हेंटमधील व्हाईट सिस्टर्स यांच्याकडे चित्रकला व शिवणकला शिकण्यास जाऊ लागली. चांदोरकर मास्तर दररोज दोन तास असे आठवड्यातून सहा दिवस गणित, संस्कृत, मराठी व इंग्रजी असे विषय घेऊ लागले. ती एकंदरीत अशक्तच होती, म्हणून डॉ. भट यांच्या सल्ल्याने मी तिला Tonics ( शक्तिवर्धक औषधे ) सुरू केली, व टेनीस किंवा ब्याडमिंटन खेळणे, पायी फिरायला जाणे, अथवा घोड्यावर बसण्यास शिकणे, यांपैकी तिला जो आवडेल तो व्यायाम घेण्यास सांगितले. ती अशक्त असल्यामुळे तिला तिच्या मनाप्रमाणे वागविण्यात येत नाही, असे कोणी कोणी म्हटल्याचे माझ्या ऐकण्यात आले. पण माझे मन या बाबतीत स्वच्छ असल्यामुळे मी तिकडे लक्ष दिले नाही.

अण्णासाहेब मात्र सुनेशी फारसे बोलायचे नाहीत. मला कधीकाळी सुनेला काही विशेष उपदेश करावयाचा असला तर मी त्याबद्दल अण्णासाहेबांचा सल्ला विचारायची. पण ते मला म्हणायचे, "तुम्ही सुनेबाबत आपले कर्तव्य उत्तम बजावीत आहा. मी ठरविले आहे की, सुनांच्या बाबतीत आपण काही बोलायचे नाही. मुलगे व सुना तुमच्या, त्यांचे तुम्ही पाहून घ्या; मुली व जावई माझे, त्यांचे सर्व मी पाहीन. आपण पूर्वीच अशा वाटण्या केल्या आहेत."

आबासाहेब शांताला आसामात पोहोचवून पंधरावीस दिवसांनी नागपूरला परत आला. एक दिवस त्याला एकाएकी खूप ताप भरला. ताप आज उतरेल, उद्या उतरेल, म्हणून तीनचार दिवस वाट पाहिली. परंतु ताप उतरण्याचे चिन्ह दिसेना. रोज चार ते पाच डिग्रीपर्यंत चढायचा आणि शंभर डिग्रीखाली उतरायचा नाही. रक्तात विषमाचे लक्षण आढळले नाही. मी ताईला मुंबईहून बोलावून घेतले. कोणत्याच डॉक्टरास तापाची परीक्षा होईना. शेवटी अण्णासाहेबांच्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून त्यांनी वैद्यकीय मासिके व वेगवेगळ्या तापांवरील पुस्तके स्वतः वाचून खात्री करून घेतली की, हा ताप आसामातील विशिष्ट प्रकारचा मलेरिया असून त्यास मोठ्या प्रमाणावर क्विनीन देणे हाच उपाय सध्या उपलब्ध आहे. मग त्यांनी तीनचार डॉक्टरांशी विचारविनिमय करून ते निदान करून पक्के घेतले व त्याप्रमाणे उपाययोजना सुरू केली. त्यानंतर आबासाहेबास अंगात चांगली शक्ती येण्यास दोन महिने लागले. मागे कमळाबाईच्या एका दुखण्यातही अण्णासाहेबांनी अशीच वैद्यकीय ग्रंथ वाचून उपाययोजनेची जबाबदारी स्वतःवर घेतली होती.

आबासाहेब बी. ए. पास होऊन त्याचे विलायतेस जाण्याचे दिवस आता येऊ लागले. आमचे जावई शंकरराव देसाई यांच्या शिफारशीने ते शिकलेल्या

केंब्रिज विद्यापीठाच्या ' सिडने ससेक्स ' कॉलेजात त्याला प्रवेश मिळाला. डिसेंबर १९१९ मध्ये तो विलायतेस जाण्यास निघणार होता. तो दूर जाणार म्हणून माझे हृदय फार कष्टी झाले. तो नुक्ताच मोठ्या दुखण्यातून उठलेला म्हणून मला त्याची काळजी वाटत होती. जाण्याच्या आदल्या रात्री तो माझ्या मांडीवर डोके ठेवून निजला व त्याला व मला काही तास रडणे आवरेना. विलायतेस जाताना आबासाहेबाला त्याच्या एका मित्राने खाडिलकरांच्या ' विद्याहरण ' नाटकाची प्रत भेट म्हणून दिली ! त्यातील गर्भित अर्थ त्याने ओळखला व तो मित्रास म्हणाला, " मी याप्रमाणे कोणत्याही मोहात न सापडता परदेशाहून विद्या मिळवून स्वदेशी परत येईन. याबद्दल कुणीही कसलाही संदेह मनात बाळगू नये. " तो मोठ्या धीरगंभीर वृत्तीने बोटीवर चढला. माझी सर्व मुले, पद्मावती, अण्णासाहेब व आमची आप्तेष्ट मंडळी बंदरावर गेली होती. त्यांनी त्याला आनंदाने निरोप दिला. माझी मात्र बंदरावर जाण्याची हिंमत झाली नाही. मागे ताई विलायतेस गेली तेव्हा असेच झाले होते.

आबासाहेब विलायतेस गेला त्याच दिवशी संध्याकाळीं मुंबईस नागपूरचे सर माणेकजी दादाभाई यांची मुलगी मिनी हिचे लग्न होते. ती सर्व मंडळी आमच्या फार स्नेहाची होती व मिनी आमच्या मुलींची मैत्रीण होती. या सर दादाभाईंची मोठी मुलगी फ्रेनी अशीच हट्टाने लग्न करायला तयार होत नव्हती. त्या दिवशी आम्ही सर्व मिनीच्या लग्नाला जाऊन घरी परत आल्यावर सर्व माणिकला चिडवू लागले की, " या फ्रेनीप्रमाणे तूही हट्टी आहेस. " त्या दिवशी अण्णासाहेबही तिला अंमळ रागाने म्हणाले, " आता लग्न करण्याबद्दल मीही तुला आग्रह करणार नाही. तुझ्या मनात येईल तसेच तू वाग. आम्ही तुझ्या हितासाठी तुला लग्न करण्याबद्दल एवढे जिव्हाळ्याने सांगतो, ते तुला काही पटत नाही. " अशा बोलण्याकडे माणिक कधीच लक्ष देत नसे. पण त्या दिवशी तिला अण्णासाहेबांचे बोलणे लागले, व ती खूप रडली. मीही माणिकवर जरा रागावले व दोन-तीन दिवस तिच्याशी बोललेच नाही. दुसऱ्या दिवशी अण्णासाहेब नागपुरास गेले.

या सुमारास नानासाहेब साठे ( चंपूताई साठे—माणिकची भावी नणंद—यांचे यजमान ) आम्हांला भेटायला आले. या मंडळींना गेले वर्ष-दीडवर्ष माणिक टाळीत असे. पण असा काही योग आला की त्यांनी बाहेरची घंटा वाजविल्यावर नेमकी माणिकच जवळ होती, ती दार उघडायला बाहेर गेली. त्यावेळी त्यांनी लगेच तिच्याजवळ गोष्ट काढली की, " माझे मेहुणे विनायकराव भिडे आय्. सी. एस्. होऊन चारपाच दिवसांतच विलायतेहून मुंबईस येऊन पोहोचतील. माझी फार इच्छा आहे की, तुम्ही त्यांच्याशी लग्न करावे. तर तुमचा काय विचार आहे ? " तेव्हा ती म्हणाली, " माझा विचार, पैशावर माझी किंमत होऊ नये असा आहे. " त्यावर ते म्हणाले, " भिडे मंडळींबद्दल अशा अफवा आहेत की, त्यांना मोठा

हुंडा हवा आहे, व त्या खऱ्या आहेत. पण मी त्या मताचा नाही, व स्वतः विनायकरावही त्या मताचे नाहीत. तेव्हा तुम्ही या संबंधाबद्दल जरूर विचार करा." माणिक म्हणाली, "हुंडा न घेण्याची तुम्ही हमी घेत असाल तर मी आक्काला आतून बोलावून आणते. तुम्ही काय ते तिच्याशी बोला." मग माझे आणि नानासाहेबांचे बोलणे होऊन असे ठरले की, अण्णासाहेबांनी प्रथम मुलाला बघावे आणि मग पुढचे बोलणे करावे. मग अण्णासाहेब पुण्यास जाऊन विनायकराव भिडे यांना भेटले. त्यांच्याबद्दल अण्णासाहेबांचे मत चांगले झाले, व थोड्याच दिवसांत त्यांची व माणिकची गाठ घालून देण्याचे ठरले.

त्याप्रमाणे ती ताईबरोबर पुण्यास गेली. माझी वहीण गोदू कानिटकर हिच्या घरी विनायकराव भिडे त्यांच्या आईसह तिला पाहण्यास आले. माणिकला त्यांनी पसंत केली. ते हुंडा घेणार नव्हते, परंतु त्यांना विलायतेचे कर्ज होते, ते फेडल्यावर लग्न करावे असे त्यांचे म्हणणे पडले. त्यावर अण्णासाहेबांनी म्हटले, "मी हुंडा म्हणून नव्हे, पण मुलीच्या नावाने स्वखुषीने रोख रक्कम व दागिने मिळून तीस चाळीस हजारांपर्यंत देणार आहे. त्यांतून तुम्ही तूर्त कर्ज फेडावे, व पुढेमागे तिचे पैसे तिच्याच नावाने बँकेत ठेवावे." हे त्यांनी तात्काळ मान्य केले. याप्रमाणे एकदाचे माणिकचे लग्न ठरले.

माणिकला हवे होते ते सर्व गुण विनायकरावांमध्ये होते. ते शरीराने चांगले उंच व रूपाने फारच देखणे होते. ते गणित विषयात केंब्रिज विद्यापीठाचे रँग्लर झाले होते. शिवाय ते घोड्यावर उत्तम बसत, व टेनिस चांगले खेळत. त्यांचा स्वभाव फार प्रेमळ, शांत व सरळ असा होता. मात्र त्यांच्या व माणिकच्या वयांत सहा महिन्यांचेच अंतर होते. परंतु या लग्नात आम्हांला हुंडा म्हणून नाही, तरी कोणत्या ना कोणत्या रूपाने एवढी देणगी द्यावी लागली, ही गोष्ट माणिकच्या मनाला फार बोचली. ती म्हणाली, "काट्यावाचून गुलाबाचे फूल मिळत नाही, हीच गोष्ट शेवटी माझ्या बाबतीत खरी ठरणार होती!"

लग्न पुण्यास मळेकरांच्या वाड्यात ८ मे १९२० रोजी झाले. त्यापूर्वी महाबळेश्वरी कमळाबाई फार आजारी झाली, त्यामुळे ती लग्नाला येऊ शकली नाही. राजेसाहेब व इंदुराजा आले. सर्व देसाई मंडळी, व वऱ्हाडातील पुष्कळ आतेष्ट मंडळी पण जमली. लग्नापूर्वी आठपंधरा दिवस माणिक इन्फ्ल्युएंझाने आजारी झाली होती. लग्नाच्या दिवशी तर एकाएकी तिचा जीव फार घाबरा झाला! त्यावेळी मी फार घाबरले! कारण असे होणे अशुभ असते. असो आम्ही सर्व भिडे मंडळींना बोलीपेक्षा अधिक अहेर व देणग्या दिल्या. मनाजोगा जावई लाभला म्हणून आम्ही सर्व काही हौसेने व थाटाने केले.

लग्नानंतर माणिक विनायकरावांबरोबर त्यांच्या नोकरीच्या गावी अहमदाबादेस गेली. आम्ही शांताच्या बाळंतपणासाठी म्हणून मुंबईस ताईकडे येऊन राहिलो.

ता. २९ जून १९२० रोजी शांताला मुलगी झाली. तिचे नांव ‘ प्रभावती ’ ठेविले. मुलगी अंगापिंडाने सशक्त होती. मी त्या दोघींना नागपूरला घेऊन गेले व तीन महिने तिथेच ठेवून घेतले. नंतर चांगली सोबत पाहून त्यांना आसामात धाडिले.

● ● ●

याच सुमारास आमच्या घरात एक नवी घटना सुरू झाली, ती अकल्पित पण मानमरातब वाढविणारी होती. जुलैमध्ये अण्णासाहेबांना एक दिवस गव्हर्नर सर फ्रँक स्लाय यांचे बोलावणे आले. “ फार जरूरीचे काम आहे ” असे त्यांनी म्हटले होते. आम्हांला वाटले की, त्यावेळी मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांविरुद्ध हिंदुस्थानात वाद चालला होता, त्यात अण्णासाहेब होतेच, तेव्हा त्यासंबंधी काही जाब विचारण्यास गव्हर्नरनी त्यांना बोलाविले असेल.त्याप्रमाणे त्यांना चांगला खरमरीत मुकाबला देण्याच्या तयारीने अण्णासाहेब गेले. पण तिथे गेल्यावर त्यांच्याशी गव्हर्नरसाहेब फारच प्रेमाने बोलले. ते म्हणाले, “ तुम्ही स्वतंत्र बाण्याचे आहात, म्हणून मला तुमच्याबद्दल आदर वाटतो. आमचा सच्चा इंग्लिशमन अशाच बाण्याचा असतो. मी तुम्हांला सरकारात अशी एक जागा देऊ इच्छितो की त्यामुळे तुम्ही सरकारचे नोकर न होता, स्वतः सरकारच व्हाल.” असे म्हणून त्यांनी त्यांना एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरची जागा देऊ केली. यापूर्वी अण्णासाहेबांनी नागपूर हायकोर्ट जज्जाची जागा नाकारली होती, या गोष्टीला उद्देशून गव्हर्नरसाहेबांनी वरील उद्गार काढले होते. वास्तविक अण्णासाहेबांचे सरकारच्या ‘ काळ्या बुका ’त नाव होते. त्यांनी कधीही कोणत्याही प्रकारे सरकारची खुषामत केली नव्हती. ॲनी बिझांट यांना.सरकारने हद्दपार केले तेव्हा त्याबद्दल कौन्सिलात प्रथम सडेतोड प्रश्न विचारण्याची हिंमत अण्णासाहेबांनीच केली होती. गव्हर्नर स्लाय तर नेहमी म्हणे, “ वऱ्हाडात जर मला कोणाची भीति वाटत असेल तर मोरोपंत जोशांची. ” अशा माणसाला गव्हर्नर एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरचे पद स्वीकारण्याचा आग्रह करीत होते हे विशेष !

अण्णासाहेबांनी याबाबत विचार करण्यास आठदहा दिवसांचा अवधी मागून घेतला. गव्हर्नरने तेव्हा त्यांना सांगितले, “ मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा लोकप्रिय होण्यासाठी सरकारला लोकांच्या विश्वासातली कर्तृत्ववान व निःस्पृह माणसे एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमध्ये नेमायची आहेत, त्यांत तुमचे नाव माझ्या डोळ्यांसमोर आहे. ” अण्णासाहेबांनी आपल्या निकटच्या स्नेह्यांशी विचारविनिमय केला. त्या सर्वांनी त्यांना असा सल्ला दिला की, “ गव्हर्नर स्लाय हा सरळ मनुष्य आहे. तो तुम्हांला एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरच्या पदावरून करावयाची कामे लोकानुवर्ती

करण्याची खचित संधी देईल. ती नच दिल्यास तुम्ही केव्हाही राजीनामा देण्यास मोकळे आहात. तरी ह्या अनायासे चालून आलेल्या संधीचा तुम्ही जरूर उपयोग करून घ्यावा." वास्तविक ही जागा पत्करण्यात पैशाच्या दृष्टीने अण्णासाहेबांचे फार नुकसान होते. कारण या पदावर त्यांना दरमहा चार हजार रुपये पगार मिळणार होता, आणि त्यांची वकिलीची प्राप्ती याहून किती तरी पटीने अधिक होती. पण हे पद स्वीकारल्याने सरकारला हिंदी लोक कर्तृत्ववान असतात हे पटवून देता येईल व लोकांचीही सेवा करिता येईल, हाच विचार त्यांनी प्रामुख्याने केला, व या नेमणुकीस संमती दिली. त्यांच्याशिवाय श्री. गंगाधरराव चिटणवीस हे दुसरे हिंदी कौन्सिलर, व मिस्टर स्टँडन हे तिसरे (इंग्रज) कौन्सिलर म्हणून नेमणूका झाल्या. श्री. शंकरराव चिटणवीस व श्री. केळकर यांस मिनिस्टर म्हणून नेमण्यात आले.

हे पद स्वीकारताना अण्णासाहेबांनी एक गोष्ट मात्र गव्हर्नरसाहेबांना स्पष्ट सांगितली. ती ही की, "तुमच्या अधिकारी वर्गाची जरी तशी पद्धत नसली, तरी मी दौऱ्यावर गेलो म्हणजे माझ्या जुन्या पक्षकारांच्या व त्या त्या गावच्या प्रमुख मंडळींच्या गाठीभेटी घेईन; त्यांच्या घरीही जाईन. सभा वगैरे झाल्यास त्यांत व्याख्याने देईन. अर्थात या नवीन कौन्सिलपासून तूर्त आपणांस काय फायदे आहेत व ते वाढविण्यासाठी कसकसे प्रयत्न केले पाहिजेत यांची मी तेथे चर्चा करीन." गव्हर्नरसाहेबांनी याबाबत त्यांना आडकाठी केली नाही.

पण अण्णासाहेबांना हा मान मिळाला हे त्यांच्या काही हितशत्रूंना पाहवले नाही. ही नेमणूक रद्द व्हावी अशी खटपट करण्यासाठी त्यांनी गव्हर्नरसाहेबांकडे एक शिष्टमंडळही धाडिले. या शिष्टमंडळात अण्णासाहेबांना आपले मित्र म्हणविणारीही मंडळी होती हे विशेष! पण ह्या शिष्टमंडळाच्या खटपटीचा काहीएक उपयोग झाला नाही. एक दिवस सहज गव्हर्नरनी अण्णासाहेबांना विचारले, "तुम्हांला कोणी शत्रू आहेत का?" अण्णासाहेब म्हणाले "नाही, कोणी नाही. का?" तेव्हा गव्हर्नरनी हसून त्यांना शिष्टमंडळाचा अर्ज दाखविला. अर्थात त्या अर्जाची गव्हर्नरसाहेबांनी लावायची ती वाट लाविली.

नागपूरच्या नव्या कौन्सिलच्या अधिकारग्रहणाचा शपथविधी फार मोठ्या समारंभाने झाला. आम्ही सर्व तो पाहण्यास गेलो होतो. समारंभ आटोपल्यावर गव्हर्नरसाहेबांनी येऊन आमचे अभिनंदन केले व माझ्या मुलींना म्हणाले, "Are you not proud of your father? We have chained a lion today" (तुम्हांला तुमच्या वडिलांबद्दल अभिमान वाटत नाही काय? त्यांच्या रूपाने आम्ही एका सिंहाला बांधू शकलो आहो.) या नेमणुकीबद्दल अण्णासाहेबांना अभिनंदनपर अनेक तारा व पत्रे आली. शपथविधीनंतर घरी आल्यावर ते एवढेच

म्हणाले, “ आज माझी आई हवी होती. तिला आजचा समारंभ पाहून जो आनंद झाला असता, तो पाहण्याच्या भाग्याला मी अंतरलो. ”

अधिकारग्रहण केल्यावर अण्णासाहेबांनी आपला पूर्वीचाच पोषाख कायम ठेवला. काळी पाटलोण व बंद गळ्याचा काळा लांब कोट व डोक्याला किरमिजी रंगाचा जरीचा रूमाल. त्यांना कपड्यांची फारशी हौस नसे, पण ते नीट व्यवस्थित लागत. तरी पण ते कौन्सिलर झाल्यावर कुठे मोठ्या समारंभास जाताना माझे दोघे मुलगे त्यांना कपड्यांत मदत करण्यास जात. ते नोकरांकडून त्याबाबत कधीच मदत घ्यायचे नाहीत. अण्णासाहेबांचा दृष्ट होण्यावर मुळीच विश्वास नव्हता. पण का कोण जाणे, हे दोघे मुलगे कपड्यांत मदत करायला गेले की ते मला म्हणायचे, “ तुमच्या मुलग्यांना सांगा की, असे जोडीजोडीने मला कपड्यांत मदत करणे, एकत्र मोटारसायकलवर बसणे, जोडीने टेनिस खेळणे, करीत जाऊ नका; त्यांना दृष्ट होईल. ” मग का कोण जाणे, माझ्या पोटात धस्सच होई.

अण्णासाहेबांचा शकुनावर तर मुळीच विश्वास नव्हता. पण ते वकिली करू लागल्यापासून सकाळीं फिरायला गेले की त्यांना रोज तासपक्षी ( नीलकंठ ) उजवी घालून जात. ज्या दिवशी हे पक्षी ज्यास्त प्रमाणात दिसत त्या दिवशी त्यांना मोठ्या केसेस ( कामें ) येत. त्यांना निळा रंग लहानपणापासूनच फार आवडे. या पक्ष्यांच्या योगायोगाचे मात्र त्यांना फार आश्चर्य वाटे. त्यांनी काम सोडल्यावर हे पक्षी त्यांना कमी प्रमाणात दर्शन देत व ते मग गंमतीने म्हणायचे, “ आता पारमार्थिक विषयांत प्रगती करण्यास ते मला साथ देत आहेत ! ”

अण्णासाहेब अधिकारपदावर आल्यानंतर लगेच आम्हांला वेगवेगळ्या लोकांचे असे काही अनुभव आले की, जे एरव्ही कधी आले नसते. किती तरी शिष्ट समजल्या गेलेल्या लोकांनी अण्णासाहेबांकडे मोठमोठ्या अधिकाराच्या जागांसाठी वशिला लावण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार अण्णासाहेबांना अगदी आवडायचा नाही. त्याबद्दल मात्र ते कधीकधी मला सांगत की, “ आपल्या लोकांना काय ही अधिकाराची हाव ! ही केव्हा व कशी जाणार ? ही जाईपर्यंत आमच्या देशाला चांगले दिवस यायचे नाहीत ! ” एकंदरीत जग खरोखरच स्वार्थसाधू लोकांनी भरले आहे. हे सर्व पाहून जगाच्या असारत्वासंबंधी आमची अधिकाधिक खात्री पटून आमचे मन ज्यास्त विरक्त होऊ लागले. पण त्याबरोबरच जगातील आमची कर्तव्यकर्मेही वाढत होती, व ती उत्तम तऱ्हेने पार पाडणेही प्राप्त होते.

अण्णासाहेबांच्या हितशत्रूंनी त्यांच्या नेमणुकीबाबत केलेल्या कारवायांचा मी मागे उल्लेख केलाच आहे. आणखी एका ‘ स्नेह्यां ’ ची हकीगत सांगते. हे गृहस्थ आमच्या तीन पिढ्यांच्या परिचयाचे होते. अण्णासाहेब अधिकारपदावर आल्यानंतर ह्या गृहस्थांनी अण्णासाहेबांबद्दल गव्हर्नरसाहेबांजवळ फार वाईट चुगल्या केल्या. ते गृहस्थ मोठे सरकारी अधिकारी होते व त्यांना अधिक बढती मिळण्याची

संधी प्राप्त होणार होती व ती बढती देणे अण्णासाहेबांच्या हाती होते. त्याबद्दल जेव्हा गव्हर्नरजवळ चर्चा सुरू झाली, तेव्हा त्या गृहस्थांच्या बढतीबद्दल अण्णासाहेबांनी तात्काळ संमती दिली. स्वत: गव्हर्नरना ते पसंत नव्हते. त्यांनी अण्णासाहेबांना बोलून दाखविले की, "तुमची एवढी नालस्ती करणाराला तुम्ही वर चढविता, हे मला बिलकूल पसंत नाही." अण्णासाहेब म्हणाले, "तो खाजगी प्रश्न आहे. ऑफिशियल गोष्टींत मी त्याचा विचार करू इच्छित नाही. आपल्या कामाच्या बाबतीत हा माणूस लायक आहे; त्याला बढती अवश्य मिळाली पाहिजे." त्याप्रमाणे त्यांनी त्याला बढती दिलीही!

आणखी एका बाबतीत अण्णासाहेबांनी असेच औदार्य दाखविले. श्री. चिंतामणि देशमुख हे विलायतेहून आय्. सी. एस्. होऊन आले तेव्हा त्यांनी तेथून इंग्रज बायको करून आणली होती. त्यांचा व आमचा फार जुना घरोबा. पण या लग्नाविषयी त्यांचे सर्व नातेवाईक व आमच्यासारखी स्नेही मंडळी, तसेच त्यांच्या प्रभू जातीचे काही लोक यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. आमच्या घरातही त्यांच्या ह्या कृतीबद्दल टीका झाली असे त्यांच्या कानांवर गेल्यामुळे ते आम्हां सर्वांशी पहिल्यासारखा संबंध ठेवीनासे झाले. हा चिंतामणि इतका चोख व हुशार अधिकारी, पण त्याच्या ह्या लग्नामुळे युरोपियन अधिकारी त्याच्या बढतीच्या विरुद्ध होते. तेव्हा अण्णासाहेबांनीच गव्हर्नरला म्हटले की, "लग्न ही त्याची खाजगी बाब आहे. शिवाय त्याचे ते लग्न कायदेशीर रीत्या झालेले आहे. आपल्याला त्याचे काम, त्याची कुशलता व चोख वागणे याकडेच पाहायला हवे. आजमितीस नागपूर प्रांतात त्याच्या इतका कुशाग्र बुद्धीचा व सरळ अधिकारी नाही! मी त्याला लहानपणापासून पाहत आहे. त्याच्या बुद्धिमत्तेस आपण अवश्य वाव दिला पाहिजे." त्यानंतर गव्हर्नरसाहेबांनी चिंतामणीला नागपूरला आणिले व त्याच्या पुढील बढतीस संधी दिली. ही गोष्ट कदाचित चिंतामणीला कळलीही नसेल!

ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद अण्णासाहेबांनी कधीच मानला नाही. जातपात, धर्म यांचा विचार न करिता प्रत्येकाला त्याच्या कर्तृत्वशक्तीप्रमाणे वाव देणे हे त्यांचे धोरण होते. अकोल्याचे दिनकरराव (दादासाहेब) राजूरकर, उत्तमराव इटकीकर पाटील, इत्यादी ब्राह्मणेतर मंडळींना पुढे येण्यास अण्णासाहेबांची फार मदत झाली. त्याबद्दल ती मंडळी नेहमी त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहिली, व ती त्यांना फार मानीत असत. अण्णासाहेबांच्या धोरणामुळे त्या काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर व इतर जातीयतेचे वाद बिलकूल उद्भवले नाहीत.

सरकारी कामाबद्दल आणखी काही धोरणे अण्णासाहेबांनी ठेविली होती. सरकारी कामासाठी दौऱ्यावर गेले असताना बाजवीपेक्षा अधिक खर्च होऊ द्यायचा नाही याबद्दल ते दक्षता बाळगीत. त्याबाबत त्यांना तशा पुष्कळ सवलती होत्या, पण ते फक्त गरजेपुरताच त्यांचा वापर करीत. त्यांना सरकारी कारकून, टायपिस्ट,

चपरासी वगैरे माणसे मिळाली होती, पण त्यांपैकी कोणालाही आपल्या घरातले खाजगी काम सांगायचे नाही असा त्यांचा नियम असे. आगगाडीत प्रवास करताना त्यांना एक पूर्ण फर्स्ट क्लासचा डबा मिळण्याची सवलत होती. पण ते फक्त एकच सीट घेत, व एकाच नोकराचे तिसऱ्या वर्गाचे भाडे लावीत. याहून ज्यास्त खर्च घेत नसत. वक्तशीरपणा पाळणे फार दक्षतेने करीत. या नागपूरच्या कौन्सिलच्या अधिवेशनांतून "सरकार पचमढीस जाऊन प्रजेचा खर्च विनाकारण वाढविते; पचमढीस जाणे बंद व्हावे" अशा तऱ्हेचे प्रश्न व टीका फार झाली. तेव्हा गव्हर्नरच्या कौन्सिलच्या तिन्ही मेंबरांनी व दोघा मिनिस्टरांनी कौन्सिलात जाहीर केले व आश्वासन दिले की, 'आम्ही पचमढीस आमच्या खाजगी खर्चाने राहू, व आमचा बंगला, दिवाबत्ती, पेट्रोल, खाजगी नोकर यांचा आमचा आम्ही खर्च करू. आमच्या मोटारी तर आम्ही आमच्या खाजगी खर्चानेच घेतलेल्या आहेत. तो खर्च केव्हाच सरकारवर लादलेला नाही. शिवाय आम्ही पचमढीस कोणत्याही तऱ्हेचा भत्ता घेणार नाही. मात्र आमचे सरकारी ऑफिस व त्याचा स्टाफ हा खर्च तेवढा नियमानुसार सरकारातून होईल." त्याप्रमाणे ह्या सर्वांनी अगदी निःस्पृहपणे आपले आश्वासन पाळले.

अण्णासाहेबांचा आताचा पगार त्यांच्या वकिलीच्या प्राप्तीपेक्षा किती तरी कमी होता. तरी पण परोपकाराच्या देणग्या देणे, दुसऱ्याला द्रव्यसाहाय्य करणे, वगैरे गोष्टी पूर्ववत चालूच होत्या. शिवाय एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर या नात्याने द्याव्या लागणाऱ्या चहापार्ट्या, मेजवान्या, यांचाही खर्च करावा लागे. या सर्वांना त्यांचा पगार पुरत नसे. आमच्या खाजगी शेतीच्या उत्पन्नातून त्याची भर करावी लागे. आमच्या बाळासाहेबाचे अद्याप बरेच शिक्षण व्हायचे होते. माझ्या कधी कधी मनात येई की या सर्व गोष्टींमुळे या मुलाच्या शिक्षणखर्चात आम्हांला हात आखडता घ्यावा लागेल की काय? पण आतापर्यंत परमेश्वराने आमच्या पाठीशी उभे राहून आमच्या गरजा सतत पुरविल्या आहेत, त्याप्रमाणे यापुढेही तो पुरवील व आमच्या आयुष्यात तो आम्हांला काही कमी पडू देणार नाही, असा माझा पूर्ण विश्वास होता.

बाळासाहेब यावेळीं (१९२०) नुकताच मॅट्रिक होऊन पुण्याच्या डेक्कन कॉलेजात गेला होता. तिथे एक वर्ष राहून त्याने पुढे शेतकी कॉलेजची पदवी मिळवावी असा आमचा हेतु होता. त्यासाठीच वऱ्हाडात आम्ही बरीच शेती करून ठेविली होती. बाळासाहेब कॉलेजात असताना सरकारने ॲनी बिझांट यांना हद्दपार केल्याची घटना झाली. त्यामुळे मोठा सत्याग्रह करण्यासंबंधी सर्व थिऑसफिस्ट लोकांनी पुढाकार घेतला व निषेधार्थ पुष्कळांनी शाळा-कॉलेजे सोडली. त्यावेळीं बाळासाहेबाच्याही मनाने उचल खाल्ली होती की, आपणही या सत्याग्रहात भाग घ्यावा. यापूर्वीच हिंदुस्थानात १९१८ मध्ये जो एन्फ्ल्युएंझाचा कहर झाला होता,

त्यात व्हॉलंटियर म्हणून बाळासाहेबाने खूप काम केले होते. त्यावेळी त्याने ती गोष्ट आम्हांला कळू दिली नव्हती. ॲनी बिझांटच्या सत्याग्रहाच्या वेळी मात्र त्याने आमची संमती विचारली, व त्याच वेळेस त्याने वरील गोष्ट आम्हांला सांगितली. त्यावेळी परमेश्वरानेच त्याचे रक्षण केले म्हणायचे. कारण त्या साथीत किती तरी तरुण माणसे दगावली ! यावेळी अण्णासाहेबांनी त्याला समजावून सांगितले की, विद्यार्थी-दशा संपेपर्यंत अशा सत्याग्रहात भाग घेऊ नये. ते त्याला पटले व त्याने मग कॉलेज सोडले नाही.

पण लष्करी शिक्षण व लष्करी पेशा घेण्याची त्याची उत्कंठा आता वाढू लागली. लहानपणापासून त्याला सैन्यात काम करण्याची हौस होती. लष्करी शिक्षण घेण्यास अण्णासाहेबांनी त्याला तात्काळ संमती दिली. मी मात्र त्याबाबत कचरले. याचे मुख्य कारण म्हणजे त्यामुळे त्याला इंग्रजांची चाकरी करायला लागून त्यांच्यासाठी म्हणून लढावे लागणार, ही गोष्ट मला असह्य वाटली. आपला देश स्वतंत्र असता तर मीच त्याला लष्करी पेशा घेण्याचा आग्रह केला असता. पण या इंग्रजांच्या गुलामगिरीत ते नको–आपल्याच देशबांधवांवर हत्यार चालविण्याचा त्याला एखादे वेळी हुकूम व्हायचा, अशा तऱ्हेचे विचार मनात येऊन मी त्याला लष्करात जाण्याची परवानगी दिली नाही. माझी इच्छा नाही हे पाहून त्यानेही आपली तीव्र इच्छा मनातल्या मनात दाबून टाकली. हा त्यावेळी त्याने माझ्यासाठी मोठाच स्वार्थत्याग केला. त्यावेळी मला याची जाणीव झाली नाही हे मी कबूल करते. पण पुढे दोनतीन वर्षांनी त्याच्या मनातील जोम मंदावण्यास आपण कारणीभूत झालो, व त्यामुळे त्याच्या पुढील आयुष्यावर एकप्रकारची निराशेची छाया पडली, हे माझ्या ध्यानात आले, व मला फार पश्चात्ताप झाला !

या वर्षी आणखी एक घटना घडली की, ज्यायोगे माझे मनःस्वास्थ्य पार बिघडून गेले. आधीच माणिकची प्रकृती बरी राहत नव्हती, याबद्दल मला काळजी वाटत होती. माझ्या हृदयविकाराची तक्रार होतीच. त्यात एके दिवशी मला असे समजले की, आमचा उमरावतीतील शहरात असलेला वाडा अण्णासाहेबांनी मला न कळविता विकला ! अलीकडे माझा भाऊ माधव नागपूरला येऊन अण्णासाहेबांशी पुष्कळ वेळ बोलत बसत असे. त्याने म्हणे आमच्या ह्या वाड्यासाठी चांगले गिऱ्हाईक आणले होते; आणि मी त्याबाबत विरोध करीन हे माहीत असल्यामुळे त्याने मला न विचारता अण्णासाहेबांना वाडा विकण्यास तयार केले. ही गोष्ट मला पुढे पंधरावीस दिवसांनी समजली, आणि फार वाईट वाटले. हा वाडा आमच्या घराण्याच्या शुभशकुनाचा होता. मला ती गोष्ट समजल्यावर मी अण्णासाहेबांना म्हटले, " एरव्ही तुम्ही कोणतीही गोष्ट मला विचारल्याशिवाय करीत नाही; मग ही महत्वाची गोष्ट मला कशी विचारली नाहीत ? ह्या वाड्यातील देवता सर्वप्रकारे आपला सांभाळ करीत होत्या. हा वाडा तुम्ही विकलात म्हणून घरात आजारीपणे

व काळज्या सुरू झाल्या. तुमच्या कामातही सत्याग्रह वगैरे राजकीय अडथळे निर्माण झालेले आहेत. आपल्या घराची शांती नाहीशी झाली!" ईश्वरी नेमानेमच तसा होता म्हणायचा, म्हणूनच मला न विचारता वाडा विकण्याची अण्णासाहेबांना बुद्धी झाली!

इ. स. १९२० मध्ये नागपूर येथे कॉंग्रेस अधिवेशन झाले. त्यासुमारास अण्णासाहेबांना फार कार्य करावे लागले. त्यापूर्वी नुक्ताच फार बोलबाला झालेला झेंडा-सत्याग्रह अण्णासाहेबांनी मोठ्या मुत्सद्देगिरीने मिटविला होता. श्री. वल्लभभाई पटेल वगैरे मंडळी त्या सत्याग्रहात पडली होती. त्यावेळच्या हकीगती वृत्तपत्रांतून आलेल्याच आहेत, म्हणून त्या येथे सांगत नाही. अण्णासाहेबांनी या सत्याग्रहाच्या वेळीं गव्हर्नर व कॉंग्रेस पुढारी यांच्यामध्ये अशा कुशलतेने तडजोड घडवून आणली की, दोन्ही पक्षांना आपला आव राहून समेट झाल्याचे समाधान मिळाले.

अण्णासाहेब इंग्रज अधिकाऱ्यांशीही सडेतोड वागत. एकदा एका मोठ्या इंग्रज अधिकाऱ्याने एका हिंदी गृहस्थाची खादीची टोपी जाळली. त्याबद्दल लागलीच त्याला जाब विचारून त्याला अण्णासाहेबांनी राजीनामा द्यायला लावला. त्यामुळे इतर इंग्रज अधिकाऱ्यांवर चांगलाच वचक बसला. याशिवाय किती तरी मंडळींना अण्णासाहेब त्यांची आत्मोन्नती व स्वाभिमान वाढविण्यात मदत करीत. त्यांपैकी दोनचार अशा विशेष गोष्टी सांगते.

नागपूर प्रांतात राजनांदगावचे संस्थानिकांची गोसावी सांप्रदायाची गादी होती व त्यांच्या ज्ञातीच्या रूढीप्रमाणे त्यांना लग्न करता येत नसे. त्यांच्या मनात ही रूढी मोडून लग्न करण्याचा कायदेशीर पायंडा पाडायचा होता. त्यांच्या त्या कामात अण्णासाहेबांनी त्यांना फार साहाय्य करून त्यांच्या ज्ञातीची समजूत पटवून व गव्हर्नरची संमती मिळवून त्यांना कायद्याने लग्न करता येईल अशी योजना करून दिली. त्यांनी मग मयूरभंजच्या राजकन्येशी लग्न केले. ते जुळविण्यासाठी अण्णासाहेबांची खटपटच कारणीभूत झाली.

बस्तर संस्थानची उपवर राजकन्या राज्याची वारस होती. तिचे आईबाप वारले होते. तिची इस्टेट सरकार बघत असे. तिच्याशी लग्न व्हावे म्हणून बऱ्याच राजे लोकांच्या खटपटी होत्या. तिचे आप्तही तिच्यावर वेगवेगळे दडपण आणीत होते. ती बिचारी अगदी गोंधळून गेली होती व त्याबाबत गव्हर्नरनेच निर्णय घ्यावा म्हणून तिने गव्हर्नरला विनंती केली व तसा तिने अण्णासाहेबांनाही निरोप धाडिला. या कामात गव्हर्नरनी अण्णासाहेबांचा सल्ला घेऊन तिला तिच्या मनाजोगा राजपुत्र वर मिळवून दिला.

जबलपूरच्या राजा गोकुळदास ह्या धनाढ्य गृहस्थांचे चिरंजीव शेट जीवनदास हे इंग्रजांची खुशामत करण्यास फार झटत. पण त्यांचा मुलगा गोविंददास यांनी उघडपणे त्यावेळच्या कॉंग्रेस पक्षात सामील होऊन इंग्रज सरकारशी प्रगट विरोध करण्यास

सुरुवात केली. त्यामुळे त्यांच्या सर्वच कुटुंबावर सरकारची फारच गैरमर्जी झाली व त्यांच्यावर इतर इंग्रज वरिष्ठांनी काही तरी कुभांडे रचून त्यांची इस्टेट जप्त होण्यापर्यंत मजल आली, अशा दाट वदंता उठल्या. त्या कुभांडांत त्यांनी एका इंग्रज जज्जाला दोन घोड्या लाच म्हणून दिल्या असाही एक आरोप रचण्यात आला. त्याबाबत अण्णासाहेबांनी गुप्त पोलिसांमार्फत फार बारकाईने व कसून माहिती मिळवून ते सर्व आरोप खोटे असल्याबद्दल गव्हर्नरची खात्री पटवून दिली. तरी पण गव्हर्नरचा गोविंदशेठवरचा राग कमी झाला नाही. तेव्हा अण्णासाहेबांनी शेठ जीवनदासना सल्ला दिला की, तुम्ही गव्हर्नरसाहेबांना सांगा की, "माझा मुलगा माझ्या मनाविरुद्ध वागतो, म्हणून मी माझी सर्व इस्टेट माझ्या नातवाच्या नावे करून देतो." ती गोष्ट गव्हर्नरला पटली व जीवनदासांची इस्टेट वाचली. ज्या इंग्रज जज्जावर लाच घेतल्याचा खोटा आरोप आला होता तोही खोटेपणा सिद्ध झाला. पण त्यानंतर त्या मानी इंग्रजाने राजीनामा देऊन विलायतेस प्रयाण केले. मात्र वरील मंडळींपैकी त्यानेच तेवढी अण्णासाहेबांबद्दल कृतज्ञता कायम ठेविली. दर ख्रिसमसला त्याचे अण्णासाहेबांना सुंदर पत्र येई. पण अण्णासाहेब कुणाजवळूनही कृतज्ञतेची अपेक्षा करीत नसत व त्याबद्दल उच्चारही करीत नसत.

एक जुना प्रसंग मात्र त्यांना कधी कधी आठवे. त्याबद्दल ते गहिवरून म्हणत, "तो प्रसंग मात्र मला माझ्या वकिलीच्या आयुष्यात मोलाचा वाटला. त्यात एका गरीब महारावर खुनाचा आरोप लादण्यात आला होता. तो दीनवाणीने माझ्याकडे येऊन बाहेर उभा राहिला. मी त्याला आत बोलावून माझ्याजवळ बसविला व त्याची सर्व केस ऐकून घेतली. त्याच्यासाठी मी कोर्टात नेटाने लढलो, व तो निर्दोषी म्हणून सुटला. मग त्याने एक झेंडूची माळ माझ्या घरी आणून माझ्या गळ्यात घातली. त्याजजवळ तेवढेच मला देण्याजोगे होते. पण ती त्याची देणगी मला जे काही आयुष्यात मोठे मान मिळाले त्याहून सहस्रपटीने मोठी वाटली. मला त्याची जन्मभर आठवण राहील." असो.

या सुमारास अण्णासाहेबांच्या कारकीर्दीतच नागपुरात अलीबंधूंचे प्रकरणही फार पेटत होते. मुसलमानधार्जिण्या सरकारला अलीबंधूंना कैदेत घालावे लागले होते. त्यामुळे मुसलमान लोकांत फार खळबळ उडाली होती. त्यांनाही शांत ठेवण्यात अण्णासाहेबांचे चातुर्य मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाले होते. सरकारी गुप्त दप्तरात त्याची सर्व नोंद जरूर असेल, पण ते बाहेर उघडपणे कोणाला समजले नाही. त्यावेळी सरकारी परंपरेस सोडून अण्णासाहेबांनी स्वतः जाऊन त्यांची तुरुंगात (मला वाटते ते छिंदवाड्याच्या तुरुंगात होते) गाठ घेतली, व त्यांच्याशी चर्चा करून मोठ्या शिताफीने त्यांची व सरकारची तडजोड घडवून आणली.

अशा प्रकारचे राजकीय वातावरण असताना नागपुरात काँग्रेसचे अधिवेशन भरत होते. त्यामुळे नेहमीप्रमाणे आमच्याकडे खूपच पाहुणी मंडळी जमणार म्हणून

मुंबईहून ताई व आसामातून शांता माझ्या मदतीस आल्या. माझी प्रकृती नीट नव्हतीच–हृदयविकाराने मी पडूनच होते. यावेळीं आम्ही ताईकडे मुंबईस रक्कम पाठवून आमच्यासाठी चांगल्यापैकी फर्निचर, कटलरी, क्रॉकरी, डिनरसेट, तसेच खोल्यांना लावण्यासाठी उत्तम पडदे वगैरे सामान मुंबईस खरेदी करवून नागपूरला आणले. आता आम्हांला इंग्रजी तऱ्हेच्या मेजवान्या वरचेवर कराव्या लागत, त्या-दृष्टीने हे सामान घेणे आवश्यक होते. आमच्या ताईला उत्तम सामानाची पारख चांगली होती, व ते नीट व्यवस्थेने, कलात्मक पद्धतीने कसे लावावे, याची हातोटी साधली होती. विलायतेत मोठ्या लोकांच्या घरांतली व्यवस्था व सामानाची मांडणी पाहण्याची संधी तिला मिळाली होती, व त्यास तिच्या अंगी असलेल्या स्वाभाविक कल्पकतेची जोड मिळाली होती. या योगाने तिने आमचा तो नागपूरचा बंगला सुंदर पद्धतीने सुशोभित केला. इंग्रज बायकांनाही त्याबद्दल कौतुक वाटले.

इंग्लंडच्या पार्लमेंटचे एक सभासद व त्यांची पत्नी कॉंग्रेस पाहण्यास म्हणून मुद्दाम नागपुरास येणार होते. त्यांची व ताईची विलायतेत ओळख झालेली होती, म्हणून ते आमच्याच घरी उतरणार होते. मुसलमानांत फार गाजलेले बॅरिस्टर जिना व त्यांची तरुण पत्नी ( सर दोराबजी पेटिट यांची मुलगी ) हेही आमच्याकडेच उतरणार होते. एक तरुण उत्साही अमेरिकन मुलगी कॉंग्रेस बघण्यास मुद्दाम अमेरिकेहून आली होती, तीही आमच्याकडे उतरली. वरील पाच मंडळींची आमच्या माडीवर, इंग्रजी पद्धतीने राहण्याची व जेवण्याची आम्ही सोय केली होती. खालच्या मजल्यावर पुष्कळच पाहुणी होती, त्यांत आमचे व्याही श्री. पांडुरंग-राव देसाई होते. नवे जावई विनायकराव भिडेही दोनतीन दिवस येऊन गेले.

कॉंग्रेसकरिता आलेली मंडळी अण्णासाहेबांच्या जुन्या ओळखीची. त्यामुळे रोज भेटावयास व जेवावयास येणाऱ्या लोकांची गर्दी व्हायची. कॉंग्रेस अधिवेशनास जाण्याची अण्णासाहेबांनी गव्हर्नरसाहेबांकडून खास परवानगी घेतली होती. एकदा मोतीलाल नेहरू, त्यांच्या पत्नी, मुलगा जवाहरलाल व त्याची पत्नी व दोघी बहिणी ( विजयालक्ष्मी व कृष्णा ) आमच्याकडे जेवायला आले होते. मोतीलाल सर्वांशी खूप खेळीमेळीने बोलले, पण त्यांचा मुलगा व मुली फारच गप्प होते. त्यांना म्हणे सरकारी अधिकाऱ्यांबद्दल तिटकारा वाटे ! कितीही मोठ्या दर्जाचा अधिकारी असो, त्याच्याशी ते तुटक वागत असे आम्ही ऐकले. बॅ. जिनांची तरुण बायको ‘ रती ’ त्यावेळी जेवायला आली होती, तिच्याशी मात्र तरुण नेहरू मंडळी खूप मोकळेपणाने बोलली !

या कॉंग्रेसमध्ये हिंदुमुसलमानांची एकी करण्याचे फार प्रयत्न झाले, परंतु जिना सर्वांना सारखे ओढून धरीत होते. यामुळे या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. आमच्या घरच्या मेजवान्यांतून राजकीय प्रश्नांबाबत खूप चर्चा चालायची. त्यावेळीं मी हृदयविकाराने आजारी असल्यामुळे बाहेर मंडळीत जाऊ शकत नव्हते.

पण माझ्या खोलीत ती सर्व बोलणी मला ऐकायला यायची. मला रात्रीची लवकर झोप लागत नसे, तेव्हा ही एक प्रकारची मला करमणूक होती. याप्रमाणे नागपुरातली १९२० ची ही काँग्रेस आमच्या घरातही खूप धामधुमीची व गर्दीची झाली.

१९२१ साली—मला वाटते सप्टेंबर महिन्यात असेल, इंग्लंडचे युवराज ( Prince of Wales ), जे पुढे आठवे एडवर्ड म्हणून काही दिवस गादीवर आले, ते हिंदुस्थानास भेट देण्यास आले असता नागपुरास आले. त्यांच्या आगमनाचे वेळी मुंबईत सत्याग्रह, बहिष्कार वगैरे बरेच प्रकार झाले होते. तसेच प्रकार नागपुरातही होणार अशी भीती होती, परंतु अण्णासाहेबांच्या दूरदर्शीपणाने व समयसूचकतेमुळे ते सर्व टळले व नागपुरात युवराजांचा उत्तम सत्कार झाला. गव्हर्मेंट हौसमध्ये त्यांना थाटाचा खाना देण्यात आला. त्यावेळी युवराज इतक्या रुबाबाने परंतु साधेपणाने वागले की सर्व मंडळी बेहद्द खूष झाली. त्यावेळची एक माझ्याबद्दलची गोष्ट सांगते—मला त्याचे विशेष औचित्य वाटले नाही, पण इतरांना आश्चर्य वाटले—ती अशी की, त्या खान्याच्या वेळी युवराजांच्या समोरच्या मानाच्या जागी मला बसविले. हिंदी स्त्रियांना हा मान इकडे प्रथमच दिला गेला असे ऐकले. त्याबद्दल इंग्रज स्त्रियांनी व आमच्या काही मंडळींनी माझे फार अभिनंदन केले.

● ● ●

मध्यंतरी माणिकची प्रकृती बरी नव्हती म्हणून ती माझ्याकडेच होती. तिला अशक्तता फार आली होती, म्हणून मी तिला आमच्याबरोबर महाबळेश्वरी घेऊन गेले होते. तेथे हळूहळू तिची प्रकृती सुधारत गेली व जूनअखेर ती आपल्या यजमानांकडे अहमदाबादेस गेली. माणिक फार टापटिपीने व काटकसरीने संसार करी. आपल्या पगारातून दरमहा विनायकराव आपल्या आईस पैसे धाडीत असत. त्यांच्या पगारातून इन्कमटॅक्स, आय्. सी. एस्. फंड, वगैरे जाऊन त्यांच्या हातात दरमहा साडेतीनशे रुपये उरत. त्यांतून घरभाडे, नोकर, गाडीघोडा वगैरेंचा खर्च करून आय्. सी. एस्. अधिकाऱ्याचा दर्जा सांभाळून माणिक सुखाचा संसार करीत होती हे विनायकरावांनीच मोठ्या कौतुकाने सांगितले.

पण जूनअखेर ती अहमदाबादेस गेल्यावर सुमारे पावणेतीन महिन्यांनी विनायकराव एकाएकी फार आजारी झाले. ताईला त्याबद्दल तार गेल्याने ती मुंबईहून अहमदाबादेस गेली. सातआठ दिवस त्यांना बराच ताप आला. नंतर तो हळूहळू कमी होत गेला. त्यांना रजा घेऊन थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. त्याप्रमाणे आम्ही त्यांना घेऊन पचमढीस गेले. तेथे त्यांची प्रकृती लवकरच सुधारली व आम्हांला महिनाभर त्यांचा सहवास लाभला. तिथे जे

जे लोक त्यांना पाहत ते ते त्यांची नम्रता, हुशारी, देखणेपणा, यांची स्तुती करीत–इतकी की, एखाद्या वेळीं माझ्या मनात येई की, यांना कुठे दृष्ट तर लागायची नाही ? त्यांची रजा संपल्यावर ते अहमदाबादेस परत गेले, तेव्हा आम्हांला भारी चुकल्याचुकल्यासारखे झाले. माणिक पुढे दिवाळीनंतर अहमदाबादेस गेली.

पुढे ती विनायकरावांबरोबर गुजराथ, काठेवाड इकडे दौऱ्यावर हिंडली. प्रवास फार उत्तम ठिकाणांतून झाला. तिची प्रकृतीही उत्तम राहत होती. प्रवासाची रसभरित वर्णने ती आम्हांला लिहून कळवी, त्यामुळे तिच्याबाबत आम्ही चिंतामुक्त होऊन आनंदात होतो. परंतु तो तिच्या सौख्याचा, जोडीने हिंडण्याचा शेवटचाच दौरा होता, हे त्यावेळीं तिच्या व आमच्या ध्यानीमनीही आले नाही !

अहमदाबादेस उन्हाळा वाढू लागला म्हणून मार्च (१९२२) महिन्यातच विनायकरावांनी तिला नागपुरास धाडून दिली. तिला आता दिवस राहून अडीच तीन महिने झाले होते. या वेळेपासूनच तिच्या चेहऱ्यावर तेज चढू लागले होते व तिला घरात सर्वजण चिडवू लागले की, " तुला आता मुलगी होणार. " मार्चअखेर आम्ही तिला घेऊन पचमढीस गेलो. तिथे नेहमीप्रमाणे चहापार्ट्या इत्यादी चालू होत्या. गव्हर्नरच्या मुलीची व आमच्या मुलींची ( माणिक व पद्मावती यांची ) मैत्री झाली. ती ( मिस् स्लाय ) आमच्याकडे जेवायला येई व पाटावर बसून आमच्या पद्धतीने देशी जेवण आवडीने खाई. आय्. सी. एस्. अधिकाऱ्याची बायको म्हणून माणिकशी तिथल्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या बायका विशेष स्नेहभावाने वागत.

जूनच्या तिसऱ्या आठवड्यात कमळाबाईचा मोठा मुलगा रावसाहेब (युवराज) सांगलीस विषमाने आजारी झाल्याचे समजले, म्हणून मी व अण्णासाहेब पचमढीहून परस्पर सांगलीस गेलो; आणि माणिक व पद्मावती यांना सामानसुमान आवरून नोकरांसह आमच्या नव्या मोटारने नागपूरला जाण्यास सांगितले. वाटेत ही मोटार बरेच वेळा पंक्चर झाली ! असे पूर्वी कधी झाले नव्हते. शिवाय वाटेत त्यांना पाऊस व वादळ यांचा खूप त्रास झाला. त्यामुळे त्या नागपुरास फार उशीरा पोहोचल्या. मी आठदहा दिवसांनी नागपुरास परत आल्यावर माणिकने ही सर्व हकीगत मला सांगितली आणि म्हणाली, " माझा उजवा डोळा सारखा लवत होता ! " मी काही तरी सांगून तिची समजूत घातली, पण ते सर्व ऐकून माझ्याही मनाला उगाच हुरहूर लागली. माणिकला तर वाटू लागले की, आपल्यावर लवकरच काही मोठे संकट येणार ! या बाळंतपणात आपल्या जिवाला खास धोका येणार हेच तिच्या मनाने घेतले. पण मला तसे काही न दर्शविता तिने आपले एक मृत्युपत्र लिहून पद्मावतीजवळ दिले, व " मी बाळंतीण झाल्यावर पंधरा दिवसांनी ते उघड, तोवर गुप्त ठेव. " असे तिला सांगितले. हे पुढे चारपाच महिन्यांनी मला समजले. असो. आता ती आपला वेळ भावी अपत्याच्या मनावर उत्तम संस्कार व्हावे

म्हणून चांगली पुस्तके वाचण्यात व त्यांचे मनन व ईश्वराचे ध्यान करण्यात घालवू लागली.

असे दिवस चालले असता ता. ५ आक्टोबर ( १९२२ ) रोजी विनायकराव थोडी रजा घेऊन माणिकला भेटण्यासाठी नागपुरास आले. तिचे दिवस आता भरले होते व ते आले त्याच दिवशी तिचे पोट दुखू लागले. दोन दिवस तिला फार त्रास झाला. शेवटी फॉर्सेप्स् लावावे लागले. मुलगा झाला, त्याचे वजन अकरा पौंड होते ! एवढे मोठे मूल मीच काय, पण बाळंतपणासाठी आलेल्या डॉ. मिस् मार्टिन या इंग्रज डॉक्टरिणीनेही निदान हिंदुस्थानात जन्मलेले पाहिले नव्हते. पण बाळंतीण झाल्यावर मात्र तिला चांगले बरे वाटू लागले.

रजा संपल्यामुळे विनायकरावांना अहमदाबादेस जाणे भाग होते. त्यामुळे माणिकचे मन फार बेचैन झाले. तिला उत्तेजनपर चार शब्द सांगून ते जायला निघाले. जाताना मी त्यांच्या पाठीवरून हात फिरवला, तो त्यांचे अंग मला गरम लागले. म्हणून "आताच जाऊ नका, चार दिवस रहा" असा मी त्यांना आग्रह केला. तेव्हा "उगाच थोडी कसर आहे–जाणे भाग आहे" असे म्हणून ते गेले. अहमदाबादेस पोहोचल्यावर तीनचार दिवसांनी त्यांची तार आली की, ताप बराच वाढल्याने ते हॉस्पिटलमध्ये राहण्यास गेले आहेत ! माणिकची जीवावरच्या कठीण बाळंतपणातून सुटका होऊन तिला मुलगा झाल्याबद्दल आम्हांला अम्मळ हायसे वाटत होते, तो तार आल्याने आम्ही काळजीत पडलो !

ताई मुंबईहून तावडतोब अहमदाबादेस गेली. "विनायकरावांचा ताप विषमज्वर आहे, तथापि काळजी करण्याचे कारण नाही" असे तिने आम्हांला कळविले. माणिकच्या मनाची स्थिती मात्र फारच सचिंत झाली. ती सारखी शून्यमनस्क स्थितीत वसे. आम्ही तिला खूप धीराच्या गोष्टी सांगायच्या. एकविसावे दिवशी ताप नॉर्मल झाल्याची ताईची तार आली. तेव्हा माणिकच्या मुलाचे बारसे थोडक्यात उरकून त्याचे नाव 'चिंतामणि' उर्फ 'विजयसिंह' ठेविले.

पण विनायकरावांचा ताप नॉर्मल होऊन पुन्हा दुसऱ्या दिवशी खूप चढला. डॉक्टरांचे असे मत पडले की, विनायकरावांच्या पोटात काही तरी गाठ असून त्याचा हा ताप आहे, विषमज्वर नव्हे. म्हणून त्यांच्याच सल्ल्यावरून ताईने विनायकरावांना आपल्या घरी मुंबईस आणले व त्यांच्या आईला मुंबईस येण्यास तार केली. त्यांच्या आईकडून अशी माहिती मिळाली की, विनायकरावांचे वडीलही पोटात क्षयाच्या गाठी होऊन वारले होते व त्यांची नणंदही क्षयाने गेली होती. त्यावरून डॉ. देशमुखांनी मत दिले की, विनायकरावांच्या पोटात जी गाठ वाटते ती क्षयाची आहे व तिचाच हा ताप आहे. विनायकरावांच्या शुश्रूषेसाठी दोन युरोपियन नर्सेस ताईने ठेविल्या. त्यांना आराम पडावा म्हणून आम्ही स्वतः पाण्यासारखा पैसा खर्चीत

होतो. विनायकरावांचे मित्र वी. जी. वाड हे त्यावेळीं मेडिकल कॉलेजच्या शेवटच्या वर्षाचे विद्यार्थी होते. ते रोज रात्री त्यांच्याजवळ जागायला येत.

माणिकने आता सारखा हट्ट धरला की, " मी आता मुंबईस जाते. " अण्णासाहेबांची काही महत्त्वाची कौन्सिलची कामे चालू होती, पण त्यांतून सवड काढून ते माणिकला तिच्या मुलासह मुंबईस घेऊन गेले. मला डॉक्टरांनी जाऊ दिले नाही, कारण त्या धसक्याने माझ्या छातीत जोराने धडधड ( palpitation ) सुरू होऊन हृदयविकाराचा झटका येण्याची भीति होती. शिवाय माझ्या मनात विनायकरावांचे ग्रहमान पाहून त्यांच्या शांतीसाठी जप व दाने करायची होती.

अण्णासाहेब दोन दिवस मुंबईत होते तोवर विनायकरावांचा ताप ९८ डिग्रीच्या वर चढला नाही. पण त्यानंतर तापाची पुन्हा वाढती कमान सुरू झाली. डिसेंबरच्या सुरुवातीस पोटातील क्षयाच्या गाठींसाठी ऑपरेशन करण्याचे डॉक्टरांनी ठरविले. त्यासाठी अण्णासाहेब पुन्हा मुंबईस गेले. कमळाबाई व राजेसाहेब समाचारास म्हणून मुद्दाम मुंबईस गेले व कमळाबाईने आपली युरोपियन नर्स माणिकच्या मुलाला सांभाळण्यासाठी मुंबईस तिच्याजवळ ठेविली. सर्वजण सर्वतोपरीने तिला मदत करीत होते, पण ईश्वराच्या मनात तिला मदत करायची नव्हती; त्यामुळे आम्हा मानवांची मदत व्यर्थ झाली ! डॉ. देशमुखांनी ऑपरेशन ताईच्या घरातच केले. त्यावेळीं पोटातील क्षयाच्या गाठींनी आतड्याचा दूषित केलेला भाग ऑपरेशनच्या कक्षाच्या बाहेर गेला असल्याचे त्यांना आढळून आले व त्यावर कसलीशी किरणे देऊन त्यांनी पोट पुन्हा जसेच्या तसे शिवून टाकले.

ऑपरेशननंतर विनायकरावांना अतिशय अशक्तपणा आला ! तोंडातून शब्दही निघेना. आमचे फ्यामिली डॉक्टर डॉ. भट आपण होऊन विनायकरावांची प्रकृती पाहण्यास मुंबईस गेले. रोग्याची स्थिती हाताबाहेर गेलेली आहे हे डॉ. भट यांनी तेव्हाच ओळखिले. शेवटचा उपाय म्हणून कुणी सांगितले, " ना. आगाखान यांचा एक नामांकित हकीम आहे; तो खात्रीचा आहे–त्याला आणा. " त्याला दिवसाचे एक हजार रुपये देऊन ताईने आणविला. त्याने फार आशा दाखविली. पण अखेर सर्व उपाय खुंटले व ऑपरेशननंतर १५–२० दिवसांनी विनायकराव इहलोक सोडून चालते झाले ! आमची गरीब बिचारी, निष्पाप, कोमल मनाची माणिक कायमची वैधव्यगर्तेत पडली ! !

इतक्या लवकर विनायकराव जातील याची कल्पना नसल्यामुळे डॉक्टरांना विचारून अण्णासाहेब महत्त्वाच्या कामासाठी आधीच नागपुरास परत आले होते, व ते काम आटोपून ते व मी मुंबईस जाणार होतो. ज्या दिवशी विनायकराव गेले त्याच दिवशी कौन्सिलात अण्णासाहेबांचे महत्त्वाचे भाषण होते. भाषण चालू होऊन काही प्रश्नोत्तरे चालली होती, इतक्यात त्यांच्या चपराशाने त्यांच्या हातात तार आणून दिली. तीत विनायकराव वारल्याची बातमी होती ! त्याबरोबर अण्णासाहेबांचा

चेहरा, सर्वांच्या लक्षात येईल इतका पांढरा फटक पडला! पण दुसऱ्या क्षणी स्वतःला सावरून त्यांनी भाषण पुढे चालू केले, व कौन्सिलातील कामे शांतपणे आटोपून ते घरी आले त्यांच्यावर दुःखाचा काही प्रसंग आला असेल अशी त्या कौन्सिलच्या बैठकीत कुणाला कल्पनाही आली नाही!

विनायकरावांची शेवटची क्रिया डॉ. वाड यांनी केली. त्यांचा भाऊ वेळेवर येऊ शकला नाही. कुणाचा कसा ऋणानुबंध असतो पहा! डॉ. वाड आमच्या कुणाच्या नात्याचा ना गोत्याचा! पण तो यावेळी उपयोगी पडला. तेव्हापासून डॉ. वाडला मी माझा मुलगा मानते. विनायकराव गेले त्याच्या दुसऱ्या दिवशी माणिकच्या सासूबाई पुण्यास परत गेल्या. त्या जाण्यापूर्वी त्यांचा मोठा मुलगा पुण्याहून आला होता, तोही त्यांच्याबरोबरच पुण्यास गेला. ताईला मात्र तीन दिवस सर्व आवरासावर करण्यास मुंबईत राहावे लागले. चवथे दिवशी ती माणिक व तिचा मुलगा यांना घेऊन नागपुरास आली. विनायकरावांच्या आजारीपणात पहिल्यापासूनच ह्या भिडे मंडळीचे वागणे आम्हांला चमत्कारिक वाटले. विनायकरावांच्या मृत्यूनंतर लागलीच त्यांच्या विम्याचे कागद त्यांनी माणिकजवळ मागितले! पुढे काही महिन्यांनी आम्हांला समजले की, विनायकरावांनी विलायतेस जाताना श्री. सीतारामपंत पटवर्धन यांच्याकडून कर्ज घेतले होते व त्याच वेळी विम्याची पॉलिसी त्यांच्या नावे करून दिली होती व ती त्याच वेळी त्यांचे हवाली केली होती.

विनायकराव गेल्यावर एक वर्ष माणिक अत्यंत शून्य मनःस्थितीत होती. एकसारखी पडून डोळ्यांतून अश्रू गाळीत राहायची. कुणालाही भेटायची नाही की कोणाशी बोलायची नाही. मी तिला धीर द्यायचा की, "या मुलाच्या कल्याणासाठी तरी तुला जगले पाहिजे... तो पुढे तुला खूप सुख देईल." ती खिन्नपणे म्हणे, "कुणाला ठाऊक! लग्न करण्याची मला भीति वाटत होती, तेव्हा तुम्ही अशाच धीराच्या आणि सौख्याच्या गोष्टी मला सांगत होता. . पण सुख लागण्याचे माझ्या नशिबातच नाही." ती असे बोलू लागली की माझ्या पोटात तुटून येई! तिच्या मुलाला तिला सुखी करण्याबद्दल पूर्ण जाणीव राहावी असा त्याला उपदेश करीत राहायचे असे आम्ही ठरविले. एवढेच आता आमच्या हातांत होते.

१९२३ सालच्या मार्चमध्ये माणिक व तिचा मुलगा यांजसह आम्ही पचमढीस गेलो. आमची सर्वांचीच मने ह्या वर्षी दुःखाने भारावलेली होती. म्हणून आमच्या मनाला थोडा विरंगुळा मिळावा यासाठी कमळाबाई व राजेसाहेब त्यांच्या मुलांसह दरवर्षीप्रमाणे महाबळेश्वरी न जाता, आमच्याकडे पचमढीस येऊन राहिले. अण्णासाहेब आता होम मेंबर झाल्यामुळे ते सरकारच्या मर्जीतले समजले जात. त्यामुळे त्यांच्याशी संबंध ठेवण्याबाबत राजेसाहेबांवर नियंत्रण ठेवण्याची पोलिटिकल एजंटाची आता हिंमत नव्हती.

आपल्या हिंदी राजेलोकांना या पोलिटिकल एजंटांचा नानाप्रकारे मोठाच

जाच असे. तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी या राजेलोकांची स्थिती होत असे. त्यांना पोलिटिकल एजंटांनी एवढ्यातेवढ्यावरून तंव्या देत असायचे, आणि तिकडे लोकांनी त्यांना इंग्रजधार्जिणे, देशद्रोही, व मित्रे म्हणून नावे ठेवायची, अशी त्यांची मृदंगासारखी स्थिती होती. त्यांना नावे ठेवणाऱ्या लोकांना वास्तविक त्यांची कींव वाटायला पाहिजे व या स्थितीतून त्यांची सुटका होण्यास लोकांनी मदत करायला पाहिजे. या राजेलोकांपैकी बहुतेकांच्या पूर्वजांनी एके काळी मर्दुमकी करून इनामे मिळविली आहेत. त्यांच्या रक्तात क्षात्रतेज भरलेले आहे, पण इंग्रजांनी ते पार लोपवून टाकले आहे. शिवाजीसारखा एखादा तेजस्वी पुरुष निर्माण होईल, तरच त्यांचे क्षात्रतेज पुन्हा उफाळून येऊन त्यांची स्थिती सुधारेल, व आपल्या देशाला स्वातंत्र्य व वैभव प्राप्त होईल, असे मला निश्चित वाटते. आजकाल रशियात नवीनच विचारप्रवाह सुरू झाले आहेत! ईश्वराचे अस्तित्वच त्यांना मान्य नाही! ज्या कार्यात ईश्वराचे अधिष्ठान मानले जात नाही, त्या कार्यास यश नाही. अर्थात ही आपली माझी मते आहेत. असो.

जून महिन्यात (१९२३) आम्ही पचमढीस असताना गव्हर्नरकडून एक जरूरीचा खलिता आमच्याकडे आला. त्यात "हिज म्याजेस्टींनी अण्णासाहेबांना नाइटहूड दिली आहे" असा मजकूर होता. अण्णासाहेब लागलीच गव्हर्नरकडे जाऊन म्हणाले, "मला पदवीची बिलकूल इच्छा नाही हे आपणांस पूर्ण माहीत असताना ती मजवर का लादता? मी ती साभार परत करू इच्छितो." तेव्हा गव्हर्नर म्हणाले, "ही पदवी बादशहाने दिलेली आहे. तिला 'नाही' म्हणणे प्रशस्त नव्हे. तुमचा राग ब्रिटिश ब्युरोक्रसीविरुद्ध आहे–बादशहाविरुद्ध तर नाही? तेव्हा बादशहांनी दिलेली पदवी म्हणून ती स्वीकारावी. ती नाकारल्याने बादशहांचा विनाकारण अपमान होईल." याप्रमाणे इच्छा नसताना ती पदवी अण्णासाहेबांना स्वीकारावी लागली. त्यामुळे आम्हांला कुणालाच आनंद झाला नाही. पुष्कळ लोकांनी त्याबद्दल आमचे अभिनंदन केले, तर काहींनी अण्णासाहेब आता इंग्रजांचे पूर्ण अंकित झाले म्हणून टीका केली. जग हे असे आहे!

आबासाहेब आता विलायतेहून लवकरच परत येणार, म्हणून पद्मावती व बाळासाहेब यांना बरोबर घेऊन मी मुंबईस गेले. त्याला बघायला माझे मन अत्यंत उत्कंठित झाले होते. तो बोटीवरून उतरताच मी त्याला घट्ट पोटाशी धरले. तो सुखरूप परत आला, आता पद्मावतीबद्दलची माझी जबाबदारी संपली, म्हणून मला आनंद झाला!

पहिले काही दिवस सर्वांना भेटण्यात आनंदात गेले. मी पाहिले की विलायतेहून आल्यानंतर आबासाहेबांच्या विचारात, वागण्यात विलायती पद्धतीचा पगडा बसला होता. दोघांनीच एकमेकांशी बोलणे, दोघांनीच फिरायला भेटायला जाणे वगैरे. मलाही त्याबद्दल कौतुक वाटे. मी म्हणे, "चार वर्षांनी नुकताच विलायतेहून परत

आला आहे, हिंडू दे अंमळ बायकोबरोबर!" पण संध्याकाळच्या कुटुंबातील मंडळींच्या गप्पागोष्टींत तो कमी भाग घेऊ लागला. मला वाटे की, ह्या बाबतीत त्याने आपल्या वडिलांचे अनुकरण करावे. अण्णासाहेब आईलाही खूष ठेवीत व मलाही खूष ठेवीत. त्याचा एक विचार मला अस्वस्थ करू लागला, तो हा की प्रत्येक मुलाने लग्न झाले की वेगळे राहावे. आमच्या समोर तरी त्यांनी विभक्त राहू नये अशी माझी उत्कट इच्छा होती. मी माझ्या दोघां मुलांसाठी सारख्या वस्तू करून ठेविलेल्याच होत्या.

आबासाहेब विलायतेहून परत आल्यावर महिन्या दीड महिन्यातच त्याच्या पुढील जीवनक्रमाबद्दल आमच्या घरात वाटाघाटी सुरू झाल्या. तो विलायतेस असताना हिंदुस्थानातूनच काही मुलांची आय्. सी. एस्. मध्ये नेमणूक करण्याचे घाटत होते. त्यात आबासाहेबास नेमावा असा खुद्द गव्हर्नरनी अण्णासाहेबांना सल्ला दिला. अण्णासाहेबांच्या ते हातांत होते. अण्णासाहेब नोकरी करण्याच्या विरुद्ध होते, तरी त्याबाबत त्यांनी आबासाहेबाला विलायतेस पत्र लिहून विचारले होते. तेव्हा त्यानेही 'मला नोकरी करण्याची इच्छा नाही' म्हणून कळविले होते. माझे स्वतःचे मत असे होते की, त्याने नागपुरात राहून ब्यारिस्टरी करावी. अण्णासाहेबांचे जुने पक्षकार होतेच. तेव्हा त्याचा लवकर जम बसेल असे मला वाटत होते. अण्णासाहेबांचे पूर्वीपासून म्हणणे होते की, सर्वांनीच एका चाकोरीत राहून काम न करिता, बुद्धिवान मुलांनी आता नव्या नव्या धंद्यात पडावे, व व्यापार करावा. आबासाहेब विलायतेहून व्यापारविषयक एक डिग्रीही घेऊन आलेला होता. आबासाहेबाची वृत्ती व्यापाराला जे डावपेच व लटपटी कराव्या लागतात तशा प्रकारची नव्हती, म्हणून त्याला व्यापारात पडणे जमणार नाही असे माझे ठाम मत होते.

पुष्कळशा वाटाघाटी होऊन शेवटी असे ठरले की, आबासाहेबाने उमरावतीत राहून, अण्णासाहेबांचे मारवाडी स्नेही गणेशदास राठी तिवसेवाले यांच्या हाताखाली कापसाच्या व्यापाराचे काम दोन वर्षे शिकावे. उमरावतीस जाण्यापूर्वी अण्णासाहेबांनी त्याला अनेक प्रकारच्या सूचना दिल्या व नेकीने काम करण्याबद्दल बजावले. मीही त्याला उपदेश केला की 'मोठी दृष्टी व मोठे मन ठेवून हिंमतीने काम कर, म्हणजे देव तुला काही कमी पडू देणार नाही.' मग मी उमरावतीस जाऊन आबासाहेब व पद्मावती यांचा संसार मांडून दिला व नागपुरास परत आले.

वरीलप्रमाणे घडलेल्या घटनांचा माणिकच्या मनावर—जरी ती त्या वाटाघाटीत प्रत्यक्ष भाग घेत नव्हती तरी, फार परिणाम झाला. ती एक दिवस अण्णासाहेबांना म्हणाली, "मी इतके दिवस बोलले नाही, पण आता घरात ज्या वाटाघाटी झाल्या त्या लक्षात घेता पुढेमागे आबा व ताई यांजवर माझा बोजा पडला असे त्यांनी म्हणू नाही. मला आय्. सी. एस्. फ्यामिली पेन्शन भरपूर मिळते.

तेव्हा माझा व माझ्या मुलाचा खर्च यापुढे माझा मलाच करू द्या. मी तुम्हा दोघांना सोडून केव्हाही कुठे जाणार नाही. तुमची सदैव सेवा करण्याचा माझा संकल्प आहे, ते माझे कर्तव्य आहे, व ते करण्याची तुम्ही मला संधी द्यावी." अण्णासाहेबांनीही विचार केला की एवढ्याने जर तिच्या मनाला समाधान लाभत असेल तर तूर्त तिचे म्हणणे मान्य करावे. पुढे त्याची भरपाई अन्य तऱ्हेने करता येईल. तेव्हा असे ठरले की, माणिकच्या व तिच्या मुलाच्या कपड्यालत्त्याचा, औषधपाण्याचा, मुलासाठी ठेवलेल्या नोकरमाणसांचा व प्रवासाचा वगैरे खर्च तिने करायचा आणि स्वस्थ चित्ताने आमच्याजवळ राहायचे.

त्याप्रमाणे तिने आपला नित्यक्रम चालू ठेविला. पहाटे चार वाजता उठून तीन तास नामस्मरण करायचे, नंतर मुलाचे सर्व करायचे, व मला गृहकृत्यांत मदत करायची असा तिचा दिनक्रम चालत असे. मुलगा अठरा वर्षांचा होईपर्यंत सहसा कुणाच्या घरी जायचे नाही; सभा नाटके इत्यादी कार्यक्रम सर्वस्वी वर्ज्य करायचे; तो दहा वर्षांचा होईपर्यंत घरातही जी मंगलकार्ये, मेजवान्या किंवा समारंभ होतील तेथे जायचे नाही; केवळ मुलाची माता म्हणून यापुढे जगायचे, असा तिने दृढ निश्चय केला. तिची विरक्ती पाहून आमचे काळीज तुटत असे!

आबासाहेब आता सपत्नीक उमरावतीस राहू लागला. माझी प्रकृती नीट नसायची. अशा स्थितीत घरातला सर्व कारभार कुणी संभाळायचा? तो सगळा भार माणिकवर पडला! म्हणून मला वाटू लागले की आता बाळासाहेबाचे लग्न करून नवी सून घरात आणावी. तीनचार वर्षे तरी ती आपल्या जवळ राहील, व तिला आपल्या घरचे वळण लागेल. त्यामुळे माझेही मन अंमळ दुसरीकडे लागेल, आणि घरातील सर्व बघण्याचा भार जो माणिकवर पडत आहे तो कमी होईल. बाळासाहेबाला आता एकविसावे वर्ष चालू होते. त्याची शेतकी कॉलेजची पदवी मिळण्यास अद्याप दीड वर्ष अवकाश होता. तो प्रथम लग्नास मुळीच तयार होईना! पण मी जेव्हा त्याला माणिकवर पडणाऱ्या कामाबद्दल समजावून सांगितले, तेव्हा तो एकदाचा लग्नास तयार झाला. माणिकवर त्याचा भारी जीव होता. तिच्या सुखासाठी वाटेल ते करण्यास तो तयार असे.

योगायोग असा की त्याच वेळीं श्रीमंत दादासाहेब मंगळवेढेकर जहागिरदार यांची मुलगी बाळासाहेबाला सांगून आली. मुलगी सोळा वर्षांची असून इंग्रजी पाचवीत होती. मुलगी मला व बाळासाहेबाला पसंत पडली. ती चांगली गोरी असून तरतरीत व हसतमुख होती. लग्नापूर्वी काका कानिटकर यांच्या हातून मुलीस साखरपुडा यथासांग करविला. मंगळवेढेकरांनी मोठ्या हौसेने उत्तम रीतीने लग्न केले. वरातीस आम्हांला आमच्या गावच्या अंबादेवीची पालखी मिळाली, आणि मोठ्या थाटाने वरात घरी येऊन ही नवी लक्ष्मी आमच्या घरात आली. लग्नास ताई, कमळाबाई, राजेसाहेब व सांगलीची सर्व राजबालके, तसेच इतर आप्तेष्ट जमले होते.

एकंदरीत बाळासाहेबाचे लग्न उमरावतीत उत्तम तऱ्हेने पार पडले. नागपूरला परत गेल्यावर आम्ही एक चहापार्टी दिली. त्यावेळीं गव्हर्नरसाहेब हजर होते. मंडळीं-कडून अहेर येऊ नयेत अशी आमची इच्छा होती, म्हणून आम्ही ती पार्टी लग्ना-प्रीत्यर्थ आहे असे जाहीर केले नाही.

माणिक मात्र उमरावतीस लग्नास न येता नागपुरातच राहिली. मला तिची पदोपदी आठवण येई ! बाळासाहेबाच्या आनंदमय सुखसोहळ्यात मला तिचा क्षणभरही विसर पडला नव्हता. याप्रमाणे देव मला कडू आणि गोड दोन्ही प्रकारचे घुटके पाजीत होता. त्यायोगे काय शिकवीत होता, तर " संसार मिथ्या आहे, पण आपले आयुष्यातील प्राप्त कर्म कर्तव्यबुद्धीने व शांतपणे पार पाडीत राहा. "

शांताही लग्नाला येऊ शकली नाही. तिचे नऊ महिने भरले होते व ती नागपुरास बाळंतपणास आली होती. ती सुखरूप बाळंतीण झाल्याची मला उमरावतीस तार आली. लग्नानंतर सर्व आवराआवर करून मी नव्या सुनेसह शांताच्या मुलाचे बारसे वगैरे करण्यासाठी नागपुरास गेले. सगळी म्हणाली, " नव्या सुनेचा पायगुण चांगला आहे ! "

मी पद्मावतीस आपल्या नव्या जावेशी सख्ख्या बहिणीप्रमाणे वागण्याचा उपदेश केला. तारादेवीचा—नव्या सुनेचा-स्वभाव घळमळीत, आनंदी व एकप्रकारे भोळा असा दिसला. ती माहेरी बरीच लाडात वाढलेली होती. त्यामुळे आमच्या जुन्या व नव्या ( इंग्रजी ) पद्धतीत समरस होण्यास तिला अंमळ उशीर लागला. पण तिने प्रथमपासूनच नव्या नव्या गोष्टी,, पुस्तकी विद्या व गृहकृत्ये वगैरे शिकण्याची हौस व तत्परता दाखविली. दोघी सुनांना आम्ही टेनिस खेळायला शिकविले. तारादेवी तर टेनिस फार लवकर शिकली. तिला चांगले गाणे येत असे, व तिचा आवाज गोड होता. तिचे वडील उत्तम टेनिस—खेळाडू होते. इंग्रजी बोलण्यास ह्या दोघी सुना लवकर शिकल्या. तारादेवीच्या शिक्षणाचीही मास्तर वगैरे ठेवून मी मागे पद्मावतीसाठी व्यवस्था केली होती तशीच केली. शिवाय घरात वेगवेगळ्या सण व उत्सव प्रसंगी कसकशी व्यवस्था करावी याचे शिक्षण घेऊन आमच्या घरची शिस्त व रीत दोघी सुनांनी लवकर उचलली व त्याबाबत मला अत्यंत समाधान वाटले.

१९२४ च्या उन्हाळ्यात मी जरा लवकर अशी दोघी सुनांसह सांगलीस गेले. तिथे कमळाबाईच्या मुलांच्या-राजकुमार रावसाहेब व प्रतापसिंह यांच्या—एप्रिलमध्ये मुंजी होत्या. कमळाबाईने या मुंजींचे समारंभ स्वतः श्रम करून अत्यंत शिस्तीने पार पाडले. अक्षत व भिक्षावळ या दोन्ही प्रसंगांच्या मिरवणुकी प्रेक्षणीय होत्या. मातृभोजनाच्या पंगतीची आरास मी, माझ्या दोघी सुना व शांता-बाई ( ही मुद्दाम मुंजीसाठी आसामातून आली होती ) यांनी मिळून केली होती, ती फारच अप्रतिम झाली होती. भिक्षावळीसाठी तऱ्हेतऱ्हेची इतकी पक्वान्ने केली

होती की ते जणू काही पक्वान्नांचे एक प्रदर्शनच झाले होते ! भिक्षावळीस दोन्ही राजकुमारांस एकसारखे जरीचे अचकन, मंदिल, गळ्यातील सोन्याचे गोफ व जानवी आम्ही ( आजोळची ) केली. शिवाय रीतीप्रमाणे चांदीची पळीपंचपात्री, ताम्हन, व मोठा करवेघाटी तांब्या हेही आम्ही देऊन कमळाबाई, राजेसाहेब व त्यांच्या मातुःश्री वगैरेंना रीतीप्रमाणे पोषाख व अहेर दिले.

याप्रमाणे मुंजी उत्तम प्रकारे पार पडल्यावर मी तारादेवीसह कमळाबाई-बरोबर महाबळेश्वरी गेले व अण्णासाहेब पचमढीस गेले. माणिक पचमढीसच होती. तिच्या नेमाप्रमाणे ती मुंजीस आली नव्हती. आबासाहेब व पद्मावती माथेरानास गेले.

अशा परिस्थितीत महाबळेश्वरी सरदार रास्ते यांजकडे चित्रकूटचे माधवनाथ महाराज म्हणून एक पोक्त ब्रह्मचारी स्वामी आले असल्याचे मला समजले. माणिकचे वाईट झाल्यापासून माझ्या हृदयाला तिळमात्र शांती नव्हती. व्यवहारा-तल्या गोष्टी केवळ कर्तव्य म्हणून व्यवस्थित करण्याचा मी प्रयत्न करीत होते, पण आतून माझे काळीज भाजत होते. कोणी तरी संत महात्मा भेटावा व त्याने आपल्या मनाला शांती द्यावी, अशी मला सारखी तळमळ लागली होती. म्हणून मोठ्या आशेने मी माधवनाथ महाराजांच्या दर्शनाला गेले. त्यांनी अनेक चांगल्या वेदांतपर गोष्टी सांगितल्या व माझ्या मनातल्या किती तरी गोष्टींची मी न विचारताच आपण होऊन उत्तरे दिली. त्यामुळे मला एक प्रकारचा विसावा मिळाला. मग माझ्या मनात आले की माणिकलाही यांचे दर्शन घडले तर बरे होईल. म्हणून मी महाराजांना नागपूरला आमच्या घरी येण्याची विनंती केली. तेही म्हणाले, " मी उमरावतीस येऊन तुमच्या या मुलीला भेटणार आहे. " तिकडे माणिकच्या स्वप्नात येऊन त्यांनी तिलाही काही दृष्टांत दिला. मग मी तिला कळविले की, " तू इकडे महाराजांच्या दर्शनाला ये. " पण तिने मला उत्तर धाडले की, " मी आता ठरविले आहे की, कोणाही साधुसंताकडे जायचे नाही. दृष्टांतावरचा माझा विश्वास उडाला आहे. ईश्वराचे नामस्मरण करीत माझा कर्मभोग मलाच भोगणे प्राप्त आहे ! " असे म्हणून ती आली नाही. मी मात्र महाराजांचा उपदेश घेतला.

अशा अस्वस्थ मनःस्थितीत मी जूनअखेर तारादेवीसह नागपुरास गेले. लोकांनी तेथे अनेक भानगडी उपस्थित केल्यामुळे अण्णासाहेबांच्या कामांत खूप विघ्ने यायला लागली होती. गांधीजींची सत्याग्रह चळवळ, त्यात निघणाऱ्या प्रभात-फेऱ्या, सभांतून होणारी सरकारच्या निषेधाची भाषणे, वगैरे प्रकार जोरात चालू होते. राजकीय चळवळीसंबधीचे हुकूम केंद्र सरकारकडून येत व इतर प्रांतांना ते पाळणे प्राप्त असे. पण ते शक्य तितके कमी तीव्र करणे त्या त्या प्रांतांना शक्य होते; आणि तसे करण्याचा अण्णासाहेब सर्व तऱ्हेने—आवश्यक वाटल्यास राजकीय पुढाऱ्यांना तुरुंगात जाऊन भेटून—प्रयत्न करीत.

तथापि या सर्व तंग राजकीय वातावरणात अण्णासाहेबांचा दिनक्रम नित्या-प्रमाणे–जणू विशेष काही घडतच नसावे अशा तऱ्हेने–चालू होता. संध्याकाळचा वेळ ते घरातील मंडळींशी नेहमीप्रमाणेच गप्पागोष्टी करण्यात घालवीत. राजकीय कटकटींबद्दल ते घरात कधी तक्रारी किंवा चर्चा करीत नसत. पुढे लवकरच कॉंग्रेस व सरकार यांमध्ये तात्पुरती तडजोड होऊन सर्व राजकीय कैदी सोडण्याचा अण्णा-साहेबांनी गव्हर्नरना सल्ला दिला. त्याप्रमाणे राजकीय कैद्यांची मुक्तता करण्यात आली. त्यात रविशंकर शुक्ल, जमनालाल बजाज, वीर वामनराव जोशी, वगैरे पुढारी मंडळी होती. या निर्णयामुळे सर्वांना संतोष वाटला. पण सर्व राजकीय कैदी एकदम सोडले, हे त्यावेळच्या व्हॉईसरॉयना आवडले नाही. त्यांनी त्याबाबत गव्हर्नरला जाब विचारला. अण्णासाहेबांनी गव्हर्नरांजवळ याबद्दल इतके मार्मिक उत्तर लिहून दिले की, व्हाईसरॉयचे त्यामुळे पूर्ण समाधान झाले. अर्थात ही गोष्ट जाहीर झाली नाही. पण अण्णासाहेबांना पुढे K. C. I. E. (Kt नंतर दुसरी) पदवी मिळाली ती या समाधानाचेच द्योतक होते, असे मानण्यास हरकत नाही.

याच सुमारास व्हाईसरॉयनी सर्व प्रांतांचे गव्हर्नर व त्यांचे कौन्सिलर्स यांज-कडून मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा लोकांना कितपत रुचत आहेत, व त्या कशा अमलात आणल्या जात आहेत, यासंबंधी मते मागविली. गव्हर्नर, त्यांचा इंग्रज कौन्सिलर सर स्टॅंडन, तसेच गंगाधरराव चिटणवीस यांनी 'सर्व उत्तम प्रकारे चालले आहे' अशा तऱ्हेचे मत दिले. अण्णासाहेबांनी मात्र त्याविरुद्ध मत (Note of Dissent) दिले. गव्हर्नर स्लाय हे खरोखरीच फार मोठ्या मनाचे गृहस्थ होते! त्यांनी अण्णासाहेबांच्या या विरोधी मतास कोणत्याच तऱ्हेने हरकत घेतली नाही, व ते जसेच्या तसेच व्हॉईसरॉयकडे धाडले!

० ० ०

मागे सांगितल्याप्रमाणे उमरावतीस रायसाहेब गणेशदास राठी (तिवसेवाले) यांजकडे आबासाहेब कापसाचा व्यापार शिकत होता. पण त्याचे मन त्या कामात लागेना! "मारवाडी लोक व्यापारात अनेक लांड्यालबाड्या करतात व अनेक युक्त्या लढवितात; तसे माझ्या हातून जन्मात होणार नाही; म्हणून मी हे काम करू इच्छित नाही" असे त्याने अण्णासाहेबांना स्पष्ट सांगितले. मग अण्णासाहेबांचे स्नेही श्री. अप्पासाहेब चितळे यांनी येऊन त्यांना आग्रह केला की, "तुम्ही कौन्सिलर पदावरून निवृत्त झाल्यावरही नागपूरचे बिऱ्हाड मोडू नका. आबासाहेबांना हाताखाली घेऊन नागपुरलाच पुन्हा वकिली सुरू करा. एकदोन वर्षांत आबा-साहेबांचा चांगला जम बसल्यावर तुम्ही खुशाल उमरावतीस जाऊन स्वस्थ बसा.

आबासाहेबांना मी सर्वप्रकारे मदत करीन." पण आता अण्णासाहेबांना विश्रांतीची अत्यंत जरूरी भासू लागली होती. शिवाय आबासाहेबाच्या मनाने घेतले की, उमरावतीसारख्या लहान शहरात आधी ब्यारिस्टरी सुरू करावी व तीनचार वर्षांनी जम बसल्यावर नागपूरला जावे. आताच नागपुरात ब्यारिस्टरी करणे फार खर्चाचे पडेल. माझे मत आबासाहेबाने हिंमत धरून प्रथमपासून नागपुरातच ब्यारिस्टरी सुरू करावी असे होते, व मी तसे त्याला आग्रहाने सांगितले. खर्च जास्त होईल या भीतीने त्याने हातपाय गाळावे हे मला मुळींच आवडले नव्हते. पण त्यावेळी माझे म्हणणे त्याने व अण्णासाहेबांनीही मुळींच ऐकले नाही.

१९२३ साली बाळासाहेब ॲग्रिकल्चरची पदवी परीक्षा पास झाला. पुढील शिक्षणासाठी विलायतेस जाण्याची त्याने इच्छा दर्शविली. यावर अण्णासाहेब त्याला म्हणाले, "माळव्यातील आपले गाव किसोनी मी तुझ्या नावे करून देतो. एक दोन वर्षे तू हिंदुस्थानातल्या शेतीचा अनुभव घे, व मग पाहिजे तर विलायतेस शेतीचे काम शिकण्यास जा." पण बाळासाहेबाच्या मनात विलायतेस जाऊन ब्यारिस्टरही होण्याचे आले होते. तथापि अण्णासाहेबांचा सल्ला त्याने ऐकला. अर्थात त्याचा हिरमोड मात्र फार झाला. मग मी म्हटले, "तुमच्या वशिल्याने त्याला कुठे चांगलीशी नोकरी तरी लावून द्या." पण ते म्हणाले, "माझा मुलगा म्हणून मी त्याच्यासाठी कुठेही वशिला लावणार नाही. त्याने हवी तर स्वतःच्या हिंमतीवर नोकरी मिळवावी." पण बाळासाहेबही त्यांचाच मुलगा! तो म्हणाला, "अण्णासाहेबांच्या अधिकारपदाचा फायदा घेऊन मी नोकरी मिळविली असे कोणी म्हणायला नको! म्हणून मी नोकरीच्या भानगडीतच पडणार नाही."

मग त्याने निंबोली, किसोनी व पहूर या आमच्या गावांतील शेतीची कामे पाहण्याचा निश्चय केला! शेतीत त्याचे मन रमले नाही, तरी एकदा ते करण्याचे ठरविल्यावर ते तो उत्तम करू लागला. त्याची बुद्धि कुशाग्र होती व त्याला कामाचा उरकही चांगला होता. पण शेतीचे कामच असे आहे की, त्याचे योग्य फळ लाभण्यास अंमळ उशीरच लागतो. त्याने आमच्याकडे राहूनच शेतीची कामे पहावी व त्यासाठी अण्णासाहेबांनी त्याला स्वतंत्र रक्कम द्यावी असे ठरले. त्याप्रमाणे तूर्त तरी त्याचे बस्तान ठीक बसले.

तारादेवीची पहिली मंगळागौर मी नागपूरला मोठ्या हौसेने केली. त्यासाठी तिच्या मातुःश्री व धाकटी बहीण चंपूताई यांना मी पुण्याहून मुद्दाम अगत्याने बोलावून आणले होते. त्यांना तारादेवीचे सर्व उत्तम चाललेले पाहून फार संतोष वाटला व त्यांनी तसे बोलूनही दाखविले. माझ्या थोरल्या सुनेची—पद्मावतीची—बहीण लो. टिळकांच्या मुलाला दिली होती. मी पद्मावतीस नीट वागवीत नाही, असा तिचा काही तरी गैरसमज झाला होता की काय कुणास ठाऊक, पण ती तसे काही तरी तारादेवीच्या माहेरच्या मंडळींजवळ बोलली होती, असे माझ्या कानांवर

आले होते. पण आता त्या मंडळींनी माझ्या घरी येऊन स्वतःच आमच्या घरातली सर्वांची वागणूक पाहिली, त्यामुळे त्यांना समाधान वाटले. पद्मावतीप्रमाणे तिची धाकटी वहीण शांताबाई हिला मी मुलीसारखी मानीत असे. मला वाटे, या मुलीला आई नाही–आपणच तिचे माहेरपण करावे !

१९२५ च्या सप्टेंबरच्या सुमारास गव्हर्नर सर फ्रॅन्क स्लाय् विलायतेस परत गेले व त्यांच्या जागी सर मॉटेग्यू बटलर नागपूरप्रांती गव्हर्नर म्हणून आले. जाताना स्लाय्साहेबांनी अण्णासाहेबांना आणखी पाच वर्षे होम मेंबरचे काम करण्याचा अतिशय आग्रह केला. पण अण्णासाहेबांनी त्यांस स्पष्टच सांगितले की, " सर मॉटेग्यू बटलर यांची व माझी मते जुळणार नाहीत, म्हणून माझी पाच वर्षे संपल्यानंतर मी होम मेंबर राहू इच्छीत नाही. आहे त्या परिस्थितीत मी लोकांचे कल्याण साधण्यासाठी अहर्निश झटलो, व सरकारचीही इभ्रत राखली. पण मॉटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणासंबंधी भिन्नमतपत्रिका ( Note of Dissent ) लिहून मी स्पष्ट दाखवून दिले आहे की, यापुढे सरकारने लोकांना अधिक हक्क व सवलती दिल्या नाहीत तर माझ्यासारख्यांना सरकारला मदत करणे अशक्य होईल. " मग स्लाय्-साहेबांनी त्यांना दुसरी एक सूचना केली. ते म्हणाले, " तुमच्यासारख्या निःस्पृह माणसाची आम्हांला फार गरज आहे. ज्याअर्थी तुम्ही इथली होम मेंबरची जागा नको म्हणता, त्याअर्थी विलायतेतील हिंदुस्थानच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या सल्लागार समिती ( Advisory Committee ) वर काही वर्षे तरी तुम्ही राहावे अशी मी व्यवस्था करतो. पुढे तेथून तुम्हांला दोनचार वर्षांत हिंदुस्थानांत गव्हर्नर होण्याची संधी मिळेल. " त्यावर अण्णासाहेब त्यांना म्हणाले, " त्या कमिटीत जाऊन मला माझ्या देशाचे काहीच हित साधता येणार नाही; कारण त्या कमिटी-वरचे सल्लागार जवळ जवळ नावाचेच असतात; त्यांच्या सल्ल्याला काही महत्त्व नसते. " माझी इच्छा होती की त्यांनी ही जागा वर्ष दोन वर्षे तरी घ्यावी. त्यात त्यांना विश्रांती मिळाली असती, आणि विलायतेतील देश पाहण्याची त्यांची फार दिवसांची इच्छा होती ती पूर्ण झाली असती. पण ते व्हायचे नव्हते.

पुढे स्लाय्साहेबांनी दिल्ली येथील केंद्र सरकारच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सि-लरच्या पदासाठी अण्णासाहेबांची शिफारस आपण होऊन करून ठेविली, व " या जागेचा तरी अव्हेर करू नका " म्हणून अण्णासाहेबांना सांगून ठेविले. पण अण्णा-साहेबांनी स्वतः त्याबाबतीत काहीच हालचाल केली नाही, म्हणून ती गोष्ट तेवढ्या-वरच राहिली. नंतर १९२५ मध्ये नागपूरच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरपदापासून निवृत्त झाल्याबरोबर त्यांना कलकत्त्याच्या लिबरल फेडरेशनचे अध्यक्ष होण्याचे निमंत्रण आले, व ते त्यांनी स्वीकारले. त्यावेळी अध्यक्षपदावरून त्यांनी केलेले भाषण सरकारला फार झोंबणारे असे झाले. मग आम्हांला विश्वसनीय रीत्या असे समजले की त्यामुळेच व्हाईसरॉयनी त्यांना दिल्ली येथील एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर-

पदाच्या जागेबद्दल विचारणा केली नाही. पण स्लायसाहेबांच्या शिफारशीप्रमाणे त्यांना K. C. I. E. ही पदवी दिल्याची तार आमच्याकडे येऊन थडकली! "माझ्या भाषणापूर्वी सरकारने हा निर्णय घेतला असावा, नाही तर ही पदवी सरकारने मला दिली नसती!" असे कलकत्त्याहून आल्यावर अण्णासाहेब विनोदाने म्हणाले!

एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमधून निवृत्त झाल्यावर अण्णासाहेबांना व त्यांच्या इतर सहकारी कौन्सिलर्सना निरोप देण्यासाठी अनेक पार्ट्या झाल्या. स्वतः गव्हर्नरनी गव्हर्मेंट हाऊसमध्ये मोठी मेजवानी दिली. त्यावेळीं त्यानी केलेल्या गौरवपर भाषणाला उत्तर देताना अण्णासाहेब म्हणाले, 'आता काळ बदलत चालला आहे. जनतेला अधिकाधिक हक्क देण्याचा समय आला आहे....माझे स्वतःचे नाव एके काळी सरकारच्या 'काळ्या बुकात' असताना, वेळ आली तेव्हा सरकारने मला होम मेंबरचे काम दिले, यावरून आता हिंदी लोकांवरील अविश्वास सोडून सरकार त्यांची किंमत जाणू लागले आहे, हे स्पष्ट दिसते."

याप्रमाणे अण्णासाहेबांची होम मेंबरची मुदत संपली व दुसऱ्यास दिवशी आम्ही मोटारींनी उमरावतीस येऊन पोहोचलो. नागपूर सोडताना तेथील लोकांनी निरोप देण्याचे सोहळे घरी किंवा स्टेशनवर येऊन करू नयेत म्हणून अण्णासाहेबांनी उमरावतीस आमच्या जाण्याची कुणालाच दाद लागू दिली नाही. आता मी दहा वर्षांनी उमरावतीस माझ्या आवडत्या घरात पुन्हा राहण्यास आले, याच आनंदात माझे मन गर्क होऊन गेले! असे समाधान नागपूरच्या त्या टोलेजंग बंगल्यात, तेथील मानमान्यतेत व वैभवात, कशातही मला लाभले नाही. मला आता उमरावतीच्या घरातला पुन्हा नीटनेटकेपणा आणण्याचे खूप काम होते. जणू काही ते घर मला म्हणत होते, "तू मला इतके दिवस सोडून का गेलीस? तुझ्या गैरहजेरीत माझी बघ कशी आबाळ झाली! तुझ्या प्रेमळ जोपासनेने मला आता पूर्ववत् प्रफुल्लित कर!" आपल्या लाडक्या मुलाची पुष्कळ दिवस आबाळ होऊन ते भेटले म्हणजे आईचे हृदय जसे कळवळून येते, तसे त्यावेळीं मला झाले!

पण आम्ही उमरावतीस परत आल्यावर आबासाहेबाची वेगळे राहण्याची अधिक इच्छा असल्याचे दिसून आले. उमरावतीस व्यापार शिकण्याच्या कामी त्याला चांगले अनुभव आले नव्हते व त्यात त्याचे मन लागत नव्हते. दोनतीन वर्षे उमरावतीत ब्यारिस्टरी करून मग नागपूरला प्रॅक्टिससाठी जावे असे त्याने ठरविलेच होते. त्याप्रमाणे आता नागपुरास जावे असे त्याला वाटू लागले व आम्हीही त्याला अडथळा केला नाही. परंतु त्याचे तिथे नीट बस्तान बसेपर्यंत अण्णासाहेबांना काही दिवस तिथे जाऊन प्रॅक्टिस करावी लागली. हा त्यांचा मोठाच स्वार्थत्याग झाला! पण संसार सुखमय करण्यास वडील माणसांना पुष्कळदा असा स्वार्थत्याग करावा लागतो. मुलांच्या काही गोष्टी पटत नसल्या तरी त्या पोटात

घालून, त्यांच्याशी प्रेमाने वागावे लागते. आम्ही आमच्या मनाची अशी घडण केली असल्यामुळे घरात कचकच अशी कधी झाली नाही.

सुनांशी वागण्याचेही मी एक पक्के धोरण ठेविलेले होते. त्या दोघींच्या कामांची मी साधारणपणे सारखी वाटणी करून दिली होती. शिवाय रिते दिसेल ते काम करायला मी आणि माणिक होतोच. एवढेच की, माझी व अण्णासाहेबांची आदरातिथ्याची जी पद्धत होती ती त्यांनी पुढे तशीच चालवावी अशी माझी इच्छा असे. घरात पाहुणेमंडळी येणे व त्यांच्यासाठी उत्तम जेवणे व मेजवान्या करणे हे जोशी घराण्याचे वैशिष्ट्य होते. मी सुनांना म्हणायची, " मन मोठे ठेवावे ! अन्नदान करीत राहावे–त्याने बरकत राहते व आपल्या मनाला समाधान मिळते. "

तशाच आमच्या घरात काही ठराविक पद्धती असत. त्या मुलींच्या व सुनांच्या मनावर ठसविण्याचा माझा प्रयत्न असे. घरात कामाला कितीही नोकर असले तरी त्यांच्यावर देखरेख ठेवून त्यांच्याकडून कामे व्यवस्थित करवून घेण्याचे काम घरधनिणीनेच केले पाहिजे, अशी पद्धत मी माझ्या सासूबाईंच्या वेळेपासून पाहत आलेली होते. स्वयंपाकघरात स्वतः काम करण्याचा प्रसंग मला क्वचितच येई, पण आलाच तर ते मी टापटिपीने झटकन उरकीत असे. माझ्या मुलींना याचे आश्चर्य वाटे. मी त्यांना म्हणायची, " तुम्हीही असेच करायला शिका. मालकिणीस सगळे येत असले आणि पडेल ते काम करण्याची तिची तयारी असली, म्हणजे नोकरमाणसे वचकून असतात. " रोज स्वयंपाकघरात जाऊन एक तरी पदार्थ स्वतः करून मुलामाणसांना खाऊ घालण्याचा माझा नियम असे. त्यामुळे स्वयंपाकघरात सहजगत्याच देखरेख राहत असे. जेवणात तऱ्हतऱ्हेची तोंडीलावणी वगैरे केली म्हणजे फार खर्च येतो अशी बऱ्याच लोकांची समजूत आहे. पण गृहिणीने त्याबाबत स्वतः लक्ष ठेवल्यास तसे काही होत नाही आणि जेवणाराची तृप्ती होते, हा माझा तरी अनुभव आहे.

आमच्या वेळी तऱ्हतऱ्हेचे मुरांबे, लोणची, पापड, पापड्या, कुर्डया, भाजणी, मेतकूट वगैरे पदार्थ घरीच करण्याची पद्धत होती. भाजणी व मेतकूट याशिवाय बाकीचे वरील साहित्य वर्षाचे एकदमच करून ठेवीत. हे सर्व पदार्थ घरी केल्याने खर्च कमी लागून स्वच्छतेबद्दल खात्री राहते. धान्यांपैकी तांदुळाखेरीज सर्व धान्य आमच्या शेतीवरून दरवर्षी आमच्या गरजेप्रमाणे बैलगाड्यांतून आणले जाई. मी ते व्यवस्थित कोठीत भरून घेई. त्यासाठी घरापासून दूर, उंदरांचा प्रवेश होऊ नये अशी बंदिस्त व लोखंडी पत्र्याची मी एक खोली बांधून घेतली. तीत धान्ये ठेवण्यासाठी पत्र्यांचे लहानमोठे हौद करवून त्यांवर त्या त्या धान्यांची नावे घातलेली असायची. दर नोव्हेंबरमध्ये कडुनिंबाचा पाला सुकवून पोत्यात भरवून घेई व दर पोत्यात $\frac{3}{4}$ धान्य व $\frac{1}{4}$ तो पाला मिसळून ते धान्य हौदांत भरवून घेई. त्यामुळे धान्यास आळ्या किंवा पोरकिडे लागायचे नाहीत. हे धान्य दरवर्षी दर

मार्चअखेर भरण्यात येई व त्यास पावसाळ्यानंतर पुन्हा एकदा बाहेर काढून उन्हे देण्यात येत, त्यामुळे त्यांची खराबी होत नसे.

याशिवाय घरातला कपडालत्ता, गाद्या, बिछायती वगैरेंना दरवर्षी चित्रा-नक्षत्राची उन्हे द्यावी लागतात. तसे केल्याने ती खराब होत नाहीत. आमच्या घरातील शालू, शेले, पैठण्या, पीतांबर, गजनीचे पडदे, आसने वगैरे कपड्यांना मी स्वतःच्या नजरेखाली फार काळजीने ही उन्हे देते. त्यामुळे आमच्या कोणत्याच कपड्यांना कधी कसर लागली नाही. पण ही सर्व कामे घरधनिणीने स्वतः बघायला हवीत, नोकरमाणसांवर सोपवून चालत नाही. मी स्वतः या गोष्टींकडे लक्ष पुरवीत आले, त्यामुळे लोकांना दिसणारा आमच्या घरातील अवाढव्य पसारा फार व्यवस्थितपणे व लोकांच्या कल्पनेपेक्षा फार कमी खर्चात आवरला जातो. घरातील सर्व सामान, भांडीकुंडी व दागदागिने वगैरेंच्या याद्या मी शिस्तवार करून ठेविल्या आहेत व दरवर्षी त्या तपासते. ह्या कामी मला माणिकची फार मदत होते. या याद्या अद्याप माझ्या मुखोद्गत आहेत. माझ्या चारही मुली या कामात तरबेज झालेल्या आहेत. तसेच आमच्या घरातील सुनांनी पुढे चालवावे म्हणून आमच्या गृहकृत्या-बद्दल ही हकीगत अंमळ विस्ताराने लिहिली आहे.

१९२६ च्या उन्हाळ्यात आम्ही माणिकला व तिचा मुलगा बाबा याला, शांताबाईच्या आग्रहावरून आसामात शिलाँग येथे तिच्याकडे धाडिले. तिकडच्या नव्या मुलुखात काही दिवस तिच्या मनाला विरंगुळा वाटेल असे आम्हांला वाटले. पद्मावतीही तिच्याबरोबर गेली व त्यानंतर काही दिवसांनी आबासाहेबही तिकडे गेला. जाताना ती मंडळी कलकत्त्यास थोडा वेळ थांबून पुढे जाणार होती. पण त्याच वेळेस हिंदुमुसलमानांचे भयंकर दंगे कलकत्त्यास सुरू झाले. ही सर्व मंडळी दोन दिवस हॉटेलात जिथे उतरली होती तिथेच अडकून पडली! सुदैवाने शांताबाईच्या ओळखीचे श्री. आघारकर हे महाराष्ट्रीय गृहस्थ कलकत्त्यास होते, त्यांना टेलिफोन केल्यावर त्यांनी स्वतः जीव धोक्यात घालून या मंडळींना सियाल्डा स्टेशनवर पोचते केले, व ती सुखरूपपणे शिलाँगला पोचली!

त्यानंतर थोड्याच दिवसांनी मला व अण्णासाहेबांना मुंबईस जावे लागले. कमलाबाईची थोरली मुलगी राजकुमारी इंदुमतीराजा हिच्या लग्नाचे घाटत होते. याबद्दल विचार ठरविण्यासाठी राजेसाहेब व कमलाबाई यांनी आम्हांला मुंबईस बोलाविले होते. तिथे त्यांचे भावी व्याही ग्वाल्हेरचे जनरल गणपतराव उर्फ नाना-साहेब राजवाडे लग्नाची बोलणी करण्यास यायचे होते. अशा वेळी वडीलकीच्या नात्याने आम्ही हजर असावे अशी राजेसाहेबांची इच्छा होती.

या सुमारास ताईने आपले पूर्वीचे बिऱ्हाड बदलून ‘ शाम भुवन ’ नावाच्या इमारतीत नेले होते. तिची प्रॅक्टिस जोरात सुरू होती. तरी पण माझ्या मनात सारखे दडपण रहायचे की “ हिचे एकदा लग्न झाले पाहिजे. ब्राह्मणाची मुलगी–लग्ना-

शिवाय राहता कामा नये. " हा माझ्या मनाचा पूर्वसंस्कार मला त्यासाठी देवाची मनोभावे प्रार्थना करायला लावी.

ग्वाल्हेरचे जनरल राजवाडे यांची आमची मुंबईत लवकरच गाठ पडली. त्यांचा स्वभाव बाणेदार, कर्तृत्ववान् व सरळ दिसला. त्यांची पत्नी दोनतीन वर्षांपूर्वी वारली होती. त्यांना चार मुलगे व दोन मुली होत्या. त्यांचा सर्वांत मोठा मुलगा रामचंद्रराव उर्फ रावसाहेब पुण्याच्या डेक्कन कॉलेजात इंटर आर्ट्स् पास झाला होता. घरात कुणी बायको माणूस पाहिजे म्हणून या मुलाचे लवकर लग्न करणे त्यांना कर्तव्य होते. राजवाड्यांचे घराणे कुलीन, श्रीमान् व लष्करीपेशाचे होते. जनरलसाहेब स्वतः शिंदेसरकारच्या पदरी मोठे अंमलदार असून त्यांच्या फार मर्जीतले होते. त्यांना शिंदेसरकारकडून ' रावराजे ' ही पदवी व इतर सरदारकीचे मान होते, व इंग्रजसरकारकडूनही ' राजा ' हा किताब व जहागिरी मिळाल्या होत्या. पटवर्धन घराण्यातील राजकन्येला हे स्थळ सर्व दृष्टींनी उत्तम होते.

इंदुराजाला पंधरावे वर्ष चालू असून अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत तिचे लग्न करायचे नव्हते. आमच्या मनात सध्या वाङ्निश्चय करून दोन वर्षांनी लग्न करावे असे होते. पण जनरल राजवाडे यांचे असे म्हणणे पडले की, " आमच्या घरात कोणी बाईमाणूस नाही, म्हणून मुलाचे लग्न मी लवकर करू इच्छितो. लग्नानंतर हवे तर दोन वर्षे मुलीला तुम्ही माहेरी ठेवून शिक्षण द्या. तोपर्यंत हे लग्न वाङ्निश्चयाच्या स्वरूपाचे समजावे म्हणजे झाले. " हे आम्हांला मान्य झाले व याप्रमाणे अटी ठरून हे लग्न निश्चित झाले.

यावेळी इंदुराजाच्या लग्नाबद्दलची सर्व बोलणी वगैरे मुंबईस ताईच्या घरातच झाली. तिथे जनरलसाहेब सातआठ दिवस जात येत होते. त्यावेळी ताई व जनरलसाहेब यांच्यामध्ये एकमेकांबद्दल आदर व आस्था खूप वाढत असल्याचे आमच्या निदर्शनास आले. मग मी एक दिवस अण्णासाहेबांना एकीकडे म्हटले, " या जनरलसाहेबांचे व ताईचे लग्न व्हावे असे माझ्या मनात येत आहे, तर तुम्ही तशी खटपट करा. " त्यावर ते म्हणाले, " गेले दोनतीन दिवस माझ्याही मनात तोच विचार घोळत आहे. " योगायोग असा की त्याच दिवशी ताईने अण्णासाहेबांना आपल्याबरोबर फिरायला नेऊन तिच्याही मनात हीच गोष्ट असल्याचे त्यांना सांगितले ! अण्णासाहेबांनी तिला म्हटले, " कमळाबाईच्या मुलीचे राजवाड्यांकडे प्रथम लग्न ठरले आहे. तेव्हा या लग्नाला तिची संमती असली तरच मी त्यासंबंधी खटपट करीन. " ताईने ते मान्य केले.

मग अण्णासाहेबांनी ही गोष्ट कमळाबाईच्या कानावर घातली व तिची संमती मिळविली. ताईचे लग्न व्हावे अशी जरी माझी फार इच्छा होती, तरी ती आपल्या सख्ख्या बहिणीच्या मुलीची सावत्र सासू व्हावी ही गोष्ट माझ्या मनाला अंमळ

खटकत होती. पण अखेर पुष्कळ विचारविनिमय होऊन या लग्नासंबंधी वाटाघाटी करण्याचा अण्णासाहेबांनी निर्णय घेतला.

मग अण्णासाहेबांनी जनरलसाहेबांना ग्वाल्हेरला पत्र लिहून मोठ्या सावधपणाने व चातुर्याने या लग्नासंबंधी विचारले. जनरलसाहेबांनी त्याबद्दल बराच विचार करून आपल्या खास मित्रांचा—विशेषतः ग्वाल्हेरच्या दरबारी उच्च दर्जाचे कौन्सिलर असलेले त्यांचे स्नेही कैलासनारायण हक्सर यांचा सल्ला घेऊन, तसेच आपल्या थोरल्या मुलाचे (कमळाबाईच्या भावी जावयाचे) मत विचारून, सर्वांची मते अनुकूल पडल्यावर या लग्नास रुकार दिला. जनरलसाहेब व ताई यांचे लग्न १९२६ च्या डिसेंबरात उमरावतीस करावे, व इंदुराजाचे १९२७ च्या मे महिन्यात सांगलीस करावे असे ठरले.

ताईचे लग्न अगदी थोडक्यात घरातल्या घरात उरकून घेण्याचा आमचा विचार ठरला होता. कारण जनरलसाहेबांचे हे तिसरे लग्न होते. तरी पण लग्नासाठी बाहेरगांवची ५०–६० मंडळी जमली. ताईच्या पेशंट बारिया संस्थानच्या महाराणीसाहेब यांनी आपण होऊन आपल्या दिरास लग्नासाठी उमरावतीस धाडले. त्याशिवाय सांगलीची सर्व मंडळी आली होती ती वेगळीच. जनरलसाहेब बरोबर आपले पाचसहा नोकर घेऊन आले. त्यांना आमच्या छोट्या बंगल्यात जानोसा दिला होता. त्यांनी आम्हांला कळविले की, "कमळाबाई राणीसाहेब माझ्या बहिणीचे—करवलीचे—काम करतील."

लग्न घरातल्या घरात करायचे म्हटले तरी आमच्या विशेष घरोब्याच्या अशा उमरावतीतील शंभर दीडशे घरी आम्हांला आमंत्रणे धाडावी लागली. लग्नासाठी मोठा मंडप व बाहेरच्या पाहुण्यांसाठी आमच्या बंगल्याच्या आवारात आठ दहा तंबू लावावे लागले. लग्न मोठ्या बंगल्याच्या खालच्या दिवाणखान्यात लागले. ताईचे नाव 'लक्ष्मी' असे ठेवण्यात आले. मिरवणुका वगैरे काही काढल्या नाहीत. तरी पण एकंदरीत लग्न थाटात झाले. लग्नानंतर एकदोन दिवसांतच ताई जनरलसाहेबांबरोबर ग्वाल्हेरला गेली. त्याच वेळी नामदार श्रीनिवास शास्त्री आमच्याकडे सहज पाहुणे म्हणून आले. आमच्याकडे लग्नाची प्रयोजने चालूच होती. त्यांना त्याबद्दल फार मौज वाटली आणि ते गंमतीने म्हणाले, "मला लग्नाचे आमंत्रण का दिले नाही?" ते त्यावेळी सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे अध्यक्ष होते. त्यांनीही ना. गोखले यांच्याप्रमाणेच आमच्यावर फार लोभ ठेवला होता.

ताईला आता ग्वाल्हेरसारख्या जुन्या तऱ्हेच्या संस्थानी वातावरणात व सहा सावत्र मुलांत नांदावयाचे होते. लग्नापूर्वीच तिला अण्णासाहेबांनी ग्वाल्हेरला गेल्यावर कसे वागायचे याबद्दल खूप सूचना दिल्या होत्या. मीही माझ्या परीने तिला पुष्कळ उपदेश केला. मुले मोठी व जाणती झाली तरी आईबापांना काही बाबतीत त्यांना मार्गदर्शन करावेच लागते. तीही ग्वाल्हेरला जुन्या पद्धतीने वागायची. नऊवारी

लुगडे नेसायची, देवपूजा करायची, घरात नीट देखरेख ठेवायची व आपल्या सावत्र मुलांशी प्रेमाने वागायची. त्यामुळे तिने तेथे खूप चांगुलपणा मिळविला.

ग्वाल्हेरकडील जहागीरदारांची राहणी दक्षिणेकडील जहागिरदारांपेक्षा थाटाची आहे. राजवाडे यांच्या घरात अनेक मानकरी, कारकून, हुजरे, कुणबिणी यांची रेलचेल होती. जनरलसाहेब ग्वाल्हेर सरकारचे पहिल्या प्रतीचे सरदार असून तेथील सैन्याचे सेनापती होते. कै. माधवराव शिंदे यांनी जनरलसाहेबांना राजकारणाचे व सैन्याचे फार काळजीपूर्वक शिक्षण दिले असून आपल्या पश्चात अल्पवयी युवराजांच्या वतीने राज्यकारभार पाहण्यासाठी एक कौन्सिल नेमून ठेविले होते, त्यात जनरलसाहेब होते. इंग्रजांच्या दरबारीही त्यांचे फार वजन होते. त्यांनी ग्वाल्हेरची फौज फार शिस्तीची व व्यवस्थितपणाची ठेविली होती व त्याबद्दल इंग्रज सेनापतीकडून गौरव संपादन केला होता.

याच सुमारास आमच्या बाळासाहेबाची सैन्यात दाखल होण्याची फार दिवसांची इच्छा पूर्ण झाली. टेरिटोरियल फोर्समध्ये त्याला प्रथम स्थान मिळाले. तिथे त्याला वर्षातून तीन महिने कामावर जावे लागे. पहिल्या तीन महिन्यांतच त्याने इतकी कर्तृत्वशक्ति दाखविली की, त्याच्या वरिष्ठ इंग्रज अधिकाऱ्याने त्याला प्रथम लेफ्टेनंट व लगेच क्यापटन्चा हुद्दा दिला. पूर्वी त्याच्या फौजेत जाण्याला मी विरोध केला होता, ती गोष्ट माझ्या मनाला फार लागली होती. तेव्हा याबद्दल अंशतः तरी भरपाई व्हावी म्हणून आता मी त्याच्या वरील इच्छेला मान्यता दिली. त्याने जरी हे काम पत्करले, तरी पण तो त्याच्याकडे सोपविलेले शेतीचे कामही तत्परतेने पाहत असे. याप्रमाणे आमच्या घराण्यात सैन्यात जाण्याचा पायंडा सुरू झाला.

* * *

# ६.

## ( १९२७ – १९४० )

ताईचे लग्न आटोपल्यावर आता राजकुमारी इंदुराजा हिच्या लग्नाची तयारी सुरू झाली. लग्न मे महिन्यात व्हायचे होते; तरी मी मार्चमध्येच कमळाबाईच्या मदतीसाठी म्हणून सांगलीस गेले. आमच्या कुटुंबातील बाकीची मंडळी माझ्या मागून आठदहा दिवसांनी आली. कमळाबाईस लग्नाची फार मोठी तयारी करायची होती; त्यासाठी तिने व राजेसाहेबांनी वेगवेगळ्या कमिट्या नेमून कामाची व कार्यक्रमाची सुंदर आखणी केली होती. सांगलीच्या अधिकारी मंडळींनी व शहरातील अनेक प्रमुख मानकरणी व स्त्रिया यांनी त्यात मोठ्या उत्साहाने भाग घेतला.

सांगलीच्या राजघराण्याच्या तोलाचे कोकणस्थात स्थळच नव्हते. त्यात हे राजवाड्यांचे स्थळ सर्वांत उत्तम होते. त्यांची दीड लाखांच्या उत्पन्नाची जहागीर होती व छत्रचामर, मोरचेल, डंकानौबत, हत्ती, पालखी, भालदार, चोपदार, हे सर्व राजवैभवाचे मान त्यांना होते. विशेष म्हणजे मुलगा–नवरदेव रामचंद्रराव उर्फ रावसाहेब हा विद्येत फार हुशार व सुस्वभावी होता. म्हणून मुलगी सुस्थळीं पडत आहे या विचाराने कमळाबाई व राजेसाहेब यांनी एवढ्या हौसेने अवाढव्य कार्याची कुशलतेने सिद्धता सुरू केली. दक्षिण महाराष्ट्रातील सर्व राजेरजवाडे व विद्वान मंडळीं, सांगलीचे सरदार-दरकदार व रयतेपैकी अनेक लहानथोर मंडळीं, या सर्वांच्या पाहुणचारासाठी आठदहा वेगवेगळे क्यांप उभारले गेले. विशेष म्हणजे कोल्हापूरचे छत्रपती या लग्नाला येणार होते.

वरपक्षाचा क्यांप मुलांच्या हायस्कूलच्या मोठ्या इमारतीत व त्या सभोवतीच्या विस्तीर्ण कंपाउंडात उत्तम तऱ्हेने सजविण्यात आला होता. या ठिकाणी राजेसाहेब व कमळाबाई यांनी जातीने देखरेख करून फारच मेहनत घेतली होती. तेथील दिवाणखाने, खोल्या वगैरे सजविण्यात, आणि चहा व जेवण्याची व्यवस्था लावण्यात, मी, माझ्या मुली व सुना यांनी कमळाबाईस मदत केली. सर्व व्यवस्था पाहून

जनरलसाहेब (राजवाडे) खूष झाले. त्यांनी त्यांच्या फौजेतील सुमारे पाऊणशे शिपाई व पन्नास नोकर बरोबर आणले होते. त्याशिवाय त्यांची खाशी शंभर सव्वाशे मंडळी वेगळींच होती. जनरलसाहेबांच्या शिपायांची व त्यांच्याकडील एकंदर कार्यक्रमांची जनरलसाहेबांनी लावलेली शिस्त पाहून सांगलीतील सर्व आबालवृद्ध माणसे दिपून गेली ! त्यांच्याकडील सर्व कामे घड्याळाच्या काट्याप्रमाणे नियमित व कोणत्याही प्रकारचा गोंधळ न होता सुरळीत पार पडत.

लग्नसमारंभ पाहण्यास सांगली राज्यातील सर्व भागांतून व शेजारच्या ब्रिटिश विभागातून हजारो लोक सांगलीस आल्यामुळे ते शहर जसे काही दुमदुमून गेले ! लग्नसमारंभ अत्यंत प्रेक्षणीय झाला. वरपक्ष व वधूपक्ष दोन्ही समानतुल्य दिसत होते, त्यामुळे या समारंभाला विशेष शोभा आली. त्यावेळीही मागील मुंजीप्रमाणे रुखवताचे सामान, व विहिणीच्या मुख्य पंगतीची सजावट व व्यवस्था माझ्याकडेच सोपविण्यात आली होती. माझ्या सुनांची व मुलींची या कामी मला फार मदत झाली. जुन्या पद्धतीप्रमाणे लग्नसोहळा चार दिवस मोठ्या थाटाने चालू होता. ताईनेही नवऱ्या मुलीचे दागिने, कपडालत्ता वगैरे मौल्यवान व कलात्मक पद्धतीने करवून आणले होते. आता लग्न म्हटले म्हणजे वरपक्षाकडील रागावण्याचे रुसण्याचे वगैरे थोडेबहुत प्रकार व्हायचेच, आणि ते झालेही ! पण आमची ताई व कमळाबाई या विहिणी सख्ख्या बहिणीच असल्यामुळे ते प्रसंग थोडक्यात मिटले. एकंदरीत लग्नसमारंभ फार थाटाने पार पडला. त्यानंतर ग्वाल्हेरची मंडळी इंदुराजासह ग्वाल्हेरला गेली, व मी मुलांसह कमळाबाईबरोबर आठदहा दिवस महाबळेश्वरी गेले. अण्णासाहेब १५ जूनच्या सुमारास व मी जूनअखेरपर्यंत काही दिवस सांगलीस राहून उमरावतीस परत आले.

इ. स. १९२७ च्या श्रावणात मी उमरावतीस इंदुराजा हिची मंगळागौर करण्याचे ठरविले. चंद्रावतीदेवी व राजकुमार भय्यासाहेब यांनाही कमळाबाईने इंदुराजाबरोबर उमरावतीस धाडले. भैय्यासाहेबाला एका वर्षापूर्वी महाबळेश्वरी घट-सर्प झाला होता, व त्याची प्रकृती तेव्हापासून काहीशी अशक्त झाली होती. तो माझ्याजवळ उमरावतीस राहण्यास नेहमी खूष असे. ही सर्वच नातवंडे माझ्याजवळ आनंदाने राहत, व त्यांना साधेपणाच्या सवयी लागाव्या म्हणून कमळाबाईही त्यांना मधूनमधून आमच्या घरी राहण्यास धाडी. आमचे फ्यामिली डॉक्टर डॉ. भट यांच्यावर आम्हां सर्वांचा विशेष विश्वास असे. म्हणून त्यांचे औषधोपचार भय्यासाहेबास चालू केले. दिवाळीपर्यंत मजजवळ राहण्यास तो राजी झाला.

एक दिवस त्याला एकदम खूप ताप भरला ! ताप एकदम १०४ डिग्रीपर्यंत चढला आणि त्याची शुद्धच गेली ! ताप वाईट तऱ्हेचा विषम असल्याचा डॉ. भट यांनी निर्णय दिला. आम्ही ताबडतोब कमळाबाई व राजेसाहेब यांना तारेने प्रकृति-मान कळवून उमरावतीस बोलाविले. 'आईला बोलवा' म्हणून भय्यासाहेबाचेही

तापात चालले होते. कमळाबाई व राजेसाहेब तिसरे दिवशी उमरावतीस पोचू शकले. दुखण्याची वाढतीच कमान होती. आमच्या तोंडचे तर पाणीच पळाले. रात्रंदिवस आम्ही त्याची शुश्रूषा करीत होतो. नर्सेस पण होत्याच. एकविसाव्या दिवशी सकाळीं त्याचा ताप उतरला तो पुन्हा रात्री १०६ डिग्रीपर्यंत चढला ! ताई व जनरलसाहेब मुद्दाम ग्वाल्हेरहून उमरावतीस समाचारास येऊन गेले. मुंबईच्या बड्या डॉक्टरांचा सल्ला डॉ. भट घेतच होते. कुणी एका हकीमाचे नाव सांगितले, त्यालाही बोलावून घेतले. त्याने आपले औषधोपचार सुरू केले. त्याच्या सांगण्यावरून आम्ही दुर्गा-देवीचा पाठही सुरू केला ! माधवनाथमहाराजांकडून अंगारा आणविला. त्याने मुलाला नक्की बरे वाटेल असे त्यांनी आम्हांला आश्वासन दिले. करता येण्याजोगे सर्व उपाय केले, परंतु दुर्गादेवीचा पाठ सुरू झाल्यानंतर ४८ तासांनी–पाठाचे स्वर चालू असतानाच–भय्यासाहेबाचा आत्मा त्याचा सुकुमार देह सोडून चालता झाला !! हरहर...काय तो दारुण प्रसंग !! प्रत्यक्ष पोटच्या पोरापेक्षा लाडका असा तो आमचा नातू आमच्या घरी येऊन स्वर्गवासी व्हावा, याहून भयंकर दैवदुर्विलास तो कोणता ? सांगलीहून निघण्याच्या दिवशी आयत्या वेळीं तो 'मी जात नाही' असे म्हणाला होता म्हणे; पण राजेसाहेबांनी त्याची समजूत घातल्यावर तो जायला तयार झाला होता ! मध्यंतरी कमळाबाईचाही निरोप आला होता की तो कंटाळला असेल तर त्याला सांगलीस परत पाठवून द्यावे. परंतु तो राजीखुशीने माझ्याजवळ राहिला होता ! पण देवाच्या मनात हे असे होते !!

मुलगा गेल्यानंतर तिसरे दिवशी राजेसाहेब व कमळाबाई सांगलीस परत गेले. त्यांनी खरोखरच आपले दुःख किती संयमाने गिळले ! ती दोघे उलट आमचे सांत्वन करीत होती ! मग त्यांच्याबरोबर मी, माणिक व तिचा मुलगा बाबा, व राजकन्या चंद्रावतीदेवी यांजसह सांगलीस गेले, ती दिवाळीपर्यंत राहिले. इंदुराजाचा दिवाळसण सांगलीस थाटाने व्हायचा होता, पण त्या मनःस्थितीत कसला आला आहे सण ! दरवर्षी भाऊबीजेस तिघा भावांना एकसारखे पोषाख करून बसवीत व त्यांना वहिणी प्रेमाने ओवाळीत ! यंदाची भाऊबीज ही अशी आली ! एवढेच की, देवापुढे कुणाचे अंगारे, कुणाचे पाठ वगैरे काहीएक कामास येत नाहीत, हा अनुभव येऊन, स्वामी, महाराज इत्यादिकांवरचा माझा विश्वास मात्र पार उडाला !

● ● ●

१९२९ च्या जानेवारीत माझ्या ध्यानात आले की पद्मावतीस काही दिवस गेले आहेत. ही तिची पहिलीच खेप होती. तिच्या लग्नाला आठनऊ वर्षे होऊन गेली होती, व तिला मूल व्हावे अशी साहजिकच माझी उत्कट इच्छा होती.

तेव्हा या नवीन घटनेमुळे माझ्या मनाला अत्यंत संतोष झाला, व हे नातवंड एकदाचे केव्हा दिसेल अशी मला तीव्र इच्छा उत्पन्न झाली. पद्मावतीची तऱ्हतऱ्हेची डोहाळजेवणे करण्यात माझे मन रमू लागले. तिचा प्रसूतिसमय जुलैच्या सुमारास येणार होता, म्हणून ह्या वर्षी आम्ही उन्हाळ्यात चिखलदरा या थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचे ठरविले. तेथे 'फोर्ट व्ह्यू' हा मिशनऱ्यांचा बंगला आम्ही तीनचार वर्षांपूर्वी विकत घेतला होता. जूनच्या पहिल्या आठवड्यातच मी पद्मावतीस चिखलदऱ्याहून उमरावतीस घेऊन गेले.

१७ जुलै १९२९ रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी पद्मावती प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झाले. भूल देऊन तिचे बाळंतपण करावे लागले, पण ते सुखरूपपणाने झाले. तिला आई नसल्यामुळे माझ्या स्वतःच्या मुलीपेक्षाही मला तिची अधिक जबाबदारी वाटत होती. मुलगा आठ पौंड वजनाचा होता. एकदा बालकमुख सुखरूप दृष्टीस पडल्यावर सर्व चिंता दूर होऊन मला अत्यानंद झाला. जोशांचा वंश चालविणारा हा आमचा पहिलाच नातू होता. त्यामुळे घरात जिकडे-तिकडे नवचैतन्य व आनंदीआनंद पसरला. मुलाचे बारसे आनंदात झाले. ताई, कमळाबाई व शांताबाई बारशास मुद्दाम आल्या होत्या. प्रत्येकीने आपल्या भाचास हौसेने बाळंतविडे केले. यावेळी माझ्या चौघी मुली एकत्र उमरावतीस फार वर्षांनी अशा जमल्या होत्या. हा नातू आषाढी एकादशीस जन्मला, आणि पुत्रप्राप्तीसाठी मी पद्मावतीकडून गोकुळाची पूजा करवून घेतली होती, म्हणून त्याचे नांव 'श्रीकृष्ण' व टोपणनाव 'भाऊसाहेब' ठेवले.

१९२८ साली सरकारने 'संमती वय कमिटी' (Age of consent committee) नेमली व या कमिटीचे अध्यक्ष म्हणून अण्णासाहेबांची नियुक्ती केली. हिंदुस्थानातील ठिकठिकाणची मोठी मंडळी या कमिटीत होती. त्यांत मद्रासचे प्रसिद्ध ॲड्व्होकेट श्री. रामस्वामी मुदलियार हे होते. हे गृहस्थ फार हुशार असून ते पुढे फार मोठ्या पदास चढतील, अशी अण्णासाहेबांनी त्याच वेळीं खूणगाठ बांधून ठेविली होती, व त्याप्रमाणे पुढे झालेही. हा मान मिळाल्याबद्दल अनेक लोकांनी अण्णासाहेबांचे अभिनंदन केले व म्हटले की, "तुम्ही तुमच्या मुलींना उत्तम शिक्षण देऊन त्यांची विवाहमर्यादा वाढविण्याचे जे धैर्य दाखविले त्याचे हे फळ आहे."

या कमिटीचा सेक्रेटरी नेमण्याचे काम सरकारने अण्णासाहेबांवरच सोपविले होते. त्यासाठी त्यांनी श्री. सगणे या प्रॉव्हिन्शियल सर्व्हिसमधील एका ब्राह्मणेतर अधिकाऱ्याची निवड केली. अण्णासाहेबांनी आपल्या ब्यारिस्टर मुलाला (आबासाहेबाला) या जागेवर नेमून घ्यावा असे त्यांना अनेक मित्रांनी सुचवून पाहिले. परंतु या बाबतीत त्यांची मते ठाम होती. "माझ्या वशिल्याने माझ्या मुलाला मी नेमणे योग्य झाले नसते. सदसद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून सरकारी नोकरीत

आधीच असलेल्या अधिकाऱ्याला ही संधी देणे रास्त होते, ते मी केले " असे ते म्हणाले.

या कमिटीच्या कामासाठी अण्णासाहेबांना सबंध हिंदुस्थानभर हिंडावे लागले. ठिकठिकाणी भाषणे करून त्यांना कमिटीचे काम लोकांना समजावून सांगावे लागे. प्रत्येक प्रांतात ह्या कमिटीचे फार स्वागत होऊन अण्णासाहेबांबद्दल लोकांनी विशेष आदर दाखविला. त्याबद्दल त्यांनी आम्हांला एवढेच सांगितले की, " या दौऱ्यात मला खूपच नवे अनुभव व लोकांतील वेगवेगळ्या चांगल्यावाईट रीती पाहण्यास मिळाल्या." त्यांनी बरोबर पुण्याचे श्री. हरिभाऊ गोळे म्हणून एक प्रायव्हेट सेक्रेटरी नेले होते. त्यांनी आम्हांला अण्णासाहेबांच्या झालेल्या मोठ्या आदर-सत्कारांच्या व भाषणांच्या खूप गोष्टी सांगितल्या, त्यांपैकी एक सांगते. मद्रासमध्ये झालेल्या एका सभेत भाषणानंतर त्यांनी श्रोत्यांना 'कुणाला काही प्रश्न विचारायचे असल्यास विचारावे' म्हणून म्हटले. अनेकांनी प्रश्न विचारले व त्यांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. एका सुशिक्षित वड्या गृहस्थाने विचारले, " आठव्या वर्षानंतर मुलीचे लग्न केले तर तिचा बाप रौरव नरकात जातो असे आमचे धर्मशास्त्र सांगते. तुम्ही आता कायदे करून आमचा धर्म मोडणार व आम्हांला नरकात लोटणार, हेच ना ?" यावर अण्णासाहेबांनी उत्तर दिले, " याला सोपा उपाय आहे ! तुम्हांला रौरव नरकात जायला नको आहे ना ? मग तुमच्या इच्छेप्रमाणे मुलीचे लग्न करा, आणि त्याबद्दल कायदा शिक्षा देईल ती भोगा, म्हणजे झाले !" यावर सभेत मोठा हशा पिकला, व नंतर कोणी प्रश्न विचारले नाहीत.

वरील कमिटीच्या दौऱ्यात अण्णासाहेबांनी माणिक व तिचा मुलगा बाबा यांना दिल्ली, पेशावर, सिंध वगैरे ठिकाणी बरोबर नेले. (त्यांचा खर्च त्यांनी स्वतः केला.) माणिकचे मन अद्यापि कोणत्याच गोष्टीत लागत नव्हते. तिने विरंगुळा म्हणून काही तरी सामाजिक कार्य हाती घ्यावे अशी आमची फार इच्छा होती. तिचा मुलगा बाबा आता सात वर्षांचा झाला होता. त्याला आम्ही कॉन्व्हेंटमध्ये शिकायला घातले होते. तो फारच बुद्धिवान असून त्याला वाचनाचा भारी नाद होता. शिवाय ड्रॉइंग, पेंटिंग, मेक्यानो वगैरेंची त्याला फार आवड होती. प्रवासही त्याला फार आवडे. मुख्यतः त्याच्याच आग्रहास्तव माणिक अण्णासाहेबांबरोबर महिना दीड महिना दौऱ्यावर जाण्यास तयार झाली. त्याचा त्या दोघांनाही फार फायदा झाला. पण मध्यंतरी फेब्रुवारी १९२९ मध्ये मला पुन्हा जोराचा हृदयाचा झटका आल्यामुळे माणिकला मुलासह मध्येच उमरावतीस परतावे लागले.

१९३० साली लंडन येथे गोलमेज परिषद (Round Table Conference) भरणार होती, त्यासाठी सरकारतर्फे राजेसाहेबांसही आमंत्रण आले. तेव्हा ते, कमळाबाई, राजकन्या उषादेवी व शकुंतलाराजे, यांनी विलायतेस जावे असे ठरले. त्यावेळी माणिकच्या मनात आले की, त्यांच्या सोबतीने आपणही बाबास

घेऊन विलायतेस जावे. तिकडे चांगल्यापैकी शाळा ( Public Schools ) आहेत, त्यांची प्रत्यक्ष माहिती मिळवून, पसंत झाल्यास बाबाला तिकडेच शाळेत घालावा, असे तिने योजिले होते. तिला स्वतःला आय्. सी. एस्. फ्यामिली पेन्शन फंडातून दरमहा रु. ४०० व बाबाला अकरा वर्षे होईपर्यंत अंदाजे १५० रु. व त्यानंतर एकवीस वर्षांचा होईपर्यंत दरमहा रु. २०० मिळावे, अशी सरकारी नियमानुसार व्यवस्था केली गेली होती. तेव्हा ती आपला खर्च कोणावर पडू देत नसे. विलायतेस जाण्यायेण्याचा व इतर खर्च तिचा व बाबाचा ती स्वतः करणार होती. मला स्वतःला वाटे की, बाबाला इतक्या लहान वयात तिकडे शाळेत ठेवणे बरे नव्हे, कारण त्यामुळे तो आपल्या मातृभूमीला विसरेल! पण कधी नव्हे ते माणिकच्या मनात बाहेर जाण्याचे आले होते, म्हणून मी त्यात काहीएक मोडता घातला नाही. उलट त्यामुळे तरी तिच्या मनाला विरंगुळा मिळेल व तिला चांगला थारेपालट होईल, या विचाराने आम्ही तिला जाण्याचा आग्रहच केला.

राजेसाहेबांची विलायतेस जाण्याची वेळ जवळ आली म्हणून जुलै (१९३०) अखेर आम्ही सर्व मंडळी सांगलीस गेलो. आपल्या गैरहजेरीत अण्णासाहेबांनी ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून सांगलीचा राज्यकारभार पहावा अशी राजेसाहेबांची इच्छा होती. त्याप्रमाणे त्यांनी अण्णासाहेबांना विनंती केली व "मी ते काम विनावेतन करीन" या अटीवर अण्णासाहेबांनी ती मान्य केली. त्यांनी राजेसाहेबांच्याच बंगल्यात राहावे व त्यांच्या खाण्यापिण्याचा व वाहनांचा खर्च संस्थानाकडून व्हावा असे ठरले. म्हणूनच मी या काळात सांगलीस राहायचे नाही असे ठरविले. लेकीच्या घरी जास्त दिवस राहणे मी पहिल्यापासून टाळीत आले होते.

सांगलीच्या प्रजाजनांनी राजेसाहेब संस्थान सोडून काही महिने विलायतेस जाणार म्हणून त्यांना फार प्रेमाचा व आदरपूर्वक निरोप दिला! राजेसाहेब विलायतेस जाण्यास निघाले त्यावेळी त्यांना स्टेशनवर पोचविण्यास त्यांचे हजारो प्रजाजन जमले होते. त्यापूर्वी अनेक ठिकाणी नागरिकांतर्फे निरोपाचे समारंभ झाले. राजेसाहेबांबद्दलचे प्रजेचे ते अलोट प्रेम पाहून आम्हांला आनंदाचे भरते आले.

ती सर्व मंडळी गेल्यावर मी पंधरावीस दिवस सांगलीस राहिले. त्यावेळी मी मुंबईस गेले तर बोटीवर त्या मंडळींना निरोप देण्यास जाणे मला असह्य होईल असा मी विचार केला. शिवाय सांगलीस राहण्याचे दुसरे कारण असे होते की, युवराज रावसाहेब व प्रतापसिंह सुट्टीसाठी सांगलीस येणार होते. त्या दोघांनाही डेहराडून येथील मिलिटरी कॉलेजात घातले होते. हेतू हा की, त्यांना उत्तम शिस्त लागावी व चार लोकांत खेळीमेळीने व साधेपणाने वागता यावे. त्यांचाही सहवास घडेल म्हणून मी सांगलीस काही दिवस राहण्याचे ठरविले. हे दोघे मुलगे आता अनुक्रमे १५ व १३ वर्षांचे झाले होते. अभ्यासात त्यांची प्रगती चांगली होती.

राजेलोकांची मुले विद्या करीत नाहीत, छांदिष्ट निघतात, असा साधारण अनुभव असल्यामुळे कमळाबाईने त्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत जातीने लक्ष घालून त्यांना चांगल्या सवयी लाविल्या होत्या. त्यामुळे ती मुले सरळ स्वभावाची व सद्‌गुणी झाली होती. मी व अण्णासाहेबही त्यांना मधूनमधून उपदेश करीत असू. तीही आमच्यावर मनापासून प्रेम करीत. पण ते काही स्वार्थसाधू व विघ्नसंतोषी लोकांना पाहवत नसे. राजदरबारी अशी माणसे असतातच. आम्ही या बाबतीत फार खोलात जात नसू. पण माझ्या मनात येऊन जाई की, पोलिटिकल एजंटाच्या अनेक अंतस्थ कारवायांपैकी तर हा प्रकार नाही ?

मला यावेळी विशेष काळजी वाटण्याजोगी एक गोष्ट माझ्या दृष्टोत्पत्तीस आली. या दोघा राजकुमारांना जेव्हा डेहराडूनच्या मिलिटरी कॉलेजात ठेवले तेव्हा त्यांच्यासाठी कोल्हटकर म्हणून एक खाजगी ट्यूटर ( शिक्षक ) राजेसाहेबांनी नेमले होते. रावसाहेबाचा स्वभाव खोल व हळवा होता, तर प्रतापसिंहाचा मनमोकळा व दुसऱ्यावर छाप बसविणारा होता. त्यामुळे शाळेत प्रतापसिंहाची छाप अधिक पडे. हे रावसाहेब मनाला फार लावून घेई. माझ्याजवळ तो सर्व मनमोकळेपणाने सांगे. मी त्याची हरतऱ्हेने समजूत घाली, पण त्याला ते फारसे पटत असल्याचे दिसत नसे. रावसाहेब कित्येक वेळा प्रतापसिंहावर रागावत असे. अशा वेळी हे कोल्हटकर त्याला वेदांतपर गोष्टी सांगत. ते स्वतः थिऑसफिस्ट होते. रावसाहेब रागावला की ते त्याला म्हणत, " येईल त्या परिस्थितीत शांतपणा व सहनशीलता धारण करावी. राग आला तर तो मनात ठेवावा व तो फारच असह्य वाटला तर आपल्या मनातले एका वहीत लिहून ठेवावे. " आता हा असला वेदांतपर उपदेश मोठ्या माणसांना ठीक असेल, पण लहान मुले एकमेकांत भांडली तर तो त्यांना सांगण्याचा नव्हे. त्यांची भांडणे खेळीमेळीने सोडवून त्यांची एकमेकांबद्दल तेढ वाढू देऊ नये. पण कोल्हटकरांच्या या चमत्कारिक धोरणामुळे रावसाहेबाच्या मनावर विपरीत परिणाम होऊ लागला, आणि तो मनातल्या मनात कुढू लागला व नसत्या गोष्टींबद्दल विनाकारण त्रास करून घेऊ लागला ! प्रतापसिंह मोकळ्या व घळमळीत स्वभावाचा असल्यामुळे त्याच्यावर अशा तऱ्हेचा काहीच परिणाम होत नसे.

हे सर्व ऐकून मला रावसाहेबाबद्दल फार चुटपुट लागली. स्वतःचे रागाचे विचार वहीत टिपून ठेवण्याचा त्याचा हा प्रकार मला पटत नसे. राजघराण्यातून भावाभावांत, आईबापांत, बापलेकांत, वाकडे आणण्यास असले हे लेखन पुढेमागे कारणीभूत होणार व त्यापासून अनेक संकटे उद्‌भवणे शक्य आहे, अशी माझ्या मनाला भीति वाटे ! पण काय ईश्वराची इच्छा असेल तसे होईल, असा विवेक करून मी स्वस्थ राही. यापेक्षा माझ्या हातांत दुसरे काय होते ? असो. याप्रमाणे पंधरावीस दिवस सांगलीस राहून आम्ही सर्वजण उमरावतीस परत गेलो.

आम्ही उमरावतीस गेल्यावर थोड्याच दिवसांत आमच्या बाळासाहेबावर एक

संकट ओढवले. नित्याप्रमाणे सकाळी तो घोड्यावर बाहेर फिरायला गेला असता त्याने घोडा भरधाव सोडला, व त्यात घोड्यास एकाएकी ठेच लागून तो पडला व बाळासाहेब घोड्यावरून एकदम खाली डोक्यावर आदळून बेशुद्ध झाला. त्यावेळीं तिकडून एक मोटार ' बस ' येत होती, त्यातील सर्व माणसांनी ते पाहिले. पण ' बस '-मधील लोक म्हणू लागले, " बस थांबवू नका. पुढे पंचनामा वगैरे भानगड आमच्या मागे लागेल. हा मनुष्य संपलेलाच दिसत आहे. " त्यावर बस ड्रायव्हर मुसलमान असूनही म्हणाला, " तुमचे मी नाही ऐकणार. हा कोण साहेब पडला आहे त्याला अर्विन हॉस्पिटलमध्ये मी नेऊन पोहोचवीन. " घोडा उभाच होता, पण बाळासाहेबाला तिथे कोणीच ओळखले नव्हते. बस ड्रायव्हरने त्याला उचलून बसमध्ये घालून हॉस्पिटलमध्ये पोहोचविले. तिथे दोनतीन मिनिटे अर्धवट शुद्धीत येऊन तो " डॉ. दामले कुठे आहेत ? त्यांना बोलवा " इतकेच म्हणाला. त्यावरून डॉ. दामले ( त्याचे मित्र ) यांना बोलाविले गेले व त्यांनी येऊन मग आम्हांला त्या अपघाताबद्दलचा निरोप धाडिला ! तोपर्यंत आम्हांला त्याबद्दल काहीच कल्पना नव्हती ! मग बाळासाहेबाला घरी आणला. त्याच्या डोक्यावर साहेबाची ' सन् हॅट ' टोपी होती, त्यामुळे डोक्याच्या माराचा जोर कमी झाला. टोपीचा अगदी चुराडा झाला होता. अंगावर बरेच खरचटले होते व मेंदूसही धक्का लागून तो तीन दिवस बेशुद्ध व अत्यवस्थ स्थितीत होता ! मग हळूहळू शुद्धीवर आला. लहानपणापासून अशी अनेक संकटे त्याचेवर अचानक येत. एक वर्षाचा असताना दिव्यावर पडून त्याला डोळ्याजवळ खूप मोठी खोक पडली. तीन वर्षांचा असताना आमच्या बंगल्यावर वीज पडली तिथे तो जवळच होता, त्यावेळीं त्याला जोराचा धक्का ( shock ) बसला. पाचसहा मोठमोठे आजारही झाले. म्हणून मी आता त्याची पत्रिका करविली. ज्योतिष्यांनी सांगितले की, " याच्यावर अशी अनेक संकटे येत राहतील. पण तुम्ही जिवंत असेपर्यंत याच्या जीवास धक्का पोहोचू शकणार नाही...याला सैन्यात जाण्याची प्रबळ इच्छा राहील व ती पूर्ण न झाल्यास हा संसारात अंमळ विरक्तवृत्तीने राहील. हा मुलगा तुम्हांला फार सुख देईल. " बाळासाहेब माझ्याबद्दल विशेषच आस्था व प्रेम दाखवीत असे हे खरेच !

इकडे सांगलीत अण्णासाहेब आपल्या कामांत पूर्ण गढून गेले होते. ब्रिटिश मुलखात काम करणे, व संस्थानच्या वातावरणात–व तेही निढावलेल्या पोलिटिकल एजंटच्या तंत्राने–काम करणे, यात महदंतर होते. त्यावेळीं ब्रिटिश मुलखात ठिकठिकाणी इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध झेंडावंदन, प्रभातफेऱ्या वगैरे नानातऱ्हेची निदर्शने चालू होती. पण संस्थानांतून ती न होऊ देण्याबद्दल पोलिटिकल एजंट संस्थानिकांवर फार दडपण आणीत. त्यामुळे बिचाऱ्या राजेलोकांची स्थिती मात्र अनुकंपनीय होत होती. एकीकडून यांची पोलिटिकल एजंटने मुस्कटदाबी करावी, आणि दुसरीकडून प्रजेने त्यांच्यावर नाराज व्हावे, अशा कात्रीत ते सापडले होते.

अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ दि ............


महाराष्ट्रात तर पुण्याच्या खालोखाल सांगलीची बुद्धिमत्ता व उपद्व्यापीपणा यांबाबत प्रसिद्धी होती. त्यामुळे पुण्यात इंग्रजांविरुद्ध जी जी निदर्शने होत, ती ती सांगलीत व्हायचीच ! पण अण्णासाहेब तिथे असल्यामुळे या निदर्शनांबाबत पोलिटिकल एजंटच्या दमदाटीच्या कारवाया चालेनात. अण्णासाहेब त्यांना सरळ विचारीत, "अगदी शेजारच्या ब्रिटिश हद्दीत तुम्ही या निदर्शकांना आळा घालू शकता का ? मग आम्हांला बोलण्यात काय अर्थ आहे ?" अण्णासाहेबांपुढे फुकटची दमदाटी चालायची नाही, कारण ते वरपर्यंत जाऊन त्याचा जाब विचारतील, हे पोलिटिकल एजंट जाणून होता. त्यामुळे तो मनातल्या मनात अण्णासाहेबांवर चडफडत असे. पुढे त्याने वड्याचे तेल वांग्यावर म्हणतात तसा तो राग राजेसाहेबांवर काढलाच !

वरील सर्व कामांतून आठ दिवस सवड काढून अण्णासाहेब बियास (पंजाब) येथे जाऊन तेथील महान संत सद्गुरू सावनसिंगमहाराज यांचा गुरूपदेश घेऊन आले. तिकडे त्याला 'नाम घेणे' म्हणतात. यापूर्वी उमरावतीस असताना ते बियासला जाऊन तेथे एकदीड महिना राहून या गुरूंजवळ आपल्या परमार्थविषयक शंकांचे निरसन करून आले होते. ते ज्या तऱ्हेच्या गुरूच्या शोधात होते, त्या तऱ्हेचे हे गुरू असल्याची त्यांची खात्री पटली होती. मुख्य म्हणजे हे गुरू कोणत्याही प्रकारचा बाह्य देखावा करीत नसत. ते साध्या शीख माणसासारखा पोषाख करीत. कोणालाही स्वतःच्या पाया पडू देत नसत. आपल्या फोटोचीही पूजा करू देत नसत. मग गुरूपूजा, दक्षिणा वगैरे घेणे दूरच ! नामस्मरण व नादानुसंधान ही त्यांची शिकवण होती. त्यांचा मुख्य भर सद्वर्तनावर असे. दासबोधाच्या जुन्या आवृत्तीमध्ये श्री रामदास स्वामींनी आपला शिष्य कल्याण यास जो अनुभव दिला व पारमार्थिक प्रगतीची साधने दाखविली (जी 'सोलीव सुख' या श्लोकांतून वर्णन केलेली आहेत) तशाच प्रकारचा या गुरूंचा उपदेश असे. याला पंजाबमध्ये 'संतमार्ग' किंवा राधास्वामीपंथ म्हणतात. सद्गुरूंच्या दैनिक प्रवचनांना 'सत्संग' म्हणतात. हा उपदेश घेण्यापूर्वी मांसाहार व मद्यपान न करण्याचे मान्य करावे लागते व पुरुषाने एकपत्नीव्रत व स्त्रियांनी पातिव्रत्य पूर्णपणे पाळायचे असते. असो. अण्णासाहेबांनी या गुरूंचा उपदेश घेतल्यावर, आमच्या कुटुंबीयांपैकी बरेच जणांनी त्यांचा उपदेश घेतला.

१९३१ साली गोलमेजपरिषदेचे काम संपल्यावर विलायतेस गेलेली सांगलीची सर्व मंडळी हिंदुस्थानात परत आली. आम्ही त्यांना उतरवून घेण्यासाठी मुंबईस गेलो होतो. ज्या तऱ्हेच्या पोषाखात ही मंडळी मागे बोटीत बसली होती, त्याच पोषाखात ती पुन्हा मुंबई बंदरात उतरली ! याचे आम्हांला कौतुक वाटले. माणिकने मुलाला विलायतेत न ठेवता परत आणले याचाही मला फार आनंद झाला. माझ्या अंतर्यामीची इच्छा होती तसेच घडले. मुलाला इतक्या लहानपणी

तिकडे ठेवल्याने हिंदुस्थानातील काही त्याच्या मनास येणार नाही, तेव्हा त्याला तेथे ठेवू नये असा तेथील अनेक लोकांनी माणिकला सल्ला दिला. शिवाय इथे माणिकचे मन गुंतवायला त्याच्याशिवाय दुसरे काहीच नव्हते, म्हणून तो मला इथेच राहायला हवा होता. तिला यापूर्वी प्लांचेटच्या साहाय्याने परलोकातील मृतात्म्यांच्या अस्तित्वासंबंधी काही दाखले मिळाले होते. या परलोकविद्येसंबंधी प्रयोग करणारी काही चांगली माणसे इंग्लंडमध्ये आहेत असे तिला समजले होते. त्यांजकडे जाऊन आपल्याला आलेल्या दाखल्यांची सत्यता पडताळून पाहण्याची तिची उत्कट इच्छा होती. तशी मंडळी तिला तिथे भेटली व त्यांतील संदेशवाहकां-( mediums ) कडून तिला असा प्रत्यय आला की, मृत्यूनंतर मृतात्मा आपल्या प्रिय माणसांशी संबंध ठेवतो, त्यांच्यावर प्रेम करतो व त्याची आपली ताटातूट होत नाही. यामुळे तिच्या मनाला फार शांती मिळाली. असो. यानंतर एक दोन दिवस मुंबईस राहून आम्ही उमरावतीस आलो व सांगलीकर मंडळी व अण्णासाहेब सांगलीस गेले.

सांगलीस पोहोचल्यावर अण्णासाहेबांनी राजेसाहेबांकडे राज्याची अधिकार-सूत्रे परत सोपविली. राजेसाहेबांनी त्यांना आठदहा दिवस आग्रहाने सांगलीस ठेवून घेतले व त्यांच्या सन्मानार्थ एक गार्डनपार्टी देऊन त्यांचा गौरव केला. सांगलीच्या प्रजाजनांनीही तसेच निरोपसमारंभ करून त्यांच्याबद्दलचा आपला आदर व्यक्त केला. याच वेळी अण्णासाहेबांनी राजेसाहेबांना खाजगी सूचना देऊन ठेविली की, यापुढे राजेलोकांना इंग्रजांकडून व प्रजेकडून फार त्रास होणार, तरी तुम्ही आता-पासून आपल्या मित्रराजेमंडळींना याबद्दल इषारा देऊन जागृत करा व काही अधिक संकटे येण्यापूर्वीच यातून सुटकेचा शीघ्र मार्ग काढून घ्या. राजेसाहेबांना ते विचार पटले, परंतु त्यांच्या इतर मित्रमंडळींचे त्यांना सहकार्य न मिळाल्याने ते विचार त्यावेळीं तितकेच राहिले. ते काम त्याकाळी फार सावधपणाने व वाच्यता न होईल अशा तऱ्हेने करावे लागत असे. याप्रमाणे अण्णासाहेब आपले सांगलीतील काम आटोपून आपल्या आवडत्या निवासस्थानी उमरावतीस परत आले.

इ. स. १९३१ च्या सप्टेंबर महिन्यात उमरावतीस वनितासमाजातर्फे विदर्भ महिला परिषद भरविण्यात आली. याच वेळीं अखिल भारतीय महिला परिषदेची शाखा उमरावतीस स्थापन होऊन त्यात विदर्भातर्फे ठराव पाठविले गेले. माणिकने या कामी फार परिश्रम घेतले. पण अण्णासाहेबांप्रमाणे तिने स्वत: सूत्रधाराप्रमाणे मागे राहून दुसऱ्यांकडून कामे करवून घेतली. परिषदेसाठी वर्गणी गोळा करण्याचे कठीण काम तिने फार यशस्वीपणे केले. अण्णासाहेबांबद्दल जनतेत आदर व प्रेम असल्या-मुळे तिचे काम सुकर झाल्याचे तिला दिसून आले. या परिषदेची मी स्वागताध्यक्ष म्हणून निवडली गेले. अध्यक्ष म्हणून पुण्याच्या डॉ. कमलाबाई देशपांडे यांची

योजना झाली होती. परिषदेत सरकारच्या निषेधपर ठराव मांडण्याचा एका पक्षाने आग्रह धरला व त्यामुळे काही काळ सभामंडपात गोंधळ माजला. पण अध्यक्षांच्या समयोचित व चातुर्यपूर्ण वागणुकीने लवकरच शांतता प्रस्थापित झाली. या निमित्ताने माणिकला सार्वजनिक कामाचा नवीन अनुभव मिळाला व तिचे मन दुसरीकडे लागण्यास संधी मिळाली, याचे माझ्या मनाला समाधान वाटले.

या वर्षी दिवाळीत माणिक, तिचा बाबा व मी ग्वाल्हेरला गेलो. ताईचे लग्न झाल्यापासून माझे तिच्याकडे जाणे झालेच नव्हते, म्हणून माझ्यावर ती थोडी रागावली होती. शिवाय जनरलसाहेबांनी पण विशेष आग्रहाचे आमंत्रण दिले होते. म्हणून यावर्षी तिकडे जाण्याचे ठरविले. ग्वाल्हेरला ताई व जनरलसाहेबांनी आमचे खूप अगत्य केले. त्यांचा ग्वाल्हेरचा नऊचौकी वाडा गावातच होता. पण आत गेले की आपण एखाद्या विस्तीर्ण राजमहालात आहो, असे वाटण्याइतकी भव्य व कलात्मक सजावट सर्वत्र केली होती. “ ही सर्व सुधारणा ताईने करविली ” असे मला जनरलसाहेबांनी मोठ्या कौतुकाने सांगितले. तेव्हा मी त्यांना म्हटले, “आपण तिला हे सर्व करण्यास उत्तेजन दिले, म्हणून तिला करता आले.” त्यांनाही उत्तम गोष्टींची फार आवड होती. मी आतापर्यंत ताईच्या सर्व व्यवस्थेबद्दल कानांनी ऐकले होते, पण आता ते समक्ष पाहिल्याने मला विशेष आनंद झाला.

जनरलसाहेबांचे घरातील वागणे धळमळीत होते. त्यामुळे त्यांची मुले त्यांच्याशी मोकळेपणाने वागत असत, पण धाकातही असत. ताई एवढी विलायतेत शिकलेली, पण मी पाहिले तीही अगदी त्यांच्या तंत्राने चाले. जनरलसाहेबांचा रुबाब व वळण तसेच काही विशेष होते. रोज जेवणाच्या वेळी आठदहा पाहुणे मंडळी पंगतीस असल्याशिवाय त्यांना बरे वाटत नसे. त्यांना स्वतःला स्वयंपाकातील पदार्थ उत्तम करता येत असत. कित्येकदा ते रस्से, पुलाव वगैरे पदार्थ स्वतः करीत व ते अत्यंत चवदार व्हायचे. मग जेवताना जो आग्रह व थट्टामस्करी चाले त्याची मौज काही विचारूच नका !

आमच्या ग्वाल्हेरच्या ह्या मुक्कामात एक दिवस—ग्वाल्हेरच्या महाराजांचा वाढदिवस होता, का दिवाळीनिमित्त, हे मला नीट आठवत नाही–महाराजांच्या सलामीसाठी पाच हजार सैन्य, पायदळ, घोडेस्वार वगैरे तेथील एका भव्य विस्तीर्ण मैदानावर जमले होते. तो समारंभ पाहण्यास जनरलसाहेबांनी आम्हांस नेले. महाराजांसाठी भले मोठे व्यासपीठ ( platform ) तयार केलेले असून ते उत्तम शृंगारले होते. आजूबाजूला छताखाली सरदार, दरकदार वगैरे मानकरी मंडळींस व्यवस्थेने बसविले होते. स्त्रियांसाठी चिकाच्या पडद्यांचा शामियाना होता, त्यातच आम्ही बसलो होतो. महाराजांच्या समोर दूरवर मैदानात चार पांढरे शुभ्र घोडे दिसत होते, त्यांत पुढल्या घोड्यावर जनरलसाहेब, त्यांच्या मागील घोड्यांवर त्यांचे तीन ए. डी. सी. व त्यांच्या मागे पाच घोडेस्वार, पूर्ण सैनिकी पोषाखात होते.

नंतर वरील सर्व मंडळी घोड्यावरून दौडत, मोठ्या शिस्तीत महाराजांसमोर येऊन सलामी देऊन गेली. या ग्वाल्हेरच्या सैन्याची शिस्त मोठमोठे ब्रिटिश जनरलसुद्धा वाखाणीत म्हणे! सलामीचा शेवट तोफांच्या ठराविक आवाजांनी झाला.

या सलामीनंतर राजवाड्यातील भव्य दरबार आम्हांस पाहण्यास मिळाला. मोगलांच्या वेळेच्या दरबाराप्रमाणे तेथील सर्व थाट होता. दरबार हॉल भला मोठा व सोनेरी रंगाचा आहे. त्यात प्रचंड झुंबरे हिऱ्यामाणकांप्रमाणे चमकत होती. सर्व दरबार बैठकीच्या गाद्यांवर होता. महाराज मध्यभागी किनखापाच्या आवरणाच्या सिंहासनावर बसले होते, व सर्व मानकरी मंडळी त्यांच्या ठराविक क्रमाने, महाराजांवरून ठराविक मोहरा उतरून टाकून, मुजरे करून परत जात. तो दरबार खरोखरी पेशवाईतील दरबारासारखा भासत होता!

मी दिवाळीचे म्हणून रीतीचे अहेर उमरावतीहून हौसेने करून नेले होते. परंतु जनरलसाहेबांनी आम्ही प्रथमच ग्वाल्हेरला गेलो होतो म्हणून व दिवाळीचे म्हणून, फारच मोठे अहेर आम्हांला दिले! मला एक हिऱ्याची टुशी व शालू, माणिकला भाऊबीजेचे म्हणून उंची जरीचे पातळ व सोन्याच्या पाच मोहरा, आणि बाबाला अचकनसाठी जरीचे किनखापी कापड व सोन्याच्या मोनोग्रामचे बटण, असे मौल्यवान अहेर दिले. मला ते सर्व फार अवघड वाटले!

१९३२ साली राजेसाहेबांना पुन्हा गोलमेज परिषदेच्या काही कामासाठी विलायतेस जावे लागले. यावेळी राजेसाहेबांनी कमळाबाईस ॲडमिनिस्ट्रेटर नेमून राज्यकारभाराची सूत्रे तिच्या हाती दिली होती. तिने हे काम पहावे असे मागील गोलमेज परिषदेच्या वेळीच अण्णासाहेबांच्या मनात होते. पण तिने विलायत पाहिली नव्हती म्हणून राजेसाहेबांच्या आग्रहावरून ते काम स्वतः पाहण्याचे त्यांनी पत्करले होते. त्यांनी सांगलीत पुष्कळ सुधारणा करून कामाची घडी बसवून दिली होती, त्यामुळे कमळाबाईचे काम फार सुलभ झाले. राजेसाहेब परत येईपर्यंत कमळाबाईने राजशकट फार उत्तम चालविला व सर्वांकडून वाखाणणी मिळविली. यावेळी काही विघ्नसंतोषी लोकांनी असेही उठविले की, "अण्णासाहेबांची मागील कारकीर्द पोलिटिकल एजंटला सहन झाली नाही, म्हणून त्याच्या धाकाने राजेसाहेबांनी त्यांना यावेळी बोलावले नाही." पण तसे काही नव्हते. "ज्याने त्याने आपआपली जबाबदारी उचलावी हे रास्त. लागेल तेव्हा मी सल्ला देण्यास आहेच" असे अण्णासाहेबांनी आधीच राजेसाहेबांना सांगितले होते.

१९३२ च्या मे महिन्यात महाबळेश्वरी बाबा (माणिकचा मुलगा) याची मुंज करण्याचे ठरले. माझ्या मनात ती उमरावतीस मोठ्या प्रमाणावर करायची होती. मला वाटे, ह्या मुलाची बाजू लंगडी झालेली आहे, त्याच्या सुखहौशीत काही कमी होऊ नये. पण माणिक त्यास मुळीच कबूल होईना! ती म्हणे "मुंज मुख्यतः मुलाच्या आणि त्याच्या आईच्या हौशीसाठी करायची असते. मुंज्या

मुलाला त्यांतले काही समजत नाही आणि मला तर आता कसलीच हौस उरली नाही." पण बाबा जेव्हा तिला म्हणू लागला की, "माझ्या मुंजीत मांडव हवा, बँड हवा-मला ते सर्व आवडते." तेव्हा ती तेवढ्याला कशीबशी तयार झाली. मुंज थोडक्यात करायची म्हटली तरी पुण्याची कानिटकर मंडळी, ग्वाल्हेरहून रावसाहेब राजवाडे व इंदुराजा, सांगलीच्या राजघराण्यातील मंडळी, शांताबाई देसाई व तिची मुले, रामराव देशमुख व त्यांची मोठी मुलगी, अशी ५०-६० मंडळी जमली. आबासाहेब व पद्मावती यांनी देवदेवक बसविले. बाबाला सर्वांनी रीतसर अहेर केले. प्रयोजनाच्या दिवशी ७००-८०० पान झाले व गोरगरिबांस अन्नदान केले. एकंदरीत नाही म्हटले तरी मुंज थाटात झाली.

या सुमारास शांताबाईच्या मुलाची-यशवंतची मुंज विजापूरला मोठ्या प्रमाणावर व्हायची होती; पण त्यापूर्वी आठ दिवस त्याचे आजोबा श्री. पांडुरंगराव देसाई एकाएकी वारले! त्यामुळे ती मुंज पुढे एक दीड महिन्यांनी घरातल्या घरातच अशी केली गेली.

याच वर्षी तारादेवीला दिवस गेल्याचे मला समजले. तसेच इंदुराजालाही दिवस गेले होते. तिचे बाळंतपण जानेवारी १९३३ च्या सुमारास व तारादेवीचे फेब्रुवारी १९३३ च्या सुमारास येत होते. आता मी माझ्या दुसऱ्या नातवंडाची आजी व पहिल्या पणतवंडाची पणजी होणार म्हणून आनंदाने माझ्या जिवाची धांदल उडाली. सप्टेंबर अखेर मी तारादेवीचे व इंदुराजाचे उमरावतीस मोठे डोहाळजेवण केले. त्यासाठी दोनशे पाने राहतील असा मांडव घालून आरास केली होती. मांडवाच्या पूर्वेच्या बाजूला एक उंच ओटा घालून त्यावर केळींच्या गाभ्याच्या मखरांच्या शृंगारलेल्या कमानी घातल्या होत्या. त्या हस्तीदंतासारख्या शुभ्र चमकत होत्या. तेथे मध्यभागी दोघी डोहाळतुल्या व त्यांच्या उजवीकडे कमळाबाई व शांताबाई व डावीकडे माणिक व पद्मावती या सर्वांना एका ओळींत बसविण्याची व्यवस्था केली होती. सर्व माहेरवाशिणींना लुगडी खण दिले.

याच सुमारास माणिकचा बाबा फार आजारी झाला. आधी वाटले ताप इन्फ्लुएंझाचा असावा, नंतर मुदतीच्या तापाचे निदान करण्यात आले. पण एकवीस दिवस झाले तरी ताप हटेना! नंतर डॉक्टरांना असा संशय आला की, मुलाच्या वडिलांच्या पोटात क्षयाच्या गाठी झाल्या होत्या, तसा काही प्रकार असावा. हे ऐकून तर आमच्या सर्वांच्या छातीत धडकीच भरली! माझ्या तर पायांना मुंग्या येऊ लागल्या आणि छातीत धडधड (palpitation) वाढू लागली! बाबाचा घसा इतका दुखू लागला की, त्याला गिळताना फार कष्ट होऊ लागले. मग माणिकने आमचे स्नेही मुंबईचे डॉ. तिरोडकर यांना तार करून बोलावून घेतले. त्यांनी 'हा टॉन्सिलायटीस आहे-दुसरे काहीएक दुखणे नाही' असे सांगून आपली औषधयोजना केली. त्यानंतर बाबाच्या दुखण्याला भराभर उतार पडू लागला.

पण या सर्वांचा असा परिणाम झाला की, एक दिवस मला अकस्मात फार मोठा हृदयाचा झटका आला! तो जानेवारी १९३३ चा सुमार होता. त्या दिवशी माझा भाऊ माधव अभ्यंकर याच्या मुलाची मुंज होती. मी तेथे जाण्यास म्हणून निघाले तो मला एकदम घेरी आली. सुदैवाने माणिक जवळच उभी होती, तिने मला सावरले व तेथेच निजविले. तिला माझी नाडी लागेना! लगेच डॉ. भटांना बोलावून आणले. त्यानंतर आठ दिवस माझी अवस्था फार वाईट होती. त्यावेळेपासून डॉक्टर लोकांनी मला जे बिछान्यावर निजवून ठेवले आहे, ते अद्यापपर्यंत ( १९४३ ). यातून उठण्याचे मला लक्षण दिसत नाही. माझ्या एक एक शक्ती नाहीशा होत चालल्या आहेत.

फेब्रुवारी १९३३ च्या सुमारास डॉक्टरांनी मला घरात थोडे फिरण्याची परवानगी दिली. तेवढ्यात मी तारादेवीचे चांदण्यातले डोहाळजेवण राहिले होते ते करवून घेतले. १२ फेब्रुवारी १९३३ रोजी ती प्रसूत होऊन तिला कन्यारत्न झाले. मुलगी झाली म्हणून ती व तिची आई अंमळ खट्टू झाल्या. पण मी त्यांची समजूत केली की, " पहिली बेटी तूप रोटी ! " नातीचे बारसे मी नातू झाल्यागत हौसेने केले. आमच्या घरच्या आतापर्यंतच्या दाखल्याप्रमाणे नूतन बालकास, अण्णासाहेबांच्या बारशाच्या वेळची कुंची घालून त्यांचे नाव ठेवले होते, तीच शुभ व पवित्र कुंची लेववली. कमळाबाईच्या बारशाच्या वेळी केलेला शकुनाचा घुडीपाळणा शृंगारून, त्यात नातीला घालून तिचे नाव ' चारुलता ' असे ठेवले. पुढे बाळासाहेब व ताई यांनी ते बदलून ' जयकुंवर ' असे केले.

मार्च ( १९३३ ) महिन्यात ताईच्या दोन्ही मुलींची ग्वाल्हेरला लग्ने झाली. मला ताईने आग्रहाने बोलाविले. पण हृदयविकाराने मला अशक्तपणा आल्यामुळे मला जाणे शक्य नव्हते. लग्नात काय काय करायचे असते, ते ताईने मला विचारून तपशीलवार लिहून घेतले. शिवाय तिच्या मदतीला माझी कुशल भावजय येसूवहिनी व सूनबाई पद्मावती व मुलगी शांताबाई ( देसाई ) या पण गेल्या. दोन्ही लग्ने थाटाने पार पडली. बाईराजा श्री. वसंतराव घारपुरे, इन्कमटॅक्स आफिसर यांना, व लिलूराजे श्री. मनोहरपंत भिडे आय्. सी. एस्. यांना दिल्या. सांगलीच्या राजघराण्यातली सर्व मंडळी या लग्नाला ग्वाल्हेरीस गेली होती.

इकडे माझा हृदयविकार कमीज्यास्त चालूच होता. त्यात बियासचे सद्‌गुरु सावनसिंगमहाराज यांचे " मी लवकरच लेडी जोशी यांना ' नाम ' देण्यासाठी उमरावतीस येतो " अशा आशयाचे पत्र आले. त्यांच्याबरोबर सहासात मंडळी येणार होती. त्या सर्वांची सोय लावण्याची आमची धांदल सुरू झाली. माडीवरची अण्णासाहेबांची खोली सद्‌गुरूंसाठी सुसज्ज केली. मला वाटते तो ता. ७ मार्च १९३३ असावा–त्या दिवशी मला व माणिकला सद्‌गुरूंनी पंच नामांचा मंत्र दिला. कुणाकुणाला नाम दिल्याबरोबर एकदम दृष्टांत होऊ लागतात म्हणतात, पण

आम्हांला तसे काही झाले नाही. मात्र माझ्या मनाला अत्यंत शांती मिळाली ! त्यानंतर सद्गुरूंनी दाखविलेले नामस्मरण, ध्यान व नादानुसंधान मी नियमित सुरू केले. सद्गुरू सातआठ दिवस आमच्या घरी राहिले. त्यांच्या वागण्यात विशेष साधेपणा व तसाच रुबाब होता. त्यांचे वय ७५ वर्षांचे असून, शुभ्र दाढीमुळे ते एखाद्या महान ऋषीप्रमाणे दिसत. आमच्या येथील मुक्कामात त्यांच्याशी परमार्थ-विषयक चर्चा करण्यासाठी अनेक लोक येत.

परंतु मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात माझी प्रकृती पुन्हा एकाएकी ज्यास्त झाली. सर्वांगात जसे विंचू चावावे अशा वेदना होऊ लागल्या, छातीची धडधड वाढू लागली, व नाडी फारच जलद झाली ! पाय मधूनमधून वाकडे होत, तर मधूनमधून त्यांची आपोआप अशी अढी पडे की, ती मोठ्या कष्टाने सुटे ! डॉक्टरांचे उपाय चालेनात. घरातली सर्व माणसे अगदी हवालदिल झाली. अशा स्थितीत दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी मला डॉक्टरांनी बारकाईने तपासले, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरून मी ओळखले की, त्यांनी माझी आशा सोडली असावी. मलाही ते पाहून वाटायला लागले की, आपला अंतकाळ जवळ आला. मी अण्णा-साहेबांना जवळ बोलावून निरोपाची व निरवानिरवीची भाषा बोलू लागताच त्यांना खूप जोराचा हुंदका आला. त्यावेळी माणिकने मला धीर दिला व सद्गुरूंच्या उपदेशाचे स्मरण करून दिले. त्याबरोबर माझे डोके एकदम शांत झाले. त्यानंतर हळूहळू मला झोप लागली.

विशेष सांगायची गोष्ट म्हणजे यानंतर एक संपूर्ण वर्षाची मला काहीएक आठवण नाही. मला म्हणे विंचू चावल्यासारख्या वेदना होत–आणि मी खूप विव्हळायची आणि रडायची म्हणतात ! कधीकधी ' छोट्या भाऊसाहेबाला माझ्या समोर आणून खेळू द्या ' असे म्हणायची, एवढेच फक्त मला अंधुक आठवत आहे !

त्या स्थितीतच मला उन्हाळ्यात ( १९३३ ) चिखलदऱ्यास नेण्यात आले होते. डॉ. भट माझ्यासाठी मुद्दाम चिखलदऱ्यास येऊन राहिले होते. माझ्या मुली व आतेष्ट मला तिथे येऊन भेटून जात. माझे सगळे दात काढून मला कवळी बस-विण्यात आली होती. आणखीही गोष्टी घरात घडल्या होत्या. इंदुराजाची ती सुंदर मुलगी वारली होती. पण मला त्यातले काही म्हणता काही अद्याप आठवत नाही. माझी स्मृती इतकी बोथट झाली आहे असे डॉक्टरनाही वाटत नव्हते, हे एक आश्चर्यच ! ते सबंध वर्ष तसेच गेले.

१९३४ च्या उन्हाळ्यात पुन्हा मला चिखलदऱ्यास नेले गेले. तेथे एक दिवस रात्री मी जागी झाले, आणि आपण कोठे आहोत हे न समजल्यामुळे मी मोठ्याने अण्णासाहेबांना हाका मारल्या ! त्यावेळी त्यांच्या ध्यानात आले की, माझी शुद्ध परत आली आहे. मी त्यावर " आपण कुठे आलो आहो ? का आलो ? " असा सारखा प्रश्नांचा भडिमार केला ! त्यांनी मला शांत करून आधी

झोपविले व सकाळीं सर्व सांगेन असे आश्वासन दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी मला त्यांनी सर्व हकीगत सांगितली. भाऊसाहेब व जयकुंवर यांना पाहताच मी आश्चर्यचकित झाले! ती दोघे केवढी उंच झाली होती! यानंतर हळूहळू माझी स्मृती पूर्ववत निर्मळ ( Normal ) झाली.

पण मी आता विचार केला की, आपले हे दुखणे बरे होण्यापैकी नाही; बिछान्यात पडून सारखा दुखण्याचाच विचार बळावतो व वेदना अधिक जाणवतात; तेव्हा आता हळूहळू आपले मन दुसरीकडे लावले पाहिजे. म्हणून मी सद्‌गुरुंनी सांगितलेली साधना अधिक अधिक करू लागले. शिवाय मी असाही मनाशीं एक निश्चय केला की, आपल्या आजारीपणाने घरातले वातावरण क्षुब्ध होऊ द्यायचे नाही. जेणेकरून घरात प्रसन्नता राहील असे करायचे व शक्यतोवर आपल्या प्रकृतीबद्दल डॉक्टरशिवाय कुणाजवळ तक्रार करायची नाही. यावेळेपासून डॉक्टर मला पाहण्यास रोज येत. शिवाय माझ्या शुश्रूषेसाठी दोन दिवसपाळीच्या व दोन रात्रपाळीच्या अशा चार हुशार बायका ठेविल्या होत्या. नर्स मला नको होती. माझ्याजवळ वृत्तपत्रे व इतर वाचन करण्यास अण्णासाहेबांनी एक स्वतंत्र कारकून ठेविला होता. रोज सकाळसंध्याकाळ ते माझ्याजवळ येऊन तासदीडतास इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसत. माणिक तर बहुतेक सर्व वेळ माझ्या जवळ जवळ घालवायची व माझे सर्व पथ्यपाणी नीट असण्यावर देखरेख ठेवायची. मी तिच्याकडून भरतकामाचे नमुने तयार करवून घेई व मधूनमधून ते शिवण करण्यात वेळ घालवी. १९२० च्या माझ्या मागील आजारात मी सतार वाजविण्यास शिकले होते, ती चांगली करमणूक होती. पण सध्याच्या स्थितीत माझी बोटे आखडली होती, तरी दोन बोटांनी बनेल ते शिवण मी करी. माझ्या सुना मला त्यात मदत देत. मी माझ्या सर्व मुलांसाठी एक एक बेडस्प्रेड व नातवंडांसाठी टीक्लॉथ सेट, माझी आठवण म्हणून रंगीत दोऱ्यांनी भरून तयार केले. रोज एखादे तोंडीलावणेही माझ्यासमोर करवून घेई. आमच्या आप्तेष्टांच्या बायकाही मधूनमधून मला भेटण्यास येत, त्यातही माझा वेळ जाई. तरी पण शारीरिक वेदना मला त्रास देतच राहत. त्या फार असह्य झाल्या की, मी सद्‌गुरूंना पत्र लिहून "माझ्या वेदना कमी कराव्या" म्हणून विनंती करी. उत्तरीं ते उपदेश करीत की, "तुमचे सर्व पूर्वकर्म या देहात पुरे व्हायचे आहे; तेव्हा तुमचे दुखणे धैर्याने सोसा. तुम्हांला सद्‌गुरु जन्ममरणाच्या फेऱ्यात यापुढे घालणार नाही आहेत." हळूहळू मला वाटू लागले की, सद्‌गुरुंनी माझे आयुष्य लांबविले असावे, कारण त्यांनी म्हटल्याप्रमाणे माझे सर्व भोक्तृत्व त्यांना माझ्या या जन्मातच संपवायचे आहे. म्हणजे माझा हा एक पुनर्जन्मच झाला म्हणायचा!

◉ ◉ ◉

१९३४ साली दसऱ्याच्या सुमाराला एक दिवस पहाटे राजकुमार रावसाहेब व प्रतापसिंह अचानक सांगलीहून मला भेटण्यास उमरावतीस आले. त्यांना पाहून मला अतोनात आनंद झाला. ती सर्वच मुले माझ्यावर भारीच प्रेम करीत व माझ्याशी मनमोकळी वागत. आता हे दोघे डेहराडूनच्या मिलिटरी कॉलेजची पहिली परीक्षा ( म्याट्रिक ) पास झाले असून रावसाहेबाने पुण्यास डेक्कन कॉलेजात व प्रतापसिंहाने विलायतेस आय्. सी. एस्. साठी जावे असे ठरले होते. दोन्ही मुलांची विद्येत उत्तम प्रगती होत होती.

पण यावेळी मला रावसाहेब अंमळ गप्पगप्पसा व उदास वाटला. अण्णासाहेबांच्याही ती गोष्ट लक्षात आली, व ते त्याला फिरायला बरोबर नेऊन त्याचे मन मोकळे व्हावे अशा तऱ्हेने त्याच्याशी बोलू लागले. तेव्हा त्याच्या बोलण्यात असे आले की, "तुम्हा सर्वांना प्रतापसिंह अधिक आवडतात असे मला वाटते, व त्यांनाच राज्य द्यावे अशी तुमची सर्वांची इच्छा दिसते. म्हणूनच तुम्ही त्यांना विलायतेस धाडणार आहात." अण्णासाहेबांनी त्याची तऱ्हतऱ्हेने समजूत घातली, पण त्याचे समाधान झाल्याचे दिसेना. मग अण्णासाहेबांना शंका आली की, हा आता यौवनदशेत आला आहे; कदाचित ह्याला लग्न करावेसे वाटत असण्याचा संभव आहे. म्हणून त्यांनी त्याला म्हटले, "तुला लग्न करण्याची जरूरी वाटते आहे काय? तसे असल्यास मला अगदी मनमोकळेपणाने सांग. मी जरी सुधारक मताचा आहे तरी तुझ्या इच्छेसाठी तुला लग्न करण्याची परवानगी देईन." त्यावर तो म्हणाला, "मी चोवीस वर्षेपर्यंत विद्या पूर्ण करून, मग लग्न करण्याचा दृढनिश्चय केलेला आहे. राजेलोकांचे मुलगे असे राहू शकत नाहीत अशी लोकांत समजूत आहे, ती खोटी आहे, हे मी स्वतःवरून सिद्ध करून दाखविणार आहे." त्यानंतर अण्णासाहेबांनी त्याला व्यायाम नियमितपणे घेण्याचा उपदेश केला, व तो त्याप्रमाणे करू लागला आणि त्याची वृत्ति उल्हसित झाली. अण्णासाहेबांचे त्याच्यावर सतत लक्ष असे व ते त्याला वरचेवर उपदेशपर पत्रे लिहीत. अर्थात त्याच्या आईवडिलांचेही त्याच्यावर लक्ष होतेच.

१९३५ सालच्या उन्हाळ्यात आम्ही मुंबईस जाऊन राहण्याचे ठरविले. एक तर माझी प्रकृती डॉ. तिरोडकर व डॉ. वाड यांना दोनतीन महिने लक्षपूर्वक देखरेख करून पहायची होती व छोट्या भाऊसाहेबाच्या टॉन्सिल्स् व नाकातील गाठी, तसेच बाबा भिडेच्या टॉन्सिल्स् यांचे ऑपरेशन करून घ्यावे असे डॉक्टरांचे मत होते. ते सर्व मुंबईसच करायचे होते. तेव्हा मरीन ड्राईव्हवर नवीन झालेल्या 'शाटो मरीन' या इमारतीत आम्ही एक मजला तीन महिन्यांच्या करारने घेतला. जागा चांगली प्रशस्त असून समोरून समुद्राची मोकळी हवा येत असे.

मला रोज सायंकाळी खुर्चीतून खाली नेऊन मोटारीत घालून फिरायला नेण्याची सुरुवात झाली. शिवाय तेथे अनेक मंडळी भेटायला येत-जात, त्यांना चहा,

जेवणे वगैरे चालू असायची. त्यामुळे माझे मन दुसरीकडे लागून प्रकृतीस अंमळ बरे वाटू लागले. मात्र उठून स्वतःच्या पायांनी चालणे बंदच राहिले. पुढे लवकरच भाऊसाहेब व बाबा यांच्यावर डॉ. जोगळेकर यांनी यशस्वी रीत्या शस्त्रक्रिया केल्या. त्याने आमची एक मोठी काळजी दूर झाली.

जूनअखेरपर्यंत माझ्या प्रकृतीस पुष्कळ बरे वाटून आम्ही उमरावतीस परत गेलो. बाबा ( भिडे ) ला तूर्त उमरावती हायस्कूलमध्ये घालून पुढच्या वर्षी त्याला डेहराडूनच्या पब्लिक स्कूलमध्ये घालायचा होता. ही संस्था नुक्तीच निघाली असून अण्णासाहेब तिच्या संस्थापकांच्या कमिटीवरचे एक सभासद होते. यावर्षी दिवाळीत माझी सर्व मुले, नातवंडे, जावई वगैरे उमरावतीस एकत्र जमावीत अशी माझी फार इच्छा होती. त्याप्रमाणे ग्वाल्हेरची, सांगलीची वगैरे सर्व मंडळी आली व त्यामुळे ही दिवाळी फारच मजेची झाली. माझे दुखणे, अंगाला मुंग्या येणे, वगैरे सर्व मी चारआठ दिवस पार विसरले ! त्यावेळचा मुद्दाम काढलेला एक ग्रूप फोटो मजजवळ आहे.

पण या दिवाळीच्या वेळी मला विशेष आनंद झाला तो राजकुमार प्रतापसिंह दिवाळीसाठी येऊ शकला होता याचा. तो आता विलायतेत शिकण्यासाठी गेला होता व दोन अडीच महिने सुटी असल्यामुळे तो हिंदुस्थानात आला होता. दिवाळी संपल्यावर तो व रावसाहेब सांगलीस परत जाताना माझ्याजवळ येऊन बसले व मला म्हणाले, " आक्का, आम्हांला दोघांना तुझ्या लाडक्या नावांनी ' बंड्र–पिलू ' असे म्हणून आमच्या पाठीवर हात फिरव बघू. " मला अगदी गहिवरून आले आणि मी त्यांच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवून म्हटले, " पण बंड्र, अद्याप तू मला हवा तसा मोकळेपणाने वागत नाहीस, उगीउगीच राहतोस. तुझ्या मनात आता पिलूबद्दल काही राग नाही ना ? " त्यावर तो म्हणाला, " छे छे, ते सर्व लहानपणचे होते. आता माझ्या मनात काही नाही. सध्या मी अभ्यासात गर्क आहे, म्हणून तुला उगीउगीसा वाटतो. एकदा बी. ए. झालो म्हणजे तू म्हणशील तसा होईन. " मी म्हटले, " मग लग्नाला तयार होशील ना ? " तेव्हा तो म्हणाला, " आता सध्या त्याबद्दल काही विचार करू नका, व माझ्यासाठी मुलीही बघू नका. " त्याला नुकतीच शारंगपाणी यांची मुलगी सांगून आली होती. परंतु सध्या लग्नाचा विचार करायचा नाही असे त्याने निक्षून सांगितले असल्यामुळे ते प्रकरण तेवढ्यावरच राहिले.

सप्टेंबर १९३६ मध्ये बाबा ( भिडे ) ला डेहराडूनच्या ' डून स्कूल ' मध्ये घालायचा होता. त्याची प्रकृती अद्यापि थोडी अशक्तच होती. म्हणून आम्ही असे ठरविले की, माणिकने त्याच्याबरोबर जावे; त्याने शाळेच्या वसतिगृहात राहावे व माणिकने दोन नोकर बरोबर नेऊन, जवळपास एखादा बंगला भाड्याने घेऊन बिऱ्हाड करून, एक टर्मभर राहावे व त्याच्यावर देखरेख ठेवावी. मधूनमधून मुलाला

भेटण्याची तिला हेडमास्तर मि. फूट यांनी परवानगी दिली. ती दोघे डेहराडूनला गेल्यामुळे मला मात्र फारच कठीण वाटले. माणिकची प्रत्येक बाबतीत मला फार मदत होत असे. माझ्या प्रकृतीची ती फार काळजी घेई व सारखी माझ्या जवळपास अशी राहायची. ती व बाबा दूर गेल्याने कित्येक दिवस मी माझ्या मनातील दुःख डोळ्यांतील अश्रूंवाटे मोकळे करीत होते.

डेहराडून येथे असताना माणिकची एका वयोवृद्ध शीख गृहस्थांशी व त्यांच्या अमेरिकन पत्नीशी ओळख झाली. हे गृहस्थ फारच मोठे लेखक म्हणून प्रसिद्ध होते व डेहराडूनला त्यांचा स्वतःचा बंगला होता. त्यांनी माणिकची अनेक बड्या मंडळींशी ओळख करून दिली. ते सर्वांना सांगायचे, "ही माझी पुतणी, माझे परममित्र सर मोरोपंत जोशी यांची मुलगी आहे." माणिकला आश्चर्य वाटे की, हे गृहस्थ अण्णासाहेबांचे एवढे मित्र असल्याचे आम्हांला कसे ठाऊक नाही? ते तिची अगदी आपल्या मुलीप्रमाणे विचारपूस करीत. एक दिवस त्यांनी तिला चहाला बोलाविले असता तेथे त्यांचे काही बडे अमेरिकन मित्रही बोलाविलेले होते. त्यांना ते आपल्या फोटोचे आल्बम दाखवीत असताना माणिकने सहज त्यांच्या लहानपणचा आल्बम उचलला. त्यात त्या गृहस्थांच्या तरुणपणचे फोटो होते. ते पाहताना त्यांपैकी दोनतीन फोटोंतील चेहरा तिला ओळखीचा असल्यासारखा वाटला. मग गप्पांच्या भरात त्यांनी अण्णासाहेबांच्या थोर, उदात्त व उमद्या स्वभावाची स्तुती करायला सुरुवात केली व म्हणाले, "त्यांच्या पत्नीही त्यांस अनुरूप असून त्यांचे आदरातिथ्य विशेषच जिव्हाळ्याचे आहे." ते सांगताना त्यांचा कंठ दाटून आला. (हे माणिकने आम्हांला नंतर कळविले त्यावरून मी लिहीत आहे.) ते पाहून माणिक चकितच झाली व अनेक विचार तिच्या डोक्यात क्षणात येऊन गेले व या गृहस्थांना आमच्या मातेच्या आतिथ्याची इतकी खोल माहिती कशी असे वाटले. त्याचबरोबर तिच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला व शंका आली की, फार वर्षांपूर्वी –ती ७–८ वर्षांची असताना उमरावतीत आमच्या घरी येणारे सिंग उर्फ 'रावसाहेब' तर हे नाहीत? तेच मोठे कपाळ, तेच गरुडचंचूचे नाक, तोच आवाज! नाही म्हणायला आता ते पूर्वीच्या मानाने बरेच स्थूल झाले होते. उमरावतीस आमच्याकडे राहत असताना ते घोड्यावरून पडून त्यांचा हात अधू झाला होता, त्यावेळी मी त्यांची आस्थापूर्वक शुश्रूषा केली होती. तोही हात अद्याप तसाच अधू असल्याचे माणिकच्या ध्यानात आले. तेव्हा तिने त्यांच्यासंबंधी तेथे काही मंडळींजवळ चवकशी केली, तेव्हा तिला त्यांची हकीगत कळली ती अशी:– हे गृहस्थ वयाच्या १७–१८ व्या वर्षी पंजाबातील त्यांच्या घरातून नाहीसे झाले ते सुमारे ४५ वर्षांनंतर, अलीकडे ४–५ वर्षे, त्यांच्या अमेरिकन बायकोसह डेहराडून येथे स्थायिक झाले होते. तोपर्यंत ते कुठे होते, काय करीत होते याची काही कोणाला नक्की माहिती नव्हती! त्यावरून तर्क करायला जागा मिळाली की, वयाच्या

१७–१८ व्या वर्षी ते जे घरातून नाहीसे झाले ते क्रांतिकारक मंडळींत शिरले असावे, देशभर हिंडत असावे व त्यातच ते आमच्या घरी येत असले पाहिजेत. आपले खरे नावगाव ते कुणाला सांगायचे नाहीत. त्यांनी बरीच क्रांतिकारक मंडळी आपल्या भोवती गोळा केली होती. त्यांत वडीवडी मंडळीही होती. पण जेव्हा ते प्रकरण फारच अंगाशी आले, तेव्हा ते सातपुड्यात पळून गेले. तेथे त्यांना मृत्यु आला व तेथेच त्यांना जाळले, असे त्यांच्या सोबत्यांनी उठविले, व ती मंडळी चहूकडे पसार झाली. पुढे ते गृहस्थ गुप्तपणे अमेरिकेस गेले, तिकडे सुमारे ४०-४५ वर्षे राहून आता देशवेष पालटून डेहराडून येथे येऊन राहिले होते.

पुढे उमरावतीस आल्यावर माणिकने ही हकीगत व तिचा तर्क अण्णासाहेबांना सांगितला व त्यांना स्पष्टच विचारले, " हे गृहस्थ म्हणजे तुमचे ते ' सिंग ' उर्फ ' रावसाहेब 'च ना ? " त्यावर अण्णासाहेब हसून म्हणाले, " मला माहीत नाहीं. " पण आम्ही दोघींनी त्यांना खूप खोदून विचारले, तेव्हा ते हसतहसत म्हणाले, " तुम्ही तर अगदी माझी जबानीच घेऊ लागलात ! अशा गोष्टी बाहेर फोडायच्या नसतात ! या माणिकचे डोके मात्र फार चालते हो ! " आमच्या आयुष्यातील ही एक रहस्यमय व चित्ताकर्षक गोष्ट वाटली म्हणून जरा विस्ताराने सांगितली ! हे गूढ कधी सुटेल काय ?

१९३७ साली राजेसाहेबांचे पुन्हा विलायतेस जायचे ठरले. मला वाटते ' चेंबर ऑफ प्रिन्सेसचे ' काही काम होते. त्यांच्याबरोबर कमळाबाई व इंदुराजा विलायतेस जाणार होत्या. त्यानंतर रावसाहेब ( युवराज ) व चंद्रावतीदेवी अनुक्रमे बी. ए. व इंटरच्या परीक्षा आटोपल्यावर विलायतेस जायची होती. धाकट्या राजकुमारी उषादेवी व शकुंतलाराजे उन्हाळ्याच्या सुट्टीत मजबरोबर राहणार होत्या.

एप्रिलमध्ये ( १९३७ ) परीक्षा आटोपल्यावर विलायतेस जाण्यापूर्वी रावसाहेब व चंद्रावतीदेवी दोनचार दिवस उमरावतीस येऊन मला भेटून गेले. त्या वेळीं रावसाहेब मला बराच अशक्त वाटला, आणि त्याच्या डोळ्यांवर एक प्रकारची झाप वाटली ! आधीच मला त्याच्या प्रकृतीबद्दल काळजी वाटायची, आणि त्यात अलीकडे बरेच दिवसांपासून सांगलीस राजवाड्याच्या आवारात उतारे, लिंबे वगैरे टाकणे यांसारखे चेटकांचे प्रकार होत असल्याचे मी ऐकले होते. त्यामुळे माझी काळजी फारच वाढली. अण्णासाहेबांचा अशा गोष्टींवर विश्वास नसे. ते माझी त्याबाबत समजूत घालण्याचा यत्न करीत. पण माझी चिंता कमी होत नव्हती. मी आपली मग सद्गुरुंनी सांगितलेले नामस्मरण, ध्यान वगैरे करीत बसे !

वास्तविक रावसाहेब ( युवराज ) हा अतिसौम्य, सात्त्विक वृत्तीचा, आणि प्रेमळ होता. विद्येत त्याचे फार लक्ष असे. बी. ए. पर्यंत त्याचा उत्तम अभ्यास होऊन तो चांगल्या तऱ्हेने पास झाला. प्रो. लागू त्याला अभ्यासात मार्गदर्शनही करीत; आणि ते त्याच्यावर फार खूष होते. बी. ए. ची परीक्षा दिल्याबरोबर तो व चंद्रावतीदेवी

विलायतेस गेले. त्यांच्याबरोबर राजेसाहेबांचे मित्र श्री. भाऊसाहेब पंतप्रतिनिधी औंधकर हेही गेले होते. या मंडळींची मला वरचेवर पत्रे न आल्यामुळे मी अंमळ काळजीत होते. पुढे तीनचार महिन्यांनी मला अण्णासाहेबांनी सांगितले, "युवराज रावसाहेबांची प्रकृती बोटीवरच एकाएकी बिघडली होती–त्याला भयानक आकृती दिसू लागल्या होत्या!" ते ऐकून मी स्तंभितच झाले आणि म्हणाले, "तरी मी तुम्हांला सारखी बजावीत होते की, या राजघराण्यावर काही तरी चेटकाचे प्रकार चालले आहेत, त्याचा बंदोबस्त करा. पण ते सर्व तुम्ही थट्टेवर नेलेत. माझ्या पोराला तेच बाधले." विलायतेत युवराजांना मेंदूतज्ज्ञांना दाखविण्यात आले. त्यांचे म्हणणे असे पडले की, काही तरुण मुलांना कधी कधी अशी विकृती होते, पण ती आम्ही बरी करू शकतो.

अण्णासाहेबांनी स्वतः इकडे या विकारावरील वेगवेगळी पुस्तके आणून वाचून काढली व मुंबईचे डॉ. तिरोडकर व डॉ. वाड व इतर तज्ज्ञ डॉक्टरांशी याबाबत चर्चा केली. या चर्चेत असे ठरले की व्हिएन्नामध्यें नुक्तीच Shock Treatment म्हणजे विशिष्ट प्रकारे विजेचे धक्के देऊन मेंदूस दुरुस्त करावयाची योजना निघाली आहे, ती युवराजांना करून पाहावी. त्याबद्दलची सर्व व्यवस्था डॉ. तिरोडकर यांनी करून दिली, व स्वतः राजेसाहेब युवराजांना घेऊन व्हिएन्ना येथे गेले. तेथे उपचार चालू असताना डॉ. तिरोडकर यांनी स्वतः विलायतेस जाऊन देखरेख केली व युवराजांची प्रकृती अपेक्षेप्रमाणे सुधारत असल्याचा निर्णय दिला.

त्यानंतर व्हिएन्नाच्या तिघा तज्ज्ञांची सल्लामसलतीची ( consultation ) एक बैठक घेण्यात आली. पैकी दोघां डॉक्टरांनी मते दिली की, मुलाचा मेंदू आता पूर्णपणे निर्दोष ( normal ) झाला आहे. त्याला आता हिंदुस्थानात परत न्यावे व काही महिने तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवून त्यांच्या सल्ल्याने त्याचे लग्न करावे. त्यामुळे युवराजांचा मेंदू अधिक बळकट होण्यास मदत होईल. यानंतर युवराजांना नागपूर येथे बंगला घेऊन तेथील मेंटलहोमचे नामांकित तज्ज्ञ डॉ. रॉय व नागपूरचे सुप्रसिद्ध डॉक्टर डॉ. ना. भा. खरे यांच्या देखरेखीखाली ठेविले. त्याच्यासाठी व्हिएन्नाहून एक हुशार जर्मन मेल नर्स आणला होता. तोही त्याच्याजवळ होता. त्यावेळी आबासाहेब नागपुरात ब्यारिस्टरी करीत होता, तोही त्याच्याकडे लक्ष ठेवीत असे व युवराजही आबासाहेबाचे पुष्कळ ऐकत असे. नागपुरात युवराजाची प्रकृती अधिकाधिक सुधारत राहिली व तिथल्या दोन्ही डॉक्टरांनी त्याच्या लग्नास पूर्ण संमती दिली. डॉ. खरे यांनी स्वतःची इंटरमध्ये शिकत असलेली मुलगी युवराजांना देऊ केली. पण। डॉ. खरे त्यावेळचे कट्टर कॉंग्रेसवाले! पोलिटिकल एजंटचा ह्या संबंधाला विरोध होऊन तो राजेसाहेबांना त्रास देणार, ह्या विचाराने त्यांची मुलगी करण्याचा विचार दुर्दैवाने सोडून द्यावा लागला.

इ. स. १९३८ च्या उन्हाळ्यात एप्रिल, मे व जून असे तीन महिने

आम्ही मरीन ड्राईव्हवर फ्लॅट ( flat ) घेऊन मुंबईस राहिलो. इथे कमळाबाई येऊन मला भेटून गेली. ती विलायतेस असताना ताईचा दुसरा मुलगा बाबा राजवाडे ( हा नुक्ताच आय्. सी. एस्. पास झाला होता ) याने राजकुमारी चंद्रावतीस मागणी घातल्याची बातमी तिने मला सांगितली. स्थळ उत्तमच होते. मग राजेसाहेबांनी जनरलसाहेबांना ( राजवाडे ) रीतीप्रमाणे मुलीबद्दल विचारले व हे लग्न निश्चित झाले. डिसेंबर १९३८ मध्ये महाबळेश्वर मुक्कामी हे लग्न करण्यात आले. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे मला लग्नाला जाणे शक्य नव्हते, म्हणून मी आमच्या घराण्यातर्फे तारादेवी ( सूनबाई ) ला धाडले.

१९३८ च्या जून महिन्यात छोट्या भाऊसाहेबास नागपूरला त्याच्या आईवडिलांजवळ ( आबासाहेब व पद्मावती ) राहण्यास धाडिले. तोपर्यंत त्यांनी त्याला माझ्याजवळ उमरावतीस राहू दिला होता. त्याला नागपूरला शाळेत घातले. पुढे दोनतीन वर्षांनी त्याला डेहराडून येथे ‘ डून स्कूल ’ मध्ये घालायचे ठरले. भाऊसाहेब म्हणजे मला जसा माझ्या जीवाचा कलिजा वाटे–तो क्षणभर दृष्टीआड झाला की माझा जीव कासावीस होई ! अण्णासाहेब मला म्हणायचे, “ आपल्या ह्या वयात आता आपण स्वतःला संसाराच्या बंधनांतून हळूहळू सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवाय तुमची प्रकृती अशी डागळक झालेली. तुम्ही नातवाबद्दलचा मोह आता सोडा ! ” हे सर्व मला पटे, पण ‘ कळते पण वळत नाही ’ म्हणतात ना, तसे माझे होई. भाऊसाहेबाची मधूनमधून नागपूरहून पत्रे येत, तेवढाच माझा विरंगुळा ! पुढील फेब्रुवारीत आम्ही भाऊसाहेबाची मुंज केली. त्यासाठी माझ्या सर्व मुली (ताईखेरीज–ती ग्वाल्हेरला आजारी होती), नातवंडे व निकटची आप्तमंडळी आली होती. मातृभोजनाची पंगत अप्रतिम झाली. माणिकने त्यासाठी फारच कलात्मक पद्धतीने मांडणी व रांगोळ्या काढल्या होत्या. यथायोग्य अहेर वगैरे झाले. या मुंजीबरोबर आम्ही आमच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे पाच धर्ममुंजी करविल्या. प्रत्येक मुंजा मुलास पोषाख, तांब्याभांडे–ताम्हन–पळी, व प्रत्येकाच्या आईस दोन लुगडी व दोन खण, तसेच वापास रुमाल–उपरणे, असे दिले. आपल्या डोळ्यांदेखत नातवाची मुंज उत्तम झाली याचा मला फार संतोष झाला. या मुंजीनंतर चारपाच दिवसांनीच अण्णासाहेब तीनचार आठवड्यांसाठी दिल्लीस गेले. तेथे आय्. सी. एस्. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी सरकारने एक समिती नेमली होती, तिचे अण्णासाहेबांना अध्यक्ष नेमले होते.

१९३९ सालचा उन्हाळा पुन्हा आम्ही मुंबईस मरीन ड्राईव्हवर फ्लॅट (flat) घेऊन घालविला. त्याच सुमारास इंदुराजास सांगलीस मुलगा झाल्याचे समजले. हा आमचा पहिला पणतू. मुलगा रूपाने अति सुंदर आहे, पण जन्मतःच त्याच्या हाताची बोटे कमी आहेत असे समजले. हा एक अघटित दैवदुर्विलास आहे असे समजून मी मन स्वस्थ केले. पण ताई व जनरलसाहेब यांना त्याबद्दल

अनुक्रम .................... दि: ..........
क्रमांक .................... नों दि ..........

फार वाईट वाटले. मुलाचे नाव अनंत ठेविले. याच वर्षी आक्टोबरमध्ये चंद्रावतीदेवीला मुलगा झाला. त्याचे नाव यशवंत ठेविले. दोन्ही मुलांना मी बाळंतविडे पाठविले.

जूनमध्ये आम्ही मुंबईहून उमरावतीस परत आलो. याच सुमारास युवराज रावसाहेबाची प्रकृती नागपूरला सुधारत होती, व त्याला नेहमीचा एक चांगला विश्वासाचा व जिव्हाळा वाटणारा सल्लागार असावा असे राजेसाहेब व कमळाबाई यांना वाटत होते, व हे काम आबासाहेबाने करावे अशी उत्कट इच्छा त्यांनी व्यक्त केली. आपल्या प्रिय भगिनीस आपली थोडीशी तरी मदत व्हावी ह्या दृष्टीने आबासाहेबाने त्याजजवळ सांगलीस राहण्याचे मनात आणले. पण त्याच्याकडून फुकट काम करून घेणे कमळाबाईस बरे वाटेना, म्हणून त्याने संस्थानात जज्जाची नोकरी पत्करावी असे तिने सुचविले. त्याच्या नागपूरच्या धंद्याच्या मानाने या जागेची प्राप्ती वरीच कमी होती, पण भगिनीप्रेमाखातर त्याने ही नोकरी पत्करली! हा त्याचा स्वार्थत्याग होता, पण माझ्या मते त्याने ही अशी पूर्ण वेळेची नोकरी न करता, महिन्यातून चारआठ दिवस सांगलीस जाऊन तिथल्या कामाबाबत सल्ला व माहिती ठेविली असती तरी चालले असते, व हे काम विनावेतन करण्यास पाहिजे होते. नागपूरची वकिली केली नसती तरी आमची घरची इस्टेट पाहिली तरी त्याला गुजारा करता येण्याजोगा होता! सांगली संस्थान म्हणजे त्याच्या बहिणीचे—आणि बहिणीच्या घरी त्याने नोकरी पत्करावी, ही कल्पनाच मला असह्य वाटली! आजपर्यंत आम्ही सांगलीकरांशी किती निःस्पृहपणाने वागलो! आता लोक म्हणणार, "शेवटी सांगलीकरांचीच नोकरी पत्करली की नाही?" या विचाराने मला अत्यंत वाईट वाटले. मी आबासाहेबाला हरतऱ्हेने समजावून सांगितले की, "दुसरीकडे कुठेही नोकरी कर, पण सांगलीत नको." अण्णासाहेबांजवळही मी बोलून पाहिले! पण ते काय साधूच! ते म्हणत, "त्याला योग्य वाटेल ते त्याने करावे!" अखेरीस १९३९ च्या डिसेंबरअखेर आबासाहेब सांगलीस जज्जाचे जागेवर रुजू झाला.

१९४० च्या उन्हाळ्यात आम्ही मुंबईत राहिलो असताना येत्या दसऱ्याला अण्णासाहेबांचा ऐंशीवा वाढदिवस उमरावतीस मोठ्या प्रमाणावर करावा अशी कमळाबाईने कल्पना काढली. ती आम्हा सर्वांना फार आवडली. अण्णासाहेबांच्या कानांवर मात्र ती गोष्ट इतक्यात घालू नये असा विचार ठरला. कारण त्यांना स्वतःबद्दलचे असले समारंभ पसंत व्हायचे नाहीत हे आम्हांला माहीत होते. त्या सुमारास नागपूरचे आप्पासाहेब चितळे (ऑल इंडिया लॉ रिपोर्टरचे मुख्य चालक) मुंबईला आले होते. त्यांना ही कल्पना इतकी आवडली की ते म्हणाले, "हा समारंभ नागपूर व वऱ्हाड मिळून करू. याबाबत सर्व पुढाकार मी घेतो." आम्ही त्यांच्याकडून एवढे मात्र कबूल करून घेतले की "समारंभासाठी येणाऱ्या सर्व मंडळींचा जेवणखर्च, व मंडप वगैरेचा खर्च आम्ही करू!"

याच सुट्टीत माणिक व पद्मावती या दोघींच्या पोटातील ट्यूमरचे ऑपरेशन डॉ. मुळगांवकर यांनी त्यांच्या नर्सिंगहोममध्ये केले. त्यावेळी पद्मावतीची प्रकृती एकाएकी जास्त झाली ! डॉ. मुळगावकरांचा व आमचा फार घरोबा, त्यामुळे ते इतके गोंधळून गेले की त्यांना काही सुचेना ! त्यावेळीं अण्णासाहेबांनीच नेहमी-प्रमाणे आपले मन शांत ठेवून आम्हा सर्वांना धीर दिला व डॉ. मुळगावकरांना आग्रह केला की पद्मावतीच्या अंगात रक्त घालण्याचा उपाय करा. त्या काळात या उपायाला लोक फार घाबरत. पण अण्णासाहेबांनी विचारपूर्वक त्याबद्दलचा निर्णय घेतला व त्या उपचारामुळे त्या संकटापासून पद्मावती वाचली. परंतु तिला त्यानंतर एक महिना अधिक नर्सिंगहोममध्येच राहावे लागले. अण्णासाहेबांच्या प्रसंगावधाना-मुळे तिला लवकर आराम पडला.

माणिक व पद्मावती यांच्या प्रकृतीला उतार पडू लागला नाही तोच आमच्या घरात युवराज रावसाहेबाच्या लग्नाच्या वाटाघाटी जोरात सुरू झाल्या. इ. स. १९४० च्या सुमाराला राजेसाहेब व कमळाबाई यांनी रावसाहेब युवराजाला वियासला सद्गुरूंच्या दर्शनाला नेऊन आणले. सद्गुरूंनी त्यांना ' नाम ' दिले. रावसाहेबाची प्रकृती आता चांगली सुधारली होती व तो लग्न करण्यास फार उत्सुक होता. डॉ. ना. भा. खरे यांनी त्याचे लग्न करण्यास संमती दिलीच होती, इतकेच नव्हे तर स्वतःची मुलगी त्याला देऊ केली होती. ही हकीगत मी मागे सांगितलीच आहे. आता त्याला पुष्कळ मुली सांगून येत होत्या. युवराज रावसाहेबाची मुख्य अट अशी होती की, " मुलीचा स्वभाव चांगला असला पाहिजे; ती रूपाने विशेष चांगली नसली तरी चालेल. " पण मुलीचा स्वभाव आधी जाणणे कठीण, तेव्हा अण्णासाहेबांनी राजेसाहेब व कमळाबाईला असा सल्ला दिला की, मुलीचे घराणे चांगले असावे याशिवाय जास्त अटी नसाव्या; अशा मुलीला उत्तम शिक्षण व वळण देऊन आपल्याला सुसंस्कृत करता येईल; यामुळे सुस्वभाव विकसित होण्याची जास्त शक्यता आहे.

त्यानुसार पुण्याचे श्री. आठवले यांच्या मुलीची निवड झाली. अण्णा-साहेबांनी स्वतः मुलीसमक्ष तिच्या आईबापांना युवराजांच्या प्रकृतीबद्दल सर्व हकीगत अगदी स्पष्ट व सविस्तर–वेगवेगळ्या डॉक्टरांची मते वगैरे–सर्व सांगितले. त्यानंतर मुलगी व तिचे आईबाप यांना युवराजांशी भेटीगाठी घेण्याची संधी दिली गेली, व स्वतंत्रपणे आपले मत ठरवावे म्हणून त्यांना स्वतः अण्णासाहेबांनी सांगितले. हे लग्न करण्याबाबत मुलीची पूर्ण संमती व पसंती आहे असे मुलीच्या वडिलांकडून कळल्यावरच अण्णासाहेबांनी हे लग्न पक्के केले.

नंतर युवराज रावसाहेब एवढ्या दुखण्यातून बरा झाला, त्याचे सर्व तऱ्हेने मंगल व्हावे या हेतूने, पटवर्धनांचे कुलदैवत श्रीगणपती क्षेत्र पुळे येथे लग्नसमारंभ थाटाने करण्यात आला. सांगलीहून मुद्दाम तंबू वगैरे धाडण्यात येऊन पुळे येथे

क्यांप पडला. आजूबाजूचे बरेच लोक लग्नसमारंभ पाहण्यास आले. त्या सर्वांना अन्नदान, ब्राह्मणांस दक्षिणा, श्रीगजाननाची यथासांग पूजाअर्चा, अभिषेक, नैवेद्य वगैरे झाले. आमच्याकडून लग्नासाठी अण्णासाहेब, तारादेवी व जयकुंवर गेली होती. मी मात्र प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे जाऊ शकले नाही. बियासहून सद्गुरूंचे आशीर्वाद आले. युवराज रावसाहेब व त्याची बायको यांना मग सांगलीस नेऊन हत्तीवरून मिरवत तेथील गणपतीस व तेथून राजवाड्यात नेले व तेथे लक्ष्मीपूजन झाले. मुलीचे नाव ‘ पद्मिनीदेवी ’ असे ठेवले.

लग्नानंतर रावसाहेब आनंदात राहू लागला व त्याची प्रकृतीही अधिक सुधारली. त्याच्या बायकोसाठी उत्तम शिक्षकाची निवड करून तिचा शिक्षणक्रम सुरू केला. सूनबाईची शिक्षणात समाधानकारक प्रगती होऊ लागली.

युवराज रावसाहेबाचे लग्न ठरले तेव्हा मला सांगलीच्या मंडळींना गडगनेर करण्याची इच्छा होती, पण ते दिवस उमरावतीस फार उन्हाळ्याचे असल्यामुळे ते तसेच राहिले होते. म्हणून नव्या नातसुनेची एक मोठी मंगळागौर उमरावतीस करण्याचे मी ठरविले. हा योग मला लाभला ही मी फार अपूर्वाईची गोष्ट समजले; कारण माझी प्रकृती ही अशी डागळक झालेली, केव्हा गडप होईल याचा नेम नाही, असे मला वाटे. म्हणून मी मंगळागौर फार हौसेने केली. मंगळागौरीच्या पंगतीसाठी मांडव घातला होता. ४२–४३ मुली मंगळागौर पुजण्यास जमविल्या. मंगळागौरीची आरास सुंदर केली होती. रात्री मांडवात वनिता समाजाने बसविलेले एक नाटक झाले. याप्रसंगी काढलेला पंगतीचा फोटो मजजवळ आहे.

याच सुमारास ( १९३९ च्या अखेरीस ) राजकुमार प्रतापसिंह सुटीसाठी म्हणून विलायतेहून परत आला होता. रावसाहेबाच्या लग्नानंतर तो राजेसाहेबांना म्हणू लागला की, “ सध्या लढाई चालू आहे. मी विमान चालविणे शिकून आलो आहे. मी पटवर्धनांचा बच्चा आहे–मला एअर फोर्समध्ये जाऊन लढाईत भाग घेण्याची फार उत्कंठा लागली आहे ”......वगैरे. त्याचे आईबाप त्याला त्यापासून परावृत्त करण्याचे फार प्रयत्न करीत होते, पण त्याची समजूत पटेना ! ही एक नवीनच विवंचना सुरू झाली होती !

पण यानंतर या साऱ्या मनाच्या विवंचना दूर करून मी अण्णासाहेबांच्या ऐंशीव्या वाढदिवसाच्या तयारीला लागले. असे चित्त गढून जाणारे काही उद्योग निघाले म्हणजे मला माझ्या प्रकृतीच्या अस्वास्थ्याचा तात्पुरता विसर पडतो, आणि मनाच्या चिंता पण कमी होतात. १० आक्टोबर १९४० रोजी दसरा होता. त्या दिवशीच्या समारंभासाठी बोलवायची नात्यातली मंडळी, व निकटचे स्नेही इत्यादिकांच्या याद्या तयार करून त्यांना वेगळी खाजगी आमंत्रणे करायचे आम्ही ठरविले. त्याशिवाय श्री. आप्पासाहेब चितळे यांनी नागपूर प्रांताची एक वेगळी कमिटी या सत्कारसमारंभासाठी नेमली होती. या कमिटीत श्री. एस्. बी. तांबे, बा. ग. खापर्डे,

रावबहादुर किनखेडे, श्री. वा. रा. पुराणिक ( अध्यक्ष ), इत्यादी मंडळी असून श्री. ग. त्र्यं माडखोल्कर व डी. डी. दातार हे सेक्रेटरी होते.

अण्णासाहेबांना आधी बरेच दिवस आम्ही या समारंभाचा सुगावा लागू दिला नाही. नंतर त्यांना ते समजले, तेव्हा ते खूप रागावले. " माझ्या परवानगीवाचून तुम्ही हे कारभार काय म्हणून सुरू केले ? असले काही मला अजीबात पसंत नाही हे तुम्हांला माहीत नाही का ? " असे ते रागावून चितळे यांना बोलले. पण चितळे महावस्ताद ! त्यांनी अण्णासाहेबांचा राग ओसरेपर्यंत मौन धारण केले, आणि मग हळूहळू या समारंभाच्या तयारीची हकीगत त्यांच्या कानांवर घातली व म्हटले, " आता सांगा, गोष्टी इतक्या पुढे गेल्या असताना समारंभ रहित करणे शक्य आहे काय ? आमची कमिटी आणि ही मोठमोठी मंडळी सर्व तोंडघशी पडतील ना ? " आणि मोठ्या युक्तीने त्यांनी अण्णासाहेबांकडून या समारंभासंबंधी संमती मिळविली !

पण अण्णासाहेबांनी संमती देताना नाना प्रकारच्या अटी घातल्याच ! " समारंभासाठी कोणाकडून वर्गण्या मागायच्या नाहीत; माझे कोणत्याही प्रकारचे स्मारक करायचे नाही; वाढदिवसानिमित्त मिरवणूक वगैरे काढायची नाही; उगाच भरमसाट आमंत्रणे बाहेर पाठवायची नाहीत; मी कोणाकडून काही भेटी ( प्रेझेंट ) घेणार नाही; पाहुणे वगैरे येतील त्यांच्या जेवणाचा वगैरे खर्च मी स्वतः करीन...." इत्यादी. चितळ्यांनी हे सर्व मान्य केले. पण मान्य करताना पुन्हा काही सवलती मागून घेतल्याच.

आम्ही आमच्याकडून एखाद्या लग्नकार्यासाठी करावी तशी तयारी सुरू केली. धान्य भरून ठेवणे, आचारी वाढपी ठरविणे, कामाच्या वाटण्या करणे, पाहुण्यांची उतरण्याची सोय करणे वगैरे बरीच कामे होती. या बाबतीत प्रत्येक तपशीलाची आखणी आम्ही व्यवस्थित केली असल्यामुळे सगळी कामे व कार्यक्रम बिन-बोभाट व घड्याळ्यासारखे सुरळित पार पडले. समारंभासाठी आमच्या आप्तेष्टांपैकी सांगलीच्या घराण्यातील सर्व मंडळी, माझ्या सर्व मुली, जावई, सुना, नातवंडे वगैरे सर्व मंडळी जमली. शिवाय रामदुर्गचे राजेसाहेब, भाऊसाहेब पंतप्रतिनिधी औंध-कर, अण्णासाहेबांच्या आजोळची आगाशे मंडळी, काका कानिटकर वगैरे अनेक मंडळी आली.

ता. १० आक्टोबर १९४० रोजी दसऱ्याच्या दिवशी अण्णासाहेब नेहमी-प्रमाणे सकाळी फिरायला जाऊन परत आले, तेव्हा बाहेरच्या मंडपाच्या द्वारातच पाहुणे मंडळींनी त्यांचे स्वागत केले, व इंदुराजा यांच्या दीड वर्षांच्या मुलाच्या— म्हणजे अण्णासाहेबांच्या पणतवंडाच्या हातून त्यांना प्रथम हार घातला. नंतर अण्णासाहेबांकडून घुसळखांब व रवीची पूजा करविली. त्यावेळी अनेक आप्तेष्टांनी अण्णासाहेब नको नको म्हणत असता ' फूल नाही फुलाची पाकळी आहे ' असे

डॉ. सर मोरोपंत जोशी यांच्या ऐंशीव्या वाढदिवशीं जोशी कुटुंबीय ( १९४० )



खुर्चीवर [ डावीकडून ]– सौ. ताराबाई जोशी, सौ. शांताबाई देसाई, सौ. राणी लक्ष्मीबाई राजवाडे [ ताईसाहेब ], सर मोरोपंत जोशी, सौ यशोदाबाई जोशी, हर हायनेस सौ. राणीसाहेब–सांगली [ कमलाबाई ], श्री. माणिकबाई भिडे, सौ. पद्मावतीबाई जोशी.

उभे [ डावीकडून ]– श्री. शंकरराव देसाई [ जामात ], श्री. बाळासाहेब जोशी [ पुत्र ], हिज हायनेस राजेसाहेब–सांगली [ जामात ],

म्हणून त्यांना अहेर दिलेच! नंतर दुपारी सर्व मंडळींची मोठी पंगत झाली. या पंगतीचे फोटो मजजवळ आहेत.

ता. ११ आक्टोबर १९४० रोजी दुपारी रिफॉर्म क्लबमध्ये सर्व पाहुण्यांना 'टेनिस टी पार्टी' दिली. रात्री नऊ ते अकरापर्यंत आमच्या घरातील मुलांनी कॉन्सर्ट (concert) व काही करमणुकीचे खेळ करून दाखविले. ते फारच बहारीचे झाले! अण्णासाहेब एरव्ही कधी इतका वेळ रात्री जागायचे नाहीत, पण ते यावेळी सर्व कार्यक्रम आटोपेपर्यंत बसले. नंतर कॉफीपान झाले. ता. १२ ऑक्टोबर रोजी कमळाबाई व राजेसाहेब यांनी आमच्या टेनिसकोर्टावर अण्णासाहेबांच्या सन्मानार्थ एक मोठी पार्टी (At Home) दिली. त्यात शहरातील सर्व मोठमोठ्या मंडळींना आमंत्रणे होती. सुमारे चारसाडेचारशे मंडळी आली होती. आमच्या सबंध बंगल्यावर विजेची रोषणाई केली होती. त्यावेळी राजेसाहेबांनी इंग्रजीत अतिशय सुंदर भाषण केले.

त्याच दिवशी रात्री उमरावतीच्या कॉटन मार्केटतर्फे अण्णासाहेबांना मानपत्र देण्याचा मोठा समारंभ झाला. त्यात श्री. रामनाथ बियाणी यांनी पुढाकार घेतला होता. सुमारे तीन हजार मंडळी जमली होती. समारंभानंतर सर्वांना अल्पोपाहार देण्यात आला.

ता. १३ रोजी अण्णासाहेबांचा जाहीर सत्कार टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या हॉलमध्ये झाला. अध्यक्ष म्हणून पुण्याहून रँगलर परांजपे आले होते. त्याशिवाय पुण्याहून महर्षी कर्वे व त्यांच्या पत्नी मुद्दाम या समारंभासाठी आल्या होत्या. समारंभासाठी महात्मा गांधी, ना. श्रीनिवास शास्त्री, सरोजिनी नायडू, सर तेजबहादूर सप्रू, बियासचे सद्‌गुरू, महाराणी चिमणाबाईसाहेब गायकवाड, तसेच अनेक राजेरजवाडे, यांचे संदेश, व अभिनंदनपर तारा व पत्रे आली होती. सभेत अनेक लोकांची अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाबद्दल नितांत आदर दाखविणारी भाषणे झाली. उत्तरादाखल भाषण करताना अण्णासाहेब गहिवरून गेले. पण त्यांनी जे भाषण केले ते इतके हृदयस्पर्शी होते की, ते ऐकताना अनेकांनी प्रेमातिरेकाने आपले डोळे पुसले. हे त्यांचे भाषण, तसेच आमच्या ताईने आभारदर्शक केलेले भाषण, ही माझ्या हृदयावर कायमची कोरली गेली असून, ती मला निरंतर आनंद देत असतात! त्या दिवशी रात्री समारंभास आलेल्या सर्व पाहुण्यांना आमच्या बंगल्यावर आम्ही जेवण दिले.

ता. १० ते १४ (ऑक्टोबर) पर्यंत आमच्या दारात जे कोणी अनाहूत पाहुणे किंवा भिकारी येत त्यांना अन्नदान करण्याची आम्ही व्यवस्था ठेवली होती. त्या दिवसांत किती माणसे जेवून गेली याची मोजदादही ठेवणे शक्य झाले नाही! असो. या समारंभानिमित्त आम्ही आमच्या सर्व नोकरांना त्यांचा एक एक महिन्याचा पगार बक्षिस म्हणून दिला.

याप्रमाणे जोशी घराण्याच्या इतिहासात चिरस्मरणीय, सर्वांना अभिमान

वाटण्याजोगा, शुभदायक व सुखदायक प्रसंग निर्विघ्नपणे पार पडला ! मला स्वतःला त्या प्रसंगी जी धन्यता वाटली ती काय सांगू ? अण्णासाहेबांचे चित्त मात्र स्थितप्रज्ञां-प्रमाणे अविचल व शांत होते. ते मला शेवटी म्हणाले, "मी जन्मभर सत्याला धरून वागत आलो आहे. त्याबद्दलच्या फलाची मी कधी अपेक्षा केली नाही. मान-अपमान यांची केव्हाही क्षिती बाळगली नाही. या सर्व गोष्टी क्षणभंगुर आहेत. शाश्वत शांती परमेश्वरप्राप्तीत आहे असे संतमंडळी सांगत आली आहेत, म्हणून तो मार्ग चोखळण्याचा मी प्रयत्न करीत आहे, व करीत राहीन. तुम्हीही तसाच प्रयत्न करीत राहावे !" हे त्यांचे म्हणणे माझ्या हृदयात खोल रुजले आहे व त्याच मार्गाने झटण्याचा मी निश्चय केला आहे.

मला आता एवढेच वाटते की देवाने माझ्या सर्व हौशी बऱ्याच प्रमाणात पुरविल्या आहेत; हा समारंभ म्हणजे माझ्या सौख्याचा कळस असे मी मानते ! देवाजवळ आता माझे एवढेच मागणे आहे की, "हे देवा, मला हा सौख्याचा कळस दाखविलास, पण आमच्या या घराण्याला दृष्ट मात्र लागू देऊ नकोस !"

* * *

# ७.

## ( १९४१ ते १९४८ )

मागील भागात वर्णिल्याप्रमाणे अण्णासाहेबांच्या ऐंशीव्या वाढदिवसाची घरातली गडबड संपून त्याबद्दलच्या समाधानाचे व पारमार्थिक मार्गदर्शकत्वाचे घुटके मी घेऊ लागले नाही तोच आमच्या बाळासाहेबाला सैन्यातून हुकूम येऊन ताबडतोब कामावर रूजू व्हावे लागले. तो जरी टेरिटोरियल फोर्समध्ये होता तरी हिंदुस्थानातले जे खडे सैन्य युरोपच्या दुसऱ्या महायुद्धात धाडण्यात आले होते, त्या जागी तूर्त तरी हिंदुस्थानात टेरिटोरियल फोर्सच्या तुकड्या नेमल्या होत्या त्यांनाही लढाईवर केव्हा धाडतील याचा नेम नव्हता. आमच्या बाळासाहेबाला आघाडीवर जाऊन लढण्याची व मर्दुमकी दाखविण्याची तीव्र इच्छा होतीच. त्याचा स्वभाव पहिल्या-पासूनच धाडसी व उदार असा होता. त्याला शिकारीचा विशेष नाद असे. तो जमिनीवरून वाघाची शिकार करी. त्याचा नेम अचूक असे. त्याने आपल्या काही मित्रांबरोबर जायबंदी होऊन लपून बसलेल्या चारदोन वाघांच्या शिकारी फारच शूरपणा दाखवून हिंमतीने केल्या होत्या. एकदा मेजर थोरात हेही त्याच्याबरोबर शिकारीस होते. ह्यावेळी मात्र ‘ टेरिटोरियलची ’ तुकडी कुठे राहणार हे आम्हा निकटच्या मंडळींनाही कळविण्याची सैन्यातील नियमानुसार परवानगी नव्हती. त्यामुळे माझ्या मनावर काळजीचे दडपण बसून राहिले.

याच सुमारास अण्णासाहेबांना सरकारतर्फे नागपूरप्रांताच्या रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले होते. त्यानिमित्त प्रचारासाठी त्यांना नागपूरप्रांतात फिरावे लागे व ठिकठिकाणी भाषणे द्यावी लागत. अलीकडे ब्रिटिश-सरकारविरुद्ध लोकांत असंतोष फार वाढला होता. त्यामुळे या लढाईच्या ऐन संकटाच्या वेळी हिंदुस्थानातील लोक मोका साधून काही विघ्ने उपस्थित करण्याचा संभव आहे अशी सरकारला भीती वाटत होती. म्हणून त्यांना अण्णासाहेबांसारख्या माणसाची मदत हवी होती, कारण त्यांच्यासारख्या माणसाचे जनतेवर वजन पडेल

असा सरकारला भरंवसा होता. पण अण्णासाहेब या दौऱ्यात जी भाषणे करीत ती इतकी सडेतोड असत की, ती सरकारी अधिकाऱ्यांना फार बोचत, पण जनतेला आवडत. " या लढाईत हिंदुस्थानाने इंग्रजांना जी मदत करायची ती त्यांचे मिंधे म्हणून किंवा गुलाम म्हणून नव्हे, तर त्यापासून आपल्या देशाला पुढे फायदा होणार आहे या हेतूने.... " असा त्यांच्या भाषणाचा आशय असे. या कामाच्या निमित्ताने अण्णासाहेबांना बाहेरगावी बरेच राहावे लागे. त्यामुळे आम्ही बायका-बायकाच घरात असू. त्यात मी अशी अंथरुणाला खिळलेली. हृदयाचा झटका केव्हा येईल याचा नेम नाही ! त्यामुळे मला रात्रंदिवस मनाला बेचैनी वाटे.

यावर्षी ( १९४० ) अण्णासाहेबांच्या ऐंशीव्या वाढदिवसानंतर आणखी एक आनंदाची गोष्ट घडली. नागपूर विद्यापीठाने अण्णासाहेबांना एल्‌एल्. डी. ( डॉक्टर ऑफ लॉझ् ) ची पदवी देण्याचे ठरविले. त्या डिसेंबर महिन्यात नागपूर विद्यापीठाचा पदवीदान समारंभ झाला. त्या दिवशी गव्हर्नरसाहेबांच्या हस्ते अण्णा-साहेबांना ही पदवी देण्यात आली. हा योगायोग अचानक घडला–त्याबद्दल आम्हांला पूर्वी काहीच कल्पना नव्हती. त्याबद्दल अण्णासाहेबांना अभिनंदनाच्या अनेक तारा आल्या व आम्हां सर्वांना फार आनंद झाला.

राजकुमार प्रतापसिंहाचा एअर फोर्समध्ये जाण्याचा फार आग्रह होता हे मागे सांगितलेच आहे. त्याप्रमाणे १९४१ साली तो विमानदलात दाखल झाला. तो स्वतः त्यामुळे फार खूष होता, पण आम्हां सर्वांना त्याची काळजी वाटू लागली. याच वर्षी माणिकचा मुलगा बाबा मिलिटरी इंजिनियर्समध्ये पास होऊन त्याला सैन्यात कमिशन मिळाले. त्याला लेफ्टनंटचा दर्जा देण्यात आला व मद्रास किनाऱ्यावरील लष्करी तुकडीत काम करण्यास पाठविण्यात आले. त्यालाही लढाईच्या आघाडीवर केव्हा धाडतील याचा नेम नव्हता. जनरलसाहेबांचे दोघे मुलगे बाळासाहेब राजवाडे ( मेजर ) व भय्यासाहेब ( लेफ्टनंट ) म्हणून असेच लष्करी कामावर नेमले गेले होते. काळज्या किती व कोणाकोणाच्या करायच्या असे मला होऊन गेले !

१९४१ साली मार्चमध्येच मला वाटते सांगलीची सर्व मंडळी सद्‌गुरूंच्या दर्शनास बियासला गेली. त्यांच्याबरोबर अण्णासाहेब व माणिक आठ दिवसांसाठी जाऊन आले. रावसाहेब युवराजाची म्हणे इच्छा होती की, त्याच्या बायकोला सद्‌गुरूंनी ' नाम ' द्यावे. लग्न झाल्यापासून तो फार उल्हसित वृत्तीत होता व राजेसाहेबांनी त्याच्या आवडीची काही सरकारी कामेही त्याला करायला दिली होती–उदाहरणार्थ स्काऊटिंग, ऑनररी मॅजिस्ट्रेटबरोबर बसून तिथली कामे पाहणे वगैरे. तोही ती कामे लक्ष घालून करू लागला होता. डॉक्टरांच्या अपेक्षेप्रमाणे लग्नानंतर त्याच्यात सुधारणा होऊ लागली होती.

त्याच्या इच्छेनुसार बियास येथे सद्‌गुरूंनी त्याच्या पत्नीला ' नाम ' दिले, व उपदेश केला की, " वडील मंडळींस मान देऊन वागत जा. पतीवर पूर्ण निष्ठा

व प्रेम कर." त्यावेळी प्रतापसिंहाबद्दल ते राजेसाहेबांना म्हणाले, "या मुलाला तुम्ही विमानदलात जाऊ द्यायला नको होते. अजून त्याचे मन त्यापासून वळवून पाहा." ही सर्व हकीगत माणिक परत आल्यावर मला तिच्याकडून समजली, तेव्हा माझे मन अधिकच अस्वस्थ झाले !

१९४१ साली उन्हाळ्यात आम्ही दरवर्षीप्रमाणे मरीन ड्राईव्हवर फ्लॅट घेऊन राहिलो. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात शांताबाई (देसाई)ची मोठी मुलगी ग्रॅज्युएट (बी. ए.) झाली होती, तिचे लग्न मुंबईसच व्हायचे ठरले होते. म्हणून आम्ही सर्व मुंबईस लवकर गेलो. नियोजित वर पी. व्ही. राघवेंद्रराव आय्. सी. एस् (वैष्णव देशस्थ ब्राह्मण) होते. लग्न रजिस्टर पद्धतीने करावे असा त्यांचा आग्रह होता. शांताबाईची विजापूरची सासरची मंडळी जुन्या तऱ्हेची होती. त्यांना व मलाही रजिस्टर पद्धत पसंत नव्हती. पण यातून अण्णासाहेबांनी मोठ्या युक्तीने मधला मार्ग काढला आणि उभय पक्षांचे समाधान केले. शांताबाईने मुलीला चांदी-पितळेची भांडीकुंडी, उंची कपडे वगैरे योग्य ते दिले. एकंदरीत लग्नसमारंभ फार चांगल्या रीतीने पार पडला

याच वर्षी जूनमध्ये राजकुमारी उषादेवी हिचा विवाह जनरलसाहेबांचे तिसरे चिरंजीव बाळासाहेब राजवाडे (मेजर) यांच्याशी पुण्यास झाला. राजवाडे मंडळी त्यांच्या कोरेगाव पार्कवरील बंगल्यात व सांगलीकर मंडळी त्यांच्या गावातल्या वाड्यात उतरली होती. लग्नसमारंभ दोन्ही घराण्यांस शोभेल असा राजशाही झाला. या लग्नाच्या योगाने कमळाबाईच्या तिघी मुली ग्वाल्हेरचे रावराजे राजवाडे (जनरलसाहेब) यांच्या घरात पडल्या.

या वर्षीच्या नोव्हेंबरात आम्हांला समजले की, बाबा भिडे याला ब्रह्मदेशात आघाडीवर पाठविले आहे. तेथपर्यंत लढाई पोहोचली होती. त्यामुळे मला तर काळजी लागलीच, पण आता माणिकला केवढा धसका सुरू झाला, या विचाराने मी जास्त बेचैन झाले. याच सुमारास शांताबाई (देसाई) चा यशवंत उर्फ चंदू सिग्नल्समध्ये पास होऊन लेफ्टनंट म्हणून सैन्यात दाखल झाला. अति काळज्या झाल्या किनई, म्हणजे मन कसे थिजल्यासारखे होते ! तसेच यावेळी माझे झाले. कुणी काही सांगायला आले किंवा कुणाची तार आली की, माझ्या पोटात धस्स होऊन छाती धडधडू लागे !

१९४२ साल उजाडले ते जसे काही घरीदारी सर्वत्र काळज्या व विवंचना घेऊनच आले ! देशात सर्वत्र कॉंग्रेसचा प्रचार जोरात सुरू झाला. त्यात गुंड लोकांना चांगलेच फावले ! लोकांची मने बेफाम होऊ लागली. सामोपचाराच्या गोष्टी सांगणारांचे कोणी ऐकेनासे झाले, व अशा लोकांना भ्याड म्हटले जाऊ लागले. हे सर्व प्रकरण भलतीकडेच वाहवू लागले आहे असे सुज्ञ लोकांना वाटू लागले. परंतु त्याविरुद्ध प्रचार करण्यास त्यांची हिंमत होईना, कारण तशा सभा घेण्याचा कोणी

प्रयत्न केल्यास कॉंग्रेसमधले गुंड त्या उधळून टाकीत. एखादा मोठा वणवा पेटल्यासारखी स्थिती झाली.

अण्णासाहेबांचे मन ही परिस्थिती पाहून अतिशय तळमळू लागले. त्यांनी आपल्या अनेक जबाबदार मित्रांना याबाबत पत्रे लिहून विचारविनिमय सुरू केला, व काही चांगले उपाय पण सुचविले. या परिस्थितीत देशात दंगेधोपे होतील, अनाचार वाढतील, लोकांना आवरणे पुढाऱ्यांना कठीण होऊन बसेल, आणि मग सरकार जालीम उपाय योजील, दयामाया काही दाखविणार नाही, असे त्यांचे मत होते व ते पुढे अगदी खरे ठरले. पुढे गांधीजीनीही कबूल केले की, सनदशीर पद्धतीने सत्याग्रह करण्यास आमचे लोक तयार नव्हते, त्यांचा उठाव करण्यात माझी चूक झाली, वगैरे.

लोकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी अण्णासाहेबांनी वऱ्हाडात ठिकठिकाणी सभा घ्यायचे ठरविले व त्याप्रमाणे पहिली सभा उमरावतीस घेतली. या सभेत अण्णासाहेबांव्यतिरिक्त, श्री. बामणगावकर व कॉंग्रेसचे वीर वामनराव जोशी यांची भाषणे झाली. अण्णासाहेबांनी आपल्या भाषणात या चळवळीपासून कोणते धोके संभवतात याचे विवेचन करून ‘ आधी आपल्या मनगटात जोर आणायला शिका, मुलांना लष्करी शिक्षण द्या ’ असे प्रामुख्याने प्रतिपादन केले. या सभेत प्रश्न विचारण्याची परवानगी दिली, तेव्हा एकाने मध्येच त्यांना प्रश्न विचारला की, “ लष्करी शिक्षणाबाबत आपण स्वतः काय केले आहे ? ” अण्णासाहेबांनी उत्तर दिले की, “ मी याबाबत माझ्या भाषणांतून वेळोवेळी उपदेश करीत आलोच आहे, पण आजमितीस माझ्या घरातले सहा मुलगे–जे अतिशय बुद्धिमान आहेत व ज्यांना इतरत्र कुठेही उत्तम जागा मिळू शकल्या असत्या–अशांनी लष्करात प्रवेश केला असून ते सर्व आघाडीच्या युद्धात काम करीत आहेत. ” यावर सभेत टाळ्यांचा कडकडाट झाला !

यानंतर खरोखरीच हिंदुस्थानात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात दंगेधोपे सुरू झाले. त्यांत हिंदुमुसलमानांचे जातीय दंगेही झाले. खुद्द उमरावतीत पूर्वी कधी झाला नव्हता असा हिंदुमुसल्मानांचा दंगा झाला. दोन्ही पक्षांची मंडळी व सरकारी अधिकारी अण्णासाहेबांकडे खेपा घालू लागले व “ तुमच्या मध्यस्थीनेच हे सर्व मिटेल–तुम्ही या बाबतीत आता पुढाकार घ्या ” असा त्यांना आग्रह करू लागले. आणि खरोखरच अण्णासाहेबांच्या मध्यस्थीनेच त्यावेळी हे दंगे लवकर आटोक्यात आले ! त्यावेळी कॉंग्रेसवाल्यांनी त्यांना धन्यवाद दिले. मी त्यांना म्हटले, “ पण तुमचे हे उपकार कॉंग्रेसवाले पुढे स्मरणार आहेत का ? ” त्यावर त्यांनी नेहमीप्रमाणे उत्तर दिले, “ माझे म्हणणे अजून तुमच्या गळी उतरलेले दिसत नाही. आपण आपले कर्तव्यकर्म मनोभावाने करीत असावे–त्याबद्दलच्या फळाची अपेक्षा करू नये ! ”

१९४२ च्या उन्हाळ्यात मी पुण्यास राहायचे ठरविले. तेथे बंडगार्डनरोडवर

कमळाबाईने एक बंगला घेतला होता, व तिने मला तिथेच राहण्याचा आग्रह केला. ग्वाल्हेरची राजवाडे मंडळीही पुण्यास आली होती. त्यामुळे आमचा वेळ चांगला जाई. या सुटीत आमचा बाळासाहेब दहाबारा दिवसांची रजा घेऊन घरी आला होता. तो या युद्धविषयक कामाच्या खूप गमतीदार गोष्टी सांगत असे. एकदा म्हणे त्याची तुकडी खंडाळ्याच्या घाटात रक्षण करण्यास ठेवली होती. रात्री अपरात्री वाटेल तिकडे त्यांना कामास जावे लागे व पुष्कळदा उघड्या जागेत झोपावे लागे. एका काळ्याकुट्ट रात्री तो व एक इंग्रज अधिकारी काम आटोपल्यावर एका खडकाळ जागेवर ब्लँकेट्स् घेऊन निजले. थोड्या वेळाने फुस्फुस् असा मोठा आवाज ऐकून ते जागे झाले, आणि पाहतात तो त्यांचे ब्लँकेट घुसमटले जाऊन त्यामधून एक भला मोठा साप सळसळत चालला होता! स्तब्ध बसण्याखेरीज त्यांना त्यावेळी दुसरे काहीच करणे शक्य नव्हते. काही वेळाने तो साप निघून गेल्याचे दिसले. त्यानंतर बाळासाहेब पुन्हा खुशाल झोपी गेला! दुसरे दिवशी सकाळी त्यांना आढळून आले की ते निजलेली जागा थडग्यांची होती व मातीत भल्या मोठ्या सर्पांची फरफट उठलेली दिसून आली!

आणखी एक गोष्ट त्याने सांगितली. त्याचा एक वैमानिक मित्र त्याच्या क्यांपात आला आणि कोणाला विमानात बसायचे आहे काय, म्हणून विचारू लागला. सगळेच 'मी प्रथम बसणार' म्हणू लागले. त्याच्या विमानात एकच जास्त माणूस बसण्याची सोय होती. तेव्हा तो म्हणाला, "आता सगळ्यांच्या नावाच्या चिठ्या टाका; ज्याचे नाव निघेल त्याला मी प्रथम नेईन." चिठ्या टाकल्या तर बाळासाहेबाचेच नाव निघाले. पण त्याचा एक मित्र काकुळतीस येऊन त्याला म्हणाला, "तू पूर्वी एकदा विमानात बसला आहेस. मी कधीच बसलो नाही—मला जाऊ दे!" मग तो मित्र विमानात गेला. त्यानंतर थोड्याच वेळात संदेश आला की, ते विमान अमुक ठिकाणी कोसळले आहे! मग ही मंडळी तेथे जाऊन पाहतात तो आतील माणसांसह विमानाचा चेंदामेंदा झालेला होता! या संकटापासून देवानेच बाळासाहेबाला वाचविले म्हणायचे! मृत्यूची आलेली चिठी जणू परमेश्वराने परतविली होती आणि आम्हांला त्याचा काहीएक पत्ता नव्हता!

या सुट्टीत एक दिवस अचानक राजकुमार प्रतापसिंहाने आम्हांला भेट दिली. संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास आम्ही सहज हॉलमध्ये बसलो होतो, तो हा येऊन समोर उभा राहिला! त्याच्या विमानाच्या खेपा मधूनमधून पुण्यास व्हायच्या, आणि मग तो थोडा वेळ येऊन आम्हांला भेटून जायचा. मग मी त्याच्या आवडीचे श्रीखंड त्याच्यासाठी करायची. वैमानिक दलाचा पोषाख त्याला किती खुलून दिसत असे! पण त्या पोषाखाने मला आमच्या बाळासाहेबावरील त्या टळलेल्या अपघाताची आठवण होई, आणि माझ्या पोटात धस्स होई!

जूनअखेर आम्ही मुंबईस जाऊन उमरावतीच्या गाडीत बसलो. तिथे

आम्हांला पोहोचवायला आलेला प्रतापसिंह अचानक दिसला. तो नुकताच विमानातून उतरला होता, आणि त्याचा तो पोषाख, रुबाब व चेहऱ्यावरील तेज–सर्वच अतिशय सुंदर दिसत होते. बोरीबंदर स्टेशनवर जो तो त्याच्याकडे वळून वळून पाहत होता! मला वाटले पोराला दृष्ट लागेल–लहान मुलासारखे याला पदराने झाकून घ्यावे! आगगाडीत सारखी मला त्याची मूर्ती डोळ्यांसमोर दिसत होती. पुढे तो काही दिवस सांगलीस जाऊन आल्याचे समजले व त्याच्या प्रजाजनांनी स्टेशनवर जाऊन त्याचे स्वागत केले असे कळले.

आणि ऑगस्ट ता. २४, १९४२ चा तो दिवस! सकाळी रोजच्याप्रमाणे माणिक व बाळासाहेब (तो सध्या रजेवर घरीच होता) मला भेटायला आले नाहीत! तोच मला तारवाला दिसला! तारेत युवराज रावसाहेबाला मुलगा झाल्याची बातमी! माझ्या सर्वांगावर आनंदाच्या लहरी उठल्या! इतक्यात अण्णासाहेब आले. त्यांना मी म्हटले, “बघा तरी, आपल्या रावसाहेबाला मुलगा झाला! आता मी तुमचे काही एक ऐकणार नाही–अंबाबाईला ब्यांड लावून पेढे धाडणार!” तेव्हा ते म्हणाले, “जरा स्वस्थ व्हा, मला काल रात्री स्वप्न पडले ते तुम्हांला सांगायला आलो आहे. त्यावरून आज तुमच्यावर काही तरी संकट आलेले तुम्ही ऐकाल.” त्यावेळी अण्णासाहेबांचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. माझ्या पोटात चर्र झाले. मग ते म्हणाले, “शांत राहा, काय व्हायचे ते होईल.” माझे जेवण होईपर्यंत ते काही बोलले नाहीत. मला जेवण कसले जाते? इतक्यात डॉक्टर आले व मग अण्णासाहेब म्हणाले, “ती भयंकर बातमी असलेली तार आताच आली आहे.” मी म्हटले, “काय—काय? मला लवकर सांगा, माणिकच्या बाबाला काही धोका झाला आहे का? माझा प्रताप–” अन् मला पुढे बोलवेना! मला भडभडून आले व रडू कोसळले! मग त्यांनी सांगितले, “काल रात्रीच मिलिटरी खात्याकडून तार आली आहे की, प्रिन्स प्रतापसिंह आज सकाळी मद्रासजवळ विमान अपघातात ठार झाले!” रात्री तार बाळासाहेबाने घेतली होती; व ती बातमी त्याने त्यावेळी फक्त माणिकलाच सांगितली आणि सकाळी उठल्यावर अण्णासाहेबांना सांगितली होती. म्हणूनच ती दोघे सकाळी मला भेटावयाला आली नव्हती! अण्णासाहेबांनीही मला ती बातमी माझे जेवण होईपर्यंत सांगितली नाही, आणि मला धक्का बसेल म्हणून आधी डॉक्टरना बोलावून आणून मग ती मला सांगितली. स्वप्न पडल्याचे त्यांनी जे मला प्रथम सांगितले ते काही खरे नव्हते, असे त्यांनी नंतर सांगितले.

ही बातमी कानी पडताच मला थिजल्यासारखे झाले! मी मोठ्याने रडू लागले. मला वाटले, ही माझी छाती फोडावी! “माझ्या कमळाचे आता काय झाले असेल?.... देवाने हा घोर प्रसंग आम्हांवर का आणला? ही बातमी ऐकून मला अजून मरण कसे येत नाही?” असे शब्द माझ्या तोंडून सारखे निघू

लागले ! माझा प्रताप ! माझी कमळा ! तिच्या सोन्यासारख्या मुलाला दृष्ट लागली ! !

त्याच दिवशी अण्णासाहेब व माणिक सांगलीला जाण्यास निघाले, व पुण्याहून स्पेशल मोटारने दुसरे दिवशी सांगलीस पोचले. त्यावेळचे तेथील हृदयद्रावक दृश्य अण्णासाहेबांना सहन झाले नाही ! त्याचे वर्णन पुढे मी ऐकले, त्याने माझे काळीज करपून गेले ! युवराजांना पुत्र झाल्याची बातमी ऐकून शहरभर सर्वत्र आनंदोत्सव सुरू झाले होते. हत्तीवरून गणपतीला साखर नेण्याची भव्य मिरवणूक निघाली होती. रात्री सर्वत्र दिव्यांची रोषणाई झाली होती. मिरवणूक संपवून घरी आल्यावर बाहेरच्या मोठ्या व्हरांड्यात आतेष्ट जमले होते. तिथे कमळाबाई त्यांना भेटण्यासाठी आली, व राजेसाहेब आपल्या खोलीत काही काम पाहण्यास गेले. इतक्यात एक हुजऱ्या निरोप घेऊन आला की, " सरकारस्वारींनी आपल्या हॉलमध्ये राणीसरकारांना एकट्यांनाच लवकर बोलावले आहे. " इतर मंडळी बाहेर गप्पा मारीत थट्टाविनोद करीत बसली होती—इतक्यात आतून कमळाबाईची आर्त किंकाळी ऐकू आली व हॉलचे दिवे एकदम विझले! सर्व मंडळी भयचकित व स्तब्ध झाली. आत हॉलमध्ये जाण्याची कुणाची हिंमत होईना ! शेवटी आबासाहेब आत गेला व त्याने तेथला दिवा लावला. पाहतो तो कमळाबाई कपाळावर हात ठेवून जवळच्या कोचावर बेभान स्थितीत पडलेली, तोंडातून दुःखाचे सुस्कारे चालले आहेत, आणि राजेसाहेब सुन्न होऊन तिच्याजवळ उभे असून त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पाट वाहत आहेत ! जवळच पडलेली तार राजेसाहेबांनी उचलून आबासाहेबाच्या हाती दिली. त्यात राजकुमार प्रतापसिंह लढाईत ( active service वर ) विमानात ठार झाल्याची बातमी ! आबासाहेबही ते पाहून मनात पूर्ण हादरून गेला. पण एकदोन मिनिटांनी स्वतःचे मन स्थिर करून राजेसाहेबांना म्हणाला, " ही तार या आनंदप्रसंगी कुणी विघ्नसंतोषी दुष्टाने खोटीच केली नसेल कशावरून ? आपण प्रथम याची नीट चौकशी करू. आपण दोघे धीर धरा. " मग त्याने ती तार बाहेर आणून कारभाऱ्यांचे हाती दिली ! मग काय विचारता त्यावेळचा आकांत व धावपळ ! सबंध राजवाडा हादरून गेला जसा ! ब्यांड बंद झाले, वाजंत्री चौघडे स्तब्ध झाले, विजेच्या रोषणाया एकदम विझल्या, व सर्वत्र दुःख व अंधःकार पसरला जसा !

हां हां म्हणता ही हृदयद्रावक बातमी सगळ्या सांगलीत पसरली ! सर्व शहर आश्चर्याने व दुःखाने भरून गेले ! रामराज्यवियोगासारखा तो दारुण प्रसंग सांगली राजघराण्यावर ओढवला. जणू रामाच्या युवराज्याभिषेकमहोत्सवात प्रजाजन दंग असता राम-वनवासाची भयंकर बातमी त्यांनी ऐकली व ते दुःखसागरात बुडून गेले. कौसल्यामातेला राम निदान चवदा वर्षांनी भेटतील ही तरी आशा होती. पण आमच्या कमळाबाईमातेला तिचा जीव की प्राण असलेला रत्नासारखा तेजस्वी पुत्र प्रतापसिंह कायमचा अंतरला होता ! तो तिला पुन्हा कधीही भेटणार नव्हता ! !

हा प्रसंग जितका हृदयद्रावक व करुणास्पद करता येईल तितका त्या निर्घृण कालाने केला जसा! आनंदाच्या अत्युच्च शिखरावर राजेसाहेब व कमळाबाई यांना एका क्षणाला नेऊन, दुसऱ्याच क्षणाला त्यांना दुःखाच्या दारुण दरीत जसे काही लोटून दिले होते!

पण त्या स्थितीतही राजेसाहेबांना आपले दुःख बाजूला सारून समाचाराला येणाऱ्या लोकांकडे लक्ष पुरविणे भाग होते. हजारो लोक त्यांच्याकडे येऊन म्हणू लागले, " ही बातमी खोटी असेल! देव तुमच्यासारख्या संततुल्य राजावर असा घाला घालणार नाही. " पण ते विसरले होते की, हे कलियुग आहे, सत्ययुग नव्हे! कमलाबाईनेही आपले मन लवकरच आवरले. तशा स्थितीत ती नातवास व सुनेस पाहून आली. बाळंतिणीच्या खोलीत तिने डोळ्यांवाटे एकही अश्रू बाहेर पडू दिला नाही! नित्याप्रमाणे बाळबाळंतिणीची विचारपूस करून त्यांच्या पथ्यपाण्याबद्दल व उत्तम शुश्रूषेबद्दल डॉक्टर, नर्सेस वगैरेंना सूचना देऊन आली!

मद्रासला तारा करणे किंवा कुणा अधिकाऱ्यांना धाडणे, दोनचार दिवस राजेसाहेबांना शक्य झाले नाही. कारण त्याच वेळी मद्रासच्या बाजूला दंगेखोरांनी तारेचे खांब, रेल्वेचे रूळ वगैरे उद्ध्वस्त केलेले होते. तिथल्या महाराष्ट्रीय मंडळींनी म्हणे मोठ्या मिनतवारीने प्रतापसिंहाचा मृतदेह मिलिटरी खात्याकडून मिळवून त्याचा अंत्यसंस्कार मिलिटरी मानवंदनेसह केला होता. त्यावेळी त्याचा देह झाकूनच ठेवावा असा म्हणे लष्करी हुकूम होता. यावरून पुढे अनेक बातम्या उठल्या. त्यांपैकी एक बातमी अशी की, सहासात विमानांची तुकडी दारूगोळा घेऊन जपान्यांवर चालून गेली होती, त्यांपैकी सहा विमाने शत्रूंनी पाडली. सातवे विमान मद्रास तळावर परतले, पण खाली उतरताना त्यातील दारूगोळा एकाएकी पेटून ते कोसळले! या विमानाच्या तुकडीत प्रतापसिंह होते. त्यांच्या नियमानुसार एक तार त्याच्या आईवडिलांना, व एक तार त्याच्या निकटच्या नातेवाईकांस ( हे एक नाव देऊन ठेवावेच लागते व ते अण्णासाहेबांचे दिलेले होते. ) लष्करीखात्याने धाडली होती! पण पुढे बऱ्याच दिवसांनी आमचा बाबा ( भिडे ) याला त्याच्या एका वैमानिक मित्राने गुप्त बातमी म्हणून सांगितली की, " त्या सहासात विमानांच्या तुकडीत प्रतापसिंह होता; खरे म्हणजे त्या दिवशी जाण्याची त्याची पाळी नव्हती, पण आयत्या वेळी त्याचा एक मित्र त्याला म्हणाला, ' आज माझी प्रकृती बरी नाही–माझ्या ऐवजी तुम्ही जा, ' आणि तो गेला होता. पण तो शत्रूंनी पाडलेल्या विमानांत होता की परतलेल्या विमानांत होता हे मात्र गूढ आहे. "

यानंतर ५–६ महिन्यांनी आम्हांला आमच्या एका हितचिंतकाने एका साधूची गाठ घालून दिली व सांगितले की, हे अंतर्ज्ञानी आहेत असा आमचा पक्का अनुभव आहे. ते साधू म्हणाले की, " प्रतापसिंह जिवंत असून जपान्यांच्या कैदेत आहेत. सहासात विमानांचा तांडा शत्रूवर चाल करून गेला होता, त्यांतील सहा

शत्रूंनी पाडली, त्यांपैकी प्रतापसिंह तेवढे त्यांना सापडले; व जे एक विमान मद्रासला येऊन पेटून कोसळले त्यात प्रतापसिंह नव्हतेच ! दोन वर्षांनी प्रतापसिंह परत येऊन तुम्हांस भेटतील ! ” म्हणतात ना की बुडत्यास काडीचाही आधार वाटतो, तसे माझे मन पुन्हा आशेने भरले. पण अप्पासाहेब म्हणाले, “ त्या साधूवर मुळीच विश्वास ठेवू नका. या गोष्टी खऱ्या नाहीत. मिलिटरीने जी आपल्याला बातमी दिली होती तीच खरी आहे. असल्या साधूंच्या फंदात मुळीच पडू नका. ”

आणखी काही वर्षे हे युद्ध चालणार आणि किती शूर तरुणांचे त्यात बळी पडायचे आहेत देव जाणे ! आतापर्यंत कितीक आईबापांची हृदये दुःखाने होरपळली असतील ! पण ज्याचे दुःख त्यालाच—कोण कुणाचे सांत्वन करणार ? तीच गत राजेसाहेब, त्यांचे कुटुंब व आमचे कुटुंब यांची झाली होती !

सांगलीहून परत आल्यावर माणिकला बियासला जाण्याची एक चांगली सोबत मिळाली व ती मला म्हणू लागली, “ माझेही मन सध्या भारीच उदास व उद्विग्न झाले आहे, तर मी सद्‌गुरूंच्या दर्शनाला जाते व त्यांची प्रार्थना करते की, आपण सांगलीस येऊन आमच्या कमळाबाईचे आता सांत्वन करा. ” मलाही तिचे म्हणणे पटले व तिच्याबरोबर नोकर देऊन तिची बियासला रवानगी केली. तेथे काही दिवस राहून ती सद्‌गुरूंना घेऊन सांगलीस गेली. मलाही सद्‌गुरूंचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा होती. म्हणून डॉक्टरांचे न ऐकता, प्रवासाची दगदग सोसूनही मी सांगलीस गेले. ग्वाल्हेरची सर्व मंडळी पण त्यावेळी राजेसाहेब व कमळाबाई यांच्या समाचाराला व सद्‌गुरूंच्या दर्शनाला आली होती. सद्‌गुरूंनी रोज हिंदी भाषेत प्रवचने ( सत्संग ) केली. त्यासाठी पुष्कळ लोक जमत. या त्यांच्या मुक्कामात सद्‌गुरूंनी सांगलीस दीडशेच्यावर लोकांना ‘ नाम ’ दिले. त्यांत आमचा आबासाहेब व पद्मावतीहि होती.

मग माझ्या मनात आले की, रावसाहेब युवराजाच्या मुलाला सद्‌गुरूंच्या हस्ते पाळण्यात घालून त्याचे नाव ठेवून घ्यावे. या तिच्या नातवाला सद्‌गुरूंचे हात लागू देत, म्हणजे त्याचे सर्वतोपरी चांगले होत जाईल. माझी कल्पना कमळाबाई व राजेसाहेब यांना फार पसंत पडली. मग कमळाबाईने सद्‌गुरूंना त्याप्रमाणे विनंती केली आणि त्यांनी छोट्या मुलाला आपल्या हातांनी पाळण्यात घालून त्याचे नाव ‘ परशुरामराव ’ उर्फ भाऊसाहेब असे ठेवले.

माणसावर कितीही दुःखाचे डोंगर कोसळले तरी जग काही कुणासाठी थांबत नाही. ते पुढे पुढे चाललेलेच असते, आणि माणसालाही त्याप्रमाणे आपले व्यवहार चालूच ठेवावे लागतात. राजकुमार प्रतापसिंहाच्या मृत्यूनंतर हळूहळू कमळाबाईस वाटू लागले की, आता राजकुमारी शकुंतलाराजांचेही लग्न करून द्यावे, म्हणजे आपण आपल्या मुलांच्या कर्तव्यकर्मांतून मुक्त होऊ. शकुंतलाराजे यावेळी अठरा

वर्षांची असून पुण्याच्या वाडिया कॉलेजात इंटरच्या वर्गात शिकत होती. मी मागेच कमळाबाईस नागपूरकडची एकदोन चांगली स्थळे सुचविली होती. त्यांपैकी श्री. पंडितजी यांच्या स्थळाबद्दल खटपट करण्यास यावेळी तिने मला सांगितले. मुलगा यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण शाखेचा असून नुकताच बी. ए., एल्एल् बी. झाला होता. त्याच्या आईला हा एकच मुलगा असून तो एक वर्षाचा होण्याच्या आतच त्याचे वडील वारले होते. घरची मालगुजारीची तीस गावे, व जहागिरीची पाच गावे, अशी इस्टेट होती. मुलगा अतिशय सज्जन व सुशिक्षित होता. ते लोक हुंडा घेणार नव्हते. "तुम्हांला योग्य वाटेल ते आपल्या लेकीला व जावयाला करा. आमचे मान आम्ही करू, तुमचे तुम्ही करा" एवढेच ते म्हणाले. मुलाने मुलगी पाहून पसंत केली व लग्न मार्च १९४३ मध्ये नागपुरास करण्याचे ठरले. कमळाबाई व राजेसाहेब यांची मने अद्याप अस्वस्थ असल्यामुळे लग्नाची सर्व व्यवस्था आम्ही स्वतःवर घेण्याचे ठरविले. भांडीकुंडी, धान्ये, आचारी, वाढपी वगैरे सर्व आम्ही नागपुरास उमरावतीहून नेले. लग्नसमारंभ थाटाने पार पडला. मुलाकडील मंडळींनीही सर्व समारंभ उभय पक्षास शोभेसा केला. कोणत्याही प्रकारचे रुसणे, रागावणे, गैरसमज वगैरे अजीबात झाले नाही. कमळाबाईने जावयाला, व मुलीला आपल्या वाकांच्या मुलींप्रमाणेच सर्व देणग्या दिल्या. याप्रमाणे ईश्वरकृपेने लग्नसमारंभ उत्तम होऊन सांगलीकर मंडळी सांगलीकडे गेली, व आम्ही उमरावतीस परत आलो.

यानंतर आमच्या बाळासाहेबाला खड्या लष्करी हुद्याच्या कामावर रुजू होण्यासंबंधी लष्करी खात्याकडून हुकुम आला. त्याला पहिली दोन वर्षे क्याप्टन व मग मेजर या हुद्याची कामे देण्यात येणार होती. त्याची पहिली नेमणूक मला वाटते कराचीस झाली. तो तारादेवी व जयकुंवर यांना बरोबर घेऊन गेला. आता घरात आम्ही तीनच माणसे राहिलो–मी, माणिक व अण्णासाहेब! माझी प्रकृती आता अधिकाधिक होत चालली होती. म्हणून मी १९४२ मध्येच दोघे मुलगे व दोघी सुना यांच्या नावाने दागिने व चांदीची भांडी यांच्या वाटण्या करून त्या याद्यांवर अण्णासाहेबांच्या सह्या घेतल्या होत्या. या वाटण्यांच्या वेगवेगळ्या पेट्या करून त्यांत याद्यांच्या प्रती ठेविल्या व पेट्यांवर कपडा शिवून त्या मोहोरबंद करून ब्यांकेत ठेवल्या. हे सर्व काम माणिककडूनच करवून घेतले.

१९४३ च्या उन्हाळ्यात आम्ही महाबळेश्वरी गेलो. माझी अतिशय इच्छा होती की, मला इतपत प्रवास झेपत आहे तोवर एकदा महाबळेश्वरचे शेवटचे दर्शन घेऊन यावे! आणि खरोखरीच महाबळेश्वरी माझ्या मनाला फार शांती मिळाली. पूर्वी जेथे मी पायी फिरायला जात होते अशी किती तरी स्थळे मी मोटारीतून पाहिली. अनेक जुन्या आठवणींनी मनात गर्दी केली. त्यामुळे आनंदही होई, व एकप्रकारची खिन्नताही वाटे की, पूर्वी आपण कसे बलवान होतो व आता कसे दुर्बल व अपंग झालो! या विचाराने जगाच्या नश्वरतेबद्दल माझ्या मनाची भावना

अधिकाधिक दृढ होई. फावल्या वेळात मी सद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे जप करीत असे, त्यामुळेही माझे शारीरिक क्लेश नाहीसे झाल्यासारखे वाटत. या मुक्कामात किती तरी जुनी जुनी ओळखीची मंडळी भेटली. बडोद्याच्या महाराणी चिमणाबाईसाहेब मोठ्या अगत्याने मला येऊन भेटल्या. त्यांचे व आमचे प्रेम त्यांनी निरंतर चालविले.

इथे यावेळीं महाबळेश्वरीच मी माझे आत्मचरित्र–जे मी १९४२ च्या जुलैच्या महिन्यात लिहिणे सुरू केले होते ते माणिककडून पुढे लिहवून घेण्यास जोरात सुरुवात केली. त्यात माझे मन गढून जाई व माझ्या शारीरिक यातनांचा विसर पडे. जून महिन्यात काही दिवस पुण्यात राहून आम्ही उमरावतीस परतलो.

१९४३ च्या आश्विन शुद्ध प्रतिपदेला येणाऱ्या माझ्या वाढदिवसानिमित्त उमरावती येथील वनितासमाजाने माझा जाहीर सत्कार करण्याचे ठरविले. मला असले सत्कार अगदी नको होते. विशेषतः राजकुमार प्रतापसिंह गेल्यापासून अशा गोष्टी मला तिळमात्रही गोड वाटत नव्हत्या. खरे, माझ्या हातून तसे मोठे समाजकार्य काही घडले नव्हते. पण त्या बायका ऐकेनात! समारंभ आमच्याच बंगल्यावर झाला व त्यासाठी अकोला, यवतमाळ, बुलढाणा वगैरे ठिकाणांहून बायका आल्या होत्या. एकंदर सातआठशे बायका समारंभाला जमल्या. भाषणे झाली. ते सर्व मला भारी जड वाटले. माणिकने त्यावेळीं आपणा सर्व भावंडांतर्फे पाच हजार रुपयांची देणगी काही अटींवर माझ्या नावाने हॉल बांधण्यासाठी वनितासमाजास दिली! कमळाबाईने वाढदिवसाचा अहेर म्हणून माझ्यासाठी एक सुंदर ‘ प्लिमथ ’ मोटार घेऊन पाठविली. माझ्या मुलांच्या माझ्यावरील प्रेमाने मी भारावून गेले!

इ. स. १९४४ चा उन्हाळा आम्ही मुंबईस काढण्याचे ठरविले. मरीन ड्राईव्हवरील नेहमीचा फ्लॅट आम्ही घेतला होता. या मुंबईच्या मुक्कामात एक गोष्ट माझ्या मनाला फार मोठे समाधान मिळवून देणारी घडली. अण्णासाहेब एक दिवस मला म्हणाले, “ तुमच्या इच्छेप्रमाणे आबासाहेबाला संस्थानी नोकरीतून काढून इंग्रज सरकारच्या चांगल्या नोकरीत जाण्याचा लवकरच योग येणार आहे. ” हे ऐकून तर मला असे झाले की, सद्गुरूंनीच माझी प्रार्थना ऐकली! मी त्यांना वरचेवर पत्रांतून विनंती करीत असे की, “ आबासाहेबाला सांगलीच्या नोकरीत राहू देऊ नका. ” कमळाबाईनेही आता त्याला सांगलीच्या नोकरीत राहण्याचा आग्रह केला नाही. ती म्हणू लागली, “ आबासाहेबाच्या अंगी जे थोर गुण व विद्वत्ता आहे, त्यांचा विकास होण्याला संस्थानच्या संकुचित वातावरणात वाव नाही. त्याला आमच्याकडे डांबून ठेवणे मला स्वार्थीपणाचे वाटू लागले आहे. ” या घटनेमुळे माझ्या मनात फार दिवस सलत असलेले शल्य दूर झाले!

याच सुटीत शांताबाई ( देसाई ) ची दुसरी मुलगी मीनाक्षी हिचा विवाह धारवाड कॉलेजचे रिटायर्ड प्रिन्सिपॉल श्री. जी. बी. जठार यांचे चिरंजीव क्षितीश जठार यांच्याशी ठरला. सुलगा ऑल इंडिया रेडिओमध्ये अधिकाराच्या जागेवर होता.

तो इंग्लंड येथे पदवी घेऊन आलेला होता व चांगला देखणा असून स्वभावानेही चांगला होता असे आम्हांला समजले. लग्न नोव्हेंबरमध्ये मुंबईस झाले. लग्नासाठी मुंबईस जाणे माझ्या प्रकृतीस झेपण्यासारखे नव्हते. म्हणून मी माणिकला आग्रह करून मुंबईस धाडले. सांगलीहून आबासाहेब व पद्मावतीही गेले. विजापूरच्या देसाई-मंडळीव्यतिरिक्त सांगलीची मंडळी, ग्वाल्हेरची राजवाडे मंडळी वगैरे अनेक आतेष्ट लग्नाला आले होते. शांताबाईने पाहुण्यांना ताजमहाल हॉटेलमध्ये इंग्रजी पद्धतीचे जेवण दिले.

१९४४ अखेर आबासाहेबाची नव्या सरकारी ( ब्रिटिश ) नोकरीत नेमणूक झाली. ही नोकरी म्हणजे सरकारने नेमलेले न्यायदानाचे खास मंडळ (Special Tribunal ) होते त्यात होती. पगार व अधिकार मोठा होता. नव्या जागेवर रुजू होण्यापूर्वी महिना दीड महिना तो व पद्मावती उमरावतीस आमच्याजवळ येऊन राहिले. सांगली संस्थानच्या नोकरीत त्याने चांगले नाव मिळविले होते. तो तेथील नोकरी सोडून आला तेव्हा तिकडच्या लोकांना फार वाईट वाटले. डिसेंबर ( १९४४ ) मध्ये तो आपल्या नव्या नोकरीवर कलकत्त्यास रुजू झाला.

आबासाहेब नोकरीवर रुजू झाला त्यापूर्वी एक दिवस मी त्याला म्हटले, " अण्णासाहेबांनी आतापर्यंत मला सुख देऊन माझ्या अनेक तऱ्हेच्या हौशी पुरविल्या. तुम्ही मुलेही अत्यंत गुणी व प्रेमळ आहात. तरी माझी एक इच्छा तुम्हांला सांगते. या माझ्या सौख्यावर कळस म्हणून आपल्या घरात माझी एक प्रतिमा राहावी व ती म्हणजे अण्णासाहेबांनी मला दिलेली एक मूल्यवान मोत्यांची सुंदर नथ आहे, तीवर मोठ्या खुल्या हिऱ्यांचा तुरा तुम्हां दोघा मुलांनी मला करून द्यावा. " त्या काळात त्याला पंधराशे रुपये लागणार होते. त्याप्रमाणे आबासाहेबाने एक हजार व बाळासाहेबाने पाचशे रुपये असे मिळून ती रक्कम माझ्या हाती देण्याची व्यवस्था केली. मी लागलीच मुंबईचे आमचे जवाहिरे बोलावून एक मोठा खुला हिरा घेऊन माझी नथ गुंफवून घेतली व त्या नथेसह माझा फोटो काढला. त्यावेळी मला जी धन्यता वाटली ती मी शब्दांनी वर्णन करू शकत नाही ! अण्णासाहेब मला म्हणाले, " अद्याप तुमची दागिन्यांची हाव उरलीच आहे का ? " मी म्हटले, " ही हाव नाही. तुम्ही जो मला सौख्याचा महाल दिला आहे, त्यावरचा हा कळस आहे. त्याची ही संपूर्ण प्रतिमा आपल्या वंशात कायमची राहावी अशी माझी इच्छा आहे. "

मला वाटते १९४५ च्या सुरुवातीस असेल, आमचा बाळासाहेब एक वर्ष लष्करी नोकरी करून नंतर त्या नोकरीतून निवृत्त होण्याच्या विचाराने उमरावतीस आला. त्याला अत्यंत आवडणारी नोकरी तो का सोडीत आहे, हे माझ्या ध्यानात आले नाही, व मी त्याला विचारलेही नाही. पुढे त्याच्या काही मित्रांकडून याचे कारण मला समजले. बाळासाहेब बदली होऊन नगर येथे असताना त्याची व प्रसिद्ध

मराठी ग्रंथ सं. ‍ालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: ....................
क्रमांक ...................... नोंद दि ....................



सौ. यशोदाबाई जोशी ( वय ७७ )　　　डॉ. सर मोरोपंत जोशी ( वय ८४ )

पुढारी अच्युत पटवर्धन यांची फार मैत्री होती. त्यांचे एकमेकांकडे पुष्कळ जाणेयेणे असे. पण अच्युत पटवर्धन कट्टर राष्ट्रीय कार्यकर्ते, व इंग्रजांच्या विरोधी पक्षातले! तेव्हा बाळासाहेबाला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, "तुम्ही या माणसाकडे जाणेयेणे बंद करा. हा क्रांतिकारक आहे–त्याच्याशी संबंध ठेवणे धोक्याचे आहे–त्यामुळे तुम्ही एकदम नोकरीतून बडतर्फ होण्याची शक्यता आहे!" त्यावर बाळासाहेब त्याला म्हणाला, "असे असेल तर मी ही नोकरी म्हणजे गुलामगिरीच समजतो, व आताच राजीनामा देतो." मग त्या इंग्रज अधिकाऱ्याने त्याला बऱ्याच समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. त्याला बाळासाहेबाचा दिलदार व धाडसी स्वभाव फारच आवडत असे, पण बाळासाहेबाने आपला निर्धार कायम ठेवला. तेव्हा तो इंग्रज अधिकारी त्याला म्हणाला, "तू राजीनामा देऊ नकोस. मी तुला लष्करातच असे काम देतो की जे लष्करी कायद्यात खुपणारे नाही, आणि ज्यातून तुला वाटेल तेव्हा सेवानिवृत्त होणे सोपे जाईल. तुला मी वऱ्हाडात रिक्रूटिंग ऑफिसर म्हणून बदली करून पाठवितो. तेथून पुढे 'माझी वऱ्हाडांत शेती आहे, ती पाहून मला लष्करी काम जमत नाही' असे काही तरी सांगून, एक वर्षानंतर पाहिजे तर निवृत्त हो." तो उमरावतीस परत आला त्याचे कारण हे असे होते. त्याच्या स्वाभिमानी वृत्तीबद्दल मला कौतुक वाटले!

१९४५ एप्रिलमध्ये आम्ही मुंबईस गेलो. पण यावेळी प्रवास मला अतिशय त्रासदायक झाला. स्वतंत्र डबा व सर्व सुखसोई असूनही मला आगगाडीच्या धक्क्यांमुळे असह्य वेदना झाल्या. अशक्तपणा तर सारखा वाढतच होता. डॉ. तिरोडकर व डॉ. वाड यांचे उपचार चालूच होते. पण इन्जेक्शने व औषधे यांनी मी अगदी कंटाळून गेले होते. माझे पहाटेचे स्नान, पूजा व जपजाप्य मी शक्यतो चालूच ठेवले होते. आतापर्यंत आपल्या स्वभावात दीर्घ आजारीपणामुळे चिडचिडेपणा येऊ नये म्हणून मी फार जपत असे. पण दुःख सोसण्याची तरी सीमा असते! सद्गुरुंची एक अमेरिकन शिष्या या सुमारास माझ्यावर इलाज करण्यासाठी बियासहून आमच्याजवळ येऊन राहिली होती. महिना दीड महिना तिचे उपचार घेऊनही माझ्या अंगाच्या वेदना कमी झाल्या नाहीत. तेव्हा मी मनाशी खूणगाठ बांधून ठेवली की, माझे हे दुखणे मानवी शक्तीच्या बाहेर आहे! या सुमारास, का कुणास ठाऊक, माझ्या मनाला फारच अस्वस्थता वाटू लागली!' जूनअखेर आम्ही उमरावतीस परत आलो! ही आपली मुंबईची शेवटची खेप, अशी माझ्या मनाची पक्की भावना झाली!

पण मुंबईस असताना माझ्या मनाला वाटणाऱ्या अस्वस्थतेचे कारण लवकरच मला समजायचे होते! आमच्या ताईचे पती जनरल राजवाडे यांची प्रकृती अलीकडे बरी राहत नसे. म्हणून ते व ताई डॉक्टरांना प्रकृती दाखविण्यासाठी पुण्याहून मुंबईस गेले. त्यावेळी तेथे त्यांना एकदम अर्धांगाचा झटका आल्याचे

ताईने आम्हांला कळविले. ते ऐकून अण्णासाहेब एकदोन दिवसांत मुंबईस जाण्यास निघणार होते. इतक्यात जनरलसाहेबांच्या मृत्यूची बातमी तारेने येऊन थडकली! ती बातमी ऐकून आम्हांला जो विलक्षण शोक झाला तो शब्दांनी व्यक्त करणे शक्य नाही! देव तरी का असा आमचा अंत पाहत होता? पण एका श्लोकात म्हटले आहे ना की, "सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता। अहं करोमीति वृथाभिमानः। परो ददातीति कुबुद्धिरेषा। प्रारब्धसूत्रे ग्रथितोऽपि लोकः॥" तेच खरे!!

त्याच दिवशी आपल्या लाडक्या ताईच्या सांत्वनासाठी अण्णासाहेब मुंबईस गेले. खरोखर आमच्या ताईच्या सुखमय संसाराला पुरती दृष्ट लागली! तिच्यासारख्या विद्वान, कर्तृत्ववान, समाजास अनेक दृष्टींनी आदर्श, अशा स्त्रीवर हा प्रसंग यावा हा केवढा दैवदुर्विलास! तिने डॉक्टरीत उत्तम नाव मिळविले, आदर्श संसार केला, व उत्तम प्रकारे समाजसेवेची कामे करून हिंदुस्थानात तर नाव मिळविलेच, पण परदेशातही स्त्रियांच्या उन्नतीबाबत कार्य करणाऱ्या संस्था होत्या, त्यांत तिच्या कामाबद्दल प्रशंसा होत होती! अशा या आमच्या कर्तबगार मुलीचा संसार एकाएकी उघडा पडला!

❀ ❀ ❀

दिवसांमागून दिवस चालले होते. काळ काही कोणाकरिता थांबून राहत नाही. या वर्षीचे (१९४५) सणवार सर्व आम्हांला शून्यवत झाले. कशातच मन लागेना! वर्षअखेर बाबा भिडे उमरावतीस सुटीवर आला होता. मला आता असे वाटू लागले होते की, आपल्या डोळ्यांदेखत याचे लग्न व्हावे, म्हणजे माणिकचा विस्कळित झालेला संसार तो पुढे चालवीत आहे असे आपल्याला पहायला मिळेल. माणिकही म्हणे की, "तुम्हीच त्याला लहानाचा मोठा केलेला आहे—तुमच्या समोर तो संसाराला लागला म्हणजे त्याचे कल्याण होईल, आणि माझेही आयुष्यातील त्याच्याबद्दलचे कर्तव्यकर्म संपेल. मग तुम्ही दोघे असेपर्यंत मी तुमची सेवा करीत राहीन, व तुमच्यानंतर जिवंत राहिलेच तर उरलेले आयुष्य एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी जाऊन कंठीन." माणिकचा निश्चय नेहमीच पक्का असायचा! त्यामुळे तिच्या या बोलण्याने मला फार हुरहूर लागली. पण बाबाजवळ लग्नाची गोष्ट काढताच तो म्हणे, "मला अजून सहासात वर्षे लग्न करायचे नाही." यामुळे त्याला किती तरी चांगल्या मुली सांगून येत असूनही 'त्याला तूर्त लग्न कर्तव्य नाही' असे आम्हांला त्यांना सांगावे लागे.

१९४५ साली दुसरे महायुद्ध संपले म्हणून हिंदुस्थानला लवकरच स्वराज्य मिळणार अशा सर्वत्र बातम्या ऐकू येऊ लागल्या. इंग्लंडला आपला जगभर पसर-

लेला राज्याचा विस्तार आवरणे कठिण पडू लागले होते. तेव्हा आता हिंदुस्थानची जनता मागत असलेले स्वराज्य त्यांना देऊन चांगुलपणा तरी घ्यावा, असा इंग्लंडचा पवित्रा स्पष्ट दिसत होता. याबाबत काँग्रेस पक्षाच्या इंग्रजांशी वाटाघाटी सुरू झाल्या होत्या. पाकिस्तानच्या रूपाने फाळणीचे विषारी बीज इंग्रज हिंदुस्थानात पेरीत आहेत हे उघड दिसत असूनही 'तूर्त मिळत आहे तशा स्वरूपात स्वराज्य घेऊन टाका' असे काँग्रेसने ठरविले. याबाबतीत लोकमत अनुकूल करण्यासाठी काँग्रेसतर्फे ठिक-ठिकाणी सभा घेण्यात येत होत्या.

अशा वेळीं देशातील भिन्नभिन्न विचारप्रवाह लोकांसमोर मांडले जाणे आवश्यक होते, व हे काम नेमस्तपक्षच उत्तम तऱ्हेने करू शकेल असे अनेक दूर-दर्शी व विचारवंत मंडळींना वाटत होते. अण्णासाहेब पहिल्यापासून स्वतःला नेमस्त पक्षाचे म्हणवीत होते. त्यांची भाषणे मात्र ज्वलज्जहालापेक्षा कडक पण कायद्याला धरून होत असत, त्यामुळे सरकार त्यांना कधीच पकडू शकले नाही. यावेळीं नेमस्त पक्षाची बाजू जनतेपुढे मांडण्यासाठी अण्णासाहेबांनी वऱ्हाडात भाषणे करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पहिली सभा उमरावतीस घेतली. अण्णासाहेबांचे भाषण फार मार्मिक व जिव्हाळ्याचे झाले. "सरकारी नोकरांनी गांधीजींच्या सांगण्याप्रमाणे नोकऱ्या सोडून सत्याग्रहात भाग घेतला नसला, तरी त्यांना देशाबद्दल प्रेम नाही असे म्हणणे चुकीचे होईल... तेही देशभक्तच आहेत. त्यांचा तिरस्कार न करता देशकार्यासाठी त्यांचा कसा उपयोग करता येईल हे पाहिले पाहिजे...एकदम भावनेच्या भरात न गेले पाहिजे..." वगैरे विचार त्यांनी मांडले. पण काही काँग्रेस-वाले ही सभा उधळण्याच्या उद्देशानेच आले होते. त्याबद्दल अण्णासाहेबांना आगाऊ कळलेही होते. तरीपण त्यांनी हे भाषण केलेच ! त्यांचे भाषण पूर्ण होई-पर्यंत मात्र श्रोतृवृंद तटस्थपणाने सर्व ऐकून घेत होता व ते त्याला पटत असल्याचे दिसूनही येत होते. पण एक काँग्रेस गुंड प्रथम आपण होऊनच व्यासपीठावर येऊन, "मोरोपंत जोशी हे वकिलीच्या डावपेचाच्या भाषेने तुमच्यावर छाप पाडीत आहेत, पण ते खरे देशभक्त नाहीत. ते इंग्रजांचे बगलबच्चे आहेत व तुमची दिशाभूल करण्यासाठी सरकारने त्यांना इथे भाषण करण्यास पाठविले आहे..." असे निरर्गल प्रलाप करू लागला ! मग बाकीचे कांही गुंडही आरडाओरडा करू लागले. सभेत एकच गोंधळ माजला. एकमेकांशी मारामारी करण्यापर्यंत वेळ आली आणि शेवटी सभा बरखास्त करावी लागली ! त्या गोंधळातून अण्णासाहेबांच्या मित्रमंडळींनी वाट काढून त्यांना सुखरूपपणे मोटारीत नेऊन बसविले व ते मग घरी आले. त्या गर्दीत अण्णासाहेबांची सोन्याच्या मुठीची काठी कुणी लांबविली !

मग मात्र आम्ही अण्णासाहेबांना स्पष्ट म्हटले की, "तुम्ही आता या काँग्रेसवाल्यांच्या भानगडीत पडू नये. त्यांपैकी बहुतेक लोक सत्तालोभाने भारावलेले आहेत. तुम्ही आजपर्यंत जी देशसेवा केली आहे ती परमेश्वराच्या दरबारी रुजू

आहे. आता या सत्याची चाड नसलेल्या काळात तुम्ही आपला जीव उगीच शिणवू नये..." वगैरे त्यावर ते किंचित हसले व म्हणाले, "लोकांनी स्तुती करावी अशा बुद्धीने आजपर्यंत मी कधी काम केले ? माझ्या सदसद्विवेकबुद्धीला पटले ते काम मी निष्कामबुद्धीने करीत आलो आहे !" पण मग आमच्या डॉक्टरांनीच "या वयात तुम्ही अशा प्रक्षोभकारक सभातून भाग घेणे आमच्या डॉक्टरी दृष्टीने योग्य नाही" असे सांगितले व त्यानंतर त्यांना कोणत्याही सभेत भाषणे करू दिली नाहीत. अशा रीतीने सोनारानेच परस्पर कान टोचल्यामुळे आमचे अनायासे काम झाले.

१९४७ सालच्या चैत्रात हळदीकुंकू करून मगच उन्हाळ्यासाठी चिखलदऱ्यास जायचे असे मी ठरविले होते. हे चैत्रगौरीचे माझे शेवटचे हळदीकुंकू, पुढच्या वर्षी ते पाहण्यास मी जगत नाही, अशा काही तऱ्हेची माझी भावना झाली होती. मी मुलांना तसे सांगितले, तर त्यांनी एवढीशी तोंडे केली व मला धीराच्या गोष्टी सांगू लागली. पण मला आता जीविताचा कंटाळा येऊ लागला होता. असे वाटे, "देवा, आता या शरीराला किती यातना सोसायला लावणार आहेस ?"

यावर्षीची चैत्रगौर मात्र माणिकने फारच कल्पकतेने मांडली. आमच्या सासूबाईंच्या वेळेपासून आमच्या घरच्या चैत्रगौरीची मांडणी विशेष चांगली म्हणून गणली जात असे. मीही त्यात कधी न्यूनता होऊ दिली नव्हती. पण यावेळी हिमालय पर्वताचा देखावा एका मोठ्या पडद्यावर रंगवून घेतला होता व त्यापुढे जंगलाची मांडणी केली असून हत्तीवर चांदीच्या हौद्यात गौर बसली आहे, असे दृश्य तिने तयार करविले होते. सगळीकडे विजेच्या दिव्याची रोषणाई केली होती. त्या दिवशी सातआठशे बायका हळदीकुंकू घेऊन गेल्या. रात्री दरसालप्रमाणे शंभरसव्वाशे पान फराळाचे झाले. हे अपूर्व दृश्य पाहून माझा अंतरात्मा प्रसन्न झाला आणि मी मनोभावाने देवीची प्रार्थना केली की, "माते, गजलक्ष्मीसह आज तू या घरात अवतरली आहेस. असेच या घराण्याचे वैभव कायम ठेव व या घराण्यावर सदैव तुझी कृपा राहू दे. मला मात्र या शरीरयातनांतून सोडवून तुझ्या पायांजवळ ने. हा तुला माझा शेवटचा नमस्कार !"

यानंतर आम्ही लवकरच चिखलदऱ्यास गेलो. या खेपेस जाताना मला मोटारचाही प्रवास झेपला नाही. मोटारचे धक्के असह्य होत होते. मला आता मोटारीत बसवायचे ते सुद्धा झोळीत घालून न्यावे लागे. अण्णासाहेब रोज मला मोटारीतून फिरायला नेत. त्यांना डॉक्टरांनी सागितले होते की, हा असा व्यायाम माझ्या शरीराला हवाच, नाही तर माझे हातपाय अधिकच आखडतील. कोण विलक्षण शरीरभोग हे !

त्यात आमच्या बाळासाहेबाच्या मनात रशियात जाऊन यायचे आले. तो आता लष्करातून पूर्णपणे निवृत्त झाला होता. रिक्रूटिंगचे काम करताना खेड्यांतील

लोकांचे दैन्य त्याने प्रत्यक्ष पाहिले होते. या लोकांच्या उन्नतीसाठी आपण काही तरी केलेच पाहिजे असे त्याच्या मनाला वाटले. त्यासाठी रशियात सहासात महिने राहून सामुदायिक शेतीचा अभ्यास करण्याचे त्याने ठरविले. परदेशात जाण्यात त्याचा उदात्त हेतू होता, आणि ज्या कामात तो मन घालील ते यशस्वी करून दाखवील, हे आम्ही जाणून होतो. म्हणून माझी प्रकृती ही अशी असतानाही त्याला रशियाला जाण्यास मी आनंदाने परवानगी दिली.

यावर्षी अखिल भारतीय महिला परिषदेची बैठक अकोला येथे लेडी रामराव यांच्या अध्यक्षतेखाली भरली. ही परिषद उमरावतीस व्हावी अशी माझी इच्छा होती. पण माझ्या प्रकृतीकडे पाहता परिषद वऱ्हाडात दुसरीकडे कुठे तरी भरलेली बरी असा माणिकने विचार केला आणि स्वतः खटपट करून परिषद अकोला येथे भरविण्याची योजना केली. अकोल्यास परिषद भरविण्याच्या कामी आमचे स्नेही श्री. दिनकरराव राजूरकर यांनी तिला मदत करण्याचे आश्वासन दिले. शिवाय तेथील एक पुढारी श्री. ब्रिजलाल बियाणी यांनी परिषदेच्या कामी पुढाकार घेण्याचे मान्य केले. तेथील एक कार्यकर्त्या सौ. प्रमिलाबाई ओक यांची स्वागतसमितीच्या चिटणीसपदी निवड करण्यात आली. स्वागतसमितीच्या अध्यक्ष श्री. राधादेवी गोएंका होत्या व वऱ्हाडच्या प्रत्येक जिल्ह्यातील एका प्रमुख कार्यकर्तीची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यात उमरावती जिल्ह्यातर्फे माणिकची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या परिषदेच्या कामी तिला फार परिश्रम करावे लागले. तिच्याबरोबर सौ. ताराबाई रणदिवेही वर्गणीसाठी फिरत असत. उमरावती जिल्ह्यातून त्या दोघींनी त्या जिल्ह्याच्या वाटणीला आलेले पाच हजार रुपये जलद जमवून दिले. अण्णासाहेबांच्या नावलौकिकामुळेच हे सर्व जमले व त्यांच्याबद्दल लोकांत अत्यंत आदर व प्रेम असल्याचे तिच्या प्रत्ययास ठिकठिकाणी आले. खरे म्हणजे वकिली व अधिकारपद सोडल्यास आता त्यांना बरीच वर्षे झाली होती. तरी अद्यापही त्यांची लोकप्रियता पूर्णपणे टिकलेली पाहून माणिकला फार धन्यता वाटली. अकोल्याची ही महिला परिषद एकंदरीत उत्तम झाली.

युरोपचे दुसरे महायुद्ध संपल्यावर हिंदुस्थानात सत्याग्रह वगैरे ज्या चळवळी झाल्या त्यामुळे जनतेत जरी अस्वस्थता निर्माण झाली, तरी इंग्लंडलाही फार मोठा हादरा बसला. ब्रिटिश सरकारची घडी बरीच विस्कळित झाली होती, व त्यांना जगभर पसरलेले आपले साम्राज्य ( ज्यावर म्हणतात सूर्य कधी मावळत नाही ! ) पेलेनासे झाले होते. तेव्हा तेथील दूरदर्शी मुत्सद्द्यांनी मोठी औदार्यवृत्ती ( ? ) दाखवून हिंदुस्थानला स्वराज्य द्यावयाचे ठरविले. त्यात औदार्याचा भाग किती होता याची साक्ष इतिहास देईलच. पण स्वराज्य देतानाही त्यांनी राजकारण लढविले. हिंदुस्थानची खांडोळी करून मुसलमानांचे स्वतंत्र ‘ पाकिस्तान ’ निर्माण केले आणि हिंदुस्थानला मुसलमानांचा कायमचा धोका उत्पन्न करून ठेवला. कॉंग्रेस-

वाले तर जी सत्ता मिळेल ती घेऊन टाकण्यासाठी चाईला आले होते जसे ! अशा रीतीने हिंदुस्थानची दोन छकले करून हिंदु-मुसलमानांमध्ये परस्पर द्वेषाचे बीज पेरून इंग्रज साळसूदपणे येथून चालते झाले ! हा इतिहास सर्वांना माहीत असल्यामुळे त्याबद्दल अधिक लिहीत नाही.

हिंदुस्थानला स्वराज्य मिळालेले आपल्या डोळ्यांनी पहायला मिळाले याबद्दल अण्णासाहेबांना फार समाधान वाटले. पण स्वराज्य मिळाले ते खंडित हिंदुस्थानास मिळाले, याबद्दल कोणी बोलणे काढले असता ते एवढेच म्हणत, की, " स्वराज्य ज्या स्थितीत व जसे मिळाले आहे, तसेच ते स्थिर व बलवान् करण्यास जीवापाड झटणे आपले कर्तव्य आहे. याहून याबाबतीत मी अधिक बोलू इच्छित नाही. "

१९४७ मध्ये स्वराज्य मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंदोत्सव झाले. उमरावतीसही मोठी सभा भरली होती. आमची ताई अण्णासाहेबांना आग्रह करू लागली की, " चला आपण या सभेला जाऊ. " अण्णासाहेब म्हणाले, " आता आमच्यासारख्यांनी तेथे जाण्यात काही अर्थ नाही. आम्ही घरीच बसून स्वराज्याचे अभीष्टचिंतन करावे. " पण ताई ऐकेना. ती अण्णासाहेबांना तेथे घेऊन गेलीच. गर्दीतल्या मंडळींनी अण्णासाहेबांना पाहिल्याबरोबर आदराने त्यांना व्यासपीठाकडे जाण्यासाठी वाट करून दिली. व्यासपीठावर वीर वामनराव जोशी, पी. के. देशमुख व इतर कॉंग्रेस कार्यकर्ते बसले होते. त्यांनी अण्णासाहेबांना पाहिले, पण व्यासपीठावर बसण्यासाठी बोलावले नाही ! तास दीडतास प्रेक्षकांच्या गर्दीत उभे राहून अण्णासाहेब घरी आले. कॉंग्रेसवाल्यांनी त्यांजकडे पूर्ण दुर्लक्ष केले, याचे आम्हा सर्वांनाच फार वाईट वाटले. मी मनाशी मग विचार केला की, " असल्या मानअपमानाचा आपण विचार करता कामा नये. खरे देशभक्त कोण आणि खोटे कोण याची नोंद परमेश्वराच्या दरबारी जरूर होत असते, व तेच खरे आहे ! "

सप्टेंबर १९४७ मध्ये आमचा बाळासाहेब विलायतेहून परत आला. त्याच्या इच्छेप्रमाणे त्याला रशियात जायची परवानगी मिळालीच नाही ! पण झेकोस्लोव्हियात जाऊन तेथील शेतीविषयक माहिती मिळविण्याची त्याला संधी मिळाली. तेथील सरकारने आपला खास पाहुणा ( state guest ) म्हणून त्याला आदराने वागविले, व तेथील शेती, बागा व तत्संबंधी संघटना याबद्दल सर्व माहिती मिळवून दिली. युरोपातील अनेक प्रसिद्ध स्थळेही त्याने पाहिली. त्यामुळे आपल्याकडील शेतीचे काम अधिक चांगल्या रीतीने करण्याची त्याला उमेद आली.

यानंतर लवकरच अण्णासाहेबांना राजेसाहेबांनी संस्थाने विलीन करण्यासंबंधी राज्यकर्त्यांच्या धोरणाबाबत विचारविनिमय करण्यासाठी सांगलीस बोलावून घेतले. त्यांच्याबरोबर मी माणिकलाही धाडले. अण्णासाहेबांनी राजेसाहेबांना असा सल्ला दिला की, " तुम्हा संस्थानिकांची स्थिती राज्यकर्ते व प्रजा यांमध्ये कात्रीत

इ. स. १५४२ ते १५८०
क्रमांक १२२६ नोंद दि. २९-६-८७

सापडल्यासारखी झाली आहे. तेव्हा शहाणपणाचा मार्ग हा की, तुम्ही आपले राज्य राज्यकर्त्यांच्या हवाली करावे, व पेन्शन घेऊन स्वस्थ आरामात राहावे. हा प्रसंग शेवटी सर्व संस्थानिकांवर येणारच." सांगलीस असताना अण्णासाहेबांच्या मांडीवर पणतू ( युवराज रावसाहेबाचा मुलगा ) बसवून त्यांच्या डोक्यावर सोन्याची फुले उधळण्याचा समारंभ कमळाबाईने केला. त्यावेळचाही फोटो मजजवळ आहे. तीन आठवड्यांनी अण्णासाहेब व माणिक उमरावतीस परत आले.

आता मी १९४७ साली केलेल्या माझ्या मृत्युपत्राचा थोडासा खुलासा करू इच्छिते. मला जो काही दानधर्म करायचा होता तो मी माझ्या आयुष्यभर सढळ हाताने केलेलाच आहे. त्याची वाच्यता मी करू इच्छित नाही–ते सर्व परमेश्वराच्या घरी रुजू आहे. माझ्या मुलींनाही मी वेळोवेळी निरनिराळ्या प्रसंगांच्या निमित्ताने मुबलक दिले असून त्याबाबत त्या सर्व संतुष्ट आहेत. इ. स. १९४२ मध्ये मी आमच्या घरातील दागिने, सोन्याचांदीची भांडी व रोख रकमा यांची वाटणी करून ठेवलीच होती. १९४७ च्या मृत्युपत्रात मी, माझे मुलगे, सुना व नातू यांना माझ्या स्वतःचे नावे असलेल्या हिश्श्याचे वाटप लिहिले. मी सुनांना त्यांच्या लग्नांत जे दागिने दिले ते सर्व त्यांच्याच नावाने केले–त्यांवर त्यांच्या पतीचाही हक्क ठेवला नाही. माझ्या जिनसांचा मोठा हिस्सा जो जोशी घराण्यातच राहावा अशी माझी इच्छा होती तो—माझा नातू भाऊसाहेब याच्या नावाने करून दिला आहे. आमचे संपूर्ण गाव किसोनी मात्र मी बाळासाहेबाच्याच नावाने करून दिले. हेतू हा की, पुढे ते त्याच्या मुलीस जावे. तिला मी तिच्या लहानपणी दिलेली सोन्यामोत्यांची बाळलेणी तिच्याच नावाने केली आहेत.

यावर्षी नोव्हेंबरात ताईची एक मैत्रीण पंजाबातून आमच्याकडे पाहुणी म्हणून आली. ती शीख धर्माची असून लष्करी डॉक्टर म्हणून तिला मोठ्या हुद्याची सरकारी नोकरी होती. ती आमच्या बियासच्या सद्गुरूंची पुतणी होती. म्हणून तिचे येणे आम्हांला विशेष संतोषप्रदायक झाले. एक दिवस ती मला म्हणाली, "आपल्या रोगावर रामबाण असे औषध आम्हा डॉक्टरांजवळ नाही. पण आपल्या यातना कमी करण्याचा एक दैवी उपाय आहे. आमच्या शीखांचा जो धर्मग्रंथ आहे त्याचा आम्ही तीन दिवस अखंड पाठ करतो. त्या योगाने ज्याच्या नावाने तो केला जातो त्याला पूर्ण शांती व मुक्ती लाभते; असा आमचा विश्वास आहे. तरी त्याबद्दल जर तुमची धार्मिक दृष्ट्या अडचण नसेल तर मला तो पाठ इथे तुमच्या घरी करण्याची परवानगी द्या." मी म्हटले, "आमची तशी धार्मिक दृष्ट्या काहीच अडचण नाही; पण तुम्हांला तसदी देणे मला प्रशस्त वाटत नाही." मग तिने त्याबद्दल आग्रह धरून पाठाची सामग्री गोळा केली. उमरावतीतील शिखांचा गुरुद्वारा शोधून काढून तिने पाठ म्हणणारी माणसे जमविली, आणि माझ्या निजण्याच्या खोलीत पाठ सुरू केला व मला तीन दिवस शेजारच्या खोलीत निजायला सांगितले.

या पाठाचे शीख लोकांत फार मोठे प्रस्थ असते म्हणतात. पाठ म्हणणारांचा प्रत्येकी तीनतीन तासांचा असा, चोवीस तास अखंड पहारा असतो. एका तख्तावर ग्रंथसाहेबाची प्राणप्रतिष्ठा करतात. तेथे अखंड धूप, दीप चालू असतात. पाठ पंजाबीत असल्यामुळे आम्हांला फारसा कळत नव्हता. पण त्यात गुरूची थोरवी व भक्तीचा महिमा सांगितला होता असे दिसले. हे लोक (पाठ म्हणणारे) कुणाजवळून पैसे घेत नाहीत म्हणे! नाहीतर आमचे भिक्षुक! स्वतःला मोठे शुचिर्भूत व ज्ञानी म्हणवून घेणारे, पैशासाठी घासाघीस करतात! आमचा हिंदुधर्म खरोखर अत्यंत उदात्त आहे, पण या स्वार्थी भटाभिक्षुकांनी त्याला विकृत स्वरूप दिले आहे! असो. या पाठाच्या वेळीं गावातील अनेक शीख स्त्रीपुरुष भक्तिभावाने येऊन बसत. पाठाच्या शेवटी (७२ तासांनंतर) या मुलीने–हरबन्सकुंवर असे तिचे नाव होते–माझ्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना केली व डोळे मिटून ग्रंथसाहेबाचे पान उघडले. त्यातील ज्या पहिल्याच मजकुरावर ग्रंथ उघडणाराची दृष्टी पडेल ते त्या प्रसादाचे उत्तर, असे शीख लोक मानतात. माझ्या बाबतीत ते उत्तर अशा अर्थाचे निघाले :

"प्रेमभराने गुरूचा धावा करिताकरिता शिष्य अगदी व्याकुळ झाला, आणि मग गुरूने प्रकट होऊन हसतमुखाने त्याला आपल्या दिव्य, आनंदमय व शाश्वत अशा स्थानाप्रत नेले."

यावर हरबन्सकुंवर म्हणाली, "हा सर्वोत्कृष्ट असा संदेश आहे. इतकी स्पष्ट वाक्ये सहसा निघत नाहीत."

याचा पूर्ण अर्थ मी मनात जाणला की, आता मला देव–सद्‌गुरू महिन्या दीड महिन्याच्या वर या जगात ठेवणार नाहीत! देवाने माझा धावा ऐकला आहे, आणि तो मला अधिक शक्ती व शांती देऊन माझ्या हातून जास्त एकतानतेने भजनजपन करून घेणार. नाम देताना मला सद्‌गुरूंनी आश्वासन दिले होते की, "तुम्हांला या जन्मानंतर सद्‌गुरू जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त करून त्याच्या परमधामाप्रत नेणार" वगैरे. त्यामुळे आता मला या जगाबद्दलचे मायामोह कमी होत असल्याचे भासू लागले आहे. आता या दिवसानंतर जे काही माझ्या हयातीत घडेल ते मार्णिकने लिहून पुरे करावे. मी हे आत्मचरित्र लिहवून घेतले ते माझ्या जीवनात ज्या ज्या गोष्टी घडत गेल्या व त्यांचे माझ्या मनावर जे जे पडसाद उठत गेले ते व्यक्त करण्याचा माझ्या अल्पमतीप्रमाणे मी प्रयत्न केलेला आहे. त्यात मी सुखदुःखांचे प्रसंगही सांगितले, त्याबद्दल कोणी रागलोभ मानू नये. मनुष्य आपल्या पूर्वकर्मानुसार सुखदुःख भोगण्यासाठी या जगात जन्मास येत असतो. श्रेष्ठ सद्‌गुरू मिळण्याचे भाग्य आम्हांला या जन्मी लाभले आहे. ते आम्हांला या भवसागरातून खास तारून नेतील.

परमेश्वराने मला प्रेमळ व सच्छील असे मुलगे, मुली, सुना, नातवंडे वगैरे भरपूर ऐश्वर्य दिले. याबद्दल मला धन्यता वाटते. अण्णासाहेबांबद्दलच्या माझ्या

भावना तर वाणीने व्यक्त करणे मला अशक्य आहे! ते ईश्वरी अवतार असून आम्हां कुटुंबियांना उद्धरण्यास या लोकी अवतरले आहेत अशी माझी दृढ श्रद्धा आहे. त्यांचा गुणगौरव मी कसा आणि किती करू? या माझ्या कुटुंबियांना परमेश्वर सदैव आपल्या कृपाछत्राखाली ठेवो, एवढी प्रार्थना करून, हे माझे लिखाण सद्गुरूचरणी अर्पण करून संपविते.

● ● ●

## [ १५-१२-१९४७ नंतरची हकीकत माणिकबाई भिडे यांनी लिहिलेली ]

आज तीन वर्षांच्यावर दिवस होऊन गेले, आमची ती दिव्य गृहदेवता, आमची पवित्र माता, स्वर्गलोकाप्रत गेली! तिने मला सांगितले होते की, ज्या ठिकाणी तिने आपले आत्मचरित्र लिहिणे थांबविले होते, त्यापुढची तिच्या अंतकालापर्यंतची हकीगत मी लिहून ठेवावी. पण ती स्फूर्तिदेवता अंतर्धान पावल्यानंतर काही काळ मला लिहिणे अशक्य झाले. आमच्या घरातली प्रत्येक वस्तू जणू काही मला विचारीत होती की, "आमच्यासारख्या निर्जीव वस्तूंचीही जिवापाड जोपासना करणारी आमची ती आक्का कुठे गेली?" घरातली प्रत्येक चीज, बागेतले प्रत्येक झाड, हरळीसुद्धा तिच्या हाताने जोपासलेली होती. मग आम्ही तर तिची प्रत्यक्ष मुले! तिच्यासाठी आमचा अंतरात्मा किती प्रकाराने तळमळत होता, हे शब्दांनी सांगणे शक्य आहे का? परमेश्वराचे वर्णन करताना वाणी कुंठित होते म्हणतात. पण परमावधीचे दुःख सांगतानाही तशीच वाणी कुंठित होते, असा मला यावेळीं अनुभव आला.

आणि मनाच्या अशा विकल स्थितीत कष्टी मनाने आम्ही दिवस कंठीत असताना, आमचा लाडका भाऊराया बाळासाहेब यास ९ जून १९४९ रोजी घोर कालाने अकस्मात झडप घालून आमच्यापासून हिरावून नेले! आमची माता असताना त्याला हात लावण्याची मृत्यूचीही प्राज्ञा झाली नव्हती! त्याच्या जीवा-वरची अनेक संकटे तोवर टळली होती. तो आम्हां सर्व भावंडांत धाकटा म्हणून आमच्या आक्काचे (मातेचे) व आम्हां सर्व भावंडांचे त्याचेवर फार प्रेम होते. त्यालाही आपल्या आक्काबद्दल अतिशय ओढा होता. ती गेल्यापासून तो रोज

तिच्या समाधीचे दर्शन घेऊन यायचा व आमची सर्वांची–विशेषेकरून माझी वडील भावाप्रमाणे काळजी घ्यायचा !

हाय हाय ! तो दारुण प्रसंग आमची आक्का असताना ओढवला असता तर ! तिच्या दुःखाची परमावधीच झाली असती ! जळावीण तडफडणाऱ्या माशा-प्रमाणे तिने तत्काळ प्राण सोडला असता ! हो, सर्व दुःखांवर मात करणाऱ्या या दुःखापासून देवाने मोठी कृपा करून तिला वाचवले होते म्हणायचे ! आमचे अण्णासाहेब एवढे धैर्यमेरू ! पण तेही बाळासाहेबाच्या वियोगदुःखाने अगदी हादरून गेले ! तथापि फार शांतीने त्यांनी ते सहन केले ! त्यांच्या स्थितप्रज्ञ स्वभावाचा परमेश्वराने हा कठोर अंत पाहिला होता. त्यांनी आपल्या दुःखाचा निश्वासही कधी आमच्या नजरेस पडू दिला नाही. ते पूर्वी आमच्या आक्काला म्हणायचे, “ तुमचे दोघे मुलगे आहेत. त्यांना सांगा, असे जोडीजोडीने लोकांसमोर जात जाऊ नका... दृष्ट होईल...” त्यावेळी त्यांना हे पुढील दुष्ट संकट जणू काही आगाऊ सूचना देत होते, असे त्यांनी आता एकदा उद्गार काढले ! आणि याच वेळी त्यांनी मागे मला सांगितलेल्या उपमेची आठवण झाली. ते म्हणाले होते, “ हत्ती कसा अंकुशाच्या लहानमोठ्या टोचण्या शांतपणे सोशीत आपला मार्ग आक्रमीत असतो-त्याला गजगतीच म्हणतात–तसे माणसाने धीमेपणाने दैवाचे घाव सोशीत आयुष्य आक्रमण करायला हवे.” यानंतर मात्र ते मनापासून हसलेले आम्ही कधी बघितले नाहीत !

अशा रीतीने या व्यथित मनःस्थितीत तीन वर्षांच्यावर दिवस निघून गेले प्रत्येक क्षण मला युगाप्रमाणे वाटत होता. आता माझ्या मनाला सारखी टोचणी लागली होती की, “ तुझ्या आक्काची शेवटची इच्छा पूर्ण करायला तू का विलंब करीत आहेस ? कोणतेही काम दुसऱ्या दिवसावर टाकू नये. आक्काने सांगितल्या-प्रमाणे पुढचा मजकूर लवकर लिहून काढ. ”

—आणि तो मजकूर लिहिण्यास मी हातात लेखणी घेत आहे. केवळ तिच्याच इच्छेमुळे मी तो लिहू शकेन असा मला भरंवसा वाटतो.

मागे वर्णिल्याप्रमाणे त्या गुरुग्रंथाच्या अखंड पाठाची समाप्ती झाल्यावर आमच्या आक्काने आम्हांला शेवटच्या निरवानिरवीच्या ज्या काही गोष्टी सांगितल्या, त्यानंतर तिची प्रकृती भराभर ढासळू लागली ! इकडे पाहावे तो ती अंगाने अधिकाधिक रोड होत चालली, आणि तिकडे पाहावे तो तिच्या चेहऱ्यावर शांती व दिव्यकांती वाढतच चालली ! तिचा तो पहाटेचा स्नानभजनपूजन नियम, स्वतः रोज खुर्चीत बसून स्वयंपाकघरात जाऊन सर्व पदार्थांवर लक्ष ठेवणे, तेथे एक तोंडीलावणे स्वतः करणे, सर्व मुलाबाळांची तर चौकशी करायचीच, पण घरातली गुरेढोरे व बगीच्यातील झाडेफुले यांच्याही निगेबद्दल विचारपूस करणे, हा तिचा कार्यक्रम मृत्यूच्या आधल्या दिवसापर्यंत तिने अखंड कायम ठेवला ! तिची प्रबल

इच्छाशक्तीच तिच्या हातून हे सर्व करवून घेत होती. या सर्व गोष्टी ती त्यांवरील आसक्तीने करीत नसून आपले ठरविलेले कर्तव्यकर्म शेवटपर्यंत करीत राहायचे या भावनेने करीत होती, हे आम्हांला स्पष्ट दिसत होते.

संक्रांतीच्या सणाची आमच्या घरी महिना दीड महिना आधी तयारी सुरू व्हायची. दोन अडीचशे पिशव्या अण्णासाहेबांच्या मित्रांसाठी गावोगाव पाठविण्यास म्हणून तयार करायच्या असत. शिवाय आक्काच्या स्वतःच्या आप्तेष्ट बायकांना धाडण्याचे खण व हलव्याच्या पिशव्या पन्नास साठ पार्सले करून शिवल्या जात. इंग्रजी तऱ्हेची कार्डे धाडणे त्यांना आवडत नसे, म्हणून ही हलवा धाडण्याची पद्धत त्यांनी कैक वर्षांपासून चालू केली होती. या वर्षी आक्काने मला संक्रांतीच्या देणगीचे खण लवकर आणण्याची फारच गर्दी केली. मी डिसेंबर १५ च्या सुमारास खण आणण्यास दुकानात गेले. तो काय चमत्कार सांगावा, मला माझे आतले मन बजावून सांगू लागले की, " एक बनारसी जरीचा उंची हिरवा शालू बघून ठेव; तो आक्काला शेवटचा नेसवायला लागणार आहे. " हे माझ्या ध्यानी-मनी नसलेले व मनाला अशुभ भासणारे विचार त्यावेळी माझ्या मनात अचानक कसे उद्भवले, मला कळेना ! मी ते विचार दाबून दुकानातून बाहेर पडले, पण पुन्हा आत ढकलून दिल्याप्रमाणे दुकानात परत जाऊन तसल्या शालूची चौकशी करून तो बघून घरी आले. माझा स्वप्नावर विश्वास नव्हता, व मला स्पष्टशी स्वप्ने पडतही नसत. पण त्या रात्री मला स्पष्ट स्वप्न पडले की, एका सुंदर, मोठ्या व गोल गादीवर सद्गुरू बसले आहेत, सभोवती काही तेजस्वी मंडळी बसलेली असून, आमची आक्का तोच हिरवा शालू नेसून सद्गुरूंच्या खांद्याच्या टोकास डोके टेकून बसली आहे, व जवळची मंडळी म्हणताहेत, " यांना सद्गुरू फार दूर नेणार आहेत—हे विमान आहे ! "

या स्वप्नानंतर मी घामाघूम होऊन खडबडून जागी झाले, आणि माझ्या मनाने घेतले की, आता सद्गुरू आमच्या आक्काला नेणार ! मग मी डॉक्टरना विचारले, " आक्काच्या प्रकृतीत तुम्हांला काही जास्त बिघाड दिसतो का ? तसे असले तर मला लवकर सांगा. मी कमळाताई ( राणीसाहेब ) व आबासाहेब यांना कबूल केले आहे की, तसे काही वाटले तर मी तुम्हांला तार करीन म्हणून." त्यावर तसे काही विशेष नसल्याचे डॉक्टरांनी मला आश्वासन दिले व ' तसेच वाटले तर आठदहा दिवस आगाऊ मी तुम्हांला धोक्याची सूचना देऊ शकेन ' असे सांगितले. माणसाचे मन तरी काय विचित्र असते पहा ! कित्येक वेळा न घडणाऱ्या गोष्टी-बद्दल ते निष्कारण भीती निर्माण करते, आणि येणाऱ्या संकटाबद्दल खोटी आशा उत्पन्न करून निर्धास्त राहायला सांगते ! या खोट्या आशेत मी घुटमळत बसले !

१ जानेवारी १९४८ च्या दिवशीची गोष्ट. अगदी सकाळी कमळाताईंची तार आली की, " मी, राजेसाहेब व इंदुराजा मुलांसह उद्या सकाळी उमरावतीस

पोहोचत आहो. दोनचार दिवस आम्हाला राहता येईल." त्या मध्यंतरी अकोल्याच्या महिलापरिषदेसाठी येऊन गेल्या, तेव्हां उमरावतीस येऊन सांगून गेल्या होत्या की, "मी जमेल तितक्या लवकर रावसाहेबांच्या मुलाला उमरावतीस आणून त्याला आक्काच्या मांडीवर बसवून, तिच्या डोक्यावर सोन्याची फुले उधळणार आहे." जानेवारी १९४८ च्या अखेरीस तिचा उमरावतीस येण्याचा प्रथम बेत होता, तो एकदम का बदलला हे आम्हांला समजले नाही. त्यावेळी आमचे दोन्ही बंगले रंगसफेतीकरिता रिकामे केले होते, व सगळीकडे सामानाचा व रंगाचा गोंधळ पडला होता. त्यात ही सांगलीची मंडळी उद्याच येणार म्हणून तार आली. आता हा घरातला पसारा आटोपून आपल्या हातून पाहुण्यांची व्यवस्था लवकर कशी होणार याची मला चिंता पडली. पण आमची आक्का तिळमात्र डगमगली नाही, व ते सर्व काम कसे आवरायचे ते मला सांगून "यावेळी सर्वांची व्यवस्था विशेष चांगली व्हावयास पाहिजे" असे मला बजावून ती स्वतः फराळाचे करवून घेण्यास बसली! त्याप्रमाणे मी अधिक मजूर लावून सर्व व्यवस्था केली. सोन्याच्या फुलांच्या समारंभासाठी खालचा हॉल थोड्या वेळात जितका चांगला शृंगारता आला तितका शृंगारला. समारंभासाठी अगदी निकटची——जोशांचीच मंडळी बोलावली होती.

ता. २-१-१९४८ रोजी हा समारंभ सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास साजरा करण्यात आला. त्या वेळचा फोटो आहे. तो आमच्या सुखी कुटुंबाचा शेवटचाच ठरायचा होता! त्या दिवशी आक्काचे चार पणतू तेथे होते. परंतु एकट्या रावसाहेबांच्याच मुलाला तिच्या मांडीवर देऊन तिच्या डोक्यावर सोन्याची फुले उधळली. इंदुराजाचा असा मानस दिसला की, त्या तिघी वहिणींचे मुलगे एकत्र जमवून राजवाडे मंडळींतर्फेचा आक्कासाठी वेगळा समारंभ करावा. त्या दिवशी त्यांपैकी अनंत, उदय व रघुनाथ हे हजर होते. चंद्रावतीदेवीचा यशवंत नव्हता. तो सोन्याच्या फुलांचा सोहळा त्या दिवशी खरोखरच अगदी 'सोन्यासारखा'-च झाला! त्या दिवशी आक्काच्या चेहऱ्यावर इतका आनंद व समाधान झळकत होते की, ही एवढी आजारी व अशक्त आहे असे कोणाला वाटले सुद्धा नाही. तिला व अण्णासाहेबांना कमळाताईंनी रीतीप्रमाणे अहेर दिले. तिनेही सर्व मंडळींना योग्य असे परत अहेर दिले. मग ती म्हणाली, "मला आता देवाघरची सोन्याची दारे उघडली. देव मला लवकर त्याच्या घरी नेवो." त्याच वेळी इंदुराजाने सर्व जोशी कुटुंबियांना तिचा मुलगा व तिचे तिघे पुतणे यांच्या ग्वाल्हेरला लवकरच होणाऱ्या मुंजीची अक्षत दिली. त्यावेळी आक्का म्हणाली, "मला या स्थितीत मुंजीस काही येता येणार नाही; पण या सर्व मुंजामुलांना माझा पूर्ण आशीर्वाद आहे. ती भाग्यवान होतील व तुम्हांला सौख्य देतील." यापुढे चवदाच दिवसांनी तिचे देहावसान होईल हे त्यावेळी आमच्या ध्यानीमनीही आले नाही!

यानंतर १४ जानेवारीला संक्रांत आली. हाच एक सण घरात जुन्या पंचांगा-

प्रमाणे होत असे. यंदा त्यापूर्वी एक आठवडा आक्काने आम्हांला हलव्यांच्या पिशव्या व खणांची पार्सले बाहेरगावी धाडायला लाविली व संक्रांतीची वाणे लवकर आणण्याबद्दल घाई केली. त्याचप्रमाणे किंक्रांतीची बोलावणीही आगाऊ पाच-सहा दिवस पाठविण्यास सांगितली. तेव्हा मी तारादेवीला म्हटले, " मला वाटते, ही किंक्रांत जरा उशीरा करावी; कारण मला आक्का फार अशक्त झाल्यागत वाटत आहे. बायका तिला भेटायला येणारच. मग ती स्वतःला विनाकारण दमवून घेईल." त्यावर तारादेवी म्हणाली, "तसे नको–सगळे अगदी त्यांच्या इच्छेप्रमाणे करू या." ता. १४ जानेवारीला आमच्य आक्काने सकाळी सुवासिनींना स्वतः आपल्या हाताने, हसतमुखाने संक्रांतीची वाणे दिली. मला त्यावेळी तिचे हात अंमळ कंपायमान होत असल्यासारखे वाटले. पण मी मनाची समजूत घातली की, तो निव्वळ भास आहे ! तिने तिची खुल्या हिऱ्याच्या टिकेची मोत्यांची नथ संक्रांतीची वाणे देताना पाचसहा मिनिटे आपल्या नाकात घातली होती. त्यापूर्वी तिने आपल्या नाकातील खुल्या हिऱ्याची चमकी काढून माझ्या हातात दिली. आज कित्येक वर्षे ती चमकी रात्रंदिवस तिच्या नाकात होती. ती मला म्हणाली, " हे बघ, या हिऱ्याची अंगठी करून बाबाचे लग्न होईल तेव्हा त्याच्या बायकोला दे. त्याचे लग्न माझ्या डोळ्यांदेखत झाले नाही याबद्दल मनाला लावून घेऊ नकोस. त्याचा संसार सुखाचा होईल असा मी त्याला मनापासून आशीर्वाद देते. " ते ऐकून मला आतून भडभडून आले व तोंडावाटे शब्द फुटेना ! पण मी माझे अश्रू तिच्या दृष्टीस पडू दिले नाहीत. मग तिने तिची ती आवडती नथ हातात घेऊन तिच्याकडे फार अभिमानाने व प्रेमाने डोळे भरून पाहिले आणि मला म्हणाली, " मी या नथेबद्दल मागे जे सांगितले आहे त्याप्रमाणे करा बरे का ! " असे म्हणून तिने ती नथ तारादेवीजवळ नीट ठेवायला दिली.

ता. १५ जानेवारीला ( १९ ८ ) किंक्रांत होती. यावर्षी नेहमीपेक्षा फार अधिक बायका आमच्याकडे हळदीकुंकवासाठी लोटल्या. त्या दिवशी दुपारी एक वाजता आक्काला थंडी भरून ताप आला. कुणाही बायकांनी तिला भेटू नये म्हणून डॉक्टरनी सांगितले. पहाटे पाच वाजता आक्का म्हणाली, " डॉक्टरांना बोलावून आणा. माझ्या मुलांनाही ताबडतोब तारा करून बोलावून घ्या व सद्गुरूंना तार करा की, आता मला या यातनांतून लवकर आणि कायमचे सोडवा. " डॉक्टरांनी जरी सीरियस नाही म्हणून सांगितले तरी मी, बाळासाहेब, ताई व तारादेवी रात्रभर तिच्याजवळ बसून होतो. सकाळी सात वाजता डॉक्टर आले, व तपासून पाहतात तो तिला न्यूमोनिया झालेला ! तेव्हा तिच्या इच्छेनुसार सर्वांना येण्याबद्दल तारा केल्या व डॉक्टर पेनिसिलीन आणण्यास गेले. मग आक्का म्हणाली, " मला स्नान अन् देवपूजा करू द्या. " तेव्हा ताई म्हणाली, " तुझ्या अंगात आज ताप आहे. तुझ्याऐवजी मी आज पूजा करून घेते. "

इतक्यात सिव्हिलसर्जनला घेऊन डॉ. ओक आले व त्यांनी तिला पेनिसिलीनचे इंजेक्शन दिले. त्यावेळी ती म्हणाली, "आज मला नेहमीसारखे हे टोचले नाही. मला आता डोळ्यांनी काही दिसत नाही...मी आता मरणार!" साडे अकराच्या सुमारास ती ताईला म्हणाली, "मला आता निजून चैन पडत नाही, धाप येऊ पाहत आहे, मला बसवा." ताईच्या खांद्याला डोके टेकून ती बसली. अशीच सद्‌गुरूंच्या खांद्यावर डोके टेकून बसलेली ती मला स्वप्नात दिसली होती! मग मात्र माझ्या हृदयाचा ठाव सुटला आणि कागदातल्या चित्राप्रमाणे मी तिच्या चेहऱ्याकडे बघत स्तब्ध बसले. तिच्या चेहऱ्यावर अद्वितीय शांती आणि तेज दिसत होते. ऑक्सिजन ग्यास देण्यास सुरुवात झाली. पण तिला या जगाचे काही भान नव्हते. रोज भजनाला बसली म्हणजे तिचा चेहरा जसा दिसे तशा तंद्रीत ती होती!

अशा शांत तंद्रावस्थेत असताना दुपारी दीड वाजता तिने अखेरचा श्वास सोडला! मग आमचा दुःखावेग काय सांगावा? अनेकांवर असे दारुण प्रसंग येऊन गेले असतील, पण ज्याचे दुःख तोच जाणे! आमची ही पूज्य माता आम्हांला देवासमान होती. अगदी शांतपणे निजल्याप्रमाणे ती दिसत होती. मृत्यूची अणुभरही कळा तिच्या चेहऱ्यावर आली नव्हती! थोड्याच वेळात ही बातमी सर्वत्र पसरली आणि तिला पाहण्यासाठी लोकांची रीघ लागली. अनेक सुवासिनी येऊन तिची ओटी भरून गेल्या. जिच्या तिच्या तोंडी हेच उद्‌गार होते, "आक्कासाहेबांनी खरी जिंकली! सर्व सुखवैभवात सवाष्णपणी देवाघरी गेल्या." तो दिवसही शुक्रवार— देवीचा वार आणि टिळकपंचांगाप्रमाणे वसंतपंचमीच्या पुण्यपर्वाचा होता. (ता. १६ जानेवारी १९४८)

त्यावेळीं मला कशी एवढी हिंमत आली देव जाणे! माझा मामेभाऊ शिदुभाऊ याला मी सांगितले, "एक बनारसी जरीबुट्ट्यांचा शालू रसिक स्टोअर्समध्ये आहे; तो त्या दुकानदाराला माहित आहे, तो घेऊन ये." तो आणवून तिला नेसविला व सौभाग्यलेणी लेवविली. त्यापूर्वी तिच्या अंगावर असलेले दागिने —हातांतील सोन्याच्या बांगड्या, कानांतील मोत्यांचे कुडूं, बोटांतील मोठ्या पुष्कराजाची अंगठी व गळ्यातील बारीक सोन्याच्या तारेत गाठविलेले मंगळसूत्र—सर्व तसेच तिच्या अंगावर ठेविले. "मंगळसूत्र मी पूजेत ठेवण्यास वेळेवर काढीन" म्हणून मी तिला पूर्वी कबूल केले होते, त्याची मला आठवण झाली. पण तिच्या त्या पवित्र गळ्यातून तिने गेली बहात्तर वर्षे जतन करून ठेवलेले मंगळसूत्र काढण्यास माझे हात धजले नाहीत!

तिचा अंत्यसंस्कार आमच्या बंगल्याच्या आवारातच झाला. तिने पुष्कळ दिवस आधी तशी इच्छा व्यक्त केली होती. आक्काला आम्ही सर्वांनी शेवटची मानवंदना केली—तिच्या पायांवर डोके ठेवून! अण्णासाहेबांनी तिला वाकून नमस्कार केला आणि त्यांच्या तोंडून "आज माझ्या मुलींचे खरे माहेर गेले"

एवढेच शब्द बाहेर पडले ! यानंतर बाळासाहेबाने तिचे अंत्यसंस्कार केले, आणि आमच्या आक्काचा पार्थिव देह अग्नीत नाहीसा होऊन, तिचा आत्मा–जो आम्ही आमच्या हृदयातला अत्यंत कोमल भाग समजत होतो तो-स्वर्गलोकाप्रत चालता झाला !

त्या दिवशी संध्याकाळी सूर्यास्ताचा प्रकाश फारच तेजस्वी अशा सोनेरी व केशरी रंगात फाकला होता म्हणतात. आमचे सांत्वन करण्यास जमलेले आप्तेष्ट आम्हांला सांगू लागले, " कुणी थोर महात्मे स्वर्गलोकी जातात त्यावेळी असे दृश्य दिसते. " पण आम्ही दुःखाच्या गाढ अंधकारात बुडलो होतो. आम्हांला कोणत्याच प्रकारचा उजेड दिसत नव्हता !

तिसरे दिवशी आबासाहेब, पद्मावती, कमळाताई, राजेसाहेब वगैरे परगावची मंडळी येऊन पोचली. त्यावेळींचा आमचा परस्परांचा शोक काय वर्णावा ! त्याच दिवशी रक्षा गोळा केल्या. त्यावेळीं आक्काचे ते दिव्य मंगळसूत्र जसेच्या तसेच सापडले. त्यातले मोती मात्र खडूसारखे झाले होते. काळी पोत जशीच्या तशीच होती. हातांतला हिरवा चुडा तसाच शाबूत होता. हातांतल्या सोन्यांच्या बांगड्या वितळल्या होत्या. बाकीच्या अलंकारांचा मागमूसही राहिला नव्हता. आजपर्यंत आम्ही नुसते ऐकत होतो की, पतिव्रता सतीचे मंगळसूत्र चितेत जळत नाही–ते आज प्रत्यक्षात पाहिले ! गंगाजळाने ते मंगळसूत्र धुवून आम्ही देवपूजेत ठेविले, आणि बांगड्यांचे सोने जे काचेच्या चुड्यांत वितळून मिसळले होते ते, सोनाराकडून काढवून घेऊन, त्याच्या पादुका करवून त्याही देवपूजेत ठेविल्या. त्यानंतर तेरा दिवसांनी अस्थि प्रयागला पाठविण्यात आल्या व त्या दिवशी पुष्कळ दानधर्म केला. बंगल्याच्या आवारात ज्या ठिकाणी तिची दहनक्रिया झाली होती तेथे आम्ही एक सुंदर चौथरा बांधून घेतला. दरवर्षी तिच्या पुण्यतिथीला त्या चौथऱ्यावर आम्ही फुलांची चादर घालतो. मी रोज सकाळी तेथे जाऊन, फुले वाहून, मस्तक नम्र करून नमस्कार करते. पुण्यतिथीच्या आधी सात दिवस बियासच्या सद्गुरूंच्या शिष्यामार्फत अंगणात सत्संग ( प्रवचने ) केला जातो. मी जिवंत असेपर्यंत हा परिपाठ चालू ठेवण्याची माझी इच्छा आहे. यापुढे मनाला शांती मिळायची असेल तर ती या परमार्थमार्गानेच लाभेल अशी माझी दृढ श्रद्धा आहे. आमच्या आक्काने सांगितल्य[illegible]म नथ घालून काढविलेल्या तिच्या फोटोचे मोठे तैलचित्र [illegible]ववरात ठेविले आहे.

देवा, तूंच ह्या जगाची माता आहेस. माता आपल्या लेकराला कधी कधी खूप रागावून आपल्यापासून दूर बसवून ठेविते. पण तो तिचा राग वरकरणीच असतो–मुलांच्या अंतिम कल्याणासाठीच असतो. मुलाला मात्र ते समजत नाही. हे देवा, आमची स्थिती तू तशीच केली आहेस. तू आमच्यावर रागाचे म्हणजेच दुःखांचे डोंगर लोटून आम्हांला शिक्षा का करतोस हे आम्हां लेकरांना कळत नाही !

पण मुलाला मातेने कितीही दूर लोटले तरी ते तिच्याकडेच धाव घेते. तरी हे परमेश्वरा, मी तुझ्या चरणी धाव घेत आहे! या भवसागराच्या दुःखापासून आम्हांला लवकर सोडीव, व तुझ्या त्या शाश्वत आनंदमय पदांप्रत घेऊन चल! म्हणतात की, त्या ठिकाणी तू प्रियजनांची कधीही ताटातूट होणार नाही अशी निरंतरची भेट करवून देशील! देवा, हे खरे आहे का?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3८६३१ वि: ५१
क्रमांक ११२५ नों दि: २६-६-६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ध. क्र. ११८०७
शाखा (स्थळ प्रत)

REFBK 0014451
REFBK-0014451

क्रमांक...३६६३९ दि: ........
ग्रंथ ...१२३६... नोंद दि ...२९-६-५५

## “ जीवनप्रवासा ”तील काही महत्त्वाचे टप्पे

१८६१ सर मोरोपंत ऊर्फ अण्णासाहेब जोशी यांचा जन्म.
१८६८ सौ. यशोदाबाई ऊर्फ आक्कासाहेब जोशी यांचा जन्म.
१८७४ अण्णासाहेब व आक्कासाहेब यांचा विवाह.
१८८१ अण्णासाहेब बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण.
१८८३ अण्णासाहेब एल्एल्. बी.; उमरावतीस वकिली सुरु.
१८८७ कन्या नागूताई ( पुढे राणी राजवाडे ) यांचा जन्म.
१८९० अण्णासाहेबांचे विलायतेस प्रयाण.
१८९१ कमलाबाई ( पुढे राणीसाहेब सांगली ) यांचा जन्म.
१८९१ महाबळेश्वर येथे स्वामी विवेकानंद यांची भेट.
१८९५ माणिकबाई ( भिडे ) यांचा जन्म.
१८९७ शांताबाई ( देसाई ) यांचा जन्म.
१८९७ उमरावती येथे काँग्रेस अधिवेशन.
१८९८ पुत्र एकनाथ ऊर्फ आबासाहेब यांचा जन्म.
१९०३ पुत्र भालचंद्र ऊर्फ बाळासाहेब यांचा जन्म.
१९०७ नागूताई एल्. एम्. अँड एस् ; विलायतेस प्रयाण.
१९१० कमलाबाई यांचा विवाह.
१९१६ नागपूरला बिऱ्हाड.
१९१९ शांताबाई यांचा विवाह; आबासाहेब यांचा विवाह.
१९२० माणिकबाई यांचा विवाह.
१९२० अण्णासाहेब एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर.
१९२२ जामात विनायकराव भिडे यांचे निधन.
१९२३ बाळासाहेबांचा विवाह.
१९२३ अण्णासाहेबांस ‘ सर ’ ही पदवी.
१९२५ अण्णासाहेब लिबरल फेडरेशनचे अध्यक्ष : K. C. I. E. पदवी.
१९२६ नागूताई यांचा विवाह.
१९२८ अण्णासाहेब ‘ संमतीवय समिती ’चे अध्यक्ष.
१९३१ आक्कासाहेब विदर्भ महिला परिषदेच्या स्वागताध्यक्ष.
१९४० अण्णासाहेबांचा ऐंशीवा वाढदिवस; नागपूर विद्यापीठाकडून एल्एल्. डी. पदवी.
१९४२ नातू राजकुमार प्रतापसिंह यांचा मृत्यु.
१९४८ आक्कासाहेबांचे निधन.

* * *